महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
पुणे-३०
रौप्य महोत्सवी प्रकाशन

# समानतेसाठी शिक्षण

१) मुलींचे शिक्षण
२) आदिवासींचे शिक्षण
३) मागासवर्गीयांचे शिक्षण
४) अल्पसंख्याकांचे शिक्षण

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
सदाशिव पेठ कमठेकर मार्ग. पुणे-४११ ०३०.

**प्रवर्तक**
महाराष्ट्र राज्य-शिक्षण विभाग

**संपादक व प्रकाशक**
श्री. व. रा. नागपुरे
संचालक
म.रा.शै.सं.व.प्र.प. पुणे

**कार्यकारी संपादक**
श्री. का. के. डाहुले
सहसंचालक
म.रा.शै.सं.व.प्र.प. पुणे

मूल्य रुपये ४०/-
प्रती - १०००

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
संचालक/संपादक
जीवन शिक्षण
म.रा.शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी ४४३१३८

**मुद्रक**
संगम प्रेस प्रा. लि.
१७ ब, कोथरुड
पुणे ४११ ०२९

...ARY & DOCUMENTATION CENTRE
N... ...rate of Educational
Pl... ...g and ...dministration.
17-B, Sri Aurobindo Marg,
New Delhi-110016
DOC, No ........ D-9053
Date ........ 22-02-96

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मनोगत | १ |
| मुलींचे शिक्षण | ६ |
| मागासवर्गीयांचे शिक्षण | ११२ |
| आदिवासींचे शिक्षण | १८० |
| अल्प संख्यांकाचे शिक्षण | २२४ |

# मनोगत

१९८८-८९ हे वर्ष राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. संस्थेच्या स्थापनेस पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रौप्यमहोत्सवी वर्षात जे उपक्रम कार्यान्वित करण्यात आले त्यामागे एक विशिष्ट दृष्टिकोन ठेवण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून जो कृतिकार्यक्रम केंद्र शासनाने प्रसिद्ध केला आहे, त्यातील काही कार्यक्रम कार्यान्वित होण्यास राज्यात सुरुवात झाली आहे. रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ठरवून दिलेली दिशा व कृति कार्यक्रमात प्रकट करण्यात आलेले विचार यांची सांगड घालून एका विशिष्ट विषयावर काहीतरी विचार मंथन व्हावे व भावी नियोजनाची दिशा परिषदेस मिळावी या हेतूने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात" ज्या विषयाला महत्त्व दिले आहे तो विषय म्हणजे "समानतेसाठी शिक्षण". या विषयाची परिसंवादासाठी निवड करण्यात आली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात "समानतेसाठी शिक्षण" या संदर्भात असे म्हटले आहे की, नवीन धोरण विषमतेच्या बाबी दूर करण्यावर आणि ज्यांना आजवर समानता नाकारली गेली त्यांच्या विशिष्ट गरजांकडे लक्ष देऊन त्यांना शिक्षणाची समान संधी मिळवून देण्यावर विशेष भर देईल.

वरील विचारास अनुसरून "समानतेसाठी शिक्षण" या संकल्पनेतील विविध घटकांना स्पर्श करू शकतील अशा स्वरूपाचे परिसंवाद आयोजित करावेत व त्या परिसंवादातून हाती आलेले विचार, कल्पना, शिफारशी यांना अनुसरून पुढील वाटचालीत परिषदेस काही कार्यक्रम कार्यान्वित करता येतील हा विचार पुढे आला. या विचाराचे फलस्वरूप म्हणजे समानतेसाठी शिक्षण या शिर्षकाखाली मुलींचे शिक्षण, आदिवासींचे शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण, अल्पसंख्यांकांचे शिक्षण हे परिसंवाद नागपूर व औरंगाबाद ह्या ठिकाणी रौप्यमहोत्सवी वर्षात आयोजित करण्यात आले.

"समानतेसाठी शिक्षण-मुलींचे शिक्षण" या विषयावरील परिसंवाद नागपूर येथे दिनांक ३, ४ व ५ मार्च ८९ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी मा. नामदार श्री. शरदरावजी पवार, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य; मा. नामदार श्री. सुधाकरराव नाईक, उर्जा समाजकल्याण व संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा. नामदार श्री. कमलकिशोर कदम, शिक्षण व तंत्र शिक्षण मंत्री, म. राज्य यांचे शुभसंदेश आले आहेत. औरंगाबाद येथे दिनांक १९ व २० मे ८९ रोजी झालेल्या परिसंवादाचे वेळी मा. नामदार प्रा. जावेदखान,शिक्षण राज्यमंत्री, म. राज्य हे दिनांक २०.५.८९ रोजी पूर्ण वेळ कार्यक्रमात उपस्थित राहिले व त्यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या परिसंवादात विषयाशी संबंध असणाऱ्या राज्यातील व राज्याबाहेरील विचारवंतांना आपले विचार निबंधरुपाने सादर करण्याची संधी देण्यात आली. प्रत्येक परिसंवादाचे वेळी परिसंवादात भाग घेणाऱ्यांना व उपस्थितांना त्या विषयाच्या संदर्भात परिषदेमार्फत पायाभूत साहित्य (बेस मटेरियल) पुरविण्यात आले. या साहित्यात मुलींचे शिक्षण, आदिवासींचे शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण व अल्पसंख्याकांचे शिक्षण या सर्व प्रश्नांचे बाबतीत स्वातंत्र्यपूर्व काळ, स्वातंत्र्योत्तर काळातील स्थिती व शासन करीत आलेले प्रयत्न हे सर्व शब्दांकित करण्यात आले आहे. चारही परिसंवादांचे वेळी स्वतंत्ररीत्या तयार करण्यात आलेले साहित्य व विविध तज्ज्ञांनी सादर केलेले निबंध संकलित स्वरुपात एकाच प्रकाशनाद्वारे शिक्षणप्रेमी वाचकांच्या हाती दिल्यास ते नक्कीच विचाराला चालना देणारे ठरेल, असे वाटल्यावरून हे प्रकाशन विकसित करण्यात आले आहे.

या प्रकाशनात समाविष्ट करण्यात आलेले पायाभूत साहित्य विकसित करण्यासाठी परिषदेतील अधिकारी वर्गाचे परिश्रम कारणीभूत आहेत. परिसंवादात भाग घेणाऱ्या निबंध वाचकांचे निबंध या प्रकाशनात समाविष्ट केलेले आहेत. त्यांच्या सहकार्यामुळेच परिसंवाद संपन्न होऊ शकला हे जाणीवपूर्वक नमूद करावयास हवे.

प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत ऐतिहासिक पार्श्वभूमी, तुलनात्मक सांख्यिकी माहिती, शासकीय सवलती व आतापर्यंत झालेली वाटचाल यांचा सम्यक आढावा घेण्याचा प्रयत्न या पुस्तिकेत करण्यात आला आहे. समाजाच्या प्रबोधनासाठी केलेला हा अल्पसा प्रयत्न, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केलेल्या "समानतेसाठी शिक्षण" या संकल्पास सिद्धीस नेण्यास साहाय्यभूत व दिशादर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

व.रा.नागपुरे
संचालक

‘समानतेसाठी शिक्षण – मुलींचे शिक्षण’

"आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या म्हणजेच देशातल्या स्त्रिया अशिक्षित राहिल्या, अडाणी राहिल्या, मागे राहिल्या तर आपल्या देशाचा उत्कर्ष होईल का? आणि माताच जर आत्मनिर्भर, कार्यक्षम नसतील तर आपल्या देशातील बालके आत्मनिर्भर, कार्यक्षम असे भारताचे नागरिक बनतील का?

एका फ्रेंच लेखकाच्या पुढील प्रसिद्ध ओळी आपल्यापैकी कितीजणांनी ऐकल्या असतील मला माहीत नाही. तो म्हणतो, "एखाद्या देशातीललोकांची संस्कृती आणि सभ्यता पाहायची असेल तर त्या देशातील स्त्रियांचा दर्जा आणि त्यांची स्थिती यांची पाहणी केली की पुरे."

— पं. जवाहरलाल नेहरू

# प्रास्ताविक

शिक्षण चारित्र्यविकासासाठी आवश्यक आहे. मनाचा विकास साध्य करण्यासाठी ते आवश्यक आहे आणि समाजाचा विकास साध्य करण्यासाठी आवश्यक अशी कौशल्ये व्यक्तीमध्ये विकसित करण्यासाठीही शिक्षणाची आवश्यकता आहे. भावी जीवनातील सर्व जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजेच शिक्षण.

गतिशील राष्ट्राचे द्योतक आहे शिक्षण. त्यातल्या त्यात स्त्रियांच्या शिक्षणाचे तर अनन्यसाधारण महत्त्व आहे. महात्मा गांधी म्हणत की एक मुलगा शिकला तर तो व्यक्तिगत विकास साधतो पण एक मुलगी शिकली तर ती सारे कुटुंब प्रगतिपथावर नेते. डॉ.राधाकृष्णन् यांनीही म्हटले आहे की स्त्री ही जर विचारी, चौकस, जिज्ञासू व सुज्ञ असेल तर ती मुलांवर योग्य तेच संस्कार करील व चारित्र्य घडणीतील ती एक सर्वोत्कृष्ट शिक्षिका ठरेल.

"स्त्रियांसाठी एक कॉलेज म्हणजे जगातील एक तुरुंग कमी" – किती सार्थ विधान आहे हे!

तथापि स्त्री-शिक्षणाकडे बघण्याचा समाजाचा विकृत दृष्टिकोन आजही आहे. 'चूल व मूल' यापलीकडे काही कार्यक्षेत्रे स्त्रियांसाठी असू शकतात याचा विसर समाजाला पडलेला आहे. 'अडाणी आई घर वाया जाई, तर शिकलेली आई घरादारा पुढे नेई.' हे वचन लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सुशिक्षित माताच बालकांचे संगोपन अधिक चांगले करू शकतात.

• • •

# महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणाची वाटचाल

### महात्मा ज्योतिराव फुले

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाकरिता प्रयत्न करणाऱ्यांपैकी ज्योतिबा फुले हे एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व होते. आपल्या स्त्रियांनी शिक्षण घेण्याची अत्यंत गरज आहे असे त्यांना तीव्रतेने वाटत असल्यामुळे त्यांनी १८५१ साली महाराष्ट्रातील सर्व स्तरांतील मुलींना मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली. अशी शाळा काढणारे म. फुले हे पहिले भारतीय होत. शिक्षण झिरपत जाईल या विचाराविरुद्ध शेवटी जेथे शिक्षण पोहोचले तेथेच म्हणजे समाजाच्या तळागाळात शिक्षणाची सुरुवात व्हावयाला पाहिजे हा साधा सरळ विचार म. फुले यांचा होता. फुलेकालीन स्त्रीजीवन हे अत्यंत हीन-दीन दर्जाचे होते. धर्माच्या नावाखाली तिचा विलक्षण छळ होत असे. या अवस्थेतून जर उन्नत स्थितीकडे स्त्रीने यावयाचे असेल तर शिक्षण हा एकच पर्याय आहे हे ज्योतिबांना पूर्ण पटलेले होते.

### सावित्रीबाई फुले

स्त्रियांचा प्रश्न स्त्रियांनीच पुढाकार घेऊन सोडविला पाहिजे याची जाणीव म. फुले यांच्याप्रमाणेच सावित्रीबाईंनाही होती. त्यामुळेच त्यांनी ज्योतिबांच्या अंगीकृत कामात पूर्णार्थाने मदत केली. महाराष्ट्रातील त्या पहिल्या स्त्री-शिक्षिका, अनेक अडी-अडचणी, समाजाचा तीव्र विरोध व रोष पत्करून सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचे कार्य अव्याहतपणे चालू ठेवले व या कार्याला आपले तन-मन-धन अर्पण केले.

### पंडिता रमाबाई

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यानंतर स्त्री शिक्षणविषयक तळमळीने कार्य करणाऱ्या 'पंडिता रमाबाई' यांचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे. रमाबाईंची भूमिका स्त्रियांचा होणारा छळ व त्यांच्यावरील बंधने या विरूद्ध होती. स्त्रियांची सर्वांगीण उन्नती करण्याच्या हेतूने रमाबाईंनी पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केली व त्याचा संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसार केला. स्त्रियांची उन्नती स्त्रियांना सुशिक्षण व योग्य ते हक्क दिल्याने होईल या गोष्टीवर त्यांचा दृढविश्वास होता. रमाबाईंनी स्त्रीने स्वावलंबी व्हावे, उत्तम नागरिक व्हावे, समाजात सन्मानाने जगता यावे याकरिता मुंबई येथे 'शारदा सदन' ची स्थापना केली. सदनातील मुलींना सर्व प्रकारचे शिक्षण दिले जाई. सदनामध्ये विधवा, पतित, अंध, अपंग स्त्रियांना समर्थ व स्वावलंबी बनविण्यासाठी विविध प्रकारची

शिक्षणव्यवस्था सुरू केली. महाराष्ट्रामध्ये स्त्री-शिक्षणाविषयी जागृती निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम पंडिता रमाबाईंनी केले.

**महर्षी धोंडो केशव कर्वे**

जोतिबांनी स्त्री-शिक्षणाचे लावलेले रोपटे अधिक जोमाने फुलविले ते महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी. महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाचा श्रीगणेशा जोतिबांनी केला तर त्याला मूर्त भव्य आकार स्वप्रयत्नांनी, स्वकष्टांनी महर्षींनी दिला.

इ. स. १८८५ ते १९६३ या दीर्घ काळात कर्वे यांनी महाराष्ट्रातील स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार केला.

सुरुवातीला अनाथ, परित्यक्ता, विधवा यांसारख्या निराधार मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याचा गुरुवर्य कर्वे यांचा प्रयत्न होता. स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनावी, ज्ञानसंपन्न व्हावी म्हणून त्यांनी पुण्यातील हिंगणे येथे अनाथाश्रमाची स्थापना केली. क्रमाक्रमाने येथील आश्रमात मुलींची प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, स्त्रियांकरिता प्रशिक्षण विद्यालय इत्यादी संस्था काढल्या. आश्रमात स्त्री साक्षर होत होती. ज्ञानाच्या मार्गाने धाव घेत होती. केवळ प्राथमिक, माध्यमिक शाळा काढून कर्वे थांबले नाहीत, तर त्यांनी महिलांच्या उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी म्हणून १९१६ साली महिला विद्यापीठाची स्थापना केली व स्त्री-शिक्षणाला एका नवीन टप्प्यावर आणले.

**कर्मवीर भाऊराव पाटील**

मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी आयुष्य वेचले त्यांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव घेणे अपरिहार्य आहे. १९०७ साली त्यांनी आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. ग्रामीण भागातल्या मुलांना आणि मुलींना शिक्षणाची जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्रामध्ये विशेषत: ग्रामीण भागामध्ये शाळांचे व महाविद्यालयांचे जाळे निर्माण करण्याचे महान कार्य कर्मवीरांनी केले. आज या शाळांमधून हजारो मुली शिक्षण घेत आहेत.

**डॉ. पंजाबराव देशमुख**

डॉ. पंजाबराव देशमुख हे महाराष्ट्रातील एक शिक्षणप्रेमी व तळमळीचे कार्यकर्ते होते. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रथम प्राथमिक शिक्षकांच्या समस्या दूर करणे आवश्यक आहे. हे जाणून त्यांनी 'भारतीय प्राथमिक शिक्षक संघ' स्थापन केला. १९३२ साली त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेच्या विदर्भातील अनेक शाळा व महाविद्यालयांमध्ये शेकडो मुली शिक्षण घेत आहेत.

# मुलींचे शिक्षण-
# विविध आयोगांनी केलेल्या शिफारशी

**राधाकृष्णन आयोग**

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-शिक्षणविषयक विविध आयोग सखोलतेने विचार करणारे वाटतात. या दृष्टीने डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या आयोगाच्या स्त्री-शिक्षणविषयक शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

– अधिकाधिक शिक्षणसंधी स्त्रियांना उपलब्ध करून द्याव्यात.
– अभिरुचीप्रमाणे शिक्षण घेण्यासाठी स्त्रियांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे.
– शालेय, महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची फेररचना व्हावी.
– सर्व विषयांचे महत्त्व समाजमानसावर पटविले जावे.
– सहशिक्षणासाठीच्या विद्यालयांतून सर्व प्रकारच्या सोयी सुविधा स्त्रियांना प्राप्त व्हाव्यात.

आयोगात प्रामुख्याने मांडलेली बाब म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत स्त्रीने सहभागी झाले पाहिजे. पुरुषांच्या इतक्याच दर्जाचे व त्यांच्या इतक्याच पूर्णत्वाने कार्य करण्यास स्त्रियाही समर्थ आहेत. स्त्रियांच्या दृष्टीने कोणत्या संधी देता येण्याजोग्या आहेत, देणे आवश्यक आहे याचा रचनात्मक विचार करणे आवश्यक असल्याचे आयोगात सूचित केले आहे. स्वतंत्र भारतातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल नव्या प्रश्नचिन्हाच्या दिशेने सुरू करण्याची नांदी राधाकृष्णन् आयोगाच्या अहवालातून झालेली दिसते.

**राष्ट्रीय स्त्री शिक्षण समिती**

केवळ स्त्री-शिक्षणाचा विचार करण्याकरिता म्हणून भारतीय शिक्षण विभागाने १९५८ मध्ये राष्ट्रीय स्त्री-शिक्षण समितीची स्थापना केली.

समितीच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत–
– स्त्री-शिक्षणाचा विचार स्वतंत्र प्रश्न म्हणून केला जावा. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली जावी.
– पंचवार्षिक योजनांतून स्त्री-शिक्षण विकासासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जावा.
– सर्व ठिकाणी सर्व सुविधांनी युक्त शाळा असाव्यात.
– मागासलेल्या भागाकरिता काही खास सवलती दिल्या जाव्यात.
– खासगी प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे.
– स्थानपरत्वे शाळेच्या वेळात फरक असावा.

– शाळेत स्त्री-शिक्षिका असाव्यात.
– शक्य असल्यास स्वतंत्र मुलींच्या शाळा असाव्यात व त्याचबरोबर सहशिक्षणास पूरक समाजमत बनविण्याचा प्रयत्न व्हावा.
– शाळेत दप्तर, गणवेश इ. साहित्य व मधल्या वेळचे खाणे दिले जावे.
– शाळेला जोडून पाळणाघर असावे.
– दरवर्षी स्त्री-शिक्षण सप्ताह पाळावा.
– पर्यायी विषयांची योजना करून निवडीला वाव द्यावा.
– प्रौढ स्त्री-शिक्षणाचे प्रश्न हाताळण्यासाठी राष्ट्रीय मंडळ असावे.
– याप्रमाणे राष्ट्रीय स्त्री-शिक्षण समितीने स्त्री-शिक्षणाबाबत सर्व बाजूंनी विचार करून प्रश्न हाताळलेला दिसतो. प्रश्न अत्यंत बारकाईने तपासून रचनात्मक सूचना केलेल्या आहेत. स्त्रियांचा प्रश्न स्त्रियांनी हाताळण्याच्या दृष्टीने नेमलेली ही पहिली समिती होय.

**कोठारी आयोग**

राष्ट्रीय परंपरा व आजच्या राष्ट्रीय गरजा यांचा योग्य समन्वय साधून स्त्री-शिक्षणाची आखणी झाली पाहिजे. या दृष्टीने कोठारी आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे,
– सवडीच्या वेळी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
– पत्रव्यवहाराद्वारा शिक्षण, परिसंवाद,चर्चासत्रे, व्यावसायिक मार्गदर्शन यांसारख्या सोयी उपलब्ध करून देणे.
– स्त्रियांना मुले शाळेत जाण्याच्या वयाची होईपर्यंत अध्ययन करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे स्त्री-शिक्षणविषयक झालेली जागृती होय.

**शालेय शिक्षण सुधार समिती**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शिक्षणविषयक काही समस्यांचा अभ्यास करण्यासाठी वेळोवळी समित्या नेमल्या होत्या. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिकपर्यंतच्या शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून शिक्षणात सुधार सुचविण्यासाठी नेमलेली शिक्षण सुधार समिती ही पहिली समिती होय.

समितीच्या स्त्री-शिक्षणविषयक शिफारशी खालीलप्रमाणे –
– शिक्षण संचालनालयात स्त्री-शिक्षण विभागाची स्थापना करावी.
– मुलींच्या शिक्षणाला गती देण्याच्या दृष्टीने महिला सामाजिक कार्यकर्त्यांच्या नेमणुका कराव्यात.

- मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा व विद्यानिकेतन उघडावे.
- प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मुलींसाठी वसतिगृहयुक्त माध्यमिक शाळा असाव्यात
- प्रत्येक तालुक्यात स्त्री-शिक्षण विस्तार अधिकारी नेमला जावा.
- शाळेत अधिक प्रमाणात स्त्री-शिक्षिकांच्या नेमणुका कराव्यात.
- मुलींच्या शिक्षणाला चालना म्हणून 'सावित्रीबाई फुले' निधी उभारावा.
- शाळेची वेळ मुलींच्या सोयीची असावी.

वरील सर्व आयोगाच्या स्त्री-शिक्षणविषयक शिफारशी अवलोकन केल्यानंतर स्वातंत्र्योत्तर स्त्री-शिक्षण हे अधिक समृद्ध, सोयी-सवलती उपलब्ध असलेले दिसते. नवीन शैक्षणिक धोरणाचा स्त्री-शिक्षणविषयक दृष्टिकोनमुद्धा स्त्री-शिक्षणास उत्तेजन देणारा आहे व स्त्री-शिक्षणाचा सर्वंकष विचार करणारा आहे.

• • •

# मुलींचे शिक्षण - दृष्टिक्षेप

शिक्षण आणि विकास या दोन्ही गोष्टी हातात हात घालूनच वाटचाल करतात. स्त्रियांच्या शिक्षणासाठी, उन्नतीसाठी आधुनिक काळात जे प्रयत्न सुरू झाले त्याला १५० वर्षे उलटली. या १५० वर्षांत करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांच्या परिस्थितीमध्ये खूपच प्रगती झाली असेल असे कुणालाही वाटेल. परंतु आजची परिस्थिती पाहू गेल्यास स्त्रीला जन्म घेण्याचा हक्कच नाकारण्यात येत असलेला दिसून येतो. आईच्या पोटात मूळ धरू लागलेला अंकुर स्त्रीलिंगी असेल तर तो खुडून टाकला जातो. तो सुद्धा प्रत्यक्ष आईवडिलांच्या संमतीने.

मुलगी २-४ वर्षांची झाली की ती मुलगी आहे म्हणून तिला वेगळी वागणूक दिली जाते. मुलीला खेळायला बाहुली, मुलाला खेळायला मोटारी, विमाने. मुलगी म्हणून तिने उलट उत्तरे द्यायची नाहीत. मोठी माणसे सांगतील ते निमूटपणे ऐकायचे. कारण मोठी झाल्यावर सासरी, गेल्यावर तिला याच पद्धतीने वागायचे असते. खाण्यापिण्यातला चांगला हिस्सा मुलाला. सगळ्यांना दूध देणे शक्य नसेल तर फक्त मुलाला दूध द्यायचे. सगळ्यांना शिकवणे शक्य नसेल तर फक्त मुलाला शिकवायचे. घरकामाचा बोजा मुलीवर, मुलगा या वेळी खेळायला गेला तरी चालेल.अशी वागणूक मुलींना प्रत्यक्ष तिचे आईवडील, समाज का देतात? मुलगीही हे सर्व का सहन करते? याचे कारण उघड आहे. जन्मापासून मुलींवर व मुलांवर होणारे संस्कार, त्याचप्रमाणे शिक्षणाचा अभाव.


महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ४८.८ टक्के आहे. परंतु साक्षरतेचे प्रमाण मात्र फक्त ३० टक्के आहे.

• • •


आलेख क्रमांक १

**स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण**

(भारताची जनगणना १९८१ च्या आधारे)



स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण (सर्वसाधारण)




महाराष्ट्र राज्य

• सिंधुदुर्ग, जालना, लातूर, गडचिरोली या पुनर्रचित जिल्ह्यांच्या माहितीचा समावेश अनुक्रमे रत्नागिरी, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि चंद्रपूर यांमध्ये केलेला आहे.
(भारताची जनगणना १९८१ च्या आधारे)

**तक्ता क्रमांक १ अ**

**६ ते ११ वयोगटातील विद्यार्थ्यांचे ६ ते ११ वयोगटातील लोकसंख्येशी प्रमाण**

| | मुलांचे | मुलींचे | एकूण |
|---|---|---|---|
| ग्रामीण | ९१.०८ | ७७.६२ | ८४.४९ |
| शहरी | ८५.५० | ८१.७६ | ८३.६६ |
| एकूण | ८९.०५ | ७९.१४ | ८४.१९ |

**तक्ता क्रमांक १ ब**

**११ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांचे ११ ते १४ वयोगटातील लोकसंख्येशी प्रमाण**

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रामीण | ७६.३३ | ५१.१४ | ६४.१३ |
| शहरी | ८२.३५ | ६९.७३ | ७६.२३ |
| एकूण | ७८.५३ | ५७.९५ | ६८.५६ |

६ ते ११ वयोगटातील मुलींचा विचार केल्यास मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी आहे, परंतु हेच प्रमाण ११ ते १४ वयोगटामध्ये २१.४८ टक्क्यांनी कमी आहे असे दिसून येते.

(पाचव्या राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणाच्या आधारे)

**तक्ता क्रमांक २ अ**

**विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या पटनोंदणीचे प्रमाण १९६०-६१ (शेकडा प्रमाण)**

| वयोगट | ६ ते ११ | ११ ते १४ | ६ ते १४ |
|---|---|---|---|
| मुले | ८७.८ | ४१.०० | ७२.८ |
| मुली | ५१.६ | १६.६ | ४१.३ |
| एकूण | ६९.८ | २९.६ | ५७.४ |

**तक्ता क्रमांक २ ब**
**१९८५-८६ (शेकडा प्रमाण)**

| वयोगट | ६ ते ११ | ११ ते १४ | ६ ते १४ |
|---|---|---|---|
| मुले | १२५.३ | ७६.१ | १०६.६ |
| मुली | १०५.८ | ४९.८ | ८४.६ |
| एकूण | ११५.८ | ६३.२ | ९५.९ |

(१) १९६०-६१ मध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलींच्या पटनोंदणीचे प्रमाण याच वयोगटातील मुलांच्या पटनोंदणीपेक्षा ३१.५ ने व ८५-८६ मध्ये हेच प्रमाण २२ टक्क्यांनी कमी आहे.

(२) ६ ते १४ वयोगटातील मुलींचे हे प्रमाण ४१.३ वरून ८४.६ वर गेले आहे. म्हणजेच पटनोंदणीतील वाढ ४३.३ टक्के आहे.

(३) ११ ते १४ वयोगटातील मुलींचे हे प्रमाण १६.६ वरून ४९.८ वर गेले आहे. म्हणजे पटनोंदणीतील वाढ ३२.८ टक्के आहे.

('महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास' या पुस्तिकेच्या आधारे)

## तक्ता क्रमांक ३

## महाराष्ट्रातील स्तरनिहाय शाळांची संख्या

ग्रामीण

| | मुलांची | मुलींची | मिश्र | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | ४८४ | ६८५ | ३१९९४ | ३३१६३ |
| उच्च प्राथमिक स्तर | ३०२ | ३५१ | १३१४५ | १३७९८ |
| माध्यमिक शाळा | १९ | ८० | ४४८७ | ४५८६ |
| उच्च माध्यमिक शाळा | ५ | ६ | ६७१ | ६८२ |

शहरी

| | मुलांची | मुलींची | मिश्र | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | ४१५ | ५६० | ३९५६ | ४९३१ |
| उच्च प्राथमिक स्तर | ४१५ | ४२३ | २२८३ | ३१२१ |
| माध्यमिक शाळा | २०२ | ३७५ | २०२४ | २६०१ |
| उच्च माध्यमिक शाळा | ४६ | ७० | ५८४ | ७०० |

एकूण

| | गुलांची | मुलींची | गिश्र | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | ८९९ | १२४५ | ३५९५० | ३८०९४ |
| उच्च प्राथमिक स्तर | ७१७ | ७७४ | १५४२८ | १६९१९ |
| माध्यमिक शाळा | २२१ | ४५५ | ६५११ | ७१८७ |
| उच्च माध्यमिक शाळा | ५१ | ७६ | १२५५ | १३८२ |

**तक्ता क्रमांक ४**

**शिक्षक-शिक्षिकांचे प्रमाण १९८६**

| | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|
| **ग्रामीण भाग** | | |
| प्राथमिक शाळा | ५५४९५ (७५.८६) | १७६६० (२४.१४) |
| उच्च ।ाथमिक शाळा | ७०७८७ (७२.८४) | २६३९६ (२७.१६) |
| माध्यनिक शाळा | ४१९३७ (८३.४८) | ८२९९ (१६.५२) |
| उच्च नाध्यमिक शाळा | १९३५१ (८८.२१) | २५८७ (११.७९) |
| **शहरी भाग** | | |
| प्राथमिक शाळा | १५२३५ (३६.८६) | २६०९४ (६३.१४) |
| उच्च पाथमिक शाळा | १४९४९ (३७.८०) | २४५९७ (६२.२०) |
| माध्यनिक शाळा | ३३८६९ (५६.१९) | २६४०६ (४३.८१) |
| उच्च नाध्यमिक शाळा | १६४०५ (६४.९२) | ८८६३ (३५.०८) |
| **एकूण** | | |
| प्राथमिक शाळा | ७०७३० (६१.७२) | ४३७५४ (३८.२२) |
| उच्च प्राथमिक शाळा | ८५७३० (६२.७०) | ५०९९३ (३७.३०) |
| माध्यमिक शाळा | ७५८०६ (६८.६०) | ३४७०५ (३१.४०) |
| उच्च माध्यमिक शाळा | ३५७५६ (७५.७४) | ११४५० (२४.२६) |

(कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात.) ग्रामीण भागातील शिक्षिकांचे प्रमाण पुरुष शिक्षकांच्या तुलनेत फारच कमी आहे असे दिसते. (पाचव्या राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणाच्या आधारे)

## तक्ता क्रमांक ५
## १९८१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण

| | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| मुंबई | ६०.८ | ३८.४ | ५९.२ | ३६.८ |
| नाशिक | ५६.० | २६.९ | २५.२ | ८.० |
| धुळे | ५३.२ | २३.७ | २३.७ | ६.७ |
| जळगाव | ५०.५ | १८.० | ३०.६ | ९.० |
| ठाणे | ५४.१ | ३२.० | २२.३ | ६.३ |
| पुणे | ५४.६ | २८.० | ४०.२ | १४.८ |
| अ' नगर | ४९.९ | २०.३ | २६.५ | ७.१ |
| सोलापूर | ४३.६ | १५.२ | ४४.६ | १७.७ |
| रायगड | ५७.८ | ३४.७ | २३.४ | ९.४ |
| कोल्हापूर | ५०.४ | १८.८ | ४८.० | २०.१ |
| रत्नागिरी सिंधुदुर्ग | ५१.४ | २७.० | १३.५ | ६.९ |
| सातारा | ५४.४ | २४.८ | ४०.० | १९.२ |
| सांगली | ५१.० | २२.५ | ५४.४ | २५.१ |
| औरंगाबाद जालना | ३८.० | ९.१ | २७.६ | ५.८ |
| परभणी | ३०.४ | ७.३ | २८.१ | ५.१ |
| बीड | ३३.५ | ८.५ | २६.५ | ८.४ |
| नांदेड | ३१.८ | ७.८ | ३३.३ | ७.४ |
| उस्मानाबाद लातूर | ३६.३ | ११.५ | ३५.३ | १०.७ |
| अमरावती | ५३.८ | २८.३ | ३४.४ | १६.६ |
| बुलढाणा | ४७.१ | १५.६ | ४०.४ | १३.३ |
| अकोला | ४८.३ | २०.० | ४६.४ | २०.३ |
| यवतमाळ | ४७.० | २०.१ | ३५.५ | १३.० |
| नागपूर | ५६.९ | ३४.९ | ५३.९ | ३०.६ |
| वर्धा | ५४.४ | ३०.२ | ४५.२ | २३.९ |
| भंडारा | ६३.३ | ३३.३ | ४८.५ | १८.० |
| चंद्रपूर गडचिरोली | ४५.८ | २०.० | ३३.१ | ११.३ |
| महाराष्ट्र राज्य | ४८.९ | २१.५ | ३२.४ | ११.९ |

(सिंधुदुर्ग, जालना, लातूर व गडचिरोली या पुनर्रचित जिल्ह्यांच्या माहितीचा समावेश अनुक्रमे रत्नागिरी, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि चंद्रपूर यांमध्ये केलेला आहे.)

# मुलींचे शिक्षण : सद्य:स्थिती

(अ) आलेख क्र.१ वरून असे दिसून येते की महाराष्ट्रातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ३० टक्के असून महाराष्ट्राचा भारतामध्ये दहावा क्रमांक आहे. हे प्रमाण भारतामधील स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा फक्त ५ टक्क्यांनी जास्त आहे. हे प्रमाण केरळपेक्षा ३५ टक्क्यांनी कमी आहे.

(ब) नकाशा क्रमांक १ वरून असे स्पष्ट होते की बीड, परभणी, नांदेड, गडचिरोली, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यांतील साक्षरतेचे प्रमाण ५ ते २० टक्क्यांच्या दरम्यान आहे, तर सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, अहमदनगर, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा या जिल्ह्यांतील हे प्रमाण २० ते ३० टक्क्यांच्या दरम्यान आहे.

(क) मुलामुलींचे गळतीचे प्रमाण वरच्या इयत्तेमध्ये (८ ते १०) जास्त आढळते. मुलीमधील गळतीचे प्रमाण मुलांपेक्षा प्रत्येक इयत्तेमध्ये जास्त आहे.
(आलेख क्रमांक २ वरून)

(ड) १९७६-७७ ते १९८६-८७ या दशकाचा विचार केला तर मुलींना शाळेत इ. १० वीत टिकवून धरण्याच्या प्रमाणात फक्त ६ टक्के वाढ झालेली दिसते. (आलेख क्र. ३ वरून)

(४) १९८१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व जमातींमधील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. हे तक्ता क्र. ७ वरून स्पष्ट होते. खाली नमूद केलेल्या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|
| औरंगाबाद | औरंगाबाद |
| परभणी | परभणी |
| नांदेड | नांदेड |
| बीड | बीड |
| | नाशिक |
| | धुळे |
| | जळगाव |
| | ठाणे |
| | अहमदनगर |
| | रायगड |
| | रत्नागिरी |
| | जालना |

(५) शालेय शिक्षण सुधार समितीने १९८३ मध्ये मुलींच्या शिक्षणविषयक समस्यांच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण केले. त्यावरून महाराष्ट्रातील सिरोंचा (जिल्हा गडचिरोली), अक्कलकुवा, अक्राणी व धडगाव (जि. धुळे), चिखलदरा व धारणी (जि. अमरावती), गंगाखेड, परभणी व बसमत (जि. परभणी) या नऊ तालुक्यांत स्त्रियांच्या साक्षरतेची टक्केवारी १० टक्क्यांपेक्षाही कमी आहे असे दिसून आले. यावरून स्त्रियांच्या शिक्षणाची दुरवस्था लक्षात येते.

ही आकडेवारी पाहिल्यानंतर स्त्रीशिक्षणाचे चित्र अतिशय निराशाजनक आहे असा समज करून घेण्याचे कारण नाही. भारत सरकार, महाराष्ट्र शासन व अनेक सेवाभावी संस्था आणि व्यक्ती स्त्रीशिक्षणासाठी भगीरथ प्रयत्न करत आहेत. प्रत्येकाने आपल्याला शक्य असेल तेवढा, स्त्रीशिक्षणात आपला स्वत:चा वाटा उचलल्यास स्त्री-शिक्षणाचा उज्ज्वल भविष्यकाळ दूर नाही.

**(अ) मुलींचे शिक्षण : समस्या**

(१) सर्वांत महत्त्वाची समस्या गरिबी आहे.
(२) आई-वडिलांना पैसे मिळविण्यासाठी घराबाहेर जावे लागते. अशा वेळी स्वयंपाकपाणी, घराची स्वच्छता, लहान भावंडांचा संभाळ, घरातील गाईगुरांचे चारापाणी इ. अनेक कामांचा बोजा लहान वयातच मुलींवर पडतो. त्या शाळेत जाऊ शकत नाहीत.
(३) ग्रामीण भागात आणि अशिक्षित लोकांच्यात आजही मुलींचे लहान वयात लग्न केले जाते. लग्नानंतर शाळा शिकणे ही बऱ्याचदा अवघड गोष्ट आहे.
(४) मुलीला बरोबरीचा भाऊ असेल आणि पालकांची ऐपत एकाच अपत्याला शिकवण्याची असेल तर शिकण्याची संधी नेहमी मुलालाच मिळते.
(५) पुरुष शिक्षकांच्या तुलनेत स्त्री-शिक्षकांचे प्रमाण कमी आहे. शाळेत शिक्षिका नाहीत म्हणून ग्रामीण भागातील पालक मुलींना शाळेत पाठवत नाहीत.
(६) मुलींसाठी स्वतंत्र शाळा नसल्यामुळे ग्रामीण भागातील पालक मुलींना शाळेत पाठवत नाही.
(७) एकदा शाळा सोडल्यानंतर लिहिण्या-वाचण्याचा संबंध रोजच्या आयुष्यात येत नसल्यामुळे, अशा मुली साक्षरतेच्या गटातून पुन्हा निरक्षरतेच्या गटात जाऊन बसतात.
(८) ग्रामीण, विशेषत: आदिवासी भागात पुरुष शिक्षक असेल तर शाळेत जाणाऱ्या मुलींच्या संख्येत घट होते.
(९) लांब अंतरावर शाळा असल्यास मुली शाळेत जाऊ शकत नाहीत.
(१०) मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्याची सर्वसामान्य प्रवृत्ती व पालकांचे अज्ञान यामुळे मुली शाळेत जाऊ शकत नाहीत.

### (ब) मुलींचे शिक्षण : विविध योजना

या समस्या सोडविण्यासाठी भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने मुलींच्या व स्त्रियांच्या शिक्षणासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत.

### सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना : आवश्यकता व उद्देश

मुलींचे इ. १२ वी पर्यंतचे शिक्षण शासनाने मोफत केले आहेच. या सवलतीचा लाभ मुलींना घेता यावा यासाठी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलींचा पाठीशी त्यांचे दत्तक-पालक या नात्याने खंबीरपणे उभे राहून त्यांच्या इयत्ता ७वी पर्यंतच्या शिक्षणाचा मार्ग तरी मोकळा करण्याची नितांत गरज आहे.

शिक्षणक्षेत्रात विविध स्तरांवर कार्य करणारे शिक्षक, मुख्याध्यापक, अधिकारी, पदाधिकारी आणि सुजाण व संवेदनशील नागरिक यांच्या संघटित प्रयत्नांतून सावित्रीबाई फुले यांचे स्त्री-शिक्षणाचे स्वप्न नजिकच्या भविष्यकाळात पूर्ण होऊ शकेल.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींच्या शिक्षणासाठी तिच्या पालकांना काही आर्थिक साहाय्य करून तिचे किमान ७वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यास तिला मदत करावयाची—अशा प्रकारे स्त्री-शिक्षणाला गती देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

### मुलींच्या निवडीचे निकष

आर्थिक दुर्बलतेमुळे ज्या मुलीचे वय ६ वर्षे पूर्ण होऊनही तिला शाळेत घालण्याबद्दल पालकांनी असमर्थता दाखविली असेल किंवा याच कारणासाठी शाळेतून काढून घेतले असेल किंवा काढून घेणार असतील, अशी मुलगी या योजनेखाली निवडली जावी. मुलीची निवड शक्यतो मदत करू इच्छिणाऱ्या दत्तक-पालकांनी स्वत:च करावी.

### मदतीचे स्वरूप

कौटुंबिक चरितार्थ चालविण्यासाठी अर्थार्जनात मदत व्हावी म्हणून मुलीला शाळेत न पाठविणाऱ्या किंवा शाळेतून लवकर काढून घेणाऱ्या पालकाला द्रव्यरुपाने दरमहा किमान रुपये २५/— मदत करावी.

### मदत कशी पाठवता येईल?

मुलीच्या पालकाची प्रत्यक्ष भेट घेऊन मदत शक्यतो त्यांना द्यावी. त्यामुळे मुलीच्या अभ्यासाची विचारपूस करता करता, नाते दृढ करता येईल. तसे शक्य नसल्यास

मनीऑर्डर करावी किंवा मुलीच्या पालकांशी चर्चा करून निर्णय घ्यावा. मुलीचे नाव शाळेत दाखल केल्यापासून तिचा इयत्ता ७ वीचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत मदत सुरू ठेवावी एकदा सुरू केलेली मदत काही कारणाने बंद पडल्यास संबंधित मुख्याध्यापक/शिक्षकांनी दत्तक पालकाची भेट घेऊन मदत सुरू करण्यासाठी प्रयत्न करावा. अन्यथा दुसरा दत्तक पालक पाहावा किंवा अधिक व्यक्ती मिळून दत्तक-पालक मिळवावा व मुलीचे शिक्षण पैशाअभावी खंडित होणार नाही हे पाहावे.

### लाभार्थी

१९८३ पासून ही योजना कार्यान्वित झाली असून या योजनेचा लाभ एकूण १,७०,००० विद्यार्थिनींनी घेतला आहे.

### मूल्यमापन

या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी मा. ना. शिक्षण राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून मूल्यमापनाचे काम सुरू आहे.

राष्ट्रीय स्तरावर या योजनेचा स्वीकार करण्यात आला असून ही बाब महाराष्ट्राला खचितच भूषणावह आहे.

### मातृप्रबोधन प्रकल्प

मुलाचे पहिले ज्ञानपीठ ही आई असते. त्या दृष्टीने मुलांवर सुसंस्कार करणाऱ्या माता सुसंस्कृत असणे ही काळाची गरज आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत मातेची भूमिका व मातेचे शिक्षण ही महत्त्वाची बाब विचारात घेऊन परिषदेमार्फत श्री. व. रा. नागपुरे, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या प्रेरणेने मातृप्रबोधन प्रकल्प जून १९८७ पासून हाती घेण्यात आला आहे.

### उद्दिष्टे

१. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय १९९० पर्यंत पूर्ण करण्यासाठी, ग्रामीण भागातील माता आपल्या पाल्याच्या शिक्षणाविषयी जागरूक राहाव्यात व शिक्षणाभिमुख व्हाव्यात या दृष्टीने त्यांचे प्रबोधन करणे.

२. मुलामुलींच्या शिक्षणाच्या संदर्भातील मातेची जबाबदारी समजावून देणे.

३. बालकांच्या / मुलांच्या आरोग्याविषयी मातेला माहिती देणे.

४. स्त्रीचा सर्वांगीण व्यक्तिविकास साधणे.

५. ग्रामीण स्त्री नेतृत्वाचा विकास साधणे.

### प्रकल्पाचे नियोजन व कार्यवाही

जून १९८७ पासून महाराष्ट्रातील सोलापूर, लातूर, नागपूर व सिंधुदुर्ग या ४ जिल्ह्यांतील एकूण ८० शाळांमध्ये हा पथदर्शी प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. प्रकल्पाचे स्त्रीशिक्षणाच्या संदर्भातील महत्त्व लक्षात घेऊन जून १९८८ पासून या प्रकल्पाचा विस्तार आणखी आठ जिल्ह्यांमध्ये करण्यात आला आहे.

### मातृप्रबोधन प्रकल्प क्षेत्र

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| | | | १९८७-८८ |
| १. | नागपूर | हिंगणा | २० |
| २. | सोलापूर | माढा | २० |
| ३. | लातूर | अहमदपूर | २० |
| ४. | सिंधुदुर्ग | सावंतवाडी | २० |
| | | | १९८८-८९ |
| १. | नागपूर | हिंगणा | २० (नवीन) + २० (जुन्या) |
| २. | सोलापूर | माढा | २० (नवीन) + २० (जुन्या) |
| ३. | लातूर | अहमदपूर | २० (नवीन) + २० (जुन्या) |
| ४. | सिंधुदुर्ग | सावंतवाडी | २० (नवीन) + २० (जुन्या) |
| ५. | अकोला | अकोट | २० |
| ६. | बुलढाणा | शेगाव | २० |
| ७. | अहमदनगर | नगर | २० |
| ८. | ठाणे | जव्हार | २० |
| ९. | नाशिक | कळवण | २० |
| १०. | गडचिरोली | आरमोरी | २० |
| ११. | कोल्हापूर | राधानगरी | २० |
| १२. | जालना | जालना | २० |
| | | | एकूण ३२० शाळा |

प्रकल्पाच्या कार्यवाहीची जबाबदारी या शाळेतील एका शिक्षिकेवर व मुख्याध्यापकावर सोपविण्यात आली आहे. या शिक्षिका बालसंगोपन, स्त्रियांचे व मुलांचे आरोग्य, सकस आहार, विविध सणांची नव्या दृष्टिकोनातून माहिती, अभ्यास कसा करून

घ्यावा याविषयी मार्गदर्शन, परसबाग इत्यादीविषयक माहिती देणारे विविध कार्यक्रम त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी कला व क्रीडास्पर्धा, प्रदर्शने आयोजित करतात. हे कार्यक्रम या स्त्रियांना उपयुक्त व्हावेत व अधिक समृद्ध व्हावेत म्हणून या प्रकल्प शिक्षिका गावातील इतर ग्रामस्थ, सरपंच, महिला मंडळाच्या अध्यक्षा, ग्रामसेविका, आरोग्यसेविका, डॉक्टर्स व इतर व्यावसायिक यांचा सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. संबंधित शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी त्याचप्रमाणे परिषदेने नियुक्त केलेले संपर्काधिकारी वेळोवेळी या कार्यक्रमांना उपस्थित राहून प्रकल्पशिक्षिकांना व स्त्रीपालकांना मार्गदर्शन करतात.

## लाभार्थी

प्रत्येक कार्यक्रमासाठी प्रत्येक शाळेत अंदाजे १०० स्त्रिया उपस्थित असतात असा अनुभव असून या प्रकल्पांतर्गत आयोजित एका कार्यक्रमाचा लाभ अंदाजे ३२००० स्त्रिया घेतात. प्रत्येक प्रकल्प शाळेत एका वर्षात अशा प्रकारचे ८ ते १० कार्यक्रम आयोजित केले जातात.

## प्रकल्पाचे मूल्यमापन

प्रकल्पास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पांतर्गत झालेल्या कामाचा आढावा घेणे व या कार्यक्रमांची एकंदरीत परिणामकारकता अजमावणे यासाठी परिषदेमार्फत प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यात आले असून जुलै १९८८ मध्ये मातृप्रबोधन प्रकल्पाचा मूल्यमापन अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालात नमूद केलेल्या निष्कर्षावरून असे स्पष्ट होत की, "हा प्रकल्प स्त्री-शिक्षणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त आहे."

मूल्यमापनाच्या निमित्ताने संपर्काधिकाऱ्यांनी प्रकल्पात सहभागी झालेले स्त्रीपालक, शिक्षिका, ग्रामस्थ व इतर अधिकारीवर्ग यांच्या त्या त्या जिल्ह्यामध्ये जाऊन प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. या वेळी संबंधित अधिकारीवर्ग, मुख्याध्यापक, शिक्षिका, स्त्रीपालक व ग्रामस्थ यांनी दिलेले सहकार्य उत्स्फूर्त व अपूर्व होते. ग्रामसेविका व आरोग्य सेविकांनी आपल्या मुलाखतीमध्ये असे नमूद केले आहे की, "इतके दिवस आम्ही एकट्याच काम करत होतो. आज आमच्याबरोबर शिक्षिका असल्यामुळे प्रत्येक पालकापर्यंत आम्हाला पोहोचता येते. दोन विभागांत समन्वय साधला गेल्यामुळे आमचे काम सहज व सुलभ झाले आहे. अशा प्रकारचे उपक्रम वारंवार घेण्यात यावेत. यामुळे आम्हाला स्त्रियांचे आरोग्य, बालसंगोपन व बालकांवरील सुसंस्काराची योग्य दृष्टी मिळते. आमचे विचार व्यक्त करायला मिळतात. नवनवीन प्रकारचे ज्ञान मिळते." असे प्रत्येक स्त्री-पालकाने अत्यंत जिव्हाळ्याने व आवर्जून आपल्या मुलाखतीच्या वेळी सांगितले आहे.

# मुलींचे शिक्षण

**पुरस्कार सवलती व शिष्यवृत्त्या**

(१) मुलींची पटनोंदणी वाढविण्याच्या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना व शिक्षण-विस्तार अधिकाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून १०० रु. रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यासंबंधीचा कार्यक्रम १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केला आहे.

(२) उच्च शिक्षणासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने मुंबईत येतात. म्हणून शासनाने मुंबईत विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी प्रत्येक २२५ चे वर विद्यार्थ्यांची सोय असलेली दोन वसतिगृहे बांधली आहेत. सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, मुंबई या वसतिगृहात दरवर्षी ४४० विद्यार्थिनींची राहण्याची सोय होत आहे.

(३) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये वरचा क्रमांक मिळविणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीत आर्थिक अडचणीमुळे बाधा पोहोचू नये म्हणून आणि त्याची गुणवत्ता वाढविणे शक्य व्हावे व त्यायोगे त्यांच्या बुद्धिमत्तेचा फायदा समाजास व राज्यास करून देता यावा या उद्देशाने अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्याची योजना शासनाने १९८४-८५ या वर्षी मंजूर केली. सदरहू शिष्यवृत्तीसाठी पुणे, नागपूर, औरंगाबाद ह्या तीन विभागांतील गुणवान विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. या योजनेनुसार गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुलींना असे आर्थिक साहाय्य देण्यात येते.

(४) बालवीर/वीरबाला या योजनेवर शासन दरवर्षी खर्च करते. १९८६-८७ या वर्षी रु. ९,००,००० खर्च केले आहेत. बालवीर/वीरबाला संस्थेच्या वतीने शिक्षकांना प्रशिक्षण देऊन अभ्यासक्रमही राबविला जात आहे. या संस्थेने प्रत्यक्ष केलेल्या मान्य खर्चाच्या ९० टक्के किंवा तूट यांपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम (परंतु कमाल २१.९० लाख) अनुदान म्हणून देण्यात येते.

बालवीर व वीरबाला चळवळीची मुख्य साध्ये व उद्दिष्टे म्हणजे मुलामुलींच्या व युवा स्त्री-पुरुषांच्या चारित्र्याचा विकास करणे; त्यांच्या शारीरिक, मानसिक, नैतिक व आध्यात्मिक विकासात हातभार लावणे व समाजास त्यांच्या सेवेचा उपयोग व्हावा व ते आदर्श नागरिक व्हावेत या उद्देशाने त्यांच्यामध्ये आत्मनिर्भरता व स्वयंशिस्त निर्माण करणे. १९७२-७३ पासून ८व्या, ९व्या, १० व्या इयत्तांसाठी बालवीर/वीरबाला हा विषय ऐच्छिक विषय म्हणून सुरू करण्यात आला आहे.

**अनौपचारिक शिक्षण**

अनौपचारिक शिक्षण योजना महाराष्ट्रात-१९७९-८० सालापासून सुरू करण्यात आली. ९ ते १४ वयोगटातील ज्या मुलामुलींनी कोणत्या ना कोणत्या कारणाने शाळा सोडली आहे अशांना अंशकालिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अशा मुलामुलींना नेहमीच्या शिक्षणप्रवाहात येण्याची आणि त्यांच्या इच्छेनुसार वर्ग चार अगर सातच्या शालेय परीक्षांना बसण्याची आणखी एक संधी उपलब्ध करून द्यावी अशा अपेक्षेने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**खास शिष्यवृत्ती**

महाराष्ट्रातील मुलींना सैनिकी शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून महाराष्ट्र शासनाने भोसला सैनिक शाळा, नाशिक येथे प्रशिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या मुलींकरता प्रत्येकी ७५ रुपयांच्या ३५ शिष्यवृत्त्या प्रत्येक वर्षासाठी मंजूर केल्या आहेत. या प्रशिक्षणाचा कालावधी तीन आठवड्यांचा असून ज्या मुली शारीरिकदृष्ट्या योग्य असतील व ज्या १४ ते २५ वर्षांच्या वयोगटात आहेत अशांना सदरहू प्रशिक्षणास प्रवेश दिला जातो.

**आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती**

कला शाखेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २०० शिष्यवृत्त्या आहेत. या शिष्यवृत्तीचे दर उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाकरिता दरमहा रु. ७० मुलांकरिता व दरमहा रु. ८० मुलींकरिता (जर वसतिगृहात राहात असतील तर) दिले आहेत. तसेच दरमहा रु. ४० मुलांकरिता व दरमहा रु. ५० मुलींकरिता वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले जातात. या दराने शिष्यवृत्ती १० महिन्यांकरिता दिली जाते. अंतिम परीक्षेत ४५ टक्के गुण मिळवून वरच्या वर्गात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची ही शिष्यवृत्ती पुढील शिक्षणासाठी चालू राहते.

शासनमान्य अनुदानित शाळांतील मुलींना ८३-८४ पासून १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात आलेले आहे व सन १९८५-८६ पासून इ. १ ली ते १२ वी अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमधील मुलींना शासनमान्य दराने फी माफी देण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या योजना**

(अ) सर्वसामान्य मुलींसाठी योजना
– निराश्रित विधवांच्या मुलींच्या विवाहासाठी रु. २०००/- अनुदान.
– स्वयंरोजगार योजनेखाली स्त्रियांना व्यक्तिगत अनुदान.

- व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन.
- देवदासींच्या मुला/मुलींकरिता वसतिगृह सुरू करण्यासाठी सेवाभावी संस्थेस अनुदान.
- निराश्रित आणि परित्यक्ता स्त्रियांना आश्रय देणे.
- देवदासींच्या पुनर्वसनाकरिता कल्याणकारी योजना.
- स्त्रियांसाठी प्रशिक्षण केंद्र.
- हुंडाग्रस्त स्त्रियांचे पुनर्वसन-माहेर योजना.
- हुंडा पद्धती नष्ट करण्यासाठी नेमलेल्या जिल्हा दक्षता समित्या.
- नोकरी करणाऱ्या महिलांकरिता दिवसभर मुले सांभाळण्याच्या केंद्रासह, वसतिगृहाच्या इमारती बांधकामाकरिता/त्यांच्या विस्ताराकरिता साहाय्य.
- दु:खित स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी महिला प्रशिक्षण केंद्र.
- सामाजिक, नैतिक संकटात सापडलेल्या स्त्रियांचे अल्पवास्तव्यगृह
- महिला मंडळाच्या प्रशिक्षण केंद्रास अनुदान.
- देवदासींच्या पुनर्वसनाकरिता कल्याणकारी योजना/देवदासींच्या आर्थिक पुनर्वसनासाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र.
- सामाजिक व नैतिक आणि अनुरक्षण कार्यक्रम. शासकीय महिला स्वीकार केंद्र.
- स्त्रिया व मुलींचा अपव्यापार दमन अधिनियम १९५६ च्या कायद्याच्या अंमलबजावणी करणाऱ्या संस्था.
- सामाजिक व नैतिक आरोग्य आणि अनुरक्षण कार्यक्रम महिला राज्यगृहे.
- सामाजिक नैतिक आरोग्य योजनेच्या अंतर्गत महिला स्वीकारगृहातील मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य.
- महिलांच्या पुनर्वसनासाठी साधनसामग्री विकत घेण्यासाठी अनुदान.
- अभिरक्षण गृहे.
  शासकीय प्रमाणित शाळा व सुधारगृहे यांचे परिरक्षण.
- भिक्षा प्रतिबंधक कायदा, भिक्षेकरी स्वीकार केंद्र व भिक्षेकरी गृह योजना. (महिला भिक्षेकरी स्वीकार केंद्र व गृह महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू केले आहे.)
- अनाथाश्रम (अनाथ मुले, मुली व निराश्रित स्त्रिया.)

### (ब) मागासवर्गीय मुलींसाठी कल्याणकारी योजना

- महाविद्यालयीन मुलामुलींना शिक्षण फी व परीक्षा फी देणे.
- माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, विद्यार्थिनींना शिष्यवृत्त्या.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनींना विद्यावेतन देणे.
- मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनींना शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्या देणे.
- मुलींसाठी शासकीय वसतिगृहे उघडणे व चालविणे.
- (मुला–मुलींसाठी) बालवाड्यांना अनुदान.

— मेहतर समाजाच्या मुला-मुलींसाठी पब्लिक स्कूलची योजना
— अनुसूचित जातीच्या मुलींसाठी वसतिगृहाच्या विस्तारित बांधकामास अनुदान.
— ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी शिवणकला वर्ग.
— भटक्या व विमुक्त जातीच्या महिलांसाठी शिवणकेंद्र.
— आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य.

**जिल्हा उद्योग केंद्रामार्फत स्त्रियांसाठी योजना**

— महिलांसाठी व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम.
— औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींसाठी ८० क्षमतेच्या दोन शासकीय संस्था सुरू केल्या)
— स्त्री-शिक्षण शासकीय कार्यक्रम.

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या योजना**

— कुटुंब कल्याण माता बाल संगोपन.
— लोक स्वास्थ्य परिचारिका प्रशिक्षण.

**महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे विविध योजना**

— उदा. दूध योजना, शिवण युनिट, विक्री केंद्र, केटरिंग इ.
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ,पुणे यांच्या योजना
— महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र शिवण, लोकरविणकाम, रेशीम धागा इत्यादीचे.

**चर्मोद्योग विकास महामंडळ,मुंबई यांच्या योजना**

— आर्थिक कमकुवत गटातील चर्मकार महिलांना स्वयंरोजगार प्राप्त व्हावा म्हणून अर्थसाहाय्य.
— सेवाघर-नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर, जेवण, धुलाई, इस्त्री केंद्र.
— महिलांकरिता जिल्हा स्तरावर उत्पादककेंद्र योजना.

याखेरीज महाराष्ट्रातील अनेक सेवाभावी संस्था मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्नशील आहेत.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-मुलींचे शिक्षण

देशातील जवळजवळ निम्म्या लोकसंख्येच्या (म्हणजेच स्त्रियांच्या) निरक्षरतेमुळे देशाला भोगावे लागणारे परिणाम गंभीर स्वरूपाचे आहेत. विशेषत: बालकांचे संगोपन व त्यांच्यावर होणारे संस्कार, कुटुंबाचे आरोग्य व कुटुंबाचे पालन याबाबत स्त्रियांच्या निरक्षरपणाचे, अशिक्षितपणाचे परिणाम गंभीर स्वरुपाचे आहेत.

स्त्री-शिक्षणाच्या या परिस्थितीत बदल घडवून आणावेत व चालू काळाची गरज लक्षात घेऊन याबाबत ठोस पावले उचलावीत या दृष्टीने भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (१९८६) स्त्रियांसाठी पुढील योजना आखल्या आहेत. स्त्री-शिक्षणाचा विचार राष्ट्रीय पातळीवर इतका व्यापकपणे प्रथमच होत आहे.

**लक्ष्ये**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (१९८६) स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुढीलप्रमाणे लक्ष्ये ठरविण्यात आली आहेत.

(अ) १९९० पर्यंत मुलींना विशेषत: प्राथमिक शिक्षण देणारा टप्प्याटप्प्यांचा पण कालबद्ध कार्यक्रम व १९९५ पर्यंत उच्च प्राथमिक शिक्षण देणारा कार्यक्रम.
(ब) १९९५ पर्यंत १५ ते ३५ वयोगटातील स्त्रियांना (ज्यांची संख्या अंदाजे ६.८ कोटी आहे.) प्रौढ शिक्षण देणारा टप्प्याटप्प्याचा कालबद्ध कार्यक्रम.
(क) स्त्रियांचा व्यावसायिक, तांत्रिक, तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञानाकडे वाढता प्रवेश.
(ड) स्त्रियांच्या समानतेबाबत भरीव मदत होईल, अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे सिंहावलोकन व पुनर्रचना आणि उचित अशा विभागाची निर्मिती.

**धोरणात्मक चित्रण व कार्यपद्धती**

लक्ष्य व कार्यपद्धतीची अंमलबजावणी यामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टी असतील.

(अ) संपूर्ण शिक्षणप्रणालीत स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देण्यासाठी विधायक स्वरुपाची मध्यस्थाची भूमिका वठविण्यास नियोजन करण्याच्या कामात गती देणे.
(ब) स्त्री-शिक्षणास उत्तेजन. त्यांच्या विकासास मदत करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना कृतियुक्त कार्यक्रम घेण्यास उत्तेजन.
(क) व्यावसायिक, तांत्रिक शिक्षणक्रमामध्ये स्त्रियांच्या प्रवेशाला अधिक संधी.
(ड) अपेक्षित लक्ष्य गाठण्यासाठी गतिमान व्यवस्थापनाचा आकृतिबंध निर्माण करणे.

## कार्यपद्धतीचे प्रतिपादन व कार्य योजना

– १९९५ पर्यंत शैक्षणिक संस्थांनी स्वयंस्फूर्तीने परिसरातील स्त्रियांचे संघटन निर्माण करावे व त्यांच्या गरजांवर आधारित कृति-कार्यक्रम हाती घ्यावेत.
– सर्व शिक्षक, अनौपचारिक व प्रौढ शिक्षण देणारे मार्गदर्शक, यांना स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देणारा प्रतिनिधी म्हणून शिक्षण दिले जावे.
– स्त्री-शिक्षिका व अनौपचारिक व प्रौढ शिक्षण देणाऱ्या स्त्री-मार्गदर्शिका यांचे स्त्रियांच्या समानतेसाठी क्रियाशील भूमिका घेऊ शकतील अशा प्रकारचे खास उद्‌बोधन केले जाईल.
– चर्चासत्रे, नाटके, प्रवचने, भित्तिचित्रे, बाहुलीनाट्य यांद्वारे स्त्रियांमध्ये सर्वसाधारण जाणीव व आत्मप्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी कार्यक्रम केले पाहिजेत.
– समाजातील वेगवेगळे घटक, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट इ. तून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.
– शालेय स्तरापर्यंत शिक्षकांच्या भरतीमध्ये स्त्रियांना प्राधान्य दिले जावे.
– स्त्रियांना समान अधिकार प्रदान करण्याचे प्रभावी साधन या दृष्टीने समान पायाभूत अभ्यासक्रम उपयुक्त होईल.
– राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, राज्यस्तरीय संस्था, शिक्षक, प्रशिक्षक, नियोजनकार व प्रशासक हे स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जाणीव निर्माण करण्याचे कार्य करतील.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात एकशिक्षकी शाळा आहेत. गुणवत्ता विकास कार्यक्रमासाठी प्रत्येक विभागाला आणखी एक शिक्षक देण्याची तरतूद ८ व्या योजनेत केली जाईल. शाळेतील दोन शिक्षकांपैकी एक स्त्री असावी या दृष्टीने प्रयत्न केले जातील. त्यासाठी स्थानिक परिस्थितीचा विचार करून पुढील शिक्षणाच्या प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून स्थानिक सुशिक्षित स्त्रियांची निवड करण्यात येईल.

## प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व प्रौढ शिक्षण

– देशातील शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या भागात अनौपचारिक शिक्षणकेंद्रांचा विस्तार केला जाईल. सेवाभावी संस्थांना मुलींसाठी अनौपचारिक शिक्षणकेंद्रे चालविण्याकरिता आर्थिक सहाय्य देण्यात येईल.
– ग्रामीण भागात घरगुती कामे करण्यासाठी म्हणून १९९५ पर्यंत शैक्षणिक धोरणात उल्लेखिलेल्या विशेष सहाय्यसेवांचा विस्तार ह्या सर्व विभागापर्यंत झाला पाहिजे.
– खेड्यात अथवा स्थानिक भागात व्यवसायाशी अथवा कामाच्या संधीशी निगडित कौशल्यांच्या विकासास इतर गोष्टी बाजूला सारून प्राधान्य दिले जावे, त्यामुळे पालकांना आपल्या मुलींना शिकविण्याची प्रेरणा मिळेल.
– १९९५ पर्यंत स्त्रियांमधील निरक्षरता निर्मूलनासाठी १५ ते ३५ वयोगटातील स्त्रियांना शिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रौढ शिक्षण वर्ग सुरू केले पाहिजेत.

– मुली व स्त्रियांमधील कौशल्य विकासाचा कार्यक्रम हा अनौपचारिक शिक्षणकेंद्रापासून प्रौढ शिक्षणकेंद्रापर्यंत सातत्याने चालला पाहिजे.
– व्यावसायिक, तांत्रिक व धंदेशिक्षणात तसेच अस्तित्वात असलेल्या व उदयोन्मुख तंत्रज्ञानात स्त्रियांना प्रवेश मिळावा.
– मुलींना औपचारिक/अनौपचारिक पद्धतीने व्यावसायिक प्रशिक्षण दिले पाहिजे.
– औद्योगिक प्रशिक्षण संस्था केवळ स्त्रियांसाठी काम करीत असून सामान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून ९७ विभाग स्त्रियांसाठी राखून ठेवलेले आहेत.

सर्व राज्यात राज्यपातळीवर स्त्रियांचा विभाग स्थापन करण्यात यावा. या विभागाचा प्रमुख म्हणून किमान सहसंचालकांच्या दर्जाचा एक अधिकारी असावा.

• • •

# मुलींचे शिक्षण-पुढील वाटचाल

वेगवेगळ्या वयोगटातील मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण, मुलींचे शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण, गळतीचे प्रमाण (विशेषत: ११ ते १४ वयोगटातील) या बाबी विचारात घेता या प्रश्नाकडे अधिक जाणीवपूर्वक पाहणे आवश्यक आहे. मुलींच्या शिक्षणातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या आयोगांनी अनेक उपयुक्त शिफारशी केलेल्या आहेत. या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी सत्वर व ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

या व्यतिरिक्त सर्व मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून काही सूचना करण्यात येत आहेत. या सूचनांना अनुसरून उपक्रम आखले व या उपक्रमांना प्राधान्य देऊन त्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रात केला तर मुलींच्या शिक्षणाचा हा प्रश्न लवकरात लवकर सोडविणे शक्य होईल, असा विश्वास वाटतो.

– मुलींच्या शिक्षणामधील समस्या व तद्अनुषंगिक गरजा यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी शासन स्तरावर तसेच सेवाभावी संस्थांमार्फत अल्प व दीर्घ मुदतीचे संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावेत. सर्व स्तरांवर सर्वेक्षण, कृतिसंशोधन, संशोधनात्मक अभ्यास व वृत्तेतिहास इ. चा अवलंब करावा.

यामधून उपलब्ध झालेल्या निष्कर्षांना अनुसरून विविध योजना तयार कराव्यात व त्यांची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात करावी.

– प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांतील मुलींची पटनोंदणी वाढविण्यासाठी तसेच मुलींना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व संबंधित अधिकारीवर्ग सतत प्रयत्नशील असतात. तरी देखील आपण मुलींमधील निरक्षरतेचे प्रमाण, गळतीचे प्रमाण कमी करू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. हे प्रयत्न जर अधिक डोळसपणे झाले तर ही समस्या निश्चितपणे सुटू शकेल. या प्रश्नाच्या अनुषंगाने येणाऱ्या समस्यांची जाणीव देण्यासाठी, या समस्यांवर योजावयाच्या योग्य उपायांची व प्रयत्नांची माहिती देण्यासाठी शिक्षक व शिक्षिकांना खास प्रशिक्षण देण्याची सोय करणे आवश्यक आहे.

शिक्षिकांना अशा प्रकारचे किमान एक महिन्याचे प्रशिक्षण द्यावे.

मुलींच्या शिक्षणाच्या समस्यांवर सखोल विचार करून एक प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी व त्याद्वारे मुख्याध्यापकांच्या व शिक्षक शिक्षिकांच्या प्रशिक्षणाची सोय करावी. अशा प्रकारचा अध्ययन अध्यापन साहित्य संच शिक्षणविस्तार अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्यासाठी तयार करून त्यांचेदेखील उद्‌बोधन करण्यात यावे.

– इयत्ता १ ते १० मधील गरजू मुलामुलींना मधल्या वेळचे जेवण देण्याची व्यवस्था व्हावी. विशेषकरून ही सोय इ. १ ते ४ मधील मुलामुलींसाठी प्राधान्याने करावी.

– 'खडू फळा मोहीम' (Operation Black Board) या योजनेखाली एक शिक्षकी शाळचे द्विशिक्षकी शाळांमध्ये रूपांतर करताना एकतरी स्त्रीशिक्षिका नियुक्त करावी असे सुचविले आहे. ग्रामीण भागात स्त्रीशिक्षिकेची नियुक्ती करताना ज्या अनेक समस्या अनुभवाला येतात, त्यामधील एक समस्या म्हणजे नियुक्त केलेल्या शिक्षिकेची ग्रामीण भागात काम करण्याची तयारी नसते. आणि दुसरी समस्या म्हणजे स्थानिक पातळीवर प्रशिक्षित शिक्षिका मिळत नाहीत. यासाठी ग्रामीण भागात नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षिकांना प्रोत्साहनपर सवलती द्याव्यात. त्याचप्रमाणे शक्यतो स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या प्रशिक्षित शिक्षिकांची नियुक्ती करावी. जर प्रशिक्षित शिक्षिका उपलब्ध नसतील तर किमान इ. १० वी पास असलेल्या स्त्रियांची नियुक्ती करून त्यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची व्यवस्था करावी. यासाठी वयोमर्यादा देखील ४५ वर्षापर्यंत शिथिल करावी. मुलींचे शिक्षण खऱ्या अर्थाने यशस्वी व्हायचे असेल तर सुरवातीस तरी अशा सवलती देऊन उपाय योजणे आवश्यक आहे.

– मुलींच्या शिक्षणासाठी स्थानिक पातळीवर नेतृत्व निर्माण करता आले तर प्रत्येक गावातील मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सहजगत्या सुटू शकेल. मुलींमधील नेतृत्वगुणाचा विकास व्हावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, मुलींमधील सुप्त कलागुणांचा विकास व्हावा यासाठी वासंतिक शिबिरे ग्रामपातळीवर व तालुका पातळीवर घेण्यात यावीत. या शिबिरांमधून मुलींच्या शिक्षणातील समस्या, विविध कार्यानुभवांचे ज्ञान, सकस आहार, अंधश्रद्धा, स्वच्छता, ११ ते १४ वयोगटातील मुलींचे प्रश्न इ. सारख्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्तच्या विषयांची माहिती शिबिरार्थींना द्यावी. अशा प्रकारची शिबिरे प्रामुख्याने ११ ते १४ वयोगटातील मुलींसाठी घ्यावीत व प्रत्येक मुलीला किमान २ शिबिरात तरी सहभागी होता यावे.

– आदिवासी भागातील तसेच अल्पसंख्याक गटातील मुलींच्या समस्यांबाबत अधिक व वेगळा विचार करणे आवश्यक आहे. कारण या गटातीलच फार मोठी मुलींची संख्या शिक्षणापासून वंचित आहे. या मुलींसाठी विशेष कार्यक्रम आखून ते राबविण्यात यावेत.

– ६ ते १४ वयोगटातील शाळा सोडलेल्या किंवा शाळेत न गेलेल्या मुलींसाठी खास अनौपचारिक शिक्षणाची सोय करावी. अनौपचारिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाबरोबरच परिसरातील त्याचप्रमाणे विशिष्ट वयोगटातील मुलींच्या गरजांप्रमाणे पूरक अभ्यासक्रमही तयार करण्यात यावा. या अनौपचारिक शिक्षण केंद्रांची कामकाजाची वेळ मुलींच्या सोयीप्रमाणे ठरवावी.

– पालकांशी सतत संपर्क ठेवून शिक्षणाविषयी त्यांना आस्था वाटावयास लावणारे उपक्रम योजावेत. पालकांचे मेळावे आयोजित करावेत. त्याचप्रमाणे माता भगिनींच्यामध्ये मुलींच्या शिक्षणासंबंधी जाणीव जागृती व्हावी, ग्रामीण नेतृत्वाचा उदय व्हावा यासाठी राज्यव्यापी

कार्यक्रम आखण्यात यावा. यासाठी मातृप्रबोधन प्रकल्पाच्या धरतीवरचा कार्यक्रम ८ व्या पंचवार्षिक योजनेत सुरू करावा.

– सर्वसाधारणपणे इ. ५ वी पासून पुढे मुली घरासाठी अर्थार्जनाकडे वळतात. त्यामध्ये मुलींचा जाणारा वेळ वाचून त्यांना शिक्षण घेता यावे म्हणून मुलींच्या पालकांना अर्थसाह्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे मुलींची आर्थिक समस्या दूर व्हावी म्हणून सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात अधिक जोमाने करण्यात यावा.

– अभ्यास कसा करायचा हे मुलींच्या लक्षात यावे, अभ्यासाचा त्यांना त्रास वाटू नये. तसेच शिक्षणाविषयी त्यांना आवड निर्माण व्हावी, यासाठी अभ्यास कसा करावयाचा? याची प्रात्यक्षिके घेतली जावीत.

– सेवाभावी संघटनांच्या सहाय्याने स्त्रीशिक्षण जागृती मंच स्थापण्यात यावा. यासाठी स्थानिक महिला मंडळांचे सहकार्य घेऊन त्यांना आर्थिकसाह्य द्यावे. ग्रामपातळीवर मुलींसाठी, स्त्रियांसाठी वाचनालये, करमणूक केंद्रे, क्रीडांगणे यांची सुविधा करावी.

या कामात समाजाचा सहभाग अधिकाधिक मिळविण्यासाठी समाजप्रबोधनाचा राज्यव्यापी कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

# EDUCATING THE YOUNG FOR TOMORROW

**– USHA NAIR**

I consider it a privilege to have been asked to share some of my thoughts with you in this session.

The present workshop-cum-seminar has been organized to discuss the issue of girls' education. May I take this opportunity to congratulate the Director, S.C.E.R.T. , for choosing the Girl Child for focus as part of the Silver Jubilee celebrations of the State Council. As you are all aware, the heads of State meeting of the SAARC decided to declare 1989 as the Year of the Girl Child in South Asia. Your deliberations are, therefore, very timely and of consequence.

South Asia (barring Sri Lanka*) is the only region in the world where there are fewer women in the population compared to men. In India, the sex ratio fell from 972 women per 1000 men in 1901 to 930 in 1971 and rose to 934 in 1981. This phenomenon speaks of the conscious and unconscious neglect of the female half. Another major indicator that moved down sharply during the same period was the work force participation rate of women from nearly 32% to 12% during 1901 to 1971. The introduction of modern technologies displaced women from their traditional economic tasks which were taken once by men as soon as these were mechanized. All new effect and training to build the skills for handling modernized agricultural and industrial operations were directed at men by the Development Planners, who saw women as "consumers" or "welfare beneficiaries" of development only, totally ignoring their roles as 'Producers'. Women form only 10% of those employed in the organized sector of the economy and

---

* Sri Lanka is a fairly egalitarian society which does not discriminate on the basis of gender or caste or class. Their post-Independence policies have been distributive in nature; free food, free education, free health and subsidized transport has built a literate society; female literacy is 85% and so is the percentage of effective school enrolments. Population growth rate was reduced from 2.5% to 1.7% between 1950-1973.

34 Pl... and ...
17-B, Sri Aurobindo M...
New Delhi-110016
DOC, No ....... D-9053

only one third of main workers and bulk of the marginal workers. The rate of skill formation among rural women was estimated as 3% only, 1981. Education has done little to redraw the occupational map, most women are without education or any skill. The educated women are hurdled in sex typed low skilled, low paid. Girls are given or they exercise limited curricular options denoting their employment potential to just a few occupations.

I have picked up the above two indicators to draw your attention to the differential intra household distribution of food, health care, medical attention, educational and social customs as between sons and daughters, men and women, which finally lead to greater female dipletion in the population. If girls who are unwelcome at birth, manage to survie, they fall into the trap of early marriage, unsafe high risk motherhood, frequent pregnancies, malnourishment, anemia and hence grow up into listless adults with lower productivity. Education has done little to alter this vicious cycle of a negative self image, poor health, low skilled education caused by an unfair division of labour and resources within the household, in the economy, which is both a product of the powerlessness of women and a continued factor causing further powerlessness. We have to think of an integrated approach to education of girls which will combing education, health and training for self confidence and self reliance among themselves. Educated women have smaller and healtheir families, are more likely to work in more productive sectors.

The National Policy on Education, 1986, is the most radical statement of its times with regard to the status of women. It does not rest with provision of equal educational opportunity to both boys and girls, but commits the whole educational system to work for women's equality and improvement. This is a much bigger task and a challenge to be shouldered by education and let us face it, that education has the largest physical and human infrastructure of over 7,50,000 institutions, 120 million students and over 3-4 million teachers/instructors.

According to NPE, Education will be used as an agent of basic change in the status of women and will play a positive interventionist role in the empowerment of women and for neutralizing the accumulated distortions of the past through a well conceived edge in their

favour. It will foster the development of new values through redesigned curricula, text books, the training and orientation of teachers, decision makers and administrators through the active involvement of educational institutions. This will be an act of faith and social engineering. Women's studies will be promoted as a part of various courses and educational institutions encouraged to take up active programmes of women's development. Further, elementary education will receive overriding priority through provision of special support services, setting up of time targets and effective monitoring. The emphasis will be both on removing obstacles inhibiting the access of girls to and retention in school. Major emphasis will be laid on women's participation at all levels and in all types of education especially in non-traditional, vocational, technical and professional education programmes. Sex stereotyping of such courses is to be avoided. The Programme of Action details out the policy statement, giving action points and possible strategies. Concretely, the following operational strategies may be adopted.

1. Awareness generation programmes among all educational packages and innovative communication. Styles on advantages of educating girls and the dangerous consequences of ignoring them.

2. Removal of sexist bias from curriculum, text books and educational programmes and incorporation of positive ideas. Specific guidelines may be prepared for the following :

(i) Educational planning & administration ;
(ii) Teacher-education and teachers ;
(iii) Curriculum developers and text-book writers.

3. A positive school based programme for promotion of equality between sexes (one of the ten core values listed in the National Curricular Frame work) through activities promoting shared roles, mutual respect and a harmonious growth of young children.

Such a programme, if consciously planned, can provide a vehicle for (a) a proper transaction of the undifferentiated curricula, and (b) foster a spirit of service among young boys and girls who can carry the message of equality to their families and communities through the out

of school, activities that may be planned by them along with their achers.

4. -**Women's Cells** would have to be set up at the State and the District levels for building adequate research and data base for monitoring and evaluation of educational plans and programmes in respect of equality between sexes. Women's studies would form an integral part of the total scheme, through adequate demystification of research. The different aspects of the reality surrounding girls and women, needs to be understood, analysed, documented and disseminated to remove many cobwebs that hide it or distart it. As a first step, indications of equality between sexes would have to be identified/developed, for measuring the progress made over definite periods of time. Simple action research would have to be built into pre-service and in-service education and training of all educational personnel. Such would be tasks of women's studies cells at the SCERT/SIEs and now in the DIETs.

5. Resource allocations need a relook as between education and other development sections, between elementary education and other schemes of education, between boys and girls with elementary education. The fresh inputs and allocations should take into account the proportion of girls among the out of school population. For, it will be important not only to expand educational facilities alone, but look for a compendium of support services (drinking water, cheap fodder and fuel, easy access to medical and health care), early childhood education and care and schools with meaningful programmes that will enable girls to come into their own. This would imply differential allocations, non-directed allocations and built in costs for promotional activities and support services that can help enrol and return girls in the system.

**Thrust for Eighth Plan**

At this point, I would like to draw your attention to a single point agenda for the VIII Five Year Plan and i.e. Universalization of Elementary Education. The UEE will serve not only as an educational programme for girls but also the foral point for convergence of various other services. I would like to draw your attention to the following :

(i) Presently, UEE is the only developmental programme for girls in the age group 6-14 years. All other programmes like the ICDS, DWCRA, NLM, TRYSEM, Condensed courses of the CSWB are aimed at the 0-6 years or the 15 + group. UEE can provide the entry point for health and nutrition inputs for.

(ii) UEE is a pre-requisite for building a **permanently literate** population or else we shall always be needing national literacy mission and like programmes to **salvage** the 15 plus group who have been victims of our neglect. Currently there are over a 100 million illiterate in the age group 15–35 years, of whom 69 million are women. They speak of our ineffectiveness in getting them to school and keeping them there.

(iii) UEE will have to use many innovative strategies to enrol and retain children. The programme will have to make special attempts to get 6-9 year olds in the system who are out of school rather than want for them to be 9, and, this eligible for NFE. Innovation and flexibility would have to be a hall mark of the programme as also the co-ordination and linkages needed between education and other departments. A major input needed is a free nutritious noon meal and state supported school health care.

(iv) Introduction of a sex bias free curriculum and text books in elementary education and building positive School Based Programmes for building equality between sexes should recall one immediate attention. This will give us a qualitative different set of adults in the 21st Century, those who shall have grown together in the **shared mode** as against the present **dominance culture.**

(v) UEE will have to focus on the Girl Child without loosing its broader perspective as an equity programme.

The Girl Child needs special attention. Of the estimated 79.50 lakhs children in the age group 6-11 years, only 38.82 lakh are girls compared to 40.68 lakh boys; in the age group 11-14 years there are 23.51 lakh girls compared to 25.06 lakh boys. There are 32.4 lakh men and 30.4 lakh women in the population of Maharashtra.

The enrolments at various levels and types of education speak

the same tale. The gap grows under with every successive higher level of education.

At the elementary stage, half the girls compared a quarter of boys in the age group 11-14 years are outside school. These girls are a crucial group for UEE as also the boys who are outside. We need to know more about these children, about the phenomenon of child labour, child marriage, child abuse, child development.

UEE has to be an inter-sectoral programme to promote and safeguard the interests of the Girl Child in the larger interest of the nation. Investment in the Girl Child is the safest investment for a more balanced, healther and peaceful future. Let the Eight Plan centre around the Girl Child in the framework of UEE. The costs of doing this will be high but the cost of not doing it will be far heavier.

The attention to the deprived female half is no more an equity question but a major survival issue for human kind as a whole. The true improvement of women would mean providing them the required education, health, nutrition and training and for taking their due place in societal processes. Protective discrimination can be an interim strategy to be employed carefully, as an enabling mechanism and not a disabling device and building further dependence. This really adds another challenge to education. Education has to get these girls ready for shouldering society's decision making in addition to their productive and reproductive roles.

• • •

# मुलींचे शिक्षण - एक आव्हान

श्री. व.रा.नागपुरे

**नको जन्म मुलीचा :**

भारतीय समाजातील कुटुंबात मुलाचा जन्म झाला की, आनंदोत्सव करण्याची प्रवृत्ती आढळते आणि मुलीचा जन्म झाला की, कुटुंबामध्ये अनावश्यक व्यक्तीची भर पडली अशी जाणीव निर्माण होते. मुलीच्याबाबतीत जन्मापूर्वी अनास्था आणि तिच्या जन्मासंबंधी अनावस्था दाखवली जाते. गर्भपरीक्षेत मुलीचा अंकुर असल्यास तो निपटून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येते. मुलीला जन्मानंतर कुटुंबात आणि कुटुंबाबाहेर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

कुटुंबाला भार झालेली मुलगी सातत्याने दुर्लक्षिली जाते. कुटुंबातील व्यक्तींची नकारात्मक भूमिका आणि समाजातील गैरसमज, अंधश्रद्धा यामुळे मुलीचे भावविश्व विकसित होण्याऐवजी कोमेजू लागते आणि कुटुंबासाठी स्त्रियांनी त्याग करावा अशी तिच्या ठायी सातत्याने जाणीव निर्माण केली जाते.

२१ व्या शतकाला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न चालू असताना मुलींच्या शिक्षणाच्याबाबतीत आतापर्यंत झालेली वाटचाल विचारात घेता ज्या समाजात ५० टक्के स्त्रिया आहेत आणि त्या अजूनही सर्वच बाबतीत दुर्लक्षित आहेत. असा समाज परिणामकारक विशेष प्रयत्न केल्याशिवाय खंबीरपणे प्रगती करू शकणार नाही. मुलीच्या जन्मापासून तिच्या आरोग्याची, तिच्या शिक्षणाची आणि समान वागणूक देऊन स्वावलंबी बनण्यासंबंधीची कामगिरी सर्व स्तरांवर जबाबदारीने व परिश्रमाने पार पाडावी लागेल.

**स्त्री-पुरुष विषमता :**

मुलीच्या जन्मापासून तिला मिळणारी वागणूक किंबहुना तिच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक वाढीकडे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, यामुळे मुलींच्याबाबतीत बालवयात मृत्यूचे प्रमाण अधिक प्रमाणात आढळून येते. एकीकडे मुलीचा जन्म टाळावयाचा आणि दुसरीकडे जीवनाला आवश्यक सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे आणि जीवन यशस्वी व आनंददायी होण्याचा मार्ग न सापडल्यामुळे खुंटीत होणारी जीवनवेल-यामुळे स्त्री-पुरुष प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असल्याचे आढळते. १९०१ मध्ये १००० पुरुषांमागे ९७२ इतके स्त्रिया होते. हे प्रमाण १९५१ मध्ये ९४६ वर आले आणि १९८१ मध्ये ९३३ इतके झाले. याचाच अर्थ पुरुषांची संख्या स्त्रियांच्या तुलनेने वाढत आहे आणि स्त्री-पुरुष ही दरी फक्त संख्येच्याच बाबतीत नाही तर सर्वच बाबतीत वाढत असल्याचे आकडेवारीवरून लक्षात येते.

**परक्याचे धन :**

कुटुंबामध्ये मुलगी सातत्याने दुर्लक्षित घटक म्हणून वावरत असते. "दुसऱ्याच्या परसातील झाडांना पाणी घातल्याप्रमाणे आपल्या कुटुंबातील मुलगी वाढविणे असते" अशा प्रकारची तेलगू म्हण आहे. मुलामुलींतील फरक बालपणातच रुजविला जातो आणि वाढविला जातो. मुलीच्या मनावर बालवयात होणारे संस्कार अत्यंत टिकाऊ आणि दूरगामी परिणाम करणारे असतात. कुटुंबातील मुलाला अधिक प्राधान्य देण्यात येते. मुलीकडे दुर्लक्ष केले जाते आणि दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जाते. कुटुंबात मुलाचा जन्म झाला तर जो हर्ष होतो आणि मुलीचा जन्म झाला की जो विषाद प्रकट केला जातो त्याची नोंद कुटुंबातील मुलीच्या मनावर झाल्याशिवाय रहात नाही. मुलीच्या मनात सातत्याने अस्थिरपणाची भावना लहानपणापासून निर्माण केली जाते. आई-वडिलांकडून मिळणारे प्रेम हे दुय्यम दर्जाचे असते. आणि अशातऱ्हेने "परक्याचे धन" अशी संभावना सातत्याने करण्यात येते. मुलगी म्हणजे कुटुंबातील तात्पुरती सदस्य अशा तऱ्हेचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन असतो. अशा परिस्थितीत तिचे आरोग्य, पोषक आहार आणि शिक्षण याकडे दुर्लक्ष होते.

कुटुंबाच्या बाहेर देखील मुलीला मिळणारी वागणूक ही नेहमी सापत्नभावाची असते. शाळेमध्ये आणि अन्य ठिकाणी तिला सातत्याने जाणीव करून दिली जाते की, तिच्यामध्ये आणि मुलामध्ये फरक आहे आणि विशिष्ट मर्यादा तिने पाळणे आवश्यक आहे. मुलाबरोबर प्रत्येक उपक्रमात तिला सहभाग दिला जातोच असे नाही. नेतृत्वाचे गुण विकसित करताना क्वचितच मुलींना प्राधान्य दिले जाते. आणि त्यांच्या कामाचे स्वरूप 'बायकी' असल्याने 'पुरुषी' कामे त्यांना जमणार नाहीत अशी भावना सातत्याने रुजवली जाते. शाळेत मुलामुलींना मिळणारी वागणूक, पाठ्यपुस्तके, उपक्रम, शिक्षकांचा दृष्टिकोन यामध्ये असलेला मुलांमुलींच्या बाबतीतील फरक याचबरोबर समाजातील अन्य घटकांकडून देखील स्त्री-पुरुष भेद किंवा मुलगा-मुलगी भेद हा वाढवला जातो आणि रुजविला जातो.

**बाहुल्यांचे जग :**

तंत्रज्ञान आणि दळणवळणात झालेली प्रगती अत्यंत नेत्रदीपक अशी मानली पाहिजे. दूरदर्शन देशातील ७०% जनतेपर्यंत पोचले आहे परंतु या माध्यमामार्फत दाखविण्यात येणारे कार्यक्रम मुलामुलीतील भेद कमी करण्यावर तयार झालेले दिसून येत नाहीत. परंतु कथा कार्यक्रमातून आणि जाहिरातीतून स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे आणि कपडे धुणे, स्वयंपाक करणे, मुलांना सांभाळणे, वडिलांचा मान ठेवणे अशाप्रकारचे चित्रण स्त्री किंवा मुलीच्या भूमिकेतून तयार केले जाते.

अकुशल कामगार म्हणून काम करीत असताना किंवा शेतमजूर म्हणून काम करीत

असताना मजुरीचे मिळणारे दर स्त्री-पुरुष यांच्याकरिता वेगळे आहेत आणि पुरुष स्त्रीपेक्षा अधिक काम करतो हेच ह्या दराच्या फरकावरून दाखविले जाते.

स्त्रियांचे कायदे, स्त्रियांना मिळणारी वागणूक, वारसा हक्काद्वारे मिळणारी सुविधा याबाबतीतही स्त्रियांवर नेहमीच अन्याय झाल्याचे दिसून येते. लोकशाही राज्यामध्ये स्त्री-पुरुष समानता हे गृहीत तत्त्व मान्य केल्यानंतरही स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा किंवा लोकसभा यामधून निवडून येणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अत्यंत अल्प असे दिसून येते. स्त्रियांना समान वागवण्याची प्रवृत्ती आणि त्यांच्या हक्कासंबंधीची जागरुकता पुरुषप्रधान समाजामध्ये अभावानेच दिसून येते.

**प्रगतीमधील विसंवाद :**

स्त्रियांमधील दुर्बलता नष्ट व्हावी आणि त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रांमध्ये समान संधी मिळावी, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा याची जाणीव समाजकार्यकर्त्यांना आणि राजकीय नेत्यांना स्वातंत्र्यपूर्व काळापासून झालेली आहे. याबाबतीत झालेले प्रयत्न फार महत्त्वाचे आहेत. परंतु आजच्या परिस्थितीत त्यांची परिणामकारकता जाणवत नाही. भारतात अजूनही ७५% स्त्रिया निरक्षर आहे. आणि पुरुषांच्या बाबतीत हे प्रमाण ५३% आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये इयत्ता १ ली मध्ये दाखल झालेल्या ५३% मुली ४ थी पर्यंत राहतात. ७ वी पर्यंत, २९.६ टक्के राहतात, आणि १० वी पर्यंत १५.१ टक्के राहतात. म्हणजेच ७ वी पर्यंत ७० टक्के आणि १० वी पर्यंत ८५ टक्के एवढ्या प्रमाणात गळती होते. इयत्ता १ ते ४ स्तरावर होणाऱ्या ५५ टक्के गळतीमधील बहुसंख्य मुली नंतर निरक्षर स्त्रिया म्हणून गणल्या जातात.

मुलींच्या बाबतीत त्यांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यामध्ये पालक, पालकांची आर्थिक स्थिती आणि शिक्षण व्यवस्था जबाबदार आहे. त्यांची मुलीच्या शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी व स्वरूप विधायक नसते. मुलगी हाताशी आली की, आईला आणि कुटुंबाला मदत करू लागते आणि मग तिच्यावर कुटुंबातील बरीचशी कामे सोपवून आई अर्थार्जनासाठी बाहेर पडू लागते. ६ ते ११ वयोगटातील मुली कुटुंबातील जवळ जवळ ३०% कामाचा भार उचलीत असतात. घर साफ करणे, कपडे धुणे, पाणी आणणे, जळाऊ लाकडे गोळा करून आणणे, जनावरांची काळजी घेणे त्याचप्रमाणे आईच्या व्यवसायिक कामामध्ये मुली मदत करीत असतात. महाराष्ट्रातील विड्या वळण्याच्या उद्योगात स्त्रिया आणि मुलींची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. कुटुंबाच्या फायद्यासाठी मुलींचा उपयोग अगदी लहानपणापासूनच केला जातो. आणि त्यामुळे शाळेमध्ये शिक्षणासाठी पाठविणे पालकांना शक्य होत नाही. ज्या मुली आवडीने शाळेत येतात त्या ठिकाणी शाळेविषयी, अभ्यासाविषयी आकर्षण निर्माण व्हावे असे वातावरण आढळून येत नाही आणि पुरुष शिक्षकांच्या हाताखाली मुलींना शिक्षणासाठी पाठविणे बऱ्याच पालकांना मान्य होत नाही.

मुलगी वयात आल्याबरोबर लग्न करून देण्याची घाई अजूनही अशिक्षित व सुशिक्षित, ग्रामीण-शहरी भागात कमी झालेली दिसत नाही. किंबहुना मुलीचे लग्न करून आपले कर्तव्य संपले अशी भावना आजही मोठ्या प्रमाणामध्ये आढळून येते. मुलीच्या लग्नासाठी पालकांची विवंचना आणि भार, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेला-सामोरे जातात. आणि त्यातून ही अबलेच्या जीवनाची कहाणी पुढे सुरु होते.

शाळेतील अभ्यासक्रम हा दैनंदिन जीवनाशी सुसंगत वाटत नाही. म्हणून शाळेत मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये यांचा शाळेबाहेर उपयोग होत नाही. इयत्ता १ ते ४ या वर्गात देण्यात येणारे शिक्षण मुलीला भावी जीवनात स्थिरता टिकविण्यासाठी मदत करीत नाही. त्या काळात मिळविलेल्या विषयज्ञानाचा वापर करण्याची आणि अधिक ज्ञान मिळविण्याची क्षमता निर्माण केली जात नाही किंवा मुलीमध्ये ती टिकून रहात नाही.

**मुलगी-मोलकरीण :**

बाल कामगार कायद्याची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या होत नाही याला प्रमुख कारण म्हणजे, पालकांची आर्थिक परिस्थिती. दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या व्यक्तीला, प्रत्येक व्यक्तीने अर्थार्जन करावे आणि कुटुंबाला मदत करावी अशी अपेक्षा असते. त्याशिवाय ज्याचा मोबदला मिळत नाही असे कुटुंबातील काम मुलींकडून करून घेतले जाते. अशा कामाची राष्ट्रीय पातळीवर पाहणी केल्यानंतर असे आढळून आले आहे की ग्रामीण भागात मुलगी घरी, घराबाहेर, शेतात दररोज ९ तास काम करते आणि सरासरी वर्षात तिला ३१५ दिवस काम करावे लागते. किमान वेतन कायद्याप्रमाणे जर हिशोब केला तर, तिच्या श्रमाची वार्षिक किंमत रु. २२००/– एवढी होते. म्हणजेच त्या कुटुंबाला मुलीच्या कामामुळे अप्रत्यक्षरीत्या ही रक्कम मिळते. १९८१ च्या जनगणनेनुसार ८५% स्त्रिया काम करतात त्यात मुलींचा देखील समावेश आहे. त्या असंघटित क्षेत्रात काम करीत आहेत. आणि त्यांचे कामाचे स्वरूप प्रामुख्याने अकुशल कामगार म्हणून गणण्यात येते. १९८१ च्या अहवालानुसार १ कोटी ४ लाख बालमजूर आढळून आले त्यापैकी १४ वयोगटातील २.१ मुले आणि ४.३ इतक्या मुली होत्या. म्हणजेच बालकामगारात मुलींची संख्या जवळ जवळ मुलांच्या दुप्पट आढळते. मुलींना कामाला पाठवून मुलांना शाळेत पाठविण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे त्यावरून दिसून येते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये मुलींच्या शिक्षणासंबंधी काही निश्चित उपाययोजना सुचविल्या आहेत. मुलींचे शिक्षण आणि त्याचा दूरगामी परिणाम याचा विचार करून कार्ययोजना निश्चित करण्याचा प्रयत्न कृतिकार्यक्रमामध्ये दिसून येत आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, प्रौढ शिक्षण, व्यावसायिक शिक्षण या तिन्ही स्तरांवर मुली आणि

स्त्रिया यांच्या सहभागावर विशेष भर दिलेला आहे. प्राथमिक स्तरावर ऑपरेशन ब्लॅकबोर्ड या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील आणि देशातील एकशिक्षकी प्राथमिक शाळेमध्ये किमान सुविधा व साहित्य उपलब्ध करून दुसरा शिक्षक देण्याची कार्यवाही सुरु आहे. आणि या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे देण्यात येणारा दुसरा शिक्षक ही शिक्षिका असावी अशी अट घालण्यात आली आहे. त्याचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर निश्चित दिसून येईल असा विश्वास वाटतो.

अनौपचारिक शिक्षणावरही भर देण्यात आलेला असून अनौपचारिक वर्गात प्रामुख्याने मुलींची संख्या जास्त राहील अशी अपेक्षा आहे. प्रौढ शिक्षण वर्गात स्त्रियांसाठी वर्ग सुरु करण्यात आले असून त्याची व्याप्ती नजिकच्या काळात वाढवली जाणार आहे. मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षण विभागामार्फत व अन्य विभागांमार्फत तसेच सेवाभावी संस्थांमार्फत होणारे प्रयत्न पुरेशी आर्थिक उपलब्धता होत नसल्यामुळे अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य करू शकत नाहीत.

**कमकुवत घटक :**

मुलींचा अंतर्भाव कमकुवत घटकात केला जातो आणि कमकुवत घटकांकरिता देण्यात येणाऱ्या सवलतींचे फायदे काही प्रमाणात या घटकातील मुलींना मिळू शकतात. कमकुवत घटकांमध्ये मागासवर्गीय, आदिवासी, अपंग, अल्पसंख्याक इ. चा समावेश होतो. या घटकांसंबंधी योजना बनविताना त्या त्यांना शिक्षणाची समान संधी मिळवून देण्यासाठी प्रामुख्याने तयार केल्या जातात. त्या प्रत्येक घटकामध्ये ५०% मुली आहेत. आणि त्यांचे प्रश्न या घटकातील मुलींच्या प्रश्नासोबत आणि बरोबर विचार करून योजना आखणे योग्य ठरते. त्या प्रत्येक घटकात मुलींचे प्रश्न अत्यंत भिन्न असून त्या प्रश्नांची उकल करून कारणम्मिांसा शोधणे आणि नंतर उपाययोजना करणे योग्य ठरेल. अशाप्रकारची उपाययोजना केली तरच खऱ्या अर्थाने मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविला जाईल आणि त्यांच्या भावी यशस्वी जीवनाचा मार्ग मोकळा होईल.

**असमतोल :**

महाराष्ट्र राज्यात शिक्षणाची प्रगती स्वातंत्र्योत्तर काळामध्ये झपाट्याने झालेली दिसून येते. तरीही अजून महाराष्ट्रातील काही भाग विशेषत: मराठवाडा हा स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत मागासलेला दिसून येतो. अनुसूचित जाती जमाती यांच्या मधील शिक्षणाचे प्रमाण जरी वाढले असले तरी मराठवाड्यातील जिल्ह्यात इतर समाजाबरोबरच अनुसूचित जाती जमातीतील स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण देशातील शैक्षणिक दृष्ट्या मागास राज्यांच्या इतकेच आहे.

**एकात्म कार्यक्रम :**

मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत पुढील काळात अधिक ठोस आणि प्रभावी पावले उचलली नाहीतर समाज खऱ्या अर्थाने समर्थ होणार नाही. मुलींच्या शिक्षणासंबंधी संशोधन करून योजना आणि प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. ८ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ज्या तालुक्यात आणि जिल्ह्यात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण १० टक्केपेक्षा कमी आहे अशा तालुक्यात आणि जिल्ह्यात एकात्म मुलींच्या शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणणे योग्य ठरेल. अशा विभागात जिल्हा आणि तालुका प्रकल्प तयार करून मुलींच्या शिक्षणाच्या वेगवेगळ्या योजना एकात्म पद्धतीने अमलात आणल्या जाव्यात व त्यासाठी पूर्णवेळ, अर्धवेळ समाज कार्यकर्ते (प्रामुख्याने स्त्रिया) यांची नियुक्ती करावी, पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहनात्मक भत्ता द्यावा, मुलींच्या कपड्यांची, पुस्तकांची व दुपारच्या जेवणाची सुविधा उपलब्ध व्हावी, त्या विभागातील निरक्षर प्रौढ स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षणाचे वर्ग घेण्यात यावेत, प्रौढ स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षणाचे वर्ग घेण्यात यावेत, प्रौढ शिक्षण वर्गात आणि अनौपचारिक शिक्षण वर्गात अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी आणि जीवनाला सुसंगत अर्थाजन करू शकेल अशाप्रकारचा व्यवसाय शिकविण्यात यावा आणि त्याप्रीत्यर्थ कौशल्य, साहित्याचा पुरवठा सातत्याने करण्यात यावा. स्थानिक स्वराज्य संस्था, सेवाभावी संस्था, युवक मंडळे, महिला मंडळे आणि शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माता - भगिनी यांना वेगवेगळ्या स्तरांवर एकत्र आणून स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यात यावा. प्रसिद्धी माध्यम आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रामुख्याने प्रौढ शिक्षण वर्गात आणि अनौपचारिक शिक्षण वर्गामध्ये उपयोग केला तर शिक्षणाची परिणामकारकता अधिक वाढेल. मुलींच्या शिक्षणासंबंधी अधिक प्रयोग करून त्यावरील निष्कर्ष आणि उपक्रम, आणि कार्यक्रम मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्यास समाज कार्यकर्त्यांना त्याचप्रमाणे शिक्षकांना निश्चित दिशा आणि दृष्टी मिळू शकेल. हे सर्व करण्यासाठी ८ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये भरीव कार्यक्रम आणि आर्थिक तरतूद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

# ‘समानतेसाठी शिक्षण – मुलींचे शिक्षण’

**विद्या बाळ**

**मुलामुलींचे समान संस्कार, वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण :–**

१८४८ साली पुण्यामध्ये म. जोतिबा फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. स्त्रियाही माणूसच आहेत. माणसासारखं जगण्याची संधी त्यांना मिळायला हवी असेल तर त्यांना शिक्षणाची वाट खुली केली पाहिजे, असा विचार करून त्यानुसार कृती करणारे म. फुले पहिलेच विचारवंत असावेत. या घटनेला आज १४० वर्षे होऊन गेली आहेत. अजूनही स्त्रीशिक्षणाचा व्हावा तेवढा प्रसार तर झालेला नाहीच आणि आहे त्या रुढ शिक्षण व्यवस्थेतून व्यापक विषमता आणि विशेषत: स्त्री पुरुषांतील विषमतेबाबतही पुरेशी जाणीव निर्माण झालेली नाही.

स्त्रिया शिक्षणापासून पूर्णपणे वंचित होत्या त्या काळात स्त्री-शिक्षणाची सुरुवात करतानाचा शिक्षणविषयक विचार, आजच्यापेक्षा वेगळा असणे स्वाभाविकच होते. स्त्रीशिक्षणाची सुरुवात म. फुल्यांनी केली आणि तिचा विस्तार, त्यानंतर मुख्यत: महर्षि कर्व्यांनी केला. चालू शतकाच्या सुरुवातीला अनाथ बालिकाश्रम, मुलींसाठी कन्याशाळा, त्यानंतर महिला महाविद्यालय या साऱ्या शैक्षणिक संस्थांची पुण्यामधली सुरुवात आण्णासाहेब कर्व्यांनी केली. त्यापाठोपाठ महाराष्ट्रात ठिकठिकाणी कन्याशाळेचा प्रसार झाला. मुलींसाठी स्त्रीच्या पारंपारिक प्रतिमेला अनुसरून असं सोपं शिक्षण अशी या शिक्षणामागची कल्पना होती. मुलींसाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची वैशिष्ट्यपूर्ण कल्पना कर्व्यांच्या विद्यापीठामार्फतच सर्वांच्या नजरेसमोर आली. याखेरीज मातृभाषेचा अभ्यास आवश्यक करणं, सक्तीचे विषय कमी करून ऐच्छिक विषय वाढवणं आणि त्यातून विद्यार्थिनींना अधिक निवडीची संधी देणं, शिवाय एखाद्या विषयाची नावड असेल तर त्यापायी शिक्षणक्रमालाच मुकण्याऐवजी पर्याय ठेवणं असा आण्णासाहेब कर्व्यांचा दृष्टिकोन होता. १९१७ साली सुरू झालेल्या महिला महाविद्यालयाचा अभ्यासक्रम बघितला तर कुटुंबात आणि समाजात स्त्रीकडून अपेक्षित असलेल्या भूमिकेनुसार, स्त्रीची पारंपारिक प्रतिमा जपणारा असाच हा अभ्यासक्रम होता असं म्हणावं लागेल. त्या काळाचा विचार करता, यात टीका करण्याजोगं काही नाही. पण आज ७० वर्षांनंतरही शिक्षणाचा प्रसार किंवा स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टिकोनातील सखोलता यात फारसा फरक पडलेला दिसत नाही. म्हणूनच शिक्षणविषयक धोरण, उद्दिष्ट, कार्यपद्धती याचाच मुळातून विचार करण्याची गरज वाटते.

औद्योगिक क्रांतीनंतरच्या औद्योगिकरणाच्या रेट्यातून जगभरात सगळीकडेच शेतीप्रधान व्यवस्थेतील कुटुंबाचं स्वरूप हळूहळू बदलू लागलं. एकत्र कुटुंब पद्धती आणि

शेती यांच्यातला संबंध काहीसा पातळ होऊ लागला. उद्योगापाठीमागे कुटुंबातले पुरूष बाहेर पडले आणि त्यांच्याभोवती नवं कुटुंब किंवा त्यांच्यापुरतं कुटुंब जमा झालं. विज्ञानाची प्रगती होऊ लागली तसतशी नवनवीन उपचार पद्धतींच्या मदतीने माणसांची आयुर्मर्यादा वाढली. संतती नियमनाची साधनं आली आणि सार्वत्रिकपणे नाही तरी शिकलेल्या कुटुंबाचा आकार छोटा झाला. याच विज्ञानाच्या मदतीनं घरात आलेल्या तांत्रिकतेमुळे स्त्रीचे शारीरिक, किचकट, वेळखाऊ कष्ट काहीसे कमी झाले. (उदा. नदीविहिरीवरून पाणी आणणे, रॉकेलचे दिवे, लाकडावर पेटणाऱ्या चुली, दळण कांडण) आजवर मुलांना जन्म देता येण्याची शारीरिक शक्यता असेतोपर्यंतच्या काळात मुलांना जन्माला घालणं आणि नंतर जन्माला घातलेल्या मुलांना मोठं करणं यातच जाणारा स्त्रीचा वेळ; कमी मुलं आणि कष्ट वाचवणारी सुविधा यामुळे वाचू लागला. शिवाय शेतीपासून दूर आल्यामुळे शेतीकाम कमी झालं.हे मुख्यत: ज्या कुटुंबात घडू लागलं, त्यात नगण्य प्रमाणात का होईना स्त्रिया शिकू लागल्या. व्हायोला कोन आणि अल्वा मिर्दाळ या समाजशास्त्रज्ञांनी युरोपातील अशा कुटुंबांच्या संदर्भात एक महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं. अशा प्रकारच्या कुटुंबातील स्त्री ही 'राष्ट्रीय संपत्ती' आहे; तिचा उत्पादक उपयोग केला नाही तर ती राष्ट्रीय वित्तहानी ठरेल. कुटुंब ही एक प्रवाही सामाजिक संस्था आहे. त्यामुळे व्यक्तींना आवडो किंवा नावडो, सामाजिक बदलांबरोबर तिचं स्वरूप बदलत आलं आहे, यापुढेही बदलणार आहे.

ही पार्श्वभूमी अशासाठी स्पष्ट केली की कुटुंबातील स्त्रीपुरुषांच्या प्रतिमाही या कुटुंबातील बदलाबरोबर बदलतात याची जाणीव ठेवायला हवी. कष्टकरी कुटुंबात स्त्री/पुरुष दोघं कमावतात पण बाई एकटी घरकाम करते. मध्यमवर्गीय कुटुंबात पुरुष एकटा कमावतो आणि बाई त्या कमाईत घर सांभाळते. पुरुषावर घराबाहेरच्या जगातली जबाबदारी तर स्त्रीवर घरकामाची जबाबदारी म्हणजेच व्यापक औपचारिक आर्थिक जगात पुरुष महत्त्वाचा तर कौटुंबिक कामासाठी स्त्री कामाची (महत्त्वाची नव्हेच!) अशी स्त्रीपुरुष भूमिकात कामाची विभागणी झाली. आजकाल याच्यात समता आहे असं समर्थन करणारे काहीजण यालाच 'भागिदारी पद्धती' म्हणतात. धंद्यातल्या भागिदारीत भागिदारांचा मान, अधिकार समान मानला जातो. ही समता स्त्रीपुरुषांच्या पारंपारिक प्रतिमेत अपेक्षितच नाही. पुरुष श्रेष्ठ, मोठा, महत्त्वाचा; तर बाई कनिष्ठ, छोटी आणि दुय्यम. हीच प्रतिमा जीवशास्त्रीय म्हणून 'नैसर्गिक' मानली गेली. स्त्रीपुरुषांमध्ये जे स्थान स्त्रीचं तेच प्रस्थापितांच्या समाजव्यवस्थेत दलित, आदिवासी, भटक्याविमुक्त आणि गरीबगुरिबांचे स्थान आहे. आणि म्हणूनच व्यापक सामाजिक संदर्भात आणि स्त्री-पुरुष संदर्भात समानतेसाठी शिक्षण : मुलींचं शिक्षण – हे धोरण आवश्यक ठरते.

पटेल बिलामधून पुढे आलेला एक विचार पुणे म्युनिसिपालिटीनेही उचलून धरला म्हणूनच १९१८/१९ साली पुणे म्युनिसिपालिटीने मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा ठराव आणला. आर्थिक अडचण होती म्हणून या ठरावाला तोडगा काढून आधी मुलांचं शिक्षण सक्तीचं आणि नंतर मुलींचं शिक्षण सक्तीचं करण्याचं ठरलं. यावेळी झालेल्या जाहीर

सभेत, डॉ. कमलाबाई देशपांडे, त्यावेळी त्या कर्व्यांच्या महिला महाविद्यालयात शिकत होत्या – त्यांनी या धोरणाचा निषेध केला. त्या म्हणाल्या – "स्त्रिया आजवर पुरुषांच्या मागोमाग, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालत आल्या. आता त्या पुरुषांच्या बरोबरीनं वाट चालतील". आजही मुलामुलींच्या शिक्षणाचा विचार करताना फार मोठा बदल झालेला नाहीच. पण स्त्री ही पुरुषाच्या एवढीच महत्त्वाची आहे हा विचार मांडणारी स्त्री स्वातंत्र्याची चळवळ आता रुजू लागली आहे. स्त्री आणि पुरुष हा लिंगभेद जन्मजात असला तरी लिंगावर आधारीत भेदाभेद जन्मजात नाही तर तो संस्कारसिद्ध आहे हे आता सर्वमान्य झालेलं नसलं तरी शास्त्रानं मान्य केले आहे. म्हणूनंच या संदर्भात बायांना बायकी आणि पुरुषांना पुरुषी घडवण्याचा ठेका घेणार आजचं शिक्षण मुळातूनच बदलण्याची गरज आहे.

या नव्या शिक्षणाचं उद्दिष्ट निश्चित झाल्यावर, त्याच्याशी इमान राखणारं शिक्षण कोणत्या पद्धतीनं देता येईल याचा विचार करता येईल. जातीपाती, धर्म, पैसा, शिक्षण इ. तून फैलावलेल्या भेदांपलिकडची समता हे शिक्षणाचं उद्दिष्ट असायला हवं. तसंच स्त्रिया कुटुंबाचा, समाजाचा महत्त्वाचा घटक म्हणून, त्यांचं जीवन माणूस म्हणून अर्थपूर्ण आणि समृद्ध करणं हेही शिक्षणाचं उद्दिष्ट हवं. या शिक्षणात एकप्रकारची स्वयंपूर्णता देणारं पैसा मिळवण्याचं बळ द्यायला हवंच पण त्याचवेळी पैसा मिळवणं हे जीवनाचं एकमेव उद्दिष्ट नाही हेही शिकवायला हवं. शिक्षणानं केवळ माहिती देणं पुरेसं नाही. त्यानं मूल्यविचार द्यायला हवा. शिक्षण विविध प्रकारची माहिती देतंच पण या माहितीच्या आधारानं माहीत नसलेल्यापर्यंत पोचण्याची एक बौद्धिक ताकदही शिक्षणानं द्यायला हवी. यातलं काहीच न देणारं शिक्षण स्त्रियांना दिलं तर त्यामुळे स्त्रीची पारंपारिक प्रतिमा जगणाऱ्या स्त्रियाच तयार होतील. आजवर काहीसं हेच झालं आणि म्हणून स्त्रीशिक्षणाच्या फेरविचाराची गरज विचारात घ्यायची वेळ आली.

स्त्रिया आणि पुरुष शरीररचनेनं वेगळे असले तरी समान आहेत. कारण मुळात स्त्रियाही आणि पुरुषही माणसं आहेत. पुरुषांमध्ये काही पुरुष इतर काही पुरुषांपेक्षा अधिक हुषार किंवा मूर्ख, शूर किंवा भित्रे असू शकतात. तशाच स्त्रियाही इतर काही स्त्रियांपेक्षा हुषार, धीट, मूर्ख, भित्र्या असतात. पण म्हणून सर्व पुरुष जमात सर्व स्त्री जमातीपेक्षा हुषार, मूर्ख, धीट वा भित्री असू शकत नाही. तसंच स्त्रीपुरुषांसाठी दुटप्पी मूल्यव्यवस्थेची गरज तर नाहीच उलट ती विषमता पोषक ठरते – हा सारा विचार नव्या शिक्षणातून व्यवस्थितपणे मुलींमध्ये रुजवायला हवा. पण सुरुवात मुलींपासून झाली तर त्याचवेळी हाच विचार मुलांनाही समजायला, पटवायला हवा. नाहीतर नव्या पिढीत पुरोगामी विचाराच्या स्त्रिया आणि जुन्या विचाराचे पुरुष एकत्र येतील आणि त्यांचं उभं आयुष्यच अर्थहीन आणि विसंवादी बनेल.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार बदलणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या भूमिका, त्यांच्या प्रतिमांनाही बदलत आहेत. अशावेळी एकाधिकारी कुटुंब लोकशाही समाजरचनेत पायात

कीड पोखरू ठेवील. कुटुंबांचंही लोकशाहीकरण करण्याची प्रक्रिया शिक्षणाच्या मदतीनं व्हायला हवी. यासाठी कुटुंबाची जाणीवपूर्वक, विचारपूर्वक फेररचना करायला हवी. घराचं दार अशासाठी उघडायला हवं की घरात फार गुंतलेली, अडकलेली स्त्री थोडी घराबाहेर पडेल आणि घराबाहेर बुडून गेलेला पुरुष थोडा घरात येईल. यातून दोघांच्या अंगभूत सामर्थ्याचा समाजाला उपयोग होईल. शिक्षणातून हा विचार घेत वाढलेली मुलं, जबाबदार स्त्रीपुरुषांच्या भूमिका न्यायाचं आणि समतेचं अधिक भान ठेवून जगतील.

शिक्षणाचं उद्दिष्ट पक्कं झालं की त्यानुसार त्याच्या अंमलबजावणीसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीही ठरवाव्या लागतील. मी शिक्षणतज्ञ नाही. मी एक सामाजिक कार्यकर्ती आहे. म्हणून काय हवं हे मी काही प्रमाणात सांगू शकेन,पण ते कसं करता येईल याचा विचार मुख्यत: तज्ञांनी करायला हवा. माझा सामाजिक कामाचा अनुभव असं सांगतो की शिक्षण पद्धतीतही बिनउतरंडीचा आणि लोकशाही पद्धतीचा अवलंब व्हायला हवा. शिक्षणातील शिक्षकांची मक्तेदारी कमी करायला हवी. टेबलाच्या अलिकडे आणि पलिकडे अशी सीमारेषा ठरवून शिक्षण एकतर्फी प्रवाह पद्धतीनं देता कामा नये. त्यापेक्षा सहभागी पद्धतीचा अवलंब करावा. हे करणं सोपं नाही पण अशक्यही नाही. सहभागी पद्धतीमध्ये प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वातील सुप्त सामर्थ्याला आवाहन आहे. एकच एक ठरीव चाकोरी नसल्यामुळे नाविन्य आणि पुढाकाराला वाव आहे. यातूनच तर्कसंगती आणि बुद्धिवादाची घडण व्हायला मदत होईल; तसेच प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका याच केवळ दोन साधनांच्या मदतीवर अवलंबून राहण्याच्या मर्यादा ओळखायला हव्या. अप्रत्यक्ष परीक्षा आणि निरीक्षण यावर भर दिला तर विद्यार्थ्यांवरचा ताण कमी होईल. ही पद्धती परीक्षेनंतरच्या खऱ्या जीवनातले प्रश्न सोडवताना उपयोगी पडेल. उत्तरं स्वत: शोधण्यासाठीचा पुढाकार, धडपड, आनंद यादृष्टीनं विकास होईल.

मुलींच्या शिक्षणाची उद्दिष्टं, त्यानुसार पद्धती आणि त्यानुसार तपशीलही बदलायला हवा. उदाहरणार्थ स्वयंपाक, शिक्षण, बालसंगोपन हे विषय मुलींच्या अभ्यासात असावेत पण ते मुलांच्याही अभ्यासाचा आवश्यक भाग असावेत. राष्ट्रभाषा जशी किमान पातळीपर्यंत सक्तीची तसंच हे जगण्यासाठीचं मूलभूत शिक्षण त्या त्या व्यक्तीला स्वयंपूर्ण बनवील. स्त्रीपुरुषांच्या प्रतिमांशी निगडित अशी भूमिकांची, कामांची श्रेष्ठ-कनिष्ठता या कल्पना बदलायला याची मदत होईल. लग्न मुलगा - मुलगी यांचं मिळूनच होतं. असं असूनही हुंडा मुलीकडूनच घेणारी प्रथा मुलीचं स्थान मुलाच्या बरोबरीचं नाही हेच सांगते. तसंच लग्न दोघांचं, संसार दोघांचा तर घराची मालकी आणि जबाबदारी दोघांची का नाही? मुलं दोघांची तर त्यांच्या संगोपनात दोघांचा हातभार का नको? हे प्रश्न कुटुंब संस्थेतील स्त्री-पुरुष स्थानाचा आणि म्हणून श्रमविभागणीचा फेरविचार करायला लावणारे आहेत. आज मध्यमवर्गीय कुटुंबात (आणि कष्टकरी कुटुंबात तर पूर्वीपासूनच) स्त्रिया, पुरुषांच्या तथाकथित (घराबाहेरच्या) जबाबदाऱ्या अंगावर घेताहेत तर पुरुषांनी स्त्रियांच्या पारंपारिक जबाबदाऱ्यात वाटा का उचलू नये? हे घडायचं असेल तर लहानपणापासूनच

खेळ, कामं, अभ्यासविषय या संदर्भात मुलांमुलींच्यातला भेदाभेद टाळायला हवा. बायकी कामं, पुरुषी कामं, अनुषंगानं पैसा देणारी कामं आणि बिनपैशाची कामं आणि परिणामत: महत्त्वाची कामं आणि बिनमहत्त्वाची कामं याबाबत स्त्रीपुरुषांसाठीचा वेगवेगळा आणि विषमता जोपासणारा दृष्टिकोन तयार होतो. हे प्रयत्नपूर्वक निपटून काढण्यासाठी शालेय शिक्षणातून सुरुवात आणि प्रसार माध्यमांचा यानुसार पाठपुरावा अशी जोड हवी.

समानतेसाठी शिक्षण आणि मुलींचं शिक्षण हा विचार करताना मुलींच्या शिक्षणाच्या संस्था, जागा वेगळ्या असायला हरकत नाही. स्थानिक परिस्थितीनुसार शहरापासून दूरवर जावं तिथे याची गरजही असेल. पण संस्था आणि जागा वेगळी असली तरी अभ्यासक्रमात जीवनावश्यक शिक्षणाचा भाग असलेले विषय मुलामुलींसाठी सारखेच असावे आणि त्यानंतरच्या निवडीसाठी दोघांना खुली संधी असावी.

एका गोष्टीची मात्र मनात जाणीव हवी की संधी खुली करणं म्हणजे काय? बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण हे पाऊल मुलींच्या शिक्षणासाठी नक्कीच पुढचं पाऊल आहे. पण ते पुरेसं नाही. दिलेली संधी घेता आणि उपभोगता येण्यासारखी इतर सुविधा द्यायला हवी. म्हणजे फी माफ केली तरी पुस्तक वह्यांचा खर्च, गणवेश, शाळेत ये-जा यासाठीचा खर्चही त्या पातळीवरच्या कुटुंबात जड असतो. शिवाय पाळणाघरांची सोय नसली की कामावर जाणाऱ्या आईचे मूल सांभाळण्यासाठी मोठ्या, जाणत्या मुलींची शाळा बंद केली जाते. म्हणूनच नोकरी, मजुरी करणाऱ्या किंवा न करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघराची सोय ही सुद्धा मुलींच्या शिक्षणाशी संबंधित गोष्ट आहे. गरिबांना मुलं जास्ती होतात ते त्यांना बाळंतपण आणि बाळसंगोपनाचा त्रास वाटत नाही म्हणून नव्हे, तर जन्माला घातलेली सर्व मुलं जगतील याचा भरंवसा त्यांना नसतो. म्हणजे योग्य आरोग्यसेवेच्या आणि पोषणाच्या अभावी येणारी असुरक्षिततेची भावना हीही पुन्हा मुलींच्या शिक्षणाशी येऊन ठेपते. प्राथमिक वास्तवाचं भान मुलींच्या शिक्षणाचा विचार करताना ठेवायला हवं. पुरुषाचं पुनर्शिक्षण केल्यानं स्त्रीच्या विकासाला मदत होते याचीही जाणीव हवी.

मुलींना डोकंच कमी, मुली भित्र्याच असतात, त्यांना स्वयंपाकघरात कोंडून घ्यायलाच आवडतं याच चालीवर त्यांना शिक्षणाची गोडीच नसते म्हणून त्यांच्या गळतीची आकडेवारी जास्त हे म्हणण्याचं धाडस न करणं शहाणपणाचं ठरणार आहे. परीक्षांचे नुसते निकाल आणि पहिले क्रमांक बघितले तरी यावर प्रकाश पडेल. आपणच डोळे उघडून बघायला आणि कान देऊन ऐकायला शिकू या.

• • •

# प्राथमिक शिक्षणातून स्त्री-पुरुष समानता कशी रुजवता येईल?

आशा मुंडले

## असमानतेची यंत्रणा

शिक्षणामुळे सामाजिक समता प्रस्थापित होण्यात मदत होईल असा सिद्धांत आहे. सामाजिक समतेतील महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्रीपुरुष समानता. तेव्हा जातीजमातींमधील विषमता आणि स्त्रीपुरुष विषमता ही जी दोन आपल्या समाजातील ठळक वैगुण्ये आहेत त्यांचा प्रतिकार शिक्षणप्रक्रियेतून व्हायला हवा. हे काम सहज होणारे नाही. कारण विषमता तशीच चालू रहावी यासाठी त्याला बळकटी आणणाऱ्या अनेक यंत्रणा समाजात सतत कार्यरत आहेत. शिक्षण याचा येथील अर्थ शालेय औपचारिक शिक्षण असा आहे. हे शिक्षण आजतरी शंभर टक्के मुलांपर्यंत पोचतच नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही साक्षरता जेमतेम ५०% माणसांपर्यंत पोचली आहे. आणि तीसुद्धा साक्षरतेची व्याख्या लवचिक आणि पातळ करूनच. उलट विषमता कायम ठेवण्याची यंत्रणा शंभर टक्क्यांपर्यंत आयुष्यभर पोचते कारण तिचे मूळ आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेत आहे. हे सहज शिक्षण जन्मापासून मरणापर्यंत घरीदारी आणि सामाजिक व्यवहारातून माणसांना मिळते. इतकेच नव्हे तर शालेय शिक्षण जे ६ ते १४ वयापर्यंत सक्तीचे आहे ते देणारी, त्याची आखणी करणारी मंडळीही या विषमतेच्या प्रभावातून मुक्त नाहीत. तेव्हा शिक्षणामुळे सामाजिक समता येईल असे समजणे हा आशावाद आहे. परंतु त्याची उभारणी मजबूत पायावर करायची झाली तर शिक्षण देताना सध्यापेक्षा कितीतरी डोळस आखणी आणि अंमलबजावणी हवी हे उघड आहे.

## शिक्षण कुणाला मिळतं?

सुरुवात हवी शिक्षण कुणाला मिळतं इथपासून. प्रत्येक मूल शाळेत जातं का? का जात नाही? शाळांचा विस्तार आता सर्वदूर आहे. पण शाळेत यायची मोकळीक सर्व मुलांना नाही. कितीतरी मुलं आर्थिक कारणांसाठी शाळेत पोचत नाहीत. पोचली तरी १-२ वर्षात शाळा सोडून देतात व नंतर पुन्हा निरक्षरच राहतात. यामध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त आहे. मुलींना आईबाप रोजगारावर गेल्यावर घरकाम व लहान भावंडे सांभाळणे यासाठी घरी ठेवले जाते. प्रत्यक्ष पाहणीत असे आढळले की ५-६-७ वर्षांच्या मुलींवर सुद्धा कामाची जबाबदारी टाकली जाते व काम नीट झाले नाही तर त्याना मारहाण होते. एका दृष्टीने ही स्थिती बालकामगारांपेक्षा भयावह आहे. कारण कामगार घराबाहेर काम करत असल्याने त्यांना थोडी तरी रोख मजुरी मिळते. मुलींना या कामाचा मोबदला

नाही, मान्यता नाही व जवळजवळ रोजच मारहाण होते.कारण वयाच्या मानाने काम जास्त व जबाबदारीचे असते. ते नीट होणे अशक्यच. स्वत:ची खेळण्याची ऊर्मी दाबून टाकावी लागते, त्यामुळे आत्मविश्वास खच्ची होतो. सुरुवातीपासूनच मुलीचा जन्म काबाडकष्टाचा व कमी महत्त्वाचा हे भोवतालच्या माणसांच्या वागणुकीतून व बोलण्यातून ठसवले जाते. यालाच मी विषमतेच्या दृढमूलनाचे सहज शिक्षण म्हणते.

### परिसरातच शाळा हवी

या प्रवाहाविरुद्ध जाऊन मुलींना शिक्षण प्रवाहात ओढायचे तर दोन अत्यावश्यक अटी आहेत. एक म्हणजे शाळा परिसरातच हवी आणि शाळेला जोडून मु‍ सांभाळण्याची व्यवस्था हवी. कोसबाडला असा यशस्वी प्रयोग ताराबाई मोडक व अनुता‍ वाघ यांनी केला. परंतु आज अशा प्रयोगांची शहरातूनसुद्धा अतिशय गरज आहे. काम‍ जाताना घरातली सर्व मुले शाळेच्या आवारात सोपवून जाता आलं तरच शिक्षण‍ संधी सर्व मुलींना मिळेल. अर्थात अशा शाळांना जोडून आरोग्य केंद्रही हवेच. कारण ल‍ मुलांचे आरोग्य उत्तम नसले तर ती शिकण्याचा उत्साह कुठून दाखवणार? कित्ये‍ मूल मतिमंद नसले तरी अपुऱ्या आहारामुळे व सततच्या आजारामुळे मागासलेलेच राहते. याच आरोग्यकेंद्रातून कुटुंब नियोजनाचेही शिक्षण पालकांना देता येईल. थोडक्यात म्हणजे प्रत्येक वस्तीत शाळा हे महत्त्वाचे, नवीन जीवन पद्धतीचे केंद्र ठरले पाहिले. आज तशी परिस्थिती नाही. शाळा वस्तीमध्ये हवी व आजूबाजूच्या सर्वांनी तिथेच शिकायला हवे. कारण लहानपणीच जर आज उच्च नीच समजली जाणारी मुले एकत्र मिसळली, खेळली, त्यांची मैत्री झाली तरच त्यांच्या मनात समतेचे बी रुजेल. आपल्याकडे शाळा या विषमता जोपासण्यात अग्रभागी आहेत. कारण शाळेपासूनच श्रीमंत व गरीब यांच्यात दरी रुंदावते व ती पुढे वाढतच जाते. परिसर शाळा व लहान मुले सांभाळणे ही पहिली गरज. दुसरी महत्त्वाची गरज म्हणजे आहाराची सोय. पालक या मुलांना 'डबा' देऊ शकणार नाहीत. तेव्हा शाळातून जेवणाची सोय हवी.

### स्त्री-शिक्षिका अत्यावश्यक

मुलींना शिक्षण द्यायचे तर या दोन प्रमुख गरजा आहेत. त्याखेरीज आणखी गरज म्हणजे शाळेत एक तरी स्त्री-शिक्षिका हवीच. कारण मुलींना आपल्या घरगुती अडचणी बोलून दाखवता आल्या पाहिजेत. टोलेजंग माध्यमिक शाळांवर खर्च करण्यापेक्षा वर दिलेल्या किमान सोयी असलेली एक प्राथमिक शाळा दर हजार मुलांमागे उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे आहे. किंबहुना ज्या नावाजलेल्या खाजगी शाळा आज आहेत त्यांनी अशा तऱ्हेचे परिसर शिक्षण देणारी प्राथमिक विद्यालये सुरू करावी यासाठी त्यांना अनुदान देण्यास हरकत नाही. ज्या संस्था फक्त उच्चवर्गीय श्रीमंतांनाच सांभाळतात त्या बंद झाल्या तरी चालेल अशा मताची मी तरी आहे. कारण अशा शाळांतली मुले पुढे विषमतेचे दुष्टचक्र

.ू ठेवायला स्वत:च्या अधिकारस्थानांचा मोठे झाल्यावर वापर करीत राहतात. त्यांचा दृष्टिकोनच विषमतावर्धक असतो.

**निवासी शाळा**

परिसर शाळा हा एक मार्ग. दुसरा मार्ग म्हणजे संपूर्ण वसतिगृह शाळा अथवा निवासी शाळा. या निवासी शाळांपैकी काही शाळांतून मूलभूत गुणवत्तेवर प्रवेश द्यायला हरकत नाही. पण ५-६ वर्षाच्या मुलाची गुणवत्ता कशी पहायची याची जाणीव हवी. त्याला आधीच किती लिहितावाचता येते हे पहाणे हा निकष पूर्णपणे चुकीचा आहे. किंबहुना ५-६ वर्षापर्यंत मुलांनी 'अभ्यास' करू नये, खेळावे; कारण तोपर्यंत त्यांच्या मेंदूची वाढ होत असते. त्यांच्या निरोगी आणि जिज्ञासू व्यक्तिमत्त्वाचा पाया ३ ते ६ वयात घातला जातो. अक्षर आणि आकडे यांच्या कसरती लवकर लादल्यामुळे मुलाला अभ्यासाचा तिटकारा आणि भीती वाटण्याचा संभव असतो. कितीतरी मध्यमवर्गीय मुले आज ८वी ते ९वीत अभ्यासाला अत्यंत विटलेली दिसतात, बेशिस्त होतात. त्याचे मूळ त्यांना २।। वयापासून अभ्यासाला लावण्यात आहे. निवासी शाळांमध्ये मुलांच्या गुणवत्तेनुसार प्रतवारी राहिली तर व्यवस्थापन सोपे होईल. माध्यमासंबंधी प्रयोगही करता येतील. पण परिसर शाळा मात्र मातृभाषाप्रधान असाव्यात.

ज्यांचे पालक फिरतीच्या नोकऱ्या करतात, किंवा कामानिमित्त सीझनप्रमाणे स्थलांतर करतात किंवा परदेशात, परप्रांतात कामे करतात अशांना निवासी शाळा हव्यात. किंवा ज्या मुलांना कौटुंबिक कलहामुळे किंवा मृत्यूमुळे दोन्ही पालक नाहीत त्यांना निवासी शाळा हव्यात. केवळ घरी मुलांची कटकट नको या कारणाने वसतिगृहात प्रवेश देऊ नये. कारण परिसर शाळा ही मुलाचा घराशी संबंध कायम ठेवून त्याला नवे शिक्षण देते. निवासी शाळेत त्याचा घराशी संबंध सुट्टीपुरता राहतो. तेव्हा शैक्षणिकदृष्ट्या निवासी शाळा ही काही म्हटले तरी दुय्यम किंवा पर्यायी व्यवस्था आहे. परिसर शाळा ज्यांना अपरिहार्य कारणामुळे शक्य नाही त्यांनाच निवासी शाळेत जाऊ द्यावे.

**अभ्यासक्रमातून समानता**

शाळांमध्ये समानता रुजवण्याचे काही प्राथमिक पथ्य वर दिले आहे. आता शाळेच्या अंतर्गत शिक्षणक्रमातून स्त्रीपुरुष विषमता कशी कमी होईल याचा विचार करूया. परंपरा अशी आहे की समाजात श्रमविभागणी पुरुष-स्त्री याप्रमाणे केलेली आहे. भांडी कुणी घासायची, झाडायचं कुणी, स्वयंपाक कुणी करायचा, शिवण कुणी करायचं — प्रत्येक कामाबद्दल पूर्वग्रह आहेत. म्हणून प्राथमिक शाळेपासूनच शिक्षणक्रमात गृहशास्त्र (डोमेस्टिक सायन्स) हा विषय असावा आणि तो मुले आणि मुली यांना सक्तीचा असावा. म्हणजे निदान नवी पिढी तरी घरकाम, अपत्यसंगोपन याबाबत निरोगी दृष्टिकोनाची होईल. कोल्हापूरला

प्रा. लीला पाटील यांनी सृजन आनंद विद्यालयाचा जो प्रयोग सुरु केला आहे तो समानतेच्या पुरस्कर्त्यांनी विशेष अभ्यासण्यासारखा आहे.

### गृहशास्त्राचा समावेश

गृहशास्त्राचा अभ्यासक्रमात प्राथमिक पातळीवर सक्तीने समावेश ही गोष्ट वरवर साधी दिसते पण त्यातून दृष्टिकोन बदलण्याची प्रेरणा सर्वच थरातून मिळेल. मुलगे व मुली हे दोनही गट आज पालकांच्या प्रभावामुळे मुलींचे दुय्यम स्थान मान्य करतात. तेव्हा प्रशिक्षणाची गरज दोन्ही गटांना आहे. मुलींचा आत्मविश्वास वाढला पाहिजे आणि मुलांचा कर्तृत्वरहित अहंगंड कमी झाला पाहिजे. गृहशास्त्राच्या द्वारा हे घडवता येईल. तसेच श्रीमंत आणि गरीब यातील दरी यामुळे निदान शाळेत तरी कमी होईल. श्रीमंतांकडे घरकाम स्त्रिया व नोकर करतात. परंतु शाळेमध्ये सर्वांना काम करावे लागल्याने श्रमप्रतिष्ठा आणि घरकामाच्या गुंतागुंतीची जाणीव होईल. शिवाय प्राथमिक आरोग्याच्या सवयी– उदाहरणार्थ मलमूत्र विसर्जनाची योग्य रीत, केस, नखे यांची स्वच्छता याच्या सवयी लावता येतील.

### भावंड योजना

दिल्लीतील एका शाळेत भावंड योजना सुरु आहे. म्हणजे मोठ्या वर्गातील १ मुलगा धाकट्या वर्गातील १ मुलाच्या सवयीकडे लक्ष ठेवतो. त्याची रोज विचारपूस करतो. हा प्रयोगही प्राथमिक शाळांत करण्यासारखा आहे. ४ थीतील मूल २ री च्या मुलांना व ३ री तील मूल १लीच्या मुलांना 'भावंड' म्हणून काम करू शकेल.

एकमेकांविषयी सामूहिक जबाबदारीची जाणीव रुजवायला या योजनेचा चांगला उपयोग होईल. आज गरीब मुलांवर नकळत्या वयात श्रमांचे ओझे असते तर श्रीमंत मुले फार मोठेपणीही ऐतोबा व परावलंबी राहतात. शाळांमधून या दोन्हीना आळा बसेल. आपल्या जातीधर्माच्या बाहेरील मूल भावंड समजता येणे यामुळेही समता रुजेल.

आतापर्यंत मी जे विवेचन केले त्यात परिसर शाळा, निवासी शाळा, गृहशास्त्र व भावंड योजना या चार गोष्टी आल्या. त्यात मुले व मुली यामध्ये भेद न करता समानता रुजवता येईल असे सांगितले . परंतु ह्या गोष्टी एकप्रकारे 'भेद न करणे' यातच मोडतात. परंतु आपला इतिहास व धार्मिक परंपरा लक्षात घेतल्या तर मुलींना विशेष म्हणजे सकारात्मक पूरक योजनाही हव्यात तरच या वर दिलेल्या समानतेचा उपयोग होईल.

### शिकणाऱ्या मुलीला विद्यावेतन

त्यापैकी एक पाऊल म्हणजे मुलींना मोफत शिक्षण हे शासनाने उचललेले आहे.

परंतु तेवढे पुरेसे नाही. आईबापांच्या रोख मिळकतीचा मार्ग आज मुलींच्या विनामोबदला श्रमांमुळे सुकर होतो. तेव्हा शिकणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना हवी. अर्थात विद्यावेतन कोणाला मिळावे हे सर्वस्वी पालकांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून ठेवावे. त्यात जात, धर्म यावरून भेद नसावा. मुलगी आणि पुढे स्त्री हा कुटुंबाचा मिळवता घटक असावा. अशी विचारसरणी, भावना दृढमूल आहे की नवऱ्याच्या किंवा बापाच्या मिळकतीवर जगणारी स्त्री उच्च दर्जाची व नशीबवान. ती धारणा बदललीच पाहिजे.

### पाठ्यपुस्तकातील दृष्टिकोन

यासाठी महत्त्वाचा वाटा अर्थात क्रमिक पाठ्यपुस्तकांचा आहे. सर्व विषयाच्या पाठ्यपुस्तकातून स्त्रीची प्रतिमा सर्व क्षेत्रात कार्यक्षम व सहभागी अशी दाखवली पाहिजे. हे चित्र आदर्श आहे व वास्तव नाही. परंतु पाठ्यपुस्तके जी प्रतिज्ञा आरंभी देताता ती आदर्शवादीच आहे. घटनेतील आदर्शाचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात पडावे ही अपेक्षा राष्ट्रीय एकात्मता या क्षेत्रात आजही ठेवली जाते. पाठ्यपुस्तकातून सर्व विभागातील व जातीधर्मातील श्रेष्ठांना आवर्जून स्थान मिळते. त्याचप्रमाणे विषमता निर्मूलनासाठीही पाठ्यपुस्तकांचा उपयोग यापुढे झाला पाहिजे.

आई घरी वाट पहाते व बाबा कामाला जातात, बाबा घरातले निर्णय घेतात, बाबा शूर असतात आणि आई भित्री असा मध्यमवर्गीय सूर अभ्यासक्रमातून कटाक्षाने दूर ठेवला पाहिजे. तसेच प्रचलित कायद्यांचे भान असावे. उदाहरणार्थ समान कामाला समान वेतन हा कायदा आता आहे. जरी त्याची अंमलबजावणी सदोष असली तरी गणिताच्या पुस्तकात ती चोखच हवी. उदाहरणार्थ शेतावर लावलेले मजूर-स्त्रिया व पुरुष यांची मजुरी गणितात समान दाखवावी. त्याचप्रमाणे जास्त मजुरीचे आणि जास्त तंत्रकौशल्य लागणारे काम आज स्त्रियांना दिलेच जात नाही. त्या कामाचे शिक्षणही त्यांना मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. पण पुस्तकातून तसे नको.

### वास्तव उदाहरणे

आजही काही पथप्रदर्शक स्त्रिया तंत्रकौशल्याच्या नव्या वाटा जाणीवपूर्वक चोखाळत आहेत. अशा प्रत्यक्ष उदाहरणांचा समावेश पाठ्यपुस्तकात अवश्य हवा. इतिहासातील लक्ष्मी आणि चांदबिबीपेक्षा सध्या मुलांना सहल काढून पहाता येईल अशा स्त्रियांची माहिती जास्त उपयोगी ठरेल. कारण पूर्वीच्या प्रसिद्ध स्त्रिया समाजातील उच्चवर्णीय तरी होत्या किंवा पन्नादाई प्रमाणे कनिष्ठ वर्गातल्या असल्या तर सरंजामी मूल्यांचाच बळी होत्या. तेव्हा पाठ्यपुस्तकातून लोकशाही व स्त्रीपुरुष समानता याच्याशी सुसंगत असेच वातावरण कटाक्षाने दाखवले पाहिजे. ६ ते १४ हे वय अत्यंत संस्कारक्षम असते आणि कर्तबगारीची जडणघडण तेव्हा होते. शिवाय १४ नंतर कायद्याला मागे सारून

अनेक मुलींची लग्ने होतात व शिक्षण बंद पडते. तेव्हा १४ पूर्वीच आत्मविश्वासावर भर दिला पाहिजे.

**कायद्याचे भान**

१४ ते १८ या वयात लग्न करणे गुन्हा आहे. पण तो आज घडतो. ६०-७० टक्के मुलींची लग्ने १८ च्या आतच होतात किंवा ठरतात. म्हणून या वयोगटातील शिक्षण चालू ठेवणाऱ्या अविवाहित मुलींना वाढीव विद्यावेतन असावे. म्हणजे १८ पर्यंत तिचा पैसा आपल्याला मिळावा याकरिता तरी लग्न लांबवले जाईल. आर्थिक प्रलोभनाचा इष्ट परिणाम होतो याचा पुरावा आपल्याजवळ आहे. मध्यमवर्गीय मुली जेव्हा दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी नोकऱ्या करू लागल्या (रेशनिंग ऑफिसात वगैरे) तेव्हा त्यांची लग्नाची वये आपोआप वाढली व नंतर ती कमी झाली नाहीत विद्यावेतन देऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातही हे घडवता येईल. मात्र अविवाहितांनाच विद्यावेतन द्यावे. म्हणजे १८ पूर्वी मातृत्व आल्याने आपल्याकडे ज्या माता बालआरोग्याच्या समस्या आहेत त्यांनाही आळा बसेल. शिक्षण क्षेत्रातील धोरणांचा परिणाम पुढे राजकीय व आर्थिक क्षेत्रात होतो हे सिद्ध झाले आहे. इंग्रजांनी 'बाबू' घडवले व ते घडले. आता आपण आत्मनिर्भर नागरिकही शिक्षणातून योग्य बदल करून निश्चितच घडवू शकू.

तीस टक्के स्त्रियांना राजकीय प्रतिनिधीत्व मिळावे हा सरकारचा नवा धोरणात्मक निर्णय त्यादृष्टीने स्वागतार्ह आहे. कारण लोकसभेच्या मॉडेलवर पूरक कायदे राज्याराज्यातूनही होतील अशी आशा वाटते. तामीळनाडूने ते पाऊल आताच उचलले आहे. इतर राज्यांनीही या टक्केवारीचा गंभीर विचार करावा, असे मला वाटते.

**शिक्षक होण्यासाठी प्रोत्साहन**

आणखी एक महत्त्वाची योजना म्हणजे शिक्षक व्यवसायाला प्रतिष्ठा व गुणवत्ता प्राप्त करून देण्यासाठी योजना. आज गौरव वगैरे होतात. पण हा व्यवसाय निवडावा यासाठी इन्सेन्टिव्हज नाहीत. प्राथमिक शिक्षण हा पाया आहे. म्हणून प्राथमिक शिक्षकाचे वेतन व पात्रता माध्यमिकपेक्षा कमी नको. तसेच जे विद्यार्थी शिक्षण संपल्यावर पहिली पाच वर्षे शिक्षक म्हणून काम करायला तयार आहेत त्यांना सवलत कर्ज योजना किंवा शिष्यवृत्ती असावी.

पहिली पाच वर्षे म्हणजे पदवीनंतर साधारण २० ते २५ वयाचे तरुण-तरुणी. शिक्षकांच्या व्यवसायातला मोठा धोका म्हणजे शिळेपणा व तीचतीच रेकॉर्ड लावून वेळ मारून नेण्याची सवय. तसेच वय फार वाढले की मुलांवरचे प्रेमही बऱ्याच वेळी वैतागात रुपांतरीत होते व मारकुटेपणा वाढतो. तेव्हा शक्यतो तरुण वयाचे, उमेदीचे व न कंटाळलेले

शिक्षक मुलांना मिळालेले बरे. २५ नंतर हाच व्यवसाय चालू ठेवणारे तो आवडीमुळे ठेवतील. इतरजण त्यातून बाहेर पडतील. ते मुलांच्या दृष्टीने उत्तमच. म्हणून कॉलेजाच्या सर्व शाखातून ५ वर्षे शिक्षक होण्यास तयार असणाऱ्यांना सवलत कर्ज द्यावे.

आजच्या ज्ञानाच्या विस्तारामुळे कालबाह्य शिक्षक ही सर्वच पातळीवर समस्या आहे. नव्या बदलांना यांच्या संघटना विरोध करतात. त्यावरही ही तरुणयोजना उपाय ठरेल. शिवाय या योजनेतून मोठ्या प्रमाणावर शिक्षक हाती लागले तर मुले व शिक्षक यांचे सध्याचे दारुण प्रमाण बदलून दर २५-३० मुलांमागे १ शिक्षक या ध्येयाकडे जाता येईल.

अर्थात याला अनुसरुन ज्यांना २५ नंतर शिक्षक व्यवसाय सोडायचा आहे त्यांना सरकारी व इतर नोकऱ्यात वयोमर्यादा शिथिल हवी. आपल्याकडे एक धोरण स्वीकारले तर त्याच्या तर्कशुद्ध परिणामांशी सुसंगत असे इतर बदल त्याच वेळी केले जात नाहीत. म्हणून बदललेल्या धोरणांची कार्यशक्ती घटते. ती चूक शिक्षणविषयक धोरणात झाली तर ते गंभीर परिणाम अनेक पिढ्यांना सोसावे लागतात.

तेव्हा समानता रुजवण्याकरता परिसर शाळा, बदललेली पाठ्यपुस्तके आणि ताज्या दमाचे, नवविचारांचे शिक्षक ही त्रिसूत्री योजना प्रभावी ठरायला ती एकत्रितपणे अमलात आणली पाहिजे. प्रथम पायलट म्हणून तरी असे प्रकल्प जरूर सुरु करावे व नंतर मूल्यमापनावर आधारित असा त्यांचा विस्तार करावा असे मला वाटते. गृहशास्त्राचा समावेश व भावंड योजना या शिक्षणाची गुणवत्ता निश्चित वाढवतील.

**व्यापक सामाजिक बदल**

आज समाजातील मुलींचा विचार केला तर त्यांची शैक्षणिक स्थिती समान नाही. परंतु एका बाबतीत त्या सारख्याच दुर्दैवी आहेत. ती म्हणजे दुय्यम नागरिक म्हणून वागणूक. विवाहानंतर वाट्याला येणारा छळ, अत्याचार व आर्थिक शोषण ही जात, धर्म, शिक्षण यांच्या मर्यादा ओलांडून आणि गरिबी - श्रीमंती भेद बाजूला ठेवून स्त्रियांच्या वाट्याला येतात. त्याबाबतीत पुरोगामी आणि प्रतिगामी कुटुंबमूल्ये ह्या एकाच निकषावर छळ होणार की नाही ते ठरते. आणि पुरोगामी विचाराचे लोक अल्पसंख्य आहेत. छळाचे प्रमाण कमीजास्त असते परंतु तो फरक उडदामाजी काळेगोरे एवढाच. स्त्रीची आकांक्षा खच्ची करण्याचे काम अनेक कुटुंबे पार पाडतात.

हुंडाबंदीचा कायदा आजही अस्तित्वात आहे. पण तो राहतो पुस्तकात. नवविवाहितेचा मृत्यू अचानक झाल्यास पोलिसांनी चौकशी करावी हा कायदा आहे. परंतु एकूण मृत्यूइतके खटले दाखल होत नाहीत आणि एकूण खटल्यांपैकी शिक्षा होण्याचे

प्रमाणही फार कमी आहे. वर्तमानपत्रातील कात्रणे काळजीपूर्वक ठेवल्यावर दिसते की खटला सुनावणीला फार उशीरा येणे आणि पुराव्याअभावी निर्दोष सुटणे यांचे प्रमाण फार आहे. सवतबंदीचा कायदाही सर्रास मोडला जातो. बालविवाह नकोत हा कायदा मोडला जातो. वारसाहक्क दिलेला असला तरी प्रत्यक्षात मुलींकडून सह्या घेऊन भावांनाच जमीन इ. दिली जाते.

माणूस म्हणून जे मूलभूत हक्क आहेत – उदाहरणार्थ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, औषधोपचार आणि कायदेशीर मदत या सर्व क्षेत्रात स्त्री दुय्यम आहे. त्याचप्रमाणे आर्थिक विकासाची समान संधीही तिला नाही. काबाडकष्ट करणाऱ्या खूपच स्त्रिया आहेत. पण घरातल्या व्यवसायात किंवा शेतीत मदत करणाऱ्यांना श्रममूल्य मिळत नाही. शिवाय इतर रोजगार केल्यानंतरही विनामोबदला घरकाम, पाणी भरणे व अपत्यसंगोपन यात श्रमाचा मोठा भाग स्त्रियांचा असतो.

शिक्षणाने हे सगळेच बदलण्यासाठी नुसता अभ्यासक्रम बदलून पुरेसा नाही. शिक्षण मुलींपर्यंत पोचवण्याची यंत्रणाच बदलली पाहिजे आणि मुलांच्या शिक्षणातही बदल हवा. फक्त स्त्रीचा दृष्टीकोन बदलला की झाले. या धोरणाने जर स्त्री-चळवळी चालवल्या तरी त्या यशस्वी होत नाहीत. कारण स्त्री-पुरुष हा परस्परावलंबी संबंध आहे. स्त्रीचा आणि पुरुषाचा दृष्टिकोन एकदम बदलला तरच त्यांचे परस्परातले नाते सुधारेल.

आज या नात्याचा पाया एका बाजूने अविश्वास, भीती आणि नाईलाज म्हणून जुळवून घेणे असा आहे तर दुसऱ्या बाजूने संशय, वर्चस्व आणि आर्थिक शोषण असा आहे. शिवाय एकमेकांबद्दल आदर आणि प्रेम असलाच पाहिजे अशा तऱ्हेचा सांस्कृतिक दट्ट्या पण आहे. त्यामुळे वस्तुस्थिती आणि कथित मूल्ये यामध्ये अंतर्विरोध असल्याने स्त्री आणि पुरुष दोघांमधेही अनेक मानसिक विकृती आढळतात. कारण शेवटी एकमेकांची गरज लागतेच. त्यामुळे सहवासाचे मार्ग किंवा प्रक्रिया न अडवता अधिक निरोगी सहकार्य हे धोरण ठेवून शिक्षणामध्ये बदल केले पाहिजेत. मुलामुलींना एकत्र आणि समान अभ्यासक्रम यासाठीच गरजेचा आहे. सहशिक्षणाची संधी बालपणापासून उच्च शिक्षणापर्यंत मध्ये खंडित न होता मिळाली पाहिजे.

**शाळांच्या मान्यतेचा पुनर्विचार**

वर दिलेल्या सर्व मूलभूत तत्त्वांशी विसंगत अशा शाळा आजही महाराष्ट्रात आढळतात. त्यांच्या मान्यतेविषयी पुनर्विचार करण्याची गरज आहे. कशी का असेना, शाळा तर आहे असे धोरण अंती घातकच आहे.

आपण हॉटेलला सुद्धा किमान दर्जाचा आग्रह धरतो मग मुलांचे ६ ते १४ या आठ वर्षांचे आयुष्य दररोज ५-६ तास जिथे जाणार त्या शाळेबद्दल किमान दर्जाचा आग्रह का

नको ? मुलाच्या राहत्या ठिकाणापासून पायी जाण्याइतकी जवळ, एकतरी स्त्रीशिक्षक असलेली, गृहशास्त्र शिकवणारी, वाढत्या वयानुसार मुलींना विद्यावेतन देणारी आणि लहान मुले सांभाळण्याची सोय असणारी अशीच शाळा आम्हाला आता हवी आहे. या चौकटीबाहेर आज काही महागड्या शाळा आहेत. तेथे सहशिक्षण नाही. मुलांना २-३ तास प्रवासात घालवून शाळेत जावे लागते व परिसराशी नाते न राहता विशिष्ट आर्थिक स्तरातच वावरावे लागते. समानता रुजवण्यासाठी अशा शाळा माझ्या मते बंदच करायला हव्यात आणि नव्या मूल्यांवर पुनर्रचित करायला हव्यात. आपलेच हितसंबंध सुरक्षित राहण्यासाठी धडपडणाऱ्या प्रस्थापितांना हे विचार आवडण्यासारखे नाहीत. पण समानता हे मूल्य या देशात अतिशय नवे आहे. घटनेच्या पुस्तकाबाहेर पडून हे मूल्य समाजात मोकळेपणे वावरायचे असेल तर शिक्षणाने खंबीरपणे बदलाला सज्ज होऊन समाजमनाची मशागत केली पाहिजे. नाहीतर समानतेऐवजी दांभिकता आणि शोषणावर गोड शब्दांची मलमपट्टी ही मूल्ये दिसू लागतील. विस्तार भयास्तव या लेखात मी माध्यमाचा प्रश्न विचारात घेतला नाही. परंतु समानतेसाठी मातृभाषेतून शिक्षण जास्त योग्य ठरेल यात शंका नाही.

तसेच कोणताही आराखडा प्रथमदर्शनी निर्दोष वाटला तरी अनुभवाने त्यात बदल करावे लागतातच. म्हणून काही निवासी शाळा प्रायोगिक शाळा म्हणून ठेवाव्यात आणि माध्यमविषयक किंवा धोरणविषयक नवे प्रयोग तिथे प्रथम करून पहावेत. शिक्षणामध्ये असा संशोधन आणि विकास विभाग नसला तर कालांतराने कोणतेही शिक्षण चाकोरीबद्ध होण्याचा व प्रस्थापितांनाच पोषक ठरण्याचा धोका संभवतो हे विसरता कामा नये.

# मुलींचे शिक्षण–मानवी साधनसामग्रीच्या विकासासाठी

श्रीमती शालिनी मेनन

कोणत्याही देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत मानवी भांडवलाची भूमिका भौतिक भांडवलापेक्षाही अधिक महत्त्वाची आहे हा विचार आता विकासाच्या अर्थशास्त्रात महत्त्वाचा मानला जातो. मानवी भांडवल निर्मिती म्हणजे देशातील लोकांचे ज्ञान, कौशल्ये आणि कार्यक्षमता यात वाढ करण्याची प्रक्रिया होय. F.H. Harbision आणि C.A. Meyers यांनी Education, Manpower and Economic Growth या ग्रंथात अशी व्याख्या केली आहे की, Human capital formation is the process of increasing knowledge, the skills and the capacities of all people of the country.

अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या जलद आर्थिक विकासाची कारणमीमांसा करीत असताना शिक्षणावर होणाऱ्या खर्चात सतत होत गेलेली तौलनिक वाढ या घटकाला Schultz, Harbinson, Denison या अर्थशास्त्रज्ञांनी कारण मानले आहे. अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ यानेही देशातील सर्व नागरिकांनी प्राप्त करून घेतलेल्या उपयुक्त कौशल्यांचे महत्त्व आपल्या लेखनातून व्यक्त केले होते. आर्थिक विकासाठी यंत्रे, जमीन, कच्चा माल या सर्व भौतिक साधनांना एकत्र आणून त्यांचा उत्पादक रीतीने वापर करणारा मानवी घटक हा त्या इतर साधनांपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. म्हणूनच मानवी साधनसामग्रीचा विकास ( Human Resources Development) आजकाल जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. यात सर्वसामान्य शिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण, क्रीडा आणि कला अशा मानवी व्यक्तिमत्त्व संपन्न करणाऱ्या विविध अंगांचा समावेश होत असतो. हा मानवी साधनसामग्रीचा विकास मानवाला मिळणाऱ्या अनुभूती, त्याची स्वत:ची शारीरिक व बौद्धिक कुवत आणि त्याच्यावर होणारे संस्कार या घटकांवर अवलंबून असतो. याच कारणास्तव स्त्रीशिक्षण आणि मानवी साधनसामग्रीचा विकास हे दोन परस्परांवर अवलंबून असलेले घटक ठरतात. आजची शाळेत शिकणारी विद्यार्थिनी ही उद्याची गृहिणी आणि माता असते. तिच्या शिक्षणावर खर्च होणारा प्रत्येक रुपया हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत केलेली भांडवल गुंतवणूक असते. अमेरिकेचे पूर्वी भारतात असलेले राजदूत व एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. गालब्राइथ (Prof. Galbriaith) यांच्या मते सध्या अमेरिकेत जो औद्योगिक विकास झालेला दिसून येतो. त्याचे मूळ मानवी घटकावर केलेली भांडवल गुंतवणूक व त्या मानवी घटकाने घडवून आणलेल्या औद्योगिक सुधारणांमध्ये आहे. यावरून भारतासारख्या विकसनशील देशात मानवी घटकाचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे हे लक्षात येते.

मानवी साधनसामग्रीचा विकास पाच मार्गांनी करता येतो. ते मार्ग म्हणजे १) आरोग्य सेवा – यामध्ये सरासरी आयुर्मयादा वाढविणे, दर व्यक्तीची शारीरिक व बौद्धिक कुवत वाढविणे या गोष्टींचा समावेश होतो २) व्यावसायिक शिक्षण यामध्ये शिकाऊ उमेदवार ( ॲप्रेंटिस) म्हणून कारखान्यात काम करण्याच्या सुविधा उपलब्ध असण्याचा समावेश असतो. ३) प्राथमिक दुय्यम व उच्च शिक्षणासाठी पुरेशा शिक्षणसंस्था ४) शेतीव्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानासाठी विस्तार व प्रशिक्षण योजनांची उपलब्धता आणि ५) व्यक्ती आणि कुटुंबे यांना बदलत्या जीवनपद्धतीशी समायोजन करून नवीन व्यवसाय व नवे प्रदेश यांच्याशी एकरुप होण्याचे प्रशिक्षण देणे हे होत. या पाचही मार्गांकडे काळजीपूर्वक नजर टाकली असता ते यशस्वी करण्यासाठी मुलींच्या शिक्षणाची किती गरज आहे हे सहज लक्षात येते.

## संख्यात्मक व गुणात्मक प्रश्न

मानवी साधनसामग्रीला संख्यात्मक तसेच गुणात्मक अशी दोन अंगे आहेत. तिसऱ्या जगातील देशांपुढे यापैकी संख्यात्मक अंगाचे आव्हान उभे असल्याने लोकसंख्या नियंत्रणावर विशेष भर दिला गेला. कुटुंबनियोजनाचे काम हा शब्दप्रयोग अप्रिय झाला. पण संख्यात्मक वाढ आटोक्यात न आल्याने विकासाच्या फायद्याचे माप लोकांच्या पदरात फारसे पडले नाही. आर्थिक विकासावरील प्रचंड भांडवल गुंतवणूक मानवी घटकाच्या संख्यात्मकवाढीमुळे सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास अयशस्वी ठरली. जागतिक बँकेने आपल्या १९८०-८१ च्या अहवालात मागील दशकात तिसऱ्या जगातील देशांनी केलेल्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नांचा आढावा घेताना उत्कृष्ट मार्गदर्शन केले होते. या देशांनी जर लोकसंख्येचा आकार मर्यादित ठेवला नाही तर विसाव्या शतकाच्या अखेरीला त्यांची वाढती भांडवल गुंतवणूक फक्त वाढीव लोकसंख्या जिवंत ठेवण्यातच खर्ची पडेल. त्यापेक्षा या देशांना मुलींच्या शिक्षणावर अधिक भांडवल गुंतवणूक करावी म्हणजे लोकसंख्येचा प्रश्न आपोआप सुटेल. " या प्रकारच्या इशाऱ्याबरोबरच त्या अहवालात भारतातील स्त्रीशिक्षणाचा सर्वात जास्त प्रसार असलेल्या केरळ या राज्याचे उदाहरण तिसऱ्या जगातील विकसनशील देशांना एक आदर्श म्हणून दाखविले होते. दर हजारी बालमृत्युचा दर घटविण्यात त्या राज्याने २००० या वर्षाचे उद्दिष्ट १९८० मध्येच म्हणजे २० वर्षे आधीच साध्य केले होते. सरासरी आयुर्मर्यादा वाढविणे या विकासाच्या पाच मार्गांपैकी पहिल्या मार्गावर यशस्वी वाटचाल केली होती. जागतिक बँकेच्या या पाहणी अहवालाकडे भारतातील विचारवंतांचे लक्ष वेधले आणि आपल्या देशात मानवी साधनसामग्रीचा विकास हा वेगळा आणि सर्वसमावेशक विषय निर्माण झाला.

प्राथमिक शिक्षण मोफत, सक्तीचे आणि सार्वत्रिक आहे. सहा ते चौदा या वयोगटातील सर्वच्या सर्व मुली जर शिक्षणाच्या प्रवाहात राहिल्या तर त्यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी ज्यावेळी त्यांचे विवाह होतील त्यावेळी त्यांना कुटुंबनियोजनासाठी प्रवृत्त

करण्याचे न आवडणारे काम त्या वेळच्या प्राथमिक शिक्षकांना करावे लागणार नाही. आज जर प्राथमिक शिक्षणात होणारी मुलींची गळती थांबविता आली तर एका दशकात संख्यात्मक वाढीला प्रतिबंध करणे सहज शक्य होईल. जरी या मुली लेखन, वाचन आणि अंकगणित यासारख्या कौशल्यात अपेक्षेइतक्या पारंगत झाल्या नाहीत तरीही स्वत:चे शारीरिक कष्ट टाळण्यासाठी आपल्या मुलांना अधिक उच्च राहणीमानाचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आपण मुलांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे हे त्यांना समजेल. स्त्री शिक्षण आणि दर स्त्रीला असणाऱ्या अपत्यांची संख्या यांमध्ये फार जवळचा सहसंबंध (Close correlation or High Degree positive correlation) आहे हे संख्याशास्त्राने सिद्ध झाले आहे. पश्चिम युरोपियन देशांमधील घटता जननदर हे याचेच द्योतक आहे. जागतिक पातळीवरील पाहणी अहवालात असे स्पष्ट दिसते की मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष म्हणजे मानवी घटकाची संख्यात्मक वाढ आणि गुणात्मक घट होय.

संख्यात्मक वाढीमुळे गुणात्मक प्रगती करणे कठीण जाते. प्रसुतीसमयी होणारे मातांचे मृत्यू व एक ते पाच वयोगटातील बालमृत्यूदर हा मानवी घटकाच्या गुणात्मक अंगाकडे दुर्लक्ष होत असल्याचा पुरावा आहे. यादृष्टीने खालील आकडेवारी बोलकी वाटते.

| देश | दर हजारी जननदर | दरहजारी मृत्युदर |
|---|---|---|
| अमेरिका | २४.६ | ९.३ |
| चिली | ३५.० | १२.८ |
| श्रीलंका | ३७.९ | ११.० |
| भारत | ४०.३ | २६.३ |
| स्वीडन | १४.८ | ९.४ |
| युनायटेड किंगडम | १५.४ | ११.७ |

अमेरिका, ब्रिटन, स्वीडन यांसारख्या विकसित देशांच्या तुलनेने भारतात जननदर व मृत्युदर हे दोन्ही जास्त आहेतच. पण श्रीलंका, चिली यांसारख्या विकसनशील देशांपेक्षाही ते दर जास्त आहेत. ही बाब चिंतेची आहे. जननदर कमी करण्याची आवश्यकता सहज लक्षात येते. पण मृत्युदर कमी का करायचा असा प्रश्न अनेकांच्या मनात उभा राहतो. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की हा प्रचंड मृत्युदर बालमृत्युचे प्रमाण जास्त असल्याने निर्माण होत असतो. आफ्रिका व आशिया खंडातील अनेक बालके पाच वर्षांची होण्यापूर्वीच अतिसाराने मरण पावतात. आता जागतिक आरोग्य संघटनेने (World Health Organisation) 'जलसंजीवनी' हा सोपा व स्वस्त उपाय त्यासाठीच लोकप्रिय केला आहे. पण त्याचा वापर करण्यासाठी बाळाची आई निदान प्राथमिक शिक्षणाच्या प्रवाहात वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत राहिलेली असली पाहिजे. तिच्यावर

शिक्षणाचे संस्कार झाले पाहिजेत. निरोगी, सतेज बालके ही राष्ट्राची भावी मांडवल गुंतवणूक स्त्रीच्या हाती आहे. याकडे दुर्लक्ष केले गेले तर विकासाची गती रोखली जाईल.

## आईकडून होणारे कौशल्यांचे संक्रमण

मानवी घटकाच्या गुणात्मक विकासात त्याचे आरोग्य, समतोल, बुद्धी आणि विविध कौशल्ये आत्मसात करण्याची त्याची कुवत यांना प्राधान्य आहे. आरोग्य तर पिण्याचे पाणी निर्जंतुक करण्यासारख्या साध्या तंत्रापासून तो आहारशास्त्राच्या नियमानुसार अन्न खाण्यापर्यंत विविध घटकांवर अवलंबून असते आणि त्या घटकांत प्राथमिक शिक्षणाचा लाभ झालेली स्त्री नैपुण्य मिळवू शकते. जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला देशातील सरासरी आयुर्मर्यादेपर्यंत निरोगी व सुदृढ जीवन जगता यावे यासाठी त्याच्या मातेला आरोग्यविषयक साधी तत्त्वे शिकविण्याची गरज असते. साथीच्या रोगांविरुद्ध लस टोचून घेणे या गोष्टींचे महत्त्व आईला पटलेले असले म्हणजे ती ते पुढील पिढीला सहज समजावून देऊ शकते. तिसऱ्या जगातील देशात देवीच्या साथीचे निर्मूलन होण्यास स्त्रीशिक्षणाचा प्रसार अत्यंत उपयुक्त ठरला. पूर्वी स्त्रिया देवी डॉक्टर पासून आपले मूल लपवून ठेवीत असत. मग त्या देवी टोचून घेण्यासाठी उत्साहाने पुढे येऊ लागल्या. आज अशाच प्रकारच्या दृष्टिकोनाचा प्रसार इतर साथीच्या रोगांच्या बाबतीत केला जात आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम ( Mass Immunisation Programme) यशस्वी करण्यासाठी मुलींमध्ये जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे. आणि ते कार्य त्या वयाच्या निदान चौदाव्या वर्षापर्यंत तरी नियमित शिक्षणाच्या प्रवाहात राहण्याने शक्य होणार आहे.

स्त्री हा उत्पादक घटक आहे या गोष्टीकडे अनेकदा दुर्लक्ष होते. कारण घरकामाचे मूल्यमापन पैशाच्या रुपात केले जात नाही. पण आंतरराष्ट्रीय पाहणी अहवालावरून असे स्पष्ट होते की एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी तीस ते पन्नास टक्के उत्पन्न केवळ घरकाम करणाऱ्या गृहिणींनी निर्माण केलेले असते. जर्मनीतील कलोग आर्थिक अभ्याससंस्थेने (German Economics Institute of cologue) याबाबतीत संशोधन करून असे दाखविले आहे की जर्मन गृहिणी दर आठवड्याला चाळीस ते पन्नास श्रम तास (Labour Hour) काम करते. भारतातील ग्रामीण भागातील गृहिणी यापेक्षा खूपच जास्त तास काम करते. कारण स्वयंपाक, अपत्यसंगोपन या घरगुती कामांबरोबरच शेताची कामे, घरगुती व्यवसायातील मदत यामध्येही तिचा मोठा सहभाग असतो. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांत श्रमिक वर्गातील महिला घरच्या मिळकतीत भर घालण्यासाठी घरकामांखेरीज इतर उत्पादक व सेवाव्यवसायात काम करीत असतात. शिंप्याची पत्नी हातशिलाई, काजे, बटने करणे ही कामे करते तर लोहाराची पत्नी भाता हालवीत असते. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, सूतकताई यांसारखे व्यवसाय स्त्रिया करीत असतात आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नात भर घालीत असतात. या व्यवसायांसाठी लागणारी कौशल्ये एका

पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण पद्धतीने जात असतात. या संक्रमण प्रक्रियेसाठी सर्वसामान्य शिक्षणाची मोठी गरज असते.

तिसऱ्या जगातील देशात लोकसंख्येचा प्रचंड आकार हा महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे उत्पादनक्षेत्रात श्रमशक्तीचा वापर अधिक, भांडवलाचा वापर कमी असे उत्पादनतंत्र वापरावे लागते. पण तरीही प्रत्येक उत्पादनात साध्या आणि सोप्या तंत्रज्ञानाचा वापर हा करावाच लागतो. कारण त्यामुळे श्रमशक्ति अधिक उत्पादक बनून दर माणशी उत्पादनात वाढ होते. भारतीय स्त्री शेतीच्या कामात पुरुषाच्या बरोबरीने नव्हे तर जास्त पटीनेही श्रम करते. पण शेती विकासासाठी प्रचलित असलेल्या प्रशिक्षण व भेट योजना, कृषि विद्यापीठांच्या विस्तार सेवा योजना यांच्याशी संपर्क साधून शेताचे अद्ययावत तंत्रज्ञान जर तो शिकू शकेल तर दर माणशी आणि दर हेक्टरी उत्पादनात वाढ करता येईल. दापोली येथील कोकण कृषि विद्यापीठाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या स्त्री शेतकरी मेळाव्यात सहभागी होणाऱ्या स्त्रियांच्या आकडेवारीकडे नजर टाकली तर सुमारे नव्वद टक्के भगिनी प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेऊन नंतर विवाह झालेल्या आणि घरच्या शेती व्यवसायात काम करणाऱ्या आढळतात. पंजाब आणि हरयाणा या राज्यांतील शेतीच्या क्षेत्रातील प्रगतीमागे आणि हरित क्रांतीमागे स्त्री शिक्षणातील प्रगतीचे पाठबळ आढळते. परंपरेने शेतीप्रधान अशा आपल्या देशात शेतीवरील एकूण लोकसंख्येचा ताण कमी करणे, शेतीचे दर माणशी आणि दर हेक्टरी उत्पादन वाढविणे, शेती व्यापारी दृष्टिकोनातून म्हणजेच नफा तोट्याचा हिशेब ठेवून करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेत स्त्रीचा वाटा फार मोठा आहे. येथेच तिच्या शिक्षणाचे महत्त्व लक्षात येते. आपल्या देशांतील हरित क्रांती आणि मुलींच्या शिक्षणाची सुधारत जाणारी टक्केवारी यांच्यामध्ये निकटचा सहसंबंध आहे.

ग्रामीण भागात शेतीला पूरक असे व्यवसाय आधुनिक तंत्राचा वापर करून करणे हा राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्याचा एक मोठा यशस्वी उपाय आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी भारतीय स्त्रीच्या उत्पादकतेचे महत्त्व ओळखले होते आणि म्हणूनच घरकाम करताकरता सहज करता येण्याजोग्या सूतकताईच्या कामाला त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील विधायक कार्यक्रमात महत्त्वाचे स्थान दिले होते. स्त्रीच्या उत्पादकशक्तीची ती एक प्रतिकात्मक झलक होती. आज त्याच विचाराचे आचरण करण्यासाठी मुलींना सामान्य शिक्षणात सहभागी करून घेऊन थोडी परिपक्वता आल्यानंतर व्यावसायिक क्षेत्रात आधुनिक तंत्र आणि विचार यांचे मार्गदर्शन देण्याची गरज आहे. परंपरेने स्त्रिया शेतीमालावर प्रक्रिया करण्यात तरबेज असतात पण त्यामागील वैज्ञानिक कारण त्यांना माहीत नसल्याने त्यांच्या मालाला विशिष्ट दर्जा प्राप्त होणे कठीण जाते. यासाठी Agmark, I.S.I. प्रमाणपत्र यासारख्या संकल्पना त्यांच्यापर्यन्त पोचवून त्यांच्या उत्पादनाला प्रमाणित दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे. या दृष्टीनेही स्त्रीशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरते. स्त्रियांच्या अंगी विविध क्षेत्रात उत्पादक कार्य करून राष्ट्रीय उत्पन्नात

मोलाची भर टाकण्याची सुप्त कुवत नक्कीच असते. पण तिचा वापर केला जाण्यासाठी निदान सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण पूर्ण करून मगच त्या वैवाहिक क्षेत्राकडे वळल्या पाहिजेत.

**बदलत्या जीवनपद्धतीजवळ स्त्रीचे समायोजन :**

दर माणशी उत्पादनात वाढ करून राष्ट्राचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी देशातील मानवी साधनसामग्रीचे नियोजन Manpower Planning हा उत्तम उपाय असतो. प्रत्येक मानवामध्ये काही मूलभूत अशा सुप्त शक्ती असतात. यांचा विकास झाला म्हणजे तो माणूस उत्तम आणि कार्यक्षम उत्पादक बनतो. पण जर त्याच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास करण्यासाठी आवश्यक असे वातावरण त्याला प्राप्त झाले नाही तर त्याच्या शक्तीचा देशाच्या विकासात काहीच उपयोग होत नाही. स्त्रियांची बुद्धिमत्ता, त्यांच्या अंगी असलेली कौशल्ये, इत्यादी गुणांचा अनेक देशात फार कमी प्रमाणात वापर केला जातो. कारण त्यांना स्वत:चा विकास करून घेण्याच्या सुविधा फार अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध असतात. यासाठीच लोकशाही राष्ट्रात शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्कांपैकी एक हक्क म्हणून देशाच्या राज्यघटनेतच समाविष्ट केलेला असतो. हॅरॉल्ड लास्को यांनी हक्काची व्याख्या करताना असे म्हटले की "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी विशिष्ट परिस्थिती की जिच्याखेरीज माणसाला आपल्या अंगीभूत गुणांचा सर्वोत्कृष्ट विकास करता येणार नाही." (Rights are those conditions of social life without which no man can find himself to be at his best).

सुदैवाने २६ जानेवारी १९५० मध्ये भारताची राज्यघटना अंमलात आल्यापासून भारतीय स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. शिक्षणामुळेच तिच्या समायोजन करण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीला आता विकसित होण्याची संधी मिळाली आहे. परंपरेने सासरचे गाव आणि सासरची माणसे यांच्याशी जुळवून घेणारी भारतीय स्त्री, जीवनाच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्राजवळ समायोजन करण्यास सिद्ध आहे. दर शतकामध्ये तंत्रज्ञानाचा विकास अधिकाधिक वेगाने होत आहे. तांत्रिक विकासामुळे मानवी जीवनपद्धतीही बदलत जाते. दोन महायुद्धांमुळे भारतीय मध्यमवर्गीय स्त्री आपल्या परंपरागत संथ आणि सुरक्षित जीवनपद्धतीतून बाहेर आली. कारण वाढत्या किंमतमानामुळे तिला अर्थार्जन करावे लागले. तिच्या विचारांची क्षितिजे विस्तारली. जाती संस्था, अंधश्रद्धा यांसारख्या गोष्टींवरील तिचा विश्वास कमी होऊ लागला. म्हणजे तांत्रिक जीवनाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न ती करू लागली. आपल्या विकासासाठी आपला गाव, प्रांत, देश सोडून अन्य ठिकाणी जावे लागते, प्रगत ज्ञान प्राप्त करून घ्यावे लागते आणि हे करीत असताना आपली पाळेमुळे विसरून चालत नाहीत. याची जाणीव होणे आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक आहे. जपानच्या जलद आर्थिक विकासामागे तेथील माणसांची

प्रगत तंत्रज्ञानाशी आपली स्वदेशी जीवन जीवनपद्धती जुळवून घेण्याचे कसब आहे हे विसरता कामा नये. यादृष्टीने आपल्या भावी पिढीला नवनवीन क्षेत्रांचे आव्हान स्वीकारण्यासाठी उत्तेजन देणारी आई ही शिक्षणाचा लाभ मिळवून डोळस बनलेली असणे आवश्यक आहे.

**मुलींच्या शिक्षणाचे प्रचंड आव्हान :**

भारतातील दर व्यक्तीची बौद्धिक कुवत वाढवून शेती आणि इतर व्यवसायांचे अत्याधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची कुवत त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी मुलांची प्राथमिक शिक्षणात शंभर टक्के उपस्थिती आवश्यक आहे. दुर्दैवाने आजचे चित्र मात्र निराशाजनक आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या पाचव्या शैक्षणिक पाहणीचे निष्कर्ष कोणाचीही झोप उडविणारे आहेत. या पाहणी अहवालात असे नमूद केले आहे की जरी १९७८ ते १९८६ या कालखंडात शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीवर्गाची संख्या वाढली असली तरी प्राथमिक शिक्षणात होणाऱ्या गळतीचे प्रमाण मोठे असल्याने या प्रवेशवाढीपासून फारसे फायदे झालेले नाहीत. ग्रामीण भागात शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या संख्येत याच काळात मुलांच्या संख्येपेक्षा अधिक वेगाने वाढ झाली असली तरी गळतीचे प्रमाण कमी झालेले नाही. केरळ राज्याचे उदाहरण साक्षरतेच्या बाबतीत एक आदर्श राज्य म्हणून दिले गेले असून प्राथमिक शिक्षणात शंभर टक्के बालकांना प्रवेश दिला गेल्याचा उल्लेख आहे व त्यात मुली आणि मुलगे यांच्या प्रमाणात तफावत आढळत नाही. पण याच १९७८ ते १९८६ या पाहणी कालखंडात या राज्यात एकूण प्राथमिक शाळांत प्रवेश घेणाऱ्यांचे प्रमाण ३.५ टक्क्यांनी कमी झालेले दिसत आहे. कारण स्त्री शिक्षणात आघाडीवर असलेल्या या राज्यात कुटुंबकल्याण योजना अर्थातच यशस्वी झालेली आहे. म्हणजेच इतर राज्यांना हे उदाहरण नजरेसमोर ठेवून आज ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली असता कुटुंबनियोजनाचे काम एका दशकात प्राथमिक शिक्षकांच्या कामातून कमी कसे करता येईल याचा हा पुरावा आहे. आज प्रत्येक मुलीने शाळेत प्रवेश घेऊन निदान सहा सात वर्षे तरी शिक्षणाच्या संस्कारामध्ये काढली तरी मानवी साधनसामग्रीच्या संख्यात्मक अंगाच्या नियंत्रणाच्या दृष्टीने एक मोठे यशस्वी पाऊल उचलल्यासारखे होईल.

मुलींच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रवेशात वाढ होण्यास त्यांना बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत केले गेले हा उपाय निश्चितच परिणामकारक ठरला आहे. महाराष्ट्र राज्यातील सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना ही सुद्धा या कामासाठी उपयुक्त अशी योजना असली तरी अद्याप तिचे महत्त्व अनेक लोकांना आणि विशेषत: शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींना पटलेले दिसत नाही. मुलाच्या शिक्षणाचे आव्हान इतके प्रचंड आहे की ते पेलण्यासाठी केवळ प्राथमिक शिक्षकच नव्हेत तर पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर (From K.G. to Post - Graduate) या सर्वच क्षेत्रांतील शिक्षकांनी सहभागी होणे आवश्यक आहे. मानवी भांडवल अधिक उत्पादक बनविण्यासाठी आरोग्य, बौद्धिक विकास, व्यावसायिक प्रशिक्षण, समायोजन कौशल्य यासारखे गुण दर व्यक्तीच्या अंगी बाणविणे हे काम केवळ प्राथमिक

शिक्षकांचेच नसून शिक्षणाचा लाभ मिळालेल्या प्रत्येक सुदैवी व्यक्तीचे आहे.

मुलींनी शाळांतून प्रवेश घेतल्यावर पुढे वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत तरी त्या शैक्षणिक प्रवाहात राहाव्यात यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. ग्रामीण भागात दारिद्र्यामुळे मुलींची प्राथमिक शिक्षणातून मोठ्या प्रमाणात गळती होते. ती वयाने थोडी वाढली की पुरेशा कपड्यांअभावी तिला शाळेत पाठविणे आईवडिलांना जड वाटते. शाळेतच पाळणाघर आणि बालवाडी यांची सोय अशा उपाययोजना केल्या पाहिजेत. हे काम केवळ शासनाकडून केले जाईल अशी अपेक्षा अतिमहत्त्वाकांक्षी ठरेल. त्यासाठी सेवाभावी संस्था, सुखवस्तू व्यक्ती आणि विशेषत: शिक्षणाचा लाभ मिळालेल्या महिलांना पुढाकार घ्यावा लागेल. ग्रामीण भागातील महिलामंडळांनी आपल्या कार्यक्रमांमध्ये आपल्या गावातील सक्तीच्या वयोगटातील सर्वच मुली शिक्षणाच्या प्रवाहात राहतील यासाठी आवश्यक ते कार्यक्रम निवडून त्यांचा पाठपुरावा केला पाहिजे.

मुली शाळेत गेल्या म्हणजे त्या दहावीची परीक्षा उत्तीर्ण होऊन संघटित क्षेत्रातील कर्मचारी बनाव्यात अशी अपेक्षा ठेवणे अनावश्यक आणि चुकीचेही आहे. दहावी अनुत्तीर्ण किंवा केवळ सहावी अथवा सातवीपर्यंतच शिकलेली मुलगी ही सुद्धा राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका पार पाडू शकते. इ.स. २००० मध्ये सर्वांसाठी आरोग्य (Health for all) या योजनेच्या यशासाठी चार इयत्ता शिकलेल्या मुलीही उपयुक्त कार्य करू शकतात. पाणी गाळणे, उकळणे, जलसंजीवनीचा वापर, लसीकरण यासारखे उपाय या मुलींनी प्राथमिक शिक्षणात ऐकले असल्याने आई झाल्यावर भूतबाधा, झपाटणे अशासारख्या अंधश्रद्धांऐवजी डोळसपणे त्या रोगाचे कारण असलेल्या सूक्ष्म जंतूंकडे पाहू शकतात. सुदृढ आणि निरोगी बालक म्हणजे देशाची भावी भांडवल गुंतवणूक होय. त्या दृष्टीने ही कामगिरी कमी महत्त्वाची कशी समजता येईल?

आज १९८९ या वर्षाच्या जून महिन्यात जरी शालेय वयोगटातील शंभर टक्के मुलींनी शाळेत प्रवेश घेतला आणि त्या सात आठ वर्षे शाळेत शिकत राहिल्या तरी देखील एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मानवी भांडवल या घटकाचे संख्यात्मक नियंत्रण आणि गुणात्मक वाढ निश्चित साध्य होईल.

• • •

# ग्रामीण भागातील मुलींच्या आरोग्यविषयक समस्या

कु. नलिनी जोशी

रामायणामधील सर्वपरिचित असलेली सीता ही खरी शेतकरी कन्याच. सीतेचे आयुष्य म्हणजे एक संपूर्ण वेदना होती. वनवास, अपहरण, शीलहरणाचे भय, अग्निपरीक्षा, समाजाची दूषणे, पतीविरह, पुत्रसंवर्धनाची जबाबदारी इ. खडतर कर्तव्यपूर्तीनंतरही सीतेला अखेर देहत्याग करावा लागला. स्त्रीजातीची केवढी मोठी शोकांतिका आहे. सीतेप्रमाणेच आजच्या शेतकरी कन्येच्या किंवा ग्रामीण स्त्रीच्या कपाळीच्या वेदनेचा प्रवास संपलेला नाही.

राष्ट्राचा विकास हा संपूर्णपणे समाजाच्या विकासावर अवलंबून असतो आणि समाजाचा विकास हा त्या समाजाच्या स्थितीवर अवलंबून असतो. शिक्षणाने व सामाजिक आस्थेने स्त्री वर्गाचे मनोबल वाढेल तर समाज परिवर्तनास गती मिळेल. स्त्रीची श्रमशक्ती चूल व मूल ह्या चाकोरीतून बाहेर पडून देशाच्या आर्थिक क्रांतीस हातभार लावू शकेल. भारत हा बहुतांशी खेड्यांचा देश असल्याने ग्रामीण स्त्रियांच्या स्थितीत आमूलाग्र बदल होणे ही काळाची गरज आहे.

मनूसारख्या आचारधर्म सांगणाऱ्यांनी देखील स्त्रीला क्षूद्र मानले. आजही हे गुलामगिरीचे जोखड ग्रामीण स्त्रिया इमाने इतबारे खांद्यावर पेलताना दिसत आहेत. गुलामानेच गुलामगिरी विरुद्ध बंड पुकारल्यास गुलामगिरी नष्ट होऊ शकते. ह्यासाठी स्त्रीने स्वत:च सुधारणेच्या चळवळीची सूत्रे स्वत:च्या हाती घेतली पाहिजेत. तरच ती सबल बनू शकेल. ह्या दृष्टिकोनातून ग्रामीण स्त्री ही आजपर्यंत आश्रिताचेच जिणे जगत आल्याचे दिसते.

भारतातील सुमारे ८०% जनता खेड्यातून वास्तव्य करून आहे. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी खेडूत पूर्णपणे असहाय्य होता. आकाशाकडे डोळे लावून वरुण राजाच्या कृपेवर त्याची शेती अवलंबून असायची. दुष्काळ पडल्यास अन्नाला मोताद होत असे. अशावेळी ब्रिटीश सरकार दुष्काळी कामे सुरू करीत असे, पण वेळ पडल्यास शेतकऱ्याला सावकाराचे पाय धरावेच लागत. अशा परिस्थितीत शेतकरी वर्ग वर्षानुवर्षे कर्जात बुडलेला असायचा. ह्या सगळ्या दिवसांमध्ये खेडुताबरोबर खरी साथ मिळायची ती डोक्यावर पदर घेऊन मुकाटेपणे दाराआडून आपली कामे पार पाडणाऱ्या त्याच्या बायकोची. कितीही संकटं येवोत, आर्थिक समस्या असोत, शारीरिक हालअपेष्टा असोत, सगळं काही सहन करून एक नि:शब्द आयुष्य जगणारी ग्रामीण स्त्री; स्वातंत्र्य मिळून आज ४० वर्षे उलटून गेली

ऱ्री यामध्ये फारसा बदल झाला असे म्हणता येणार नाही. बाह्य दृष्टिकोनामधून खेड्याच हणीमान सुधारलेले दिसते. शाळा, रुग्णालय, बाजारपेठ, दूरदर्शन, रेडिओ इ. महाराष्ट्रातील काही खेडी उजळली आहेत. पण आर्थिक स्थिती आणि शिक्षण इ. सांस्कृतिक सुधारणेचे फळ दृष्टिपथात येत नाही.

अलिकडच्या काळामध्ये शेतमालाला रास्त भाव मिळू लागला आहे. पण हा फायदा शेतकऱ्यांच्या स्त्रियांपर्यंत कधीच पोचू शकत नाही, कालचा साधा शेतकरी आज एखाद्या सोसायटीचा चेअरमन, एखाद्या कारखान्याचा मालक झालेला दिसतो. मुंबई-दिल्लीकडे गाडीने अगर विमानाने फेऱ्या मारताना दिसतो. पण त्याच्या घरातील स्त्रीची अवस्था अजून जैसे थेच आहे. तिच्या डोईवरचा पदर आणि डोक्यावरची भाकरीची टोपली काही खाली येत नाही. ग्रामीण भागातील स्त्रियांवर आजही पारंपारिकतेचा पगडा आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही खेड्यामधून आजही बायकांची नेसणी काष्टी पातळाचीच असलेली दिसून येते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ७५% स्त्रिया निरक्षर आहेत आणि त्यांच्या ह्या निरक्षरतेमुळेच त्यांचे प्रश्न व त्यांचे जीवनमान अधिक बिकट होत चालले आहे.

खेड्यांमधून आजही स्त्रीचा जन्म म्हणजे पाप आहे असे समजले जाते. जन्म देणाऱ्या बाईला 'कन्यारत्न' झालेच तर तिचे हाल विचारू नयेत. स्त्रीला बाळंतपणानंतर आवश्यक असलेली विश्रांतीही केवळ मुलीला जन्म दिला ह्या सबबीखाली घेऊ देण्यात येत नाही. मुलगी झाली तर स्त्रीला बाळंतपणानंतर १०/१२ दिवसांनीच घरकामाला लागावं लागतं. बाळंतपणानंतर तब्येत सुधारण्यासाठी आवश्यक तो आहार तिला मिळत नाही. अशा वेळी ही बाई आपल्या नव्याने जन्मलेल्या कन्येला सकस दुधाचा आहार कोठून देणार? साहजिकच ती मुलगी लहानपणापासूनच आपल्या अन्नाला वंचित रहाते आणि परिणामी बालपणाच्या आजारांना बळी पडते.

ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न हा मोठा आहे. अगणित कष्ट, निकस आहार व मानसिक अस्वास्थ्य यामुळेच ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य ढासळते. दुखणे विकोपाला जाईपर्यंत ह्या स्त्रिया ते सोसत राहतात आणि अखेर ह्या दुखण्याला बळी पडतात. खेड्यामधून मुलीला लहानपणी आजार झाला तर मुलगी आहे ह्या सबबीखाली तिच्यावर कधीच उपचार केले जात नाहीत. बऱ्याच वेळा तिच्या आजाराकडे दुर्लक्ष केले जातं आणि त्याचे परिणाम भविष्यकाळात त्या मुलीला भोगावे लागतात. काही वेळा लहानपणी झालेल्या आजारामुळे ह्या मुलींमध्ये जन्माचे व्यंगही राहून जाते. याउलट स्त्रीने मुलाला जन्म दिल्यास तिची परिस्थिती चांगली असते. निदान तिला चांगला आहार मिळतो. मुलगा वंशाचा दिवा आहे. कुळाचा आधार आहे, कुटुंबाचे भविष्य आहे, त्याचे पोषण लहानपणीच चांगले झाले पाहिजे. ह्या भावनेतून जन्म देणाऱ्या स्त्रीच्या कुटुंबातील साऱ्या लोकांचे लक्ष केंद्रित असते. त्याला जराशी सर्दी झाली तरी त्यावर लागलीच उपाय केले जातात. पण हे सारं सुख नवजात मुलीच्या भाग्याला कधीच येत नाही.

मुलगी जेमतेम ४/५ वर्षांची होत नाही तोच तिच्यावर कुटुंबाच्या अनेक जबाबदाऱ्या येऊन पडतात. ज्या वयात तिने मोकळेपणाने खेळावं आपल्या जिज्ञासूवृत्तीने नवीन जगाचा अभ्यास करावा त्याच वयात त्या मुलीच्या पदरी १/२ लहान भावंडांना सांभाळण्याचं काम येतं. धड स्वत:चा तोल सांभाळू न शकणाऱ्या ह्या मुलीच्या खांद्यावर ५/६ महिन्याचं एक लहान मूल विसावलेलं असतं. स्वत:च्या केसांना बांधून ठेवता येत नसलेल्या वयात ह्या मुलींना दिवसभर गुरांच्या मागे धावाधाव करावी लागते. शाळेत जाऊन चार ज्ञानाच्या गोष्टी शिकण्याच्या वयात या मुली रानावनात गुरं राखत हिंडत असतात, तर कोणी पाण्याने भरलेल्या मोठमोठ्या कळशा डोक्यावर व कंबरेवर घेऊन साऱ्या कुटुंबाचा भार सांभाळण्याचा एक मोठा प्रयत्न करताना दिसतात.

कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असेल तर त्यातल्या त्यात परिस्थितीचे चटके मुलांपेक्षा मुलींनाच जास्त बसतात. अशा कुटुंबामध्ये अन्नाचा जास्त वाटा मुलांच्या वाटयाला जातो. मुलीने उरेल ते खावं, मिळेल ते पांघरावं, असेल त्याच्यात समाधान मानून जगावं हा नियम. केवळ पोटापुरते अन्न न मिळाल्यामुळे रातआंधळेपणासारखे रोग मुली व बायका यांना जास्त प्रमाणात होतात. काही ठिकाणी तर मुलींच्या आहाराची आबाळ इतकी होते, बिचाऱ्यांना कायमचा मतिमंदपणाचा रोग जडून जातो. इतके वाईट कुपोषण झाल्याची उदाहरणे देखील आहेत. अशा मतिमंद मुलींचे हाल लहानपणी आणि त्यानंतर तिच्या पुढच्या आयुष्यात कुत्रादेखील खाईनासे होतो. अशी असंख्य आयुष्ये मग, न उमलताच मिटून गेलेली दिसतात.

खेड्यातील कुटुंबातील स्त्रीला आजार होतच नाही असा पुरुषवर्गाचा समज असावा. आणि आजार झाला तर त्यावर तिने घरीच औषध-उपचार करावेत अशी पुरुषांची इच्छा असते. घरातील मुलगी अथवा स्त्री ही आजारी असल्यास तिला डॉक्टरकडे नेण्यात येत नाही. खेड्यातील एखाद्या मुलीला किंवा बाईला उपचारार्थ चांगल्या डॉक्टरकडे नेले तर ते तिच्या दुखण्याच्या शेवटच्या टप्प्यातच. तोपर्यंत तिच्यावर घरचेच किंवा गावातील एखाद्या जाणकार समजलेल्या व्यक्तीचे औषध/गंडा/दोरा वगैरे प्रकारचे उपचार केले जातात. मुंबईमधील एका सरकारी हॉस्पिटलमधील आकडेवारी पाहता ग्रामीण भागामधून भरती झालेल्या स्त्रियांचेच प्रमाण कमी आहे आणि ज्या भरती झालेल्या ग्रामीण स्त्रिया आहेत त्यांचे आजार अतिशय गंभीर स्थितीला पोचलेले आहेत व त्यांच्यापैकी वाचणाऱ्यांची संख्या ही कमी आहे.

खेड्यामधून लहानपणापासूनच मुलांच्या व मुलींच्या आहारात उजवं-डावं केलं जातं. घरात जरा काही विशेष खायला केलं असलं तर मुलाच्या वाट्याला उजव्या हाताने थोडं जास्तच वाढलं जातं. आणि मुलीला कमी मिळतं. सर्वसाधारणपणे मध्यम शेतकऱ्याला तूप हा दुर्मिळ पदार्थच, पण तोही वाढायचा झालाच तर तो मुलाच्या भाकरीवर जास्त वाढला जाणार आणि मुलीला त्या तुपाची फक्त चवच पहायला मिळणार. अगदी एखाद्या

भांड्यातील दही घुसळायचं असलं तरी वरचं लोणी हे कुटुंबातील मुलगा ह्या घटकाला मिळणार व उरलेलं खालचं दह्याचं पाणी पोरीच्या नशिबी येणार. मुलगी परक्याचं धन ज्याचं त्याला लखलाभ. असं म्हणून तिचं संगोपन करत रहायचं, आणि ह्या वागणुकीनेच तिचं संपूर्ण बालपणच करपवून टाकायचं.

खेडेगावातून मुलांच्या शिक्षणाबद्दल इतकी अनास्था बाळगली जाते. खेड्यांमधून पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ३० % इतके आहे तर स्त्रीयांच्या साक्षरतेचं प्रमाण ९ % आहे. इथली मुलगी शाळेत शिकून पुढे संसारच नशिबी आहे या सारखी दूषणं लावून मुलींना घरातील कामांना जुंपायचं. त्यामुळे मुलगी शाळेत गेली तर तिचे शिक्षण शाळेपुरतेच मर्यादित रहाते. घरी भावंडांना सांभाळणे, पाणी भरणे, शेण गोळा करणे, घर सारवणे, इ. कामांमध्येच तिचा वेळ जास्त जात असतो. एवढे सगळे सांभाळून एखादी स्त्री शिक्षण घेत असलीच तर तिच्यावर अन्य वेगळ्याच जबाबदाऱ्या येऊन पडतात. घरातील करती सवरती बाई आजारी झालीच तर तिच्या आणी ७ वी पर्यंत नेटाने शिकत असलेल्या ह्या मुलीला शाळा सोडून घरी बसवले जाते. खरे तर अशा परिस्थितीमध्येही तिचे शिक्षण चालू रहाणे महत्त्वाचे असते. अशा मुलींसाठी त्यांच्या सोयीनुसार सकाळ, दुपार, संध्याकाळ ह्या वेळांमध्ये २ तास असे अंशकालीन वर्ग भरवून त्यांना शिक्षण दिले पाहिजे. याबरोबरच फिरत्या मजुरांच्या मुलींसाठी फिरत्या शाळा ठेवल्या पाहिजेत. याउलट आपला मुलगा शिकत नाही, जास्त हुंदडतच आहे हे दिसत असलं तरी मुलीपेक्षा त्यालाच शिक्षण देणं पालकांना महत्त्वाचं वाटत असतं.

ज्या मुलींच्या शरीराची वाढ पूर्ण निकोप झालेली नाही, विवाहाची सामाजिक बाजू, पती-पत्नी संबंधामधील पावित्र्य, मातृत्वाची ओढ ह्याची तिची मानसिक तयारी झाली नाही अशा अवस्थेतच तिच्यावर संसाराची जबाबदारी पालकांकडून लादली जाते. वयाच्या १२/१४ व्या वर्षीच मुलींना संसाराच्या गाड्याला जुंपून हे माय-बाप मोकळे होतात. बिचारीला आपलं माहेर सोडून सासरी परत नवी-विटी नवा दांडू घेऊन स्वत:चं स्थैर्य मिळवण्याचा प्रयत्न करावा लागतो. तोपर्यंत तिच्यावर बालसंगोपनाची एक नवीन जबाबदारी येऊन पडलेली असते. त्यातून घरात नव्याने नांदायला आलेल्या सुना म्हणजे हुंडा देऊन आयती सापडलेली कामकरी यंत्रेच आहेत असा सासरच्यांचा एक समज असतो. विवाहित मुली व त्यांचे आई-बाप हे सारं सहन करतात म्हणून ा सासरचे अधिक छळतात. यासाठी स्वत: विवाहित स्त्रीने ह्या विरुद्ध बंड पुकारले पाहिजे तरच हे प्रकार हळूहळू बंद होतील.

ग्रामीण स्त्रियांची पहिली बाळंतपणेही जिवावरची दुखणीच असतात. अलिकडे आधुनिक वैद्यकाच्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत; पण त्या अगदी थोड्यांच्या वाट्याला पोचलेल्या दिसतात. खेड्यांतून बाळंतपणे ही घरीच सुईणीमार्फत केली जातात. सर्व्हे केलेल्या कांदळवाडा ह्या गावी ६० स्त्रियांपैकी फक्त २/३ स्त्रिया सोडल्या तर बाकी

साऱ्यांची बाळंतपणे ही घरीच झालेली आढळली. बाळंतपणानंतर औषध उपचाराची प्रथा खेड्यांमधून नाही. सकस आहार वगैरे काही नाही, मिळेल ते खावे व थोड्याशा विश्रांतीनंतर लगेच कामाला लागावे, हा इथला नियम. त्यातून जन्माला मुलगीच घातली तर हेही सुख त्या आईच्या पदरी नसते.

गर्भधारणेवरती आजही खेड्यांतील स्त्रियांचे स्वत:चे असे नियंत्रण दिसत नाही. केवळ वंशाला दिवा हवा, वारस मुलगा हवा म्हणून ५/७ मुलांनंतरही मुलगा होण्याची वाट बघणे, खेड्यांमधून अजूनही चालू आहे. ग्रामीण स्त्री ' मला आता मूल नको आहे हे आजच्या प्रगत परिस्थितीतही सांगू शकत नाही. ग्रामीण स्त्री म्हणजे गर्भधारणेचं एक यंत्र होऊन बसलेली दिसते.

कुटुंबनियोजनाच्या साधनांची माहिती ग्रामीण स्त्रीला नाही. केवळ भीतीपोटी व जुन्या काही रुढींमुळे स्त्रिया कुटुंबनियोजनाच्या साधनांना स्वत:पासून दूर ठेवताना दिसतात. कांदळवाडी ह्या गावात एकाही स्त्रीने अशा प्रकारचे ऑपरेशन करून घेतलेले आढळत नाही. कारण विचारल्यावर " गरज वाटत नाही, भीती वाटते, आम्हाला अजून मुलगा हवा आहे, अशा प्रकारची साधने वापरायला आवडत नाही, अशा शस्त्रक्रियेला पुरुषांची परवानगी नाही. अशी उत्तरे मिळाली. ह्याच गावामध्ये डिसेंबर महिन्यामध्ये आरोग्यविषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते. स्त्रियांचे आजार लक्षात घेऊन त्यातील एक दिवस स्त्रियांच्या तपासणीसाठी ठेवला होता. यासाठी खास डॉक्टरबाई आल्या होत्या. तरीही गावातील ४ बायका सोडून कोणीही बायका आपली अशी तपासणी करून घेण्यास तयार नव्हत्या. याचे कारण शोधल्यावर समजले की, येथील बायकांना अशा तपासणीची सवय नाही. बाळंतपण देखील घरीच होत असल्याने त्याही वेळी त्यांना अशी तपासणी करावी लागत नाही. यासाठी मुलांना शालेय शिक्षणातच ह्या बाबतचे ज्ञान देण्याची गरज आहे. शाळेतच त्यांना ह्या विषयाचे ज्ञान मिळाल्यास असा प्रकार घडणार नाही. कांदळवाड्यातील स्त्रियांना ह्या विषयाचे ज्ञान नाही. आणि म्हणूनच केवळ लाज व भीतीपायी ह्या बायकांनी तपासणी करून घेतली नाही. याचे मूळ कारण ग्रामीण भागातील स्त्रियांचा अशिक्षितपणा होय. निरक्षरता, अंधश्रद्धा, रुढी ह्यामुळे ग्रामीण स्त्रिया स्वत: स्वत:च्या विकासापासून दूर जात आहेत. त्यांच्यावर असलेले पुरुषांचे वर्चस्व कमी होणे महत्त्वाचे आहे.

मुलगी वयात आल्यावर तिच्यावरची बंधने अधिक कडक होतात. या बंधनांमुळे तिची कर्तृत्वाची भावना मरून जाते. घराबाहेर पडलेल्या मुलीने वेळेवरती किंवा वेळेच्या आधीच घरी यावे हा इथला संकेत. पण घरातील मुलाने बाहेर जाऊन कितीही गुण उधळले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाणार. मुलींच्या बाबतीत निसर्गाचा बाऊ करण्यापेक्षा घरातील वयाने व अधिकाराने मोठ्या असलेल्या स्त्रीने मुलीला आपल्या स्त्रीरक्षणाची कल्पना वेळीच दिल्यास ती समोरचे धोके टाळू शकेल व स्वत:चे स्वातंत्र्य कायम ठेवून स्वत:चा विकास साधणे तिला शक्य होईल.

" मुलींची अब्रू म्हणजे काचेचे भांडे, तडकले की सांधता येत नाही." अशा म्हणी वापरून स्त्रियांचे आजूबाजूचे वातावरण आधीपासूनच भयावह बनवले जाते. मुलीला सोबत असली तरी भय. एकटे असली तरी भय. गर्दीतही भयच तिच्या साथीला असते. खेड्यांमधून एका गावात साधारणपणे ४ ते ७ वी पर्यंतच शाळा असते. तेवढंच शिक्षण मुलीचे ठरलेले असते; कारण पुढील शिक्षण घेण्यासाठी गावाबाहेर जावे लागते आणि मुलीला गावाबाहेर पाठवणे हे पुरुषांच्या नियमावलीत बसत नाही.

ग्रामीण स्त्रीला स्वत:ची अशी ओळख नाही. तिची ओळख आहे ती फक्त कुणाची तरी मुलगी, आई, सून या नात्यांपुरतीच. देशाच्या ८०% मुली आया, सुना, या ग्रामीण भागात राहतात. ह्या स्त्रियांच्या आयुष्याचा प्रमुख व मोलाचा भाग हा आपल्या कुटुंबासाठी स्वयंपाक करण्यात, पाणी भरण्यात, लाकूडफाटा गोळा करण्यात जात असतो. या मुलींच्या जीवनाची सुरुवातही याच चक्रात होते आणि त्याच चक्रात त्यांचा अंतही होत असतो. हा चक्रव्यूह भेदून ग्रामीण स्त्रीने बाहेर येणे हे आजच्या युगात महत्त्वाचे आहे. तिने शिक्षणाचा आधार घेऊन स्वत:ची ओळख समाजाला करुन दिली पाहिजे.

कोणत्याही समाजाची उंची ही समाजातील शिक्षणावर अवलंबून असते. त्याला ग्रामीण समाज अपवाद असू शकत नाही. समाजातील सगळ्यात महत्त्वाची संख्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुटुंबाची उंची ही गृहिणीच्या उंचीवर अवलंबून असते. मुलाला सुसंस्कृत करायचे असेल तर प्रथम मुलाची आई सुसंस्कृत असणे महत्त्वाचे आहे. पुरुषांइतकेच स्त्रीला देखील स्वातंत्र्य व मोकळेपणाचे हक्क आहेत. स्त्री-पुरुष हे एक सारखे नाहीत, पण एकमेकांना पूरक आहेत. एकाशिवाय दुसऱ्याला अस्तित्व नाही. असे असूनही ही विषमता का ?

ग्रामीण स्त्रियांचं जीवन सुधारायचं असलं तर तेथील स्त्रियांची लग्न वयाची पातळी वाढवणे व शैक्षणिक पातळी वाढवणे महत्त्वाचे आहे. मुलीचं लग्न वय १८ हे फक्त कागदापुरतेच राहिले आहे. खेड्यातील कित्येकांना अज्ञानापोटी हा कायदा माहीत देखील नाही. मुलीचं लग्नवय जर वाढले तरच तिची जननक्रिया सुरक्षित राहील. १८ व्या वर्षापर्यंत तिची मानसिक व शारिरीक वाढ व्यवस्थित होईल. लग्नानंतर येणाऱ्या समस्यांना ती शारिरीक दृष्ट्या योग्य होईल. तसेच ग्रामीण मुलींचे शिक्षण हे कमीत कमी १० वी पर्यंत होणे महत्वाचे आहे. त्याशिवाय तिचा मानसिक व बौद्धिक विकास होणार नाही. तीच निरक्षर राहिली तर ती तिच्या संततीला कसले शिक्षण देणार ? त्यांचे संगोपन कसे करणार ? शिवाय स्त्री शिक्षणाचा अर्थ केवळ तिने आपल्या मुलांना शिकवावं, त्यांचं चांगलं संगोपन करावं असा नाही. शिक्षणामुळे तिचे तिलाही एक वेगळे व्यक्तिमत्त्व मिळू शकते. तिलाही स्वत:च्या जगण्याचा अर्थ कळू लागतो आणि त्यामुळे पुरुषांबरोबर स्त्री हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व समाजामध्ये वावरू शकते. त्यामुळे झाला तर समाजाचा फायदाच होणार आहे.

एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंबच शिक्षित होत असते. कमी वेळात, कमी खर्चात एखादं राष्ट्र शिक्षित करण्याचा हा सोपा मार्ग नेपोलियनने सांगितला आहे. या नीतीचा अवलंब आजच्या ग्रामीण भागातून होणे ही गरजेची गोष्ट आहे.

७ वी नंतर मुलीला गावाबाहेर शिकण्यासाठी न पाठवून तिच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करण्यापेक्षा तिला शाळेत पाठवून तिच्या अपुऱ्या ज्ञानाची पूर्ती करण्याचं काम पालकांनी करावे. एका गावातील सगळ्याच मुलींना गावाबाहेर शिक्षणासाठी पाठवलं तर मुलींचा एक चांगला समूह गावामध्ये तयार होऊ शकतो आणि तो बरंच काही करू शकतो. स्त्रियांच्या अब्रूला काचेचं भांडं बनवून स्वतःच त्याच्यावर दगड मारणाऱ्या पुरुषांनी स्त्रीची बौद्धिक पातळी ओळखून तिला शैक्षणिक स्वातंत्र्याचा लाभ करून द्यावा. त्यामुळे भविष्यात एखादे वेळेस मुलाऐवजी मुलगीच तुमच्या म्हाताऱ्या काठीचा आधार बनू शकेल. स्वातंत्र्यानंतर सरकारने स्त्री शिक्षणाचे बरेच कार्यक्रम राबवले, पण त्याला ग्रामीण स्त्रियांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. याचे मुख्य कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर ते म्हणजे पुरुषांनी ह्या स्त्रीयांमध्ये रुजवलेली असुरक्षिततेची भावना. १० वी पास व लग्न वय सक्तीने १८ झाल्यास ग्रामीण स्त्रियांची स्थिती निश्चितच सुधारेल. गावातील काही स्त्रियांच्या डोक्यावरच्या शेणाच्या पाट्या ह्यामुळे खाली येतील. त्यांच्या आरोग्यविषयक समस्याही कमी होतील. स्वत्वाची जाणीव निर्माण होऊन गावांमध्ये पुरुषांबरोबर स्त्रीचे जिते जागते अस्तित्व आपल्याला पहायला मिळेल. घराच्या दारामागून उत्तर न देता त्याही स्त्रिया समोर येऊन आपली मते मांडू शकतील. समाजाला एक नवीन पालवी फुटून समाजाच्या प्रगतीच्या वेग वाटेल.

ग्रामीण स्त्रियांचे वर उल्लेख केलेल्या प्रश्नांशिवाय आणखी बरेच प्रश्न आहेत. ग्रामीण स्त्रियांनी हे प्रश्न शोधून त्यांची उत्तरे मांडण्याचा प्रयत्न करायला हवा. यासाठी आपणही त्यांना सहकार्य दिले पाहिजे. नाही तर कालांतराने ग्रामीण समस्यांना एखाद्या यक्षप्रश्नाचे स्वरुप प्राप्त होईल.

• • •

# संक्रमणावस्थेतली नोकरी करणारी स्त्री

श्रीमती मेधा कानेे

आज आपण इथे सर्वजणी जमलो खऱ्या. पण इथे येण्यासाठी किती आटापिटा केला त्याची आठवण येते. विचार करावासा वाटतो. या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळालेल्यापैकी दोघी-तिघीजणी काही काही दिवसांपूर्वी भेटल्या होत्या. या कार्यक्रमाचा विषय निघाल्यावर ते जमवणं, निभावणं किती अवघड आहे ते प्रत्येकीनं सांगितलं आणि हे काही फक्त दोघी-तिघींच्याच बाबतीतील नाही तर सर्वांच्याच बाबतीतले वास्तव आहे. सर्वांच्याच म्हणजे अर्थातच सर्व स्त्रियांच्या. पुरुषांच्या नव्हे.

इथे जमलेल्या आपल्या मित्रांना इथे येणं आपल्याइतकं अवघड नक्कीच गेलं नसणार. कदाचित त्यांची बॅग त्यांना घरातून भरून मिळाली नसेल. त्यांना मागचं काही बघावं लागलं नसेल. आपल्याला तीन चार दिवस घर सोडून निघायचं तर अगणित गोष्टींचा विचार करावा लागतो. नियोजन करावं लागतं. दह्यादुधापासून ते अगदी बॅंकेच्या कामापर्यंत. घर सोडण्याआधीचा हा त्रास आणि नंतर परत घरी गेल्यावर घरची घडी पुन्हा बसवण्याचा त्रास. हा शारीरिक त्रास आपल्या अंगवळणी पडलेलाच असतो. पण मानसिक त्रास ? खरे तर त्याचीही सवय होऊन जाते.

मुळात नोकरी, व्यवसाय या निमित्ताने घराबाहेर पडणे हेच आपल्याला अपराधीपणाचं वाटत असतं. कारण आपण ज्या वातावरणात, संस्कारात वाढलो आहोत त्या वातावरणानं, संस्कारांनी, आपल्याला स्वत:कडेच पुरुषी दृष्टीने बघायला शिकवलंय, आणि पुरुषाची दृष्टी स्त्रीकडे माणूस म्हणून व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा एक उपयुक्त यंत्रणा म्हणूनच पाहणारी. हीच चौकट स्त्रीच्या आयुष्याभोवती इतकी पक्की झाली की ती स्वत: या चौकटीत अडकूनच गेली. कधी या चौकटीची इतकी सवय झाली की चौकटीचा जाच वाटेनासा झाला. कधी चौकटीत जीव गुदमरला पण बाहेर पडण्यासाठी चौकट तोडण्याचं बळ नव्हतं. कधी चौकट मोडावीशी वाटली पण चौकटीबाहेरच्या जगाबद्दल विश्वास नव्हता. त्याहून आतच सुरक्षित वाटत होतं. पण एकदा मात्र सारं बळ एकवटून चौकट मोडून बाहेर आल्यावर काय झालं ? बाहेरच्या जगाचा आवाका पाहून क्षणभर बावरायला झालं. पण मग मात्र ते बाहेरचं जग मोहून टाकणारं, चैतन्यशील, संजीवक वाटलं आणि मग त्याच त्या चौकटीत राहण्यापेक्षा बाहेरच्या जगात मिसळावसं वाटलं. बाहेरच्या जगातले अनुभव घेत घेत चौकटीच्या कक्षा विस्तारु लागल्या.

आज असं दिसतं की घर आणि व्यवसाय दोन्ही सांभाळताना स्त्रीची अगदी ससेहोलपट होते. इतकी की ती धड कुठेच मन लावून काम करू शकत नाही. मगाशी

म्हटल्याप्रमाणे याला कारण स्त्रीचा स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोन. पुरुषांइतकच तिनंही स्वत:ला काही बाबींसाठी गृहीत धरलंय.

कामाच्या ठिकाणी ठराविक वेळी पोचायचं तर घरातली काम पारंपारिक पद्धतीने करून कसं चालेल ? स्वयंपाकघरात फ्रीज, मिक्सर आले. स्वयंपाकघराचे रुप बदलले. पण घरातल्या बाईचं मन बदललं नाही अणि घरातल्या इतर माणसांचंही नाही. नवऱ्याला बाहेरच्या वर्तुळात आपल्या पत्नीची ओळख ही ऑफिसर आहे किंवा मोठ्या पदावर आहे अशी करून द्यायला आवडत असेल कदाचित, पण हाच नवरा तिच्या घरातला कामातला किती वाटा उचलतो. तिच्या नोकरी, व्यवसाय क्षेत्रासाठी तिला अधिक वेळ देण्याची गरज असेल तर जोडीदार म्हणून त्याचा सहभाग किती असतो. तासभर काम करत बसलेल्या बाईला नवऱ्यानं चहा करून दिला तरी स्वत:च्या नोकरी, व्यवसाय क्षेत्रात बाईने गाजविलेल्या कर्तृत्वाचं घरात खरोखर किती कौतुक होतं ? आणि कौतुक असलंच तर बऱ्याचदा लहान मुलाचं त्याच्या पालकांनी करावं तसं ते कौतुक असतं. बरोबरीच्या नात्यानं, मैत्रीच्या नात्यानं ॲप्रिसिएशन किती होतं ?

आमच्या एका कार्यालयीन मिटींगसाठी काही बाहेरच्या मंडळींना आमंत्रित केलं जातं. या मिटिंग्ज बाहेरगावीसुद्धा होतात. तर एक बाई, ज्या स्वत:च्या क्षेत्रात कर्तबगार होत्या. त्या जेव्हा जेव्हा सभेला यायच्या तेव्हा तेव्हा त्यांचा नवरा त्यांच्याबरोबर यायचा. सभेचा वेळ अर्थात एक तास असला की तो तेवढा वेळ बाहेर बसून रहात असे; कारण त्याला आत बसायला परवानगी नव्हती आणि सभा संपली की त्या बाई जराही न रेंगाळता तडक निघून जात असत. हे पहिल्या खेपेला झालं तेव्हा आम्ही विचार केला बाईच्या सोबतीला आला असेल नवरा. पण पुढे अनेकदा घडलं तेव्हा ते फार अप्रशस्त वाटलं. खरं तर स्वत:च्या व्यवसायाची मागणी पुरविण्यासाठी स्त्रीनं स्वत: धीट बनलं पाहिजे. पहिल्यावेळी सोबतीची गरज वाटली तरी पुढच्या वेळी सोबतीशिवाय प्रवास करता यायला हवा. आईलाच घडोघडी वडिलांची सोबत लागते असं पहाणारी लहान मुलगी स्वत: कितपत स्वावलंबी होईल वडील घडोघडी आईला आधार देतात असं पाहणारा लहान मुलगा पुढे स्वत:च्या पत्नीचं स्वावलंबीपण कितपत खपवून घेईल ? नोकरी व्यवसाय करताना घरात काही तडजोडी कराव्या लागल्या तर अपराधी वाटण्याऐवजी या तडजोडी करणं कसं जरुरीचं आहे हे मुलांना समजावून सांगणं फार महत्त्वाचं आहे. माझी एक मैत्रीण प्रसार माध्यमांसाठी बरच लिखाण करते. अर्थात घरात काही तडजोडी करूनच. पण अगदी मुलगी लहान असल्यापासून तिनं मुलीला हे पटवून देण्याचा प्रयत्न कला आहे की हे लिखाण करणं कसं चांगलं आहे, महत्त्वाचं आहे. मुलीला त्यापैकी जे कळेल, आवडेल ते वाचून दाखवणं. ती स्वत: लिहायला बसल्यावर मुलीला स्वत:ची कामं स्वत:च करायला सांगून शाबासकी देणं, घरातली मंडळी सर्व कामात वाटा उचलतात. म्हणून हे लिखाण जमू शकतं असं वेळोवेळी व्यक्त करणं. अशामुळे तिच्या मुलीला आपल्या मैत्रिणीच्या आयांपेक्षा आपली आई निराळी आहे. काहीतरी विशेष गुण आपल्या आईपाशी आहे याची

जाणीव झाली. एक दिवस गंमतीने या मुलीची आजी मुलीला म्हणाली," बघ मी या पुरणपोळ्या केल्या. तुझी आई करते का ?" त्यावर मुलीने उत्तर दिले, " पण माझी आई स्क्रिप्ट लिहिते." - - - - - - - - - - - - - - - - -

खरं तर ती आजीसुद्धा स्क्रिप्ट लिहू शकली असती, नोकरी व्यवसाय करू शकली असती. पण ती बिचारी पुरणपोळ्यांपुरतंच स्वत:च कौशल्य दाखवू शकली. घरातली कामं उत्तम रीतीने करण्यात कौशल्य नक्कीच आहे. मग जी स्त्री अनेक आघाड्यांवर उत्तम तऱ्हेने घर सांभाळू शकते तीच स्त्री घराबाहेरचं क्षेत्र का नाही सांभाळू शकणार ?

पण घराबाहेर काही वेगळंच दिसतं. एक तर नर्स, शिक्षिका आणि हवाईसुंदरी, रिसेप्शनिस्ट अशा नोकऱ्या ती करते. या नोकऱ्या म्हणजे बाईकडून घरात जी अपेक्षा केली जाते त्याच अपेक्षांची बाहेर मागणी करणाऱ्या असतात. पुन्हा ऑफिसात पुरुष सहकाऱ्यांचे आरोप ठरलेले. बायकांना कामं करायला नकोत. भरपूर सुट्या पाहिजेत. एका ऑफिसात एका बाईंना लागोपाठ रजा घ्यावी लागली. रजेचं कारण अर्थातच मुलांची आजारपणं. त्यांच्या डिपार्टमेंटमधले त्यांचे पुरुष सहकारी यावरून बाईंना टोमणे मारू लागले. यावर बाईंनी सरळ त्यांना विचारलं की," काहो घरी मुलं आजारी पडली की तुम्ही रजा घेता की तुमच्या बायकोला रजा घ्यायला लावता ?"

या सर्व गोष्टींची कारणमीमांसा केली की उत्तर एकच मिळतं. हे सारं बदलण्यासाठी तसे संस्कार मुळातूनच व्हायला हवेत. तसं शिक्षण, वातावरण मिळायला हवं. समानतेसाठीचं शिक्षण आणि प्रामुख्याने त्याचाच विचार करण्यासाठी आज आपण इथे जमलो आहोत. पण आपल्यासारख्या स्त्रिया; ज्यांच्यावर हे समानतेचे संस्कार झाले नाहीत; पण स्वत: अनुभव घेता घेता आपल्याला आपल्यावरच्या संस्कारांचा फोलपणा अपुरेपणा लक्षात आलाय. आपण स्वत:ला बदलू बघतोय; पण कुटुंबात, समाजात राहून आपण एकटं बदलणं शक्य नाही. म्हणून आपल्याला आपला भोवतालही बदलायचाय.

यासाठी आपल्याला काही गोष्टी आवर्जून करायला हव्यात.

१. आपल्या घरातल्या लहान मुलामुलींवर समानतेचे संस्कार करण्यासाठी आपल्याला तसं वागलं पाहिजे.

२. स्त्रीच्या नोकरी, व्यवसायाचं महत्त्व घरातल्या मंडळींना पटवून देणे. त्यासाठी घरातल्या कामाच्या पारंपारिक अवस्थेत बदल करणं.

३. घर आणि नोकरी या दुहेरी काचात अडकलेले असूनही काही ठाम भूमिका घेऊन आपली व्यावयायिक निष्ठा टिकवण्याचा प्रयत्न करणं. उदाहरणार्थ आपल्या व्यवसायाच्या विषयाबद्दलचं अद्ययावत अधिक ज्ञान मिळविणं.

४. स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीची बरीचशी जबाबदारी समाजावर आणि पुरुषप्रधान व्यवस्थेवर असली तरी आपण स्वत: प्रतिष्ठेविषयी, आपल्या स्थानाविषयी जागरुक राहणे. विचार परिवर्तनाशी बांधिलकी मानणे.

५. घरात आणि घराबाहेर भेटणाऱ्या इतर स्त्रियांशी 'मैत्रिणीचं नाते प्रस्थापित करणे. सासू-सून, जावा-जावा, नणंद-भावजय, बॉस-असिस्टंट या नात्यांच्या पारंपारिकतेतून बाहेर पडून निराळं मैत्रीणपणाचं नात प्रस्थापित करणं. त्यासाठी एकत्र भेटल्यावर केवळ साड्या-दागिने या विषयांवर गप्पा न मारता घर-व्यवसाय या विषयांवरच्या आपापल्या अनुभवांची मोकळेपणे देवाण-घेवाण करणे, त्यातून परिवर्तनासाठी बळ मिळवणे.

६. स्वत: स्वतंत्र होतानाच इतरांच्या स्वतंत्रपणे जगण्याच्या हक्काची जाणीव बाळगणं आणि नाती समृद्ध करणं. 'मी गुलाम राहणार नाही आणि कुणालाही गुलाम करणार नाही.' हे भान ठेवणे.

७. स्वत:च्या सन्मानाची जाणीव ठेवताना आपल्या 'एक उपयुक्त यंत्रणा, भोग्य वस्तू,' या प्रतिमेविरुद्ध लढणं.

व्यक्तीचं सौंदर्य हे केवळ रंगावर वा सुडौलपणावर अवलंबून नसतं. तर व्यक्तीच्या डोळ्यात माणूसपणाचं तेज, चेहऱ्यावर बुद्धीची चमक हवी. म्हणूनच डॉ. लोहियांनी म्हटले आहे की 'गुलाम कधीच सुंदर असत नाही.'

८. परिवर्तनवादी विचारांशी, चळवळीशी संवाद ठेवणे.

शेवटी हे विचार मैत्रिणीपर्यन्त पोचवण्याची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार आणि माणूस म्हणून स्त्रीला सन्मानानं जगता यावं, यासाठी कार्य करणाऱ्या विचारवंतांचं कृतज्ञतापूर्वक स्मरण. आणि हा विचार संपवताना आपल्यासारख्याच दुहेरी निष्ठेत अडकलेल्या एका स्त्रीबद्दल. लिव्ह उलमन नावाची प्रख्यात अभिनेत्री; हिने इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' या नाटकातली नोरा-रंगभूमीवर पहिल्यांदा साकार केली. या अभिनेत्रीने इगमार बर्गमन या विख्यात दिग्दर्शकाच्या चित्रपटात उत्तम भूमिका केल्या. लिव्ह उलमनचे आत्मचरित्र आहे, 'चेंजिंग' या पुस्तकात घर आणि व्यवसाय या दोन्हीत मनाने गुंतलेल्या स्त्रीची प्रतिकूल सामाजिक अवस्थेत होणारी तडफड फार समर्थपणे व्यक्त झाली आहे. लोकप्रियतेच्या, कलात्मक निर्मितीच्या नशेत रहाणाऱ्या या अभिनेत्रीला नाटक-चित्रपटांसाठी घरापासून दूर गेल्यावर आपल्या लेकीची जीवघेणी आठवण येत असे. आणि नाटक, चित्रपट सोडून लेकीच्या सहवासात घरी रहावं तर नाटक-चित्रपटातल्या भूमिका खुणावत रहायच्या, अस्वस्थ करायच्या आणि तिचं सारं आयुष्य हा एक चेंजिंग पिरियडच राहिला. संक्रमणाचा काळ. आपणही याच संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहोत. ही अवस्था पार करायचं बळ आपल्यात रहावं आणि पुढच्या पिढीतल्या मुलींसाठी आपण अधिक समृद्ध, प्रगत समाजव्यवस्थेचा ठेवा द्यावा असं वाटतं.

# अनुसूचित जातीच्या मुलींचे शिक्षण

श्रीमती सुगंधा शेंडे

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमाची आखणी करताना 'समानतेसाठी शिक्षण मुलींचे शिक्षण' हा विषय कालपरत्वे संयुक्तिकच. या विषयाचे पोटविभाग करून शीर्षके प्रस्तावित केली. ती भारतीय घटनात्मक तरतुदीला अनुसरून असलेली पाहून संयोजनकर्त्यांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन केल्याविना राहवत नाही. माझा विषय आहे –

**'अनुसूचित जातींच्या मुलींचे शिक्षण'**

**'अनुसूचित' शब्दाची संकल्पना**

या शीर्षकात अनुसूचित हा शब्द प्रमुख आहे. म्हणून 'अनुसूचित' या शब्दामागील संकल्पना लक्षात घेणे जरुरीचे आहे. अनुसूचित हा शब्द Scheduled या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. याचाच अर्थ 'ठराविक' असा होतो. जे गावकुसाबाहेर राहतात, जे गलिच्छ धंदे करतात, असे लोक ज्यांनी आर्यांचे प्रभुत्व नाकारले, ज्यांनी बौद्ध धर्माचा त्याग केला नाही असे लोक. डॉ. बी. आर्. उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांनी 'अस्पृश्य मूळचे कोण' या संशोधनपर ग्रंथात हे सर्व लोक 'ब्रोकन मेन' म्हणजेच ज्यांचे जीवनच भंगलेले आहे, आशाआकांक्षा मृत झालेल्या आहेत अशा विविध जाती गटांचे समूह! अशा समूहांना वेगवेगळ्या काळात, देशाच्या वेगवेगळ्या भागात 'बहिष्कृत पंचम्, अस्पृश्य, परिया, अतिभूद्र, अंत्यज, अवर्ण, नामशूद्र, हरिजन आणि सांप्रतच्या काळात दलित' म्हणून संबोधि ले जाते.अनुसूचित जमाती किंवा निग्रो हे घरात दारात काम करायला चालतात. परंतु 'अनुसूचित जातीच्यांचे तोंड पाहणे देखील अशुभ मानले जाते. 'मनुस्मृती' मध्ये यांचे संबंधी काही नियम घालून दिलेले आहेत. जसे चुकून जरी विद्या यांचे कानी पडली, तर कानात तापलेले शिसे ओतावे. चुकून विद्या विषयक बोलले गेले, तर त्यांची जीभ छाटून टाकावी. रस्त्यावर चालताना पावले उमटू नयेत म्हणून त्यांनी कमरेला बांधलेल्या फांदीने ते मिटवायचे. थुंकायचे झाल्यास गळ्यात अडकवलेल्या गाडग्यातच थुंकायचे. जेथे विद्या शिकण्याची मनाई तेथे सारेच खुंटले. यातनांचे भोग भोगत असता, पोट जिथे रातंदिवस चिंता, त्यांना विद्येचे भान रहावे ते कसे? Suffering depresses vitality हे सॉमरसेट मॉम या तत्त्वचिंतक लेखकाचे म्हणणे किती सार्थ आहे याची प्रचीती येते. ही अवस्था काय एका पिढीची – एका युगाची? छे, पिढ्यान् पिढ्या! युगानुयुगे! यांतून बाहेर पडायला, मोकळा श्वास घ्यायला ना दार ना झरोका!

## मुलींसाठी पहिली शाळा

स्वतंत्र भारताच्या घटनेद्वारे ही दुरवस्था पार पुसून टाकली आहे. परंतु तथाकथित हिंदूंच्या मनातून गेलेली नाही.

स्त्री शिक्षणाचे आद्य प्रवर्तक महात्मा जोतीराव फुले यांनी दोन्ही बाजूंनी कामाला प्रारंभ केला. एकीकडे अस्पृश्यांसाठी शाळा काढली. दुसरीकडे मुलींसाठी शाळा काढली. या दोन्ही शाळांची या देशातील पहिल्या शाळा म्हणून नोंद घेतलेली आहे. अनुसूचित जातींच्या मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळाली. म. जोतीरावांच्या सुविद्य पत्नी सावित्रीबाई यांनी, लोकापवाद झेलीत, शेणगोळे खात या शाळा चालविल्या आणि संधी मिळाली की पायाखालची धूळदेखील मस्तकावर जाऊन बसते हे लक्षात आणून दिले.

## स्वतंत्र भारतीय घटनेत तरतूद

बाबासाहेब आंबेडकर, म. फुले यांना आपले गुरू मानीत. त्यांनी भारतीय घटनेचे शिल्प घडविताना धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ याबाबतीत भेद मानला जाऊ नये (कलम १५), सक्तीचे सार्वत्रिक मोफत शिक्षण (कलम ४५) अशा प्रकारची आम भारतवासियांचे कल्याण साधणारी, अनुसूचित जाती - जमातीसाठी शिक्षणाची दारे खुली करणारी, शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्यास वाव देणारी मार्गदर्शक तत्त्वे अंतर्भूत केली. ही घटना सन १९५० मध्ये लागू करण्यात आली. यानुसार अस्पृश्य निवारण कायदे तयार झाले.

## पहिली समिती

सन १९५८ मध्ये प्रख्यात बुद्धिनिष्ठ समाजकार्यकर्त्या दुर्गाबाई देशमुख यांचे अध्यक्षतेखाली महिलांचे प्रश्न हाताळणारी पहिली समिती निर्माण करण्यात आली. या समितीने अनुसूचित जातीच्या मुलींचा विचार केलेला दिसत नाही. प्रा. कुंदा दाभोळकर यांनी अनुसूचित जातींच्या मुलींच्या प्रश्नावर पुढील विधान नमूद केलेले दिसते.

'भारत व इतर राष्ट्रांची साक्षरता लक्षात घेता, स्त्री शिक्षणामध्येही शिक्षणात मागासलेल्या वर्गातील भगिनींकडे जास्त लक्ष दिले जावे ही आजच्या स्त्री शिक्षणामधील गरज आहे. (प्रा. कुंदा दाभोळकर लिखित भारतीय स्त्री शिक्षण (पृ. १०५)

## व्याख्या

भारतीय संस्कृतीचे बरे - वाईट परिणाम भारतातील जनतेवर झालेले आहेत. हे सारे लक्षात घेऊन सर्वसामान्य मुलींच्या शिक्षणाची व्याख्या करायची झाल्यास असे म्हणता

येईल की, 'जे शिक्षण भारतीय संस्कृतीच्या, कालमानपरत्वे कुसंस्कार ठरलेल्या जोखडातून मुक्त करील, ते मुलींचे शिक्षण.' परंतु समाजापासून वंचित ठेवलेल्या, अमानुष अमानवी जीवन जगणाऱ्या पालकांच्या पारंपरिक कचाट्यातून अनुसूचित जातीच्या मुलींना मोकळीक देईल, समाजात, राष्ट्रात प्रतिष्ठा देईल ते खरे अनुसूचित जातींच्या मुलींचे शिक्षण होय.

**विश्वासाची वाण**

स्वतंत्र भारताच्या घटनेत अनुसूचित जातींच्या लोकांचे, त्यांच्या मुलाबाळांचे हित साधण्याचे नमूद केले आहे, ही शुभवार्ता त्यांचेपर्यंत पोहोचवण्याचे काम तरी कुणी केले आहे काय? ना वाचता येत, ना कानावर पडत. आलेच कानावर चुकून माकून तरी नक्की काय करायचे हे कळत नाही. निदान सक्तीचे मोफत शिक्षण खऱ्या अर्थाने अमलात आणले गेले असते तरी बरेच काही साधणे शक्य झाले असते. परंतु यावर तरी या पालकांचा विश्वास बसावा तो कसा? कारण, आजवर झालेच असेल काही तर एकच. या ना त्या नावाखाली गांजवणूक आणि लुबाडणूक. विविध उपजातींच्या गलबलाटात परस्परांवर विश्वास ठेवणेच कठीण झाले आहे.

पितृसावर्ण्यपद्धतीमुळे मुलगाच वारस ठरतो. मुलगी परक्याचे धन समजली जाते. अशी मुलगी जगली काय नि मेली काय सारखेच! ना खंत ना खेद! जन्मत:च इतके दूध पाजायचे की, दम कोंडून तिला मृत्यू यावा. गर्भजल परीक्षणावर बंदी घालण्याचा कायदा लक्षात घ्या. यावर ज्येष्ठ श्रेष्ठ व्यक्ती विरोध करताना दिसतात. 'मातृदेवोभव' म्हणून स्त्रीला अग्रस्थान, तर कधी स्त्री हत्या म्हणजे क्षुल्लक गुन्हा असे मनुस्मृतींत नमूद केलेले आढळते. हीच भावना 'झिरपत' अनुसूचित जातींच्या मुलींच्या पालकांपर्यंत जाऊन भिडली असेल आणि पर्यायाने रक्तात भिनली असेल तर नवल नाही.

**जाणीवशून्यता**

मॅडम मरिआ मॉंटिसरी या स्वत: व्यवसायाने डॉक्टर होत्या. त्यांना अगदी सकाळी घराबाहेर पडणारे स्त्री-पुरुष दिसले. हे सारे कामगार! त्यांच्यामागे त्यांची छोटी छोटी मुले धुळीत खेळताना, लोळताना दिसली. हा काल मुलांच्या आयुष्याला आकार देण्याचा, सुसंस्कार घडविण्याचा ! ही मोलाची वर्षे अशी वाया जात आहेत याची मॅडम मॉंटेसरींना प्रकर्षाने जाणीव झाली. त्यांना ही जाण कृतीत उतरवली. वर्षे २।।–३ च्या वयोगटात येणाऱ्या बालकांसाठी शाळा काढली. आजही मॉंटिसरी शाळा सुरू आहेत. एवढी लक्षणीय प्रक्रिया डॉ. मॉंटिसरीच्या हातून का घडली? याचे कारण एकच! त्यांना झालेली जाणीव. जेथे अज्ञानच अज्ञान, तेथे 'जाणीव' नावाची वस्तू अनुसूचित जातींच्या पालकांना कशी उमगावी? उमगली तरी उपयोग काय?

अनुसूचित जातींमध्ये स्थलकालमानाने अनेक आणि विविध जातींचा समावेश झालेला आढळतो. विदर्भात महार बौद्ध मुली शिकू लागलेल्या दिसतात. नगण्य स्वरूपात गलिच्छ धंदा करणाऱ्यांच्या पाल्यांस पाचव्या वर्गापासूनच विद्यावेतन मिळते. परंतु त्याची दखल घेतली जात नाही, असे दिसते. एखादीच मुलगी अभावाने शिकताना आढळते. मातंग तर मुळात कलावंत, वाद्यवृंदात प्रवीण. शिंदीच्या पानांपासून फडे बांधणे, टोपल्या बनवणे ते उत्तम प्रकारे जाणतात. पण मुलींना शाळेत पाठविण्याच्या बाबतीत अत्यंत उदासीन. भंगी समाजाचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केलेला आहे. शहरी वातावरणात पोसली जाणारी ही जात शिक्षणाचे बाबतीत मुद्दाम बेफिकीर. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, 'ज्या धंद्यामुळे आम्हाला अस्पर्शनीय ठरविले गेले, दूर ठेवले गेले असा कोणताही व्यवसाय आम्ही करणार नाही. गावात ढोर मेले की ते आम्ही गावाबाहेर ओढत न्यायचे, ते का? यांच्या घरातली म्हातारी गेली, तर सांगतात का आम्हाला?' हे विचार भंगी समाजपर्यंत पोहोचलेले दिसत नाहीत.

गावातले जनावर गावाबाहेर न नेल्यामुळे या लोकांचे किती नुकसान झाले हे चवीने सांगणारे लोक आजही आढळतात.

## शैक्षणिक वारे

या भारत भूमीत लोकशाही घटनेचे बीज रुजवले गेले. मंदगतीने का होईना त्याची वाढ होत आहे. स्त्री शिक्षण, अनुसूचित जाती - जमातीच्या मुलींचे शिक्षण असे विषय चर्चिले जाऊ लागले, हेही नसे थोडके! स्त्री शिक्षणाचे दृष्टीने आपले महाराष्ट्र राज्य इतके उदारमतवादी की, बारावीपर्यंत मुलींचे शिक्षण विनामूल्य केल्याचे शासनाकडून जाहीर करण्यात आले. आता तर सर्वच स्तरांवर मोफत केले जावे असेही विचारवारे असल्याचे ऐकिवात आहे. मोफत शिक्षण म्हणून नाव बदलले जाते. परंतु संचालक गण पालकांवर आर्थिक भार घालीतच असतात.

## अर्थार्जनासाठी पूर्वतयारी

मुली शाळेत गेल्या म्हणून काय पोट भरत असते? म्हणून शाळेत पाठवण्यापेक्षा सोबत मजुरीला घेऊन जाणे, घरी छोट्या भावंडाला सांभाळणे ही कामे पालकांना अधिक मोलाची वाटतात. एकूण शिक्षण आणि अर्थार्जन यांची सांगड शिक्षणात घातली गेलेली नाही याचे अनुसूचित जातींच्या मुलींच्या पालकांना वैषम्य वाटत असले तर नवल नाही. मूलोद्योगी शिक्षण पद्धतीमध्ये शाळेच्या कालावधीत धंदेशिक्षणाचाही अंतर्भाव केलेला होता. विज्ञान काळाच्या या युगातही अर्थार्जन करता येईल अशी काही कामे, – त्याला वयोगटास झेपतील, शिक्षणाला पूरक ठरतील, – शाळांमधून का केली जाऊ नयेत? कार्यानुभव हा विषय पोटतिडकीने शाळाशाळांमधून शिकविला गेला तर बरेच काही साध्य होण्यासारखे आहे.

## शालेय परिसरातील मानसिक अवस्था

अनुसूचित जातीच्या ज्या थोड्याफार मुली शाळेत जातात त्यांना कोणकोणत्या दिव्यातून बाहेर पडावे लागते वा तोंड द्यावे लागते याचा विचार अप्रस्तुत होणार नाही. एक तर शाळेत जाऊन इतर मुलींमध्ये बसणे हेच मोठे दिव्य असते. कारण समाजात अशा अनुसूचित जातींच्या लोकांशी दैनंदिन जीवनात होत असलेले व्यवहार पाहून अनुसूचित जातीची मुलगी खचलेली असते. त्यानंतर तिच्याकडे दुराव्याच्या दृष्टीने वर्गातल्या मुलींच्या - विद्यार्थ्यांच्या वळलेल्या नजरा! एखाद्या धिट्कलीने शिक्षकांनी वर्गाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी हात वर केला आणि उत्तर द्यायची संधी मिळालीच, तर तिची अशुद्ध भाषा! ती साऱ्या वर्गाचा तिरस्काराचा, हास्यापद विषय बनते. अशा परिस्थितीत ती गलितगात्र झाली तर दोष द्यायचा तो कोणाला? मॅक्जिम गॉर्की 'दाही दिशा' या कादंबरीत म्हणतात, 'खानदान कुळातला पुस्तकामधून शिकतो, तर मी माझ्या जखमांमधून शिकतो हेच खरं..... पण, त्याची पाठ माझ्यापेक्षा पांढरी असली तरी हुशारी माझ्यापेक्षा जास्त नसते.' ....आणि अशाच विचाराने मनातून खचलेली मुलगी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अंगच्या हुशारीमुळे शिक्षकाची आवडती बनते. परंतु हा सामान्य नियम नव्हेच.

## वसतिगृह

महाराष्ट्र राज्याने 'पंचायत राज्य' पद्धती स्वीकारली. पाव शतक लोटले. या कालावधीत अनेक फायदे आम जनतेला मिळाले. गावोगावी शाळा निघाल्या. मुलांप्रमाणे मुलीही शाळेत जाताना दिसतात. काही अंतर पायी चालत जाऊन शाळेत हजर होणे मुलींना परवडत नाही. तशात अनुसूचित जातींच्या मुली त्यांच्या आईबापांच्या नसतात अशी पारंपरिक भावना. हा धोका पत्करण्यापेक्षा मुलींना शहरातील वसतिगृहात शिकायला ठेवणे अधिक सुरक्षित अशी मनोधारणा अनुसूचित मुलींच्या पालकांची झालेली दिसते. खास अनुसूचित जाती - जमाती आणि मागास मुलींसाठी अशी वसतिगृहे महाराष्ट्र शासन अनुदान देऊन चालवीत आहे. शिक्षणात प्राविण्य संपादन करणाऱ्या अनुसूचित जाती-जमातींच्या मुलींसाठी विभागीय स्तरावर शासन स्वतःच वसतिगृहे चालवित आहे. हल्ली या वसतिगृहातील संचालकत्व निरुत्साही करणारे असल्याचे ऐकिवात येते. ती कोणती बाब असावी असे साहजिकच वाटण्यासारखे आहे. या वसतिगृहातील शिकाऊ मुलींच्या हातात महिन्याकाठी काही रक्कम देण्यात येते. त्या रकमेचा विनियोग भोजनादी बाबींवर करायचा असतो. हातात आलेल्या पैशाचा विनियोग यथायोग्य होईलच असे सांगता येत नाही. शिवाय भोजनासाठी मुलीच्या जातीने कुठे आणि कसे खाणावळीत जायचे? हातात पैसा येतो म्हणून मुली, त्यांचे पालकसुद्धा, खूष असावेत. परंतु उदयोन्मुख समाजातील मुलींच्या मनावर कोणत्या प्रकारचे संस्कार, ही रक्कम घडवून जात असेल हा खरोखरीच चिंतेचा विषय आहे. असो.

एकंदरीत शहरातील अनुसूचित जाती - जमातीच्या मुलींसाठी चालविली जाणारी वसतिगृहे अतिशय फायद्याची असतात. या वसतिगृहात मागास मुलींबरोबर आर्थिकदृष्ट्या मागास मुलींनाही प्रवेश दिला जातो. अनुसूचित जातींच्या मुली आणि इ.बि.सी.च्या मुली एकत्र राहत असल्यामुळे समाजात आढळणारा दुरावा आपोआपच गळून पडतो. आणि कधी कधी त्यांची वसतिगृहात झालेली मैत्री, आजीवन स्नेह निर्माण करणारी ठरते. परिणामी दुरावा, अस्पृश्यता, या भावना बोथट होण्यास फार मोलाची भर पडत असते. शिक्षणाचा हेतू केवळ साक्षर करणे नसून विज्ञानामुळे शहरात उपलब्ध असलेल्या सोयी, सुधारणा राहणीमान आदी सुसंस्कार करणाऱ्या बाबी दिसणे, अनुभवता येणे जरुरीचे असते. त्यातून प्रेरणा मिळते. उत्तेजन मिळते. नवीन शिकण्याची जिद्द निर्माण होते. इतर मुलींची प्रगती बघून इर्ष्या निर्माण होते. आत्मविश्वास वाटू लागतो. स्वत:मध्ये पेलेल तेव्हा बदल करून घेण्यास उत्सुक असतात. या ठिकाणी एक लक्षणीय बाब नमूद करणे अतिशय आवश्यक वाटते. जो अंतर्बाह्य बदल बहुजनांच्या मुलीमध्ये आढळतो तसा नव्हे, त्याहून कितीतरी पटीने सर्वांगी बदल अनुसूचित मुलींमध्ये दिसून येतो. तिचा पेहेराव बदलतो. राहणीमान बदलते. भाषा बदलते आणि अंतर्यामी अस्मितेची जाणीव आकार घेते, आकांक्षांना पालवी फुटते. नदीने जसे वाट शोधीत पुढे पुढे जावे, तसे तिलाही मार्ग शोधण्याचा हव्यास जडतो. परदेश-गमनामुळे कोणत्याही व्यक्तीची दृष्टी विस्तारित होते. तसे नागपूरचा युवक मुंबईला राहू लागला की, त्याला नागपूरला राहावेसे वाटत नाही. ग्रामीण भागात राहणाऱ्या अनुसूचित जातींच्या– महार, बौद्ध मुलींना खेड्यात जावेसे वाटत नाही. महाविद्यालयीन विद्यार्थिनींना खेड्यात मुळीच वाव नसतो. हा अपवाद गणला जाईल इतका नगण्य प्रगतीचा टप्पा होय. कारण मुलाच्या शिक्षणाकडे लक्ष देणे अजून पालकांना जमत नाही. परवडत नाही, तेथे मुलींच्या शिक्षणाचा विचार अभावानेच असणे स्वाभाविक आहे.

## सुसंघटन

कोणतेही कार्य सुसंघटित केले की त्यास बळ प्राप्त होते. हाताची मूठ बांधायची झाली तर त्याला पाचही बोटे एकत्र आली पाहिजेत. तसे सुदृढ समाजासाठी बालक, पालक, शिक्षक, संचालक आणि प्रशासक यांचे संतुलित संघटन हवे. राष्ट्रीय स्तरावर घटना, घटनेनुसार अस्पृश्यता उच्चाटनाचा कायदा, नंतर त्यांची अंमलबजावणी, तसेच राज्यस्तरावर काही सरकारी ठराव होत असतात. राष्ट्रीय असो वा राज्य स्तरावर झालेले निर्णय कार्यान्वित करण्याचे जोखमीचे काम प्रशासकांवर असते. प्रशासक म्हणजे जनतेचे मायबाप! पण ते ही भूमिका स्वतंत्र राष्ट्रातील जनतेसाठी बजावीत नसतात. ते पारंपारिक उच्चभ्रूंच्या मानसिकतेचे पोषण करण्यात गर्क असतात. यांची मानसिकता कुणी बदलावी? शाळा संचालक गणही याच पंक्तीतले. पारंपरिक मानसिकतेने पछाडलेले. एखाद दुसरा या कामात शिरला तर त्याला कसे नामोहरम करता येईल इकडेच प्रशासनाचे लक्ष असते. राज्यस्तरावर मुलींचे शिक्षण सर्व स्तरांवर मोफत होत आहे. ही पालकांना, मुलींना दिलासा

देणारी वार्ता असली तरी संचालकगण या नाही तर त्या हाताने पालकांवर आर्थिक भार घालत असतात.

**अभ्यासाची अनास्था**

हल्ली गावागावात शाळा, शाळेत अधिक प्रमाणात मुली जाव्यात अशी सुसंधी निर्माण झाली आहे. मुलाला कुणी अभ्यासाला बस म्हणत नाही तेथे तेथे मुलींना कोण सवलत देणार! अनुसूचित जातींच्या मुलींची याहून दयनीय अवस्था. अनुसूचित जातींच्या मुलीला अभ्यास कर असं कोण म्हणणार? सर्वच मुलींना दुसऱ्याच्या घरी नांदायला जायचे म्हणून कष्टाचा उपसा तिच्या पाचवीला पुजलेला! शाळेत नापास झाली तर त्यांच्या प्रगतीकार्डावर एकही गुण न दाखवता फक्त 'वर पास' लिहिले जाते. मग काय आनंदी आनंद! अशा वातावरणात गृहपाठ देऊन घरी अभ्यास करायला भाग पाडणे हास्यास्पद ठरते. कोणी आणि कसा गृहपाठ करून घ्यावा? आम्ही शिकत असताना detention class भरायचा. न झालेला अभ्यास करून घेतला जाई तो शाळा सुटल्यानंतर. अर्थात शिक्षकाला थांबावे लागत असे. अनुसूचित जातीच्या मुलींच्या बाबतीत असा काही विचार अमलात आणता येईल काय यावर जरूर विचार व्हावा. पूर्वी प्रायमरी टीचर्स ट्रेनिंगसाठी निवड केली जाई. त्यास मागास जातीच्या मुलींसाठी तीन वर्षांचा अभ्यासक्रम, तर इतरांसाठी दोन वर्षांचा. पहिले वर्षी मागास जातींच्या मुलींची पूर्वतयारी करून घेतली जाई. अशाप्रकारे पूर्वतयारी सर्वच विषयात करून घेण्यासाठी तरतूद करता येईल काय यावर विचार व्हावा. एकूण संचालक मंडळीला अनुसूचित जातीच्या मुलींनी शिकले पाहिजे ही अंतर्यामी भावना असेल तरच शक्य आहे.

**महिलांचे काम**

सामाजिक स्तरावर बरेच काही साधण्यासारखे आहे. पंचायत राज्यात स्त्रियांना काम करण्यास भरपूर वाव आहे. गाव आपल्या स्वतंत्र राष्ट्राचा शेवटचा घटक आहे. शरीरात अनंत पेशी. ही प्रत्येक पेशी स्वतंत्रपणे जिवंत असते. तसे आपल्या गावाचे. पेशीसारखा जिवंतपणा महिलांमध्ये निर्माण व्हावा. स्त्रिया परंपरेला उराशी कवटाळतात अशी दूषणे धुवून काढायची आहेत. महिलांनी एकत्र बसावे. गावातील सर्व मुली-विशेषकरून अनुसूचित जातींच्या मुली शाळेत जातील, मध्येच शिक्षण थांबविणार नाहीत याची दक्षता घ्यावी. गाठीभेटी घ्याव्यात. सरमिसळीच्या अभावी दुरावा आला तो नाहीसा करण्याचे कार्यक्रम आखावेत जसे – सणावाराला एकत्रित येणे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा राष्ट्रीय सणाला एकत्र बसून 'खानपान' कार्यक्रम आखावेत. मुख्य सेविकांनी अशा महिला मंडळांना उत्तेजित करावे. महिलांची वृत्ती लक्षात घेऊन मनोरंजन, त्यातून उद्‌बोधन, उद्‌बोधनातून अनुसूचित जातींच्या मुली, त्यांचे पालक यांचेबाबतीत जवळीक साधणे, मुलींना शाळेत पाठवण्यासाठी, जातीने लक्ष घालून, शिक्षणास प्रवृत्त करणे आजची काळाची गरज आहे. गटशिक्षण अधिकारी यांचेवरही ही जबाबदारी टाकली जावी.

**शिक्षक**

शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेचा कणा! अनुसूचित जातींच्या मुली आणि शिक्षक याची दररोजच गाठभेट. रागलोभ, या मुलींना प्रोत्साहित करणे वा न करणे हे सर्वस्वी शिक्षकावर अवलंबून असते. शिक्षणकालात शिक्षकाने प्रेम, निरलस प्रेम दिले नसते तर प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी नररत्ने या देशात निर्माण झाली नसती. शिक्षणखाते शिक्षकांचे पगार देऊ लागल्यापासून मुख्याध्यापकाचे मुळीच मानत नाहीत. त्यांचेशी 'किस झाड की पत्ती' या भावनेने बघतात. तशात त्यांच्या युनिअन्स. युनिअन्स असाव्यात पण त्यात शैक्षणिक विषयावरही चर्चा होणे काळाची गरज आहे. अनुसूचित जातींच्या मुलामुलींना शिकवून 'सर्पाची पिलावळ' वाढवायची काय? असा सवाल टाकून त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणारी शिक्षक जमात वाढत आहे. या अपप्रवृत्तीला आळा बसला पाहिजे. राष्ट्रविघातक वृत्ती मूळ धरण्याआधी मुळासकट उपटली गेली पाहिजे. महाराष्ट्र शासन शिक्षण प्रगत करण्यासाठी नवीन राष्ट्रीय योजना राबवीत आहे. परंतु योजनांची माती करायची की सोने हे सर्वस्वी अध्यापक गणांवर अवलंबून असते, याची जाणीव प्रशासकीय वर्गाला नाही असे म्हणता येणार नाही.

**शालेय आकर्षण**

शाळेत अनुसूचित जातींच्या मुलींचे मन रमेल काय? हा प्रश्न निर्माण होतो. याचे उत्तर होय असेच आहे. घरातून मोकळीक, नवे वातावरण, नवा परिचय, नवा अनुभव, नवे जग. या जगात ती हरवून जाऊ नये याची दखल घेणे आवश्यक आहे.

या दृष्टीने शाळा संचालक आणि शिक्षक यांचेसाठी काही पथ्ये सुचवाविशी वाटतात.

१) जातीचा उल्लेख करून मानखंडना करू नये. अपमानास्पद बोलण्याचे टाळावे.
२) उगीचच वाद घालू नये.
३) सर्वांसमक्ष लज्जित होईल असे व्यवहार नसावेत.

**पुढील गोष्टी कराव्यात**

१) अनुसूचित जातींचा नामोल्लेख बुद्ध्याच टाळावा. आवश्यकच असेल तर जवळ बोलावून हळूच माहिती काढून घ्यावी.

२) चूक लक्षात आल्यास खवळून जाऊ नये. मातेच्या ममतेने लक्षात आणून द्यावे. पुन: अशी चूक होणार नाही अशी दखल घेतली जावी.

३) अक्षम्य चूक लक्षात आल्यास त्या चुकीच्या मार्गापासून दूर कसे करता येईल यावर विचार करावा. अमलात आणावा.

४) शाबासकी देण्याची संधी मिळाल्यास वर्गासमोर सांगून उत्तेजित केले जावे.

५) शाळेत निर्मळपणे वागणारी, खुल्या अंत:करणाची, नि:स्वार्थ सहानुभूती बाळगणारी माणसे आहेत असा अनुभव अनुसूचित जातींच्या मुलींना दिला जावा.

६) शाळेतील समारंभात अशा मुलींच्या पालकांना विशेषकरून महिलांना पाचारण करावे. परिणामी पारस्परिक सरमिसळीमुळे मनात रुतून बसलेली अढी हळूहळू नाहीशी व्हायला मदत होईल.

७) सर्वच गोष्ट पैशांनी होत नाहीत तसे सर्वच बदल केवळ कायद्याने होत नाहीत. माणसांची हालचाल कायद्याचे अनुषंगाने नसेल तर त्या कायद्याचे मातेरे होणार हे लक्षात ठेवले पाहिजे.

खलिल जिब्रानच्या मते ईश्वराचे सृजन मानवरूपात झाले आहे. सर्वांना सुख लाभावे. कोणी दु:खी असू नये ही भावना वाढावी.

# राष्ट्रनिर्मितीसाठी मुलींचे शिक्षण

श्रीमती नलिनी लढ्ढके

**राष्ट्र म्हणजे त्यातील समाजघटक**

उपरोक्त विषयात ' राष्ट्र व शिक्षण हे मुख्य दोन शब्द आहेत. राष्ट्र म्हणजे भू-प्रदेश, नद्या, पर्वत, समुद्र हा अर्थ आपल्यालाही मान्य नसावा. राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील स्त्री, पुरुष हाच अर्थ अभिप्रेत आहे. शिक्षणाच्या संदर्भात विचार करताना या दोन घटकांच्या विचारांचा समावेश आपण करतो. मग राष्ट्र निर्मितीसाठी स्त्री-पुरुष या प्रमुख घटकांची जडण-घडण योग्य प्रकारे होण्यावरच राष्ट्रनिर्मितीचे स्वरूप अवलंबून राहील हे कोणी नाकारणार नाही. व्यक्तींची जडणघडण करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी व महत्त्वपूर्ण साधन आहे, हेही आज आम्ही मान्य केले आहे.

**शिक्षण हे व्यक्तित्व विकासाचे माध्यम**

शिक्षण मानव घडविण्याचे माध्यम असा सरळ अर्थ घेतला तर शिक्षण काही शिक्षण संस्थांतूनच होते असे नाही तर माणूस अनुभवातून, निरीक्षणातून इतर व्यक्तींच्या सहवासातून शिकत असतो. त्यातून त्याच्या वृत्ती घडत असतात. स्वाभाविक वृत्तीचा विकास होत असतो. त्याप्रमाणे त्याच्या आचार - विचारात बदल होत असतो. परंतु हा स्वाभाविकपणे होणारा विकास व बदल योग्य दिशेने व कल्याणकारी होईल याची खात्री देता येत नाही. उदाहरण द्यायचे झाले तर नदीच्या पाण्याचे देता येईल. पूर आला की नदीच्या पाण्याचा विस्तार वाढतो. ते योग्य प्रकारे धरण वगैरे बांधून वळविले तर जीवन ठरते. परंतु स्वच्छंद व मुक्तपणे वाहू दिले तर प्राणहानी, वित्तहानीलाही कारणीभूत ठरते. हा नियम मानवीवृत्तींच्या विकासालाही लागू पडणारा आहे. मानी विकासातून जे परिवर्तन घडवावयाचे आहे ते योग्य दिशेने व्हावे असे अपेक्षित आहे. त्यासाठी त्यांच्या वृत्ती, प्रवृत्ती, विचार, आचार यांना कल्याणकारी वळण देण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यालाच आम्ही संस्कार करणे मानतो व त्यासाठी प्रयत्नपूर्वक योग्य प्रकारे व योग्य संस्कार करणे म्हणजे शिक्षण देणे असेही म्हणता यावे असे वाटते.

म्हणून शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, केवळ आचारहीन पुस्तकी पांडित्यही नव्हे, तर व्यक्तींच्या शक्तीला व वृत्तीला मानवी कल्याणाचा हेतू ठेवून योग्य वळणे देण्याची व त्याद्वारे समर्थ व्यक्तिमत्व घडविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण असे मानायला हरकत नसावी. शिक्षण तज्ज्ञांनी अशाच अर्थाच्या परिभाषा दिलेल्या आपल्या माहितीच्या आहेतच.

" शिक्षण म्हणजे सर्वांगीण व्यक्तित्व विकासासाठी करण्यात येणारे संस्कार"; " शिक्षण म्हणजे विकसनशील असा बदल" ह्या परिभाषा लक्षात घेतल्यास शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास असा सारांश घेता येईल. शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे साधन मानले तर समाजाच्या स्त्री आणि पुरुष या दोन्ही घटकांना विकासासाठी त्यांची गरज आहे. पण राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक व महत्त्वपूर्ण मुलींचे शिक्षण मात्र दुर्लक्षित राहिले.

**मुलींच्या शिक्षणाकडे एवढे दुर्लक्ष का ?**

ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी थोडे मागे वळून पहावे लागेल. पुढील उपाय-योजनेसाठी त्या कारणांचा शोध घेणे अनिवार्य ठरते. म्हणून संक्षिप्तपणे त्या पार्श्वभूमीचा आढावा घेऊ या.

वैदिक काळात स्त्रीला समाजात समानतेचे स्थान होते. विद्येचे दालन तिच्यासाठी खुले होते. विद्यार्जनाचा व विद्यादानाचा तिला अधिकार होता. पुढे मनुस्मृतीचा काळ सुरू झाला. स्त्रीबद्दलच्या विपरीत विचारांचा प्रभाव वाढला. स्त्री शिक्षण, धर्म नियमानुसार पापाचरण ठरले. धर्मबाह्य बाब ठरली. पुढे तिचे क्षेत्र चार भिंतीतील हक्काची सेविका इतकेच उरले. श्रमजीवी महिला कष्टासाठी बाहेर पडत असल्या तरी त्यांचेही स्थान त्यांच्या कुटुंबात दुय्यमच राहिले. त्यांचा त्यांच्या मिळकतीवर तर अधिकार नव्हताच पण स्वत:वरसुद्धा अधिकार नव्हता. आजही ही स्थिती फारशी बदललेली नाही. अर्थोत्पादन करणाऱ्या स्त्री घटकांचे सुद्धा स्वतंत्र अस्तित्व समाजाने मान्य केलेले नाही, उलट स्त्री जीवनाबद्दल पुढील विचार समाजाने जोपासले.

" स्त्री ही निसर्गानेच परतंत्र राहण्यायोग्य, आश्रित राहावी अशीच निर्माण केली. शारीरिक बळाच्या दृष्टीने ती पुरुषापेक्षा दुर्बल असते. बुद्धीने सुद्धा पुरुषापेक्षा कमी प्रतीची असते, एवढेच नव्हे तर ती जन्मत:च पापबुद्धी व चंचला असते. म्हणून ती पुरुषाच्या मुक्ती मार्गातील धोंड आहे हे विचार समाजमान्य ठरले. ते विचार पुरुषांनी स्वीकारले व जीवनात वापरले यात नवल नाही. कारण ते त्यांच्या हिताचे होते. परंतु तेच विचार स्त्री मनात सुध्दा रुजविले गेले. तिच्या अज्ञानामुळे यापासून होणारा अन्याय तिला जाणवला नाही. अन्यायाची जाणीव नव्हती म्हणून त्यांच्या विरोधासाठी प्रयत्न ती स्वत: करू शकली नाही. याचा परिणाम म्हणून स्त्रीला आश्रित राहण्यास सुख मानून घेता आले. आपला जन्म असेच जगण्यासाठी झाला अशी तिची समजूत करवून दिली गेली. तिच्यावर लादलेला अन्यायकारक निर्बंध ईश्वरी संकेत व स्त्रीधर्म समजून तिने स्वीकारलेली तिची जीवन पध्दती बनली. शिक्षणाच्या अभावी ती मानसिक, बौध्दिक, आर्थिक व शारीरिक गुलाम बनली. समाजाचे हे अर्धे अंग असे निर्जीव कळसूत्री बाहुल्याप्रमाणे बनले.

"या कल्पनांना तडा गेला "

याविरूध्द भारतात – महाराष्ट्रात दीडशे वर्षांपूर्वी काही एतद्देशीयांकडून आवाज उठविला गेला. अनेक विचारवंतांनी मुलींच्या शिक्षणाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. जोतिबा फुल्यांनी तर प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन स्वत: मुलींची शाळा काढली व भारतातील पहिल्या भारतीय स्त्री शिक्षण क्षेत्रातील कृतिवीराचा मान मिळविला. पुणे येथे १२ फेब्रुवारी १८५३ ला श्री. आण्णासाहेब चिपळूणकर एका भाषणात म्हणाले होते, 'मुलींच्या शिक्षणाबद्दल औदासीन्य ठेवणाऱ्याला परमेश्वराकडून शासन घडेल. आपल्या नातू व पणतू यांचे भावी हित लक्षात घेऊन मुलींच्या शिक्षणासाठी पुढे यावे' त्याच कार्यक्रमात शिक्षणक्षेत्रातील मान्यवर व्यक्ती प्रा. फ्रेजर म्हणाले, "स्त्रियांच्या प्रगतीशी मानव जातीची प्रगती निगडित असते. या जगातील फार मोठ्या सत्याविषयी तुम्ही अज्ञानी असू नये. मानव जातीच्या प्राथमिक सुधारणावस्थेत जी अस्थिरता होती त्याला कारण गतकालीन मानव समाजाकडून झालेली स्त्रियांची अवनती हे होय. ज्या समाजामध्ये स्त्रीला हीन आणि गुलाम समजण्यात येते त्या समाजाला कायम स्वरुपाची प्रगती करता येईल ही अशक्य गोष्ट आहे.'

ज्ञानोदय नावाच्या पत्राने १५ सप्टेंबर १८४९ च्या अंकात आमचया समाजाची स्त्री शिक्षण बद्दलची मन:स्थिती वर्णन केली. संपादक म्हणतात,' जरी स्त्री शिक्षणाचे महत्त्व हिंदूंना पटले तरी स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी ते काहीच धडपड करीत नाहीत. आणि जोपर्यंत हिंदूंच्या माता आणि भगिनी शिकून सुसंस्कृत होत नाहीत तोपर्यंत ते सुखी होणार नाहीत.

' सत्साव पत्रिकेत – म. जोतिबा फुले कळवळून म्हणाले, ' स्त्री पासून उपजुनिया त्यांची जातीय निंदशील जरी' उपटावे कान तुझे त्वन्मातेने, तरी व्यर्थ इतर करी ।'

असा हा विचार वाढीस लागला तरी कलकत्त्याला बाबू ईश्वरचंद्र यांनी कलकत्त्याच्या मुलींच्या शाळेत आपल्या मुलीचे नांव नोंदवले. त्यासाठी त्यांच्या जातभाईंनी जातीचा बहिष्कार घालण्याची धमकी दिली. शेवटी त्यांनी क्षमा मागितली. व मुलीचे शुद्धीकरण करवून घेतले. व जातीत आले, अर्थात मुलीचे शिक्षण बंद झाले.

प्रत्यक्ष शिकविण्यासाठी जाणाऱ्या सावित्रीबाईचा छळ झाला. हे अडथळे आहेत स्वातंत्र्यपूर्व काळातले. पण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडणाऱ्यांनी सुद्धा मुलींचे शिक्षणाकडे दुर्लक्षच नाही तर विरोध केला. पुण्यास इ. सन. १९२० साली मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाच्या विरोधात सभा झाली. त्यात लोकामान्य टिळकांचाही सहभाग होता.

पुढे समाजात सतत या विचारांचा प्रचार व कृती वाढत गेली, त्यामुळे मुलींना शाळेत घातल्याबद्दल पालकांचे गौरव करणारे मजकूर वर्तमानपत्रात येऊ लागले. परिवर्तन घडविण्याचे कार्य घडत राहिले. परिणामी मुलींच्या शिक्षणाला अनुकूल वातावरण बनत गेले. समाजाच्या धारणा बदलल्या. विचारांची दिशा बदलली. भूतकाळातील विचारामुळे झालेल्या वाईट परिणामाचा आढावा घेणारे समाजमन पुढे आले. त्यामुळे एके काळी समाजाला अमान्य, धर्माला अमान्य असलेला स्त्री शिक्षणाचा विचार नवराष्ट्राची गरज

म्हणून सूज्ञांना मान्य होऊन पुढे आला. समाजात लोकशाही जीवनप्रणालीचे प्राण असलेले समता, सामाजिक न्याय, बंधुता या तत्त्वांच्या प्रस्थापनेसाठी म्हणजेच राष्ट्रनिर्मितीसाठी स्त्री–मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व आम्ही आज मान्य करीत आहोत. - - - - - -

**मुलींच्या शिक्षणाबाबत प्रतिकूल मत पूर्ण संपले काय ?**

या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक द्यावे लागेल. त्यांच्या शिक्षणाबाबत आजही गैरसमज कायम आहेत. समाजात वावरणाऱ्या शिक्षित व्यक्तींचे जीवन व आचार जेव्हा स्वैराचारी व असामाजिक वाटतात तेव्हा सामान्य माणूस चटकन बोलून जातो की हा शिक्षणाचा परिणाम आहे. हा विचार मुलींच्या शिक्षणात गतिविरोध निर्माण करू शकतो. त्यासाठी व्यक्तीच्या वर्तनाला जबाबदार असलेले कारण विचारपूर्वक शोधावे लागेल. विचारानंतर एक गोष्ट मान्य करावी लागेल की हा वर्तनदोष शिक्षणामुळे नव्हे तर अपूर्ण ज्ञानामुळे, चुकीच्या व विकृत जाणिवांमुळे आलेला असतो.

समाजातील अनेक तरुणी व तरुणांच्या वागण्यावर टीका होते. त्यांच्या त्या वर्तनाचा उगम शोधावा लागेल. तो उगम मुलींच्या शिक्षणाच्या स्थितीत आहे.

बालकांचे शून्य ते पाच वर्षे हे वय अधिक संस्कारक्षम मानले जाते. त्या वयात आरोग्याच्या सवयी, शिष्टाचाराच्या सवयी, व्यसन व वाईट गोष्टींबाबत तिरस्कार वगैरे शरीराची व मनाची जोपासना होणे आवश्यक असते, वाईट बाबीबद्दल तिरस्काराचे बीजही याच वयात पेरण्याची गरज असते. या वयात योग्य गुणांचे बीजारोपण व घातक वृत्तींना आळा घालण्याचे संस्कार झाले नाहीत, तर त्यांच्या भावी जीवनात त्या घातकवृत्ती उग्र रूप धारण करतील. त्यापासून फक्त त्यांचेच जीवन बिघडत नाही तर देश, समाज, कुटुंब सर्वच अशांत, दु:खी व दुर्बल बनण्यालाही तो कारणीभूत ठरतो.

**या वयात हे संस्कार करावे कुणी ?**

या प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे. आपल्या सर्वांप्रमाणे मलाही ते माहीत आहे. "घर, बालकांची प्रथम शाळा आहे " "माता बालकाची प्रथम गुरू आहे" याचा अर्थ हे संस्कार करण्याची जबाबदारी मातेची आहे. ही गोष्ट आम्ही मान्य केली पण ज्या व्यक्तीकडे जे काम सोपविले जाते ते योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्या व्यक्तीकडे शारीरिक, वैचारिक, वगैरे सर्व प्रकारचे सामर्थ्य असावे लागते, हाही विचार वरील विचाराच्या अनुषंगाने मान्य करावा लागेल. त्याशिवाय सोपविलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडता येणार नाही.

हा विचार मनात आल्याबरोबर एक म्हण आठवते ती म्हणजे "विहिरीत असेल तर पोहऱ्यात येईल."

आईच जर योग्य जाणिवांनी समृध्द नसेल तर बालकांवर ती कोणते योग्य संस्कार करणार? पारंपरिक पध्दतीनेच मर्यादित अर्थाने ती चूल सांभाळेल व मूल वाढू देईल.

समाजाचे डोळसपणे निरीक्षण केले तर असे लक्षात येते की, बहुसंख्य कुटुंबांत मातेचे स्थान हक्कांच्या मोलकरणीचेच असते. तिला तिच्या अस्मितेची ओळख नसते. तिला स्वाभिमान शिल्लक राहू नये अशी वागणूक दिलेली असते. त्यामुळे ती अंधश्रध्दा जोपासते. निरुपयोगी व्रत - वैकल्यात मन रमविते. टाकाऊ कल्पनांत गुरफटून जाते. हे तिचे जीवन बालक तिच्या सहवासात राहून पाहात असते. ते संस्कार ते बालक स्वाभाविकपणेच स्वीकारत असते. अशा माता समाजाला बदलत्या युगात आवश्यक ते विचार व संस्कार कसे देणार? या वयातील संस्कारांचे महत्त्व आजच वाटत नाही तर सव्वाशे वर्षांपूर्वी म. फुले म्हणाले होते, "पुरुषांच्या शाळापेक्षां स्त्रियांच्या शाळेची आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजं असतात." (म. फुले चरित्र पान नं. २८)

**मुलींचे शिक्षण दुर्लक्षित – त्याचे दुष्परिणाम**

बाळांवर संस्कार करण्याची क्षमता मातेला प्राप्त व्हावी त्यासाठी तिच्या बालवयापासून शिक्षणाद्वारे तिची जडणघडण केली गेली नाही. समाजाच्या गरजा वेगाने बदलत गेल्या. सामाजिक जीवनातही क्रांतिपूर्व वेदना जाणवू लागल्या. विचार परिवर्तनाचे वारे वाहू लागले. पण या सर्व प्रक्रियेत बालमनावर संस्कार करणारी माता मात्र "जैसे थे" स्थितीतच राहिली. संस्कार करणारी व्यक्तीच जर आजच्या सामाजिक गरजाबाबत अनभिज्ञ असेल, परिवर्तनशील जाणिवांशी तिचा परिचय नसेल, विज्ञानवादी दृष्टिकोन तिच्या ठिकाणी निर्माण झाला नसेल तर ती आपली जबाबदारी पार कशी पाडणार?

आजच्या वातावरणात वावरणाऱ्या पिढीवर प्रभाव ठेवण्याइतपत तिच्या ठिकाणी क्षमता नसेल तर चालू पिढीतील बालकांवर ती आपला प्रभाव पाडू शकणार नाही. अनेक पिढ्यांपासून शिक्षणाची आबाळ केली गेली. त्यामुळे आजची माता व नवीन वातावरणात वावरणारे बालक ह्या दोन घटकांमध्ये वैचारिक अंतर वाढले. आजच्या वातावरणात अपत्यांना योग्य दिशा देण्याचे आईचे बळ अपुरे पडते. घरात योग्य दिशा मिळत नाही. बाहेरचे वातावरण मोह घालते. अशावेळी न कळत स्वैरवर्तनात पर्यवसान होते. यात त्या व्यक्तीने घेतलेल्या शिक्षणाचा दोष समजणे योग्य नव्हे. जर असे मानले तर "दुखणे पायाला व पट्टी कपाळाला" असे चुकीचे निदान केल्यासारखे होईल. निदान चुकले तर उपाययोजना चुकीची होईल व मग सुधारण्यासाठी केलेले श्रम वाया जातील, निरुपयोगी ठरतील. खरं तर असे म्हणावेसे वाटते की मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले, त्यांना अज्ञानात ठेवण्यात समाजाला सुख वाटले, त्यामुळे माता बालकांच्या मनोभूमीची मशागत करण्यात असमर्थ राहिल्या आणि त्यांचेच परिणाम म्हणजेच आज समाजाला डोकेदुखीसारखी वाटणारी तरुण पिढी आहे.

## मुलींच्या शिक्षणाअभावी कुटुंब संस्थाही दुर्बल राहिल्या

आमच्या समाज व्यवस्थेत संस्कारप्राप्तीच्या संदर्भात कुटुंब व्यवस्थेचे आम्ही महत्त्व मानतो. कुटुंबांतील संस्कार करणारे घटक स्त्री आणि पुरुष होत. आज बहुसंख्य कुटुंबातील पुरुषांना मुलांवर संस्कार करण्यास वेळ नाही. ज्यांना वेळ असतो त्या कुटुंबातील बहुसंख्य पुरुष अनिर्बंध वागणारे आढळतात. व्यसनात किंवा कुण्यातरी कुविचारात डुबलेले दिसतात. असे उदाहरण ज्या दुर्दैवी कुटुंबात असते तेथील बालकांची दिशा चुकण्याचाच धोका संभवतो. पित्याची किंवा कुटुंबातील पुरुषाची ही स्थिती व दशा असते. माता किंवा अन्य स्त्रिया व्यक्तित्व घडविण्याच्या प्रक्रियेत अनभिज्ञ असतात. म्हणून असमर्थ शिवाय अन्यायपिडीत असतात. अशा कुटुंबातील बालक बाह्य वातावरणात दोरा तुटलेल्या पतंगाप्रमाणे वाहावत जाणे क्रमप्राप्त आहे. ही स्थिती बदलण्यासाठी कुटुंबातील माता सक्षम असावी व त्यासाठी मुलींचे शिक्षण आवश्यक आहे. हा विचार आज मान्य होत असला तरी त्याला वेग येण्याची गरज आहे. राष्ट्र निर्मितीच्या हेतूने दिशा देण्याचीही गरज आहे.

## मुलींच्या शिक्षणाने काय साध्य होईल ?

या प्रश्नाचे उत्तर संक्षिप्तपणे द्यावयाचे असल्यास असे म्हणता येईल की "भारतवासीयांनी समाजात न्याय व बंधुता यासह स्वीकारलेले स्वातंत्र्य साकार होईल. लोकशाही जीवनप्रणाली यशस्वी होईल."

शिक्षणामुळे व्यक्तींच्या जीवनात आवश्यक तो वर्तनबदल व्हावा व त्यामुळे बलवान राष्ट्र निर्मिती व्हावी ही अपेक्षा असणार. मुलींच्या शिक्षणाबद्दल खुद्द जोतिबांनी स्पष्ट सांगितलेला उद्देश असा आहे– ते म्हणतात "शिक्षणाने त्यांना चांगली गोष्ट कोणती आणि वाईट गोष्ट कोणती, हितकारक काय आणि अहितकारक काय याचे चांगले ज्ञान होईल असे शिक्षण द्यावे. आपल्या हक्कासाठी लढण्याचीच नव्हे तर त्यांच्या संरक्षणाची ही तयारी झाली पाहिजे." असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले. राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणाने असा वर्तनबदल व्हावा.

### (अ) शिक्षणाने न्यूनगंड दूर व्हावा

स्त्री ही वेलीप्रमाणे झाडाच्या म्हणजेच कोण्यातरी पुरुषाच्या आधारानेच वाढू व जगू शकते. ती स्वतंत्र जगूच शकत नाही. ह्या पारंपरिक विचारातून आलेला न्यूनगंड हा भ्रम आहे हे तिला कळेल. शिक्षण घेताना तिला अनेक कर्तबगार स्त्रियांची चरित्रे वाचावयाला मिळतील. त्यातून स्त्री सुध्दा संधी मिळाल्यास आपली अस्मिता दाखवू शकते हे ती जाणून घेईल.

### (ब) आत्मविश्वास वाढावा

कोणाच्या तरी आज्ञेत राहणे व त्यांच्या मर्जीवर जगण्यासाठीच मुलींचा जन्म नाही, ती स्वतंत्रपणे जगू शकते. हा आत्मविश्वास जागेल. इतिहासात झालेल्या टोकाच्या अत्याचारपीडित डॉ. रुखमाबाईची त्यांना ओळख होईल. ती स्त्री हतबल न होता स्वत:च्या जिद्दीने परदेशात जाऊन डॉक्टर बनून येते हे ज्ञान तिला मानसिक बळ देईल.

### (क) लिंगभेदामुळे दुर्बलतेचा आरोप ती नाकारेल

स्त्रीचा जन्म मिळाला म्हणून ती शारीरिक दृष्टीने पुरुषापेक्षा कमजोर नाही हा समज चिकित्सक बुध्दीने समाजाचे निरीक्षण केल्याने पक्का बनेल व त्यामुळे तिला स्त्री सामर्थ्याचे दर्शन होईल. उदा लोहाराच्या तप्त लोखंडावर घणाचे घाव घालणारी त्याची पत्नी स्त्री असते. ती घणाचे ओझे पेलते. ते ओझे सराव नसलेला माणूस पेलू शकणार नाही. अशा निरीक्षणातून तिला बोध होईल की शारीरिक असमर्थता हे लिंगभेदाचे कारण नसून सरावाचा तो परिणाम आहे. स्त्रीला संधी मिळाली तर ती परिश्रमाची कामे करण्यात पुरुष शक्तीपेक्षा कमी ठरत नाही. आज आकाश भ्रमणापासून सर्वच क्षेत्रात स्त्रिया आपले प्रभुत्व सिध्द करीत आहेत. अशा तिच्या जाणिवांच्या व माहितीच्या सीमा वाढल्या म्हणजे जीवन संघर्षासाठी तिच्यात आत्मविश्वास निर्माण होईल.

### (ड) काल्पनिक भीती दूर होईल

शिक्षणाने मुली स्वच्छंदी, स्वैराचारी बनतील. कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यास त्या असमर्थ बनतील. त्यामुळे आमची कुटुंब व्यवस्था नष्ट होईल. शिक्षणाने ती स्वच्छंदी बनेल. अशा तऱ्हेने आमची संस्कृती नष्ट होईल. धर्म बुडेल." ही भीती काल्पनिक आहे. ती भीती समाजात स्वार्थी हेतूने निर्माण केल्याचे ज्ञान तिला होईल. शिक्षणाबद्दलचा गैरसमज दूर होईल.

### (इ) शिक्षण हे व्यक्तित्वविकासाचे साधन वाटेल

शिक्षण हे केवळ केशभूषा, वेषभूषा, बदलण्यासाठी नाही, ते माझी अस्मिता जागविण्याचे साधन आहे. मला समाजाचा एक नागरिक म्हणून जी भूमिका पार पाडावी लागणार आहे त्याचे ज्ञान देणारे हे साधन आहे. समर्थ व्यक्तिमत्व बनविण्याची ती संधी आहे. ही जाणीव होईल. विकासाच्या आड येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्याचे ती प्रयत्न करील. हक्क व कर्तव्य दोन्ही व्यक्तित्व विकासाच्या कसोट्या आहेत. हे ती समजून घेईल मग भावी पिढीवर हेच संस्कार करील.

**(ई) समतेचा स्वीकार व अन्यायाचा प्रतिकार करण्यास समर्थ होईल.**

समाजाच्या सुस्थितीसाठी, स्थिरतेसाठी सुयोग्य व नीतीमान नागरिकांची गरज असते. त्यासाठी काही बंधने पाळावी लागतात. ती बंधने, नियम सर्व घटकांकरिता सारखी असावीत अशी अपेक्षा ठेवणे अयोग्य असू शकत नाही. पण समाजात स्त्री पुरुषांसाठी बंधने समान नाहीत ही वास्तविकता आहे. उदाहरण घ्यायचे झाले तर नीती नियमांच्या संदर्भात घेता येईल. स्त्री नीतिमान असावी ही कल्पना समाज काटेकोरपणे मानतो. पण पुरुषांच्या बाबतीत तो नीतिनियम लागू केला जात नाही. अनीतिमान ठरविलेल्या स्त्रीकडे समाज तुच्छतेने पाहतो. तिला सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत करून मानसिक छळही करतो. तिला जीवन जगणे कठीण होते. परंतु त्याच कृतीत तिच्याशी भागीदारी करणारा पुरुष मात्र समाजात उजळ माथ्याने वावरतो. समाज त्याला अपमानित अथवा दंडित करीत नाही. ही विषमता अन्यायमूलक आहे. त्यासाठी नीतीची बंधने समानतेच्या तत्त्वावर लागू करावीत. यासाठी ती आग्रह धरील. व अन्यायाचा प्रतिकार करील. स्त्री आणि पुरुष एकसमान मानावे. मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असताना स्त्रियांस एक तऱ्हेचा नियम लागू करणे व लोभी, धाडसी पुरुषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय हे जोतिबांचे विचार ती मार्गदर्शक मानेल.

**मानवी मूल्यांचा आदर करील-**

मनुष्याचे मूल्यमापन जन्माने न करता त्याच्या कर्तबगारीवरून व्हावे हा विचार ती स्वीकारील. त्यामुळे वर्ण, जात, धर्म ह्यामुळे कृत्रिम निर्माण केलेल्या विषमतेचा ती त्याग करील. हा समानतेचा व मानवी मूल्यांचा विचार ती अपत्याच्या ठिकाणी रुजवील.

**(ड) बौद्धिक गुलामगिरीतून मुक्त होईल**

अज्ञानाने बुद्धीची विचारशक्ती कुंठित होते. अशी व्यक्ती महात्मवादी विभूतीपूजक, शब्दप्रामाण्यवादी बनते. तिची चिकित्सक बुद्धी स्थिरावते. त्यामुळे जीवनात बौद्धिक गुलामगिरीचा प्रभाव वाढतो. शिक्षणाने बुद्धीचा विकास झाला तर बौद्धिक गुलामगिरीतून निर्माण केलेला दैववाद, दैवी चमत्कारावरील विश्वास, नवसाने ईश्वर प्राप्त करून घेण्यासारख्या भ्रामक कल्पना यांचा ती त्याग करील. त्यामुळे समाजात निर्माण होणारे बळी देण्यासारखे प्रसंग; मंत्रावरील विश्वास, धुपारे, बुवा यांच्यावरील विश्वास नाहीसा होईल. त्यातील फोलपणा तिच्या लक्षात येईल. अशा अनेक असामाजिक बाबींमुळे समाजात संघर्ष निर्माण होतो ते योग्य नाही; ही जाणीव तिला होईल. विवेक जागृत होईल. घडणाऱ्या घटनांचा कार्यकारण संबंध ती समजून घेईल. त्यातून सामाजिक कर्तव्यांची जाणीव निर्माण होईल. भ्रामक कल्पनांचा त्याग केल्यामुळे कल्याणकारी योजनांचा लाभ तिला घेता येईल. माता व बालसंगोपनाचे ज्ञान शिक्षणातून झाल्यामुळे केंद्र व राज्याला

लाखो रुपये खर्च करुन त्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्याची मग गरज राहणार नाही.

### (उ) विज्ञानवादी दृष्टिकोन वाढेल, मानसिक विकास होईल

मानसिक विकास झालेली माता अपत्यामध्ये योग्य विचार, मानवतेची भावना जागृत करू शकेल. समाजातील अनेक कुप्रथांच्या विरुद्ध तिचे मन तयार होईल. मानवी मूल्यांचा नाश करणाऱ्या कुविचारापासून भावी पिढीला ती दूर ठेवील. स्त्री - पुरुष समानतेची भावना वाढली म्हणजे हुंड्यासारख्या कुप्रथांना आळा बसेल. हुंड्यांशी संबंधित प्रतिष्ठित मानपानाच्या कल्पनांचा ती स्वत: त्याग करील व त्याचे प्रतिबिंब भावी पिढीत पडेल. ती वैयक्तिक भावनांचे सामाजिकीकरण करु शकेल. पारंपरिक कल्पनांचे सुद्धा उदात्तीकरण करू शकेल उदा- पुत्र प्राप्तीची कल्पना घ्या. ती वात्सल्य भावना वंशवेल व मृत्यूनंतरच्या पित्याच्या मुक्तीशी जोडली तर ती कल्पना आमच्या समाजाच्या रोमरोमात वास करीत आहे. ती भावना अनेकदा विकृत स्वरूप धारण करते व इहलोकीच दु:ख निर्माण करते. परंतु त्याच वात्सल्य वृत्तीचे उदात्तीकरण करण्याची वृत्ती वाढली तर इहलोकातच दु:खी व मातृप्रेमाला वंचित झालेल्या जीवांना स्वर्गीय सुख देऊ शकते. त्यातही मुलगा असावा ही इच्छा असली तर त्या घरात मुलींचाच जन्म झाला तर त्या स्त्रीच्या वाट्याला छळ येतो. अपत्य न होणाऱ्या स्त्रीला वांझ म्हणून तिचाही मानसिक छळ होतो. पुत्रप्राप्तीच्या हव्यासामुळे द्विभार्या प्रतिबंध कायदा तोडून दुसरी पत्नी घरात आणली जाते. पुत्र प्राप्तीसाठी बळी दिल्याची अघोरी कृत्येही घडतात. सुखदायी वात्सल्यवृत्ती ही समाजात असे दु:ख निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. त्या वृत्तीचे सामाजिकीकरण झाले तर समाजातील मातृसुखाला वंचित जिवांना त्या प्रेमाचा लाभ मिळू शकतो ही जाणीव शिक्षणातून विकसित होईल. अशी वृत्ती घडलेल्या मुली भावी पिढीतील मुलांमध्ये ही वृत्ती वाढवतील हा मानवतेचा झरा मानवी जीवनास सुखी समृद्ध बनवील.

### (ऊ) कायद्याशी परिचय होईल

समाजात स्त्री-पुरुष समानतेचा विचार मान्य व्हावा यासाठी प्रयत्न होत आहेत. केवळ स्त्री जन्मामुळे तिला पित्याकडून, पतीकडून, किंवा मुलाकडून विषमतेची, दुय्यमतेची वागणूक मिळणे अन्यायमूलक आहे. ही जाणीव महिलांमध्ये शिक्षणामुळे होत आहे. अशी वागणूक स्वतंत्र देशांच्या नागरिकांच्या समान हक्कांच्या नियमांच्या विरुद्ध आहे. ही जाणीव जागरूक नागरिकांना झाली आहे. त्याविरुद्ध चळवळी सुरू झाल्या. फक्त भारतातच नव्हे तर जगभर महिला दशक पाळले गेले. त्या जागृतीमुळे पूर्वीच्या स्त्री बद्दलच्या कायद्यात परिवर्तन व्हायला सुरुवात झाली. हुंडाप्रथेचा कायदा प्रथम दखलपात्र गुन्हा नव्हता, केवळ मार्गदर्शक होता. तो आता बदलत जाऊन हुंडा घेणे आता सजापात्र गुन्हा झाला. असे अनेक कायदे समानतेसाठी अन्याय निवारणासाठी तयार झाले. परंतु शिक्षणाच्या अभावी त्या कायद्याचे ज्ञान स्त्रीसमाजाला नाही. शिक्षणाचे प्रमाण वाढले तर या कायद्याची माहिती मिळण्यास मदत होईल. व कायद्याचा उद्देश पण सफल होईल

वारसा हक्काचा कायदा झाला. परंतु त्याचे स्वरूप महिलांना माहीत नाही. पोटगीचा कायदा आहे. मोफत कायदेशीर सल्ला देण्याची तरतुद आहे. पण त्याचीही माहिती नाही. हुंडाबंदीच्या कायद्यातील तरतूदी व त्यातील प्रक्रियांची माहिती नाही. ४९८ अ कायदा आहे पण त्याचा आधार घेण्याची हिंमत नाही. शिक्षणाच्या अभावी ह्या लाभापासून मुली वंचित राहतात. शिक्षणाने ह्या जाणिवा निर्माण होतील.

असा शिक्षणाने स्त्रियांमध्ये कल्याणकारी विचारांचा, वृत्तींचा विकास झाला की, त्याचे प्रतिबिंब आचरणात दिसून येईल. सामाजिक विषमता दूर होईल व समानतेचा प्रभाव वाढेल. जात, धर्म, वर्ण, ह्यामुळे घडलेल्या कृतीत भेदाभेद संपविण्यास आवश्यक तो विचार व वातावरण निर्माण होईल. मानवाच्या प्रती आदर व मानव धर्माबद्दल आस्था निर्माण झाली म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी येईल. शिक्षणाने मुलीमध्ये झालेले हे वर्तन परिवर्तन समाजाला म्हणजेच राष्ट्राला बलशाली बनविण्यात कारणीभूत ठरेल. म्हणून राष्ट्रनिर्मिती व मुलींचे शिक्षण ह्या दोन्ही बाबी एकात्म आहेत.

शिक्षण प्रसाराच्या गतीच्या वाढी सोबतच ही दिशाही शिक्षणातून मिळावी.

• • •

# मातांचे शिक्षण व जाणीव जागृती

**श्रीमती कमल सारडे**

मातांचे शिक्षण म्हणजे महिलांचे शिक्षण - स्त्रीचे शिक्षण. कारण अपवाद सोडल्यास प्रत्येक महिला ही गृहस्थाश्रमी बनून माता होते, महिला म्हणजे-महान, शक्तिशाली- असा हा गौरवशाली शब्द. स्त्री शब्दही तसाच, "स्तृ" धातूवरून बनलेला. स्तृचा अर्थ होतो - विस्तार करणे, सर्वत्र प्रेम पसरवणे- मातेच्या भूमिकेतूनच हे प्रेम व्यापक व्हावे असा अभिप्रेत अर्थ मानला गेला आहे. पण आज मात्र "स्त्री" शब्द वा "महिला" शब्दाचा योगिक अर्थ लुप्तप्राय होऊन केवळ रूढार्थानेच महिला व स्त्री शब्द प्रचारात राहिला आहे. तसेच मनात अर्थ अभिप्रेत असलेला "अबला" हा शब्दही चलनात आलेला आहे, ह्या "अबला" शब्दामागे इतिहासाच्या अनंत घडामोडी उभ्या असतीलही आणि देश-कालमान परिस्थितीनुरूप त्याची आवश्यकता क्वचित काळी कधी भासलीही असेल परंतु स्वातंत्र्याची पहाट उगवली तरी स्त्रियांचं अबलत्व, तिचा दुय्यम दर्जा, तिला हीन मानण्याची प्रवृत्ती,भोगवस्तू म्हणून बघण्याची दृष्टी मात्र संपलेली नाही, उलट दिवसेंदिवस ती साधनस्वरूप बनून विविध प्रकारच्या जुलमाची, अत्याचाराची, भोगाची बळी ठरली आहे, पुरुषाच्या नानाप्रकारच्या विलासाची साधन ठरली आहे.

**ढोर, गवार, पशु, नारी**
**सब है ताडनके अधिकारी**

अशा संत वचनांनी तर तिला ढोर आणि पशूंच्या मालिकेत नेऊन बसवलं. त्यामुळे पशू, जनावरं आणि शूद्र तसेच स्त्रीजात ही लत्ताप्रहाराचे अधिकारी शोभतात असे तुच्छतेचे उद्‌गार पुरुषप्रधान समाज व्यवस्थेचा आधारासारखे वाटले आणि मग पुरुषांच्या विविध प्रकारच्या अत्याचाराची बळी ठरलेली स्त्री अधिकच अगतिक बनली, स्वत:ला "दुबळी" ठरवू लागली. प्रसंगी "अबला" म्हणवून घेण्यातच भूषण मानू लागली. - पुरुषाच्या संरक्षणाची ढाल सततच तिच्या पाठीशी असावी असं तिला वाटू लागलं. जी स्त्री स्वत:च संरक्षिता बनली आहे आणि स्वत: तिनेही तसे मानले आहे, ती माता बनल्यावर आपल्या बालकाचे योग्य तऱ्हेने सरंक्षण करणे, पालनपोषण करणे, त्याच्यावर योग्य संस्कार करणे, त्याच्या विविध प्रकारच्या विकासाच्या दृष्टीने सतर्क राहणे आदी कर्तव्ये कशी पार पाडू शकणार? म्हणून योग्य ज्ञान नसलेली अजागृत स्त्री ही फक्त जन्मदात्रीच्या भूमिकेपर्यन्तच आपली भूमिका थोड्या प्रमाणात बजावू शकते असे मला विविध जन्मदात्रींच्या अनुभवावरून वाटायला लागले आहे. मातृत्वाची संकल्पना जोवर स्त्रीला आकलन होत नाही, तोवर मातांचे शिक्षण होणे अशक्यप्राय आहे.

मातेबद्दलची संकल्पना किती उदात्त आहे हे मातृदेवो भव: ह्या वचनातून प्रकट होते, आधी मातृदेवाचे वंदन नंतर पितृदेव भव:— पित्याला वंदन आणि नंतर विद्या ज्ञान करणाऱ्या गुरूला वंदन-गुरुदेवो भव:, अशी ही भारतीय वैदिक संस्कृती मातेची महानता वर्णिली आहे मातेचे मातृत्व जन्म देणाच्या क्रियेपुरतेच मर्यादित नसते तर बालकांना घडविण्याच्या थोर कार्यापर्यन्त त्याची व्याप्ती जाऊन पोहचते. पक्षीप्राणी यांचे मातृत्व काही काळापुरतेच मर्यादित असते, मानवी मातेचं मातृत्व तिच्या जीवन सीमांतापलीकडे श्रद्धा भावनेनं अजरामर स्वरूपात टिकून राहतं, मात्र मातेचं प्रेम आणि मुलाची श्रद्धा आंधळी असली तर मातेचे बालकाचेही अकल्याणच घडते. मातेचं प्रेम डोळस असलं तर बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाचाच ते सदा ध्यास घेत राहतं.

आजच्या जाणीव जागृतीच्या युगात मातृत्वाच्या परिवर्तनशील संकल्पना शिक्षित मातेलाच प्रथम समजावून घेण्याची, ती चिंतनशील स्वरूपात हृदयात भिनवून घेण्याची काळाची गरज झाली आहे. त्यासाठीच मातृत्व जपण्याचे शिक्षण प्रत्येक मातेला, भगिनीला घेण्याची आवश्यकता आहे.

मानव हा बुद्धिवान, भावनाप्रधान प्राणी असल्यामुळे जीवन विकासाच्या संकल्पना सतत नव्या उर्ध्वगामी विचारांनी आणि भावनांनी गतिशील असायला हव्या असतात. कालचे स्त्रीचे स्त्रीत्व पातिव्रत्याच्या भावनेत सामावलेले होते - पती हाच तिचा परमेश्वर होता, परंपरागत भावनेनं तो जुलमी, क्रूर असला तरी त्याचीच पूजा तिनं बांधायची असे, पती निधनाने निराधार बनलेली स्त्री सती जात होती (आजही रुपकुंवर सती जाऊ शकते ही अंधश्रद्धेची आजच्या युगातली परमोच्च परिसीमाच) पती हेच तिचे जीवन सर्वस्व असायचे, तिच्या जगण्याचा हेतू पुरुष होता, तिच्या जगण्याचे साधन पुरुष होता. काळाच्या ओघात (अपवाद सोडून दिल्यास) ही परिस्थिती काही प्रमाणात शहर विभागात बदललेली असली तरी त्याचे किती तरी अवशेष आजही स्त्रीजीवनाला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु जागरुक झालेली स्त्री वैज्ञानिक दृष्टिकोनातून, सामाजिक जीवन दृष्टी घेऊन काही प्रमाणात आपल्या व्यक्तित्वाला पैलू पाडण्याचा थोडा प्रयत्न करीत आहे. आई वडिलांनी गुणांना संधी दिली, प्रोत्साहन दिले तर मुलाइतकेच नेत्रदीपक यश कमावतांना बहुतेक क्षेत्रात त्या दिसत आहेत. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण शहरात प्रस्थापित कुटुंबात माध्य. वा उच्च माध्य. शिक्षणापर्यन्त तरी निश्चितच पोहचले आहे, नव्हे महाविद्यालयीन शिक्षणाकडेही हा समाज वळलेला आहे. मात्र कुटुंबात आईची व्रत - वैकल्ये, उपास वगैरे अनुकरण पुढच्या मुलींच्या पिढीत बहुतेक संक्रमित होताना दिसते. हे सर्व आजही करण्याची आवश्यकता आहे वा नाही ही चिकित्साच त्या कधी करीत नाहीत. वडीलही परंपरागत विचारांच असले तर, पदवीधर मुलगीही स्वतंत्र विचारसरणीने नव्या परिवर्तनाच्या दिशेने पावलं टाकताना नगण्य स्वरूपात दिसते. त्यामुळे प्रस्थापित समाजातील मुलींच्या पुढची पिढी काळाची पावले ओळखून क्रांतीची नवी पाऊल वाट शोधण्याऐवजी मळलेल्या वाटेनेच जाताना दिसते. शहरातला कालचा बहुजन समाज आज मुलामुलींच्या शिक्षणाबद्दल थोडा

जागरुक झाला असला तरी परिवर्तनाच्या दिशेने त्यांच्याही मुलामुलींवरचे विषम संस्कार त्यांच्या परंपरागत जुन्या वळणाचेच बहुधा असतात. एकूण काय तर वैचारिक परिवर्तनाच्या दिशेने गेल्या दोन पिढ्यांमधील मुलामुलींवर फारसे पुरोगामी संस्कार त्यांच्या माता करू शकल्या नाहीत हेच स्पष्ट दिसते.

**परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्यास काय व्हायला हवे?**

स्त्रीचे, मातेचे पुरुषनिर्भर, पतिनिर्भर जीवन संपायला हवे, ती स्वरक्षिता व्हायला हवी. पुरुष स्वरक्षित स्वत:ला समजतोच, आता स्त्रीही स्वरक्षिता झाल्याने दोघांनाही दुप्पट संरक्षण व आश्वासनही मिळेल, दोघांचेही जीवन द्विगुणित होईल आणि कुटुंबात एकतेचे, पावित्र्याचे, विश्वासाचे वातावरण तयार होईल.

आज स्त्रीचे जीवन 'एक जपण्याची वस्तू,' म्हणून सुरक्षित करून ठेवली गेलेली असल्यामुळे परस्परांमध्ये विश्वासाची जी उणीव आहे त्यामुळे सतत संशयाचे वातावरण थोड्या थोड्या कारणामुळे वाढत जाते व त्यामुळे त्याची परिणती स्त्रीच्या परित्यक्त जीवनात तरी होते वा अहर्निश कुटुंबातील संघर्षामुळे अशांत वातावरणात तरी होते, ज्याचा परिणाम थेट तिच्या मातृत्वाच्या कर्तव्यावर अनिष्टपणे घडत राहतो. परित्यक्त माता आजही समाजाच्या उपेक्षेचा विषय तर ठरलीच आहे, परंतु तिच्या पुरुषनिष्ठ जीवनाची शोकांतिका मग कायदाही थांबवू शकत नाही. यासाठीच तिचे जीवन स्वनिर्भर होणे आणि तिने स्वविकास घडवून आणणे काळाची निकड समजली पाहिजे. स्वनिर्भरता आली की स्त्री स्वरक्षिता होणारच. मग पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री दुय्यम, पुरुष सबल आणि स्त्री अबला ही परंपरागत विषमतेची पाळामुळात रुजलेली भावना हळूहळू नष्ट व्हायला लागेल आणि क्रमश: परस्परांचे जीवनसाथी होण्याची पतिपत्नीमधील विश्वासभावना दृढ व्हायला लागेल, दोघेही परस्परांच्या गुणविकासासाठी धडपडायला लागतील, एकमेकांच्या गुणांची कदर करायला लागतील आणि त्याची सुरवातीची परिणती म्हणजे स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण घरात तयार होऊ लागेल – घरातले कोणतेही काम 'हे स्त्रियांचे,' 'हे पुरुषांचे' अशी वाटणी राहणार नाही, भेद राहणार नाही. मुलांचे संगोपन – त्यांचा विकास – त्यांच्यावर होणारे संस्कार दोघांचीही जबाबदारी राहील, तेव्हाच 'माणूस घडण्याच्या' प्रक्रियेलाही प्रारंभ होईल.

**सहयोगाचे शिक्षण**

आजचे शिक्षण हे सहयोगाचे शिक्षण की सहशिक्षण? या प्रश्नाचीही उकल व्हायला हवी आहे, सहयोग म्हणजे परस्पर विचारांची, आचारांची जुळणी. परिवर्तनाच्या दिशेनं वाटचाल सुरू झालेले बुद्धिनिष्ठ तरुण-तरुणी हा सहयोग साधण्याचा थोडा बहुत प्रयत्न करतात. परंतु परंपरागत मळलेल्या वाटेने जाणारेचे बहुसंख्य आहेत. आर्थिक व सामाजिक

क्षेत्रातही काही प्रमाणात सहयोगाची भूमिका झालेली आहे. उदा. समान वेतनाबाबतची आणि बहुतेक क्षेत्रातील स्त्रियाच्या प्रवेशाबाबतची. परंतु मनापासून हा सहयोग नसतो, कायद्याने आलेला असतो. म्हणून पुरुषश्रेष्ठ मनाची तक्रार व टीका सुरूच असते. त्यातून मग "स्त्रियांनी आपली क्षमता, कुवत ओळखून क्षेत्र निवडावे, सर्व क्षेत्रात लुडबुड करु नये" अशी विधानं पुरुषी अहंकारातून केली जातात. बऱ्याच स्त्रियाही आपल्या मानसिक दुर्बलतेची ग्वाही देऊन मुलींचे पाय मागे ओढण्याचा प्रयत्न करतात. एकूण काय तर स्त्रीच स्त्रीच्या विकास मार्गातील शत्रू ठरते – २० व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या दिशेनं उर्ध्वगामी होण्याच्या मार्गावर स्त्रीची वाटचाल असताना स्त्रीच धोंडा ठरू नये असे हृदयपूर्वक वाटते. ही मानसिक स्थिती मातेच्या जाणीवपूर्वक, उद्दिष्टपूर्ण शिक्षणाने व टप्याटप्याने करावयाच्या प्रबोधनानेच बदलू शकेल.

आपले शोषण होत आहे याची जाणीव एकदा प्रकर्षाने स्त्रीला झाली की त्यामागची कारणे ती शोधू लागेल – विषम समाज व्यवस्थेचे "शोषण" हे अपत्य आहे – तेव्हा कौटुंबिक व सामाजिक बाह्य व्यवहारात समानता आणीत असतानाच आपली दुय्यमतेची मानसिकताही बदलली पाहिजे, विचार व कृतीत समानता आणली पाहिजे असं तिचं तिलाच वाटू लागेल. तिची प्रत्येक कृती समानतेच्या दिशेनं घडायला लागली की तिचे आत्मबलही क्रमश: वाढायला लागेल – हे आत्मबल म्हणजेच स्त्री शक्ती – वास्तविक "शक्तीची" उपासना आपण स्त्री स्वरूपातच करीत आलो आहे - ज्ञानाचं प्रतीक "श्री सरस्वती" स्त्री लिंगीच, श्रमाचं प्रतीक, – वैभवाचं प्रतिक "लक्ष्मी" हीही स्त्री लिंगीच आणि दुष्ट प्रवृत्तींचं निर्दालन करणाऱ्या श्री दुर्गेचे, "महिषासुर मर्दिनीचे" शक्तिस्वरूप प्रतीकही स्त्री लिंगीच – तात्पर्य जगात सत्यम, शिवम, सुंदरमचं प्रतीक स्त्री स्वरूपातच एकत्र रूपानं पाहण्याची प्रेरणा मूळ भारतीय संस्कृतीनं दिली आहे. तेव्हा मूळ प्रेरणा स्थानापर्यन्त जाऊन शक्तिरूपी देवतेला आम्हाला हे आत्मशक्तीचं दान पुन्हा मागून घ्यायला हवं आहे. उदाहरण द्यायचं झालं तर स्त्रीशक्तीचं उदात्त आध्यात्मिक स्वरुप आजही महावीर संप्रदायात पहायला मिळतं. महावीरांनी जैन धर्म संप्रदायात स्त्री-पुरुष भेद मानला नाही त्यामुळे आजही श्रमण पुरुष आणि श्रमण स्त्रिया संन्यास दीक्षा घेतलेले आढळतात आणि जैन धर्मातील उदात्त तत्त्वांचा ग्रामोग्रामी प्रचार करताना दिसतात – त्यातही विशेष हे की, पुरुष श्रमणापेक्षा स्त्री श्रमण संख्या अधिक आहे – उदात्त, भव्य, दिव्य, तेजस्वी शक्तीचं दर्शन श्रमण स्त्रियांना घडल्याशिवायच का स्त्री शक्तीच जगाचा उद्धार करू शकते. सुखशांतीचे अधिष्ठान ठेवून जगाच्या कल्याणाचा मार्ग दाखवू शकते. असे प्रसार व प्रचार प्रवचनाद्वारे त्या ग्रामोग्रामी आदर्श करू शकतात. सामान्य स्त्रियांसाठी केवढा प्रेरणादर्शक आदर्श आहे हा.

**संघटित स्त्रीशक्तीचे जागरण :-** सहजीवनाप्रत पोहचण्यासाठी आधी संघटितरीत्या स्त्री शक्तीचे जागरण करून प्रथम विषमता नष्ट करणे हाच स्त्री शिक्षणाचा प्रथम हेतू राहील.

**आता भावसाक्षरतेचीच गरज :-** केवळ आजच्या प्रचलित अक्षर साक्षरतेने हे घडावयाचे नाही. तसे जर घडले असते तर शहरात स्त्री शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे म्हणून स्त्री पुरुष विषमता कमी झाली असती. उदा. सुशिक्षित स्त्रियांचे वाढते हुंडाबळीचे प्रमाण ही त्याची जिवंत आणि भयानक साक्ष आहे. अशा आणखी कितीतरी साक्षी काढता येतील काही विशिष्ट क्षेत्रात स्त्रियांना प्रवेश न देण्याचा आजवर झालेला हेतुपुरस्सर प्रयत्न आणि कितीतरी असंघठित क्षेत्रातील (ग्रामीण व शहरीही) स्त्रियांचे असमान वेतन वा मजुरी हे विषमताच स्पष्ट करतात. ग्रामीण विभागात आर्थिकदृष्ट्या स्त्री स्वावलंबी असतानाही नवरेशाहीचा होणारा जुलूम पुरुषाच्या व्यसनाधीनतेमुळे होणारी मारहाण आणि त्यामुळे आलेली संघर्षमय अगतिकता की त्यामुळे जाणीव जागृती तर दूरच परंतु तिचे जीवनच कायम उखडले जाते. ती एक माणूस म्हणून तिचा जगण्याचा हक्कच हिरावला जातो. त्यासाठीच अक्षर साक्षरतेपेक्षाही तिने भावसाक्षर होणे. तिच्या कुटुंबाचे दृष्टीने, तिच्या मुलांचे दृष्टीने अंतिम हिताचे ठरणार आहे. ही भावसाक्षरताच तिला तिच्या स्वत:ची आणि स्वत्वाबरोबर मातृत्वाचीही जाणीव देईल की, जे मातृत्व तिच्यातील डोळस वात्सल्य विकासाला नवी सुख शांतीची वाट दाखवील आणि मानवतेच्या संस्काराची जडण घडण तिच्या हातून घडेल आणि मग हेच खरे तिचे मातृत्वाचे आणि जागृतीचे शिक्षण ठरेल.

**भावसाक्षरतेसाठी आत्मबल :-** स्त्रीला आत्मबळ मिळण्यासाठी आता पंचमहापतिव्रता अहिल्या, तारा, सीता, द्रौपदी, मंदोदरी ह्या महान पतिव्रता स्त्रियांचे दाखले कृपया दिले जाऊ नयेत. त्या त्या काळातले ते आदर्श आज तसेच्या तसे जोपासल्यामुळेच आज सारे बिघडले आहे. पातिव्रत्याच्या खोट्या कल्पना विज्ञान युगात चालणार नाहीत. अन्यथा पुरुषप्रधान समाज व्यवस्था कदापि बदलणार नाही. उलट पातिव्रत्याच्या नावाखाली ही व्यवस्था तिला पुन्हा विषमतेच्या निकृष्ट स्थानाच्या कर्दमात ढकलेल, असे स्त्रियांनी निश्चितपणे लक्षात घेऊन त्यांना पुढचे पाऊल जागरूकतेने टाकावे लागेल.

**मानवप्रधान समाजव्यवस्था :-** आपल्याला ना हवी पुरुषप्रधान समाजव्यवस्था, ना हवी स्त्रीप्रधान समाजव्यवस्था. समानता, समताधिष्ठित पायावर उभी राहील, अशी मानवताप्रधान समाजव्यवस्था आणण्यासाठी आता पुढाकार घ्यावा लागेल तो स्त्रियांनाच, तोही संघटित स्वरूपात. जेथे पुरुषांनी सहयोग दिला तेथे त्यांना समवेत घेऊन दोघांनी मिळून कुटुंबाच्या, समाजाच्या, पर्यायाने देशाच्या विकासाची दिशा ठरवायची आहे आणि जेथे पुरुष सहयोग देणार नाही तेथे संघटितरीत्या त्यांनीच आपल्या आत्मसामर्थ्यावर पुढे जायचे आहे.

**स्वत:च्या उद्धाराची जाणीव व प्रचार माध्यमे :-** स्वत:च्या उद्धारासाठी पावले तिची तिलाच उचलावी लागणार आहेत. "आत्मा आत्मेन उद्धरति" हे गीतेचं तत्त्व तिचे तिलाच स्वीकारावं लागणार आहे. आज पुरुषापेक्षाही स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू कशा झाल्या आहेत

याचे अनंत दाखले तिला विषमतेच्या खंडणासाठी द्यावे लागणार आहेत. याच देशाच्या इतिहासाने पराक्रमी स्त्रियांचे, राजकारण धुरंधर स्त्रियांचे आणि आदर्श पुत्र घडविणाऱ्या मातांचेही दर्शन वेळोवेळी घडविले आहे हे तिला विविध प्रचार माध्यमांद्वारे शिकवावे लागणार आहे – मात्र मातांचे शिक्षण होताना जी विविध प्रसार माध्यमे आपण उपयोगात आणणार आहोत ती अधिक दृकश्राव्य राहतील आणि जे कार्यक्रम या माध्यमातून दाखवले जातील त्यांच्यात एकसूत्रीपणा कसा राहील यांचाही कटाक्ष ठेवावा लागेल. उदा. वेदकाळातील स्त्रियांना शिक्षणाचे, मौंजी बंधन आदींचे समान अधिकार होते याची चित्रमालिका दाखवून होताच दाखविल्या जाणाऱ्या शृंगारप्रधान जाहिराती, तिच्या उघड्या नागड्या शरीराचं प्रदर्शन करणारे चित्रपट, वा मध्यरात्री प्रौढासाठी दाखविले जाणारे स्त्री-भोगी चित्रपट यामुळे तिच्या मनात स्त्री जीवनाच्या समानतेची जी प्रतिमा पहिल्या चित्रमालिकेत उभी झालेली असते ती पार पुसली जाते आणि ती म्हणजे एक वस्तू, पुरुषाच्या भोगाचे एक साधन अशा स्वरूपात दृढ होते. दूरदर्शनसारखी प्रसार माध्यमे कटाक्षाने स्त्री जीवनाचा स्तर उंचावरणारेच कार्यक्रम दाखवतील असा कटाक्ष हवा. नव्या योजनेत स्त्री संघटनांचा प्रतिनिधी सेन्सॉर बोर्डावर नेमण्याची शिफारस झाली आहे. सर्वच स्त्री विकासाच्या शिफारशी अभिनंदनीय आहेत. पुढची शुभचिन्हे कृती स्वरूपात आशादर्शक असली तरी कोठे नोकरशाहीची उदासीनता तर कोठे शिथिलता तसेच राजकारणाचा स्वार्थी हस्तक्षेप योग्य अंमलबजावणीत अडथळा न आणो हीच अपेक्षा.

**महाराष्ट्राचे नेतृत्व :-** महाराष्ट्र स्त्रीशिक्षणाबाबत, प्रौढ शिक्षणाबाबत अग्रेसर समजला जातो. आताही महाराष्ट्रानेच "समानतेचे शिक्षण–मुलींचे शिक्षण" संदर्भात नव्या आदर्शांसाठी, नव्या पायंड्यासाठी जे पाऊल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या माध्यमातून उचललेले आहे, ते आम्हाला नवी दिशा दाखविणारे ठरू दे. स्त्रीला विकासाच्या नव्या दिशा दाखविणाऱ्या स्त्री संघटनांचे सहकार्य घेऊन स्त्री शिक्षणाचे कार्य करणाऱ्या शिक्षिका, मुख्याध्यापिका यांना प्रबोधनाद्वारा नवी समानतेची दृष्टी देण्याचा परिषदेने जो स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे त्या बद्दल शतशः ऋणी आहोत. तसेच अग्रक्रमाने मातांच्या शिक्षणाची जबाबदारी मातृप्रबोधनासारख्या प्रकल्पाद्वारे घेऊन एका नव्या प्रयोगशीलतेचे दर्शन आपण भारताच्या शिक्षण क्षेत्रात घडवले आहे. आता मातृप्रबोधनाबरोबरच पितृप्रबोधनाचा प्रकल्पही महाराष्ट्रानेच प्रथम हाती घ्यावा. त्या बद्दल आम्ही भगिनी निश्चितच आभारी व कृतज्ञ राहू.

---

## निबंधासाठी संदर्भ ग्रंथसूची

१) स्त्री शक्ती – ले. आचार्य श्री. विनोबा भावे, परमधाम प्रकाशन, पवनार
२) स्त्री पुरुष सहजीवन – ले. आचार्य श्री. दादा धर्माधिकारी, परमधाम प्रकाशन, पवनार.
३) विज्ञान युगातील आई – ले. प्राध्यापक श्री. अनील थत्ते, साधना प्रकाशन, पुणे.
४) मर्म – ले. प्रा. सु. श्री. पांढरीपांडे, नागपूर, साधना प्रकाशन, पुणे.

## एकविसाव्या शतकाची आव्हाने स्वीकारण्यासाठी मुलींच्या शिक्षणाच्या विशेष संदर्भात शिक्षकांचा कार्यभाग

# आजची भारतीय स्त्री

श्रीमती ग्लोरिया डिसोझा

भारत देश आज अशा कालखंडात आहे की त्याच्यापुढे जी आव्हाने उभी आहेत त्यातून मार्ग काढीत असताना त्याची लोकशाही विचारसरणी व कृतीही त्याच्या विकास-कार्यातून स्पष्टपणे दिसत आहे.

लोकशाहीची मूल्ये आणि त्यावरील वाढता विश्वास ह्या पार्श्वभूमीवर आजची भारतीय अबला ही एक 'ज्योती आणि शक्ती' चे केंद्र बनत आहे. मात्र त्या शक्तीचा उपयोग आजतागायत अत्यल्प प्रमाणातच करून घेण्यात आलेला आहे.

भारतीय संस्कृतीचा वारसा, मग तो आध्यात्मिक असो, सामाजिक असो, किंवा राजकीय क्षेत्रातील असो, त्यात अभिमान वाटावा असे कर्तृत्व दाखविणाऱ्या नारीरत्नांच्या उदाहरणांनी अलंकृत केलेला आहे. मीराबाई, जिजाबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, अहिल्या बाई होळकर आणि इंदिरा गांधी ही त्यांतील दैदीप्यमान उदाहरणे आहेत.

आज, भारतात अशा अनेक स्त्रिया आहेत. त्या शहरातील असोत अथवा खेड्यातील असोत, त्या व्यावसायिक क्षेत्रातील असोत किंवा कुशल, अर्ध कुशल अथवा अकुशल कामगार असोत, त्यांची शक्ती इतकी मोठी आहे की त्या शक्तीची नोंद घ्यावीच लागेल.

पण वस्तुस्थिती अशी आहे की स्त्रियांचा एक फार मोठा घटक, अज्ञान व त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या पिळवणुकीचे अगतिकपणे भक्ष्य ठरत आहे. कारण अज्ञान व शोषणाच्या शृंखला तोडून टाकण्यासाठी लागणारी मानसिक जागृती अजून त्यांच्यात झालेली नाही.

**आव्हान**

असे असले तरी आपण भारतीय स्त्रीला स्वत:चे भवितव्य घडविण्यासाठी सिद्ध करीत आहोत. अशावेळी विद्यमान परिस्थिती आणि भविष्य काळातील तिचे भवितव्य ठरविण्याच्या ह्या कार्यात, आपणांसमोर दोन आव्हाने अगदी स्पष्ट पणे उभी आहेत. लाखो

स्त्रियांची मानसिक जागृती करून, त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त शक्तीची जाणीव त्यांना करून देणे हे पहिले आव्हान आहे आणि त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे हे दुसरे आव्हान आहे.

वरील दोन्ही गोष्टी एकत्रितपणे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यांना दिले जाणारे शिक्षण औपचारिक असो किंवा अनौपचारिक असो, एकविसाव्या शतकात सुविहीतपणे प्रवेश करण्यासाठी जगात होत असलेल्या बदलांशी सुसंवादी भूमिका घेऊन, त्यांच्याशी उपयुक्त संबंध साधण्याची क्षमता देईल आणि, एकविसाव्या शतकात प्रवेश करण्यासाठी स्त्रियांना सिद्ध करील अशा प्रकारची क्षमता त्या शिक्षणात असलीच पाहिजे. मग, ते शिक्षण घेणारी स्त्री खेड्यातील असो अथवा शहरातील असो.

**शिक्षणाच्या क्षेत्रात आज सामान्यपणे दिसून येणारे चित्र**

वर नमूद केलेले उदिष्ट हे आपल्या देशातील मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत, शिक्षकांसमोर उभे असलेले फार मोठे आव्हान आहे. कारण आजचे बहुसंख्य शिक्षक हे, ज्या शिक्षण पद्धतीतून तयार झालेले आहेत, ती पद्धती, पाठ्य पुस्तकातून किंवा शिक्षकाने दिलेल्या टाचणांवरून किंवा वर्गातील फळ्यावरून नकलून घेण्यासाठी दिलेल्या माहितीची घोकंपट्टी करून ज्ञान संपादन करता येते, ह्या गोष्टीत समाधान मानणाऱ्या शिक्षण प्रणालीतून तयार झालेले आहेत; असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

अशा प्रकारे मन मारून टाकणारे नसले तरी बुद्धीला योग्य चालना न देणाऱ्या शिक्षण पद्धतीचा वापर आज सरसकट केला जात आहे. आणि मानवी साधनसामुग्री (म्हणजे मुले) त्याच प्रमाणे आर्थिक साधनसामुग्री अशा दोन्ही प्रकारच्या साधनसामुग्रीच्या फार मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या केविलवाण्या अपव्ययाला कारणीभूत होत आहे.

अर्ध्यातून शाळा सोडणाऱ्या {dropouts} विद्यार्थ्यांची मोठी संख्या ही शिक्षण क्षेत्रात फार मोठी काळजीची बाब झालेली आहे. ही परिस्थिती प्रामुख्याने समाजाच्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांत, त्याचप्रमाणे ज्या समाजातील, पहिलीच पिढी शिकत आहे, अशा लोकांत दिसून येते. आणि शाळा अर्ध्यातून सोडण्याचा ह्या दुर्दैवी घटनेत विशेषत: मुलींची संख्या फार मोठी आहे, हे कटुसत्य आहे.

**हे दृष्य बदलू शकेल का?**

सामान्य भारतीय स्त्रीला एकविसाव्या शतकातील उपयुक्त आणि नियोजित कार्यातील आपला वाटा उचलण्यासाठी तयार करण्याच्या दिशेने लक्षणीय आणि निश्चित बदल घडवून आणता येतील असा विश्वास 'परिसर आशा' या संस्थेला वाटतो.

१९८२ सालापासून 'परिसर आशा' ही संस्था 'परिसर परिचय' शिक्षण पद्धतीचा प्रसार करीत आहे. ह्या पद्धतीत सामान्य विज्ञान, समाज शास्त्र आणि गणित ह्या विषयांना; परस्परांना साहाय्यभूत होणारी एकात्मिकता साधण्याचा प्रयत्न केला जातो. तिच्यातून केवळ ज्ञानाचीच वृद्धी व्हावी असा दृष्टिकोन न ठेवता व्यक्तिविकास होऊन त्याला त्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करता यावा म्हणून जरूर त्या क्षमताही प्राप्त व्हाव्या. त्या क्षमतांद्वारे मिळालेल्या ज्ञानाचा वापर, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी करता यावा, इतकेच नव्हे तर त्यातूनच विधायक दृष्टिकोन आणि विधायक मूल्ये वाढीस लागावी, आणि जीवन सुसंवादी व सेवाभावी व्हावे असाही दृष्टिकोन ठेवला जातो.

अशा प्रकारच्या शिक्षण पद्धतीत, विद्यार्थ्यांचा सर्व परिसर- नैसर्गिक आणि कृत्रिम हा शिकवण्याचे आणि शिकण्याचे साधन बनतो. अभ्यासाचा प्रत्येक घटक हाताळताना प्रथम विद्यार्थ्यांच्या परिसरातून घेतलेला एकादा अनुभव उपयोगात आणून सुरुवात केली जाते. अशा प्रकारे त्याचा अनुभव उपयोगात आणला की तो विद्यार्थी प्रश्न विचारू लागतो; त्यामुळे त्याला निरीक्षणाची संधी मिळते व त्याची संवेदना जागृत होते.

विद्यार्थ्याला प्रश्न विचारण्यासाठी चालना मिळते व चौकसपणे पाहणी करण्यातून आणि चर्चेतून विषयाचे आकलन होऊन ज्ञान मिळवणे त्यास साध्य होते. म्हणून अभ्यासाचा घटक जरी सामान्य विज्ञान, भूगोल किंवा गणितातील संबोधासंबंधित असला, किंवा समाज जीवनातून येणाऱ्या सामाजिक अथवा सांस्कृतिक बाबीसंबंधी असला तरी त्याचाही पाठपुरावा करण्यासाठी ह्या पद्धतीचा उपयोग होतो.

अनुभव – जिज्ञासा – चर्चा – शोध घेणे – विचारांची देवाण घेवाण करणे ह्या प्रक्रियेचा वापर परिणामकारकपणे करता येतो. एकदा ज्ञान प्राप्ती झाली की विद्यार्थ्याला निरनिराळ्या नोंद कौशल्यांची आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी लागणाऱ्या कौशल्यांचा परिचय करून देण्यात येतो. ते करण्यासाठी फक्त भाषाच नव्हे तर गोष्टी, गाणी, नाट्य, नकला, चित्रकला, हस्तकला ह्यांचाही उपयोग केला जातो.

### मुलींसाठी उपयुक्त शिक्षण

मुलींना शिक्षण देण्याचा विचार करताना – मग त्या मुली खेड्यातल्या असोत किंवा शहरातल्या असोत – त्यांना उपयुक्त शिक्षण देण्याच्या कार्यात परिसर परिचय शिक्षण पद्धतीत कोणती विशेषमूल्ये दिसून येतात, ते पाहू या.

१) शिकण्यासाठी जो प्रयत्न करावयाचा तो विद्यार्थिनीच्या परिसरातून तिने घेतलेल्या अनुभवांशी निगडित असावा. त्यामुळे जे ज्ञान विद्यार्थिनीने मिळविले, ज्या क्षमता आत्मसात केल्या आणि जे दृष्टिकोन व मूल्ये समजून घेतली, त्या मधून ती जे काही शिकली

त्या गोष्टी ती सहज आठवू शकेल. कारण आता तिच्याकडे जिवंत पाठ्यपुस्तक म्हणजे तिचा परिसरातला अनुभव आहे. त्याच्यातून तिला संदर्भ शोधता येईल. त्यामुळे तिला घरकाम हे शिक्षणाच्या मार्गातील धोंड आहे असे वाटणार नाही. तर उलट गणित, सामान्य विज्ञान आणि भूगोलातील संबोध आणखी चांगले समजण्यासाठी तो एक मार्ग ठरेल. आणि शिकताना आत्मसात केलेली कौशल्ये व दृष्टिकोन ह्यांचा व्यवहारात वापर करण्याची संधीही तिला मिळेल.

२) मिळविलेल्या ज्ञानाचा, क्षमतांचा, दृष्टिकोनांचा आणि मूल्यांचा वापर तिला समस्या सोडविण्यासाठी विपुल प्रमाणावर करता येईल. अशा शिक्षणाने समस्या सोडविण्याचे परिणामकारक मार्ग शोधता आल्यामुळे तिला स्वत:ची पात्रता कळून येईल आणि त्यामुळे स्त्रीची दुसऱ्यावर विसंबून राहण्याची प्रवृत्ती, जिच्या मुळे अनेक वेळा स्त्री – शोषणाची संधी इतरांना मिळते, ती प्रवृत्तीच नष्ट होईल.

३) ज्या शिक्षण पद्धतीचा रोख परिसरातील अनुभवांचा वापर करण्यावर आहे, त्या पद्धतीद्वारे परंपरागत रूढी आणि आधुनिक सुधारणा ह्यांचा योग्य मेळ कसा साधावयाचा ते पहायला विद्यार्थिनीला मार्गदर्शन करता येईल. अनेक भारतीय स्त्रियांना आधुनिक उपयुक्त गोष्टीही स्वीकारणे कठीण वाटते. जुन्या नव्यांचा समन्वय साधणे शक्य आहे ही गोष्ट परिसर परिचय शिक्षण पद्धती दाखवून देते.

शाश्वत आणि जागतिक स्वरूपाची मूल्ये अबाधित ठेवल्यास पारंपरिकता आणि आधुनिकता गुण्यागोविंदाने नांदू शकतील हे परिसर परिचय पद्धती दाखवून देते.

अंधश्रद्धेचा पाया अज्ञानात असतो. स्त्रियांवर तिचा पगडा फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. जेव्हा ज्ञानाचा प्रकाश परिसराशी संबंधित असलेल्या अंधश्रद्धांवर पडतो, तेव्हाच अज्ञानाचा अंधार दूर होतो. तसे झाले तर आपण खूप काही साध्य केले असे होईल.

**शिक्षकाची भूमिका**

शिक्षकाची भूमिका फक्त शैक्षणिक तयारी आणि, आपल्या कार्याला तनमनधनाने वाहून घेण्याच्या तयारीची अपेक्षा करते. इतकेच नव्हे तर संवेदना क्षमता आणि मोकळेपणा ह्यांचीही अपेक्षा करते. ह्या गोष्टी तर परंपरागत भारतीय गुरूंच्या ठिकाणी दिसून येतात. गुरु कधीही आज्ञा देत नसत, किंवा दडपण आणीत नसत, तर आपल्या शिष्याचे हात हातात घेऊनच ते दोघे एकत्रपणे प्रगती, ज्ञान, सेवा, आणि सुसंवाद ह्यांचा शोध घेत असत.

आज महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा रौप्यमहोत्सव साजरा केला जात आहे.

भारताला एकविसाव्या शतकात घेऊन जाण्यासाठी शिक्षक ज्या प्रेरणेची आणि मार्गदर्शनाची अपेक्षा ह्या परिषदेकडून करतील, ती प्रेरणा व ते मार्गदर्शन देण्याची ह्या संस्थेची क्षमता दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो आणि भारताच्या सूज्ञपणाचा आणि प्रेमाचा प्रकाश सर्व राष्ट्रांना लाभो, अशी विशेष प्रार्थना आजच्या दिवशी 'परिसर आशा' संस्थेतर्फे करून मी आपला निरोप घेते – धन्यवाद.

● ● ●

# समानतेसाठी शिक्षण

# मागासवर्गीयांचे शिक्षण

**पार्श्वभूमी : -**

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी श्रमावर आधारित चार वर्णांची विभागणी वेदकालात झाली. या विभागणीला धर्माची व शास्त्राची मान्यता आहे, असे म्हणून ती जन्मावर अवलंबून ठेवली गेली. त्यामुळे वर्णव्यवस्थेत बदल होणे अशक्य होऊन बसले. पिढ्यान् पिढ्या होत असलेला अन्याय मुकाट्याने सहन करून हा उपेक्षित व पददलित समाज अजही सामाजिक न्याय पूर्णार्थाने मिळवू शकला नाही, ही गोष्ट खरी आहे. शिक्षणाच्या दृष्टीने विचार केल्यास १८५५ सालापर्यन्त हा समाज शिक्षणाला पारखा झालेला होता किंब्हुना शूद्र व शिक्षण हे शब्द एकत्र कधीच आले नव्हते.

शिक्षणाशिवाय मागासवर्गाची सुधारणा होणे शक्य नाही ही गोष्ट सर्वप्रथम लक्षात आली ती महात्मा जोतिबा फुले यांच्या. महात्मा गांधींनी तर अस्पृश्यांचा प्रश्न हा भारतीय संस्कृतीचा कलंक मानून, तो पुसून टाकण्याचा देशव्यापी प्रयत्न केला. माणसाला माणसानेच तुच्छ लेखावे, पशूपेक्षाही त्यांना हीन समजावे ही कल्पनाच किती भयानक होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात काही महान विभूती निर्माण झाल्या. त्यांच्या अथक प्रयत्नाने व विचाराने सर्वसामान्य माणसाला विचार करावयास लावण्याचे व अनुसूचित जातीच्या लोकांत जाणीवजागृती निर्माण करण्याचे काम ह्या विभूतींनी केले. त्यांत महात्मा जोतिबा फुले, सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव, डॉ. आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या नावाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात शासकीय पातळीवरून अनुसूचित जातीच्या शिक्षणाकरिता प्रयत्न करण्यात आले. पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वातंत्र्य, समता, बंधुता ह्या तत्त्वांवर आधारित असलेल्या राज्यघटनेप्रमाणे मागास जातीच्या सर्वांगीण विकासाकरिता भरीव अशा योजना आखण्यात आल्या. शिक्षणाशिवाय विकास होऊ शकत नाही हे सत्य असल्यामुळे शिक्षण विषयक योजनांवर विशेष भर देण्यात आला व केंद्र शासन व राज्य शासन ह्यांनी विविध खात्यांमार्फत योजना कार्यान्वित केल्या.

आज परिस्थितीत बरीच सुधारणा झाली आहे व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेत जाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनांमुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या प्रमाणात भरीव अशी वाढ झाली आहे.

भारतीय घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार वेळोवेळी ज्या जाती व गटांचा समावेश अनुसूचित म्हणून करण्यात आला त्या सर्व जाती व गटांना "अनुसूचित जाती" म्हणून संबोधण्यात येते. भारतात अनुसूचित जातींची संख्या एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के इतकी आहे तर महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातींची लोकसंख्या ७.१४% आहे.

सन१९६१ ला महाराष्ट्राचे साक्षरतेचे प्रमाण २९.९% होते ते आता १९८१ नुसार ४७.२% झाले आहे. सन १९६१साली भारतातील अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण १०.२७% होते तर महाराष्ट्रात अनुसूचित जातीचे साक्षरतेचे प्रमाण १५.७८% होते तर आता तेच प्रमाण ३५.५५% आहे. अनुसूचित जातीच्या साक्षरतेच्या प्रमाणात भारताच्या तुलनेत वाढ झालेली आहे.

अनुसूचित जातींना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पहिल्या पंचवार्षिक योजनेत ३१.९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती व त्यात वेळोवेळी वाढ होऊन सहाव्या पंचवार्षिक योजनेत अनुसूचित जाती व मागासवर्गीयांकरिता ९६०.३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी शिक्षणावर ५०६.५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

महाराष्ट्रातसुद्धा शिक्षण व समाज कल्याण खात्यामार्फत खास योजना कार्यान्वित करण्यात येत असून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येत आहे. इतर राज्यांच्या तुलनेने अनुसूचित जातींच्या शिक्षणाबद्दलचे महाराष्ट्राचे प्रयत्न व प्रगती वाखाणण्यासारखी आहे असे अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षणाच्या आकड्यांवरून दिसते. असे असले तरी अद्यापही बरीच वाटचाल करावयाची आहे हे मात्र निश्चित.

**मागासवर्गीयांच्या शिक्षणाकरिता केलेले प्रयत्न –**

**महात्मा जोतिराव फुले (जन्म ११.४.१८२७ – मृत्यू २८.११.१८९०)**

भारताच्या उपलब्ध इतिहासात कनिष्ठ वर्गास शिक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न, वरिष्ठ वर्गाने धर्माच्या व शास्त्राच्या नावाखाली केले. शेकडो वर्षांच्या संस्कारांमुळे, रुढींमुळे आपणही शिक्षण घ्यावे असे शूद्रांच्या मनात कधीही येत नव्हते. पण या शूद्र, अतिशूद्र लोकांची प्रगती साधायची असेल, त्यांना अज्ञानातून बाहेर काढावयाचे असेल, त्यांची गरिबी दूर करावयाची असेल तर फक्त शिक्षण हे एकच साधन आहे, याची जोतीरावांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच २९ मे १८५२ रोजी त्यांनी स्वत:च्या खर्चाने अस्पृश्यांसाठी वेताळ पेठ, पुणे येथे शाळा सुरू केली. अशा तऱ्हेची शाळा काढणारे जोतिबा हेच पहिले होते. अस्पृश्य - शूद्र लोकांना शिकविण्यामागे त्यांना साक्षर करावे एवढाच जोतिबांचा हेतू नव्हता, तर "जिच्यापासून आपले बरे वाईट समजण्याची शक्ती त्यास येईल अशी चांगल्या प्रकारची विद्या त्यास द्यावी" असे जोतिबा म्हणतात. परंपरेच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी मुलांना सुतारी, लोहारी, गवंडी काम, विणकाम याचे शिक्षण द्यावे असे त्यांनी सरकारलाही सुचविले होते. अस्पृश्यतेची उचलबांगडी अस्पृश्य समाजातील सुशिक्षितच अधिक परिणामकारकरीतीने करू शकतील असे त्यांचे मत होते. या समाजाची सुखदु:खे जाणणारा

त्याच समाजातील शिक्षक असावा, तोच आपल्या विद्यार्थ्यांना अधिक आपुलकीने, समरसतेने शिकवू शकेल असे त्यांना वाटत होते.

शुद्रातिशूद्रात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, निरनिराळ्या कनिष्ठ जातीतून प्रशिक्षित शिक्षक तयार करावेत अशा सूचना जोतिरावांनी सरकारला केल्या होत्या. त्या सर्व गोष्टी व्यवहारात आल्या.

**सयाजीराव गायकवाड (जन्म १७.३.१८६३ मृत्यू ६.२.१९३९)**

सयाजीराव गायकवाड हे बडोद्याचे महाराज. पण सयाजीरावांचे दुसरे नाव सुधारणा. आपल्या कारकीर्दीत त्यांनी सर्वच क्षेत्रात प्रजेसाठी सुधारणा केल्या. १८९२ साली महाराजांनी अमरेली येथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. १९०६ सालापासून सर्व राज्यभर प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. पुढारलेल्या जातींच्या शिक्षणाप्रमाणे मागासलेल्या जातींच्या शिक्षणाकडे महाराजांचे लक्ष होते.

या जातींची सुधारणा फक्त शिक्षणानेच होऊ शकेल हे महाराजांना पटले होते. त्यासाठी सुरुवातीला वसतिगृह असलेल्या शाळा सहा ठिकाणी स्थापन करण्यात आल्या. इतर लोकांशी संबंध आल्यामुळे या मागास जातीत सुधारणा होऊ लागली. या शाळांतून प्राथमिक शिक्षणाबरोबरच शेतकी व बागायती काम, भरतकाम, विणकाम शिकवीत.

डॉ. आंबेडकरांना बडोदे सरकारातून मॅट्रिकचे पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली होती. बाबासाहेबांना शिष्यवृत्ती देतेवेळी सयाजी महाराजांनी सांगितले होते की, "शिक्षण संपादन केल्यानंतर तुम्ही आपल्या जातीच्या व विद्येत मागे पडलेल्या लोकात शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी हाती घेतली पाहिजे. आम्ही बडोद्यात अस्पृश्य वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी सुरू केली आहे. तुम्ही आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे."

महाराजांच्या या उद्‌गारांवरून मागासांच्या हिताची त्यांची तळमळ दिसून येते.

**कर्मवीर भाऊराव पाटील (जन्म १८८७ – मृत्यू १९५९)**

भाऊराव पाटलांनी गरीब, ग्रामीण, बहुजन समाजातील मुलांची स्थिती प्रत्यक्ष पाहिली होती. त्यांना शिक्षण घेण्यात प्रवृत्त केले तरी त्यासाठी लागणारी आर्थिक कुवत त्यांच्यापाशी नव्हती. म्हणूनच वसतिगृहात राहूनच शिक्षण देण्याची कल्पना त्यांच्या मनात आली. शिक्षण फक्त पुस्तकी आणि पोषाखी असू नये. शिक्षाबरोबरच सुसंस्कार व्हावेत, शिक्षणाची व्यवहाराशी सांगड असावी हे विचार त्यांनी प्रत्यक्ष अमलात आणले. शाळेबरोबर

वसतिगृहात राहण्याची सोयही त्यांनी मोफत केली. त्यामुळे सर्व जातीतील, सर्व थरातील, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील गरीब मुलांना शिक्षणाचा लाभ झाला.

या मुलांत अठरापगड जातीची मुले असत. पण खालचा, वरचा असा भेदभाव, शिवाशिव, अस्पृश्यता पाळली जात नसे. एकात्मतेचे संस्कार, समानतेबरोबर श्रमाची प्रतिष्ठा, स्वावलंबन, स्वाभिमान यांचे संस्कार मुलावर होते होते. शिस्त, काटकसर इ. गोष्टी मुले शिकत होती.

ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी शिक्षित झाला पाहिजे या तळमळीतून भाऊरावांनी पश्चिम महाराष्ट्रात गावोगावी शाळा उघडल्या. मोफत वसतिगृह प्रवेशासाठी कुठल्याही जातींचे धर्मांचे बंधन नव्हते. १९७९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची तीनशेवर माध्यमिक विद्यालये झाली आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर –**

मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी मागासवर्गातील लोकांनी प्रयत्न केले तर ते परिणामकारक होतील असे महात्मा जोतिरावांचे मत होते ते किती सत्य होते याचे उदाहरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. बाबासाहेबांनी मागासलेल्या समाजाची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रगती होईल यादृष्टीने पोटतिडकीने प्रयत्न केले. आज जी मागासवर्गीयांची उन्नती झालेली दिसते ती म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांचे फळ होय. त्याबरोबरच सरकारी पातळीवरही अनेक न्याय्यहक्क प्राप्त करून घेण्याची कामगिरी बाबासाहेबांनी पार पाडली. भारतीय घटनेच्या या शिल्पकाराने भारतीय घटनेत मागासलेल्या वर्गासाठी निश्चित तरतुदी ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शाळा, महाविद्यालये, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात उघडली. त्याचा लाभ आजही हजारो तरुण घेत आहेत.

**विठ्ठल रामजी शिंदे (जन्म १८७३ – मृत्यू १९४४)**

अस्पृश्य समाजाचा विकास शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही व त्याकरिता ह्या समाजाला शिक्षणासाठी प्रवृत्त केले पाहिजे अशा विचाराने श्री. शिंदे ह्यांनी अनुसूचित जातीच्या मुलांकरिता १९०६ साली शाळा सुरू केली. त्याचप्रमाणे शाळा त्यांच्या घराजवळ असाव्या म्हणून गलिच्छ वस्त्यांजवळ शाळा सुरू करून कार्यकर्त्यांच्या द्वारे प्रचार करून मुलांना शाळेत आणावयाचे महत्त्वपूर्ण काम केले. फक्त शाळा सुरू करून चालणार नाही, विद्यार्थी एका ठिकाणी राहाणे आवश्यक आहे म्हणून वसतिगृहाची स्थापना केली. अस्पृश्योद्धाराचे अत्यंत महत्त्वाचे काम केले. शिक्षणासाठी पालकांनी मुलांना शाळेत पाठवावे म्हणून सभा संमेलनाद्वारे जाणीव जागृती निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम केले.

**शासकीय पातळीवरील प्रयत्न –**

१८५६ साली सरकारने मागासलेल्या समाजाला सर्व सरकारी शाळांत शिक्षण घेण्याचा हक्क आहे हे स्पष्ट करून प्रथमच मागासवर्गीयांनी न्याय मिळवून दिला. १८८२ च्या सुमारास अनुसूचित जाती व जमाती यांच्या शिक्षणविषयक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी जे कमिशन नेमले त्यामुळे फायदा झाला तो म्हणजे सरकारने या शिफारशींचा पाठपुरावा केला.

**स्टार्ट कमिशन –**

जुन्या मुंबई राज्यात स्वातंत्र्यपूर्व काळात आणखी एक कमिशन एका आय.सी.एस. अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली नेमले. त्या कमिशनचे नाव स्टार्ट कमिशन. समानतेची वागणूक, सर्व जमातीच्या मुलांना एकाच प्रकारच्या शाळा, मागासलेल्या वर्गातील शिक्षकांच्या नेमणुका व स्वतंत्र खात्याची स्थापना अशा गोष्टींची शिफारशीद्वारा मागणी या कमिशनने केली. यामुळे सन १९३०–३१ मध्ये मुंबई राज्यात मागासलेल्या वर्गासाठी एक स्वतंत्र खाते उघडण्यात आले.

**डॉ. एलबीन व डॉ. ढेबर कमिशन –**

स्वातंत्र्योत्तर काळात मागासलेल्या समाजाच्या शिक्षणाला चांगली चालना मिळाली. देशपातळीवरील या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनेमध्ये तशी तरतूद करण्यात आली. १९५९ साली डॉ. एलबीन समिती व १९६० साली राष्ट्राध्यक्षांनी नेमलेल्या ढेबर यांच्या अध्यक्षतेखालील कमिशनच्या शिफारशींमुळे अनुसूचित जमातीच्या शिक्षणाला चालना मिळून अनेक सवलती मिळू लागल्या.

# मागासवर्गीयांचे शिक्षण
# विविध-आयोगांनी-केलेल्या शिफारशी

राज्यघटनेच्या कलम ३४१ अन्वये नमूद केल्याप्रमाणे "अनुसूचित जाती" या सदराखाली अशा सर्व जातींचा समावेश होतो की ज्यांना अनुसूचित जाती असे म्हटले जाते. ह्यात सर्वसाधारणपणे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचा समावेश होतो. (अनुसूचित जातींची भारतातील लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या १५ टक्के आहे व सर्वसाधारणपणे ९० टक्के लोकांचे वास्तव्य ग्रामीण भागात आहे) भारतीय संविधानाच्या कलम ४५ अन्वये राज्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून द्याव्यात असे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती व जमातीच्या मुलांच्या शिक्षणाकरिता खास प्रयत्न करण्यात यावे असे कलम ४६ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

**विविध आयोगाने केलेल्या शिफारशी :**

**१) कोठारी आयोग – (१९६४–६६)**

राष्ट्रीय परंपरा व राष्ट्रीय गरजा यांचा योग्य समन्वय साधून मागासवर्गीयांच्या शिक्षणाची आखणी खाली पाहिजे. यादृष्टीने कोठारी आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे.

– अनुसूचित जमातीतील लोकांच्या शिक्षणासाठी आज असलेल्या योजना पुढेही चालू रहाव्यात.

– भटक्या आणि निमभटक्या जमातींच्या प्रश्नांचा विशेष अभ्यास करून जेथे पुरेशा संख्येने विद्यार्थी सापडू शकतील तेथे त्यांच्यासाठी फिरत्या (मोबाईल) आणि इतर शैक्षणिक सोयी निर्माण केल्या जाव्यात.

– अशा जमातीतील मुलांसाठी वसतिगृहाची सोय केली जावी.

– वर्गीकृत विभाग व अनुसूचित जमाती यांच्याबाबत नेमण्यात आलेल्या मंडळांच्या शिफारशींची आणि नियोजन मंडळ आणि नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशन रिसर्च आणि ट्रेनिंग यांच्यातर्फे आदिवासी जमातींची शिक्षणासाठी जी दोन चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती त्यात करण्यात आलेल्या शिफारशींचा आम्ही पुरस्कार करीत आहोत.

– सर्व आदिवासी जमातीतील मुलांसाठी ५ वर्षांचे सुव्यवस्थित शिक्षण देण्याची व्यवस्था १९७५–७६ पर्यन्त केली जावी आणि हा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जावेत.

– माध्यमिक स्तरावर शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणात आश्रमशाळांची सोय करण्यात यावी.

– भारत सरकारने दिलेल्या शिष्यवृत्त्यांबाबतच्या प्रशासन यंत्रणेचे विकेंद्रीकरण करण्यात यावे. या कार्यक्रमाच्या कक्षेत विद्यार्थ्यांना विशेष शिकवणी देण्याच्या योजना अंतर्भूत केल्या जाव्यात आणि सर्व उपलब्ध अभ्यासक्रमांचेबाबत त्या अमलात आणाव्यात.

– भारतीय शिक्षण मंत्रालय आणि जेथे आदिवासी जमाती वा भटक्या जमाती मोठ्या प्रमाणात असतील अशा राज्यातील शिक्षण विभाग यांनी अशा जमातीच्या गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यांच्या भागात सुधारणा योजना राबविण्यासाठी खास कक्ष सुरू करावेत.

२) महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधीचे धोरणविषयक निवेदन(१९६८)

– सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अविकसित घटकांच्या व विभागांच्या सर्वांगिण शैक्षणिक विकासाकडे व प्रगतीकडे खास लक्ष देण्यात येईल.
– मागासलेल्या वर्गातील विशेषत: आदिवासी जमातीमधील मुलामुलींसाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याकडे खास लक्ष देण्यात येईल. राज्यातील वर्गीकृत व आदिवासी विभागामध्ये शिक्षणविषयक सवलतींचा प्रसार करण्यासाठी आश्रमशाळा उघडण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येईल आणि त्या ठिकाणी माध्यमिक शिक्षणासाठीही आश्रमशाळांची सोय करण्याच्या धोरणाचा पुरस्कार करण्यात येईल व आश्रमशाळांना जोडून बालवाड्या काढण्यात येतील.

३) शालेय शिक्षण सुधार समिती (१९८४)

– मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून धर्मादाय संस्था, साखर कारखाने, औद्योगिक प्रतिष्ठाने व अन्य सेवाभावी संस्था यांचे साहाय्य घ्यावे.
– जिल्हा परिषदांनी मागावर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी वसतिगृहे {Happy Homes} सुरु करावीत.
– मागासवर्गीयांसाठी असलेल्या शैक्षणिक सवलतींची माहिती देण्यासाठी शिक्षक पालक मेळावे भरवावेत.

मागासवर्गीयांचे शिक्षण – समस्या

१. सर्वात महत्त्वाची समस्या गरिबी ही होय. मुलगा/मुलगी थोडी मोठी झाल्यावर तो घरी आईवडिलांना मदत करतो. उदा :- मुले सांभाळणे, सरपण गोळा करणे, कष्टाची कामे -गुरे सांभाळणे इ. करून घरात मदत करतो. त्यामुळे या मुलांना आईवडील शाळेत पाठवू शकत नाहीत.

२. मुले साधारणपणे ८ ते १० वर्षांची झाली असता कष्टाची अनेक कामे करून पैसे मिळवितात. त्यामुळे आर्थिक उत्पन्न बुडू नये म्हणून पालक मुलांना शाळेत पाठवीत नाहीत.

३. ग्रामीण व दुर्गम डोंगराळ भागात शाळा दूर अंतरावर असल्यामुळे लहान मुले शाळेत जाऊ शकत नाहीत.

४. ग्रामीण भागातील शाळांची वेळ तेथील स्थानिक परिस्थितीनुसार असावी. शेतीच्या हंगामाच्या वेळी व स्थानिक सणानिमित्ताने मुलांना शाळेला सुट्टी असावी.

५. ग्रामीण व डोंगराळ भागात शाळांना योग्य अशा इमारती नाहीत. मंदिरे, चावड्या इ. ठिकाणी शाळा भरतात. अयोग्य शैक्षणिक वातावरणामुळे मुले शाळेत येत नाहीत.

६. आईवडील आपल्या मुलांना क्रमिक पुस्तके व गणवेश घेऊ शकत नाहीत.

७. एकंदरीत ग्रामीण व डोंगराळ भागातील लोकांत अज्ञान असल्यामुळे व अनेक जुन्या रूढींच्या प्रभावामुळे मुलांना ते शाळेत पाठवू शकत नाहीत.

८. शाळांमध्ये अध्यापनास साह्यभूत होईल अशा अनेक शैक्षणिक साधनांचा अभाव असल्यामुळे शैक्षणिक वातावरण निर्मिती होत नाही. म्हणजेच सदोष अध्यापन प्रक्रिया होते. त्यामुळे शाळेबद्दलची आवड व गोडी मुलांमध्ये निर्माण होत नाही. अध्यापन व अध्ययन प्रक्रिया व्यवस्थित होत नसल्यामुळे विद्यार्थी अभ्यासात मागे पडतो व कालांतराने शाळेबद्दलची व अभ्यासाबद्दलची नावड मुलांमध्ये निर्माण होऊन त्याची परिणिती शाळा सोडण्यात होते.

**अनुसूचित जातींचे शिक्षण – सद्य:स्थिती**

महाराष्ट्र राज्य हे नेहमीच प्रगतिपथावर राहिले आहे. मागासवर्गीयांच्या शिक्षणाला चालना देण्याचे काम महाराष्ट्रातील समाजसेवकांनी केले आहे हे आपणास दिसते. महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या साक्षारतेचे प्रमाण ३५.५५ आहे. पहिली ते चौथीच्या वर्गात असणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींची संख्या १३,१०,३२२ आहे. जवळपास महाराष्ट्रातील सर्व खेड्यापाड्यांत शाळांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीच्या मुलांची भरती करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. प्राथमिक ते माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. विविध योजनांद्वारे शासनातर्फे काही प्रमाणात गणवेश, पुस्तके, शिष्यवृत्या विद्यार्थ्यांना देण्यात येतात.

अनुसूचित जातीच्या मुलांच्या गळतीचे प्रमाण सर्वसाधारणपणे बरेच जास्त आहे असे सोबत दिलेल्या तक्त्यावरून दिसते.

ज्या ठिकाणी बहुसंख्येने अनुसूचित जातीची वस्ती आहे अशा ठिकाणी मुलामुलींकरिता महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. जवळपास ३०० लोकवस्तीच्या ७०.८६% वाड्या वस्त्यांवर शाळा उघडण्यात आल्या असून

१ कि.मी. च्या अंतरावर ९७.१२% वाड्यावस्त्यांवर शाळा असून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाता येणे शक्य झाले आहे.

तक्त्याचा विचार केल्यास इ. १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांच्या प्रमाणात फार थोडे विद्यार्थी वरच्या वर्गात दाखल होतात व त्यातही मुलींचे प्रमाण फार कमी आहे.

महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये अनुसूचित जातीच्या शिक्षकांची भरती करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून अनुसूचित जातीच्या शिक्षकांचे प्रमाण उच्च प्राथमिक शाळेत पं. बंगाल व तामिळनाडूच्या खालोखाल आहे. मात्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत भारतात सर्वात जास्त अनुसूचित जातीच्या शिक्षकांचे प्रमाण महाराष्ट्रात आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे एक शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगतिशील राज्य आहे असे म्हणता येईल.

**अनुसूचित जातीच्या पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण**

| | सन १९७१ नुसार | | | सन १९८१ नुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | एकूण | भारत | महाराष्ट्र | एकूण |
| पुरुष | ४,०८,६७,०४४ | १५,५४,४२८ | ३.८०% | ५,४२,१०,५९४ | २२,९९,०९८ | ४,२१% |
| स्त्रिया | ३,८२,२५,७९७ | १४,७१,३३३ | ३.८५% | ५,०५,४४,०२९ | २४,८०,६६५ | ४,३२% |

**अनुसूचित जातीचे शेकडा प्रमाण**

| तपशील | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|
| १९७१ नुसर एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जातीचे प्रमाण | १४.४३% | ६.००% |
| १९८१ नुसार एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जातीचे प्रमाण | १५.२९% | ७.१४% |

## सन १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील मागासवर्गाची लोकसंख्या

| क्रमांक | प्रकार | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | ४४,७९,७९३ | ७.१४% |
| २. | नवबौद्ध | ४०,६४,९८५ (अंदाजे) | ६.४७% |
| ३. | अनुसूचित जमाती | ५७,७२,०३८ | ९.३०% |
| ४. | विमुक्त जाती | १८,९९,००० (अंदाजे) | ३,०२% |
| ५. | भटक्या जमाती | ६६,००० (अंदाजे) | १.०५% |

## अनुसूचित जातीचे एकूण लोकसंख्येतील मागासवर्गीय जातीशी साक्षरतेचे शेकडा प्रमाण

| | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | १९७१ नुसार | १९८१ नुसार | १९७१ नुसार | १९८१ नुसार |
| अनुसूचित जातीचे साक्षरतेचे शेकडा प्रमाण | १४.६७ | २१.३८ | २५.२७ | ३५.५५ |
| पुरुष | २२.३६ | ३१.१२ | ३७.०२ | ४८.८५ |
| स्त्रिया | ६.४४ | १०.९३ | १२.८५ | २१.५५ |

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे स्तरनिहाय वर्गीकरण

| तपशील | इयत्ता १ली ते ४थी | इयत्ता ५वी ते ८वी | इयत्ता ९वी ते १०वी | इयत्ता ११वी ते १२वी |
|---|---|---|---|---|
| | १३.८६% | १३.३६% | १३.१७% | ६.५७% |
| एकूण विद्यार्थी | १३,१०,३२२ | ४,३५,००२ | १,८८,६४७ | ३९,९३१ |
| एकूण मुली | ५,७४,८८० | १,५७,८०६ | ५८,००६ | ९,७३० |

## स्तरवार अनुसूचित जातीच्या शिक्षकांचे प्रमाण

| अ.क्र. | शाळास्तर | एकूण संख्या | अनुसूचित जातीचे एकूण |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिक | १,१४,४८४ | १२.०८% |
| २. | उच्चप्राथमिक | १,३६,७२९ | ११.८३% |
| ३. | माध्यमिक | १,१०,५११ | १०.६४% |
| ४. | उच्च माध्यमिक | ४७,२०६ | ७.९८% |
| | एकूण | ४,०८,९३० | |

### माध्यमिक शालान्त परीक्षा
### अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची माहिती

| सन | एकूण विद्यार्थी परीक्षेस बसले | एकूण उत्तीर्ण | शेकडा | सर्वसामान्य निकाल |
|---|---|---|---|---|
| १९८६-८७ | १,२१,५९७ | ४१,९७४ | ३४.५१ | ४४.६८ |
| १९८७-८८ | १,३७,९७५ | ४१,९६० | ३०.४१ | ४०.९९ |

### उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा
### अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची माहिती


| सन | एकूण विद्यार्थी परीक्षेस बसले | एकूण उत्तीर्ण | शेकडा | सर्वसामान्य निकाल |
|---|---|---|---|---|
| १९८६-८७ | ११,६९१ | ४,५३४ | ३८.७८ | ५३.१२ |
| १९८७-८८ | १४,९७४ | ५,९०६ | ३९.४४ | ५१.७८ |

## १९८१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण

| जिल्हा | अनुसूचित जाती | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया |
| १. मुंबई | ६०.८ | ३८.४ |
| २. नाशिक | ५६.० | २६.९ |
| ३. धुळे | ५३.२ | २३.७ |
| ४. जळगाव | ५०.५ | १८.० |
| ५. ठाणे | ५४.१ | ३२.० |
| ६. पुणे | ५४.६ | २८.० |
| ७. अहमदनगर | ४९.९ | २०.३ |
| ८. सोलापूर | ४३.६ | १५.२ |
| ९. रायगड | ५७.८ | ३४.७ |
| १०. कोल्हापूर | ५०.४ | १८.८ |
| ११. रत्नागिरी,सिंधुदुर्ग | ५१.४ | २७.० |
| १२. सातारा | ५४.४ | २४.८ |
| १३. सांगली | ५१.० | २२.५ |
| १४. औरंगाबाद,जालना | ३८.० | ९.१ |
| १५. परभणी | ३०.४ | ७.३ |
| १६. बीड | ३३.५ | ८.५ |
| १७. नांदेड | ३१.८ | ७.८ |
| १८. उस्मानाबाद,लातूर | ३६.३ | ११.५ |
| १९. अमरावती | ५३.८ | २८.३ |
| २०. बुलढाणा | ४७.१ | १५.६ |
| २१. अकोला | ४८.३ | २०.० |
| २२. यवतमाळ | ४७.० | २०.१ |

| जिल्हा | अनुसूचित जाती | |
| --- | --- | --- |
| | पुरुष | स्त्रिया |
| २३. नागपूर | ५६.९ | ३४.९ |
| २४. वर्धा | ५४.४ | ३०.२ |
| २५. भंडारा | ६३.३ | ३३.३ |
| २६. चंद्रपूर,गडचिरोली | ४५.८ | २०.० |
| २७. महाराष्ट्र राज्य | ४८.९ | २१.५ |


(सिंधुदुर्ग, जालना, लातूर व गडचिरोली या पुनर्रचित जिल्ह्यांच्या माहितीचा समावेश अनुक्रमे रत्नागिरी, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि चंद्रपूर यामध्ये केलेला आहे.)




अनुसूचित जातींची जिल्हावार
लोकसंख्या (लाखात) १९८१

सिंधुदुर्ग, जालना, लातूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांचे माहितीचा समावेश अनुक्रमे रत्नागिरी औरंगाबाद, उस्मानाबाद व चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आहे.

# RETENTION RATES FROM 1975-76 TO 1984-85 FOR MAHARASHTRA



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६
# अनुसूचित जातींचे शिक्षण

**धोरण, लक्ष्य आणि पद्धतीचा सूचित अर्थ :–**

१. शैक्षणिक विकासाचे मध्यवर्ती केंद्रस्थान म्हणजे वर्गीकृत जातींना जनसामान्यांबरोबर सर्व थरांतून, सर्व शैक्षणिक पातळीतून शिक्षण देणे होय.

२. यासाठी ६ ते ११ वयोगटातील (वर्ग १ ते ५) मागासवर्गीय जाती/जमातींतील मुलांची १०० टक्के पटनोंदणी करून आणि त्यांना शाळेत टिकवून ठेवण्याचे खात्रीलायक प्रयत्न करून शिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सन १९९० पर्यन्त साध्य केले गेले पाहिजे. म्हणजेच १९६० पर्यन्त ६ ते ११ वयोगटातील अनुसूचित जातींची सुमारे १ कोटी ५५ लाख मुले पटनोंदणी व्हायला हवी.

११ ते १४ (वर्ग ६ ते ८) वयोगटातील मुलांचे इ. ८ वी पर्यन्तचे शिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण होण्यासाठी त्यांची कमीत कमी ७५ टक्के पटनोंदणी केली गेली पाहिजे आणि त्यांना शाळेत टिकविले पाहिजे.

३. उपरोल्लेखित ध्येय साध्य करण्याकरिता व उद्दिष्टाप्रत वाटचालीसाठी पुढीलप्रमाणे कृतिशील मार्गाचा अवलंब केला जाईल.

अ) गरजू/गरीब कुटुंबांना त्यांची मुले ११ वर्षे वयाची होईपर्यन्त नियमित शाळेत पाठविण्याकरिता उत्तेजन.
१) राज्य सरकारच्या अखत्यारीतील व त्यांच्या निधीतून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांचे नियमित वाटप होण्यासाठी (केंद्रशासन पुरस्कृत, तथाकथित "गलिच्छ धंदे" करणाऱ्या लोकांच्या मुलांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या ५०.५० टक्के निधीतून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या वगळता) संबंधितांना निरंतर शिष्यवृत्त्यांच्या रकमांचे वाटप प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस झाले पाहिजे.

२) अनुसूचित जाती/जमातींच्या मुलांची पूर्णत: पटनोंदणी होण्यास मदत व्हावी हा दृष्टिकोन लक्षात घेऊन पुरेशा प्रमाणात शिष्यवृत्त्यांचे दर आणि रक्कम वाढविली जाईल.

३) अनुसूचित जाती/जमातींच्या सर्व पात्र मुलांचे शाळेत दाखल होण्याचे प्रमाण शंभर टक्के ठेवले जाईल.

४) भारत सरकारतर्फे (समाज कल्याण खाते) दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्त्या लवकर दिल्या जाव्यात यासाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्या देण्याबाबत वर सांगितलेल्या धर्तीवर उपाय योजना केली जाईल.

५) शिष्यवृत्त्यांच्या दरांची पुनर्रचना करण्यासाठी समाज कल्याण खात्याने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतल्यानंतर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्त्यांबाबतच्या आर्थिक अंदाजपत्रकाची आखणी केली जाईल.

६) गणवेश वाटप, पुस्तके व शालोपयोगी साहित्य वाटप, यासारख्या उत्तेजनात्मक योजनांच्या बाबतीत राज्य सरकारे सविस्तर अशी अंदाजपत्रके तयार करतील आणि त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल.

(ब) सफाईकाम, कातडी काढणे आणि कमावणे यासारख्या व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांतील मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्या.
१) सध्या इ. ६ वी ते १० वी च्या मुलांसाठीच लागू असणारी ही शिष्यवृत्ती योजना अशाप्रकारे मर्यादित न ठेवता सन १९८६-८७ या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीपासूनच इ. १ ली च्या मुलांपासून सर्वच मुलांना लागू करण्याकरिता समाज कल्याण खात्याने आवश्यक ती पावले उचलावीत. उत्पन्नाची मर्यादा रद्द केली जावी.

२) बिगर निवासी शिष्यवृत्ती धारकांनाही या योजनेचा फायदा दिला जाईल.

(क) कोणत्याही स्तरावर वर्गीकृत जाती/जमातीच्या मुलांची पटनोंदणी त्यांचे शाळेत टिकून राहणे व यशस्वीरीत्या अभ्यासक्रम पूर्ण करणे ह्यात घट होऊन खंड पडू नये म्हणून सातत्याने सूक्ष्म नियोजन आणि पुनर्विलोकन केले जाईल.

(ड) अनुसूचित जाती शिक्षक भरती - सध्या अस्तित्वात असलेली याबाबतची तफावत नाहीशी करण्यासाठी आणि एकशिक्षकी शाळांची गरज भागविण्यासाठी, अनुसूचित जातीतील शिक्षक भरतीचा धडक कार्यक्रम हाती घेतला जाईल. शैक्षणिक गुणवत्ता, मुख्यत्वे स्त्री शिक्षकांसाठी शिथिल केली जावी.

(ई) जिल्हयाच्या ठिकाणी अनुसूचित जाती / जमातीतील मुलांसाठी वसतिगृह व्यवस्था-
१) ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी वर्गीकृत जातीच्या मुलांसाठी वसतिगृहाची सोय नाही. ती उपलब्ध करून देण्यासाठी १९८६-८७ या वर्षामध्ये आखीव कार्यक्रम हाती घेतला जाईल.

(ग) अनुसूचित जाती जमातींना शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देण्यासाठी "राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम "आणि " ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम" यापासून

मिळणाऱ्या निधीचा वापर.
१) शैक्षणिक यंत्रणेतील उणिवा लक्षात घेऊन " राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम" या कार्यक्रमांमधून उपलब्ध झालेल्या निधीतून मागासवर्गीय जातींच्या वस्त्यांमधून शैक्षणिक संस्था विकसित करण्यासाठी एक गतिमान कार्यक्रम हाती घेतला जाईल.

(ज) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले विभाग.
१) शिष्यवृत्त्या, गणवेश वाटप, पुस्तके, शालोपयोगी साहित्य वाटप यासारख्या उत्तेजनात्मक योजना गरिबातील गरीब जनतेप्रत पोहोचविण्यासाठी अधिक प्रमाणात उपाययोजना केली जाईल.

४. कार्यक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन.

५. शैक्षणिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे सातत्याने मूल्यमापन करणाऱ्या अंतर्गत यंत्रणेच्या जोडीस बाह्य प्रातिनिधिक संस्थांमार्फत शिष्यवृत्त्या, वसतिगृह व्यवस्था आणि प्रस्तावित उत्तेजनात्मक योजना यासारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्याचे काम हाती घ्यावे.

**मागासवर्गीयांचे शिक्षण – पुरस्कार सवलती व शिष्यवृत्त्या**

प्रत्येक सामूहिक विकास गटातील अनुसूचित जातीतील शिष्यवृत्तीधारकास ४२५ शिष्यवृत्त्या तसेच महाराष्ट्रातील एकूण १३ जिल्ह्यातील ४८ जनजाती विकास प्रत्येकी ३ प्रमाणे १४४ शिष्यवृत्त्या मंजूर केल्या आहेत.

आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शिष्यवृत्तीच्या स्पर्धात्मक परीक्षेच्या गुणाचे आधारे इ. ८ वी पासून प्रदान केल्या जातात.

**प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इ. जातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा - लेखनसाहित्य व गणवेश पुरवठा.**

ज्या भागात साक्षरतेचे प्रमाण शेकडा १० पेक्षा कमी आहे आणि ६-११ या वयोगटातील मुलांची पटसंख्या (शाळेतील) शेकडा ७० पेक्षा कमी आहे अशा भागातील प्राथमिक शाळात इ. १ ली व ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती, जमाती, भटक्या व विमुक्त जमातीच्या मुलांना गणवेशाचे संच आणि लेखनसाहित्य मोफत पुरविण्यात येते.

**प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी -**

- - - - -प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी योजना सुरू करण्यात आली असून त्याचा फायदा एकूण विद्यार्थ्यांच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना लाभ होतो.

**मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहांना अनुदान**

ही योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा १९६१ कलम १०० अन्वये जिल्हा परिषदेकडे वर्ग केली आहे. या योजनेखाली दरमहा प्रत्येक मुलासाठी रुपये २५ व मुलीसाठी रु. ३० या दराने वर्षातून १० महिन्यांसाठी अनुदान देण्यात येते.

माध्यमिक परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत आर्थिक अडचणीमुळे बाधा पोहचू नये म्हणून पुढील शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्याची योजना शासनाने मंजूर केली.

उच्च माध्यमिक परीक्षेत वरचे स्थान मिळविणाऱ्या मागासवर्गातील विद्यार्थ्यां-मधून दोन विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. यात प्रवेश फी, तंत्र फी, ग्रंथालय व जिमखाना फी आणि परीक्षा फी दिली जाते. तसेच विद्यार्थी वसतिगृहात राहात असेल तर प्रत्येक सत्रासाठी रु. ३००/- भोजन खर्च व दरमहा रुपये १५०/- वैद्यकीय व पुस्तकासाठी साहाय्य दिले जाते.

**महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या योजना -**

**अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहांना मान्यता व अनुदान-**

मागासवर्गीय मुलामुलींना शैक्षणिक सवलतींचा लाभ घेता यावा व त्यांना सामाजिक व शैक्षणिक सुधारणा करण्याची संधी मिळावी म्हणून शासनाने शासकीय वसतिगृहे सुरू करून त्या व्यतिरिक्त स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणारी अनुदानित मागासवर्गीय मान्यता व अनुदान ही योजना सुरू केली आहे.

**बालवाडयांना अनुदान -**

स्वच्छता इत्यादी विषयी सवयी मागासवर्गीय मुलांच्या अंगी बाणवण्यासाठी बालवाडीचा कार्यक्रम देखील हाती घेण्यात येत आहे. एकूण बालवाड्यांची संख्या ८३६ झाली आहे.

**अनुदानित वसतिगृहांच्या इमारतीसाठी अनुदान -**

स्वेच्छा संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय वसतिगृहांची सन १९८४-८५ अखेर एकूण संख्या १६५५ होती. स्वेच्छासंस्थांना प्रत्येक मुलामागे ७५०/- याप्रमाणे इमारत अनुदान देऊन त्यांना स्वत:ची इमारत बांधण्याकडे प्रवृत्त करण्यात येते.

**अनुदानित मुलींच्या वसतिगृहासाठी इमारत अनुदान**

ही योजना भारत सरकार पुरस्कृत योजनेखाली भारत सरकारकडील १०० टक्के सहाय्यावर राज्य शासनामार्फत सन १९७८-७९ पर्यन्त राबविण्यात येत होती. सन १९७९-८० पासून राज्य शासन आणि भारत सरकार यांनी ५०/५० टक्के खर्च सोसून ती राबविण्यात येत आहे.

***आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलींसाठी वसतिगृहे सुरु करणे***

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण विषयक सवलतींचा फायदा घेणे शक्य व्हावे म्हणून शासनाने वसतिगृह सुविधांची सोय केली आहे. या वसतिगृहांमध्ये विनामूल्य भोजन व निवास, पाठ्यपुस्तके, लेखनसामुग्री, गणवेश व बिस्तरा, विनामूल्य वैद्यकीय मदत, वाहन व खास शिक्षण विषयक सोयी इ. सह सर्व सुविधांची तरतूद केली जाते.

**भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती -**

शालान्त परीक्षोत्तर शिक्षणासाठी भारत सरकारने पुरस्कृत केलेली अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती देण्यात येते.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी देणे**

अनुसूचित जाती जमाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न लक्षात घेता शिक्षणाच्या सर्व पातळीवर शिक्षण फी, परीक्षा व इतर सक्तीची देय फी देण्यापासून सूट देण्यात येते. अशाप्रकारच्या फीच्या रकमांची समाज कल्याण विभागाद्वारे शैक्षणिक संस्थांना परिपूर्ती करण्यात येते.

**माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती -**

माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असलेल्या हुशार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्तेजन

देण्याचे दृष्टीने मागील वर्षाच्या परीक्षेत ५० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या गुणानुक्रमे पहिला व दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**औद्योगिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील मागासवर्गीय डेस्कॉलर्स क्राफ्टस्मन ट्रेनिंग प्रोग्रॅमखाली विद्यावेतन मिळते.

**सैनिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता**

ही योजना १९७६-७७ सालापासून लागू करण्यात आली आहे. सैनिक शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सैनिक शाळेने लागू केलेल्या संपूर्ण खर्चासाठी विशेष निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो.

**अस्वच्छ उद्योगधंद्यात असलेल्यांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्या**

अस्वच्छ कामधंदे करणाऱ्या म्हणजे भंगी, झाडूवाले, कातडी सोलणारे इ. व्यक्तींच्या मुलांना चांगल्या उच्च शाळेमध्ये उत्तम शिक्षण मिळण्याच्या उद्देशाने केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाखाली ही योजना राबविली जाते. ह्या योजनेनुसार इयत्ता ६ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये १४५/- प्रमाणे काही विशिष्ट अटींवर ही शिष्यवृत्ती अनुदेय आहे.

**वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयातील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना पुस्तकपेढी योजना -**

ही योजना १९७८-७९ पासून मंजूर करण्यात आली आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी लागू करण्यात आलेल्या नियमित पुस्तकांच्या पुस्तकपेढ्या सुरु करण्याचा उद्देश ह्या योजनेमागे आहे. ७ विद्यार्थ्यांमागे एक नियमित पुस्तकांचा संच पुरविण्यात येतो.

**महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ, मुंबई**

या महामंडळाची स्थापना सन १९७८ मध्ये करण्यात आली. अनुसूचित जाती व नवबौध्दांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. महामंडळाने अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या आर्थिक उन्नतीकरिता वेगवेगळया योजना हाती घेतलेल्या आहेत.

**विषेश घटक योजना (अनुसूचित जाती व नवबौध्दांकरिता)**

अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्यासाठी विशेष घटक योजना राज्यामध्ये सन १९७९-८० सालापासून राबविण्यात येत आहे. दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबांसाठी असलेल्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमांना गती आणणे हा या योजनेचा हेतू आहे.

**पुढील वाटचाल :**

अनुसूचित जातीचे साक्षरतेचे प्रमाण, शाळेत टिकून राहाण्याचे प्रमाण, गळतीचे प्रमाण ह्या बाबी लक्षात घेता या प्रश्नाकडे अधिक जाणीवपूर्वक पाहणे आवश्यक आहे. इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये एकूण १३,१०,३२२ अनुसूचित जातीचे विद्यार्थी शिक्षण घेतात. परंतु १० वी च्या माध्यमिक शालान्त परीक्षेला १,३७,९७५ विद्यार्थी, तर उच्च माध्यमिक परीक्षेला १४,९७४ विद्यार्थी बसतात. ह्याचा अर्थ फार मोठ्या प्रमाणात गळती होते असे दिसते.

मागासवर्गीयांच्या शिक्षणातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी आयोगांनी अनेक उपयुक्त सूचना केल्या आहेत तसेच १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ह्याविषयी विचार केला आहे. ह्या सर्वांची अंमलबजावणी व गळती थांबविण्याकरिता खास प्रयत्न करणे आवश्यक आहे. तेव्हाच शिक्षणाचा खरा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होऊ शकेल.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गळती, नापासी व साक्षरतेचे अल्प प्रमाण या गंभीर समस्यांचा विचार केला तर असे दिसून येईल की, शासनाकडून त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती अत्यंत अपुऱ्या आहेत. खालील सोयी सवलती उपलब्ध करून देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे.

मागासवर्गीय मुलामुलींच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी (निदान पुढील काही वर्षे तरी) राज्य शासनाने घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील निवास, भोजन, पुस्तके व शैक्षणिक साहित्य व शैक्षणिक सोयी सवलतींचा अंतर्भाव असावा.

मागासवर्गीय विद्यार्थी त्यांच्या कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती असतात. त्यांना शिक्षणासाठी पूर्ण वेळ मुक्त करणे त्यांच्या कुटुंबियांना शक्य नसते. ही पार्श्वभूमी समजून घेऊन शिक्षणासाठी महिन्याकाठी काही ठराविक रक्कम देणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती मिळेल.

शिक्षणाचे आशीर्वाद सर्वांपर्यन्त पोचावेत या प्रक्रियेलाच Universalisation of

Education म्हणतात. या अर्थी "Blessings of Education should reach the poorest and most underdeveloped inhabitant of the meanest hut located in the farthest mountain"- हे होण्याची गरज आहे. आपण एकविसाव्या शतकात पाऊल टाकण्यापूर्वी हे स्वप्न खरे होईल अशी आशा आहे.

# समानतेसाठी शिक्षण

डॉ. मा. मो. माळी

महात्मा जोतिराव फुले हे जसे आद्य समाज सुधारक व समाज क्रांतिकारक आहेत तसेच ते भारतीय शिक्षणाचे आद्य शिल्पकारही आहेत. देशातील दीनदलितांचे आणि विशेषत: स्त्रियांचे शिक्षण अग्रक्रम देऊन हाताळले जावे हे सांगणारा आणि प्रत्यक्षात कृती करणारा हा पहिला महात्मा होय. त्यांच्या शब्दात विद्येला त्यांनी सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. सर्व क्षेत्रांतील मागासलेपणाला आणि सर्व प्रकारच्या गुलामगिरीला प्रामुख्याने विद्या कारणीभूत होते हे त्यांनी खालील ओळीत अचूकपणे स्पष्ट केले आहे.

विद्योविना मती गेली । मती विना नीती गेली ।
नीतीविना गती गेली। गती विना वित्त गेले।
वित्तविना शुन्द्ररखचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले।।

यावरून गोरगरिबांच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे सुस्पष्ट होते. ते म्हणतात "जमा होणाऱ्या महसुलापैकी फार मोठा हिस्सा घाम गाळणाऱ्या श्रमिक रयतेच्या कष्टातून उभा राहात असतो" या विचाराला धरूनच एक इंग्रज लेखक म्हणतात "आमचे खरे उत्पन्न अत्यंत निकृष्ट अशा गरिबांच्या गरजेच्या वस्तूवरील करातून जमा होते. हे उत्पन्न पापाचे आणि अश्रूचे फळ आहे." अशा प्रकारे जमा होणारी बहुतांशी रक्कम श्रीमंत, उच्च वर्णीय आणि परंपरा लाभलेल्या मूठभर लोकांच्यावर खर्च होते. तथापि शतकानुशतके शिक्षणाचा यथेच्छ उपभोग घेणाऱ्या विद्याविभूषित समाजाने अगर व्यक्तीने गरिबांच्या शिक्षणासाठी कधीही प्रयत्न केलेले नाहीत हे कटू सत्य आहे. महात्मा फुले यांनी हा अन्यायकारक प्रश्न स्पष्ट करताना म्हटले आहे "शेतकऱ्यांचे कमालीचे दारिद्र्य, त्यांच्यातील स्वावलंबनाचा अभाव, सुशिक्षित आणि बुद्धिमान वर्गावर अवलंबून राहण्याची त्यांना जडलेली सवय या गोष्टींना त्यांची ही शैक्षणिक क्षेत्रातील शोचनीय अवस्थाच कारणीभूत आहे. म्हणून त्यांनी "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या साठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे आणि दीन दलितांच्या शिक्षणापेक्षा न्याय बुद्धीने व सढळ हस्ते जरूर तेवढा पैसा खर्च केला जावा असे आवर्जून सांगितले. विशेषत: शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रिया किंवा मुली यांच्या शिक्षणाला त्यांनी सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. त्यांच्या मते सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील वाढत्या विषमतेला शिक्षणातील विषमताच कारणीभूत आहे.

महाराष्ट्रातील व देशातील ७५ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागातच आहे. शहरातील मूठभर श्रीमंतांचे शिक्षण आणि ग्रामीण भागातील बहुसंख्य गोरगरिबांचे शिक्षण

यामधील विषमता पराकोटीला पोचत आहे. "शिक्षणाची समान संधी" हे ग्रामीण जनतेच्या दृष्टीने मृगजळच ठरत आहे.

महाराष्ट्र राज्य हे शिक्षण क्षेत्रात पुढारलेले राज्य म्हणून सांगितले जाते ते खोटे आहे. कारण महाराष्ट्रात सुद्धा निरक्षरांची संख्या सारखी फुगतच आहे. स्त्री समाजातील साक्षरतेचे प्रमाण अद्याप २० टक्के च्या आसपास आहे. आपणच आपली खोटी स्तुती करून घेण्यात काही अर्थ नाही.

महात्मा फुले यांची पुण्यतिथी शताब्दी सन १९९० मध्ये साजरी करताना राज्यातील प्राथमिक शिक्षणाची वाटचाल-जी फुल्यांना अपेक्षित होती त्याप्रमाणे-व्हावी यासाठी मी काही महत्त्वाच्या सूचना सादर करीत आहे.

१. "गाव तेथे बालवाडी" या सूत्रानुसार राज्यभर संगोपन व बालशिक्षण यांची सोय करावी.
२. बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण या क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या योजना प्रथम अगदीच छोट्या खेड्यात आणि मग मोठ्या खेड्यात अशा पद्धतीने राबवाव्यात. कारण शहरात सुरू झालेल्या योजना शेवटपर्यंत खऱ्या अर्थाने पोचत नाहीत.
३. घटनेच्या ४५ व्या कलमानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांमुलींचे दरसाल सर्वेक्षण करून या वयोगटातील सर्व मुले आणि मुली शाळेत येण्याची व ती किमान १४ वर्षे वयापर्यंत टिकवून धरण्याची यंत्रणा नव्याने निर्माण करावी.
४. महाराष्ट्रात आज सुमारे ३०० छोट्या गावांत शाळा नाहीत त्या सर्व गावांत स्थानिक शिक्षक (कमी शैक्षणिक पात्रता असली तरी सुद्धा) नेमून १ ते ४ इयत्तेपर्यंत वर्ग चालू करावेत.
५. सहकारी व खाजगी साखर कारखाने, सर्व प्रकारचे उद्योगधंदे आणि धरणांची कामे येथे काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी कारखाने व त्या त्या उद्योगधंद्यावर सोपवावी.
६. कारखाना परिसरात ऊस ओढणाऱ्या गोरगरीब गाडीवानांच्या व इतर भटक्या जाती जमातींच्या मुलांमुलींसाठी डॉ. मा. गो. माळी यांनी शासनाला सादर केलेली साखरशाळा योजना अमलात आणावी.
७. गोरगरीब व मागासवर्गीय पालकांना शिक्षणाचे महत्त्व आणि आपल्या पाल्यांचे हित पटवून देण्यासाठी पालक शिक्षणाची योजना मोहीम हाती घ्यावी.
८. मुलांच्या व पालकांच्या मनात शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी प्रत्येक गावी पालक शिक्षक संघ स्थापन करण्यात यावेत.
९. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्यात गेल्या अनेक वर्षात मिळालेले अपयश विचारात घेता महात्मा फुले यांनी १०० वर्षांपूर्वी सुचविल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक शिक्षण उठाव समिती आणि

तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली अशा प्रकारची समिती स्थापन करावी आणि गावपातळीपासून जिल्हापातळीपर्यंत वयाच्या १४ वर्षापर्यंतची सर्व मुले आणि मुली शाळेत आणणे, त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविणे आणि इतर अडचणींचे निराकरण करणे अशी सर्व कामे सदर समित्यांनी हाताळावीत.

१०. प्रत्येक तालुक्याला एक उपस्थिती अधिकारी नियुक्त करून सर्व मुले व मुली शाळेत आणण्याची व ती टिकून आहेत किंवा कसे हे पाहून जरूर ते मार्गदर्शन व उपाययोजना करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी.

## मुलींचे किमान शिक्षण

१. मुलींचे किमान आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण व्हावे यासाठी शिक्षण संचालनालयात स्वतंत्र स्त्री शिक्षण विभागाची स्थापना करावी. त्याचबरोबर जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी स्त्री शिक्षण विस्तार अधिकारी नियुक्त करून त्यांच्याकडे मुलींच्या शिक्षणाची सर्व प्रकारची जबाबदारी सोपवावी.

२. मुलींसाठी तालुक्याच्या व इतर आवश्यक ठिकाणी आश्रमशाळा स्थापन कराव्यात.

३. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मुलींसाठी वसतिगृह योजना तातडीने कार्यान्वित करावी.

४. काम करणाऱ्या मुलींसाठी सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना अमलात आणावी.

५. काम करणाऱ्या गोरगरीब मुलींसाठी शाळांची वेळ त्यांच्या सोयीप्रमाणे ठेवावी.

## २) आदिवासींचे शिक्षण

१) आदिवासी भागात शिक्षक टिकून राहावेत व त्यांनी समरस होऊन काम करावे यासाठी त्या समाजातील शिक्षक नेमावेत. प्रसंगी त्यांच्या निवडीचे निकष शिथिल करावेत.

२) कुपोषणास आळा बसावा यासाठी दूधयोजना, मधल्या वेळेचे जेवण इत्यादी सुविधा उपलब्ध कराव्यात.

३) आश्रमशाळा व वसतिगृहयुक्त शाळांची पुरेशी सुविधा उपलब्ध करावी. या शाळा कार्यक्षमपणे चालतील हे पहावे.

४) गणवेश पाठ्यपुस्तके, लेखनसामुग्री अशा सर्व सुविधा वर्षारंभीच उपलब्ध कराव्यात.

५) शाळा, इमारती  क्रीडांगण, बागबगीचा अशा भौतिक सुविधा प्राधान्येकरून पुरवाव्यात.

६) आदिवासी पालकांची भयंकर गरिबी व अज्ञान विचारात घेऊन पालक प्रबोधन कार्यक्रम सातत्याने राबवावा.

७) गुणी मुलामुलींसाठी बक्षिसे, पारितोषिके व्यापक प्रमाणात द्यावीत.

८) मुला-मुलींसाठी शिष्यवृत्त्यांची सोय करावी.

९) बालकामगारांच्या मिळकतीइतकी भरपाई शासनाने करून तेवढी आर्थिक मदत पालकांना द्यावी.

१०) आवश्यक तेथे पाळणाघरे चालू करावीत.
११) प्रत्येक प्राथमिक शाळेला जोडून बालसंगोपन व बालशिक्षण योजना कार्यान्वित करावी.
१२) स्थानिक ग्रामपंचायत, सहकारी संस्था, इतर खात्याचे अधिकारी यांचेवरही शाळा विकासाची जबाबदारी सोपवावी.

**अल्पसंख्याकांचे शिक्षण -**

अल्पसंख्या सर्व समाज घटक शिक्षणात मागासलेले आहेत असे नाही. तथापि जे मागास आहेत त्यांना मागासवर्गीय समाजाप्रमाणे आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याची गरज आहे. तसेच आणखी पुढील उपाय योजना अमलात आणाव्यात.

१) अल्पसंख्याकांच्या शाळा सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे.
२) या शाळांना उदारपणे अनुदान द्यावे.
३) आवश्यक ती पाठ्यपुस्तके व इतर ग्रंथ त्यांचे भाषेत उपलब्ध करावेत.

**मागासवर्गीयांचे शिक्षण**

१) मागासवर्गीय मुल-मुलींना प्राथमिक शिक्षण स्तरावर शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात.
२) मागासवर्गीय पालकांची प्रबोधन मोहीम हाती घ्यावी.
३) वसतिगृह किंवा आश्रमशाळांची आवश्यक तेथे स्थापना करण्यात यावी.
४) बाल कामगार प्रतिबंधक कायदा काटेकोरपणे अमलात आणावा.
५) मागासवर्गीय मुला-मुलींना आवश्यक त्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध कराव्यात.

**इतर मागासवर्गीयांचे शिक्षण**

साळी, माळी, कोळी, कोष्टी सुतार इत्यादी २०० हून अधिक जातींचा इतर मागासवर्गीय समाजामध्ये शासनाने समावेश केला आहे. यातील बहुसंख्या समाज श्रमजीवी, अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, मजूर असून या सर्वांचा दुर्बल घटकात समावेश होतो. शेती व शेतमजुरी करण्यासाठी ग्रामीण भागातील यापैकी शेतीशी संबधित समाज हा गावापासून दूर शेतीवरच झोपड्या बांधून राहतो. ज्यांना शेतीचा आधार मिळत नाही ते लोक पोट भरण्यासाठी बाहेरगावी साखर कारखाने, धरण योजना इत्यादी ठिकाणी मुलाबाळांसह जातात. अज्ञान आणि दारिद्र्यात खितपत पडलेल्या या समाजाच्या शिक्षणाची अनुसूचित जाती जमातीच्या मुलां-मुलींची जशी चिंताजनक स्थिती आहे तशीच या समाजातील मुलां-मुलीचीही आहे. तथापि आजवर या समाजाच्या त्या दृष्टीने विचारच झालेला नाही. या समाजातील सुमारे २० टक्के मुले-मुली (१४ वर्षांपर्यंतची) कधीच शाळेला येत नाहीत. तसेच शाळेत दाखल झालेल्या मुला-मुलींपैकी सुमारे ९० टक्के

मुला-मुलींची इयत्ता ७ वी पर्यंत गळती होते. थोडक्यात दुर्दैवाने आजवर या समाजाच्या किमान शिक्षणाचा विचार राज्य व देश पातळीवर झालेला नाही. म्हणून यासाठी एक स्वतंत्र "इतर मागासवर्गीय समाज शिक्षण समिती" राज्य शासनाने नियुक्त करून सखोल अभ्यास करून उपापयोजना करण्याची गरज वाटते. तथापि तातडीचे उपाय म्हणून या समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी म्हणून पुढील सूचना उपयुक्त ठरतील.

१) मागासवर्गीय समाजातील मुला-मुलींना ज्या सोयी-सुविधा दिल्या जातात किंवा दिल्या जातील त्या सर्व या समाजातील मुला-मुलींना द्याव्यात.
२) या समाजातील मुला-मुलींसाठी योग्य ठिकाणी आश्रमशाळा व वसतिगृहांची योजना कार्यान्वित करावी.
३) या समाजाची गरिबी विचारात घेऊन मुला-मुलींसाठी शिष्यवृत्त्यांची सोय करावी.
४) हुषार मुला-मुलींनी विविध परीक्षा व इतर शैक्षणिक क्षेत्रात बजाविलेल्या कर्तबगारीबद्दल बक्षिसे व पारितोषिके देऊन त्यांचा गौरव करावा.
५) शिक्षणाचे महत्त्व व शासनाच्या सोयीसवलती पालकांना समजून देण्यासाठी पालक-प्रबोधन कार्यक्रम कार्यान्वित करावा.
६) स्थानिक स्थिती विचारात घेऊन धंदा शिक्षणाची सुविधा उपलब्ध करावी.
७) धर्मादाय संस्था, साखर कारखाने व इतर उद्योगधंदे या ठिकाणी काम करणाऱ्या समाजाचे प्रौढ शिक्षण व त्यांच्या मुला-मुलींचे किमान प्राथमिक शिक्षण व्हावे यासाठी कायद्याने त्यांच्यावर बंधन घालावे.
८) *"इतर मागास वर्गीय शिक्षण सुधार राज्यसमिती" स्थापन करुन त्या समाजाच्या शिक्षण* सुधारणेचा सखोल विचार राज्य शासनाने करावा.

**सर्वसामान्य सूचना**

१) राज्यातील साखर कारखाना, इतर उद्योगधंदे, धर्मादाय संस्था आणि प्रतिष्ठाने यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठी व उठावासाठी आपापल्या परिसरातील सर्व गावांची आर्थिक व इतर जबाबदारी पार पाडावी.
२) राष्ट्रीयकृत आणि इतर बँका, मोठ्या पतपेढ्या यांनी प्रत्येकी किमान एक गाव दत्तक घेऊन किमान आठ वर्षाचे शिक्षण त्या गावातील सर्व मुलामुलींना देण्यासाठी जो खर्च येईल तो भागवावा.
३) प्राथमिक शाळांचे वातावरण अधिक आकर्षक होण्यासाठी शाळा इमारती, क्रीडांगणे, बागबगीचा, संडास, मुताऱ्या, पिण्याचे पाणी, खेळ साहित्य, अध्यापन साहित्य सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी गावातील सेवा सोसायटी, दूध डेअरी व पतपेढ्या यांच्यावर सोपवावी. यामध्ये शासनाचा सहभाग राहील.
४) किमान प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य प्राथमिक सल्लागार समिती स्थापन करण्यात यावी. जिल्हा व तालुका पातळीवर याच धरर्तीची यंत्रणा असावी.

# शिक्षणातील विषमता
# सामाजिक - आर्थिक पैलू

**डॉ. पा. रा. पंचमुखी आणि स्वाती शिरवाडकर**

समानतेच्या ध्येयाशी बांधिलकी असणे हा सर्व सुसंस्कृत समाजामध्ये प्रगतीचा निर्देशांक मानला जातो. ह्या उद्‌दिष्टाचे प्रत्यक्ष कृतीच्या योजनेमध्ये रूपांतर करताना स्पष्ट स्वरूपात असणारी समानता व अस्पष्ट स्वरूपात असणारी समानता यामध्ये भेद करावा लागतो. शैक्षणिक समानतेच्या संदर्भात ह्या दोन्हींचा अंतर्भाव होतो व दाहोंमध्ये संबंध आहेत हे अर्थातच गृहीत धरले जाते. स्पष्ट स्वरूपात असणाऱ्या समानतेच्या संदर्भात शैक्षणिक संधी, सोयी, सहभाग व परिणाम यांचा उल्लेख करावा लागेल. ह्या गोष्टींना अस्पष्ट वा ठळकपणे न दिसणाऱ्या समानतेशी संबंधित असे पैलूही असू शकतात. स्पष्ट स्वरूपातील पैलू हे परिवर्तक असतात ज्यांचे धोरणाद्वारे व्यवस्थापन करता येते. शैक्षणिक समानतेच्या संदर्भात बोलताना ह्या कारक परिवर्तकांना धोरणाविषयक उद्‌दिष्टांचा दर्जा गृहीत धरला जातो. अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांनी शैक्षणिक समानतेच्या विविध पैलूंकडे लक्ष दिलेले आहे. सदर संशोधन पत्रिकेचे उद्‌दिष्ट हया विषयावर भारतातील महत्त्वाच्या योगदानांचे विषय-अवलोकन करणे हे आहे. ही मांडणी पुढील प्रमाणे विभागली आहे.

प्रथम शिक्षणातील समानतेच्या प्रश्नावर चर्चा करून त्या चर्चेच्या ओघात शिक्षणाचे ध्येय आणि समानता आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग याविषयी वैचारिक चौकटीची बांधणी केलेली आहे. दुसऱ्या विभागात शिक्षणातील समानतेच्या संदर्भातील संशोधनाचे थोडक्यात अवलोकन केलेले आहे. तिसऱ्या विभागात धोरणात्मक उपाययोजनांविषयी चर्चा केलेली आहे.

चौथ्या विभागात समानता आणण्यासाठी शिक्षणाचा होऊ शकणारा आणि झालेला उपयोग यावरील संशोधनाचे अवलोकन केलेले आहे.

## (एक)
## शिक्षणातील समानता : वैचारिक बैठक

समाजात उच्च दर्जा मिळविण्यासाठी किंवा उच्च दर्जाच्या नोकऱ्या मिळवण्यासाठी शिक्षणाचा परवाना जेव्हा आवश्यक बनतो तेव्हा शैक्षणिक संधीचे योग्य वाटप हे आर्थिक संधीचे आणि एकूणच सामाजिक स्तरांच्या उंचीचे गमक बनते. शैक्षणिक समानता म्हणजे नेमके काय, ह्याची व्याख्या करणे हे समानतेच्या ध्येयाशी संबंध असण्यासाठी फारसे आवश्यक ठरत नाही. परंतु वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक परिस्थितींमध्ये शैक्षणिक

समानतेचा अर्थ काय आहे याचा विचार आवश्यक ठरेल. शिक्षणाच्या संधीबाबत पुढील विचार या संदर्भात मांडता येतील.

१) शिक्षण हे आर्थिक-सामाजिक दर्जाशी संबंधित नसते तर शैक्षणिक समानतेची फारशी आवश्यकता राहिली नसती. निसर्गत: किमान आवश्यक गुणवत्ता विषय प्रमाणात विभागली जाते. तशी ज्यांच्याकडे आहे त्यांनीच उच्च शिक्षणासाठी प्रयत्न केला असता. त्यामुळे शैक्षण्कि समानतेचे तत्त्व सरसकट अमलात आणणे म्हणजे ज्यांना अशी नैसर्गिक गुणवत्ता नाही त्यांना स्पर्धेत मागे फेकणे होईल. म्हणजेच विषम दर्जाच्या लोकांना समान वागणूक देण्याचे धोरण हे विषमता निर्माण करणारे ठरेल.

२) शिक्षण आणि ज्ञान सामाजिक-आर्थिक दर्जाशी संबंधित असले तर शैक्षणिक समानतेचे तत्त्व हे समाजकल्याणकारी आहे असे म्हणता येऊ शकेल. मात्र जर शिक्षण घेणाऱ्याच्या उपयुक्ततेच्या पातळीवर शैक्षणिक प्रक्रियेचा दुष्परिणाम होणार असेल तर हे समाजकल्याणकारी ठरणार नाही. याचाच अर्थ असा की विषम दर्जाच्या लोकांना विषम संधी ह्याबरोबरच संधीचा उपयोग करण्यास समानता असली तर समानतेचे तत्त्व अमलात येण्यास मदत होईल.

३) ज्या समाजात सामाजिक-आर्थिक दर्जाची विषमता आहे आणि सामाजिक आर्थिक दर्जाचा एक परिणाम शिक्षण हाही आहे अशा समाजामध्ये शिक्षण हा घटक समानता आणण्यासाठी प्रभावीपणे कार्य करू शकत नाही. कारण केवळ शैक्षणिक समानतेद्वारा सर्वसाधारण समाजकल्याण साधू शकणार नाही. उदा. ज्यांना आर्थिक सामाजिक दर्जा कमी आहे अशांचे कल्याण कमी साधले जाईल तर उच्च दर्जाच्या लोकांचा दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकेल. पॅरेटो कार्यदक्षता स्थिती निकषाप्रमाणे हा कार्यदक्ष बदल नव्हे. सामाजिक विषमतेच्या प्रश्नांची उकल केवळ शिक्षण ह्या एकाच क्षेत्रात सापडणार नाही. मालमत्तेची मालकी, मिळकत, सामाजिक दर्जा, राजकीय प्रभाव ह्या विषमतेच्या वेगवेगळ्या घटकांपैकी केवळ शिक्षण ह्या एकाच घटकामध्ये बदलाचा प्रयत्न केल्यास त्याचा सामाजिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने फारसा उपयोग होऊ शकणार नाही.

वरील चर्चेतून सद्य परिस्थितीतील शैक्षणिक विषमता, ती दूर करण्यासाठी योजलेले उपाय व समानता आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग याविषयी काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. (पा. रा पंचमुखी १९८१)

**काही महत्त्वाचे प्रश्न :**

प्रत्येक व्यक्ती जन्मत:च काही गुण आणि योग्यता घेऊन येते. त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे उपयोग करण्यास मदत करण्याची शक्ती शिक्षणामध्ये असते. असे जागतिक बँकेच्या

अहवालात म्हटले आहे. (१०८०) शिक्षणाद्वारा काही आर्थिक कार्य अभिप्रेत आहे. उदा. शिक्षित व्यक्तींची आर्थिक योग्यता वाढवून त्याद्वारा त्यांना योग्य मोबदला मिळवून देणे, हे कार्य शिक्षणाद्वारे योग्य प्रकारे नियोजन केले तर सामाजिक विषमता कमी करण्यासाठी ते एक प्रभावी माध्यम ठरू शकेल. अर्थातच त्याचा प्रभाव इतरही काही आवश्यक गोष्टींवर अवलंबून आहे. शिक्षणाच्या सोयी सर्व देशात समप्रमाणात वाटल्या गेल्या आहेत काय? सोयी पुरेशा आहेत काय? शिक्षणाच्या संधीमध्ये स्त्री-पुरुष समुदाय व व्यक्ती - व्यक्तींमध्ये समानता आहे काय? ह्या संधी समानतेने वापरल्या जात आहेत काय? प्रत्यक्ष कृतीत समानता, नोकरीच्या संधी, परिस्थिती, मोबदला यात समानता आहे काय? असे अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. या व अशा प्रश्नांभोवती केंद्रित असणारे संशोधन भारतीय संदर्भात पुष्कळ झालेले आहे. ह्यावरून असे दिसून येते की शैक्षणिक विषमतेची समस्या ही वेगळी विचारात घेता येणार नाही, तर शैक्षणिक विषमता ही समाजातील अनेक प्रकारच्या विषमतेचा केवळ बाह्यात्कारी परिणाम आहे. ह्यावर झालेल्या समाजशास्त्रीय संशोधनामध्ये सर्वसाधारण सिद्धांत आणि भारतीय संदर्भातील संशोधन यांचे अवलोकन, शिक्षण हे सामाजिक विषमतेच्या परिणामांचाच एक भाग आहे ह्या दृष्टीने करणे उचित ठरेल.

**सामाजिक समता : विविध वैचारिक पैलूंचे अवलोकन :**

फार पूर्वीपासून सामाजिक विषमतेच्या संदर्भात अनेक धर्मांमध्ये, धार्मिक सिद्धांतांमध्ये त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान, अध्यात्म ह्यामध्ये विचार व्यक्त केले गेले. अठराव्या शतकातील युरोपात यावर आणखी सामाजिक तत्त्वज्ञानची मांडणी केली गेली. त्या सर्वातून पुढे सामाजिक विषमतेविषयी काही महत्त्वाचे वैचारिक सिद्धांत विकसित झाले.

मार्क्सच्या सिद्धांतानुसार उत्पादन साधनांची मालकी ही सामाजिक विषमतेच्या निर्मितीशी संबंधित आहे. पुढील काळात अर्थात वर्गाधिष्ठित समाजरचनेच्या सिद्धांताची पुनर्मांडणी करण्याचे अनेक प्रयत्न झाले. मालमत्तेतून मिळणाऱ्या सत्तेचे कितपत महत्त्व आहे ह्यावरही विचार झाला. वेबरने घटकाचे महत्त्व कायम ठेवून सामाजिक दर्जा-प्रतिष्ठा व सत्तेचा वापर करणारे राजकीय पक्ष यांचे वेगळे महत्त्व दाखवून दिले.

शिक्षणापुरता विचार करायचा झाल्यास वर्ग आणि जात यांनी अधिक प्रभावी केलेले हे एक सत्तेचे उगमस्थान आहे. परंपरागत भारतीय संदर्भात हे फारसे ठळकपणे दिसले नसले तरी ब्रिटिशांच्या काळापासून ह्यावर आधारित विषमता अधिक स्पष्टपणे दिसू लागली.

सामाजिक संरचना कार्यवादी विचारवंतांनी सामाजिक विषमता अपरिहार्य मानली. कारण समाजातील काही कार्ये महत्त्वाची व आवश्यक असतात. त्यासाठी प्रेरणा

व मोबदला यांची योग्य सांगड समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. असे या सिद्धांतानुसार मानले गेले.

अर्थशास्त्रातील, विशेषतः १९६० च्या सुमारास मानवरूपी भांडवल सिद्धांताची मदत घेऊन केले जाणारे संशोधन ह्याच गटात मोडेल. शिक्षणातून परतीच्या वेगाविषयी केल्या गेलेल्या पुष्कळशा संशोधनाचा ह्या गटात समावेश करता येईल. (नल्लगुंडन १९६७, कोठारी १९६७, एच.एच.पंडित, डी.एम.ब्लॉग१९६७, डि.एफ चौधरी १९७०, हारबर्जर १९६६, जे.बी.टिळक १९८१ आणि इतर)[1]

## (दोन)
## प्रमुख विचारांचे विश्लेषण

भारतीय संदर्भात सामाजिक विषमतेवर झालेल्या प्रमुख संशोधनामध्ये वर्गाधिष्ठित आणि जातिधिष्ठित विषमता ह्या दोहोंच्या अंगाने विचार झालेला दिसतो.

पाश्चात्य विचारवंतांनी जाती हा एक बंदिस्त समूह मानला. जाती संस्थेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये विचारवंतांनी निश्चित केली. (डेव्हीस १९६७, हटन १९६३, घुर्ये १९५०)[2] जाती संस्था ही विषमतेवर आधारित संरचनाची अशी व्यवस्था आहे की जी सामाजिक संबंधांना मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात आकार देते असे मानले गेले, त्यातही हिंदू धर्माधिष्ठित पवित्र–अपवित्रतेच्या कल्पना त्यात महत्त्वाच्या आहेत असे निदर्शनास आणले गेले. (हटन १९६५, श्री निवास १९६६,६२)[3]. जातीवर आधारित विषमतेविषयी कार्याधिष्ठित विचार भारतीय समाज व संस्कृतीच्या संदर्भात केलेला आहे. त्यामध्ये जाती–जातीमधील सलोख्याचे संबंध, शिस्त व देवाण घेवाण ह्या विषयी संशोधन निष्कर्षही मांडले गेले. (रिजले १९६९, केतकर १९०९, सेनार्ट १९३० फर्निव्हाल १९३९, शेरिंग १९७४)[4]

नंतरच्या काळात या विरुद्ध मते मांडली गेली. विशेषतः जातिसंस्था ही केवळ हिंदू वर्गापुरती मर्यादित नसून ती इतर धर्मातही अस्तित्वात आहे ह्याचे पुरावे मांडले गेले. (अहमद १९७८, फॉरेस्टर)[5]. बंदिस्तपणा व गतिमानतेच्या पैलूंच्या महत्त्वाआधारे जात ही केवळ सांस्कृतिक व्यवस्था नाही हे निदर्शनास आणले गेले. (डिसुझा १९६१,६६)[6]. त्याचप्रमाणे सामाजिक दर्जा प्रतिष्ठा हा सामाजिक विषमतेचा आधार आहे ह्या संकल्पनेच्या मांडणीत जाती व्यवस्थेविषयी विवरण केले गेले. (घुर्ये १९५७,१९६१)[7]. तसेच ग्रामीण समुदायाविषयक अभ्यासांमध्येही त्याचा आधार घेण्यात आला.

भारतीय समाजव्यवस्थेच्या सखोल अभ्यासामध्ये सामाजिक संरचनेमध्ये केवळ जाती नव्हे तर वर्गाधिष्ठित सामाजिक संबंध देखील गुंफलेले आहेत असे दिसून आले.

(तपन १९७२, जोशी १९६९,१९७१)[८]. जमिनीची मालकी, सत्ता व मिळकत आणि उत्पादन साधनांची मालकी ह्यातील विषमतेने जातिसंघर्ष वाढला व जाती ह्या वर्गाधिष्ठित आहेत असे प्रतिपादन मार्क्सवादी विचार बैठकीतून करण्यात आले.

भारतीय संदर्भामध्ये जाती विषमतेवर आधारित समाज रचनेतील दर्जा व शिक्षण आणि संस्कृतीची उपलब्धता यामध्ये संबंध आहे असे दिसते. (ए.आर.देसाई १९६९)[९]. आर्थिक घटक ह्यात महत्वाचा ठरत असला तरी तो प्रमुख मानता येणार नाही. (मिश्रा १९६१, कामत १९७९–१९८५)[१०]. दोन परस्परांविरुद्ध सिद्धांत कल्पनांतून विषमतेकडे पाहाण्यापेक्षा परस्पर परिणाम करणाऱ्या प्रक्रियांचे विश्लेषण केले पाहिजे हा प्रवाह आता जास्त मान्यता पावलेला दिसतो. त्यामुळेच ब्रिटिश काळातील व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील सामाजिक विषमता आणि शिक्षण यांचा संबंध जास्त प्रकर्षाने दिसून येतो. शिक्षणामुळे सामाजिक दर्जा-प्रतिष्ठा जातीच्या आधारापासून वेगळा काढण्यास मदत झाली. पण त्याबरोबरच नवीन वर्ग निर्माण झाले. सामाजिक गतिशिलता वाढवण्यास सांस्कृतिकरण वा पाश्चात्यीकरणाच्या प्रक्रिया कारणीभूत ठरल्या. त्यांचा शिक्षणाशी संबंध आहे.[११] . स्वातंत्र्यानंतरच्या काळात घडलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणाद्वारा कनिष्ठ व उपेक्षित जाती जमातींना प्राप्त झालेली राजकीय-सामाजिक जाणीव आणि त्या आधारे लढवल्या गेलेल्या अनेक चळवळी (कामत, १९८५, सिंग १९७७)[१२] स्वत्वाची जाणीव, शैक्षणिक हक्कांची जाणीव व त्यासाठी पुन्हा आपापल्या जाती समूहांची राजकीय पुनर्बांधणी ही स्वातंत्र्यानंतरच्या काळात लोकशाही व मतदानाच्या हक्कांशी निगडित असणारी प्रक्रिया महत्त्वाची ठरली. त्याचबरोबर लोकशाही आणि शिक्षण ह्यांची सांगड होऊन काही प्रमाणात धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांशी तडजोड, जाती बांधिलकी बदलणे ह्या गोष्टीही काही प्रमाणात घडल्या (दामले वाय. बी. १९८२)[१३]. जाती विषमतेच्या राजकीयीकरणाची प्रक्रिया पुन्हा राजकारणावर प्रभाव पाडणारी ठरली (कोठारी १९७१) ह्या सर्व प्रक्रियांचा शिक्षणाशी संबंध आहे हे स्पष्ट आहे.[१४]

**शैक्षणिक विषमतेची परिस्थिती :- विभागवार विषमता**

साक्षरता प्रसाराचा वेग शिथिल, शिक्षणासाठी स्थलांतरित होण्याबद्दल उदासीनता तसेच सामाजिक - आर्थिकदृष्ट्या प्रगत विभागाकडे सुशिक्षितांचा ओघ ह्या सर्वांमुळे व्यक्ती-व्यक्तींमधील विषमता व त्यातून आणखी विभागवार शैक्षणिक विषमता निर्माण होते. या विषयी काही महत्त्वाच्या संशोधनांचा आढावा पुढे दिलेला आहे.

विभागवार विषमतेचा विचार दोन दृष्टिकोनांतून आंतरराज्य व ग्रामीण नागरी विषमता असा करता येईल. देशातील विविध राज्यांमध्ये शैक्षणिक सोयींविषयीची, शाळेच्या इमारती, शिक्षण, साहित्य, ग्रंथालय शिक्षणाची पातळी इ. बाबतीतील विषमता आढळते. हे भारतीय शिक्षण विषयक पाहणीतून (एन.सी.इ.आर.टी. द्वारा) दिसून येते.

पा.रा. पंचमुखी (१९७०) यांनी संख्याशास्त्र पद्धतीतील एक विशेष तंत्र वापरून राज्यांच्या शैक्षणिक प्रगतीची वर्गवारी केली. शिक्षणावरील खर्चाच्या तरतुदींबाबतच्या अभ्यासांमध्ये राज्यातील फरक अभ्यासण्याच्या आणि एकूण शैक्षणिक विकासाच्या मोजमापासाठी काही सोप्या पद्धती जे.बी.जे.टिळक(१९८१) व पा.रा.पंचमुखी(१९८३) यांनी सुचविल्या.

केरळ, तामीळनाडू, पंजाब, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र ही राज्ये शिक्षणाच्या बाबतीत आघाडीवर असून बिहार, प. बंगाल, कर्नाटक, ओरिसा, मध्यप्रदेश ही राज्ये १९६६-६७ या दशकात मागासलेली होती. परंतु साक्षरता आणि राज्यांचा आर्थिक पाया यांचाही संबंध आहे हे मुनीस राझा व आगरवाल (१९८३) यांच्या संशोधनात स्पष्ट झाले. तर ग्रामीण गुजराथ मधील साक्षरतेतील विषमता माया शहा (१९८१) यांच्या अभ्यासातून दिसते.

**व्यक्ती-व्यक्तींमधील विषमता :-**

जे.पी.नाईक (आय.सी.एस.एस. आर. ऑकेजनल पेपर्स नं.६.- १९६५) यांनी जाती आधारित शैक्षणिक विषमता अजूनही प्रभावी आहे हे दाखवले. शिक्षणासाठी प्रवेश व संधी, त्याचा उपयोग/वापर याबद्दल जातींमध्ये आणि अनूसूचित जाती-जमातींमध्ये अंतर्गत असणारी विषमता काही संशोधनाद्वारे स्पष्ट झाली. (चिटणीस १९७४, १९७७ व व्ही.पी. शहा व तारा पटेल १९७७) शैक्षणित सवलतींच्या वापरामध्ये विषमतेमध्ये जिल्ह्यानुसार तसेच ग्रामीण-शहरी विभागानुसार फरक आहे. ही विषमता जाती-जातींमध्येच आहे असे नव्हे तर अनुसूचित जाती व जमातीच्या सदस्यांमध्ये काही जातींना स्थानानुसार, शहरी विभागात असल्यामुळे जास्त फायदे मिळतात असे चित्र दिसते. सवलतींचा फायदा मिळणाऱ्यांमध्ये ह्या गटातील मुली मात्र मागे पडलेल्या दिसतात. म्हणजे अनुसूचित जाती जमातींमध्येही-मुलींच्या बाबतीत आणखी विषमता आढळते.

अनुसूचित जाती-जमातींमध्ये कुटुंबाकडून प्रेरणेचा अभाव आणि आर्थिक अडचणी इ. गोष्टी शिक्षणाचा फायदा घेण्यापासून वंचित करणाऱ्या ठरतात. तसेच शिक्षण घेतानाही उच्च दर्जाचे व चांगल्या नोकऱ्या मिळतील असे शिक्षण घेण्यात ते मागे पडतात. (अनुसूचित जाती-जमातींबद्दलचा कमिशनरचा अहवाल १९६४)

संख्याशास्त्राच्या पद्धतींचा वापर करून सामाजिक - आर्थिक दर्जा आणि जातींमधील अंतर यांच्या पातळ्या व निर्देशांक यांचा वापर सामाजिक विषमतेच्या अभ्यासाठी केला गेला आहे. (मुखर्जी व मिश्रा १९५५, कुप्पुस्वामी १९६२, रुहुडकर १९६०, कुप्पुस्वामी व सिंग १९६२, योगेश अठल १९७२) ह्या अभ्यासांमध्ये आर्थिक मिळकत, व्यवसाय, सामाजिक दर्जा ह्याबरोबरच शिक्षण हा घटक सामाजिक-आर्थिक दर्जा ठरवण्यासाठी महत्त्वाचा मानला गेला आहे.१७

शिक्षणामुळे स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक स्तर रचनेमध्ये पुष्कळच बदल झाले. सामाजिक दर्जा, स्थान व प्रतिष्ठा तसेच मिळकत, अधिकार व सत्ता इ. गोष्टींची पुन्हा वेगळ्या प्रकारे वाटणी झाली. यांचे परिणाम खेड्यावरही झालेले दिसतात. (उदा.के.एल. शर्मा १९७४) यांचे संशोधन.१८

**सामाजिक समतेसाठी शिक्षण : हरवलेली आशा :-**

भारतीय परिस्थितीच्या अभ्यासामधून सर्वसाधारणपणे शिक्षण हे परावलंबी परिवर्तक आहे, स्वतंत्र परिवर्तक नाही ह्यावर भर दिलेला दिसतो.

शिक्षण हे सामाजिक - आर्थिक दर्जा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोचवण्याचे अप्रत्यक्ष माध्यम आहे. (दत्ता १९८४).१९ इतकेच नव्हे तर बोवेल्स गिंटीस यांनी म्हटल्याप्रमाणे सामाजिक दर्जा व वर्ग यांचे पुन्हा उत्पादन करण्याचे कार्य करण्यास शिक्षण हे कारणीभूत होते. कॅपिटेशन फी, आर्थिक मदतीमध्ये राज्य-केंद्राच्या विद्यापीठांमध्ये फरक इ. गोष्टींमुळे विषमता अधिक वाढते व समाजातल्या प्रतिष्ठित गटाचा वरचष्मा शिक्षणामुळे कायम रहातो. (वाय.रामोजी राव, १९७७).२०

काही पर्यावरण विषयक घटकांचा परिणाम समाजातील दुर्बल घटकांच्या शिक्षणावर होतो. परंतु शिक्षणाआधारेच त्यावर मातही करता येते, असेही संशोधनाअंती दिसून आले आहे. (एल.एम. सिंग व वेंकटाचलम् १९७६) (पा.रा. पंचमुखी १९८१) २१ शिक्षणाच्या संधीमध्ये समानता आणली तरी जोपर्यन्त ह्याच्या मोबदल्याच्या व्यवस्थेची ही समानतेआधारे पुनावीटणी होत नाही तो पर्यन्त शिक्षण समानता आणण्यास फारसे प्रभावी ठरणार नाही. (जे.बी.जे.टिळक १९८०). गतिशीलता आणण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे हे खरे, परंतु ती किती प्रमाणात आणता येईल यावर शैक्षणिक पातळीनुसार-ही मर्यादा पडतात. खरे तर ठराविक पातळीमुळे ते फारसे प्रभावी राहातही नाही असे दिसते. हे अर्थात परतीचा वेग उच्च शिक्षणामध्ये कमी आहे यावरूनही दिसून येते. (जसवंत सिंग, १९७८० आर.सी.दत्ता १९८१) शिक्षणाच्या उच्च पातळीच्या प्रमाणात मोबदला मात्र कमीच मिळतो.

शैक्षणिक विषमतेबद्दल आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्त्रिया व मुले ह्यांची शैक्षणिक मागासता.

**स्त्री शिक्षण आणि विषमता :-**

समानतेसाठीच स्त्री चळवळींमध्ये जगात स्त्रीची शृंखलेतून मुक्तता करण्यासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन मानले गेले आहे. राज्य घटनेने स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क

दिले असले तरी प्रत्यक्षातली परिस्थिती किती धक्कादायक आहे हे कमिटी ऑन स्टेटस् ऑफ विमेनच्या (१९७१-७४) च्या अहवालातून दिसून आले. शिक्षणाशी संबंधित सर्वच बाबतीत स्त्रियांची परिस्थिती चिंता वाटण्यासारखी आहे हे त्यात नमूद केले आहे. साक्षरता, नोकरीचे क्षेत्र, प्राथमिक, शालेय व उच्च शिक्षण शाळेतील नाव नोंदणी इ. सर्वच बाबतीत स्त्रियांची टक्केवारीनुसार प्रगती कमीच आहे व त्यास अनेक सामाजिक-सांस्कृतिक कारणे आहेत हे चित्रही आता स्पष्ट झाले आहे. शिक्षणाच्या बाबतीत जसजसे वरच्या पायरीवर जावे तसे गळतीचे प्रमाण अधिक, राज्याराज्यांमध्येही स्त्री शिक्षणात असमतोल, मागासवर्गीय जातींमध्ये जास्त समस्या, शिक्षण सोडून देणे किंवा उपयोगातच न आणणे अथवा पुन्हा पुन्हा निरक्षरतेकडे घसरणे ह्या सर्व समस्यांनी स्त्रियांच्या बाबतीत शैक्षणिक विषमतेचे स्वरूप गंभीर बनवले आहे असे अनेक संशोधनांद्वारे आणि सरकारी अहवालावरून स्पष्ट होते. शहरांमध्ये सुशिक्षित व नोकरी करणाऱ्या स्त्रियांमुळे आता स्त्रिया शिकू लागल्या इतकेच नव्हे तर नोकरी करून स्वावलंबीही बनल्या आहेत. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रश्न फारसा उरलेलाच नाही असा भ्रम निर्माण होतो. परंतु टक्केवारी पाहिल्यास उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अत्यल्प आहेच पण त्यातूनही फार कमी स्त्रिया नोकरी वा आर्थिक स्वावलंबनाकडे वळतात. ग्रामीण भागातील समाजात तर बाकीच्या इतर समस्यांशिवाय उच्चभ्रू स्त्रियांना प्रतिष्ठेचा सापळा लावून घरातच अडकवले जाते. (श्री निवास एम.एन.१९८०) शिक्षण व आरोग्य यांचा निकटचा संबंध असल्यामुळे ह्या आघाडीवरही स्त्रियांचे शोषण होत असते. शिवाय त्याला एकूणच परंपराधिष्ठित समाजरचना आधार देते. औपचारिक शिक्षणामध्ये या शिवाय विशिष्ट प्रकारचे शिक्षण स्त्रियांना उपलब्ध असणे शिक्षणाच्या अभ्यासविषयाचे विशिष्ट स्वरूप ह्या समस्याही आहेतच.

औपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये स्त्रियांचा, विशेषत: शहरी गरीब वर्ग आणि ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणासाठी अनेक त्रुटी आहेत हेही आता स्पष्ट झाले आहे. अनौपचारिक शिक्षणपद्धतीने स्त्री शिक्षणास मदत करण्याचे प्रयत्न आणखी सुदृढ करणे आवश्यक आहे.

## (तीन)
## शैक्षणिक समानतेसाठी धोरणात्मक उपाययोजना

शैक्षणिक विषमतेविषयी धोरणात्मक आणि कायदेशीर उपाययोजना नजीकच्या काळात काय केल्या गेल्या आहेत याचा ऊहापोह करणे उचित ठरेल.

न्यायाच्या तत्त्वांचा विचार केल्यास समता आणण्यासाठी काही गोष्टींची पुनर्वाटणी करणे रॉल्सच्या न्यायतत्त्वाआधारे आवश्यक ठरते. समाजातील दुर्बल घटकांना समानतेच्या पातळीपर्यन्त वर आणण्यासाठी त्यांच्यावरील शिक्षणाचा खर्चाचा विचार न करता दीर्घकालीन फायदे काय आहेत, तेही समाजाच्या दृष्टीने, आर्थिकदृष्ट्या नव्हे हे पाहिले

हिजे. शिक्षणामुळे व्यक्तीला केवळ नोकरीची शाश्वतीच नव्हे तर संस्कृतीचा उपभोग ण्याची पात्रताही मिळावयास हवी. ह्यामुळेच राज्यघटनेने समानतेसाठी - संरक्षक - असमानतेचे धोरण अवलंबिलेले आहे.

अर्थात राज्यघटनेतील आश्वासनांची पूर्तता करण्यात बरेच अडथळेही आहेत. न्यायदेवतेपर्यन्त पोचण्यासाठी गरिबी, मोफत कायदा सल्ल्याची माहितीच नसणे, शिवाय राज्यांच्या मंजुरीची काही गोष्टींसाठी असणारी आवश्यकता इ. अनेक अडथळे पार पाडावे लागतात जे बहुसंख्य जनतेच्या दृष्टीने कठीण आहे.

शैक्षणिक सवलतींसाठी मागासवर्गीय कोण आहेत हे ठरवण्यास कायदा आणि काही न्यायालयीन निर्णयांचीही मदत झालेली आहे व यावरून हे निश्चित करणे फार क्लिष्ट नाही हे सिद्ध होते. मागासवर्गीयांच्या प्रगतीसाठी दिलेल्या सवलतींमुळे समाजातील जे प्रगत घटक आहेत त्यांवर अन्याय होतो हा आक्षेप योग्य नाही. कारण ह्या सवलती म्हणजे भेदाभेद करण्याचे तत्त्व नसून ज्यांच्या बाबत आतापर्यन्त विषमता अवलंबिली गेली आहे त्यांना एक प्रकारे भरपाई देणे होय.

समानतेसाठी केलेल्या १९२१ ते ८० पर्यन्तच्या प्रयत्नांच्या भारतीय शिक्षणसंस्थेतर्फे घेतलेल्या आढाव्यामध्ये पुढील निष्कर्ष निघतात.

काही सुधारणा ह्या वर्गाधिष्ठित आहेत तर काही आम जनतेत समानता आणण्यासाठी आहेत. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण, मातृभाषेचे माध्यम, प्रौढशिक्षण, स्त्री शिक्षणाच्या योजना ह्या आम जनतेसाठी केलेल्या सुधारणांच्या वर्गात मोडतील, तर दृकश्राव्य आणि टी.व्ही माध्यमाद्वारे शिक्षण व उच्च शिक्षण, व्यवसायासाठी विभागांनुसार महाविद्यालये इ. वर्गाधिष्ठित सुधारणा होत. त्यापैही आम जनतेसाठी केलेल्या सुधारणा कमी यशस्वी झाल्या आहेत किंवा यशस्वी होण्यासाठी त्यांना दीर्घ कालावधी लागतो. आधीच सामाजिक- शैक्षणिकदृष्ट्या प्रगत व प्रगल्भ असलेल्या समाजातच अशा सुधारणा लवकर यशस्वी होतात. अन्यथा अप्रगत समाजात त्या यशस्वी करण्यास अडथळे येतात असेही चित्र वेगवेगळ्या राज्यांच्या अभ्यासांवरून दिसते.

## (चार)
## भविष्यकालीन संशोधनासाठी दिशा

शैक्षणिक विषमतेच्या समस्येच्या अभ्यासावरून ही समस्या वेगळी काढली जाऊ शकत नाही. तर समाजातील अनेक सामाजिक-आर्थिक बाबींशी तिचा संबंध आहे हे अनेक संशोधनांवरून सिद्ध झाले आहे असे दिसते. परंतु ही समस्या समजावून घेणे व त्याची

उकल करण्याच्या दृष्टीने विचार करणे ह्यासाठी सखोल अभ्यासाची गरज आहे. ह्या समस्येच्या समाजातील आर्थिक-सामाजिक अशा अनेक अंगांनी पसरलेल्या मुळांचा विचार करता, ह्या अभ्यासासाठी बहुविद्याशाखीय पद्धती आणि आंतर-विद्याशाखीय पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे हेच स्पष्ट होते.

शैक्षणिक सुधारणांच्यासाठी नियोजनाद्वारे केलेले प्रयत्न फारच अपुरे आहेत. उलट नियोजनाच्या कक्षेबाहेरील प्रयत्नच जास्त दिसून येतात. समानतेचे तत्त्व अंमलात आणण्यासाठी समानता व त्याबरोबरच दर्जा टिकवणे ह्या दोन्ही गोष्टींचीं सांगड कशी घालावी, शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी इतर अनेक गोष्टी (आरोग्य, निवास, नोकरी इत्यादी ) कडून कसे आधार द्यावे लागतील इ. बाबींवर विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक समता हे सर्व समाजांचे उद्दिष्ट असते पण ते साध्य करणे तितकेच कठीण असते. हेच शैक्षणिक समतेच्याबाबत म्हणता येईल. म्हणूनच ते साध्य करण्याच्या दिशेने प्रगती करण्यासाठी जागरूक संशोधनाची कायम आवश्यकता आहे.

# REFERENCES

1. Nalla Gounden, A.M. 'Investment in Education in India' Journal of Human Resources, Vol II, No.3,1967

Kothari V.N. 'Returns to Education in India' in Baljit Singh (Ed) Education as Investment Meenakshi Prakashan, Meerut, 1967

Herberger A.C. 'Investment in Men Investment in Machines' The Case of India, in CA Anderson and M J Bowman, Education and Economic Development Frank Cass & Co,, 1966

Marc Blaug et al 'The Causes of Graduate Unemployment in India' Allen Lane, Penguin Press, 1969

Tilak J.B.G. 'Inter–State Disparities in Education Development' in K.R.G.Nair (Ed) Regional Disparities in India, Agricole Publishing Academy, New Delhi.

Choudhari D.P., 'Private and Social Returns to Education' EPW April 4 1970

Choudhari D.P., 'Education, Innovations and Agricultural Development; A Study of North India, ILO Croom Helm, London 1979

2. Davis K. Human Society. New York : Macmillan 1967

Hutton H.J. Caste in India (4th ed) London : Oxford University Press, 1963

Ghurye G.S. Caste & Class in India, Bombay Popular Book Depot, 1950

3. Hutton Caste in India Delhi : Oxford University Press 1965

Srinivas M.N.Future of Indian Caste,EPW Vol.14 Nos.7 and 8

– 1966 Social Change in Modern India, Berkely University of California Press

– 1962 Caste in Modern India, Bombay Asia Publishing House

– 1927 Religion & Society Among the Coorgs of South India, Oxford University Press

Dumont, L. Homo Hierarchicus, London : Paladin 1972

4. Risley H H The People of India (2nd ed) Delhi Orient Books, 1969

Ketkar S V The History of Caste In India, Ithaca N Y Cornell 1909

Senart E. Caste in India, The Facts and the System London Metheun 1930

Furnivall J S Netherlands, India : A Study in Plural Economy, Cambridge : Cambridge University Press 1939

Hutton op. Cit.

Sherring M.A., Hindu Castes and Tribes, New Delhi : Cosmos 1974

5. Ahmad, Imtiaz Caste and Social Stratification Among Muslims in India : New Delhi : Manohar Publications 1978

Forrester D. Caste and Christianity London : Cruzon Press

6. Desouza V S Caste and Class, Journal of Asian and African Studies, Vol. 2 1967, Nos. 3–4

7. Ghurye G.S. Caste and Class in India, Bombay : Popular Book Depot, 1957

– Caste, Class and Occupation, Bombay Popular Book Depot 1961

8. Tapan R 'Past and Prejudice', Patel Memorial Lectures (Mimeographed), 1972

Joshi P.C. 'Land Reform and Agrarian Change in India and Pakistan (Report) 1971

9. Desai A.R. (ed) Rural Sociology in India, Popular Bombay 1969

10. Mishra B.B. Indian Middle Classes : Their Growth in Modern Times Delhi Oxford University Press 1961

11. Damie Y.B. 'Reference Group Theory and mobility in the Caste System in James Silverberg (ed) Mouton & Co., The Hague 1968

Lynch O.M. 'The Politics of Untouchability - A Case from Agra, India' In Milton Singer & Cohn (eds) Structure and Change in Indian Society, Aldine Publishing Co.; Chicago, 1986

Srinivas M.N. 'Mobility in Caste System' In Singer and Cohn (eds) Structure and Change in Indian Society Wenner Gren Foundation for Anthropological Research New York, 1968

12. Kamtt A. R. Op. Cit.
Sing, Yogendra Op. Cit.

13. Damle Y. B. Caste, Religion and Politics in India New Delhi Oxford and IBH Publishing Co., 1982

14. Kothari R. (ed) Caste in Indian Politics, Orient Longmans Ltd., New Delhi 1970

15. Panchamukhi P.R. ' Decision Making in Education' EPW 1789 (Annual No.)

Panchamukhi P.R. 'On Measuring Educational Disparities in India, Giri Institute for Development Studies Lucknow, 1983

Jain K.P. A Study of Regional Imbalances in Education in India, Ph. D. BHU 1981

16. Raza Moonis, A. Ahmed, SC Nuna (1984) School Accessibility in India: The Regional Dimension, NIEPA, 1984

Lal, Nukat. A Study of the Problems, Background of Public Expenditure on Social Services in West Bengal, ISI Calcutta, 1981

17. Mukherjee & Misra Inter-Caste Tensions in India 1955 (Mimeographed)

Kuppuswamy B. & Sing. Socio-Economic Status Stratification in Western Uttar Pradesh. Sociological Bulletin March, 1967

18. Sharma K. L. The Changing Rural Stratification System (A Comparative Study of Six Villages in Rajasthan, India) New Delhi : Orient Longman, 1974

19. Datta R. C. Family Background, Education and Earnings, Transmission of Inequality. Indian Journal of Industrial Relations Vl. 20 No. 4 1985.

20. Rao Ramoji, Y. Socio-Economically Disadvantaged Children and their Academic Achievement, Institute of Educational Research, Madras 1977, JIER Vol. 1 (2) PP 9-13

21. Singh L. M. and Venkatachalam R Socio-Economic Environment and Performance Under Trimaster System, Dept of Sociology, Madras University P G Centre, Coimbatore 1979 JIEF vol. 1 (1) PP 27-29

Panchamukhi P R Inequalities in Education, Centre for Multi Disciplinary Research Dharwad 1981.

# समानतेसाठी शिक्षण-
# - मागासवर्गीयांचे शिक्षण

**प्राचार्य वसंत बनसुडे**

या परिसंवादाचे सन्माननीय अध्यक्ष, सहवक्ते व प्रथमत: मी संयोजकांचे मनस्वी आभार मानतो की, समानतेसाठी आवश्यक असणाऱ्या मागासवर्गीयांच्या शिक्षणाबद्दल माझी मते व अनुभव, माझी निरीक्षणे व परीक्षणे मांडण्याची व त्यावरील आपल्या प्रतिक्रिया जाणून घेण्याची संधी त्यांनी मला दिली.

समानता म्हणजे काय? किंवा मागासलेपणा म्हणजे काय? इत्यादी संकल्पनांचा ऊहापोह करण्यापेक्षा विविध स्तरांवरील मागासलेपणा आणि त्याचे झालेले दूरगामी परिणाम दूर करण्यासाठी कोणत्या शिक्षणाची आज नि उद्या आवश्यकता आहे, हे शिक्षण कशाप्रकारे मागासवर्गीयांपर्यंत पोहोचले पाहिजे इत्यादी महत्त्वाच्या बाबींवर मी माझे विचार प्रगट करू इच्छितो. माझे विचार मी विशिष्ट पद्धतीने मांडणार आहे. प्रथमत: भारतीय प्राचीन संस्कृतीचा आधार व पौराणिक - ऐतिहासिक काळातील दुर्दैवी बदलांबद्दल मी दाखले देईन. तद्नंतर सामाजिक -आर्थिक -सांस्कृतिक समानतेशी शिक्षणाची संलग्नता कशी असावी हे सांगेन. भारतीय शिक्षण पद्धती व शैक्षणिक मुल्यांच्या प्रवाहाबद्दल मी नंतर बोलेन. शेवटी महत्त्वाच्या घटकांवर म्हणजे सद्य: स्थितीतील शिक्षणाच्या आवश्यकतेवर माझी मते मांडेन.

**भारतीय संस्कृतीचे दाखले :-**

वैदिक संस्कृतीचा बारकाईने अभ्यास केल्यास हे जाणवते की, कर्माधिष्ठित समाजरचना किंवा वर्गरचना हा समाजाचा पाया होता. पूजा-अर्चा व होमहवन करणारा ब्राम्हण समजला जायचा किंवा अध्यापन करणारा तो ब्राम्हण अशी व्याख्या असायची हा ब्राम्हण क्षत्रीय बनू शकायचा किंवा वैश्य वा शूद्रही बनायचा. एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे जाताना (म्हणजे वर्गांतर करताना) त्या त्या वर्गातील व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी आवश्यक ते शिक्षण उपलब्ध असायचे. किंबहुना पूर्ण शैक्षणिक पद्धतीचा पायाच असा असायचा की, प्रत्येक व्यक्तीला सर्व वर्गातील किमान कौशल्ये अवगत व्हावीत. यासाठी बालपणीच (बहुधा वयाच्या आठव्या वर्षी) विद्यार्थी गुरुगृही जायचा व व्यापार, कला, राज्यशास्त्र, उपनिषदे - वेद, नितिशास्त्र, संरक्षण शास्त्र, आरोग्यशास्त्र इत्यादी शास्त्रे शिकायचा. गुरूंचे आश्रम रोज स्वच्छ ठेवणे, पाणी भरणे, जळितासाठी लाकडे तोडून आणणे, गाईचे शेण गोळा करणे इत्यादी शूद्र वर्गातील कार्येसुद्धा युवराजांना शिकावी लागायची. तात्पर्य हेच की प्रत्येक विद्यार्थी हा "पूर्ण पुरुष" व्हावयास हवा. पूर्ण पुरुषाचा पौराणिक दाखला भगवान कृष्णांचा देता येईल.

समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुष कोणतेही कार्य - व्यवसाय करावयास स्वतंत्र होती. अट एकच होती नि ती म्हणजे त्या त्या कार्याचे/ व्यवसायाचे पुरेसे कौशल्य त्या व्यक्तीने आत्मसात केले पाहिजे. अर्थात असे कौशल्य देणारे शिक्षण प्रत्येकाला उपलब्ध असायचे.

कालांतराने "अवडंबर" नावाचा रोग आमच्या आदर्श समाजरचनेस लागला. कर्माधिष्ठित समाजरचना नाहीशी होऊन जन्माधिष्ठित वर्गकलह निर्माण झाला. न्यूनगंड, अंधश्रद्धा, मानसिक व शारीरिक दौर्बल्य इत्यादीमुळे "मागासवर्गीय" हे जन्माधिष्ठितपणे मागासवर्गीयच राहिले. पौराणिक काळात महावीर कर्ण अथवा एकलव्य सारख्या विद्यार्थ्यांनी या सडलेल्या समाजरचनेस शह देण्याचा एकाकी प्रयत्न केला. अर्थात नंतरच्या ऐतिहासिक काळात सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, समाजसुधारक कर्वे - गोखले, टिळक - आगरकर, बुद्धिवंतांचे मेरुपणी स्वामी विवेकानंद आणि डॉक्टर आंबेडकर, प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी सावरकर, राष्ट्रपिता गांधीजी इत्यादींनी आपापल्या वैचारिक चौकटीतून हा तथाकथित मागासलेपणाचा रोग नष्ट करण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी आवश्यक ते शैक्षणिक उपक्रमसुद्धा राबविले. तरी मागासवर्गीयांची अव्याहतपणे चाललेली परवड थांबली नाही. याची कारणेही बरीच आहेत. त्यापैकी महत्त्वाची अशी

१) आपण शोषित किंवा मागासलेले आहोत, की पक्की भावना जन्मोजन्मी वाहात आली. परमेश्वरी इच्छेनेच आपण मागासवर्गीय म्हणून जन्मलोय नि त्याप्रमाणेच आपण जगले पाहिजे ही न्यूनगंडाची अंधश्रद्धा मागासवर्गीयांच्या तन-मनात इतकी घर करून राहिली आहे की, आजही खेड्यातला "श्रीमंत मागासवर्गीय" गरीब ब्राम्हणाच्या घरी जातो तेव्हा दाराजवळ अथवा दाराबाहेर शरीराची वळकटी करून बसतो. शारीरिक बौद्धिक क्षमता ही जातींवर आधारित नसते किंवा ती एखाद्या जमातीची मक्तेदारी नसते. हा विचारही दुर्दैवाने आमच्या मागासवर्गीय बांधवांच्या मनामध्ये येत नाही. म्हणून रुजत नाही. 'Inferiority Complex' हा या मागासवर्गीयांचा मोठा रोग बनून राहिला आहे.

२) राजा किंवा अधिपती हा देवाचा अंश असतो, क्षत्रिय किंवा ब्राम्हण कुळामध्ये जन्मणे म्हणजे अतिभाग्याचे नि पूर्वपुण्याईचे असते- हाही एक सोईस्कर समज रुजविला गेला आहे. नि तो आमच्या मागासवर्गीय बांधवानी शिरसावंद्य मानीत आणला आहे.

३) "उच्चतम संस्कृती" हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. ही संस्कृति जातीने वा जन्मानेच मिळते हा महाभयंकर समज होऊन बसला आहे. 'Excellence on all fronts of life' हा जो उच्चतम संस्कृतीचा खरा अर्थ आहे - तो आम्ही सुदैवाने आज मानू लागलो आहोत. उच्चभू समाजातील आंतरजातीय विवाह हे कौतुकास्पद ठरतात. परंतु जाणीवपूर्वक केलेले मागासवर्गीयातील आंतरजातीय विवाह मात्र कुचेष्टेचे विषय ठरतात. एखादा मागासवर्गीय उत्तम इंग्रजी बोलतोय किंवा सुंदर विचार मांडतो अथवा

अत्यंत सभ्य नागरिक म्हणून राहायचा प्रयत्न करतोय - हे आजही आम्हाला अशक्य व अपारंपरिक वाटते. Intelligence Quotient किंवा बुद्ध्यांक हा विशिष्ट जातीचाच - सर्वोत्तम असतो हाही एक गैरसमज आमच्यामध्ये रुजला आहे.-

४) "धर्म" म्हणजे "आदर्श जीवन पद्धती" क्षणोक्षणीचे आचरण हे आदर्श असले पाहिजे. "आदर्शाची" संकल्पना ही कालानुरूप बदलती असली पाहिजे आदर्श जीवन पद्धती" हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क असला पाहिजे. हे सारे होण्यासाठी "आदर्श जीवनकोष" तयार केला पाहिजे. देव-देवता, पूजा स्थाने, सण-चालीरीती इत्यादीचा अडसर या जीवनपद्धतीत होता कामा नये. राष्ट्रोन्नती, समाजसुधारणा व व्यक्तिमत्वाची योग्य जडण-घडण हे कोणत्याही आदर्श जीवनपद्धतीचे मुख्य उद्देश असले पाहिजेत. विचार-उच्चार आणि आचारांमधील मागासलेपणा आम्हाला घालवायचा आहे.

५) "मागासलेपणा" हा एका विशिष्ट जाती-जमातीचा विशेष गुण नसून तो सर्व धर्मीयांना - जातीजमातींना लागू होतो. जिथे आचार - उच्चार - विचार - मधील आदर्श संकल्पनांचा ऱ्हास झाला आहे. आडावर पाणी न भरणारा शूद्र व पाणी न भरू देणारा ब्राम्हण दोघेही मागासवर्गीयच म्हणविले पाहिजेत. तेव्हा "मागासलेपणा" हा Omnipresent आहे. तो दूर करण्यासाठी आवश्यक असणारी वातावरणनिर्मिती, साधने, समंजसपणा समाजातील सर्व थरांतून अपेक्षित आहे.

**"मागासवर्गीयांसाठी शिक्षण :-**

आतापर्यंत चर्चिलेल्या सर्व बाबींचा विचार करीता मागासवर्गीयांसाठी जे शिक्षण उपलब्ध करावयाचे आहे त्या संबंधी पुढील घटकांचा प्रामुख्याने विचार केला जावा.

१) फक्त अर्थार्जन देणारे शिक्षण आम्ही स्वातंत्र्योत्तर काळात मागासवर्गीयांनाही उपलब्ध करून दिले. या शिक्षणाचे निरंतर मूल्यमापन करण्याची संयोजना असली पाहिजे. गरजेनुसार या शिक्षणाचा स्तर उन्नत केला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मताप्रमाणे "बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे व शरीराला श्रमाकडे नेणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय."

"शिक्षण हे केवळ पोट भरण्याचे साधन नसून शिक्षणाने विवेक आणि धैर्य वाढते, मनाला शांती मिळते. शिक्षण प्राप्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने विद्या, प्रज्ञा, करुणा व शील यांच्या साहाय्याने आपले चारित्र्य बनविले पाहिजे."

डॉ. आंबेडकरांच्या मताप्रमाणे या गोष्टी शिक्षणाने साध्य झाल्यात का ते आज तपासण्याची गरज आहे.

२) मागासलेपणा नष्ट करून समानता प्रस्थापित करावयाची असल्यास, अर्थार्जन देणारे "भौतिक शिक्षण" पुरेसे ठरणार नाही. या शिक्षणासोबतच आदर्श मूल्ये रुजविणारे,

स्वत्वाची जाणीव अथवा अस्मिता जागृत करणारे व आचार-विचार-उच्चारांना उच्चतम दर्जा देणारे शिक्षण उपलब्ध केले गेले पाहिजे. योग्य वातावरण निर्मिती व साधनांची उपलब्धता व्हावी म्हणून गेली ४२ वर्षे मागासवर्गीयांना सोयी - सवलती देण्यात आल्या व देण्यात येतील. या सवलतीमुळे बऱ्याच प्रमाणात मागासवर्गीयांना शिक्षण व अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध झाले. तरीही असा उच्चशिक्षित व बऱ्यापैकी अर्थार्जन करणारा "मागासवर्गीय" हा पुन्हा मागासवर्गीय म्हणूनच जगतो. एखादा मागासवर्गीय प्राध्यापक किंवा डॉक्टर अथवा मंत्री जेव्हा तन-मन अर्पण करून काम करीत असतो, तेहाही "मागासवर्गीय" नावाचा कुत्सित शब्दप्रयोग त्याच्याबद्दल केला जातो.

मित्रहो, आम्हाला म्हणूनच अशा "शिक्षणा" ची गरज आहे. की जे जन्माधिष्ठित मागासलेपणा कर्माधिष्ठित बनवील. मागासवर्गीय म्हणून जन्माला आलेली व्यक्ती मागासवर्गीय म्हणूनच मरणार असेल तर त्या सोयी-सवलती व तथाकथित शिक्षणाचा काय अर्थ उरतो? कर्माधिष्ठित समाजरचनेची पुनर्स्थापना करणारे शिक्षण आम्हाला हवे आहे.

३) आजही आम्ही पाहतो की, दोन-तीन पिढ्यांनी सरकारी सवलतींचा वापर करून उच्चतम संस्कृती संपादित करण्याचा प्रयत्न केला तरी, पूर्ण आत्मविश्वास, स्वतंत्र बाणा आणि स्वावलंबनाची पुरेशी भावना मागासवर्गीयांमध्ये निर्माण झालेली नाही. "मी माझ्या कर्तृत्वावर, बुद्धिमत्तेच्या जोरावर आकाशाला गवसणी घालीन" असा विचार करण्याचे सामर्थ्य आमच्या मागासवर्गीय बांधवांना मिळाले पाहिजे. यासाठी पिढ्या न् पिढ्या चालत आलेला न्यूनगंड आम्हाला दूर करावयाचा आहे. प्रस्थापित झालेली चुकीची मूल्ये - अंधश्रद्धा - गैरसमज दूर करणारे शिक्षण आम्हाला हवे आहे. उच्चतम संस्कृती मग ती वैदिक असो वा ग्रीक असो वा अन्य कोणतीही असो - ती प्रत्येकालाच उपलब्ध असली पाहिजे. ही उच्चतम संस्कृती पुनर्स्थापित करणारे शिक्षण आम्हाला सर्व थरांतील - सर्व जाती-धर्मीयांना उपलब्ध करून द्यावे लागेल.

४) "समानता" ही फक्त अधिकारांची, अर्थार्जनाची किंवा भौतिक स्वरूपाची असून चालत नाही. जेव्हा शूद्राला ब्राम्हणाचा अधिकार मिळेल व ब्राम्हणसुद्धा शूद्र कार्य करण्यात कमीपणा बाळगणार नाही, तेव्हाच खरी समानता प्रस्थापित होईल. सोशल क्लबची एक Activity म्हणून आम्ही एखाद्या खेड्यात जातो व उकीरड्यांची सुद्धा साफ-सफाई करतो. सार्वजनिकरीत्या शूद्र कार्य आम्ही करतो व प्रशंसा मिळवितो. पण हेच कार्य करणारा एखादा शूद्र जेव्हा घरी येतो तेव्हा आमचे वागणे वेगळे असते. हीच बाब मागासवर्गीयांबाबतही दिसून येते. "उच्चतम संस्कृतीचे अधिकारी" म्हणून त्यांना मान्यता हवी असते आणि भौतिक पातळीवर मात्र "मागासवर्गीय" म्हणून पुन्हा सोयी सवलती हव्या असतात. या परस्परांना छेदणाऱ्या रुढी नष्ट करणारे शिक्षण आम्हाला हवे आहे.

५) मागासवर्गीयांच्या घराघरातून उत्तमतेचे दर्शन घडविणारे शिक्षण त्यांच्या बोलीभाषेतून दिले गेले पाहिजे. स्वत:चे अस्तित्व हे इतरांच्या अस्तित्वाएवढेच महत्त्वाचे आहे, एकाच मुशीतून तयार झालेले व समान क्षमता असणारे आपण मानवधर्मीय आहोत ही चेतावणी निर्माण करणारे बालसुलभ साहित्य निर्मिले गेले पाहिजे. "उचल्या" अथवा "उपरा" निर्माण करू शकणारी प्रतिभा, भारतीय संस्कृतीचे संरक्षण करणारी "घटना" निर्माण करणारे जाज्वल्य सामर्थ्य प्रत्येक मागासवर्गीयात निर्माण होऊ शकते, ही भावना वृद्धिंगत करणारे शिक्षण आज आवश्यक आहे.

६) मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शाळांतील गळतीचे प्रमाण इतर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त असून ते प्राथमिक, माध्यमिक, विश्वविद्यालयीन स्तरावर वाढत जाते. शिक्षणाची प्रात्यक्षिक व्यवहारातील उपयोगिता, आर्थिक समस्या, सामाजिक विषमता यांची सक्ती इत्यादी कारणे यास जबाबदार आहेत. हे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्राथमिक शाळांमधून "मूलभूत शिक्षण" (अथवा "साक्षरता शिक्षण") उपलब्ध करून द्यावे. मूलभूत शिक्षणाकरिता पाच वर्षांचा कालावधी पुरेसा वाटतो. या कालावधीनंतर प्रत्येक विद्यार्थ्याची 'Aptitude Test' घेऊन व त्याच्या कौटुंबिक वातावरणाचा विचार करून त्यास "उपयोजित शिक्षण" देण्यात यावे. हे उपयोजित शिक्षण ८-१० वर्षांच्या कालावधीचे असावे; ज्यामध्ये क्रमाक्रमाने पुढील घटकांचा विस्तृत अभ्यास व्हावा.

अ) विद्यार्थ्याच्या आवडीचे उपयोजित शिक्षण यावर मुख्य भर असावा.

ब) पर्यावरणाची दखल व जपणूक

क) इंग्रजी भाषेचा आवश्यक अभ्यास

ड) विपणन (Marketing) श्रमव्यवस्थापन, वित्तव्यवस्थापन, बँकींग व सहकार इत्यादी बाबींचे आवश्यक ज्ञान.

इ) शारीरिक व मानसिक संतुलनाचा अभ्यास

फ) भारतीय नीतिशास्त्र, संस्कृती, सामाजिक - राजकीय व आर्थिक तत्त्वे, घडामोडीचा अभ्यास इ.

वरील घटकांचा विस्तृत अभ्यासक्रम बनवून तो प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्याकरिता -

अ) अशा प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृह - शिक्षण व अन्य साधने विनामूल्य पुरवावीत.

ब) अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणांवर कौटुंबिक - सामाजिक समस्यांचा विपरित परिणाम होऊ नये म्हणून त्यांच्या पालकांसाठी "जागरण शिबिरे" भरविण्यात यावीत. या शिबिरांमधून या पालकांना पुढील घटकांची पूर्ण जाण द्यावी -

अ) पाल्यांच्या उज्ज्वल भवितव्याची तयारी व त्यासाठी पालकांचे लागणारे योगदान

ब) भारतीय संस्कृती - नीतिशास्त्र इत्यादींची माहिती व २१ व्या शतकातील

मागासवर्गीयांचे उन्नत स्थान

क) अंधश्रद्धा, अशास्त्रीय रुढी व चालीरीती, न्यूनगंड व नैराश्य इ. दूर करण्यासाठी "मनोजागरण."

ड) आर्थिक सुबत्तेसाठी अर्थार्जनाचे नवे मार्ग, बचतीच्या सवयी, बँका, सरकारी सवलतींची माहिती इ.

क) गणिताच्या सारख्या विषयाची सक्ती रद्द करावी. अभ्यासाची/विषयाची पुनर्रचना करावी.

आत्ताच चर्चिल्याप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना असे उपयोजित शिक्षण मिळाल्यास –

१) शाळातील गळती कमी होईल.

२) बेकारीच्या प्रश्नाची तीव्रता कमी होईल.

३) सरकारी मदतीवर अवलंबून राहण्याची "परावलंबना" –ची सवय कमी होईल.

४) "आर्थिक समता" हा सामाजिक समता – स्थापन करण्यामधील मोठा दुवा आहे, तो साधला जाईल.

५) सामाजिक उत्थापनामुळे "कर्माधिष्ठित समाजरचनेकडे" वाटचाल सुरू होईल.

मित्रहो, तकलादू आणि वरवरच्या उपायांनी व शिक्षण प्रणालीने "मागासलेपणा" दूर होणार नाही. समानता प्रस्थापित करण्यासाठी असे शिक्षण हवे जे मना-मनाला सांगेल

There is only one religion -
– the religion of LOVE
There is only one caste –
– the caste of HUMANITY
There is only one language –
– the language of HEART
And There is only one God–
– who is OMNI–PRESENT

# समानतेसाठी शिक्षण-
# मागासवर्गीयांचे शिक्षण

**श्री.ना.ज्ञा.शिंदे**

समानतेसाठी शिक्षण असा विषय आपण घेतलेला आहे. आणि त्या विषयाचे पोट भाग तीन प्रकारांनी मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यातलाच एक भाग मागासलेल्या वर्गासाठी शिक्षण हा आहे. माझ्या विचाराप्रमाणे हे तीन भाग जरी आपण विचारासाठी केले असले तरी त्यांच्या ज्या सीमारेषा आहेत त्या अस्पष्ट अशा आहेत. त्या तिन्ही घटकांचा जो विचार आहे त्याची बैठक आर्थिक व सामाजिक विषयांवर आणि काही प्रमाणात समूहावर आहे अशी माझी धारणा आहे. त्याच्यामध्ये येणाऱ्या समूहाचा असा एकंदरीत विचार करता सामाजिक अवस्थेमध्ये होणारे बदल आणि त्या बदलाच्या प्रक्रियेमध्ये या घटकाचा विशेष सहभाग या संदर्भात मला जो काही अनुभव आहे तो मी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

आपण एक पाहिलेले आहे की या विषयांवर तशी बरीच चर्चा झालेली आहे. आजही वेगळ्या संदर्भात देखील विविध पातळींवर या विषयावर वेगळ्या पद्धतीने चर्चा सुरू आहे. शैक्षणिक संदर्भ आहे, प्रतिनिधित्वाचा संदर्भ आहे, राखीव जागांचा संदर्भ आणि सर्वांनाच संधी असा एक संदर्भ आहे. प्रगतीसाठी मागासवर्गीयांना मिळणारी संधी ही समानसंधी पेक्षा अधिक, पुरेशी संधी, गरजेइतकी संधी, आवश्यकतेनुसार संधी या सूत्राचा पुरस्कार करणाऱ्यापैकी मी एक आहे. आपल्याला माहिती आहे की महाराष्ट्रामध्ये समाजसुधारणेचे प्रयत्न झाले ते सामाजिक सुधारणेचे प्रयत्न ज्या ज्या व्यक्तींनी केले, त्या त्या व्यक्तींनी केवळ एक गट असा कधी धरलेला नाही. समाजामधील सामाजिक स्तरावरचे विविध गट यांचा हा संयुक्त एकसंघ समाज असा विचार करून मागासलेला समूह पुढे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मग ते म.फुले असोत, विठ्ठल रामजी शिंदे असोत, कर्मवीर भाऊराव पाटील असोत की डॉ. आंबेडकर असोत, त्यांनी समाजाचा सर्वंकष असा विचार पहिल्यांदा मांडला आणि त्यातला जो उपेक्षित घटक असेल त्या घटकाला अधिक प्राधान्य देऊन, संधी देऊन त्याला एका स्तरावर नेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. प्रत्येकाची त्यातली भूमिका आपण समजावून घेण्याची गरज अशासाठी आहे की केवळ राखीव जागा ठेऊन, केवळ समानतेच्या संधीचा जाहीर पुरस्कार करून हा प्रश्न सुटणार आहे का? हा एक महत्त्वाचा प्रश्न आपण आपल्या बरोबर चर्चा करत असताना विचारायला काही हरकत नाही. आता आपण पाहातो, दहा वर्षे पुन्हा राखीव जागा ठेवणार आहोत. पुन्हा दहा वर्षे गरज आहे, जरूर गरज आहे. परंतु याला निश्चित कालावधीचे बंधन घातल्याशिवाय आणि शासनाने ते बंधन घालून घेतल्याशिवाय प्रगतीचा ठराविक टप्पा गाठता येणार नाही. या ठराविक

कालामध्ये आम्ही यांचे इतके प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार आहोत, अशी ठाम भूमिका घेतल्यशिवाय पांगूळपणा जो आहे, तो या विद्यार्थ्यांच्यामधला, या स्तरामधला जाणार नाही अस मला वाटतं. कारण कुठेतरी एकदा त्यांना निश्चित दिशा दिली पाहिजे. सवलती तर चालू ठेवल्या पाहिजेत. परंतु सवलती चालू ठेवीत असतानाच पाच वर्षांच्या कालावधी मध्ये आम्ही या या गोष्टींची पूर्तता करणार आहोत. सात वर्षांच्या कालावधीमध्ये आम्ही या गोष्टी करणार आहोत. दहा वर्षांच्या कालावधीमध्ये या गोष्टी करणार आहोत. आणि गरज पडल्या पुन्हा आम्ही आणखी मुदतवाढ देणार आहोत. अशा प्रकारचा एक टाईम बॉन्ड कार्यक्रम या समाजाच्या प्रगतीसाठी शासनाने निश्चित करण्याची गरज आहे.

आता हे करत असताना समान संधी देतो आपण, पण ज्यांची परिस्थिती नाही त्यांना त्या समान संधीचा काय फायदा होतो? कर्मवीर भाऊराव पाटलांनी हे गणित सोडविलेले आहे. आपल्या भागात त्यांच्या संस्था असतील किंवा नसतील किंवा आपल्या भागातले लोक आमच्या भागात आल्यानंतर त्यांनी पाहिल्या असतील. फार मोठं काम त्या महापुरुषांन केलेले आहे ते मूलभूत अशा स्वरूपाचे काम आहे. शाळा काढणे, मुलांना शिक्षण देणे हा सरळसाधा विचार, परंतु तो वेगळ्या पद्धतीने राबविण्याचा त्यांनी प्रयत्न केला, तो कसा केला? त्यांनी एक ओळखलं होतं मुलं आहेत, गरिबाची आहेत, खेड्यातील आहेत, आडबाजूला आहेत, त्यांना अन्न नाही, त्यांच्या अंगावर चांगले कपडे नाहीत, त्यांना आरोग्याला आवश्यक अशा सुविधा नाहीत, त्यांना राहण्यासाठी घर नाही, आंघोळीला चांगलं पाणी नाही. या मुलांना जर शिक्षण द्यायचं असेल तर त्यांना या शिक्षणासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करण्याची गरज् आहे. आणि ही शिक्षण घेण्यास पूरक व आवश्यक परिस्थिती निर्माण करण्याचं पहिलं महान काम कर्मवीर भाऊराव पाटलांनी केले आणि ते गरजेचे होते. आजही त्याची गरज संपलेली आहे असे माझे मत नाही. आजही ती गरज आहे. विद्यार्थ्यांना केवळ राखीव जागा दिल्या, सवलती दिल्या, मेरिटमध्येही काही विद्यार्थी आले म्हणून त्यांचे प्रश्न सुटलेत असे नाही. त्यांना त्या दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी म्हणून जे प्रयत्न करण्यासाठी म्हणून आवश्यक त्या सुविधा निर्माण करून देण्याची फार मोठी गरज आहे. मग ही सोय ते जर विद्यार्थी तिथपर्यंत येऊ शकत नसतील तर त्यांच्या दारापर्यंत गेली पाहिजे, त्या ग्रामीण भागापर्यंत गेलो पाहिजे, त्या खेड्यापर्यंत गेली पाहिजे. ही गरज भागवत असताना जर हे सगळे विचार आपण केले नाहीत तर केवळ आपण सवलती देऊन त्यांचे शिक्षण पुरे करतो असे म्हणता येणार नाही. मला कोल्हापूरच्या संस्थानचे राजे शाहूमहाराज यांचा कृतज्ञापूर्वक उल्लेख केला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रमध्ये सर्व धर्माच्या गोरगरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय कोल्हापूरला त्यांनी केली. सर्व धर्माच्या गरीब विद्यार्थ्यांसाठी चांगली वसतिगृहे बांधून मुलांची राहण्याची, जेवणाची सोय केली म्हणूनच राजकारण, शिक्षण, सहकार इत्यादी क्षेत्रात बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांनी नेतृत्व केलेले दिसू शकले. अन्यथा हे घडले नसते. शिक्षणासाठी पूरक अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे श्रीमंत शाहूमहाराजांचे ऐतिहासिक शैक्षणिक कार्य आहे.

आपण मूलभूत प्रश्नाकडे विचार केला तर शिक्षणाचा आज सगळीकडे प्रसार झाला

आहे असे दिसते. आमच्या शहरी भागामध्ये आणि ग्रामीण भागामध्ये देखील बालवाड्यांची फार मोठी चळवळ सुरू झालेली आहे. शहरीभागामध्ये खाजगी शिक्षण संस्था बालवाड्या उत्तम प्रकारे चालवतात. पालकांचाही ओढा त्यांच्याकडे आहे. परंतु देणगीच्या रूपाने या बालवाड्यांची वाढ मोठ्या प्रमाणात होते आहे हे स्पष्ट आहे. त्याच्यावर कायदेशीर बंधने वगैरे या गोष्टी वेगळ्या आहेत. परंतु खाजगी शिक्षण संस्थांची ही जी कामगिरी आहे ती दुर्लक्षून चालणार नाही. ही काळाची गरज म्हणून आहे. विद्यार्थ्यांच्या नव्या अभ्यासक्रमांच्या दृष्टीने, त्यांना जी झेप घ्यावी लागणार आहे, त्या झेप घेण्याच्या दृष्टीने त्यांची जी पूर्वतयारी करण्याची गरज आहे, त्यासाठी या बालवाड्यांची गरज आहे. नगरपालिका बालवाड्या चालवते आहे. मी नगरपालिका शिक्षण मंडळाचा गेली बरीच वर्षे सभासद आहे. आर्थिक गरिबांच्या मुलांना व मागासलेल्या वर्गातील पालकांच्या मुलांना नगरपालिकेच्या बालवाड्यांचा व प्राथमिक शाळांचा आधार अशी अवस्था सर्वत्र शहरी भागामध्ये आहे. ग्रामीण भागामध्ये प्रत्येक पहिलीच्या वर्गास जोडून एक अंशकालीन बालवाडीचा मोफत वर्ग आवश्यक असलाच पाहिजे. त्याशिवाय या मुलांची पूर्वतयारी होणार नाही. समाजकल्याण खात्याने मागासवर्गीच्यासाठी काय करावे हे पहावे. परंतु ग्रामीण भागातील सर्व बालवाड्या शिक्षण खात्यामार्फतच चालविल्या जाव्यात. श्री. चिपळूणकर साहेब यांनी अनेक प्रकल्प घेऊन या राज्याचे यशस्वी शैक्षणिक नेतृत्व केले आहे. श्री. जांभुळे साहेब वेगळया पद्धतीने परंतु तितक्याच तळमळीने नेतृत्व करीत आहेत. खास करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ते दीपस्तंभ आहेत.

ग्रामीण भागामध्ये काही ठिकाणी स्थानिक स्वरूपाच्या संस्था, काही ठिकाणी समाजकल्याण खात्यामार्फत बालवाड्या चालवल्या जातात. परंतु या बालवाड्या ज्या चालवल्या जातात त्यांचे काम आज या क्षणाला तरी पुरेसे आहे असे मला वाटत नाही. म्हणून या विद्यार्थ्यांना एकत्रित करून, त्यांना आवश्यक ती परिस्थिती निर्माण करुन आवश्यक त्या सुविधा निर्माण करून त्यांना देऊन त्यांना एकत्रित आणून बालवाड्यांच्या स्वरुपात त्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा करण्याची फार मोठी गरज आहे. त्याच्यासाठी शासनाने वरचा खर्च खाली केला पाहिजे अशी अलिकडे चर्चा चालू झालेली आहे. महाविद्यालयीन शिक्षणावर होणारा खर्च, त्याचं प्रमाण थोडसं कमी करून प्राथमिक शाळेचा खर्च थोडासा ॲडजस्ट करुन बालवाड्यावर खर्च करून या वर्गातल्या विद्यार्थ्यांसाठी खास सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. आपण प्रवेश देत असतानासुद्धा पाहतो. टक्केवारीने प्रवेश आपण राखीव ठेवतो. काही शाळांमध्ये असे प्रकार घडलेले आपल्याला पाहावयास मिळतात की शाळेमध्ये तुकड्याच वाढवावयाच्या नाहीत. म्हणजे प्रवेशाचे प्रश्न निर्माण होत नाहीत. शिक्षक भरतीचे प्रश्न निर्माण होत नाहीत. अनेक प्रकारचे अडथळे करून या वर्गाला काही वेळेला वंचित करण्याचा प्रयत्न केला जातो. या वंचित करण्याचा प्रयत्नाविरोधी ज्यांचा आवाज उठतो त्यांना न्याय मिळतो. परंतु जे गरीब आहेत त्यांचे काय? त्यांच्यात जर जाऊन त्यांच्या बालवाडीच्या स्वरूपातले जर प्रश्न आपण समजून घेतले तर याही गोष्टी आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाहीत.

वसतिगृहाचा प्रश्न हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. वर त्या प्रश्नाचा उल्लेख केला. परंतु केवळ आर्थिक मदत रु.१००/- दिले किंवा रु.३००/- दिले म्हणून त्या मुलांसाठी सरकारने आपली जबाबदारी संपली असे मानता येणार नाही. ती वसतिगृहे चांगली चालताहेत अशा अर्थाचा आपण निष्कर्ष काढता कामा नये. ज्या वसतिगृहांच्या सोयी सुविधा आहेत त्या पुरेशा करण्यासाठी जो खर्चाचा अंदाज आहे; खर्चाचे आकडे आहेत ते पुरेसे आपल्या जवळ नसतील तर आपण या विद्यार्थ्यांच्या गरजा भागवू शकत नाही. सामाजिक संस्थांनी मदत करावी हे मान्य आहे. मी मागासवर्गीय वसतिगृह संचालक मंडळाचा सभासद म्हणून काम केले आहे. पण सामाजिक संस्थांना सुद्धा खूप मर्यादा आहेत. त्या मर्यादेच्या पलीकडे जाऊन ज्या वेळेला हा खर्च करावा लागेल त्या वेळेला शासनाने ही संपूर्ण जबाबदारी उचलली पाहिजे. त्या विद्यार्थ्यांची केवळ जेवायला घातले, कुठल्या तरी वसतिगृहात त्यांची सोय केली म्हणून काम भागले असे समजून चालणार नाही. वसतिगृहे ही चांगल्या दर्जाची निर्माण करण्याची गरज ही आजही पूर्वी इतकीच निकडीची आहे.

आपण दुसरे पाहतो आहोत की या विद्यार्थ्यांना आपण प्रवेश देतो. प्रवेश दिल्यानंतर काही ठिकाणी आपल्याला आजही काय आढळून येते. चांगल्या नावाजलेल्या शाळेमध्ये प्रवेश मिळावा हे सर्वच पालकांना वाटते. मागासवर्गीय पालकांनाच का वाटू नये ? त्यांनाही वाटते. त्यांना प्रवेश दिला जातो. एका वर्गाच्या चार डिव्हीजनस् असतात. अ,ब,क,ड. अ,ब त्यांची मूळची बालवाडीपासून आलेली खास वर्गाची डिव्हीजन असते. क,ड नंतर आलेली असते. तुम्हांला आम्ही प्रवेश दिला. पालकांचे समाधान केले कुठल्या डिव्हीजनमध्ये घातले याचा आपण तपास अधिकाऱ्यांनी जरूर करावा. नवीन आलेले विद्यार्थी जे गरीब आहेत, जे मागासलेले आहेत त्यांना प्रवेश दिलेला आहे. ज्या नावाजलेल्या शाळा आहेत; ज्यांना लोकमान्यता मिळालेली आहे, राजमान्यता मिळालेली आहे अशा शाळा आहेत, त्यांच्या डिव्हीजनमध्ये जो प्रवेश दिला जातो तो कुठल्या डिव्हिजन मध्ये दिलेला आहे. कुठल्या दर्जाच्या विद्यार्थ्यांमध्ये त्या विद्यार्थ्यांना ठेवले जात आहे याचीही चौकशी ज्यावेळेला आपण वार्षिक तपासणीला जाल त्यावेळेस जरुर करा. आपल्याला तेही चित्र वेगळ्या स्वरूपात दिसल्याशिवाय राहणार नाही अशी माझी खात्री आहे.

याला जोडूनच दुसरीही गोष्ट. आपल्याला त्याच्या संबंधात विचार करावा लागेल की अभ्यासाच्या तयारीसाठी त्या विद्यार्थ्यांची खास सोय आपण करतो का ? त्यांना नादारी मिळाली, पुस्तके मिळाली, त्यांच्या पालकांच्या मनात आज क्लासेस असावेत असे आहे. खाजगी क्लासेस योग्य का अयोग्य हा अतिशय वादाचा आणि चर्चेचा विषय आहे. आणि त्यावर मतभेद हे होणारच आहेत. चांगल्या दर्जाचे क्लास कुठे आहेत हे पालकांना माहीत असते आणि पालकापेक्षा त्या मुलाला माहीत असते. असे क्लास अशाप्रकारच्या सुविधा निर्माण करून घेण्याची आर्थिक कुवत त्या पालकांची आहे का ? त्याला उत्तर "नाही" असे आहे. कारण अजूनही बराचसा वर्ग मोलमजुरी करणारा आहे. त्यांचीही मुले

आहेत. ती जी शिक्षणापासून वंचित झालेली आहेत, त्यांना या सुविधा उपलब्ध होत नाहीत. मग यांच्यासाठी काही करण्याची गरज आहे की नाही? तर माझे एक अस नम्र आवाहन आहे, शैक्षणिक सुविधातून, सरकारच्या राष्ट्रीय धोरणातून, राज्य सरकारच्या धोरणातून अनेक सुविधा निर्माण झाल्या. अनेक सवलती निर्माण झाल्या. जागा राखीव झाल्या, प्रमोशन्स् मिळाली, निरनिराळी क्षेत्रे खुली झाली. त्यातून मागासवर्गीय समाजाचे लोक, मग ते प्रशासनात असोत औद्योगिक क्षेत्रामध्ये असोत, राजकीय व सहकारी क्षेत्रामध्ये कायद्याने त्यांना संरक्षण मिळालेली आहेत. राजकीय व सहकारी क्षेत्रांमध्ये काही टक्के जागांवर ते आज पदाधिकारी म्हणून आलेले आहेत. निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये आता स्थान मिळालेला असा एक वर्ग तयार झालेला आहे. चांगल्या अर्थाने मी म्हणतो आहे. अशी काही मंडळी तयार झालेली आहेत. त्यांनी एकत्रित बसून असे एक व्यासपीठ का तयार करू नये. कारण शेवटी दुसऱ्यांनी करावे हे बरोबर आहे शासनाची ही जबाबदारी आहे प्रथम कर्तव्य आहे की जे मागासलेले आहेत त्यांना अधिक मदतीची गरज आहे. त्यांना दिलीच पाहिजे. परंतु जे पुढे गेले आहेत त्यांनी आपणहून विचार करावा की आपल्या पाठीमागे जे लोक आहेत त्यांना आपण बरोबर घेऊन जाऊ या. त्यांच्यासाठी आपण काही तरी करू या. एखादा "फोरम" आपण तयार करू या की ज्यायोगे त्यांच्यासाठी आपल्याला काही संघटना निर्माण करुन त्या मुलांना कोचिंग करता येईल. त्यांनी काही स्पर्धात्मक परीक्षांसाठी बसावं. त्यांच्यासाठी आपल्याला काही करता येईल हा विचार सुद्धा महत्त्वाचा आहे. आणि हा विचार अनेक पालकांनी आता बोलून दाखवायला सुरुवात केली आहे. ज्यांचा आवाज मोठा नाही, ज्यांना फार बोलता येत नाही ते आमच्यासारख्या जुन्या हेडमास्तरांकडे, जुन्या संस्था चालकांकडे बोलतात. इ.९वी, १०वी चा प्रश्न तयार होतो. आय.टी.आय. च्या ॲडमिशनच्या वेळेला लगेच धावपळ सुरू होते आणि मग अनेक प्रश्न त्यांच्यापुढे तयार होतात. इ.१०वीच्या निकालाचा प्रश्न, त्याच्या कोचिंग क्लासचा प्रश्न, अनेक प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झालेले असतात. या निर्माण होणाऱ्या प्रश्नांना केवळ समाज कल्याण खाते, केवळ सरकार, स्वयंसेवी संस्था या आहेतच. त्याचबरोबर आपल्याला सुदैवाने काही गोष्टी मिळालेल्या आहेत. आपण सुदैवी आहोत. आपल्याच जवळचे, आपल्याच रक्ताचे, आपल्याच नात्याचे-गोत्याचे, बांधव, त्यांना आपण मदतीचा हात देऊ या. अशाप्रकारचा एक वेगळा विचार आपण करण्याची गरज आहे असे मला वाटते. आणि तो विचारसुद्धा काही माणसं आता बोलून दाखवीत आहेत.

काही गोष्टी आपण थोपवू शकणार नाहीत. कारण आपण वर्गाविरोधी असे लढे दिलेले आहेत. तसाच मागासलेल्या वर्गातल्या सुधारलेल्या वर्गाविरोधी, मागासलेला दुसरा वर्ग आहे. असा अंतर्गत तणाव निर्माण झाला तर त्या तुमच्याच गरीब माणसाला तुम्ही दोष देऊ नका. कारण ही हताश झालेली माणसं मग वेगळ्या मार्गाला जातात. स्व:चिंतनाचा हा विचार आपल्यापुढे मांडला आहे. दुसरी बाब दिसली ती म्हणजे पूर्वी आपण गणित, इंग्रजी सोडून अकरावीला परीक्षा देत होतो. आणि काही प्रमाणात पुढचं शिक्षणही घ्यायला मिळत होते. मध्ये एक चळवळ सुरू झाली. अनेक वादाचे विषय तयार

झाले. त्यातून पाठीमागे घेणारा अभ्यास, पुढे जाणारा अभ्यास वगैरे निरनिराळी नावे त्याला दिली आणि मग तो वाद संपला. आणि सर्वांना गणित, सर्वांना इंग्रजी आलेच पाहिजे हे धोरण ठरले. आपण जर अभ्यास केला तर आपल्याला एक लक्षात येईल की गळतीचे प्रमाण मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर आहे. त्यात मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. गळतीचे प्रमाण फार मोठे असलेल्या शाळेत भरतीचे अनेक प्रयत्न शासनाने केलेले आहेत. जे गळतीचे प्रमाण आहे ते वरच्या वर्गातसुद्धा होत आहे. इ.९वी, १०वी दरम्यान ती गळती कुठल्या समाजातली होते आहे याचा तुम्ही अभ्यास कधी केला आहे काय? जरूर करा. आपल्याला त्याचं उत्तर मिळेल. मागासलेल्या वर्गातलं जास्त आहे. त्यातही आपण अधिक तपशीलात जा. चर्चेचे वेळी मागासवर्गीय मुले आपल्यापुढे आहेत आणि सर्व चर्चा मुलांच्या बाबतीत प्रामुख्याने होत असते. या समाजातील मुलींच्या शिक्षणाचा व गळतीच्या प्रश्नाचे मूळ सामाजिक रुढी, कल्पना, अंधश्रद्धा, कौटुंबिक अवस्था अशा अनेक आहेत. त्यांचे विश्व सामाजिक व आर्थिक व्याधीनं ग्रासलेले आहे. महाराष्ट्र शासनाने सावित्रीबाई फुले दत्तक योजनेद्वारे काही स्तुत्य प्रयत्न केले आहेत. परंतु ते अत्यंत अल्प आहेत.

गणित व इंग्रजी या विषयांमध्ये कोणत्या विषयांत नापासाचे प्रमाण जास्त आहे पहा. हा प्रश्न गणिताचा आहे. गणित येऊ नये असे मी म्हणणार नाही. मी आर्टस्‌चा विद्यार्थी आहे. गणित विषयाचा पदवीधर पुणे विद्यापीठातून झालो आहे. माझा हा मनाचा कल आहे. गणित या विषयासंबंधी अनेकजण सांगतील की, मनाची एक विशिष्ठ ठेवण असावी लागते. त्याला मन तसे असावे लागते. सायन्स तसेच आहे. त्याचा प्रयोग करणे, प्रयोग लिहिणे हे थोडे इन्क्लिनेशन असावे लागते. थोडासा मनाचा कल, प्रयत्न केले, त्याला ट्रेनिंग दिले, त्याच्यावर काम केले तर तो तयार होतो. पण मुळातच मनाचा कल नसेल तर त्याला जबरदस्तीने गणितच घेतले पाहिजे अशा प्रकारचे दडपण आपण लादतोय. गणितापासून या समाजाला वंचित करण्याचा हा डाव वगैरे आहे का असे काही मेहरबानी करून कोणी समजू नका. हे मी फक्त सुचवितो आहे. गणित सोडून फक्त जर बसता येत असेल तर सोयीचे होईल. तशी जर संधी मिळाली म्हणजे मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्वच विद्यार्थ्यांसाठी पूर्वी होती त्याप्रमाणे सवलत मिळावी. आपण कंपल्शन करतो. त्याऐवजी ज्याला आवश्यक वाटेल, ज्याला झेपेल त्यांनी गणित घ्यावे. इंग्रजी मात्र सर्वांनी घ्यावे ती एक भाषा आहे. आणि भाषा ही मेहनतीने, सरावाने, सवयीने आणि काही तंत्राने अवगत करता येते. असे भाषा तज्ज्ञांचे मत आहे. गणित विषयात एस.एस.सी. ला नापासाचे प्रमाण जास्त आहे. त्यातही मागासवर्गीयांची टक्केवारी अधिक आहे. त्यामुळे मागासवर्गीयांची गळती फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्या गळतीवरचा हा परिणामकारक उपाय आहे. गणित विषय सोडून परीक्षेस बसण्याची सवलत सर्वांना ठेवावी.

मागासवर्गीय शिक्षकांना काम करण्याची संधी निर्माण झाली आहे. शासनाने याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वागतचे केले पाहिजे. या शिक्षकांनी जबाबदारीने काम करून

आणि परिश्रमपूर्वक आपली गुणवत्ता वाढवून समाजामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये आदराचे स्थान मिळविलेले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलतींची माहिती त्यांना देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, व जिव्हाळ्याने त्यांच्या अडचणीत व शैक्षणिक वाटचालीमध्ये पालक ही भूमिका पार पाडणे काळाची गरज आहे. हे शिक्षक खऱ्या अर्थाने त्यांचे पालक होऊ शकतील व त्यांच्या आई-वडिलांसाठी प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालवावे लागतील.

राष्ट्रीय ऐक्य या धोरणाने राष्ट्रीय अभ्यासक्रमाची संपूर्ण पुनर्रचना करतो आहे. ही करत असताना आपण ही विद्यालये चालवतो आहे. नवोदय विद्यालयाचा हा प्रयोग आहे. पब्लिक स्कूलचा आपला प्रयोग आहे. पब्लिक स्कूल आणि नवोदय विद्यालयाचा हा जो प्रयोग आहे, त्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. मी सुदैवाने देशातील काही इतर भाग पाहिलेला आहे, अनेक ठिकाणी फिरलोय, महाराष्ट्र आघाडीवर आहे, वादच नाही. कारण देशामध्ये महाराष्ट्राची अशी भूमी आहे की जिथे डॉ.आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील इ. मंडळींनी सामाजिक समतेचे एक वातावरण मुळात तयार केलेले आहे. त्यामुळे सहकार असो, राजकारण असो, शिक्षण असो यावर एक प्रकारची जी मशागत व्हावी लागते ती मूळची या भूमीमध्ये सर्वत्र तयार झालेली आहे. त्यामुळे चटकन कुठलाही चांगला विचार स्वीकारायचा आणि त्याची अंमलबाजावणी करायची असे महाराष्ट्रीयांचे मत तयार झालेले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा नवोदय व पब्लिक स्कूल मधील प्रगतीचा अभ्यास वेळोवेळी झाला पाहिजे. या विद्यार्थ्यांचा या पब्लिक स्कूल मधला झालेला अभ्यास, त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांना दिलेल्या सुविधा आणि स्कूलमधून बाहेर पडणारा हा विद्यार्थी पुढे आयुष्यात कुठल्या कुठल्या टप्प्यावर काय काय करू शकला. त्याने जीवनातील यश आपल्या डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. कारण तो आदर्श इतर विद्यार्थ्यांच्या पुढे राहिल. हा सामाजिक आदर्श आहे. म्हणून त्या दृष्टीनेही आपल्या हातातल्या गोष्टी आहेत त्या आपण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या संदर्भात आणखीन बोलण्याचा फारसा प्रयत्न करणार नाही. बऱ्याचशा गोष्टी अशा आहेत की त्या अजूनही मांडता येतील. परंतु आजच्या विषयाला सुरुवात व्हावी त्यादृष्टीने आपल्यापुढे काही विचार असावेत, म्हणून अनुभवातून व चिंतनातून सर्व काही आपल्यांपुढे ठेवले आहे. जे सुचले ते आपल्यापुढे ठेवले. बरोबर असतील ते स्वीकारा. त्याच्यावर चर्चा करा. जे चुकीचे असतील त्यावर आपले विचार मांडा. माझे त्याच्याबद्दल काही म्हणणे नाही. परंतु वैचारिक हालचाल, चळवळ, विचार मांडणे हे सातत्याने झाले पाहिजे आणि तो उपक्रम आमच्या श्री. नागपुरे साहेबांनी जो केला त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. आम्ही सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात काम करणारी माणसं इकडे मुद्दाम यायचं आणि आपले बंधू इकडे या भागामध्ये काम करणारे आहेत ते काय बोलतायेत, काय मांडतात, त्यांचा अनुभव काय हे समजून घ्यायची ही संधी मला श्री. नागपुरे साहेबांनी दिली याबद्दल मी व्यक्तिशः त्यांचा ऋणी आहे. शिक्षण क्षेत्रातील गतिमान व्यक्तिमत्व असा त्यांचा उल्लेख करावा लागेल. श्री. चिपळूणकर साहेब माझे बी.एड. चे गुरुजी आहेत. कोल्हापूरला कॉलेजला व वसतिगृहातही तेथे होतो. त्यांच्या अध्यक्षतेखाली मला विचार मांडायची संधी इथे औरंगाबादला मिळाली

हा एक योगायोग आहे. आमच्या परिसंवादात श्री. जांभुळे साहेब सहभागी आहेत. संपूर्ण जीवन शिक्षणकार्यासाठी व सामाजिक कार्यासाठी त्यांनी वाहिलेले आहे. त्यांच्या सहवासाबद्दल आभारी आहे.

श्रीशिवाजी शिक्षण संस्था, कराड या संस्थेच्या माध्यमातून मी शैक्षणिक काम करीत आहे. तिची स्थापना कै. यशवंतरावजी चव्हाण यांनी केली आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच शैक्षणिक चळवळीची त्यांची या संस्थेच्या रूपाने सुरुवात केलेली आहे. जिल्ह्यातील पहिली सायं-प्रशाला कराडला त्यांनी हरीजन वाड्यात सुरू करून शैक्षणिक कामाची सुरुवात केली आहे. या शाळेचे उद्घाटन कै विठ्ठल रामजी शिंदे यांनी यशवंतरावजींच्या घरी हरिजन मित्रांचे समवेत भोजन घेतले. यावरून कै.यशवंतरावजींच्या कार्याचा मूळ विचार आपल्या समोर येईल. त्याच प्रेरणेने माझी संस्था आजही बहुजन समाजाला व मागासवर्गीयांना एक हक्काचा आधार आहे.

महाराष्ट्राच्या या थोर शिल्पकाराने सर्वांना मोफत शिक्षण देऊन अनेक मागावर्गीय कुटुंबाच्या जीवनात ज्ञान प्रकाश पोहोचविला त्या माझ्या श्रद्धास्थानाला विनम्र अभिवादन.

# मागासवर्गीयांचं शिक्षण आणि त्यांचे प्रश्न

**बा.ह.कल्याणकर**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने "समानतेसाठी शिक्षण" या विषयावर राज्यव्यापी परिसंवाद आयोजित केला आहे. या परिसंवादात आदिवासींचे शिक्षण, मागासवर्गीय शिक्षण आणि अल्पसंख्यांक वर्गाचे शिक्षण यांना अग्रक्रम देण्यात आला आहे. शिक्षण शास्त्र संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्तानं आजच्या शिक्षणातील महत्त्वाच्या, मौलिक आणि तितक्याच जिव्हाळयाच्या विषयाची चर्चा होत आहे या बाबींची महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञांनी नोंद घेतली पाहिजे, आणि संबंधिताचे या बाबतीत अभिनंदनही केलं पाहिजे.

समाजवादी लोकशाही रचना आणि जीवनपद्धती स्वीकारणाऱ्या समाजात शिक्षण हे सुस्संकृत मानवी जीवन निर्माण करणारे आंदोलन असते. खरं म्हणजे समाजवादासारख्या उच्च मानवी ध्येयाचा नैतिक पाया मजबूत करण्याचे काम शिक्षणाला करावं लागतं. "शिक्षण हा सर्व समाज सुधारणांचा आधार आहे" असा एक सुंदर विचार कर्मवीर भाऊराव पाटील, या कृतिशूर शिक्षण क्रांतिकारक महापुरुषानं सांगितलेला आहे. शिक्षाणात, संस्कृतीत पिछाडीवर असलेल्या मागासवर्गीयांना जीवनात पुढे आणण्यासाठी त्यांनी नांगर आणि लेखणी यांची आपल्या सबंध कार्यातून जोड घालून दिली होती. "मागासवर्गीयांचे शिक्षण" या विषयावर आपण जेव्हां जव्हा विचार करू त्यावेळी म. जोतीराव फुले, शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, मामासाहेब जगदाळे, भाऊसाहेब हिरे, गाडगे महाराज, आणि यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याचा आणि विचारांचा मागोवा घेणं क्रमप्राप्त ठरतं हे कदापि विसरून चालणार नाही.

सामाजिक न्याय, विकासाची समान संधी आणि त्या आधारावरच प्रस्थापित होणारी सामाजिक समतेची मूल्ये या बाबींचा संस्कार शिक्षण व्यवस्थेतून व्हायला पाहिजे. तो आपण स्वीकारलेल्या समाजवादी लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या उच्च मूल्यांचा परिपोष करण्यासाठी कितपत होतो? हा संशोधनाचा विषय असला तरी प्रत्यक्ष निरीक्षणातून जे प्रत्ययाला येते ते चित्र फारसे समाधानकारक नाही हे सांगणे भाग आहे. सामाजिक समता हा स्वातंत्र्याचा पाया आहे आणि ही गोष्ट खरीच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांनी "सामाजिक समता म्हणजेच लोकशाही" असा लोकशाही संदर्भातला आपला विचार मांडलेला आहे. रक्तरंजित क्रांतीशिवाय क्रांतीचा सापडलेला सनदशीर मार्ग म्हणजे लोकशाही हेच नाव त्यांच्या या विचारातलं सत्य तत्त्व आहे.

विवेकबुद्धीवर आपंल सुसंस्कृत जीवन जगणारा माणूस निर्माण करणं हेच खऱ्या

शिक्षणाचं ध्येय, धोरण आणि कार्य आहे असं मी मानतो. "शिक्षणामुळं" माणुस नवीन होतो असा एक चिंतनशील विचार महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, यांनी औरंगाबाद येथे मराठी साहित्य सभेचं उद्‌घाटन करताना मांडला होता. "मागासवर्गीयांचे शिक्षण" या विषयावर जेव्हा आपण विचार करतो, त्यावेळी त्यांना नवीन करून घेणं, त्यांच्यातला वर्तमान काळाशी सुसंगत प्रवास करणारा माणूस घडवणं हेच आपणाला अभिप्रेत असतं. त्याशिवाय या मागासवर्गीयांची सामाजिक आणि सांस्कृतिक अन्याय आणि शोषणापासून मुक्तता होणे शक्य नाही असा विचार मांडला तर तो अतिशोयक्तीचा ठरू नये. तसं पाहता, "मागासवर्गीयांचं शिक्षण" ही बाब मानव मुक्तीच्या चळवळीचाच पायाभूत आधार आहे. या मागासवर्गीयात शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन, स्त्रिया, आदिवासी, शहरातील कामगार, आणि झोपडपट्ट्यांतील राहणारा वर्ग यांचा यांत समावेश करावा लागेल. ज्ञान, संस्कृती, शिक्षण, उच्च जीवनमान यापासून तोडलेला वा पारखा राहिलेला – मग तो कुणीही असो – तो मागासवर्गीय होय आणि या तत्त्वावरच या वर्गाचे "सर्वांसाठी समान शिक्षण" आणि "शिक्षणात समाजवादी धोरण" या दोन तत्त्वांना आजच्या शैक्षणिक कृतीचा भाग करता आला पाहिजे. तरच समानतेच्या पायावर अस्तित्वात येणारं हे शिक्षण, आजची समाजवादी लोकशाही बळकट करू शकेल. आपण या समानतेच्या तत्त्वांचा म्हणजेच विकासाची सर्वांना समानसंधी या आमच्या राज्यघटनेनं दिलेल्या मूलभूत मानवी हक्कांचा विचार करण्याचं सोडून दिलं तर नैराश्यापोटी लोकांतून उसळणारा उद्रेक महाभयंकर असेल. आमचे राज्यकर्ते (ज्यात जनतेचे प्रतिनिधी, नोकरशहा, भांडवलदार आणि आमचे बुद्धिवंत) आहेत, जनतेचे असेच कठोर शिक्षण करीत राहिले तर त्यांच्या विरोधात व्यक्त होणारा संतापही तितकाच कठोर असेल. आणि या कडव्या, कठोर, दाहक क्रांतिकारी स्फोटाला कोणत्याही शतकाच्या भूलथापा देऊन बुजवता येणार नाही. वैयक्तिक चारित्र्य प्रदान करणारं शिक्षण प्रत्येकाला देऊन समाजवादी नीतिमूल्यानी संस्कार सतत वाढता ठेवावा लागेल. तसं हे प्रत्येकाच्या मानवी अस्तित्वासाठी आवश्यक आहे. {Equality} समानता या ग्रंथाचा लेखक श्री. आर. एच. टॉनी, समानतेची व्याख्या करतो, त्यांना समानतेची कल्पना ही सामाजिक न्यायाच्या संपूर्ण अशा आकलनाशी निगडित अशी वाटते. "समाजाच्या मध्यवर्ती आणि चिरस्थायी अशा प्रक्रियेतच समानता अनुस्यूत असली पाहिजे. समाजातील लोकाचे परस्परांशी रचित संबंध म्हणजे समानता होय". अशी समर्पक व्याख्या टॉनी यांनी केली आहे.

या त्यांच्या व्याख्येनुसार पाहिलं तर आपल्या आजच्या शिक्षणात समानतेचं काय चित्र दिसते? हा अभ्यासाचा आणि आमच्या शिक्षणातले अग्रक्रम निश्चित करण्यासाठी निगडित असा प्रश्न आहे. आजच्या शिक्षणावर काही मूठभर वर्गाची मक्तेदारी प्रस्थापित झालेली आहे. "इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी" या संस्थेतील गेल्या काही वर्षातील प्रवेशाची आकडेवारी बघितली तर हे ध्यानात यावं. मागासवर्गीयांचं प्रमाण पाहिलं तर अतिशय तोकडं आहे. मुख्य म्हणजे, नसल्यासारखं आहे. अगदी ३ टक्के वर्गातच आमचं स्वातंत्र्यातलं शिक्षण खेळतं आहे. शिक्षणातच समानता नसेल तर भारतीय समाजात समता

आणि समानता, सामाजिक आणि आर्थिक न्याय, सांस्कृतिक क्षेत्रात समान सहभाग आणि आमच्या राज्यघटनेनं दिलेली विकासाची समान संधी या तत्वांना आम्ही अनुभवाचा भाग करू शकणार नाही. फक्त "समानतेसाठी शिक्षण" हा विषय तात्त्विक पातळीवर चर्चा करण्यासाठी खूपच महत्त्वाचा आहे. आजच्या आमच्या भारतीय शिक्षण व्यवस्थेत समता या तत्वांनां सरळ सरळ हरताळ फासलेली आहे. आणि त्यामुळे शिक्षणातच समता नसल्यामुळे ती आमच्या समाजात दिसण्याचं तसं आता काहीच कारण दिसत नाही. कारण मक्तेदार वर्गानं आमच्या सबंध शिक्षण व्यवस्थेवर आपला पुरता कबजा प्रस्थापित केला आहेच. ज्या देशात ज्ञानाचे दरवाजे सर्वांना मोकळे नाहीत तिथं स्वातंत्र्य आणि लोकशाही ही भाषा केवळ अफवा असते. अनुभव मात्र असत नाही. मक्तेदार वर्गांच्या या लोकशिक्षण विरोधी कारवायांसमोर भारतातील विचारवंत, आणि बुद्धिवाद्यांना हार खावी लागली आहे. शेतीतील सरंजामशाही आता राजकारणात आणि शिक्षणातही तिच्या सर्व प्रवृत्ती आणि वृत्ती घेऊन उतरलेली आहे. लोकांच्या नावावर भरपूर बोललं जात आहे पण होत मात्र काहीच नाही.

खऱ्याखुऱ्या अर्थाने शैक्षणिक वर्चस्व म्हणजे इतर वर्गांची संस्कृती आणि समानता नाकरणारी जुलुमप्रद अशी मक्तेदार वर्गाच्या हातात संघटित झालेली शोषण करणारी सत्ताच असते हे कोणालाही नाकारता येणार नाही. "समानतेसाठी शिक्षण" ही चर्चाच आजच्या आमच्या भयानक अशा शैक्षणिक विषमता भक्कम करणाऱ्या प्रक्रियेची थट्टा करणारा विषय आहे. याला विनोदी वास्तववादही म्हणता येईल. लोकांकडे ज्ञान पोचविणारे सारे मार्ग बंद झालेले आहेत. ग्रामीण विभागातील शिक्षण पूर्णत: थांबलेलं आहे. ज्या काही शाळा आहेत त्या फक्त शिक्षकांना पगार मिळण्यापुरत्या भरविल्या जातात. आणि सबंध महाराष्ट्रात १७,००० शाळा एक शिक्षकी शाळा आहेत. या एक शिक्षकी शाळांचं काय दैन्य आहे हे पहायला या क्षेत्रातील जाणकारांना उसंत नाही आणि हा "संघटित वर्ग संस्कृतीच्या बाबतीत तंत्र म्हणून काम करण्याचे शिक्षण देणारीच संस्कृती असते" असा विचार मार्क्स् आणि एंजल्स् यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. तेच वास्तव या निमित्तानं आपल्या शिक्षण पद्धतीत पहायला मिळते.

१. सर्व मुलांना सार्वजनिक शाळांत मोफत शिक्षण, मुलांना कारखान्यात कामं करण्याची बंदी, औद्योगिक उत्पादनातील शिक्षणाशी संयोग घडवून आणण्याचे काम आपल्या शिक्षण पद्धतीला करता आलं नाही.

२. कारखान्यातील उद्योगधंद्याशी शेतीचा संयोग करून लोकसंख्येची वाटणी देशभर जास्त सम प्रमाणात करून शहरे आणि खेडी यामधील भेदही आम्हाला नाहीसा करता आला नाही.

३. काम करण्याची सर्वांवर जबाबदारी आणि जबाबदारीनं काम करणारा नागरिक आम्हाला आमच्या शिक्षण पद्धतीतून निर्माण करता आला नाही.

४. ज्ञानाचा जीवनाशी संबंध आणि संपर्क ठेवता आला नाही. मग ते कसलं ज्ञान?

जो कुणी माणूस आमच्या शिक्षणांनं निर्माण केला तो पैशाच्या पाठीमागे टोळा सारखा धावणारा प्राणी म्हणून. केवळ पदव्यांच्या चवडीमागे आणि कागदांच्या तुकड्यांवरच्या प्रमाणपत्रांमागे धावणारा तरुण आम्ही निर्माण केला. केवळ वैयक्तिक लाभ तोही आत्मतुष्ट आणि अगदी अल्पसंतुष्ट. जणू पदवी म्हणजे पैसा. पैसा म्हणजे संस्कृती. आणि हा वर्ग म्हणजे जणू सर्व जग. जणू तो समाजाचे काही देणं लागत नाही. फक्त समाजाकडून घेणं याचंच ट्रेनिंग आम्ही त्याला शिक्षणातून दिलं आहे. मार्कांच्या पाठीमागे धावणारे संपत्तीचे कळप निर्माण करणाऱ्या केवळ साक्षरतेच्या गोठ्यांना शिक्षण क्षेत्र म्हणायचं इतकंच!

आमच्या मागासवर्गीय तरुणांना त्यांच्या प्रत्यक्ष जीवनाशी गाठ घालून देणारी शाळा आम्हाला निर्माण करता आली नाही. जिथे ती थांबायला नको होती तिथंच आम्ही आज ती थांबविली आहे. या देशातील जवळपास ४० टक्के शाळांना स्वत:च्या इमारती नाहीत. मला वाटते आपल्या ४२ वर्षाच्या स्वातंत्र्याला भूषण वाटावी अशी ही गोष्ट नाही. लक्षात ठेवा या सर्व शाळा मागासवर्गीयांच्या मुलांच्या जास्त जवळ आहेत. शाळेत शिकायला जायचं असते आणि "एज्युकेशन इज प्रमोशन" हे या मागासवर्गीय समाजातील मुलांना माहीत नसते. आपल्या मुलाला शिकवायचं म्हणजे काय करायचं असते हे त्या मुलांच्या पालकांनाही ठाऊक नाही आणि या मुलांच्या वाट्याला आलेली दुर्मिळ संधी डोंगरावर कोसळणाऱ्या पावसासारखी पडली तशी निसटून जाते. "बार्बियानाची शाळा" या पुस्तकात बोलणारी मुलं आपल्या शिक्षिकेला लिहितात.

"गाईच्या शेणापेक्षा शाळा केव्हाही कितीतरी बरी."..७

"प्राथमिक शाळेच्या पाच वर्षात सरकारनं मला दुय्यम दर्जाचं शिक्षण देऊ केलं. एका खोलीत पाच वर्ग - म्हणजे, माझ्या हक्काच्या शिक्षणापैक्षा एक पंचमांशच. अमेरिकेतही बड्या - गोऱ्यात दरी निर्माण करण्यासाठी हीच पद्धत वापरलेली आहे. गरिबांसाठी गरिब शाळा. अगदी सुरुवातीपासूनच. आणि अगदी हेच वर्णन आपल्या देशात सध्या चालू असलेल्या मागासवर्गीयांच्या शिक्षणाला जसेच्या तसे लागू होते. नवीन शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून आलेल्या "मॉडेल स्कूल" मधून कोणता ध्येयवादी तरुण आम्ही घडवायला निघालो आहोत? काळ्या तुकतुकीत इंग्रजाच्या भारतीय आवृत्या आम्ही निर्माण करीत आहेत. कोट्यवधी रुपयांचा चुराडा या शाळांवर होत आहे. वाड्या -तांड्यावर, खेड्यावर आणि शहरातील झोपड्यांना जवळ असलेल्या शाळांना छपरं नाहीत. फळा नाही. साधी इमारत नाही. शैक्षणिक सुविधा नाही ना कसली साधनसामग्री! जे घरबसल्या पालकांच्या पैशावर संस्कृती खरेदी करू शकतात, मार्कस् खरेदी करू शकतात, गुणवत्ताही खरेदी करू शकतात. 'ट्युशन कल्चर' म्हणजे 'मनी कल्चर' ला झालेला गुप्तरोग आहे. मागासवर्गीय, गरीब मुलांना चांगलं बसता येईल अशी शाळा आम्हाला अद्याप निर्माण करता आली नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही. आमच्या लोकशाहीत काही वर्गातील मुला-मुलींसाठी इंग्रजी शाळा आणि गरिबांच्या मुलांना शाळाच नाहीत आणि असलीच तर मरतुकडी मराठी शाळा आहे. आमच्या समाजात अस्तित्वात असलेल्या

पूर्वीच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमतेला आणखी मजबूत करणारं साधन म्हणून सरकार आपलं नवं शैक्षणिक धोरण वापरत आहे. मागासवर्गीयांच्या मुलांच्यासाठी हे नवं शैक्षणिक मरण आहे असं मी म्हणालो तर या देशातील शिक्षणतज्ज्ञांनी मला वेड्यात काढू नये असं मला मनापासून सांगावेसे वाटते. मागासवर्गीयांसाठी मधात विष कालविलेली ही मधाचा आभास निर्माण करणारी बाटली आहे.

'Man is the object of Education' असा एक चांगला विचार रशियन शिक्षणतज्ज्ञ के.डी.ऊशीन्स्की यांनी मांडलेला आहे. "माणुस हाच शिक्षणांच उद्‌दिष्ट असला पाहिजे. माणुस आणि त्याच्या भोवतीची अस्तित्वात असलेली परिस्थिती ध्यानात घेऊनच शिक्षणाचं स्वरूप ठरवायला हवं. मनुष्याच्या वैज्ञानिक ज्ञानाच्या प्रकाशात या शिक्षणाचा आराखडा निश्चित करायला हवा." ..९

मागासवर्गीयांच्या जीवनाची, परिस्थितीची माहिती असलेले शिक्षणतज्ज्ञ म्हणजे म. जोतीराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हेच होत. आमच्याकडील पुस्तकीपंडितांनी या मातीजवळ असलेल्या आणि मातीतून उगवणाऱ्या ताज्या अंकुरांना कधी स्कॉलर, तत्त्ववेत्ते, शिक्षणतज्ज्ञ म्हटलेले नाही. "स्कॉलर विदाऊट सोशल आऊट लुक" अशा मंडळींनीच शिक्षणाचा तोच तो नकली विचार मांडल्यांमुळे आमच्या मागासवर्गीय समाजांच फार मोठं नुकसान झालं. रशियाचा थोर शिक्षणतज्ज्ञ के.डी. ऊशीन्स्की म्हणतो. "Which studies the earth has Man's habitant and man as its inhabitant.' ..१०

**मागासवर्गीयांचे प्रश्न**

बुजरेपणा आणि भित्रेपणा मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा आजार आहे. कामगार वर्गातील विद्यार्थ्यांना सुद्धा याच आजाराने चांगलेच घेरलेले आहे. हे या विद्यार्थ्यांचे सनातन गूढ आणि दु:ख आहे. पोथ्या आणि पुराणं यांना कवटाळून बसण्यातच यांना आजही धन्यता वाटते. त्यामानाने शहरी विद्यार्थी, त्यांच्यापेक्षा वेगळा आहे. तरी या शहरातील अतिजागरुक पालकांनी या विद्यार्थ्यांच्या स्वतंत्रवृत्तीची चांगलीच कोंडी केलेली आहे. जीवनापासून हे विद्यार्थी इतके दूर आहेत की, संघर्षाला हे विद्यार्थी खूपच घाबरतात. त्यांच्या अतिजागरुक आई-बापांनी त्यांना फक्त पैसा आणि पैशाच्या मागे पळविणारे यंत्र बनविलं आहे. बार्बियानाच्या शाळेतील मुलं आपल्या अनुभवाच्या आणि आपल्या भाषेत बोलतात ते इथे जास्त पटते. "दुसऱ्यांच्या अडचणी आपल्यासारख्याच आहेत. त्यांना सगळ्यांनी मिळून तोंड देणं हे चांगलं राजकारण. केवळ स्वत:चीच सुटका करायला बघणं हा दरिद्रीपणा झाला." प्रत्येकाने आपली वाट काढावी हे तत्त्व सुसंस्कृत आईवडिलांच्या मुलांचं लाडकं तत्त्व असलं तरी मागासवर्गीय मुलांना हे तत्त्व परवडत नाही. कित्येकदा तेच स्वत: त्या कुटुंबातले पहिले साक्षर असतात. त्यांना अश्रूचं ज्ञान असतं. ज्या मुलांच्या डोळ्यात कधी अश्रूच दिसत नाहीत त्या मुलांना मागासवर्गीय मुलांचं अश्रूंचं

ज्ञानपीठ कळणंच शक्य नाही. आणि आपले सारेच अभ्यासक्रम असेच आहेत. ज्ञान हे माणसांचे अश्रू नाहीसे करण्यासाठी असणे हे आमच्या मुलांना कोणताच शिक्षक सांगत नाही, फक्त तो पुस्तक सांगतो.

खेळ आणि सुट्ट्या, मनोरंजन आणि हुंदडणं हे श्रीमंत कुटुंबातल्या मुलांचे छंद झाले आहेत. मागासवर्गीय मुलांना हा आनंद मिळत नाही. सुट्टी झाली की त्यांना कामावर पिटाळलं जातं. कामं करणं चांगलं पण त्यांना त्यांच्या वयातील आनंद लुटण्याचा हक्क गमवावा लागतो त्याच काय? शिवाय या मागासवर्गीय मुलांची भाषा आणि त्यांच्या शाळेतील भाषा वेगवेगळी असते. पुस्तकी भाषेतील अवघड घाटांना तो घाबरतो. आणि शुद्ध भाषा कशाला म्हणायची हाही प्रश्न आपणाला अद्याप सोडविता आला नाही. गरिबांनीच साऱ्या भाषा निर्माण केल्या आहेत हे आमच्या शिक्षण खात्याला उमगलेले दिसत नाही. सर्वसामान्य लोकांच्या भाषेत सतत रोज नवी भर टाकीत असतात. शुद्ध भाषा येत नाही म्हणून मागासवर्गीय मुलांना अनेकदा नापास व्हावं लागतं आणि मग त्याला थेट घराचा आणि नंतर शेताचा रस्ता धरावा लागतो आणि त्यामुळंच की काय तीन लाख मोठ्या आणि ५ लाख छोट्या कुटुंबांच्या वर्तुळातच आमचं सारं शिक्षण अडकलेलं आहे.

मागासवर्गीय मुलांना त्यांच्या आई वडिलांच्या भाषेत बोलू दिलं आणि त्याला पुस्तकी भाषेची क्रमाक्रमानं ओळख करून दिली तर त्याला खूप मदत केल्यासारखं होईल.

१. घरातील शैक्षणिक वातावरणाचा आणि ज्ञानाच्या संस्काराचा आणि संस्कृतीचाही अभाव.

२. शाळेतील शैक्षणिक प्रेरणा बळकट करणाऱ्या पर्यावरणाचा अभाव.

३. आई-वडिलांची दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, देव आणि दैववाद, धर्म आणि रुढीशरण वृत्ती.

४. शासकीय मदतीचा अभाव - उदा: शालेय साहित्य, शिष्यवृत्त्या इ.

५. त्यामुळं वाढतं गळतीचं प्रमाण.

६. नोकरीची हमी नसण्याचा प्रश्न

७. भोवतीच्या जीवनाशी निगडित नसलेले शिक्षण.

इत्यादी प्रश्न मुख्यत: मागासवर्गीयांचे प्रश्न आहेत. त्याला विकासाची समान संधी मिळत नाही आणि मुख्य म्हणजे गुणवत्ता खरेदी करावयाच्या युगात त्याचा निभाव लागत नाही.

आजच्या आमच्या शाळा म्हणजे, आमच्या पंचवार्षिक योजनांच्या श्वासांवर जगणारी केवळ उपकरणं आहेत. निव्वळ साक्षरतेचे भव्य गोठे असे म्हटले तरी वावगे ठरु नये. ज्ञान आणि माहितीच्या कोणत्याच सुविधा आमच्या शाळांत आज उपलब्ध नाहीत.

ज्ञान आणि माहितीचा अभाव म्हणजे केवळ शोषण होय. आमची घटना म्हणते, "प्रत्येक १४ वर्षाखालील मुला-मुलींच शिक्षण सक्तीचं आणि मोफत आहे." "भाषेचे भेदभाव न करता सर्व नागरिक समान आहेत." हे पण आमच्या घटनेत सांगितलं आहे. मग इंग्रजी शाळेचे भव्य लाड कशाठायी? घटनेपेक्षा व्याकरणाला आणि ज्ञानापेक्षा भाषेला महत्त्व देणारी शिक्षण पद्धती आपण कोणासाठी राबवीत आहोत? वंशवादाचं जुनचं उपकरण अशा नव्या म्यानातून आपण आज का चालवीत आहेत? आमच्या आजच्या शाळा शाळा म्हणून पाहताना त्या किती चांगल्या आहेत? आजाऱ्याला नाकारून ज्यांची प्रकृती चांगली आहे अशा धडधाकट वर्गासाठी दवाखाने चालवावेत तशा पद्धतीने आपण आपली एकंदर शिक्षणव्यवस्था चालवीत आहोत. ज्यांना मागासवर्गीयांचं जीवन माहीत नाही असे मोजके लोक आमच्या या मागासवर्गीयांचे जीवन घडवीत आहेत. आणि हे कसं शक्य आहे? जे या मागासवर्गीयांतून पुढे आले ते तर नव ब्राम्हण झाले आहेत. जणू आपण या समाजाचे कुणीच लागत नाही अशा थाटात ते वावरत असतात. मागासवर्गीयांच्या मुलांच्या विरुद्ध सर्वच संघटित वर्गानं जणू युद्धच पुकारलं आहे. आणि ज्या परीक्षा आहेत त्या फक्त पास होण्यासाठी. या वर्गातील तरुणांना जीवनभर मदत होत राहील असं या पेपरात काहीच नसतं. जीवन जगण्यासाठी उपयोगी असं शाळांमधून काहीच मिळत नाही. या वर्गातील सर्वात तातडीच्या गरजा ओळखूनच त्यांना शिक्षण देण्याची खरी गरज आहे. हे सर्व पाहता आमचं सारं शिक्षण श्रीमंतांसाठीच चालवलं जात आहे. त्यांनाच संस्कृतीचे सारे लाभ मिळतात. 'The primary responsibility for learning rests with the learners' असे Harold Bakker म्हणाला होता. जीवनोपयोगी ज्ञान हाच आमच्या शिक्षणाचा पाया आहे. हे आज आम्ही पूर्णत: विसरत चाललो आहोत. मार्क मेमोवरचे आकडे म्हणजे गुणवत्ता आणि गुणवत्ता म्हणजे या भ्रष्ट व्यवस्थेच्या पिंजऱ्यातले पोपट अशी घृणास्पद अवस्था शिक्षण क्षेत्राला आज आली आहे.

आपल्या देशात ४३ कोटी, ७० लक्ष (१९८१) इतकी निरक्षरता आहे. "आपली साक्षरता फक्त ३६.२३ टक्के इतकी आहे. स्त्रियांची साक्षरता प्रामुख्याने मोठ्या प्रांतांत ८.९९ टक्के ते १०.१७ टक्के एवढी आहे. फक्त केरळमध्ये ६४.७ टक्के सगळ्यात जास्त स्त्रियांची साक्षरता आहे. आणि त्याचाच भाग म्हणून केरळ प्रदेशात जनन प्रमाण कमी आहे. दोन हजार साली ५० कोटी निरक्षर लोक भारतात असतील. आणि जागतिक बँकेच्या म्हणण्याप्रमाणे १५ ते १९ या वयातील ५४ टक्के निरक्षर फक्त भारतात असतील." २४.४ कोटी कामगारांपैकी ६० टक्के कामगार निरक्षर आहेत. ४० टक्क्यांपेक्षा अधिक लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. पहिल्या वर्गात दाखल झालेल्या १०० मुलांपैकी २३ मुलेच आठवीच्या वर्गात जातात. आपल्या देशात १ लक्ष ९१ हजार वस्त्यांत प्राथमिक शाळेची सोय नाहीच. ४० टक्के शाळांना पक्क्या इमारती नाहीत. ३९.७२ टक्के शाळांना फळे नाहीत. ५९.५० टक्के शाळांना पिण्याच्या पाण्याच्या सोयी नाहीत. ३५ टक्के शाळांमधून ३ ते ४ वेगवेगळे वर्ग शिकवायला एकच शिक्षक आहेत.

ही दुर्देवी दृश्ये आजचं आमचं भीषण असं शैक्षणिक वास्तव आहे. या आकडेवारीच्या

पलीकडचे निरक्षर, दारिद्री, भित्रे, पशुतुल्य जीवन जगणारे चेहरे कोणत्या स्वातंत्र्याला आज दिसणार आहेत? प्राथमिक शाळेनंतरचा प्रत्येक आघात म्हणजे "समान" होण्यापूर्वीच शेतावर कामासाठी जाणारा मुलगा आहे. वरील सर्व आकडे आपल्याकडे पाहून किंचाळत आहेत. पण त्यांच्या या करुण, दुर्दैवी किंकाळ्या ऐकायला आज म. जोतीराव फुले, कोठे दिसतात काय? कुठे हरवलं आहे, सावित्रिबाई फुले यांचं विशाल अंत:करण? त्यांनी सांगितले होते की,

"शूद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा,
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा"

**आम्ही कुठे निघालो आहोत?**

आमच्या शासनानं शिक्षणाचं सर्रास खाजगीकरण सुरू केलं आहे. खाजगीकरण म्हणजे व्यापार ज्ञानाच्या लोकशाहीच्या नरडीला नख लावण्याचं सरकारचं हे कृत्य आहे. लोकशाही नष्ट करणाऱ्या प्रक्रियेचा हा एक भाग आहे. शिक्षणाचं हे खाजगीकरण म्हणजे मध्ययुगातील मोगलाईतल्या नव्या वतनदाऱ्या आहेत. खाजगी वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, अध्यापन महाविद्यालये आणि शाळा या विना अनुदान तत्त्वावर देण्याचा सरळ सोपा अर्थ म्हणजे मागासवर्गीय मुलांना शैक्षणिक संधीपासून हुसकावणं होय.

सरसकट मुलींचं शिक्षण मोफत करण्याची काय गरज होती? हे सर्व न करणं म्हणजे, झुडपात लपून गरिबांवर बंदुक झाडण्यासारखं पातक आहे. आणि आपलं सरकार विना अनुदान असलेला नवा खानदानी वर्ग शिक्षण क्षेत्रात वाढवीत आहे. हा समाजवादाचा संकोच आहे. सरकारचं हे कृत्य समान संधीच्या तत्त्वाचा मुडदा पाडणं आहे. गरीबांची भाषा बोलत गरीबाविरुद्ध युद्ध पुकरणारं आहे. हे थांबलं नाही किंवा थांबविल नाही तर आपण या देशाच्या लोकशाहीच्या मातीत अतिरेक्यांच्या बिया पेरत आहेत हा या प्रक्रियेचा सरळ सोपा अर्थ आहे. सरकारकडे मागासवर्गीयांचं शिक्षण कसं करावं यांच्या फक्त शिफारशी आहेत, योजना आहेत. फक्त त्या धूळ खात पडल्या आहेत. फक्त आपण सुसंस्कृत मंडळींनी बार्बियानाच्या शाळेतील मुलं जे म्हणतात ते कधी विसरू नये.

"आपण खात असलेल्या प्रत्येक घासात त्यांच्या निरक्षर घामांचा थेंब आहे." आणि तो अद्याप मागसवर्गीय आहे. मागासवर्गीय जातीच्या कवचात लपलेले धनिक लांडगे खऱ्या मागासवर्गीय समाजाचे फायदे लुटत आहेत. हे या परिसंवादाच्या निमित्तानं आपण विसरू नये हीच माझी आपणाला विनंती आहे.

**संदर्भ –**

१. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या भाषणातून
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यसभेतील भाषणातून
३. कै. यशवंतराव चव्हाण यांचे मराठी साहित्य सभेतील उद्‌घाटनाचे भाषण

४. आर.एच.टॉनी, यांच्या "इक्वालिटी" या ग्रंथातून
५. आ.श्री.एन.डी.पाटील यांचे भाषण
६. पहा कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनामा मार्क्स् आणि एंजल्स पृ.क्र.६६
७. पहा "बार्बीयानाची शाळा" पृ.क्र.११
८. पहा "बार्बीयानाची शाळा" पृ.क्र. १८
९. Man as the object of Education By – K.D.Ushinsky
१०. " " " " " " "
११.पहा "बार्बीयानाची शाळा" पृ.क्र.२१
१२. योजना विशेषांक १९८७
१३. नवीन शैक्षणिक धोरण एक यथार्थ दर्शन
१४. नवीन शैक्षणिक धोरण एक यथार्थ दर्शन
१५. नवीन शैक्षणिक धोरण एक यथार्थ दर्शन
१६. बार्बीयानाची शाळा पृ.क्र. ४३.

# समानतेसाठी शिक्षण-आदिवासींचे शिक्षण

स्त्रियांनी ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात अग्रभागी असले पाहिजे. आपले दैवी गुण घेऊन, संयमशीलता घेऊन, वात्सल्य घेऊन स्त्रिया जर पुढे सरसावतील तर त्या जगाचे रूप पालटून टाकतील.

**— विनोबाजी भावे**

# समानतेसाठी शिक्षण-आदिवासींचे शिक्षण

## १. पार्श्वभूमी

इतिहासपूर्व कालापासून भरत खंडामध्ये वास्तव्य करुन राहणारे भारतवासी हेच आदिवासी. मानववंशशास्त्रज्ञ ह्यांनाच "आदि-द्रविडियन्स" म्हणून संबोधतात. भारतीय राज्यघटनेत ह्यांचाच उल्लेख - "अनुसूचित जमाती" (Scheduled Tribes) म्हणून करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न जवळ जवळ दुर्लक्षितच होता. तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आदिवासींच्या विषयी प्रामुख्याने मानव-वंशशास्त्रीय दृष्टिकोनातूनच विचार केला. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र आदिवासी जनतेला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक भर देण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सर्व स्तरावर (राष्ट्रीय, प्रांतीय,जिल्हास्तर इत्यादींवर) अनेक महत्त्वपूर्ण योजना कार्यान्वित करण्यात आल्या. कोठारी आयोगाने एकंदरीत सर्व मागासवर्गीयांच्या शिक्षणाचा फार बारकाईने विचार केलेला आहे. द्वै-भाषिक मुंबई राज्यात व त्यापूर्वीसुद्धा आदिवासींच्या शैक्षणिक उन्नतीसाठी ज्या महनीय व्यक्तींनी विशेषे प्रयत्न केले अशा व्यक्तींमध्ये कै.ठक्कर बाप्पा हे अग्रगण्य होत. १ मे १९६० नंतर नव-निर्मित महाराष्ट्र राज्यामध्ये आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी भरीव प्रयत्न झाले. १९६० ते १९७० ह्या कालखंडात अनेक स्वयंसेवी संस्थांनी आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला यथाशक्ती चालना दिली. १९७० नंतर आदिवासींच्या शैक्षणिक विकास कार्याला अधिक गती प्राप्त झाली. त्यानंतरच्या काळात स्वतंत्र आदिवासी विकास संचालनालयाची निर्मिती झाली. ह्या संचालनालयामार्फत आश्रमशाळांची योजना अधिक परिणामकारकपणे कार्यान्वित करण्याचे जोमाने प्रयत्न झाले. स्वतंत्र आदिवासी विकास महामंडळ निर्माण करण्यात आले, आणि १९८३ मध्ये राज्यस्तरावर स्वतंत्र मंत्रालयीन आदिवासी विकास विभाग अस्तित्वात आला.

आदिवासी विकास संचालनालयासाठी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हा परिषदा आणि अनुदानित/बिगर-अनुदानित स्वयंसेवी संस्था या सर्वांनी आश्रमशाळा योजना आपापल्या परीने कार्यान्वित केली. साधारणत: १९७० नंतर शिक्षण संचालनालयाने आणि मंत्रालयीन शिक्षण विभागाने आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरु केल्या. आदिवासी बोलीभाषा प्रकल्प, आदिवासी मुलांसाठी केळापूर (जिल्हा-यवतमाळ) येथे स्वतंत्र विद्यानिकेतनाची स्थापना, आदिवासी मुलामुलींसाठी विशेष शैक्षणिक सवलती, पुस्तकपेढी योजना, युनिसेफ पुरस्कृत "बालशिक्षण प्रकल्प" खडु-फळा योजना इत्यादी योजनांचा या बाबतीत आवर्जून उल्लेख करावा लागेल. कै. ताराबाई मोडक, पद्मश्री अनुताई वाघ, यांच्यासारख्या सन्माननीय व्यक्तींनीसुद्धा आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला मोठा

हातभार लावलेला आहे. एक शैक्षणिक तीर्थक्षेत्र म्हणून कोसबाड (जिल्हा-ठाणे) चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तेथील "अंगणवाडी"प्रकल्प हा पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत मूलगामी असा सिद्ध झालेला आहे.

आदिवासी जनतेची आणि त्यातल्या त्यात आदिवासी मुला-मुलींची निरक्षरता ही एक अत्यंत बिकट समस्या आहे. १९८१ च्या आकडेवारीनुसार आदिवासी पुरुषांचे सरासरी साक्षरतेचे प्रमाण ३२.४ टक्के इतके आहे. आदिवासी स्त्रियांच्या बाबतीत हेच प्रमाण ११.९ टक्के आहे. यावरुन स्पष्टपणे असे दिसून येते की, आदिवासी पुरुषांच्या मानाने आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. एकंदरीत सर्व आदिवासी जमातींचा विचार कल्यास काही जमाती (उदा.महादेव कोळी, ठाकूर, कोकणा, कोळी मल्हार) शैक्षणिकदृष्ट्या जास्त विकसित आहेत. त्या मानाने गडचिरोली जिल्ह्यातील माडिया-गोंड, अमरावती जिल्ह्यातील कोरकू, यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम, पुणे/ठाणे जिल्ह्यातील कातकरी या आदिवासी जमाती शैक्षणिकदृष्ट्या विशेष मागासलेल्या आहेत. प्रदेशपरत्वे विचार केल्यास पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील आदिवासींच्या मानाने विदर्भ व मराठवाडा विभागातील आदिवासी शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेले वाटतात.

लोकशाही व लोककल्याणकारी राज्यात अभिप्रेत असलेली किमान आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्यासाठी सर्व मागासवर्गीयांचे व विशेषत: आदिवासींचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर उत्तरोत्तर अधिक खर्च केलेला आहे. तथापि अजूनही एकंदरीत आदिवासी जनतेचा आणि आदिवासी मुलामुलींचा शैक्षणिक विकास पाहिजे तेवढा झालेला नाही हे एक कटू सत्य आहे. एकंदरीत सर्व आदिवासी जनतेचे पराकोटीचे दारिद्र्य, त्यांच्यातील अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा इत्यादी बाबी विचारात घेता त्यांची शैक्षणिक व अन्य प्रकारची उन्नती घडवून आणणे एक जबरदस्त आव्हानच आहे. सातत्याने, जिद्दीने, दीर्घकाळपर्यन्त आणि पद्धतशीरपणे सर्व स्तरांवर प्रयत्न झाले तरच हे आव्हान समर्थपणे पेलता येणे शक्य आहे, ह्याची शासनाला आणि शासकीय यंत्रणेला पूर्ण जाणीव आहे. त्या दृष्टीनेच मंत्रालयीन शिक्षण विभागाची, शिक्षण संचालनालयाची आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेसारख्या शैक्षणिक संस्थांची उद्दिष्टाप्रत अखंड वाटचाल सुरु आहे.

## २. सद्य:स्थिती

राष्ट्राच्या एकंदरीत प्रगतीच्या दृष्टीने आणि लोकशाहीच्या व्यापक हितासाठी आदिवासी जनतेला अन्य जनसामान्यांबरोबर आणणे ही एक महत्त्वाची राष्ट्रीय समस्या आहे. त्यातल्या त्यात आदिवासी मुलामुलींचा शैक्षणिक विकास घडवून आणणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास, महाराष्ट्र हे शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने

देशातील एक अग्रेसर राज्य आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार १९८१ मध्ये महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ६.२७ कोटी होती. पैकी आदिवासींची लोकसंख्या ५७.७२ लाख होती. एकूण लोकसंख्येशी आदिवासींच्या लोकसंख्येचे प्रमाण ९.२ टक्के असे होते. आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत महाराष्ट्रात एकूण १४ जिल्हे येतात. १९८१ च्या आकडेवारीनुसार (११८१ मध्ये) आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत ६४३६ प्राथमिक शाळा अस्तित्वात होत्या. ह्या शाळांना संलग्नित असलेल्या बालवाड्यांची संख्या सुमारे ४०० होती. प्राथमिक शाळांमध्ये आणि बालवाड्यांमध्ये शिकणाऱ्या मुलामुलींची संख्या अनुक्रमे ५.९० लाख आणि १५,५४० इतकी होती. १९८१ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत ३७४ माध्यमिक शाळा कार्यरत होत्या आणि त्यात १०४५ लाख विद्यार्थी शिकत होते. १९८४-८५ मध्ये महाराष्ट्रात एकूण ६२५ आश्रमशाळा होत्या. पैकी ३२६ आश्रमशाळा शासकीय, १५५ जिल्हा परिषदांतर्गत, ५ आदिवासी विकास महामंडळांतर्गत व १७९ खाजगी व्यवस्थापनाच्या होत्या. १९८४-८५ मध्ये सर्व आश्रमशाळांमधील पटनोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| पूर्व प्राथमिक स्तर– | ८२१५ |
| इयत्ता १ली – | २७६८९ |
| इयत्ता २री – | २३६४९ |
| इयत्ता ३री – | २४१२४ |
| इयत्ता ४थी – | २१३९६ |
| इयत्ता ५वी – | १७६५१ |
| इयत्ता ६वी – | १४१४४ |
| इयत्ता ७वी – | १०९९५ |
| एकूण | १४७८६३ |

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने गळती आणि नापासीची समस्या गंभीर स्वरुपाची आहे. १९७५-७६ मध्ये १०० मुलांची इयत्ता १ लीत पटनोंदणी झालेली आहे असे गृहीत धरल्यास इयत्ता १० पर्यन्त केवळ ७ विद्यार्थी राहतील एवढी प्रचंड गळती आहे. गळती आणि नापासी कमी करण्याचे बरेच प्रयत्न झाले आणि अजूनही होत आहेत. तथापि, अद्यापही आदिवासी मुलामुलींतील गळतीचे प्रमाण फारच (जवळ जवळ ८८ टक्के १९८४–८५ च्या आकडेवारीनुसार) आहे. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी पर्यन्तच जवळ जवळ ६० टक्के विद्यार्थी गळतात अथवा नापास होतात. त्यातल्या त्यात मुलांच्या मानाने मुलींच्या गळती प्रमाण अधिकच आहे. "मुलगी परक्याचे धन" ही प्रवृत्ती आदिवासींमध्ये अत्यंत दृढमूल झालेली असल्याने मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत सर्वसामान्य आदिवासी पालक अत्यंत उदासीन असतात. शिवाय मुलगी जेमतेम १२-१३ वर्षाची झाली की तिचा विवाह संपन्न केला जातो. त्यामुळे मुलांपेक्षा मुलींची गळती अधिक होते. मुलांच्या बाबतीत गळतीची आणि नापासीची अनेक कारणे देता येतील. मुलगा १०-११ वर्षांचा झाला की त्याचा उपयोग कौटुंबिक चरितार्थाला अथवा अर्थार्जनाला मदत करण्यासाठी होतो.

अनेकदा मुलांवर तशी सक्तीच करण्यात येते. मुलाने शाळेत शिकण्यापेक्षा वडिलांची अथवा कुटुंबाची परंपरागत कामे करावी असा घरच्या मंडळींचा आग्रह असतो. नोकरी करणारा मुलगा आपल्या जवळ राहणार नाही अशी भीतीसुद्धा पालकांच्या मनात असते. या व अशा अनेक कारणांमुळे आदिवासी मुलांची गळती प्रचंड होते. नापासीला ज्या बाबी कारणीभूत ठरतात त्यापैकी कंटाळवाणी अध्यापन पद्धती, शिक्षकांची सर्वसामान्य उदासीनता, आवश्यक शैक्षणिक साधनांचा अभाव आणि विद्यार्थ्यांची दैनंदिन शालेय अनुपस्थिती ह्या बाबी प्रमुख आहेत. आदिवासी पालकांची शिक्षणाविषयीची एकंदरीत उदासीनता, मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत असलेला त्यांचा नकारात्मक दृष्टिकोन आणि आदिवासी विद्यार्थ्याला पूर्वप्राथमिक ते इयत्ता ४ थी या स्तरावर शिक्षणाविषयी एक प्रकारची नावड. ह्या बाबींवर प्रभावी उपाययोजना केल्याशिवाय आदिवासी मुलामुलींमधील गळती आणि नापासीचे प्रमाण कमी होणे शक्य नाही. ह्या सर्व बाबींची जाणीव ठेवूनच अनेक प्रभावी उपाययोजना अंमलात आणण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने अंगिकारले आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतने देणे, त्यांना गणवेष व अन्य शैक्षणिक साहित्य पुरविणे इत्यादी योजनांचा प्रमुख हेतू आदिवासी मुलामुलींमध्ये शाळेविषयी व शालेय शिक्षणाविषयीची आवड निर्माण करणे हाच आहे. "खडू-फळा" योजनासुद्धा त्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण योजना आहे. आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणाचा प्रश्न हा अंतीमत: आदिवासींच्या संस्कृतीशी आणि विशेषत: त्यांच्या दैन्यावस्थेशी निगडीत आहे. त्यामुळे आदिवासी पालकांचे सामाजिक, सांस्कृतिक उद्‌बोधन होणे आणि त्याबरोबरच त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे ह्या बाबीसुद्धा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. त्यादृष्टीने आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. आदिवासी विकास विभागाने सुद्धा आदिवासींच्या आर्थिक व व्यावसायिक उन्नतीसाठी "एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प" सुरु केले. लहान-मोठ्या उद्योगधंद्यांसाठी ह्या प्रकल्पांतर्गत गरजू आदिवासींना रुपये ५०००/- पर्यन्त परत फेडीच्या तत्त्वावर बिनव्याजी कर्ज देण्यात येते. हळूहळू आदिवासींची सामाजिक आणि आर्थिक बाजू सुधारते आहे. परिणामत: आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणावर ह्या सुधारणेचा अनुकूल असा परिणाम होत आहे. आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत आश्रमशाळांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरलेले आहे. आश्रमशाळांमुळे आदिवासी मुलामुलींमध्ये शिक्षणाची बरीच आवड निर्माण झाल्याचे दिसून येते. आश्रमशाळांमधील व्यवस्थापनाचा बऱ्याचदा दिसून येणारा गलथानपणा, चांगल्या, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, चांगल्या शैक्षणिक वातावरणाचा अभाव इत्यादी बाबी विचारात घेऊनसुद्धा असे म्हणावे लागेल की, आदिवासींच्या शिक्षणाचा कणा म्हणजे आश्रमशाळा होत. अर्थात विद्यानिकेतने सुद्धा आपल्या परीने आदिवासी मुलांच्या शिक्षणाला हातभार लावीत आहेतच. ह्या दृष्टीने केळापूर (जिल्हा-यवतमाळ) येथे केवळ आदिवासी मुलांसाठी सुरु केलेल्या विद्यानिकेतनाची योजना उल्लेखनीय ठरेल. एकंदरीत आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणाविषयीची सद्य:स्थिती काहीशी संमिश्र स्वरुपाची आहे. आव्हाने बरीच आहेत. मार्ग खडतर आहे. तरी तो मार्ग यशस्वीपणे चोखाळण्याचा दुर्दम्य आशावादही दिसून येतो. हा आशावाद शासनाच्या अनेक महत्त्वपूर्ण योजनांमुळे निर्माण झालेला आहे यात शंका नाही.

## ३. विविध शासकीय योजना

* व्यक्तींच्या भावी सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुरवातीची ७ वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात, असे शास्त्रज्ञ मानतात. त्यादृष्टीने पूर्व प्राथमिक स्तरांवरील मुलामुलींचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्राथमिक शाळांना बालवाड्या/अंगणवाड्या जोडून पूर्व प्राथमिक व प्राथमिक स्तरांवरील शालेय शिक्षण एकसंध करण्याचे प्रयत्न जिल्हा परिषदांमार्फत व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत होत आहेत. १९८१ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत जवळजवळ ४०० बालवाड्या प्राथमिक शाळांना संलग्नित केलेल्या होत्या. आदिवासी भागात लहान आदिवासी मुलींमुलींमध्ये शालेय शिक्षणाची आणि शाळेची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदांमार्फत आणि राज्यशासनामार्फत अनेक योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. अंगणवाड्यांमध्ये आणि बालवाड्यांमध्ये शिकत असलेल्या आदिवासी बालक, बालिकांना खाऊ/सकस खाद्यपदार्थ देणे आणि गणवेष पुरविणे ह्या योजना त्यादृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

### १. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत "सकस आहार" योजना :

आदिवासी बालक-बालकांची शारीरिक आणि मानसिक वाढ चांगली व्हावी ह्या हेतूने आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत असलेल्या अंगणवाड्यांतील आणि बालवाड्यांतील आदिवासी मुलामुलींना या योजनेच्या अंतर्गत सकस आहार देण्यात येतो. अर्धपोटी अथवा उपाशी राहणारी आदिवासी मुले-मुली खाऊसाठी का असेना पण शाळेत येतात. परिणामत: पूर्व प्राथमिक स्तरावरील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. अंगणवाडीमध्ये २.५ ते ४.५ या वयोगटातील तर बालवाडीमध्ये साधारणत: ४ ते ५.५ वयोगटीतील बालक-बालिकांचा अंतर्भाव होतो.

### २. "युनिसेफ" पुरस्कृत बालशिक्षण प्रकल्प

"युनिसेफ" या जागतिक संघटनेच्या आर्थिक सहकार्याने हा प्रकल्प १९८२ पासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (पूर्वीची राज्य शिक्षणशास्त्र संस्था) मार्फत राज्यस्तरावर राबविण्यात येत आहे. ह्या प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यातील शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या/आदिवासी भागातील ६५ शाळा अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. बालवाड्यातील विद्यार्थ्यांना चित्रमय पुस्तकांचे संच पुरविणे, पालकांसाठी मेळावे आयोजित करणे इत्यादी कार्यक्रम ह्या प्रकल्पांतर्गत कार्यान्वित करण्यात येतात. पूर्वप्राथमिक स्तरावरील गळतीचा प्रश्न सोडविण्याच्या कामी हा प्रकल्प मर्यादित क्षेत्रापुरता का असेना पण सहाय्यभूत ठरलेला आहे.

### ३. मोफत "गणवेश पुरवठा" योजना :

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकात्मिकृत बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाड्यातील, बालवाड्यातील आणि इयत्ता १ व २ मध्ये शिकत असलेल्या आदिवासी

मुलामुलींना मोफत गणवेष देण्यात येतात. दैन्यावस्थेतील आदिवासी पालकांना तेवढाच आर्थिक दिलासा मिळतो. शिवाय त्यामुळे आदिवासी मुलांमुलींमध्ये शाळेविषयीची हळूहळू आवड निर्माण होण्यास मदत होते. आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सुद्धा सदर मुलां-मुलींना मोफत गणवेष देण्यात येतात. १९८६-८७ मध्ये इयत्ता १ली व २रीतील सुमारे १,३६,८६९ मुलामुलींना या योजनेचा लाभ झाला. लाभार्थीची संख्या १९८७-८८ मध्ये १,५९,९५१ तर १९८८-८९ मध्ये १,८३,०३९ (अपेक्षित) इतकी होती. १९७८-७९ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

शिवाय प्रायोगिक स्वरुपात १९८५-८६ पासून नेहमी स्थलांतर करीत राहणाऱ्या आदिवासींच्या मुलांमुलींसाठी १ फिरती शाळा प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आलेली आहे.

## प्राथमिक व माध्यमिक स्तरांवरील प्रमुख योजना

प्राथमिक स्तरावरील गळती आणि माध्यमिक स्तरावरील नापासी कमी करण्यासाठी ज्या योजना दोन्ही स्तरांवर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. त्या योजनांच्यामध्ये प्रामुख्याने पुस्तक पेढी योजना, आश्रमशाळा, विद्यानिकेतने, आदिवासी बोलीभाषा प्रकल्प व "खडू-फळा" योजना या योजनांचा परामर्ष घेणे आवश्यक ठरेल.

**१. पुस्तक पेढीची योजना :**

ही योजना १९७६-७७ मध्ये इयत्ता १ ते ४ या वर्गांना, ७७-७८ मध्ये इयत्ता ५वी ते ७वी या वर्गाना, ७८-७९ मध्ये ८वी ९वी या वर्गाना आणि ७९-८० मध्ये इयत्ता १०वी ला क्रमाक्रमाने लागू करण्यात आली. दैन्यावस्थेतील अथवा दारिद्र्यरेषेखालील आदिवासी भागातील/ग्रामीण भागातील पालकांच्या मुलामुलींना क्रमिक पुस्तकाचे संच परतफेडीच्या तत्त्वावर शाळांतून स्थापन झालेल्या पुस्तक पेढ्यांद्वारा देण्यात येतात. शैक्षणिक वर्ष संपताच दिलेले संच विद्यार्थ्यांनी परत करावयाचे असतात. तथापि, इयत्ता १ ली व २री च्या विद्यार्थ्यांकडून संच परत घेण्यात येत नाहीत. प्रत्येक ३ वर्षांनी पेढीतील पुस्तक संच बदलण्यात येतात. इयत्ता १ ली व दुसरीची पाठ्यपुस्तके दरवर्षी नवीन घेण्यात येतात. लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या एकूण पटसंख्येच्या २५ टक्के एवढी मर्यादित ठेवण्यात येते.

**२. प्राथमिक शाळातील अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (गणवेष व लेखन सामग्रीचा पुरवठा) :**

या योजनेअंतर्गत ज्या भागात साक्षरतेचे प्रमाण शेकडा १० पेक्षा कमी आहे आणि ६ ते ११ या वयोगटातील विद्यार्थ्यांची पटसंख्या ७० टक्क्यांपेक्षा कमी आहे अशा ग्रामीण/आदिवासी भागातील इयत्ता १ ते इयत्ता ४ मध्ये शिक्षण घेत असलेल्या

मुलामुलींना (अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमाती इत्यादीच्या) गणवेषांचे दोन संच व लेखन साहित्य (पाट्या, पेन्सिली इत्यादी) पुरविण्यात येतात. तथापि, खर्चाची मर्यादा गणवेषांसाठी रुपये ४०/- तर लेखन साहित्यासाठी रुपये १०/- ठेवण्यात आली आहे. या योजनेच्या अंतर्गत १९८६-८७ मध्ये एकूण १३६८६९ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला व सुमारे ६०.५३ लाख एवढी रक्कम खर्ची पडली.

**३. आदिवासी बोलीभाषा प्रकल्प :**

महाराष्ट्रात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचे मुख्य माध्यम मराठी आहे. तथापि बव्हंशी आदिवासी विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी नसते. त्यामुळे अशा आदिवासी मुलामुलींना (विशेषत:, "आदिम" जमातीच्या मुलामुलींना) मराठी माध्यमातून प्राथमिक शिक्षण घेणे फार अवघड ठरते. शिवाय, माडिया-गोंडी, कोलामी या भाषा मराठीहून मूलत:च भिन्न आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांची ही अडचण विचारात घेऊन तत्कालिन राज्य शिक्षणशास्त्र संस्थेमध्ये (सध्याची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे) आदिवासी बोलीभाषा प्रकल्प सुरु करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत सुरवातीला माडिया-गोंडी, वारली आणि कोलामी या भाषांमध्ये देवनागरी लिपीचा वापर करुन द्वैभाषिक स्वरुपाचे (मराठी-संबंधित बोलीभाषा असे) शैक्षणिक साहित्य (व्याकरण, शब्दकोष, पुरवणी वाचन पुस्तिका, शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका इत्यादी) निर्माण करण्यात आले. १९८६-८७ मध्ये "बालवाडी" आदिवासी आणि शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका या तीन प्रकाशनांचे पुनर्मुद्रण करण्यात आले. आपल्या मातृभाषेच्या माध्यमाने/मदतीने संबंधित आदिवासी विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकण्यास सुलभ करणे हा या प्रकल्पाचा मूळ हेतू आहे. १९८५ पासून निर्माण केलेल्या साहित्याचा वापर इयत्ता १ली व इयत्ता २री साठी सुरु झालेला आहे. यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यातील १६५ प्राथमिक शाळा व ५० बालवाड्या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**४. आश्रमशाळा :**

आदिवासी विकास संचालनालयाची आश्रमशाळेची योजना ही आदिवासी मुलामुलींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने एक पायाभूत योजना समजण्यात येते. आदिवासी/डोंगराळ भागात जवळपास शाळा नसतात. दैन्यावस्थेमुळे आदिवासी पालक आपल्या मुलामुलींना शालेय शिक्षण स्वखर्चाने देऊ शकत नाहीत. शाळेची सोय असलेल्या अथवा माध्यमिक शिक्षणाची सोय असलेल्या गावी आपल्या मुलामुलींना पाठविणे पालकांना शक्य नसते. भोजन, निवास इत्यादी अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यादृष्टीने आश्रमशाळा आदिवासी मुलामुलींना एक प्रकारचे वरदान ठरलेल्या आहेत. आश्रमशाळेचे दोन प्रकार आहेत.

१) बेसिक आश्रमशाळा (पूर्वप्राथमिक/ते इयत्ता ५ ते ७ पर्यन्त )

२) पोस्टबेसिक आश्रमशाळा (इयत्ता ५/७ ते इयत्ता १० पर्यन्त)

आश्रमशाळा ह्या निवासी प्रकारच्या शाळा असून २४ तास विद्यार्थी शालेय

वातावरणात वावरत असतात. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाची आणि शाळेची आवड निर्माण होणे फारसे कठीण ठरत नाही. भोजन,निवास, शैक्षणिक साहित्य इत्यादी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पुरविण्यात येते. १९८४-८५ मध्ये महाराष्ट्रात एकूण ६६५ आश्रमशाळा अस्तित्वात होत्या. आणि त्यांच्यामध्ये पूर्वप्राथमिक ते इयत्ता ७वी या वर्गामध्ये सुमारे १,४७,८६३ विद्यार्थी शिकत होते. (पट नोंदणीवर होते.) आश्रमशाळांवर प्रशासकीय नियंत्रण जिल्हा आदिवासी विकास अधिकाऱ्यांचे असते. शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून शैक्षणिक मार्गदर्शनाचा लाभ होतो. शिवाय, आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रातील संबंधित प्रकल्प अधिकारी (एकात्मिकृत आदिवासी प्रकल्प) यांचेसुद्धा थोडेफार नियंत्रण आश्रमशाळांवर (विशेषत: शासकीय आश्रमशाळांवर) असते. आश्रमशाळांचा दर्जा घसरत चालल्याच्या तक्रारी आजकाल बऱ्याच होत असतात. बव्हंशी आश्रमशाळांमध्ये चांगला प्रशिक्षित अध्यापक वर्ग (विशेषत: इंग्रजी, विज्ञान, गणित या विषयांसाठी) नसतो, ही वस्तुस्थिती आहे. ग्रंथालये पुरेशी समृद्ध नसतात. स्थानिक राजकारणी अंतर्गत कारभारात अधून मधून हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतात. आश्रमशाळांच्या इमारती बऱ्याचदा चांगल्या नसतात. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सुद्धा आश्रमशाळांचे अनन्यसाधारण महत्त्व ( आदिवासी मुलांमुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने ) मान्य करणे भाग आहे. आदिवासींच्या मुलामुलींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने आश्रमशाळांनी भरीव स्वरूपाचे योगदान केलेले आहे.

### ५. आदिवासी मुलांसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन :

ग्रामीण/आदिवासी भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनामार्फत धुळे, अमरावती, औरंगाबाद आणि पुसेगाव (जिल्हा-सातारा) येथे विद्यानिकेतने चालविण्यात येतात. या विद्यानिकेतनामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी १० जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. केळापूर (जिल्हा-यवतमाळ) येथे १९८१ मध्ये केवळ आदिवासी मुलांसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन सुरु करण्यात आले असून या विद्यानिकेतनात दरवर्षी८० मुलांना प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्यांच्या निवासाची, भोजनाची व शिक्षणाची सोय विनामूल्य करण्यात येते. हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम असून अन्यत्र सुद्धा अशी केवळ आदिवासी मुलांसाठी विद्यानिकेतन असणे जरुरीचे आहे. आदिवासी मुलींसाठी सुद्धा असे स्वतंत्र विद्यानिकेतन असणे आवश्यक असून तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

### ६. आदिवासी "शाळा समूह" योजना :

सर्वसामान्य शाळासमूह योजनेच्या धर्तीवर आदिवासी भागातील काही निवडक शाळांमध्ये ही योजना १९७९ पासून कार्यान्वित करण्यात येत आहे. या योजनेचे संनियंत्रण राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे या संस्थेकडे असून "योजना" शीर्षांतर्गत ५ आदिवासी शाळा समूह केंद्रे व "ना-योजना" शिर्षांतर्गत १२१ आदिवासी शाळा समूह केंद्रे कार्यरत आहेत. आदिवासी भागातील शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरण्याची सुचिन्हे दिसून येत असून योजना शीर्षांतर्गत

आणखी १३ आदिवासी शाळासमूह निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. प्रत्येक "आदिवासी समूह केंद्राला प्रतिवर्षी रुपये ८८६/- अनुदान स्वरुपात देण्यात येतात.)

७. "खडू-फळा" योजना (ऑपरेशन ब्लॅकबोर्ड)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्रात या योजनेच्या अंमलबाजवणीसाठी प्रायोगिक तत्त्वावर ५२ सामूहिक विकास गट निवडण्यात आलेले असून या योजनेच्या अंतर्गत खाली नमूद केलेले कार्यक्रम प्रामुख्याने अंमलात आणले जाणार आहेत.

१) शाळा इमारतीचे/खोल्यांचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करणे.

२) एक शिक्षक शाळांचे द्विशिक्षकी शाळात रुपांतर करणे.

३) मुलींची पटनोंदणी वाढविण्यासाठी खास स्त्री-शिक्षिकांच्या नेमणूका करणे.

४) प्रत्येक शाळेला किमान आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे.

ही एक सर्वंकष स्वरुपाची योजना असून शालेय स्तरावरील गळती व नापासीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि एकंदरीत प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल ह्यात शंका नाही.

## विशेष केंद्रीय साहाय्य योजना :

**१) आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षकांना पारितोषिके :**

ही योजना १९८२-८३ पासून सुरु करण्यात आली असून या योजनेच्या अंतर्गत आदिवासी विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना राज्यस्तरावर रुपये ५००/- चे रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येते.

**२) आदिवासी मुलांना शिक्षकांच्या कुटुंबामध्ये राहण्याची सोय उपलब्ध करुन देणे.**

१९८१/८२ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेच्या अंतर्गत इयत्ता ४ थी उत्तीर्ण झालेल्या आदिवासी मुलांना इयत्ता १०वी पर्यन्त पुढील शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून शिक्षकांच्या कुटुंबामध्ये त्यांना सामावून घेण्याची व्यवस्था केली जाते. जेणे करुन त्यांच्या भोजनाचा व निवासाचा प्रश्न सुटेल. संबंधित शिक्षक कुटुंबाला त्यासाठी इयत्ता ५वी ते इयत्ता ७वी तील प्रत्येक मुलामागे प्रतिमाह रुपये ८०/- व इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वीतील प्रत्येक मुलामागे रुपये १००/- असे अनुदान देण्यात येते.

### ४. प्रमुख शैक्षणिक सवलती/शिष्यवृत्त्या

प्राथमिक व माध्यमिक स्तरांवर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलांमुलींमध्ये शालेय शिक्षणाची आवड निर्माण करुन त्यांच्यातील गळती आणि नापासीचे प्रमाण कमीत कमी

करणे हे अत्यंत बिकट काम आहे. त्यादृष्टीने व्यापक शैक्षणिक कार्यक्रमांचाच एक भाग म्हणून आदिवासी विद्यार्थ्यांना अनेक सवलती आणि शिष्यवृत्त्या देण्यात येतात.

**१) आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्तरांवर विद्यावेतने**

आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अथवा ज्या जिल्ह्यामध्ये आदिवासी भाग अंतर्भूत आहे अशा जिल्ह्यांमधील पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून विद्यावेतने देण्यात येतात. पूर्वमाध्यमिक स्तरावर (इयत्ता ५वी ते इयत्ता ७वी) प्रत्येक आदिवासी विद्यार्थिनीला दरमहा रुपये ५०/- व प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्याला दरमला रुपये ४०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

ब) माध्यमिक स्तरावर (इयत्ता ८वी ते इयत्ता १०वी ) हेच विद्यावेतन प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्याला प्रतिमाह रुपये ५०/- आणि प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्यीनीला रुपये ६०/- प्रतिमाह या दराप्रमाणे देण्यात येते. आश्रमशाळांमधील अथवा अन्य निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना ही विद्यावेतने देण्यात येत नाहीत.

आदिवासी मुलांमुलींमध्ये शिक्षणाविषयीची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि पूर्वमाध्यमिक व माध्यमिक स्तरांवरील गळती कमी करण्याच्या दृष्टीने विद्यावेतने महत्त्वाची ठरतात.

**२) आदिवासी/ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना :**

१९७१-७२ पासून भारत सरकारने ही शिष्यवृत्ती सुरु केली. प्रत्येक सामूहिक विकास गटातील /आदिवासी विकास गटातील ३ पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. निवासी शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते. ही शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी शासकीय परीक्षा मंडळाची माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. इयत्ता ७वीत शिकणारे व १५ वर्षापेक्षा जास्त वय नसणारे विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतात.

निवासी शाळांतील इयत्ता ८वी ते इयत्ता १०वी पर्यन्तच्या पात्र विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये १००/- प्रमाणे (१० महिन्यांसाठी) ही शिष्यवृत्ती मिळते. इयत्ता ९वी व इयत्ता १०वी मधील पात्र विद्यार्थ्यांना (डे स्कॉलर) प्रतिमाह रुपये ६०/- प्रमाणे (१० महिन्यांसाठी) शिष्यवृत्ती देय आहे. इयत्ता ११वी व १२वी मधील विद्यार्थ्यांनासुद्धा आता ही शिष्यवृत्ती देण्यात येते. तथापि, दरवर्षी संबंधित विद्यार्थ्याने प्रत्येक विषयात किमान ३० टक्के गुण व एकंदरीत किमान ४० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व आदिवासींच्या शिक्षणाचे भवितव्य

बदलत्या काळाची गरज अगोदरच दूरदृष्टीने जाणून घेऊन काळाला अनुरुप बदल

घडवून आणणे हीच प्रगती. तथापि, भविष्याचा वेध घेणाऱ्या शिक्षणाशिवाय व्यक्तीची अथवा राष्ट्रची प्रगती होऊ शकत नाही. ह्या दृष्टीने, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्व जाणून घेणे अगत्याचे आहे. आपल्या देशाची प्रमुख शैक्षणिक समस्या म्हणजे निरक्षरता. मुलामुलींची आणि प्रौढांची निरक्षरता. एकीकडे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्‌दिष्ट १९९० पर्यन्त गाठावयाचे आहे. दुसरीकडे सर्व प्रौढांना शतकाअखेरपर्यन्त साक्षर करावयाचे आहे. त्यादृष्टीने, साहजिकच मागसवर्गीयांच्या विशेषत: आदिवासींच्या शिक्षणाला अग्रक्रम द्यावा लागणार आहे. सर्व आदिवासी मुलामुलींना शालेय शैक्षणिक प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी आवश्यक तेथे अनौपचारिक पद्धतीचाही अवलंब करावा लागेल. कारण १०० टक्के शालेय पटनोंदणी केवळ औपचारिक पद्धतीच्या शिक्षणाने लवकर पूर्ण होण्यासारखी नाही. शिवाय कार्यात्मक साक्षरतेच्या कार्यक्रमाचेही महत्त्व नाकारुन चालणार नाही. शालेय शिक्षण आणि प्रौढ शिक्षण ह्या एकाच नाण्याच्या दोन परस्परपूरक बाजू आहेत. आदिवासींच्या शिक्षणाच्या बाबतीत ह्या दोन्ही बाजूंचा योग्य तो समन्वय साधला जाणे जरुरीचे आहे.

आश्रमशाळांचे स्थान आदिवासी मुलामुलींच्या शालेय शिक्षणाच्या दृष्टीने अनन्य-साधारण महत्त्वाचे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळती आणि नापासीचे चिंताजनक प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण कमीतकमी करण्यासाठी आश्रमशाळांची वाढ करणे जरुरीचे आहे. त्याशिवाय, शालाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा शालेय शिक्षण प्रवाहात सामील करुन घेणे अवघड होईल. आदिवासी मुलांसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन हा महत्त्वपूर्ण उपक्रम असून अशी आणखी विद्यानिकेतने सुरु करण्याची जरुरी आहे. शिवाय आदिवासी मुलामुलींसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन असल्याची संकल्पना तत्त्वत: महत्त्वपूर्ण आणि तर्कसंगतच आहे. असे झाले तर, आश्रमशाळांप्रमाणेच विद्यानिकेतनेसुद्धा तेवढीच, किंबहुना त्यापेक्षा जास्तच महत्त्वपूर्ण ठरतील. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आदिवासींच्या शिक्षणाबाबत नेमके काय आहे हे जाणून घेणे त्या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल.

**१) आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या बांधकामाबाबत –**

राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम, आदिवासी कल्याण योजना, शिक्षणासाठी निर्धारित केलेला सामान्य निधी इत्यादीतून आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या बांधकामासाठी आर्थिक तरतूद प्राधान्ये करुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२) शिक्षणात आदिवासी बोलीभाषांचा वापर :**

आदिवासी विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक स्तरावर त्यांच्या बोली भाषेच्या माध्यमाने/मदतीने शिक्षण देण्यात येईल. मातृभाषेच्या मदतीने आदिवासी विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषा आत्मसात करणे सुलभ होईल.

३) आदिवासी भागात अध्यापनाचे कार्य करण्यासाठी सुशिक्षित व उदयोन्मुख

तरुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना प्रशिक्षित केले जाईल.

४) निवासी शाळांचा आणि आश्रमशाळांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला जाईल.

५) आदिवासींच्या जीवनपध्दतीला आणि संस्कृतीला अनुसरुन योजना आखल्या जातील.

६) तांत्रिक, व्यावसायिक व अर्धव्यावसायिक अभ्यासक्रमावर भर देण्यात येईल. त्यादृष्टीनेच उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातील.

७) विद्यार्थ्यांचे मानसिक/सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.

८) आदिवासी भागात आंगणवाड्या, अनौपचारिक व प्रौढ शिक्षण केंद्रे उघडण्यास अग्रक्रम देणे जरुरीचे ठरेल.

९) आदिवासींची संपन्न संस्कृती व त्यांची सर्जनशील प्रतिभा विचारात घेऊन विविध स्तरांवरील व्यावसायिक अभ्यासक्रमांची आखणी करण्यात येईल.

एकंदरीत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आदिवासींच्या शिक्षणाच्या दृष्टीने मूलगामी स्वरुपाचे ठरणार असून त्या धोरणाचे आदिवासींच्या संस्कृतीवर सुद्धा अनुकूल असे दूरगामी परिणाम होणार आहेत.

तथापि, आदिवासींच्या शिक्षणाची सध्याची अवस्था पाहता प्रख्यात अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या काव्यमय शब्दात असेच म्हणावे लागेल कीं,

'The woods are lovely dark and deep,
But I have promises to keep;
And, miles to go before I sleep,
And, miles to go before I sleep.

## महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या

(जिल्हानिहाय)
(लोकसंख्या लाखात)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | लोकसंख्या एकूण | १९८१ च्या जनगणनेनुसार) आदिवासी | एकूण लोकसंख्येशी आदिवासींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ८२.४३ | ०.८४ | १.०२ |
| २ | ठाणे | ३३.५२ | ७.२९ | २१.७६ |
| ३ | रायगड | १४.८६ | १.९० | १२.८० |
| ४ | रत्नागिरी | १३.८० | ०.२७ | १.९४ |
| ५ | सिंधुदुर्ग | ७.३२ | ०.०५ | ०.६९ |
| ६ | नाशिक | २९.९२ | ७.०२ | २३.४५ |
| ७ | धुळे | २०.५० | ८.३१ | ४०.५३ |
| ८ | जळगाव | २६.१८ | २.१६ | ८.२५ |
| ९ | अहमदनगर | २७.०८ | १.८८ | ६.९३ |
| १० | पुणे | ४१.६५ | १.५९ | ३.८१ |
| ११ | सातारा | २०.३९ | ०.१३ | ०.६४ |
| १२ | सांगली | १८.३१ | ०.१६ | ०.८५ |
| १३ | सोलापूर | २६.१० | ०.५२ | १.९८ |
| १४ | कोल्हापूर | २५.०६ | ०.२७ | १.०९ |
| १५ | औरंगाबाद | १५.८२ | ०.५८ | ३.६४ |
| १६ | जालना | १०.३८ | ०.२१ | २.०२ |
| १७ | परभणी | १६.४३ | ०.७६ | ४.६० |
| १८ | बीड | १४.८६ | ०.१३ | ०.९० |
| १९ | नांदेड | १७.४९ | १.७८ | १०.१९ |
| २० | उस्मानाबाद | १०.३८ | ०.१८ | १.७८ |
| २१ | लातूर | ११.९३ | ०.३३ | ३.८१ |
| २२ | बुलढाणा | १५.०९ | ०.६६ | ४.४१ |
| २३ | अकोला | १८.२७ | १.१५ | ६.२८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | अमरावती | १८.६१ | २.४२ | १२.९८ |
| २५ | यवतमाळ | १७.३७ | ३.७० | २१.३० |
| २६ | वर्धा | ९.२७ | १.४२ | १५.३५ |
| २७ | नागपूर | २५.८९ | ३.५३ | १३.६५ |
| २८ | भंडारा | १८.३८ | २.९८ | १६.२२ |
| २९ | चंद्रपूर | १४.१८ | २.९९ | २१.०७ |
| ३० | गडचिरोली | ६.३७ | २.५१ | ३९.३२ |
| | एकूण | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |

## महाराष्ट्रातील प्रमुख अनुसूचित जमाती

(लोकसंख्या लाखात)

| अ.क्र. | जमातीचे नाव | लोकसंख्या (१९७१ मध्ये) | राज्यातील एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | भोल | ६.७९ | २३.३८ |
| २ | महादेव कोळी | ३.४० | ११.५२ |
| ३ | गोंड | ३.३२ | ११.३५ |
| ४ | वारली | २.९४ | ११.८० |
| ५ | कोकणी | २.६४ | ८.८० |
| ६ | ठाकूर | १.७८ | ६.१० |
| ७ | कातकरी (काथोडा) | १.४७ | ५.०० |
| ८ | कामित | १.२९ | ४.४० |
| ९ | कोळी मल्हार | १.०० | |
| १० | आंध्र | ०.७६ | |
| ११ | कोरकू | ०.६८ | |
| १२ | ढाम फा | ०.५४ | १९.६५ |
| १३ | कोलाम | ०.५६ | |
| १४ | परधान | ०.५१ | |
| १५ | पारधी | ०.२५ | |
| १६ | कोळी-ढोर | ०.४४ | |
| १७ | इतर | १.४२ | |
| | एकूण | २९.५४ | |

## महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीचे साक्षरतेचे प्रमाण

(१९८१ च्या जनगणनेनुसार संख्या लाखात )

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पुरुष (साक्षरतेची टक्केवारी) | स्त्रिया (साक्षरतेची टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ५९.२ | ३६.८ |
| २ | नाशिक | २५.२ | ८.० |
| ३ | धुळे | २३.७ | ६.७ |
| ४ | जळगांव | ३०.९ | ९.० |
| ५ | ठाणे | २२.३ | ६.३ |
| ६ | पुणे | ४०.२ | १४.८ |
| ७ | अहमदनगर | २६.५ | ७.१ |
| ८ | सोलापूर | ४४.६ | १७.७ |
| ९ | रायगड | २३.४ | ९.४ |
| १० | कोल्हापूर | ४८.० | २०.१ |
| ११ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग | १३.५ | ६.९ |
| १२ | सातारा | ४०.० | १९.२ |
| १३ | सांगली | ५४.४ | २५.१ |
| १४ | औरंगाबाद, जालना | २७.६ | ५.८ |
| १५ | परभणी | २८.१ | ५.१ |
| १६ | बीड | २६.५ | ८.४ |
| १७ | नांदेड | ३३.३ | ७.४ |
| १८ | उस्मानाबाद, लातूर | ३५.३ | १०.७ |
| १९ | अमरावती | ३४.४ | १६.६ |
| २० | बुलढाणा | ४०.४ | १३.३ |
| २१ | अकोला | ४६.४ | २०.३ |
| २२ | यवतमाळ | ३५.५ | १३.० |
| २३ | नागपूर | ५३.९ | ३०.६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | वर्धा | ४५.२ | २३.९ |
| २५ | चंद्रपूर गडचिरोली | ३३.१ | ११.३ |
| २६ | भंडारा | ४८.५ | १८.० |
| | महाराष्ट्राची सरासरी | ३२.४ | ११.९ |

टीप :- सिंधुदुर्ग, जालना, लातूर व गडचिरोली या जिल्ह्यांच्या माहितीचा समावेश अनुक्रमे रत्नागिरी, औरंगाबाद, उस्मानाबाद आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये करण्यात आलेला आहे.

## महाराष्ट्रातील आश्रमशाळांची संख्या (१९८४-८५)

(व्यवस्थापन - निहाय)

| | राज्य शासनाच्या अंतर्गत | जिल्हा परिषदेच्या अंतर्गत | आदिवासी विकास महामंडळां-तर्गत | खाजगी अनु.-दानित | खाजगी विना अनुदानित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मुलांची | ३२६ | १५५ | ५ | १७२ | ७ | ६६५ |
| मुलींची | — | — | — | — | — | — |
| एकूण | ३२६ | १५५ | ५ | १७२ | ७ | ६६५ |

## आश्रमशाळातील पटनोंदणी (१९८४-८५)

(इयत्ता निहाय व व्यवस्थापन निहाय)

| इयत्ता | राज्य शासनाच्या अंतर्गत | जि.प.च्या अंतर्गत | आ. वि. महामंडळांतर्गत | खाजगी अनुदानित | खाजगी विना-अनुदानित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्वप्राथमिक | ७७४८ | — | ३३ | ३६५ | ६९ | ८२१५ |
| इ. १ली | १४६४६ | ४०१५ | २१६ | ८३३२ | ३८० | २७६८९ |
| इ. २ री | १२५२७ | ३८१८ | १५७ | ६७९० | ३५७ | २३६४९ |
| इ. ३ री | ११७९० | ५४२१ | १४० | ६४३९ | ३३४ | २४१२४ |
| इ. ४ थी | १०९०७ | ४२१८ | १६९ | ५८७८ | २२४ | २१३९६ |
| इ. ५ वी | १०३०१ | २८५८ | १५६ | ४१६४ | १७२ | १७६५१ |
| इ. ६ वी | ८३९३ | २२१० | १३४ | ३२९३ | ११४ | १४१४४ |
| इ. ७ वी | ६५४७ | १५७४ | १३३ | २६४६ | ९५ | १०९९५ |
| | ८२९५९ | २४११४ | ११३८ | ३७९०७ | १७४५ | १४७८६३ |

## आदिवासी मुलांचे व मुलींचे (एकत्रितपणे) शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण

(१९७५-७६ ते १९८४-८५)

| वर्ष | १ली | २री | ३री | ४थी | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७५-७६ | १०० | ५४ | ३८ | २६ | २० | १५ | १२ | १० | ८ | ७ |
| १९७६-७७ | १०० | ६० | ४२ | २८ | २१ | १६ | १३ | १० | ९ | ७ |
| १९७७-७८ | १०० | ५३ | ४४ | ३० | २२ | १६ | १३ | १० | ८ | ७ |
| १९७८-७९ | १०० | ५९ | ४० | ३२ | २४ | १८ | १४ | ११ | ९ | ७ |
| १९७९-८० | १०० | ५६ | ४२ | २८ | २५ | २० | १५ | १२ | १० | ८ |
| १०८०-८१ | १०० | ५७ | ४१ | ३१ | २३ | २२ | १८ | १३ | ११ | ९ |
| १९८१-८२ | १०० | ६१ | ४४ | ३२ | २६ | २० | १९ | १५ | १२ | ९ |
| १९८२-८३ | १०० | ६४ | ४७ | ३३ | २७ | २३ | १९ | १८ | १४ | १० |
| १९८३-८४ | १०० | ६७ | ५९ | ३६ | २८ | २५ | २० | १६ | १६ | ११ |
| १९८४-८५ | १०० | ७० | ५५ | ३९ | ३० | २६ | २० | १६ | १४ | १२ |

## आदिवासी मुलांचे शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण

(१९७५-७६ ते १९८४-८५)

| वर्ष | १ली | २री | ३री | ४थी | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७५-७६ | १०० | ५८ | ४२ | २८ | २१ | १७ | १४ | ११ | ९ | ९ |
| १९७६-७७ | १०० | ६२ | ४५ | ३१ | २३ | १७ | १५ | १२ | १० | ९ |
| १९७७-७८ | १०० | ५६ | ४६ | ३२ | २४ | १८ | १४ | १२ | १० | ८ |
| १९७८-७९ | १०० | ६३ | ४४ | ३४ | २७ | २० | १६ | १३ | ११ | ९ |
| १९७९-८० | १०० | ५९ | ४७ | ३१ | २८ | २२ | १७ | १४ | ११ | १० |
| १९८०-८१ | १०० | ६० | ४५ | ३५ | २६ | २४ | २० | १५ | १३ | १० |
| १९८१-८२ | १०० | ६३ | ४८ | ३६ | ३० | २२ | २२ | १७ | १४ | ११ |
| १९८२-८३ | १०० | ६७ | ५१ | ३७ | ३० | २६ | २१ | २१ | १६ | १२ |
| १९८३-८४ | १०० | ७० | ५५ | ४० | ३२ | २९ | २४ | १८ | १८ | १३ |
| १९८४-८५ | १०० | ७३ | ५९ | ४३ | ३५ | ३१ | २३ | २१ | १७ | १४ |

## आदिवासी मुलींचे शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण

(१९७५-७६ ते १९८४-८५)

| वर्ष | १ली | २री | ३री | ४थी | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७५-७६ | १०० | ४८ | ३१ | २१ | १७ | १३ | १० | ८ | ६ | ५ |
| १९७६-७७ | १०० | ५६ | ३६ | २४ | १६ | १३ | ११ | ७ | ६ | ५ |
| १९७७-७८ | १०० | ४९ | ४२ | २६ | १७ | १२ | १० | ७ | ५ | ४ |
| १९७८-७९ | १०० | ५२ | ३५ | २८ | १८ | १४ | ११ | ८ | ६ | ४ |
| १९७९-८० | १०० | ५० | ३५ | २३ | २० | १५ | १२ | ९ | ८ | ९ |
| १९८०-८१ | १०० | ५३ | ३६ | २५ | १८ | १७ | १३ | १० | ८ | ६ |
| १९८१-८२ | १०० | ५८ | ३८ | २६ | २० | १६ | १५ | ११ | ९ | ६ |
| १९८२-८३ | १०० | ६० | ४१ | २७ | २१ | १७ | १५ | १३ | १० | ७ |
| १९८३-८४ | १०० | ६३ | ४४ | ३० | २२ | १८ | १६ | १२ | ११ | ९ |
| १९८४-८५ | १०० | ६६ | ४९ | ३२ | २४ | १८ | १६ | १३ | १० | ९ |

## महाराष्ट्र शासनाने विद्यानिकेतनांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर केलेला खर्च

| वर्ष | खर्च (लाखात)<br>(योजना शाखांतर्गत) |
|---|---|
| १९८१-८२ | रु. १०.३३ |
| १९८२-८३ | रु. ९.२४ |
| १९८३-८४ | रु. १५.५४ |
| १९८४-८५ | रु. १९.३० |
| १९८५-८६ | रु. ७.८० + योजनेतर १९.०० |

# समानतेसाठी शिक्षण : आदिवासींचे शिक्षण

**डॉ. सौ. सुनीता ज. जोशी**

**पार्श्वभूमी**

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रशासन व महाराष्ट्र शासन यांनी शिक्षणात योग्य त्या सुधारणा, बदल सुचविण्यासाठी विविध आयोग, समित्या नेमल्या होत्या. शिक्षणाच्या विविध अंगांचा सखोल विचार करून त्यांनी अनेक शिफारशी केल्या. पण त्यांची अंमलबजावणी योग्यप्रकारे न झाल्यामुळे अपेक्षित यश प्राप्त करता आले नाही. शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याचे लक्ष्य अजूनही गाठता आले नाही. बदलत्या काळानुसार नवीन गरजा निर्माण झाल्या आणि त्यातूनच संपूर्ण शिक्षणाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

या गरजेतूनच १९८६ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची रुपरेषा लोकसभेत सादर करण्यात आली. त्यावर चर्चा करण्यासाठी नाशिक, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, वर्धा, सातारा, येथे विभागीय चर्चासत्रे आयोजित करून प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण या संदर्भात शिफारशी करण्यात आल्या. ठाणे येथेही आदिवासी शिक्षणाचा विचार करण्याकरिता स्वतंत्र चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

स्वातंत्रोत्तर काळात आदिवासींची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती फारशी बदललेली नाही. त्यामुळे त्या विभागातील विद्यार्थ्यांच्या / लोकांच्या शिक्षणाचा विचार करताना थोडी वेगळी भूमिका स्वीकारावी लागते. महाराष्ट्रातील आदिवासींच्या शैक्षणिक समस्यांचा विचार करता त्यांच्याशी संबंधित अशा एकूण विकास कार्यक्रमाशी शैक्षणिक उपाययोजनेची सांगड घालणे आवश्यक आहे. कारण आदिवासींचा विकास म्हणजे महाराष्ट्रातील व पर्यायाने भारतातील तळागाळातील माणसाला आत्मनिर्भर, निर्भय, साक्षर करण्याची प्रक्रिया आहे. जेव्हा महाराष्ट्रातील आदिवासी कार्यक्षम, सुशिक्षित स्वावलंबी नागरिक होतील तेव्हा शिक्षणातून समानतेचे, समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले असे म्हणता येईल.

**सद्य:स्थिती :**

महाराष्ट्रात १९७६-७७ पासून केंद्रशासनाच्या निर्णयानुसार स्वतंत्र अशी आदिवासी उपयोजना, पंचवार्षिक योजनेचा भाग म्हणून कार्यान्वित झाली असून त्यात पुणे, नाशिक, रायगड, अहमदनगर, ठाणे, धुळे, जळगाव, अमरावती, नांदेड, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या १४ जिल्ह्यांचा समावेश आहे. या ठिकाणी शैक्षणिक विकासाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**प्राथमिक शिक्षण :-**

१) एकशिक्षकी शाळांना जोडून बालवाड्या उघडणे. आदिवासी उपयोजनांतर्गत ३६७७ एकशिक्षकी शाळांपैकी ५२८ शाळांना जोडून बालवाड्या उघडण्यात आल्या आहेत (१९८५-८६ अखेर).
२) शाळाविरहित वस्त्यांत प्राथमिक शाळा उघडणे – १९८१ च्या जनगणनेनुसार अजून २१० शाळाविरहित वस्त्यात (आदिवासी उपयोजनांतर्गत) शाळा उघडणे आवश्यक आहे
३) एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळांत रुपांतर करणे.
४) प्राथमिक शिक्षकांची जादा पदे मंजूर करणे - १९८५-८६ या वर्षात ४५० प्राथमिक शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत.
५) मोफत गणवेश, लेखनसामुग्री पुरविणे.
६) प्राथमिक शाळाच्या इमारतीचे बांधकाम करणे.
७) अंशकालीन वर्ग उघडणे.
८) नवीन केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करणे.
९) शिक्षकांनी आदिवासी विद्यार्थ्यांना दत्तक घेणे.
१०) विकासगट स्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती करणे.

**माध्यमिक शिक्षण :-**

१) नवीन माध्यमिक शाळा सुरू करणे. २) शासकीय विद्यानिकेतनांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे – यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर येथे केवळ आदिवासी विद्यार्थ्यांकरिता सुरू करण्यात आले असून तेथे ३०० च्या वर आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच पुसेगाव धुळे, अमरावती व औरंगाबाद येथील शासकीय विद्यानिकेतनांमध्ये २०० आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**प्रौढ-शिक्षण :-**

१) विशेष केंद्रीय साहाय्यातून प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविणे. २) आदिवासी भागासाठी अनौपचारिक प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविणे ३) नवसाक्षरांसाठी वाचनालये सुरु करणे, ४) प्रौढांना उत्तेजनार्थ साहाय्य देणे, ५) प्रौढांसाठी अल्पमुदतीचे व्यावसायिक वर्ग उघडणे.


**नवीन शैक्षणिक धोरणातील आदिवासी शिक्षणाची मीमांसा :**

आदिवासींमधील शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे नमूद करून नवीन शैक्षणिक धोरणात त्याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे दिली आहे. १) कुपोषण २) आर्थिक मागासलेपणे, दारिद्र्य ३) कामाच्या अनुचित सवयी ४) एकाकीपण ५) आत्मविश्वासाचा अभाव ६) अन्य विद्यार्थ्यांशी जुळवून घेण्यातील अवघडपणा आणि या सर्वांतून निर्माण होणारे मानसिक तणाव.

नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानला आहे. समानतेसाठी शिक्षण आणि शिक्षणातून समाज परिवर्तन ही प्रमुख उद्दिष्टे सांगितली आहेत. शिक्षणपद्धतीत विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानला तर शाळा, अभ्यासक्रम आणि परिसर ही विकासाची माध्यमे ठरतात आणि शिक्षक पालक व प्रशासन हे त्यांचे अभिकर्ते ठरतात. माध्यमे आणि अभिकर्ते यांच्यात योग्य समन्वय, सहयोग असेल तर विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास सहजपणे घडून येऊ शकतो. परंतु आदिवासी भागात आज तरी या गोष्टीचा अभाव असल्याचे दिसते. माध्यमे, विद्यार्थी व अभिकर्ते यांचा अनुबंध स्पष्ट करणारी आकृती पुढे दिली आहे. त्यावरून स्पष्ट कल्पना येईल. विद्यार्थ्यांशी संबंधित अशा या घटकांची सध्याची परिस्थिती, अडचणी समजून घेतल्या तर त्याच्यावरच्या उपाययोजना सांगणे सोयीचे होईल म्हणून त्यांच्या अडचणींची आपण थोडक्यात मीमांसा करू.

## आदिवासी शिक्षण

उद्दिष्टे : १ समानतेसाठी शिक्षण
२ शिक्षणातून समाजपरिवर्तन




**शिक्षण :**

आदिवासी भागातील शिक्षक हा –

१) काम आणि विद्यार्थी याबद्दल अनास्था असणारा आहे.

२) आदिवासी भाषा, जीवन, संस्कृती यांच्याशी परिचय नसणारा आहे.

३) आदिवासी भागात काम करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण शिक्षकाला दिले जात नाही.

४) निवासासारख्या महत्त्वाच्या गरजा पूर्ण होत नाहीत.

**पालक**

१) आदिवासी भागातील बहुसंख्य पालक निरक्षर आहेत

२) शिक्षणाची गरज व महत्त्व याबाबत त्यांना जाण नाही.

३) बहुसंख्य पालक दारिद्र्य रेषेखालील जीवनमान जगत आहेत.

४) मुलांना शिक्षण देण्याऐवजी त्यांचा अर्थार्जनासाठी कसा उपयोग होईल याचाच विचार अधिक करतात.

**शाळा व परिसर**

१) बहुसंख्य शाळा एक शिक्षकी आणि तो शिक्षकही गावात न राहणारा. त्यामुळे विद्यार्थी - शिक्षक एकत्रित फारसे दिसत नाहीत. असे निराशाजनक चित्र दिसते.

२) काही भागात शाळेच्या इमारतीची अगदी दयनीय अवस्था असते. पावसाळ्यात गळणे इ.

३) शाळा घरापासून दूर असल्यास प्रश्न निर्माण होतो. पावसाळ्यात बऱ्याच ठिकाणचे नाले ओहोळ जाणे - येणे अशक्य करतात.

**प्रशासन**

१) ज्या आदिवासींसाठी शैक्षणिक योजना राबवावयाच्या त्यांची भाषा, संस्कृती यांची माहिती प्रशासकीय अधिकाऱ्यांना नसते.

२) आदिवासी भागातील कोणत्याही विभागातील लोक हे तेथे राहणे म्हणजे "काळ्या पाण्याची" शिक्षा समजतात. त्यामुळे त्यांना कामाबद्दल आस्था वाटत नाही.

**अभ्यासक्रम - पाठयपुस्तके इ.**

१) आदिवासींसाठी वेगळा अभ्यासक्रम असायला पाहिजे असे नाही. परंतु त्यांची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन अभ्यासपूरक व अभ्यासोत्तर उपक्रम राबविले जात नाहीत.

२) अनेक आदिवासींची बोलीभाषा मराठीहून बरीच भिन्न आहे. अशा मुलांना सुरुवातीला मराठीतून शिकणे अवघड जाते. परिणामी आदिवासी भागात गळतीचे प्रमाण अधिक असते.

**आदिवासी बोलीभाषा प्रकल्प**

देशात शिक्षणाच्या बाबतीत अग्रेसर असलेल्या महाराष्ट्र राज्यात, आदिवासींच्या गळतीच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा एक प्रयत्न म्हणून, आदिवासी बोलीभाषातून पुस्तकनिर्मिती करण्याचा प्रकल्प १९७५ पासूनच सुरु आहे. १९८६ साली जाहीर झालेल्या नवीन शैक्षणिक धोरणात "आदिवासी शिक्षणाच्या" बाबतीत या गोष्टीवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या डोंगराळ, जंगली भागात राहणाऱ्या विविध आदिवासी लोकसमूहातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट परिणामकारकपणे सफल व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनाने सुरु केलेला हा प्रकल्प म्हणजे आदिवासींच्या

संदर्भातील शैक्षणिक व सामाजिक विकासाचे प्रश्न सोडविण्याच्या वाटचालीतील पहिले व महत्त्वाचे पाऊल आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सुरुवातीच्या दोन वर्षात जर आदिवासी मुलांना त्यांच्या "मातृभाषेतून" शिक्षण मिळाले आणि क्रमश: त्यांचा सांधा मराठी या प्रादेशिक भाषेशी जोडता आला तर श्रवण-संभाषण-वाचन-लेखन ही भाषिक कौशल्ये आदिवासी मुले अधिक चांगल्याप्रकारे आत्मसात करू शकतील. तसे झाले तर त्यांचा समज /आकलन शक्ती व अभिव्यक्ती सुधारेल. त्यामुळे अभ्यासात त्यांची गोडी वाढेल आणि गळतीचे प्रमाण कमी होईल, ही या प्रकल्पामागची शैक्षणिक भूमिका आहे.

आदिवासी बोलीभाषांचा शिक्षण प्रक्रियेत समावेश करून त्याद्वारा मराठी भाषा सुलभपणे शिकता यावी म्हणून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या या प्रकल्पामार्फत आदिवासी बोलीभाषातून पुस्तके तयार करण्यात आली. मराठीशी सांधा जुळवण्याच्या दृष्टीने मराठीच्या देवनागरी या लिपीचाच ही पुस्तके तयार करताना उपयोग केला आहे. यापूर्वी वारली, कोलामी भाषेतून पुस्तके तयार केली गेली. कोलामी भाषेचे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमही घेण्यात आले. कोरकू भाषेचे कामही सुरु करण्यात आले होते. (१९८८-८९ पासून कोरकू भाषा बोलल्या जाणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा विभागात युनिसेफ मार्फत क्षेत्रीय सघन शैक्षणिक प्रकल्प (मानवी साधनसंपत्ती विकासाकरिता) कार्यान्वित झाला आहे. त्यानंतर शासकीय निर्णयानुसार माडिया गोंडी या एकाच भाषेचं काम सुरु ठेवण्यात आले. या भाषेतून बालवाडी, आदिभारती, शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका ही पुस्तके तयार करण्यात आली. ही पुस्तके तयार झाली तरी त्या भागात शिकवणारा शिक्षक बहुतांशी मराठी मातृभाषिकच होता. त्यामुळे या शिक्षकांना मांड्या-गोंडी भाषेचे प्रशिक्षण देणे, तयार झालेल्या साहित्याच्या आधारे, द्वैभाषिक पद्धतीचा अवलंब करून कसे शिकवावे याचे मार्गदर्शन करणे आवश्यक होते. त्यासाठी शिक्षक-प्रशिक्षण घेणे आवश्यक होते तेही पूर्ण करण्यात आले. त्याची माहिती पुढील प्रमाणे —

**कोलामी भाषा**

| वर्ष | ठिकाण | कालावधी | शिक्षकसंख्या |
|---|---|---|---|
| १९८३-८४ | यवतमाळ | ६ दिवस (प्रशिक्षणवर्ग) | १५ |
| १९८३-८४ | यवतमाळ | १ दिवस (उद्‌बोधनवर्ग) | १५० |
| १९८३-८४ | मारेगाव | " | १६० |
| १९८३-८४ | पांढरकवडा | " | २०० |
| एकूण | | | ५२५ |

### माडिया गोंडी भाषा

| वर्ष | वर्गसंख्या | ठिकाण | शिक्षकसंख्या बालवाडी | प्राथमिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९८४-८५ | ४ | गडचिरोली, अहेरी, एटापल्ली | ५० | १६० | २१० |
| १९८५-८६ | ३ | गडचिरोली | — | १५० | १५० |
| १९८६-८७ | ३ | अहेरी | — | १५० | १५० |
| १९८७-८८ | ३ | गडचिरोली | — | ९० | ९० |
| एकूण | १३ | | | | ६०० |

**सूचना आणि अपेक्षा :–**

**विद्यार्थी :**

१) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गणवेश, आहार, वह्या, पाठ्य-पुस्तके, लेखनसाहित्य, निवास इ. गोष्टी मोफत पुरवल्या जात असल्या तरी त्या वेळेवर, पुरेशा प्रमाणात, व्यवस्थितपणे पुरविल्या जाव्यात.

२) आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जावे.

३) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या दत्तक योजनेची माहिती विद्यार्थ्यांना व शिक्षकांना व्यवस्थित दिली जावी.

**पालक :**

१) शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटणे आवश्यक आहे. त्यासाठी पालक शिक्षण वर्ग आयोजित करावेत.

२) मातृ प्रबोधन प्रकल्पाची व्याप्ती आदिवासी जिल्ह्यातून अधिक वाढवावी. त्यामुळे शिक्षणाच्या प्रसाराला गती मिळेल.

३) आदिवासी भागातील प्रौढ शिक्षण वर्गांची संख्या वाढवून ते व्यवस्थित चालतील याची दक्षता घ्यावयास हवी. प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच प्रौढांसाठीही त्यांच्या आदिवासी भाषेतून वाचन साहित्य तयार करण्यात यावे.

**शाळा :**

१) आदिवासी विद्यार्थी हे निसर्गात रमणारे, मोकळ्यावर हिंडणारे. त्यामुळे शाळा

ही "कोंडवाडा" न वाटता आनंददायी वाटेल असे वातावरण शाळेत निर्माण करणे आवश्यक आहे.

२) शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च कमीत कमी कसा करता येईल याचा विचार आवश्यक आहे. त्या करिता इमारतीमध्ये साचेबंदपणा न ठेवता, स्थानिक परिस्थिती नुसार बदल करावा.

३) एकशिक्षकी शाळांची अवस्था अत्यंत निराशाजनक आहे. तो पैशाचा अपव्यय आहे. तो टाळण्याकरिता लहान लहान गावातील एकशिक्षकी शाळा बंद करून जवळच्या १०-१२ शाळांची मिळून एक समूह निवासी शाळा सुरु करावी. आश्रम शाळा, समूह निवासी शाळा यांच्या संख्येत वाढ करावी. तसेच वसतिगृहांची संख्या वाढवावी.

४) प्राथमिक शाळेला जोडूनच पाळणाघर, बालवाडी असावी. किंबहुना प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, बालवाडी या साऱ्या गोष्टी एकाच आवारात असाव्यात.

**शिक्षक :**

१) आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांची भाषा, जीवन, संस्कृती या संदर्भात विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

२) असे प्रशिक्षण घेतलेले शिक्षक आदिवासी भागातून किमान तीन वर्षे बदलले जाणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी.

३) शिक्षक आदिवासी भागात रहावा यासाठी त्यांच्या निवासस्थानाची सोय करणे, तसेच त्याला काही प्रोत्साहनपर वेतनवाढ किंवा विशेष भत्ता देणे आवश्यक आहे.

**अभ्यासक्रम :**

१) अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तकांचा वाटा मोठा आहे. आदिवासी मुलांसाठी (किमान १ लाख लोकसंख्या असणाऱ्या जमातींसाठी तरी) इयत्ता १ व २ ची पुस्तके त्यांच्या मातृभाषेतून तयार करण्याची तातडीची गरज आहे.

२) आदिवासी मुलांसाठी वेगळ्या अभ्यासक्रमाची गरज नसली तरी कार्यानुभवासारख्या विषयात अपारंपरिक उर्जा साधने सूर्य उर्जा - बायो/गोबर गॅस, पवनचक्की यासारख्या विषयांचा अंतर्भाव असावा.

३) अर्थार्जन होऊ शकेल असे छोटे व्यवसाय, स्थानिक कला / उद्योग या गोष्टी विद्यार्थ्यांना शाळेत शिकविण्यात याव्यात.

४) आदिवासी विद्यार्थ्यांच्या अंगाच्या गुणांना - चापल्य, नेमबाजी इ. वाव मिळेल असे अभ्यास उपक्रम घेतले जावेत.

**प्रसार माध्यमांचा उपयोग :–**

आज दूरदर्शन, आकाशवाणी या माध्यमांचा उपयोग शैक्षणिक प्रसार माध्यमे म्हणून होत आहे. परंतु सध्या होणाऱ्या कार्यक्रमातून आदिवासी भाषा, संस्कृती इ. संदर्भातील कार्यक्रम सादर केले जात नाहीत. आदिवासी जीवन आणि संस्कृती यांची ओळख करून

देणाऱ्या माहितीपटांऐवजी, ज्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभिरुची वाढेल आणि त्यांचा प्रादेशिक जीवन, संस्कृती यांच्याशी सांधा जुळला जाईल असे कार्यक्रम आकाशवाणी, दूरदर्शन यावरून प्रसारित होणे अगत्याचे आहे. आदिवासी बोलीभाषा आणि मराठी यांचा एकत्रित उपयोग करून असे कार्यक्रम सादर करणे विशेष परिणामकारक होऊ शकेल. त्याकरिता आदिवासी बोलीभाषा प्रकल्प, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, प्रसार माध्यमे आणि शासन यांचा संवाद साधला जाणे, कार्ययोजना तयार होणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय :**

१) केवळ शिक्षकांनाच नाही तर आदिवासी भागात काम करणाऱ्या सर्व विभागातील अधिकाऱ्यांना त्या त्या भागातील आदिवासी भाषा, संस्कृती यांचे प्रशिक्षण देणे उपयुक्त ठरेल. त्यासाठी आवश्यक असे शब्दकोश, व्याकरण, परिचयपुस्तिका - साहित्य तयार करणे योग्य होईल. त्यामुळे त्या भागात सुरु असलेल्या विकासयोजना, लोक-संपर्क, प्रशासकीय कार्य सुलभ होईल.

२) आदिवासी शिक्षण आणि विकास ही शासनाची विशेष आणि महत्त्वाची जबाबदारी असल्याने त्या बाबतीत नेहमीच्या कार्यपद्धतीतील विलंब टाळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आर्थिक तरतुदी, प्रशासकीय मान्यता या बाबतीत त्वरित पत्रव्यवहार आवश्यक आहे.

३) आदिवासी शिक्षणाशी संबंधित शासकीय आणि स्वयंसेवी स्तरावर अनेक घटक कार्यरत आहेत. त्यांच्या कामांची पुनरुक्ती, श्रम, वेळ, पैसा यांचा अपव्यय टाळण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आदिवासींकरिता एकात्मिक शिक्षण योजना तयार करायला हवी. तिची योग्य अंमलबजावणी, नियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी एका स्वतंत्र राज्यस्तरीय कक्षाची स्थापना होणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, समाज कल्याण विभाग यांच्याशी, संबंधित मंत्री, सचिव, संचालक यांचे सहकार्य असावे. प्रत्यक्ष कामाशी संबंधित असणाऱ्या संस्था (उदा. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था इ.) त्यांचे पदाधिकारी असणे आवश्यक आहे. शैक्षणिक साहित्य-निर्मिती, शिक्षक-प्रशिक्षण इत्यादी महत्त्वाच्या कार्यांशी आदिवासी बोलीभाषा प्रकल्पातील सल्लागार-मंडळ-सदस्य, संशोधक, तज्ज्ञ व्यक्ती यांचाही समावेश असणे अगत्याचे आहे. या सर्वांच्या एकत्रित विचारामुळे आणि निर्णयामुळे कालबद्ध कार्यक्रम तयार करणे, त्यानुसार शासकीय निर्णय घेणे, त्यांची विनाविलंब अंमलबजावणी करणे शक्य होईल. आदिवासी शिक्षणाचे नव्या शैक्षणिक धोरणातील महत्त्व लक्षात घेता असा राज्यस्तरीय कक्ष ही आदिवासी शिक्षणविषयक कार्ययोजनेच्या दृष्टीने परिणामकारक उपाययोजना ठरू शकेल.

४) सावित्रीबाई फुले दत्तकपालक योजनेप्रमाणे आदिवासी मुलांकरिताही दत्तक पालक योजना सुरु करावी. त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटण्यास तर मदत होईलच, परंतु एकाकी, बाजूला पडलेल्या आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेणे सोपे जाईल.

# समानतेसाठी शिक्षण - आदिवासी शिक्षण

**द. म. बिडकर**

महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षणाचा विचार करताना हे आदिवासी कोणत्या जिल्ह्यात व कोणत्या विभागात राहतात याचा विचार व्हावा. हा आदिवासी दऱ्याखोऱ्यात व डोंगराळ भागात राहतो. नागरी संस्कृतीच्या आक्रमणाने त्यांना आम्ही दऱ्याखोऱ्यात व डोंगरात आश्रय घ्यावयास लावले आहे. अनेक जातीजमाती आपापल्या भाषा, चालीरीती, आचारविचार सांभाळून अनेक जिल्ह्यात राहात आहेत. यांची वस्ती प्रामुख्याने ठाणे, नाशिक, धुळे, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांत विशेष आहे. सर्व ठिकाणची एकूण लोकसंख्या (आदिवासी) जवळ जवळ साठ लाख आहे. वरील जिल्ह्यांशिवाय अहमदनगर, पुणे, जळगाव, अमरावती, नांदेड, यवतमाळ, रायगड या जिल्ह्यांतही एका एका तालुक्यात त्यांची सघन वस्ती आहे. ठाणे जिल्ह्यात वारली जमात मोठ्या प्रमाणात, नासिक जिल्ह्यांत कोकणा, कोळी व भिल्ल या जमाती, तडवी जमात जळगाव जिल्ह्यात. कोरकू जमात अमरावती मधील मेळघाट भागात, कोलाम जमात यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात, वळवी, वसावे, गावीत व पावरा ही भिल्ल वस्ती धुळे जिल्ह्यांतील अर्ध्या भागात गोंड व माडिया गोड गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात, कातकरी जमात रायगड जिल्ह्यात अशी त्यांची विभागणी आहे. प्रत्येक जमातीतील आडनावे, स्त्रियांची नावे, भाषा, गाणी व आचार विचार निराळे आहेत. चेहरेपट्टी थोडी फार निराळी आहे. एक गोष्ट निश्चित की सर्व जमाती आपापले संघ करून राहातात.

या सर्व आदिवासी जमातीत कधीही जातीय संघर्ष झाला नाही. सर्वजण गुण्यागोविंदाने आपापल्या ठिकाणी राहतात. निरनिराळ्या जमातीच्या शिक्षणाचा विचार करताना सर्वांना सारखे शिक्षण देऊन त्यांचे प्रश्न आपण सोडवू शकू काय? हा यक्ष प्रश्न आहे.

१९८९ सालातील आदिवासींच्या शिक्षणाचा विचार आपणास करावयाचा आहे. आदिवासी भागासाठी स्वतंत्र निधी व नियम अमलात आल्याबरोबर सर्वांनी त्यांच्या शिक्षणाचा विचार केला आहे. २० वर्षांपूर्वी शिक्षण क्षेत्रात जी परिस्थिती होती ती आज राहिली नाही. आपण झपाट्याने पुढे जात आहोत. भारत सरकारने आदिवासींच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी आदिवासी विभागासाठी आदिवासी उपयोजना लागू करून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीही उपलब्ध करून दिला आहे.

आता आदिवासी भागातील शैक्षणिक कामाची व्याप्ती किती वाढली आहे हे पाहणे आवश्यक आहे.

आदिवासी विभागात सामाजिक संस्थानी चालविलेल्या १०० आश्रम शाळा व माध्यमिक शाळा (वसतिगृहयुक्त प्राथमिक व माध्यमिक शाळा) विद्यार्थी संख्या २५ हजारापेक्षा अधिक. मुलींचे प्रमाण ५ ते ६ हजार. या शाळांना आदिवासी विकास खाते अनुदान देते व तेही अपुरे. जिल्हा परिषदेच्या हजारो प्राथमिक शाळा. तेथे इमारती नाहीत. शिक्षक कधीमधी येतो. राहात नाही. शाळा असून मुलेही येत नाहीत. या शाळांतून मात्र शिक्षणाची दुर्दशाच आहे.

आदिवासी विकास खात्याने महाराष्ट्रातील सर्व आदिवासी भागांत ३५० शासकीय आश्रमशाळा काढल्या आहेत. काही शाळांचे रुपांतर हायस्कूलमध्येही करण्यात आले आहे. या शाळांत जवळ जवळ एक लाख १० हजार मुले मुली शिक्षण घेत आहे. मुलामुलींच्या शिक्षणासाठी सर्व खर्च कपडे, पुस्तके, आंथरूण-पांघरूण, पेट्या व जेवण व इतर सर्व शैक्षणिक खर्च आदिवासी विकास खाते करीत आहे. याशिवाय आदिवासी मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहे आहेत. सामाजिक संस्थांनी चालवलेली वसतिगृहेही शेकडो आहेत. शिक्षणाची इतकी व्यवस्था असताना आदिवासींच्या शिक्षणाचे प्रमाण इतर समाजाच्या मानाने फार कमी आहे. हे असे का याचाच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे.

आदिवासी आश्रम शाळांतून, आदिवासी भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण पुष्कळच आहे. इयत्ता १ ते ४ मध्ये गळतीचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. ५ ते ७ मध्ये थोडे कमी व ८ ते १० मध्ये आणखी कमी. मुलींचे गळतीचे प्रमाण जास्त आहे. याबाबतीत संशोधन होण्याची आवश्यकता आहे. दर ५ वर्षांनी मूल्यांकन व्हावे. हे गळतीचे प्रमाण कोणत्या स्तरावर आहे. शेत मजूर व आत्यंतिक गरिबी असलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलामुलींमध्ये सर्वांत जास्त आहे, ज्यांना बऱ्यापैकी शेती आहे किंवा ज्या कुटुंबात ठराविक उत्पन्न आहे त्या आदिवासी कुटुंबातील मुलामुलींच्या गळतीचे प्रमाण पुष्कळ कमी आहे. मोठ्या गावांत किंवा निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेल्या किंवा नोकरीत असलेल्या कुटुंबातील मुलामुलींचे गळतीचे प्रमाण नगण्य आहे.

आदिवासींची जमातवार आचार विचार, राहाणी इतर समाजापासून थोडी निराळी आहे. भौगोलिक परिस्थितीही त्यास कारणीभूत आहे. डोंगर उतारावरील शेतीचे उत्पन्न निकृष्ट दर्जाचे. त्यामुळे गरिबी पाचवीस पुजलेली. काही आदिवासी तालुक्यात ५० टक्क्यांपेक्षा अधिक शेती डोंगर उतारावरील. ज्या मानाने शेतीचे उत्पन्न त्यामानाने मजुरीचे दर. घरातील सर्व माणसांना-शाळेत जाणाऱ्या वयाच्या मुलांना देखील-जगण्यासाठी कष्ट करावे लागतात. या सर्व भागांत शेतीशिवाय कोणताही व्यवसाय नाही. पावसाळा संपल्यानंतर व पिके कापून घेतल्यानंतर हा आदिवासी मजुरीसाठी मोठ्या गावात, जवळच्या शहरात, किंवा साखर कारखान्यात मुलाबाळांसह मजुरीस जातो. मजुरीसाठी स्थलांतर करतो. ही मुले शिक्षणापासून वंचित राहतात.

आदिवासी भागात जे शिक्षक नेमले जातात त्यांना अडचणीच्या भागात नोकरी करण्यात स्वारस्य नसते. त्यामुळे तो तेथून लवकर त्याच्या गावाच्या आसपास कसे जाता येईल याच विचारात असतो. नागरी सुविधा, दळणवळणाची साधने, दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्याची व्यवस्था या भागात जवळ जवळ नाहीच. त्यामुळे हा शिक्षक तेथे काम करण्यास कंटाळतो. आदिवासी शिक्षकही याला अपवाद नाही. पण इतरांच्या मानाने कमी इतकेच. आश्रमशाळातील शिक्षक सर्व अडचणींना तोंड देऊन तेथे राहतात. मात्र जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची परिस्थिती शोचनीय आहे. शिक्षक राहात नाहीत. मुलेही येत नाहीत. शाळांना इमारती नाहीत. साहित्य नाही. त्यामुळे मुलांना शिक्षणात रस नाही व ती शाळेत येतच नाहीत.

१९७२ मध्ये शासकीय आश्रमशाळा सुरू झाल्या. त्यांची वाढ झपाट्याने झाली. इमारती नाहीत. पाण्याची व्यवस्था नाही. ज्या खेड्यात शाळा सुरु केली तेथे झोपड्या भाड्याने घेऊन, रहाणे, जेवणे, व शिकविणे सुरु झाले. काही ठिकाणी इमारती झाल्या पण तेथे पाण्याची व्यवस्था नाही. आजही अर्ध्या अधिक शासकीय आश्रमशाळा निरनिराळ्या झोपड्यांत आहेत. मुलामुलींना अभ्यासासाठी जागा नाही. भोजनहॉल नाही. असे किती दिवस चालणार? मुले तरी काय शिकणार?

शैक्षणिक क्षेत्रात व निरनिराळ्या शासकीय नोकरीत जागा उपलब्ध असताना त्यासाठी आदिवासी मुले मुली मिळत नाहीत. १२वी पर्यंत पोहोचणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. सायन्सकडे जाणाऱ्यांचे प्रमाण आणखी कमी आहे. त्यामुळे शास्त्रीय शिक्षणाकडे हा विद्यार्थी जाऊ शकत नाही. आदिवासीतील शेत मजूर व अल्प भूधारक शेतकरी यांची मुले व मुली त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करू शकत नाहीत. १०० मुले जर पहिलीत दाखल झाली असतील तर १० ते १५ मुले १० वी पावेतो पोहोचतात. त्यातून मग काही मुले पुढे सरकतात. लाखो शेतमजूर भिल्लांमध्ये १० टक्के मुले देखील शाळेत जात नाहीत. मुलींचे प्रमाण त्यापेक्षा देखील कमी.

जंगलात डोंगरात राहणाऱ्या आदिवासी मुलामुलींना शिक्षणाविषयी आकर्षण व प्रेम निर्माण करण्याची आज आवश्यकता आहे. मुलांची जी नैसर्गिक प्रवृत्ती व भौगोलिक परिस्थिती आहे ती विचारात घेऊन त्यांचे शिक्षण झाले पाहिजे. शिक्षणात प्रथम पुस्तक, नंतर पुस्तक व पुढे पुस्तकच पुस्तक. ज्या वयात लेख, गाणी, भटकणे करावयाचे त्या वयात मुलाला चार भिंती मध्ये चार-पाच तास बसावयास लावावयाचे. त्याचे लक्ष तरी लागेल काय? याचा विचार शिक्षण तज्ज्ञ करीत नाहीत. जी परिस्थिती शहरात आहे, तिची नक्कल आदिवासी भागात यशस्वी होणार नाही. आदिवासी भागात शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. एकदा मुलामुलींना आश्रम शाळेत दाखल केले की, पालकाची जबाबदारी संपली असे तो मानतो. पुढे मुलगा किंवा मुलगी अभ्यास करते का नाही त्याची विचारपूस देखील करीत नाही.

आज शिक्षण क्षेत्रात सुट्ट्यांचे प्रमाण फार आहे. आश्रमशाळा म्हणजे निवासी शाळा. दिवस भर मुलाशी संबंध येतो. पण तेथेही सुट्ट्या आहेत. आश्रमशाळेचे रूपांतर पुढे माध्यमिक विद्यालयात झाल्यावर सुट्ट्यांचे प्रमाण वाढते. आज तरी महाराष्ट्रात आदिवासींच्या शिक्षणासाठी काही तरी बरी व्यवस्था आहे. पण व्यवस्थापन नीट नसल्याने अव्यवस्थेत त्याचे रूपांतर झाले आहे. अभ्यासक्रमात जो बदल हवा तो नाही. डोंगरदऱ्या, नद्यानाले, पशु-पक्षी वृक्ष-वल्ली यांच्या सान्निध्यात ज्याचा जन्म झाला त्या मुलाला किंवा मुलीला सर्वस्वी निराळ्या अशा व्यवस्थेत शिकण्याचे धोरण शेवटी यशस्वी होणार नाही.

आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आज असलेल्या सोयीसवलती विचारात घेऊन खालील बाबींचा अवश्य विचार करणे जरुरीचे आहे.

१. आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांच्यासाठी स्वतंत्र अध्यापक विद्यालय असणे जरूर आहे. तेथील शिक्षणक्रमात संगीत, चित्रकला, खेळ, कथाकथन व निरीक्षण या विषयांची व्यवस्था असणे आवश्यक आहे. कारण या विषयांची नवीन येणाऱ्या विद्यार्थ्याला आवड आहे. तेथील शिक्षणक्रमात आदिवासी संस्कृतीतील जीवन, त्यांचे आचार विचार, चालीरीती, आदिवासीसाठी झालेले कायदे, आदिवासी उपयोजना व त्यांना मिळणाऱ्या विविध सवलती यांचाही त्या शिक्षणक्रमात अंतर्भाव केला पाहिजे. आज महाराष्ट्रात निघालेल्या विनाअनुदानावर व भरमसाठ देणगी घेऊन चालणाऱ्या अध्यापक विद्यालयातील शिक्षक आदिवासी क्षेत्रात निष्ठेने काम करू शकणार नाही.

२. आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांची सतत प्रबोधन शिबिरे घेऊन शिक्षकांच्या ज्ञानात भर टाकली पाहिजे. तो कल्पक व कार्यक्षम असेल तर ती शाळा नीट चालेल. आदिवासींच्या शिक्षणासाठी शिक्षणखाते व आदिवासी विकास खाते यांनी हातात हात घालून काम केले पाहिजे. आजही दोन्ही खाती निरनिराळ्या मार्गाने जात आहेत.

३. आदिवासी विकास खात्यामधील शिक्षण विभागाकडे स्वतंत्र शिक्षण विभाग निर्माण करून शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या हाती हा विभाग सोपवला पाहिजे.

४. शाळांसाठी चांगल्या इमारती व शिक्षकांना राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असली पाहिजे.

५. प्रत्येक शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. नकाशे, चित्रे, निरनिराळे चार्टस्, पशु-पक्षी, जनावरे, थोर पुरुष यांची माहिती देणारे चार्टस्ही आवश्यक आहेत.

६. सर्व प्राथमिक शाळेतील मुलांना दरवर्षी २ गणवेश व दुपारचा नाष्टा दिला पाहिजे. व शालेय साहित्य पुरविले पाहिजे.

७. मुलामुलींच्या निरनिराळ्या ठिकाणी सहली नेल्या पाहिजेत. त्यामुळे त्यांचा इतर समाजातील मुलामुलींशी संपर्क येईल व ती धीट बनतील.

८. आदिवासी विद्यार्थ्यांची २-३ दिवसांची शिबिरे घेतली पाहिजे. या शिबिरांत गाणी, खेळ, चित्रकला, कथाकथन, गप्पागोष्टी हे कार्यक्रम असावेत.

९. निरनिराळ्या शासकीय व संस्थानी चालवलेल्या पोस्ट बेसिक आश्रमशाळांतील १० वी पास होणाऱ्या मुलामुलींसाठी ११ वी ते १२ वी व पुढील शिक्षणासाठी कला, वाणिज्य व शास्त्र या शिक्षणासाठी कोठे तरी एकत्र वसतिगृहयुक्त शिक्षणाची व्यवस्था करावी. या साठी स्वतंत्र कॉलेज असावे. हे कॉलेज शहरांत न ठेवता स्वतंत्र ठिकाणी असावे. ही जबाबदारी एकाद्या मोठ्या शिक्षणसंस्थेवर सोपवावी. व्यवस्थापन त्यांचे व खर्च शासनाचा. यामुळे ही मुले मुली पुढे जातील. शास्त्र शाखेचे अनेक शिक्षणक्रम असावेत.

# समानतेसाठी शिक्षण
# विमुक्त भटक्या समाजाचे शिक्षण व समस्या

चंद्राम रामचंद्र चव्हाण

**ज्ञानशक्ती ही मौलिक क्रांतीची आधारशिला**

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या अत्यंत प्राथमिक गरजा आहेत हे खरे आहे. परंतु माणसाचे खरे माणूसपण जे आहे त्याची जडण घडण होण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा एवढीच बाब पुरेशी नाही.

माणूस हा माणूस होतो, खऱ्या अर्थाने माणूस बनतो तो शिक्षणामुळेच. माणसाच्या विकासाची, उन्नतीची व उद्धाराची बीजे असतात ती फक्त शिक्षण आणि संस्कारातच. आता प्रश्न असा आहे की प्रचलित शिक्षण पद्धतीच्या वृक्षाला आलेली फळे जर विषारी असतील- (आणि ती तर विषारीच आहेत.)

म्हणून शैक्षणिक क्षेत्राचे दीर्घकाळ चिंतन होऊन शिक्षणाविषयी आमूलाग्र पुनर्विचार करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे तो अभिनंदनीय आहे.

कारण मानवी जीवनातील सुप्त महान श्रेष्ठ शक्ती जागृत करून भूमीवर अखंड मानव समाज निर्माण करून विश्वशांती निर्माण करण्याकरिता आजपर्यंत जगात धार्मिक क्रांती झाली. लोकांनी धर्मांतर केले. राजकीय क्रांती झाली. सरकार बदलले. आर्थिक क्रांती झाली. वर्ग बदलले. परंतु अखंड मनुष्य होऊ शकला नाही.

तसेच पंथ, पक्ष, सांप्रदाय या माध्यमातूनही समता, एकात्मता, बंधुभाव निर्माण करण्याच्या चळवळी झाल्या व चालू आहेत. परंतु उपाय कमी पडू लागले आहेत. वरील क्रांत्या झाल्या. त्यातून हेतू साध्य झालेला नाही हे कोणीही नाकारू शकत नाही.

आता फक्त एकच प्रयोग उरला आहे तो म्हणजे शिक्षण क्रांतीचा प्रयोग. हा प्रयोग मोठ्या क्रांतीचा व एका प्रचंड परिवर्तनाचा ठरेल अशी मोठी शक्यता आहे. आणि हे काम फक्त शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेले शिक्षण तज्ज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था, संस्था चालक आणि शिक्षकांच्याच हाती आहे. म्हणून हे बंड शिक्षण क्षेत्रातील मंडळीच करू शकतील.

अशा या महान, ज्ञानाची प्राप्ती होणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रापासून हा विमुक्त भटका समाज अनंत पिढ्यापासून वंचित राहिला आहे.

स्वराज्य प्राप्तीनंतर ४५ वर्षांनी आज या शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजास शैक्षणिक सुविधा प्राप्त करून देण्याचे शासनाने जे धोरण ठरविले आहे त्या धोरणात व नियोजनात या समाजाची समाजरचना, त्यांचे आचार, विचार, संस्कार, संस्कृती, रूढी, परंपरा, आवड, निवड, व्यवसाय व सवयी ध्यानी घेऊन त्यांच्यात शैक्षणिक प्रगती करणे जरुरीचे आहे.

मी याच भटक्या विमुक्त समाजापैकी एक कार्यकर्ता असून गेल्या ४५ वर्षापासून मागास समाज सेवा मंडळ या संस्थेचा अध्यक्ष म्हणून कार्य करीत असल्याने माझ्या स्वानुभवास आलेल्या अडीअडचणींवरून या समाजाची अचूक परिणामकारक प्रगती करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना होणे अत्यंत गरजेचे वाटते.

या विमुक्त भटक्या समाजाच्या एकूण २० विमुक्त जमाती व २७ भटक्या जमाती आहेत. या ४७ जमातींची महाराष्ट्रातील अंदाजे लोकसंख्या ३५ लाख आहे. परंतु निश्चित लोकसंख्या समजण्याच्या दृष्टीने शासनाच्या पातळीवर खास करुन या विमुक्त भटक्या जमातींच्या लोकसंख्येचा जमातवार सर्व्हे होणे व तशी त्याची शासकीय रेकॉर्डवर नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी या समाजाचा लोकसंख्येचा सर्व्हे शासनाने लवकरात लवकर करावा कारण लोकसंख्येच्या प्रमाणावर शैक्षणिक नियोजन करणे सोईचे होईल.

हा विमुक्त भटका समाज वेगवेगळ्या दोन क्षेत्रांत परंपरेपासून रहात असल्याने त्यांचे दोन विभाग पडतात.

**पहिला गट : - जंगलात व रानावनात राहणारा -** यामध्ये लामाण, लमाणी, लंबाडा, बंजारा, मथूरा बंजारा, फासेपारधी, वगैरे. यापैकी लमाण, लमाणी, बंजारा हा समाज शेती, शेतमजुरी, पशुपालन करून उदरनिर्वाह करतात. व वाघरी, फासेपारधी, पशुपक्ष्यांची शिकार व माधुकरी मागून जीवन जगतात.

**दुसरा गट :- गावास किंवा गावाशेजारी राहणारा -** बाकीचे संपूर्ण विमुक्त भटक्या जमातीच्या टोळी गांवास कायम वसाहती करून रहातात. त्यापैकी वडर, पाथरुट, मामाडी, छप्परबंद, घिसाडी, बेलदार, गोंधळी, कटवू काशिकापडी, मांगगारुडी, कंजारभाट, रामेशी, जोशी, इत्यादी या समाजापैकी काही जमाती समाजास लागणारी अवजारे, घरबांधकाम, संरक्षण, भविष्य सांगणे, दगड फोडणे वगैरे शरीर श्रमाचे काम करून आपली उपजीविका करतात. व काम मिळेल त्या ठिकाणी स्थलान्तर करतात.

बाकीचे हेळवे, जोशी नंदीवाले, गारुडी, बैरागी, बहिरुपी, माकडवाले, डोंबारी कोलाटी, मसाणजोगी वैदू, वासुदेव, शिरुलगार वगैरे जमातीच्या लोकांचा व्यवसाय कसरतीचे व करमणुकीचे खेळ करून उपजीविका करीत असल्याने त्यांना सतत फिरत्या अवस्थेस जीवन जगावे लागते.

म्हणून या समाजाची शैक्षणिक प्रगती म्हणजे राष्ट्रीय कार्य समजूनच या विमुक्त भटक्या समाजाचे पुर्नवसन करून त्यांचा अस्थिरपणा दूर करून स्थिर करणे अत्यंत गरजेचे आहे.

या समाजाचे लोक शेती, पशुपालन यामध्ये आवडीने कष्ट करणारे, प्रगती करुन घेणारे असल्याने जे शेतकरी असतील त्यांची शेती सुधारणा व जे भूमिहीन असतील त्यांना पिकवून खाण्यासाठी शेती किंवा नवीन वननिर्मिती करणेकरिता वन वसाहती व त्या ठिकाणी पशुपालनाचा जोड धंदा देऊन काही वसाहती निर्माण करता येईल.

काही लोक माती व दगड काढणे, घरे बांधणे यामध्ये पिढीजात कुशल असल्याने त्यांना दगडाच्या खाणी, बांधकाम इत्यादी सोसायट्यांद्वारे देऊन त्यांची आर्थिक सुधारणा करता येईल.

काही लोक कसरतीच्या व करमणुकीच्या कामात विषेश तरबेज असल्याने त्यांना मिलीटरी शिक्षण, कलापथकाद्वारे प्रचाराचे काम देऊन त्यांना स्थिर करता येईल.

काही मंडळी पशू, पक्षी, प्राणी यांच्या माध्यमातून जीवन जगणारे असल्याने पशू, पक्ष्यांच्या माध्यमातून त्यांना आधुनिकतेचे शिक्षण देवून त्या धंद्याद्वारे त्यांना स्थिर करून शिक्षण देणे गरजेचे आहे.

येणे प्रमाणे वरील या समाजाच्या समस्या ध्यानात घेऊन खालीलप्रमाणे त्यांची शैक्षणिक योजना घेण्यात यावी.

१) सतत फिरता व्यवसाय करून जगणाऱ्या समाजाकरिता १०० लोकसंख्येच्या पाठीमागे एक फिरती बालवाडी व एक फिरती एकशिक्षकी शाळा सुरु करावी.

२) वसत्या व तांडे करून असलेल्या २०० लोकसंख्या असलेल्या वस्तीमध्ये आश्रमी पध्दतीची अेक बालवाडी व एक शिक्षकी शाळा त्यात मुलामुलींचे रहाण्याचे जेवणाचे, अंथरूण, पांघरूण, पाठ्यपुस्तके वगैरे व्यवस्था शासनाने करावी.

३) अशा दहा अेकशिक्षकी शाळांच्या मध्ये सेंटरला अेक आश्रम शाळा व पोस्ट बेसिक आश्रम प्रशाला असावी. या प्रशालेत त्यांच्या परंपरेस अनुसरून असणारी शैक्षणिक व्यवस्था असावी.

४) दहा पोस्ट बेसिक आश्रम प्रशालांच्या मध्यभागी अेक महाविद्यालयीन शिक्षणाची सोय असावी. ती आश्रम पध्दतीची असावी. शासनाने संपूर्ण खर्च करावा.

५) प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शेती अवजारे, पशुपालन, नर्सरी तयार करणे, जुन्या वस्तूंवर प्रक्रिया करून नवीन वस्तू निर्माण करणे या करिता प्रशिक्षण देणारे व्यवसाय केंद्र असावे.

६) शिक्षण घेतलेल्या मुला—मुलींमध्ये नोकरी व धंद्याची उत्तम प्रकाराची गुणवत्ता प्राप्त करुन देण्याकरिता जिल्हा स्तरावर या समाजाकरिता शासकीय खर्चाने अेक प्रशिक्षण केंद्र सुरु करावे.

७) या समाजाच्या रुढी व परंपरेप्रमाणे मुलींकरीता स्वतंत्र शिक्षणाची सोय करणे जरुरीचे असल्याने इ. ५ वीच्या नंतर लोकसंख्येच्या प्रमाणात मुलींकरिता स्वतंत्र आश्रम शाळा काढणे जरुरीचे आहे.

८) विमुक्त भटक्या जमातीच्या आश्रम शाळा, शिक्षण खाते व समाज कल्याण खाते या दोन्ही खात्यांच्या अधिकारात चालू असल्याने शिक्षण खात्याकडून जनरल प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये वेळोवळी होणाऱ्या बदलाचे आदेश, शिक्षण प्रशिक्षणाचे सवलती शिक्षकांना व विद्यार्थ्यांना साहित्याच्या व ज्ञानाच्या रुपाने मिळणाऱ्या सवलती प्राप्त होत नाहीत. व समाज कल्याण खात्याकडे शिक्षणासंबधीची कायदा कानूनप्रमाणे माहिती व आत्मीयता असणे अशक्य आहे. म्हणून या शाळा समाज कल्याण खात्याकडून जरी अनुदान मिळत असेल तरी शिक्षणाचे अध्ययन, अध्यापन, सेवकांची नियुक्ती, त्यास मंजुरी स्केल प्रमाण, पगार वगैरे मंजूर करणे व शाळा तपासणीचे अधिकार शिक्षण खात्याकडेच असावेत. हा बदल राज्य पातळीवर करावा.

९) आश्रम शाळेतील आश्रमवासीय मुलामुलींवर भोजन खर्चासाठी व इतर साहित्याकरिता उदा. कपडे, अंथरूण, पांघरूण, इमारत भाडे वगैरे बाबींचे अनुदान शासन चालवीत असलेल्या आश्रम शाळेप्रमाणे देण्यात यावे. म्हणजे शिक्षणाबरोबरच या मुलामुलींची शारीरिक क्षमता चांगली ठेवता येईल.

१०) विमुक्त भटक्या जमातीच्या आश्रम शाळेत भरावयाचा सेवक वर्ग (शिक्षक

व शिक्षकेतर) हा या समाजाबद्दल आत्मीयता असलेला व शाळेत येणाऱ्या मुलामुलींचे संस्कार बोली जाणणारा अशाचीच नियुक्ती करण्याकरिता नियुक्तीचे अधिकार संस्थेला पूर्ण असावे त्यास रोस्टरचा नियम शिथिल करावा.

११) भोजन खर्चाशिवाय जमीन खरेदी, पाण्याची व्यवस्था, इमारत बांधकाम खर्च हे अनुदान बाजार भावाप्रमाणे होणाऱ्या रकमेइतके द्यावे.

येणे प्रमाणे सोयी झाल्यास या समाजाची शैक्षणिक प्रगती विषेश मुदतीत पूर्ण करणे सोईस्कर होईल.

आज या समाजाच्या पुरुषांमध्ये शिक्षणाचे प्रमाण ५% टक्के असून स्त्रीचे शिक्षण प्रमाण १% टक्का सुध्दा नाही.

तरी आपल्या नव्या शैक्षणिक धोरणामध्ये खास विचार व्हावा व त्याची अंमलबजावणी अगत्याने करण्याची विनंती आहे.

# समतेसाठी शिक्षण- आदिवासीचे शिक्षण

प्राचार्य राजाराम राठोड
औरंगाबाद

आदिवासी म्हणजे आपल्या डोळ्यासमोर अशा समाजाचे चित्र उभे राहते, जो जंगलात राहतो. नग्न व अर्धनग्न अवस्थेत तिरकमठा घेऊन शिकारीसाठी वा कंदमुळे वा फळफळावळासाठी भटकणारा असा. अशा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक स्थितीमध्ये राहणाऱ्या माणसांचे नाचगाणे आपण टी. व्ही. वर पाहून आनंद मानत असतो. इतकेच नव्हे तर त्यांच्या या संस्कृतीचा आपण अभिमान बाळगतो. अशा आदिवासी समाजाच्या शिक्षणाच्या प्रश्नांची व्याप्ती व विस्तार काय असू शकतील याची कल्पनाच केलेली बरी.

समानतेसाठी शिक्षण या विषयावर परिसंवाद आयोजण्याचा उद्देश, शिक्षणाने सर्वसामान्यपणे समाजात समानता प्रस्थापित होऊ शकते अशी संकल्पना आहे. शिक्षण हे सामाजिक बदलाचे व व्यक्तीच्या विकासाचे प्रभावी साधन आहे खरे. परंतु या साधनाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करता आलेली नाही. याची अनेक कारणे व अडचणी असूही शकतील. पण अडचणीवर मात करण्याचा प्रयत्न झालेला नाही.

शिक्षण विषयक समान संधीची सोय प्राप्त करून दिली म्हणजे सामाजिक समानता आपोआपच निर्माण होते ही संकल्पना सर्वानुमते बरोबर नाही. कारण ज्या समाजात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेची दरी खूप मोठी आहे, एकीकडे आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी (बालवाडी व माँटिसरी) रांगा लावून रात्रंदिवस जागणारे व हजारो रुपये देणगीरूपाने देणारा अत्यंत जागरूक पालक व दुसरीकडे शाळेची सोय असली तरी आपल्या पाल्यांना सांगूनही शाळेत न पाठविणारा पालक-किती तफावत आहे दोघांच्या जीवन पध्दतीत! एकीकडे सर्वांना सुसज्ज माँटिसरी शाळा किंवा बालवाड्या, उत्तम प्रशिक्षित शिक्षक तर दुसरीकडे सगळ्याच बाबींचा अभाव अशा वातावरणात समान संधी निर्माण करून दिली असे म्हणणे म्हणजे पोहता येणाऱ्याला व पोहता न येणाऱ्याला सुंदर व विशाल तलावात पोहण्याची समानसंधी आहे असेच म्हटल्यासारखे होईल.

तात्पर्य, सर्व रोग्यांना एकच औषध दिल्यासारखे आहे. रोग निर्मूलन करायचे म्हणजे रोगाचे निदान करूनच औषध दिले पाहिजे.

आदिवासी समाज राहतो रानावनात व जंगलात जिथे शहराच्या काय, खेड्याच्या पण सुखसोयी नाहीत. या समाजात अद्याप शिक्षणाबद्दल जागृती नाही. अठराविश्व दारिद्र्य

हे त्याच्या पाचवीला पुजले आहे. म्हणजे रोग गंभीर स्वरूपाचा आहे म्हणून उपचाराचे स्वरूपही नाविन्यपूर्ण असले पाहिजे. मुलेमुली आठ-दहा वर्षांची होताच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कुटुंबपोषणाला हातभार लावतात. त्यांना शाळेत पाठविणे म्हणजे आर्थिक नुकसान. ब्रिटिशांनी शिक्षण खुले केल्यानंतर वा स्वातंत्र्यानंतर अनेक उपाययोजना करूनही आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार झाला नाही. ज्यांच्या हातात शिक्षणाच्या प्रसारणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी होती त्याही घटकांनी समर्थपणे जबाबदारी स्वीकारली नाही.

राधाकृष्णन अहवालात एके ठिकाणी असे म्हटले आहे की, तेव्हा समान संधी देऊनही आदिवासी समाजासारख्या लोकांसाठी विशेष संधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. ही गोष्ट घटनाकारांनी मान्य केलेली आहे. अर्थात विशेष संधी कायम स्वरुपाची नसणार, त्याला मर्यादा घालणे आवश्यक राहील. परंतु जोपर्यंत सामाजिक विषमता अस्तित्वात राहील तो पर्यंत आदिवासी वर्गांना विशेष संधी देण्याची आवश्यकता राहील. आदिवासी वर्गामध्ये समता स्थापन करणे जितके लवकर करता येईल ते केले पाहिजे. नाहीतर दिरंगाईमुळे ही समस्या भीषण स्वरूप धारण करण्याची शक्यता आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये (कलम १५(४), १६(४), २९(२), ३३०, ३३२ आणि ३३५ प्रमाणे) मागासवर्गाचे व आदिवासी समाजासाठी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे.

समतेसाठी विशेष तरतूद ही संकल्पना सर्वांना स्पष्ट झाली पाहिजे. या तरतुदीप्रमाणे शिक्षण, शासकीय सेवा व राजकीय प्रतिनिधित्व मिळाले आहे. माझ्यामते तिन्ही सवलतीपैकी शिक्षणाची सवलत अधिक महत्त्वाची आहे. या ठिकाणी समतेसाठी निर्माण केलेल्या विशेष तरतुदीसंबंधीच्या चालू असलेल्या वादात न गेलेले बरे. परंतु जोपर्यंत सर्व समाजामध्ये समता येणार नाही तोपर्यंत राष्ट्रावर प्रेम करावे म्हणणे म्हणजे कोणावर प्रेम करावे, हिमालयावर, गंगेवर, दगडधोंड्यावर का? आपण स्वीकारलेल्या लोकशाही समाजवादाचे, धर्मनिरपेक्षतेचे व राष्ट्रप्रेमाचे धोरण पुढे नेण्यासाठी आदिवासी समाजात चांगल्या शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.

आदिवासी विभागात, ग्रामीण विभागात उपलब्ध असलेल्या सोयीसवलतीही नाहीत; इतकेच नव्हे तर ग्रामीण भागात राहणारा पुढारलेला वर्ग आदिवासींचे शोषण करतो आहे असे दिसते. तेव्हा गाव तिथे शाळा असे न मानता आदिवासी ज्या पाड्यापाड्यावर राहतात अशा पाड्याच्या मध्यभागी आदिवासी या मुलामुलींच्यासाठी बालवाड्या, आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा काढणे आवश्यक आहे. यासाठी मात्र वर्गासाठी संख्येचे निकष लावता कामा नये. तात्पर्य आदिवासींना शाळेत आणण्यापेक्षा शाळाच आदिवासी मुलांच्याकडे गेली पाहिजे. याबाबतीत अनुताई वाघ यांचे उदाहरण उत्तम राहील.

आदिवासी विभागात संख्येच्या प्रमाणात कोणत्याही मध्यवर्ती पाड्याजवळ बालवाडी किंवा आश्रमशाळा सुरू कराव्यात. पावसाळयात ओढे नाल्यांचा अडथळा होऊ नये याचीही खबरदारी घ्यावी लागेल. बालवाड्यांमध्ये येणाऱ्या सर्व मुलामुलींना दुपारचे एक जेवण मोफत दिली गेली पाहिजे. नाहीतर सुरु केलेली बालवाडी कागदावरच राहण्याची शक्यता आहे. या बाबतीत शासनाने वास्तववादी दृष्टिकोन ठेवून अनुदान द्यावे. आदिवासी पालकांचा आर्थिक सहभाग अजिबात अपेक्षित नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. शहरात जे जागरूक पालक देणग्या देऊन आपल्या मुलांसाठी सर्व सोयी निर्माण करतात त्या सर्व सोयी शासनाने आदिवासींसाठी स्थापन केलेल्या शाळांमध्ये केल्या पाहिजेत. तरच शिक्षणप्रसाराबरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढविता येईल.

आश्रम शाळेची योजना आदिवासी मुलामुलींना खरे म्हणजे एक वरदान ठरावे. आदिवासी विभागात काही शासकीय आश्रमशाळा आहेत तर काही संस्था चालवीत असणाऱ्या शाळा आहेत. ज्या काही आश्रमशाळा निर्माण करून देण्यात आल्या आहेत त्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा नाहीत. आश्रमशाळेत आदिवासी मुलामुलींसाठी जेवण, दूध, कपडे, तेल, साबण, शिक्षणाचे साहित्य वगैरे देण्याची सोय आहे. परंतु प्रत्यक्षात ह्या गोष्टी त्यांना व्यवस्थितपणे मिळत नाहीत. शासकीय, बिनशासकीय व्यवस्थापनात खूप दोष निर्माण झालेले आहेत. हे दोष टाळण्यासाठी एक कार्यक्षम यंत्रणा निर्माण केली पाहिजे. केवळ समाजकल्याण व आदिवासी कल्याण खात्यावर हे सोडून चालणार नाही. या शिवाय त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी व कायम राखण्यासाठी नियमित शिक्षण क्षेत्रातली पाहणी पथके स्थापन करण्याची आवश्यकता वाटते. कारण आतापर्यन्त ज्या आश्रमशाळा चालू आहेत, त्यांचे परिणाम समाधानकारक नाहीत.

माध्यमिक आश्रमशाळा आदिवासी भागात आश्रमशाळेइतक्याच महत्त्वाच्या आहेत. कारण आदिवासींच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण झाल्याबरोबर माध्यमिक शिक्षणाची सोय जवळपास झाली पाहिजे. या शाळांमध्ये आवश्यक विषयांशिवाय त्यांच्या जीवनाशी निगडित असलेले विषय त्यांना शिकविले जावेत व त्यांच्या विषयाचा त्यांना कार्यनुभव द्यावा. आदिवासी विभागातल्या सर्व माध्यमिक शाळा सुसज्ज असाव्यात. अशा शाळांमध्ये शिकणाऱ्या शहरी व नागरी भागात सहली काढाव्यात. आंतरशालेय क्रीडास्पर्धा वगैरे सारखे उपक्रम आदिवासी विभागातील शाळेत द्यावेत, जेणेकरून सर्वांमध्ये मिसळण्याची संधी आदिवासी मुलांना मिळेल व त्यांचा लाजरेपणा नष्ट होईल. आश्रमशाळेत शालेय विषयात नैपुण्य दाखविणाऱ्या मुलामुलींना विशेष विद्यावेतन द्यावेत म्हणजे चांगल्यासाठी साहस वाढेल व पर्यायाने गुणवत्तेची वाढ होईल.

आदिवासी विभागात शाळा काढणे एकदा शक्य आहे. परंतु या विभागात जाऊन शिकविणाऱ्या शिक्षण वर्गाची नेमणूक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी वर्गातून

पुरेशा शिक्षकांची भरती करणे शक्य नाही. डोंगराळ भागात जाऊन राहण्याची इतर लोकांची इच्छा नसते. म्हणून आदिवासी विभागात जाऊन राहण्याची इतर लोकांची इच्छा नसते म्हणून आदिवासी विभागात काम करण्यासाठी, शिक्षकांसाठी विशेष आकर्षण निर्माण करणे हे आवश्यक आहे. उदा. विशेष भत्ता, राहण्यासाठी मोफत निवास व्यवस्था औषधोपचाराची सोय त्या त्या आश्रम शाळेतच त्यांच्या मुलामुलींना प्रवेशाची सोय वगैरे त्याचप्रमाणे आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकाने आदिवासी समाजाचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नावर प्रबोधन करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे त्यांना त्यांची दिशा स्पष्ट होईल. नाहीतर आदिवासींची दशा चालूच आहे.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, आदिवासी भागात शिक्षण देण्याचे कार्य सोपे नाही. शिकविणाऱ्या व शिकणाऱ्या त्यांना शिक्षणाबद्दल प्रवृत्त करणे जास्त महत्त्वाचे आहे. या शिवाय या कार्यासाठी त्या त्या विभागातील निग्रही सामाजिक कार्यकर्त्यांचेही सहकार्य घेणे योग्य राहील. कार्यक्रमाची व उपक्रमाची जाणीव परंतु अंमलबजावणी होत नाही. अंमलबजावणीवर भर देण्याची गरज आहे.

# समानतेसाठी शिक्षण-अल्प संख्याकाचे शिक्षण

# समानतेसाठी शिक्षण
# अल्पसंख्याकांचे शिक्षण

## १. स्वातंत्र्यपूर्व काळ

भारतीय इतिहास हा विविध परंपरांनी आणि संस्कृतींनी नटलेला आहे. भारतीय समाज जीवनात रुजलेली विविधतेतील एकता ठळकपणे पहावयास मिळते. गेल्या हजारो वर्षांपासून या भारत देशात वेगवेगळ्या धर्माचे, जातीचे, पंथाचे आणि वंशाचे लोक एका दिलाने राहात आहेत. या भावनिक ऐक्याची प्रचीती १८५७ च्या भारतीय संग्रामाच्या रुपाने सर्व जगात पहावयास मिळाली. १८५७ च्या रणसंग्रामात हिंदू, मुसलमान, शीख, पारशी खांद्याला खांदा लाऊन लढले, आणि प्राणाहून प्रिय असलेल्या आपल्या मातृभूमीस परकीयांच्या गुलामीतून बंधमुक्त करण्यासाठी प्राणांची बाजी लावली. १८५७ च्या रणसंग्रामात भारतीयांना यश लाभले नसले, तरी त्या निमित्ताने भारतातील विविध जाती, जमाती आणि धर्माच्या लोकांत, राष्ट्रीय एकात्मता पुन्हा एकवार उजळून निघाली आणि संपूर्ण भारतीय समाज देशप्रेमाच्या धाग्याने बांधला गेला.

मातृभूमीला गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी १८५७ च्या रणसंग्रामात पेटविलेली मशाल तशीच तेवत ठेवून दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. अबुल कलम आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू अशा असंख्य विविध जातीच्या अन् धर्माच्या देशपुत्रांनी भारतीय समाज एकसंध ठेऊन स्वातंत्र्याचा लढा सरू ठेवला. सरते शेवटी महात्मा गांधी यांच्या सामर्थ्यशाली नेतृत्वाखाली वेगवेगळ्या धर्माचे जातीचे पंथाचे आणि विविध भाषा बोलणारे लोक एकत्र येऊन भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळवून दिले.

भारताला गुलामगिरीतून मुक्त करण्यास हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, इसाई या सर्वच समाज घटकांचा हातभार लागला असून त्या समाजघटकातील असंख्य तरुणांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली.

स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मिती प्रसंगी या विविध घटकांच्या समपर्णाचा यथायोग्य विचार होऊन त्यांची भाषा, लिपी, आणि संस्कृती यांची भारत देशात जोपासना व वाढ होईल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा निर्धार करण्यात आला. अल्पसंख्याकांच्या परंपरा आणि संस्कृतीची जोपासना होऊन ती वृद्धिंगत करण्याची हमी भारतीय संविधानात देण्यात आली. एवढेच नव्हे तर सर्व धर्मांच्या लोकांना आपली संस्कृती आपल्या इच्छेनुरूप टिकविता यावी म्हणून भारतीय संघराज्य हे धर्मातीत राज्य (Secular State) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

भारतातील विविध राज्यांत विखुरलेल्या मुसलमान, शीख, पारशी, बौद्ध जैन, इत्यादी अल्पसंख्याक घटकांच्या हिताचे संरक्षण अबाधित राखण्यासाठी भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राज्यांना वेळोवेळी निर्देश देऊन अल्पसंख्याक घटकांची संस्कृती, भाषा, लिपी आणि पारंपरिक वैशिष्ट्ये टिकवून ठेवण्यास व ती वृद्धिंगत करण्यात मदत होईल असा सातत्याने प्रयत्न करण्यास सुचविण्यात आले.

## २. संविधानात्मक तरतुदी

भारतीय संविधानाच्या कलम २९ व ३० अन्वये अल्पसंख्याक समाजास त्यांची भाषा, लिपी आणि संस्कृती यांचे जनन करण्याच्या अधिकाराबाबत हमी दिली आहे. तसेच धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याकांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याच्या अधिकाराबाबत हमी देण्यात आली आहे. संविधानाच्या भाग-३ मध्ये मूलभूत हक्कासंबंधी असलेल्या कलमाखेरीज भाषिक अल्पसंख्याकांना पुढील जादा हक्कांची हमी दिलेली आहे.

**१) कलम २९ - अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे संरक्षण :**

अ) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकारि असेल.

ब) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**२) कलम ३० - अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार :**

अ) धर्म किंवा भाषा यावर अधिष्ठित अल्पसंख्याकांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

ब) शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशा प्रकारे राज्यसरकार भेदभाव करणार नाही.

**३) कलम ३५० अ – प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी :**

अ) प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रपती स्वत:ला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देऊ शकतील.

भाषिक अल्पसंख्याक समाजाचे शिक्षण या विषयाला विशेष महत्त्व देण्यात यावे, अशा आशयाची १९५६ मध्ये भारत सरकारची निवेदन पत्रिका प्रसिद्ध झाली. या विषयाचे महत्त्व प्रतिपादन करणारे भाषा विषयक निवेदन १९५८ साली प्रसिद्ध झाले. शिक्षण मंत्र्यांच्या अनेक परिषदांमधून या विषयास महत्त्वाचे स्थान देण्यात आले, तरी देखील अल्पसंख्याक समाजाच्या बाबतीत संविधानाद्वारे वर उल्लेखिलेली जी हमी देण्यात आली तिच्या कार्यवाहीमध्ये विषमता दिसून येते.

ब) १९८१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या १७.४ टक्के लोकसंख्या (धर्माच्या निकषावर आधारित) अल्पसंख्याकांची असून त्यापैकी ११.४ टक्के मुस्लीम, २.४ टक्के ख्रिस्ती, २ टक्के शीख, ०.७ टक्के बौद्ध, ०.५ टक्के जैन लोक आहेत.

केंद्रीय गृहखात्याच्या असे निदर्शनास आले आहे की, राष्ट्रीय स्तरावर मुस्लीम व नवबौद्ध समाज हे शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेले आहेत. राज्य शासनांनी देखील समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले गट शोधून निश्चित करावेत आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांना इतरांच्या बरोबर आणण्यासाठी विषेश प्रयत्न करावेत अशी सूचना केंद्रशासनाने राज्यशासनांना केली. त्याचप्रमाणे या अल्पसंख्याकांना राष्ट्रीय विकासात्मक कार्यक्रमामध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे असाही सल्ला दिला.

## ३. भाषिक अल्पसंख्याक आयोग १९ (४) दृष्टिक्षेप

**प्राथमिक शिक्षण :-**

भाषिक अल्पसंख्या आयोग १९८४ यांनी महाराष्ट्र राज्यातील भाषिक अल्पसंख्याकांच्या पाल्याच्या शैक्षणिक सवलतीचा आढावा घेतल्यावर केलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने एक आदेश काढून सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून भाषिक अल्पसंख्याकांच्या मुलांच्या नियमित नोंदी होण्यासाठी एक रजिस्टर ठेवावे, अशी सूचना केली त्यानुसार कार्यवाही होत आहे.

**त्रिभाषा सूत्र –**

महाराष्ट्र शासनाने त्रिभाषा सूत्र स्वीकारलेले आहे. माध्यमिक स्तरावर ५वी ते १०वी इयत्तांमध्ये मातृभाषा, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा अध्ययन- अध्यापनासाठी वापरण्यात येतात. भाषिक अल्पसंख्याक गटातील विद्यार्थी त्यांची मातृभाषा प्रथम भाषा म्हणून स्वीकारतात. आणि त्यांच्या आवडीनुसार मराठी, हिंदी, इंग्रजी द्वितीय व तृतीय स्तरावर निवडतात. काही विद्यार्थी आवडीनुसार संस्कृत इ. भाषा संयुक्त भाषा निवडतात. इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी व प्रामुख्याने आंग्ल भाषिक विद्यार्थी, फ्रेंच, जर्मन, इ. भाषा संयुक्तिक भाषा म्हणून स्वीकारतात.

अशा प्रकारे थोडक्यात महाराष्ट्र राज्यात माध्यमिक स्तरावर त्रिभाषा सूत्र अमलात आणले जाते.

**क्रमिक पुस्तके निर्मिती :**

**महाराष्ट्र** शासनाने भाषिक अल्पसंख्याकांच्या पाल्यांसाठी प्राथमिक व माध्यमिक स्तरांवरील **क्रमिक** पुस्तके त्यांच्या मातृभाषेतून काढण्याचा निर्णय घेतला. अल्पसंख्याक भाषिकांच्या बाबतीत क्रमिक पुस्तकांची उणीव जाणवत नाही. भाषावार क्रमिक पुस्तके तयार करून छपाईचे काम महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे यांचेकडे सोपविले आहे. हे मंडळ मराठी, गुजराथी, हिंदी, उर्दू, कन्नड, सिंधी (अरेबिक व देवनागरी) अशा विविध भाषांत क्रमिक पुस्तके छापते व शैक्षणिक वर्ष आरंभ होण्यापूर्वी ती वितरणासाठी उपलब्ध करून देते. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ हे प्राथमिक स्तरावरील पुस्तक छपाई व निर्मितीचे काम करीत असून माध्यमिक स्तरावरील पुस्तक निर्मितीची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे.

**शिक्षक-** भाषिक अल्पसंख्याक आयोगाच्या मतानुसार महाराष्ट्र राज्य शासनाने प्राथमिक व माध्यमिक स्तरावर अल्पसंख्याकाच्यां पाल्यांचे शिक्षण दर्जेदार होण्यासाठी अल्पसंख्याक भाषेच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाची परिपूर्ण सोय केलेली आहे. त्यामुळे अल्पसंख्याकांच्या पाल्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिकविणाऱ्या शिक्षकांचा तुटवडा नाही. भाषिक अल्पसंख्याक गटांनी चालविलेल्या प्राथमिक शाळेत जे अप्रशिक्षित शिक्षक नेमले असतील अशा शिक्षकांना सेवेत राहून सेवान्तर्गत प्रशिक्षण देण्याची सोय महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने पत्रद्वारा प्रशिक्षण योजना विभागाद्वारे केली आहे.

## ४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद ४.८ मध्ये अल्पसंख्याकांच्या शिक्षणाविषयी खालीलप्रमाणे विचार मांडले आहेत.

काही अल्पसंख्याक गट हे शिक्षणापासून वंचित आहेत किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत. अल्पसंख्याक समाजातील या गटात शैक्षणिक संधीची समानता प्राप्त करून देऊन सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले जाईल. त्यामुळे अल्पसंख्याक समाजास भारतीय घटनेद्वारा भाषा, लिपी व संस्कृतीचे जतन करण्याचे आणि त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याच्या अधिकाराबाबत देण्यात आलेल्या हमीचा यात साहजिकच अंतर्भाव होईल. त्याचबरोबर पाठ्यपुस्तक निर्मिती व सर्व शालेय उपक्रमांचे नियोजन या मध्ये वस्तुनिष्ठ

दृष्टिकोन प्रतिबिंबित होईल. तसेच राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी म्हणून गाभाभूत अभ्यासक्रमाशी सुसंगत राहतील अशी समान राष्ट्रीय ध्येये व आदर्श यावर आधारलेले शक्य तो सर्व उपाय योजले जातील.

**लक्ष्य गाठण्यातील टप्पे, कार्यपद्धतीचा विचार आणि प्राधान्याने योजावयाचे उपाय**

अ) **१९८६-८७ कार्यक्रम** - शिक्षण विभागामार्फत राबविले जाणारे जे कार्यक्रम १९८६-८७ सालीदेखील चालू ठेवले जातील ते खालील प्रमाणे आहे.

१) ज्या ठिकाणी अल्पसंख्याकांचे प्रमाण जास्त आहे अशा (प्रमुख) ठिकाणी स्थापन केलेल्या १० सामूहिक तंत्रनिकेतनांच्या द्वारा तांत्रिक कौशल्य प्राप्त करून घेण्याची सुविधा.

२) राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून पाठ्यपुस्तकांचे मूल्यमापन हा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नुकताच हाती घेतलेला कार्यक्रम.

३) प्राचार्य/व्यवस्थापक यांच्यासाठी उद्‌बोधक आणि अल्पसंख्याक समाजाच्या शाळांतील शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गाचा कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत टप्प्याटप्प्याने हाती घेतला जावा.

४) अल्पसंख्याक समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर वर्ग सुरू करण्यासाठी विद्यापीठ/महाविद्यालय यांना आर्थिक साहाय्य करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा कार्यक्रम.

ब) सातव्या पंचवार्षिक योजनेमधील १९८७-८८ ते १९८९-९० या उर्वरित तीन वर्षांमध्ये कार्यवाहीत आणण्यात येणारे कार्यक्रम.

वर उल्लेखिलेल्या योजनांसाठी पर्याप्त अनुदानाची तरतूद करून सातव्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या कालावधीत त्यांची व्याप्ती वाढविण्यात येईल. परिसरामध्ये असलेल्या अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्थानांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे व मार्गदर्शन करणे या उद्दिष्टांना अनुसरून काम करणारी मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यासंबंधी "राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, समाजकल्याण विभाग व शिक्षण विभाग यांची अलिगड, जामीया, मिलिया, इस्लामीया, काश्मीर, मराठवाडा व उस्मानिया विद्यापीठांच्या कुलगुरूंशी बोलणी चालू आहे. अशा प्रकारची मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्याची योजना सध्या मंत्रालयाच्या विचाराधीन आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये ही मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यासाठी रुपये ६५ लाख इतक्या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अल्पसंख्याक लोकांचे प्रमाण जास्त असलेल्या भागामध्ये सामूहिक तंत्र निकेतन योजनेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने आणखी ५ सामूहिक तंत्रनिकेतने स्थापन केली जातील.

**क) दीर्घ मुदतीचे कार्यक्रम** : बाल शिक्षण आणि पारंपरिक शालेय शिक्षण –

पारंपरिक शालेय शिक्षण देणाऱ्या शाळांमधून शास्त्र, गणित आणि इंग्रजी हे विषय ऐच्छिक ठेवण्यात येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला समाज प्रामुख्याने ज्या भागात आहे त्या भागात बालसंगोपन शिक्षण केंद्रे उघडण्यात येतील. त्याचप्रमाणे शक्य असेल त्या ठिकाणी देखील पारंपरिक शिक्षण देणाऱ्या शाळांना जोडून बालवाड्या उघडण्यात येतील. समाजोपयोगी उत्पादक कार्य या विषयाचादेखील समावेश या संस्थांमधून करण्यात येईल. आणि त्यासाठी केंद्रसरकारचे साहाय्य असलेली योजना शिक्षण विभागाकडून तयार करण्यात येईल.

**प्राथमिक शिक्षण :**

१) आयुक्तांना आवश्यक असलेली भाषिक अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक सोयीबाबतची संस्थानिहाय सांख्यिकी माहिती संकलित करण्याचे काम राज्यशासनास करावे लागेल.

२) अल्पसंख्याक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षकांना जागा मंजूर करणे आणि त्यांच्या नियुक्त्या करणे, यास लागणारा विलंब टाळण्यासाठी याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबतची कार्यवाही राज्यशासनातर्फे करण्यात येईल.

३) अल्पसंख्यांकांच्या भाषांमधील उपलब्ध पाठ्यपुस्तकाचे सर्वेक्षण करणे आणि या भाषांमधील पुस्तके मुद्रित करण्यासाठी मुद्रण सुविधांची व्यवस्था करणे, याबाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

४) अल्पसंख्याक भाषा विषयाच्या शिक्षकांसाठी योजनेत येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे सर्वेक्षण करून आवश्यक तेथे त्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी उपाय योजण्याची कार्यवाही राज्यशासन करेल.

५) अध्यापनासाठी असलेल्या वेळामधील १५ टक्के वेळ स्थानिक कला व व्यवसाय यांचे शिक्षण देण्यासाठी उपयोगात आणणे आणि कारागीर व शेतकरी यांच्या मुलांसाठी सायंकाळचे वर्ग सुरू करणे यासाठी राज्यशासनातर्फे प्रयत्न केले जातील.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण :**

१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, इतर मार्गदर्शन केंद्रे आणि राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था यांच्यामार्फत अल्पसंख्याक समाजाच्या संस्थांमधील शिक्षकांना शास्त्र, गणित, समाजशास्त्र, इंग्रजी, व्यवसाय मार्गदर्शन इत्यादी विषयांमध्ये सेवांतर्गत प्रशिक्षण देणे यासाठी सध्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेजवळ अशा प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि इतर संस्था यांच्यामार्फत या योजनेची व्याप्ती वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

२) अल्पसंख्याक संस्थांचे व्यवस्थापक व प्राचार्य यांचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आधुनिक तंत्राबाबत उद्बोधन करण्याची योजना –

सध्या ही योजना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत मर्यादित

प्रमाणावर चालू आहे.

३) राष्ट्रीय एकात्मतेच्या वृद्धीसाठी आणि त्रिभाषा सूत्र कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्याक समाजाच्या संस्थामधून प्रादेशिक भाषा शिक्षकांची नियुक्ती करण्याचे काम राज्यशासनामार्फत करण्यात येईल.

४) अल्पसंख्याकांच्या व्यवस्थापनाखाली असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये उपचारात्मक (Remedial) वर्ग सुरू करण्याची योजना हे काम राज्यशासन करेल.

५) शालेय शिक्षणामध्ये संगणक साक्षरता - या योजनामध्ये अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात येईल.

**व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण :**

१) विशेषत्वे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांची गरज पुरविण्यासाठी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळांमधून विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुविधा उपलब्ध करून देणे.

२) धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सर्व कार्यक्रमांचा पूर्णांशाने लाभ अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्थांना मिळेल, अशी व्यवस्था करणे.

३) अल्पसंख्याक समाजातील कारागीरांचे प्रमाण जास्त असलेल्या भागांमध्ये हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करणे व त्यामध्ये ८० टक्के जागा या कारागिरांच्या मुलांसाठी राखून ठेवणे.

**स्त्रियांचे शिक्षण :**

१) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याक समाजाच्या स्त्रियांमधील साक्षरतेचे व मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण सर्वांत कमी असल्याने मुलींच्या शाळा सुरू करणे, स्त्रीशिक्षिकांची नेमणूक करणे, मुलींसाठी वसतिगृहे सुरू करणे आणि मधल्या वेळचे जेवण, कपडे इत्यादी गोष्टी पुरविणे अशा स्वरूपाच्या प्रोत्साहन योजना सुरू करून अल्पसंख्यांक समाजाच्या गरजा पूर्ण करणे.

२) हस्तव्यवसायासाठी उत्पादन तथा प्रशिक्षण केंद्राची स्थापना अल्पसंख्याक समाजाचे प्रमाण जास्त असलेल्या जिल्ह्यात, विशेष करून मुलींसाठी हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्याद्वारे उत्पादन देणारी केंद्रे स्थापन करणे. या केंद्रामधून प्रामुख्याने स्त्रीशिक्षिका नेमणे. या बाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

**प्रौढ शिक्षण व बाल शिक्षणासाठी स्वयंसेवी प्रयत्न**

या योजना राबविण्यात अधिक परिणामकारकता यावी व समाजातील इतर घटकांनी स्वयंस्फूर्तीने प्रयत्न करावेत, यादृष्टीने अल्पसंख्याक समाजातील व्यावसायिकांच्यासाठी उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे.

या योजनांबाबत समाजामध्ये जागृती निर्माण व्हावी या हेतूने काम करणारे एक केंद्र अल्पसंख्याक समाजाच्या प्रत्येक संस्थेत जोडणे, त्याचप्रमाणे या केंद्रामार्फत पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देऊन योजनांच्या अंमलबजावणीची परिणामकारकता अनेक पटींनी वाढविणे, याबाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

**ग्रंथालये, वाचनालये आणि विस्तार कार्य :**

अल्पसंख्याक समाज असलेल्या भागात ग्रंथालये आणि वाचनालये स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची योजना, प्रायोगिक तत्त्वावर काही भागांमध्ये शैक्षणिक विस्तार कार्याचा प्रकल्प हाती घेण्याची योजना.

या योजनांसाठी राज्यशासन पर्याप्त अनुदान देऊन त्याबाबतची कार्यवाही करेल.

**अल्पसंख्याक समाजाच्या व्यवस्थापनाखालील शैक्षणिक संस्था**

१) शाळांच्या मान्यतेबाबतचा व त्या संदर्भात असलेल्या अर्जाचा वेळीच निपटारा करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे राज्यशासनांनी निश्चित केली पाहिजेत. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्यशासनाने शाळांच्या मान्यतेबाबतचे धोरण निश्चित करून त्यास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी दिली पाहिजे.

२) कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी परिणामकारक पर्यवेक्षण व्यवस्था केली पाहिजे.

३) शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी योजण्यात आलेल्या उपायांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी अल्पसंख्याक समाजाच्या संस्थांचे सहकार्य मिळविण्यास मदत करणे, किमान भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची हमी देणे, शैक्षणिक दर्जा, राखण्यासाठी आणि शिक्षकांची आपल्या पेशाविषयी आवड टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी विविध हेतूंनी काम करणाऱ्या अल्पसंख्याक समाजाच्या संस्थांचे राज्यवार गट (Federation) स्थापन करणे.

हे गट मान्यताप्राप्त असले पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांना आर्थिक साहाय्य मिळाले पाहिजे.

**स्थान निश्चिती** (Area approach) :

अल्पसंख्याकांची दाट वस्ती असलेल्या जिल्ह्याकडे विशेष लक्ष पुरवून अल्पसंख्याक समाजातील मुलांना प्रवेश देण्याच्या बाबतीत सोईचे होईल अशा प्रकारे शाळांसाठी ठिकाण निश्चित करावे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला समाज ज्या भागामध्ये जास्त आहे असे जिल्हे देखील राज्यशासन यामध्ये समाविष्ट करू शकेल. (परिशिष्ट पान ३४४ पहा)

**शिष्यवृत्ती योजना :**

चांगल्या दर्जाच्या संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी

ातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता तथा आर्थिक परिस्थिती या निकषावर आधारित ोजना, कारागीर व इतर मागास गटाच्या मुलांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध साठी शालेय शुल्कामध्ये सूट देण्याची / सवलत देण्याची / भरपाई करण्याची

ा प्रकारचे साहाय्य भारतातील नामांकित स्वयंसेवी संस्थांनी द्यावे. याची ाज्यशासन करेल.

**संघटनात्मक व व्यवस्थापनात्मक मुद्दे**

Organisational & Management Issues

**प्रत्यक्ष गणन पद्धतीने सर्वेक्षण** (Bench Mark Survey) **आणि संशोधनात्मक**

ारता व शैक्षणिक संपादन यातील वाढीची प्रत्यक्ष गणन पद्धतीने (Bench vey) पाहणी करणे व उपचारात्मक उपायांची परिणामकारता, विशेष करून ांची दाट वस्ती असलेल्या भागातील शाळांच्या उपलब्धतेच्या संदर्भात क संशोधनात्मक अभ्यास करणे, ही कार्यवाही राज्यशासन करेल.

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याक समाजाची शिक्षण मंडळे व इतर मंडळे यांच्याशी साहचर्य.

ाणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांचे केंद्र पातळीवर आणि राज्य कार्य करणाऱ्या विविध शिक्षण मंडळांशी आणि सल्लागार समित्यांशी संबंध करणे.

**र्यवेक्षण व्यवस्था** – शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी योजण्यात आलेल्या परिणामकारक अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहण्यासाठी केंद्र व राज्य शिक्षण विभागात एक नवीन कक्ष सुरू करणे.

) **पुनर्विलोकन** – अल्पसंख्याक समाजासाठी योजण्यात आलेल्या शैक्षणिक दरवर्षी पुनर्विलोकन करावे लागेल.

**ील प्राथमिक स्तरातील शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची स्थिती**

ाराष्ट्रातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची १९६०-६१ व १९८६-८७ या वर्षातील ी तक्ता क्र. १ मध्ये जिल्हावार दाखविलेली आहे. या तक्त्यातील आकडेवारी तेलगू व इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ५०% पेक्षा जास्त वाढ झालेली दिसते. गुजराथी, सिंधी, कन्नड माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या संख्येतही ा जास्त वाढ झाल्याचे दिसते.

यावरून असे स्पष्ट होते की महाराष्ट्रातील अल्पसंख्याकांच्या मुलामुलींच्या शिक्षणाची पुरेशी सोय करण्यात येत असून मागील २८ वर्षांचा मागोवा घेतल्यास उर्दू, कन्नड, तेलगू, गुजराथी, इंग्रजी, हिंदी, सिंधी इ. अल्पसंख्याक भाषिकांचे शैक्षणिक संबंध जोपासले जाऊन त्यांच्या मातृभाषेला परंपरा व संस्कृतीला पुरेसे संरक्षण देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे.

अल्पसंख्याकांच्या मुलामुलींची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यानुसार महाराष्ट्रातील संबंधित जिल्ह्यात त्या त्या अल्पसंख्याक भाषिकांसाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याची अंदाजे १९६०-६१ ते १९८६-८७ या वर्षांमधील शाळांची संख्या तक्ता क्र. २ मध्ये दाखविलेली आहे. १९६०-६१ पासून १९८६-८७ पर्यंत शाळांची संख्या आठ पटींनी वाढलेली दिसते. गुजराथी माध्यमाच्या शाळांची संख्या याच कालावधीत छत्तीस पटींनी वाढलेली दिसते. सिंधी, कन्नड, इंग्रजी व तेलगू माध्यमाच्या शाळांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. या वरूनच असे दिसते की अल्प संख्याकांच्या मुलामुलींना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्यास व्यत्यय येत नाही.

महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याकांच्या वाढत्या विद्यार्थीसंख्येनुसार जादा शाळा सुरू केल्या, तसेच नवीन शाळांना मान्यताही दिलेली आहे. या शाळांच्या वाढत्या संख्येनुसार प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता निर्माण झालेली आहे. वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन त्या त्या भाषेतील प्रशिक्षित शिक्षकांची व गरजेपोटी अप्रशिक्षित शिक्षकांची देखील नेमणूक करून अल्पसंख्याकांच्या पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अशा अप्रशिक्षित शिक्षकांना सेवेत राहून सेवान्तर्गत प्रशिक्षण देण्याची सोय महाराष्ट्र राज्य शासनाने शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण योजना या विभागाद्वारे केलेली आहे. या अल्पसंख्याक शाळेतील शिक्षकांची संख्या वेगवेगळ्या (माध्यमातून) भाषेतून कशी आणि किती होती याची जिल्हानिहाय आकडेवारी तक्ता क्र. ३ मध्ये दिलेली आहे.

अल्पसंख्याकांच्या पाल्यांचे शिक्षण उत्तम व दर्जेदार होण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नितांत गरज आहे. ही निकड लक्षात घेऊन १९६० पासून क्रमश: आवश्यकतेनुसार त्या त्या जिल्ह्यांत अल्पसंख्याक भाषिक शिक्षकांसाठी शासकीय व खाजगी अध्यापक विद्यालये सुरू करण्यात आलेली आहे. ती जिल्हानिहाय १९६०-६१ ते १९८६-८७ या वर्षांची आकडेवारी तक्ता क्र. ४ मध्ये दिलेली आहे. या तक्त्यांवरून अध्यापक विद्यालयाची संख्या प्रकर्षाने वाढलेली दिसते.

तक्ता क्र. ९

## १९६०-६१ ते १९८६-८७ मधील जिल्हानिहाय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या

| अ. नं. | जिल्ह्यांचे नांव | उर्दू | | | | गुजराथी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १) | मुंबई | ४१८०८ | १२२५१० | ८०२९ | ८०५६१ | ९१७९६ | ११०२३६ | ५९९४६ | १५०३६१ | ५३९११ | २०५३८० | ५९६४६ | ९३४८१९ |
| २) | नासिक | १३४७९ | ४०६७४ | ९८२ | १८३०२ | ८७३ | ६९२ | ८१९ | १७१० | ८९७ | ११२५३ | ११९९ | २२९५२९ |
| ३) | धुळे | ८१६० | १४०८२ | १४३ | ६१५४ | २५५३ | १७७६ | ३४१ | २७७२ | ८९ | १८२० | — | १४६२० |
| ४) | जळगाव | १८२४१ | ३४९०२ | २५१ | ११८१६ | ९६४ | १३० | — | — | ५३८ | २३९९ | ४०८ | १८२८६५ |
| ५) | ठाणे | ७५४५ | २९०८१ | ८५० | १७७६४ | ६८१७ | १६०४८ | ४०६१ | १६८५६ | २९६ | ७०६५१ | २११० | २८०११७ |
| ६) | पुणे | ८०९३ | १३४८२ | ११५२ | ६७७६ | २९६५ | १६७० | १८४१ | ३२१४ | ७४७३ | ३५९०६ | ७६५२ | ३७४९७५ |
| ७) | अहमदनगर | ६६६६ | ८२१७ | ३०७ | ३२५२ | २१३ | ४६ | — | — | ७० | ३९२७ | २६८ | २१४३८२ |
| ८) | सोलापूर | १४०११ | २०४२२ | ६०३ | ८९४२ | १५५ | ६८ | — | — | ३७८ | ३९८६ | २२९ | १५९९६६ |
| ९) | रायगड | १०८९२ | १४५७१ | ३६५ | १२६७० | ५१९ | ५३२ | — | ३६० | — | ४१३१ | — | ९८१८४ |
| १०) | कोल्हापूर | ६५६५ | ६७५४ | — | १६०० | २२५ | १७४ | २०४ | ४२० | ४६५ | ५६५० | २४८ | १६३८४३ |
| ११) | रत्नागिरी | १६३८१ | १५६६० | १५८ | ९०४४ | — | — | — | — | — | १०३१ | — | ७६७१२ |
| १२) | सिंधुदुर्ग | — | १०९१ | — | ७७६ | — | — | — | — | — | ४९३ | — | ५७९१७ |
| १३) | सातारा | ८०७१ | १५८० | — | ११२४ | १६ | — | ४२ | — | — | १९४६ | ११२३ | १७८६६८ |
| १४) | सांगली | ५३७५ | ७७३९ | ७१ | २१२६ | १६३ | ३१२ | ८६ | ६६६ | ९८ | २२५९ | — | १३६३८५ |
| १५) | औरंगाबाद | ३८९२ | २०५१० | २५३३ | १४७३८ | ३६३ | — | १६३ | — | — | ७६७० | ६४३ | १००००५ |

## १९६०-६१ ते १९८६-८७ मधील जिल्हानिहाय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या

| अ. नं. | जिल्ह्यांचे नांव | उर्दू | | | | गुजराथी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १६) | जालना | — | ५४७८ | — | ३२५८ | — | २३१ | — | — | — | १८७६ | — | ४११३१ |
| १७) | परभणी | २९९१ | १४२४४ | ९२७ | ८०७८ | — | — | २२ | — | १४५ | १३३८ | — | ७३१८१ |
| १८) | बीड | १६८६ | ११९०२ | ५३६ | ७०२० | — | — | — | — | — | १६३८ | — | ७५२६३ |
| १९) | नांदेड | ३३७३ | १९७८१ | ९२१ | ९४९८ | ९५ | — | — | — | — | १७११ | — | ८९०९२ |
| २०) | उस्मानाबाद | १५०० | ३५२४ | ५२७ | ३५८४ | १०६ | — | — | — | — | १४१ | — | ५९९३० |
| २१) | लातूर | — | ७४८५ | — | ५३३४ | — | २३ | — | — | — | १०५८ | — | ९०७७५ |
| २२) | अमरावती | १०५५४ | २९१७६ | १३४५ | १७६९८ | ३८५ | ३६६ | — | १३३६ | — | २१८७ | ६८८ | १७७४०६ |
| २३) | बुलढाणा | ८२५० | २२०८७ | ६९८ | ७८९० | ८४ | — | — | — | — | १०४३ | — | ९२३७६ |
| २४) | अकोला | १०६७७ | २९४८८ | ६२३ | १९८१८ | ७०३ | ३६४ | ३६६ | ४८२ | — | ६३३० | — | १३७१६८ |
| २५) | यवतमाळ | ४०९८ | १३४९६ | ५२३ | ७२९६ | २२३ | — | — | — | — | ३१२९ | — | १०५१२७ |
| २६) | नागपूर | ६६४९ | १६०७३ | २२४७ | १७१४० | ८०० | ८८३ | ४६३ | ११८४ | ५४५ | २८८१३ | ४४९७ | २९२३०५ |
| २७) | वर्धा | १२७४ | २७६६ | १२४ | २५९४ | १२२ | १०६ | — | ९८ | — | २४५६ | — | ९२०२८ |
| २८) | भंडारा | ३४८ | ९३२ | — | ७७६ | ३८८ | १७५ | २८२ | २९० | — | ३५७९ | ३०७ | १३२८३९ |
| २९) | चंद्रपूर | ४२८ | २१८२ | — | १६९२ | — | — | — | — | — | ५६३१ | २० | १०५९४८ |
| ३०) | गडचिरोली | — | ५०० | — | ४१८ | — | — | — | — | — | — | — | २४५६५ |

१९६०-६१ ते १९८६-८७ मधील जिल्हानिहाय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या

| हिंदी | | | | सिंधी | | | | कन्नड | | | | तेलगु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| २४२३३ | १२१८४५ | ११२८२ | ७१८४३६ | ५८७० | १३३ | ७५५८ | २४०१ | ४८७३ | १३४५० | ४३४५ | १४८४२ | १९१६ | — | — | ४९८८ |
| १२६७ | ११९४ | ७५४ | २२०५४३ | ८८० | २१४ | ८८६ | ९७६ | — | — | — | — | — | — | — | — |
| ५८४ | ९६९ | — | १४५२५६ | ६०९ | १०१४ | — | ७४८ | — | — | — | — | — | — | — | — |
| १५५४ | ४७७८ | ५९५ | १८२६२७ | १२१८ | २३५८ | — | २३०० | — | — | — | — | — | — | — | — |
| ५१७ | २४०६८ | ५५५ | २४९४७२ | १२५१३ | ११४१२ | ५७६२ | २३७०४ | ३३९ | १२८४ | — | ४४८ | — | — | — | — |
| ३२१९ | ५६०४ | २०४८ | ३३५०१९ | १८०३ | ५७२ | १३४५ | ४६२४ | १९८ | २३४ | ८८ | — | ४२७ | — | — | — |
| ७८५ | ६१९ | ४७० | २१०२८४ | ५०९ | ११३ | — | २१६ | — | — | — | — | १३८ | — | — | — |
| १८३ | १९१ | १४३ | १५५९७६ | १०२ | — | — | — | ८७९३ | १४१३३ | ६६३ | — | ६२६ | — | — | १४४ |
| ४४ | २३९ | — | ९५७०१ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | १५९६७६ | ८५२ | ९७३ | — | ४०४ | १४७५ | ३२ | — | — | — | — | — | — |
| — | — | — | ७५९०२ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | ५७९१७ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | १७४५७८ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | १३२७९१ | — | — | — | — | — | ८९४० | — | ४५४४ | — | — | — | — |
| ९५१ | ६२५ | ८०९ | ९५४२५ | — | — | — | — | — | — | — | — | १२३ | — | — | — |

## १९६०-६१ ते १९८६-८७ मधील जिल्हानिहाय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या

| हिंदी | | | | सिंधी | | | | कन्नड | | | | तेलगु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| — | ३३६२ | — | ४१९४६ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | ३१६ | ४८० | ७१७२८ | — | — | — | — | — | — | — | — | २८ | — | — | २१२ |
| — | — | — | ७४६६४ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७३४ | १४७० | ६०३ | ८७१८६ | — | — | — | — | — | — | — | — | ३५३ | — | २०९ | — |
| — | — | १९१ | ५९१२४ | — | — | — | — | — | — | १४० | — | — | — | — | — |
| — | — | — | ८९९११ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ४५०५ | ९४६४ | २५२८ | १७६८७८ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १००६ | ९०० | ४४८ | ९३४२८ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| २९१४ | ५६३२ | १७९६ | १३५९३२ | — | — | — | २४२२ | — | — | — | — | — | — | — | — |
| ९५८ | २९१३ | ३३१ | १०६१०१ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १४९३४ | ३९०५९ | १०६६२ | ३०३८८ | — | — | — | ४८७० | — | — | — | — | — | — | — | — |
| २३१९ | ३२९८ | २१६५ | ९३१५६ | ६४ | — | — | २२० | — | — | — | — | — | — | — | — |
| १००७० | २६३०० | २३९३१ | ४५६०४ | ३९७ | ६४५ | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७७२ | ५४१२ | ३७१ | १०३७६३ | — | — | — | — | — | — | — | — | १८२४ | — | १०३ | — |
| — | ६५० | — | २५८१९ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

तक्ता क्र.२

## १९६०-६१ ते १९८६-८७ मधील जिल्हानिहाय अल्पसंख्यांक शाळांची संख्या

| अ. नं. | जिल्ह्यांचे नांव | उर्दू | | | | गुजराथी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १) | मुंबई | १४१ | २४४ | १८ | ५९ | २९५ | २९७ | १२१ | १५२ | १४५ | ४८५ | १३६ | ४१० |
| २) | नासिक | ४९ | १३२ | ३ | १५ | ५ | २ | २ | १ | ४ | २८ | ४ | २० |
| ३) | धुळे | ४५ | ६९ | १ | ११ | १४ | १६ | २ | ४ | १ | ६ | — | ४ |
| ४) | जळगाव | १२६ | १७८ | २ | २३ | ७ | २ | — | — | २ | ९ | १ | ८ |
| ५) | ठाणे | ६६ | १०६ | २ | १२ | ३५ | ६४ | ८ | १६ | ४ | १९ | ६ | ७६ |
| ६) | पुणे | ४० | ५३ | ४ | ८ | ८ | ७ | ३ | ३ | ३० | ७३ | २१ | ७५ |
| ७) | अहमदनगर | ६६ | ६७ | १ | ५ | २ | १ | — | १ | १ | १३ | १ | १७ |
| ८) | सोलापूर | ७३ | ८७ | १ | १५ | २ | १ | — | १ | १ | ७ | १ | ९ |
| ९) | रायगड | १२० | १५२ | ३ | २० | २ | ३ | — | — | — | १२ | — | १४ |
| १०) | कोल्हापूर | ५८ | ५८ | — | ५ | १ | १ | १ | — | १ | १९ | १ | १३ |
| ११) | रत्नागिरी | १६० | १६९ | २ | १७ | — | — | — | — | — | ४ | — | ३ |
| १२) | सिंधुदुर्ग | — | २९ | — | २ | — | — | — | — | — | २ | — | १ |
| १३) | सातारा | ९ | १४ | — | ३ | १ | — | १ | — | — | १० | ८ | १७ |
| १४) | सांगली | ३५ | ५३ | १ | २ | १ | १ | १ | १ | १ | १६ | — | ९ |
| १५) | औरंगाबाद | ४३ | ४९ | १३ | २३ | २ | — | १ | — | — | २४ | २ | ११ |

| अ. नं. | जिल्ह्यांचे नांव | उर्दू | | | | गुजराथी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १६) | जालना | — | १३ | — | १२ | — | १ | — | — | — | ४ | — | ३ |
| १७) | परभणी | १८ | २४ | ४ | १६ | — | — | १ | — | १ | ७ | — | ५ |
| १८) | बीड | १४ | ५८ | ५ | १८ | — | — | — | — | — | ७ | — | ७ |
| १९) | नांदेड | २७ | ५४ | ७ | २१ | १ | — | — | — | — | ९ | — | ४ |
| २०) | लातूर | — | २३ | — | १० | — | १ | — | — | — | ४ | — | ५ |
| २१) | अमरावती | ९६ | १४६ | ९ | २७ | ३ | २ | — | १ | — | ३ | ३ | २० |
| २२) | बुलढाणा | ७२ | १२६ | ४ | १६ | १ | — | — | — | — | ६ | — | — |
| २३) | अकोला | ८८ | १८० | ७ | २९ | ५ | ४ | १ | १ | — | २४ | — | १९ |
| २४) | यवतमाळ | ३५ | ६८ | ५ | १६ | २ | — | — | — | — | १० | — | ८ |
| २५) | नागपूर | ३१ | ६० | ९ | २० | ४ | ४ | १ | २ | ३ | ७८ | १९ | २६ |
| २६) | वर्धा | १२ | १९ | १ | ५ | २ | १ | — | १ | — | ११ | — | ८ |
| २७) | भंडारा | २ | ५ | — | ३ | १ | १ | १ | १ | — | १३ | १ | ११ |
| २८) | चंद्रपूर | ५ | १६ | — | ५ | — | — | — | — | — | २३ | १ | १२ |
| २९) | गडचिरोली | — | ५ | — | १ | — | — | — | — | — | — | — | ३ |
| ३०) | उस्मानाबाद | ९ | १२ | ५ | ९ | १ | — | — | — | — | १ | — | ३ |

| हिंदी | | | | सिंधी | | | | कन्नड | | | | तेलगु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| ९४ | २२४ | २८ | ७६ | २९ | २ | १६ | ३ | ४५ | ६१ | १० | २४ | १४ | — | — | २ |
| ६ | ४ | ४ | ४ | ७ | ५ | २ | २ | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | २ | — | १ | ३ | ५ | — | १ | — | — | — | — | — | — | — | — |
| ५ | १० | २ | ४ | ६ | ७ | — | ४ | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | ५१ | ४ | १८ | २५ | २९ | १० | १४ | १ | ५ | — | ३ | — | — | — | — |
| १८ | १५ | ८ | १२ | ७ | ४ | ३ | २ | १ | १ | १ | — | ४ | — | — | — |
| ५ | २ | २ | २ | २ | २ | — | १ | — | — | — | — | १ | — | — | — |
| १ | १ | १ | १ | १ | — | — | — | ७८ | ११० | ४ | — | ३ | — | — | १ |
| १ | १ | — | ३ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | ३ | २ | १ | ११ | १ | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | २ | — | — | — | ५५ | ७४ | १ | ८ | — | — | — | — |
| ३ | — | ५ | ३ | — | — | — | — | — | — | — | — | २ | — | — | — |

| हिंदी | | | | सिंधी | | | | कन्नड | | | | तेलगु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | | प्राथ. | | माध्य. | |
| ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| — | १० | — | ७ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| — | २ | १ | २ | — | — | — | — | — | — | — | — | १ | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | ३ | १ | २ | — | — | — | — | — | — | — | — | ४ | — | १ | — |
| — | — | — | १ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ८५ | २९ | १० | १३ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ६ | ६ | १ | १ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १३ | १९ | ६ | १० | — | — | — | १ | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ | ८ | १ | ५ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ६५ | १०६ | ४० | ५४ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ६ | ९ | ८ | ११ | १ | — | — | १ | — | — | — | — | — | — | — | — |
| ९४ | १४८ | ७ | ४० | १ | १ | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ११ | १२ | ४ | ५ | — | — | — | — | — | — | — | — | ५७ | — | ३ | — |
| — | ९ | — | ५ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | — | १ | — | — | — | १ | — | — | — | २ | — | — | — | — | — |

तक्ता क्र. ३

## १९८६-८७ मधील अल्पसंख्यांक शाळेतील शिक्षक संख्या

| अनुक्रमांक | जिल्हे | उर्दू | | गुजराथी | | इंग्रजी | | हिंदी | | सिंधी | | कन्नड | | तेलगू | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. |
| १. | मुंबई | २७३२ | २०४७ | ३२९४ | ४५८३ | ५०४९ | १४९३४ | २९३७ | ५८६१ | ५३ | ६० | १०८३ | ६४० | — | ५० |
| २. | नासिक | १००७ | ३९८ | १८ | ४३ | ३११ | २४४७ | २२ | १३९९ | १५ | ३७ | — | — | — | — |
| ३. | धुळे | ३६१ | १८८ | ६८ | १०३ | ६२ | १०९२ | २२ | ८७० | ३६ | ३४ | — | — | — | — |
| ४. | जळगाव | ९०१ | २९५ | १० | — | ७१ | १६८८ | १०३ | १३८२ | ६६ | ३९ | — | — | — | — |
| ५. | ठाणे | ६२५ | ४०३ | ४५८ | ३४२ | १९१९ | ३०३१ | ५०४ | १७०९ | ३९७ | ५७६ | ३४ | २३ | — | — |
| ६. | पुणे | ३५१ | १५९ | ४९ | ८३ | ७५० | ४३२३ | १३१ | २३७१ | २० | ६६ | ८ | — | — | — |
| ७. | अहमदनगर | २१६ | १११ | २ | — | १०५ | १८२२ | १७ | १११६ | ७ | ९ | — | — | — | — |
| ८. | सोलापूर | ४८९ | २०९ | ३ | — | ९५ | १५९१ | ५ | १०९३ | — | — | ४६ | — | | |
| ९. | रायगड | ४८८ | ३०२ | २३ | ४ | १३८ | ८४३ | ९ | ४७२ | — | — | — | — | — | — |
| १०. | कोल्हापूर | २७५ | ४७ | ४ | १२ | १४५ | १५२५ | — | ९२० | ३९ | ७ | १ | | — | — |
| ११. | रत्नागिरी | ४६४ | २५४ | — | — | ३६ | ७२० | — | ४७४ | — | — | — | — | — | — |
| १२. | सातारा | ४७ | — | — | ८१ | १६६३ | — | — | ९२७ | — | — | — | — | — | — |
| १३. | सांगली | २२४ | ५५ | ९ | — | १५४ | १४०७ | — | ९७१ | — | — | — | १६४ | — | — |
| १४. | औरंगाबाद | ५०६ | ३९९ | — | — | १४४ | १०४८ | १६ | ६८९ | — | — | २३२ | — | — | — |
| १५. | जालना | १४२ | ४ | — | — | ३८ | ४७६ | ६५ | ३६६ | — | — | — | — | — | — |
| १६. | परभणी | ३६९ | ३५५ | — | — | ७१ | ६५० | ८ | ४६३ | — | — | — | — | — | — |

| अनुक्रमांक | जिल्हे | उर्दू | | गुजराथी | | इंग्रजी | | हिंदी | | सिंधी | | कन्नड | | तेलगू | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. | प्राथ. | माध्य. |
| १७. | बीड | २८० | २०७ | — | — | ७३ | ६३९ | — | ४९२ | — | — | — | — | — | — |
| १८. | नांदेड | ४०३ | २४३ | — | — | ८८ | ७९० | ३१ | ५६२ | — | — | — | — | — | — |
| १९. | उस्मानाबाद | ८६ | ९४ | — | — | १० | ६०६ | — | ४८३ | — | — | — | — | — | — |
| २०. | लातूर | १३४ | ६७ | २ | — | ५४ | ७०० | — | ५५९ | — | — | — | — | — | — |
| २१. | अमरावती | ८५७ | ४८२ | ८ | १० | ३२ | २३४० | २४७ | १४८१ | — | — | — | — | — | — |
| २२. | बुलढाणा | ५२४ | २६१ | — | — | ४५ | १२०४ | २२ | ५९२ | — | — | — | — | — | — |
| २३. | अकोला | ७४६ | ५५३ | १० | १४ | १९७ | २२९३ | १२६ | ११६९ | — | १८ | — | — | — | — |
| २४. | यवतमाळ | ५४४ | २४६ | — | — | ९९ | १३९२ | ५५ | १०५० | — | — | — | — | — | — |
| २५. | नागपूर | ३६३ | ४३० | १९ | २९ | ८६४ | २४७१ | ८७९ | २८९६ | — | ४६ | — | — | — | — |
| २६. | वर्धा | ७९ | ६५ | १ | २ | १०० | ११०९ | ८३ | ७२० | — | ५ | — | — | — | — |
| २७. | भंडारा | ३२ | ३५ | ४ | १८ | ९९ | १४९१ | ६०५ | १७३० | १३ | — | — | — | — | — |
| २८. | चंद्रपूर | ४८ | ६५ | — | — | २०३ | १६२७ | १२५ | १०१९ | — | — | — | — | — | — |
| २९. | गडचिरोली | ९ | १८ | — | — | — | २५९ | ११ | १९६ | — | — | — | — | — | — |
| ३०. | सिंधुदुर्ग | ४५ | २८ | — | — | १८ | ६०० | — | ३९६ | — | — | — | — | — | — |

तक्ता क्र. ४

१९६०-६१ ते १९८६-८७ मधील अध्यापक विद्यालयाची संख्या

| अनुक्रमांक | जिल्ह्याचे नाव | उर्दू | | गुजराथी | | इंग्रजी | | हिंदी | | सिंधी | | कन्नड | | तेलगू | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १. | मुंबई | २ | ४ | ३ | २ तुकड्या ४ मराठी अ. वि. जोडलेल्या आहेत. | – | १ तुकडी मराठी ४ अ. वि. जोडलेली आहे. | – | १ तुकडी मराठी २ अ.वि. जोडलेली आहे. | – | – | – | – | – | – |
| २. | नासिक | – | १ | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| ३. | धुळे | – | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४. | जळगाव | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५. | ठाणे | – | १ | – | – | – | १ स्वतंत्र अ.वि.६ बाकी तुकड्या अ. वि. जोडलेल्या आहेत. | – | ३ अ. वि. सलग्न | – | १ | – | – | – | – |
| ६. | पुणे | २ | २ | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| ७. | अहमदनगर | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ८. | सोलापूर | – | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | १ मराठी अ.वि. जोडलेले | – | – |
| ९. | रायगड | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १०. | कोल्हापूर | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| ११. | रत्नागिरी | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १२. | सातारा | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १३. | सांगली | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १४. | औरंगाबाद | – | १ अ.वि. सलग्न | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

१९६०-६१ ते १९८६-८७ मधील अध्यापक विद्यालयाची संख्या

| अनुक्रमांक | जिल्ह्याचे नाव | उर्दू | | गुजराथी | | इंग्रजी | | हिंदी | | सिंधी | | कन्नड | | तेलगू | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ | ६०-६१ | ८६-८७ |
| १५. | परभणी | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १६. | बीड | – | २(१ अ.वि. सलग्न) | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १७. | नांदेड | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १८. | उस्मानाबाद | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९. | लातूर | – | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २०. | जालना | – | १ अ.वि. सलग्न | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २१. | सिंधुदुर्ग | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २२. | अमरावती | १ | १ अ.वि. सलग्न | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २३. | बुलढाणा | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २४. | अकोला | | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २५. | यवतमाळ | | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| २६. | नागपूर | – | ३ | – | – | – | २ अ.वि. सलग्न | १ | १२ (५ अ.वि. सलग्न) | – | – | – | – | – | – |
| २७. | वर्धा | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| २८. | भंडारा | – | – | – | – | – | – | – | ३ (२ अ.वि. सलग्न) | – | – | – | – | – | – |
| २९. | चंद्रपूर | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ३०. | गडचिरोली | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**महाराष्ट्रातील एस. एस. सी. परीक्षेतील उत्तीर्ण होणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची परिस्थिती**

महाराष्ट्रातील मार्च १९८७ मध्ये एस. एस. सी. परीक्षेस अल्पसंख्याक विद्यार्थी किती बसले, त्यापैकी किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले याची आकडेवारी तक्ता क्रमांक ७ मध्ये पाहावयास मिळते. या अल्पसंख्याकांमध्ये उर्दू, गुजराती, सिंधी, कन्नड, इंग्रजी, तेलगू माध्यमांच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची आकडेवारी दिसून येते. त्याचप्रमाणे प्रत्येक माध्यमाच्या एकूण बसलेल्या विद्यार्थ्यापैकी किती उत्तीर्ण झाले, त्यांचे शेकडा उत्तीर्णाचे प्रमाण दिसून येते. तसेच मार्च १९८८ मध्ये एस्.एस.सी. परीक्षेत एकूण किती विद्यार्थी बसले त्यापैकी किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले, त्याचे उत्तीर्णाचे शेकडा प्रमाण तक्ता क्रमांक ८ मध्ये नमूद केलेले आहे. या दोन वर्षातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या व उत्तीर्णाचे शेकडा प्रमाण दिसून येते. त्याचप्रमाणे माच १९८७ पेक्षा मार्च १९८८ मध्ये एस.एस.सी. परीक्षेस बसलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. या दोन्ही वर्षातील शेकडा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. एकूण निकालाच्या तुलनेत अल्पसंख्याकांचे उत्तीर्णाचे शेकडा प्रमाण जास्त आहे. मार्च १९८७ व मार्च १९८८ मधील सरासरी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण शेकडा ८५% आहे. यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्याकांसाठी शासनाचे धोरण अनुकूल असून त्यांच्या मातृभाषेला संरक्षण प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.

तळटीप = वरील माहितीबद्दलची आकडेवारी तक्ता क्रमांक १, २ मध्ये पहावी.

तक्ता क्र. ६

## महाराष्ट्रातील एस. एस. सी. परीक्षा मार्च १९८८ मधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची आकडेवारी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण

| अ.क्र. | अल्प संख्याक | पुणे विभाग | | | औरंगाबाद विभाग | | | नागपूर विभाग | | | मुंबई विभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण |
| १) | उर्दू | ४०४० | ३८३० | ९४.३० | २९०७ | २३५९ | ८१.१४ | ४७८५ | ४६४३ | ९७.०३ | ७३११ | ६८७४ | ९४.७१ |
| २) | गुजराती | ६७५ | ६२० | ९१.८५ | — | — | — | ३६२ | ३१४ | ८६.४७ | १३८३१ | १२९६२ | ९३.७१ |
| ३) | सिंधी | ५२० | ५११ | ९८.२६ | — | — | — | — | — | — | १९३३ | १९२७ | ९९.६८ |
| ४) | कन्नड | ७५२ | ६२६ | ८३.२४ | — | — | — | — | — | — | १६९९ | १४७९ | ८७.६५ |
| ५) | इंग्रजी | ११८२८ | १०५४१ | ८७.११ | २०५३ | १६३४ | ७९.५९ | ४११५ | ३५९३ | ८७.३१ | ४३०९४ | .३९९४८ | ९२.६९ |
| ६) | तेलगू | — | — | — | ५६ | २४ | ४२.८५ | ४१ | ३६ | ८७.५० | ४२० | २८३ | ६७.३८ |

तक्ता क्र. ५

## महाराष्ट्रातील एस. एस. सी. परीक्षा मार्च १९८७ मधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची आकडेवारी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण

| अ.क्र. | अल्प संख्याक | पुणे विभाग | | | औरंगाबाद विभाग | | | नागपूर विभाग | | | मुंबई विभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शे. उत्तीर्ण प्रमाण |
| १) | उर्दू | ३५२९ | ३२०७ | ९०.८७ | २३९७ | १६७१ | ६९.७१ | ४०८३ | ३९२१ | ९६.०३ | ६७४५ | ६४३५ | ९५.४० |
| २) | गुजराती | ६१५ | ४९९ | ८१.१३ | — | — | — | ३२४ | १८९ | ५८.३३ | १३७०९ | १२५९६ | ९१.८८ |
| ३) | सिंधी | ५१२ | ५०६ | ९८.८२ | — | — | — | — | — | — | १९८१ | १९६७ | ९९.२९ |
| ४) | कन्नड | ६७५ | ५६१ | ८३.११ | — | — | — | — | — | — | १६५१ | १४३४ | ८६.८५ |
| ५) | इंग्रजी | १०५८५ | ८९६२ | ८४.६६ | १८०६ | ११८७ | ६५.७२ | ३५८७ | २८७५ | ८०.७० | ४०१४९ | ३५७२१ | ८८.९७ |
| ६) | तेलगू | १६ | १४ | ८७.५० | ६७ | ४८ | ७१.६४ | ३८ | २४ | ५२.६३ | ४७१ | ३२९ | ६९.८५ |

## महाराष्ट्रातील अल्पसंख्यांकाचे जादा संख्या असणारी शहरे

| क्र. | अल्पसंख्यांक | शहरांची नावे |
|---|---|---|
| १. | उर्दू | भिवंडी, मालेगांव, अकोला, अमरावती, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नासिक, ठाणे, यवतमाळ, रायगड, रत्नागिरी |
| २. | गुजराती | मुंबई, ठाणे |
| ३. | सिंधी | पिंपरी, उल्हासनगर, |
| ४. | कन्नड | दक्षिण सोलापूर |
| ५. | इंग्रजी (ख्रिश्चन) | मुंबई, पुणे, अहमदनगर |
| ६. | तेलगू | चंद्रपूर, गडचिरोली |

# EDUCATION FOR EQUALITY
# EDUCATION OF THE MINORITY

**Mr. BEJON N. DESAI**

## PROLOGUE

Equal opportunity for educational pursuits is to be made available to each and every inhabitant of India from his early age. This is based on the Indian Constitution framed at the time when India became free and Independent.

## HISTORICAL BACKGROUND

Before freedom this opportunity was only available to a privileged few who could afford to spend on its pursuits. Thus, during the early years of the British Rule in India, a very small percentage of the Indian population could afford to be literate or educated. The word 'Literacy' envisages 3 basic learning skills i.e. Reading ; Writing and Counting while the word " Education" has a wider conotation that encompasses Primary, High School and University learning with the addition of the training in several skills where 3 H i.e. Head, Heart and Hand are also involved.

The later half of the 19th Century and the first three decades of the 20th Century did give us a picture of qualitative education in India but it was made available to a very few citizens of our country.

Millions of citizens in India then remained illiterate. It was a dismal picture for the majority of the Indian people. Even when Lord Macaulay had his designs to educate Indian people; it was only for the purposes of creating 'Babus' and 'Karkoons' (Clerks) in large number and to distract them from the pursuits of higher learning.

The British Rule had subtle and dubious ways of ruing India by dividing its people. It was during this regime that minorities, Schedule Castes and backward class people ware so divided and kept behind to enable the 'Raj' to have smooth sailing. Very many times minorities were pampered for this ulterior motive only and hence as a result some hundreds of languages and dialects of India on one side and so many religions professed in India on the other side veritably helped the British Government then to divide and rule our country.

## ARTICLES 29 AND 30 OF THE INDIAN CONSTITUTION

At the time of framing the Constitution of Independent India, the authors of the constitution kept this atrocious pattern of the British Raj in their mind and so very sagaciously included articles 29 and 30 in the Constitution of our Independent Country.

### Article 29

**Protection of Interests of Minorities**

(1) Any sectios of the citizens residing in the territory of India or any part thereof having a distinct language, script or culture of its own, shall have the right to conserve the same.

(2) No citizen shall be denied admission into any educational institution maintained by the State or receiving aid out of State funds on grounds of religion, race, caste, language or any of them.

### Article 30

**Rights of minorities to establish and administer educational Institutions**

(1) All minorities, whether based on religion or language, shall have the right to establish and administer educational Institutions of their choice.

(2) The State shall not, in granting aid to educational Institutions,

discriminate against any educational Institution on the grounds that it is under the management of a minority, whether based on religion or language.

**What is a Minority Institution?**

Minority Institution means an Institution established and administered by a minority having the right to do so under clause (1) of Article 30 of the Constitution of India.

Some elucidation was sought by the U.P. Minorities via its letter No. MC/1814/85 dated 31.10.85. To which suitable and categorical answers were given by the Minorities Commission of India alongwith the supporting references attached thereto.

An attempt here is made in this paper to explain some salient points especially arising out of Article 30 of the Indian Constitution in the light of the suggested answers given by the Minorities Commission of India.

**Some salient**
**Points arising out of Articles 29 and 30 of the Constitution of India**

"Educational Institution of their choice" in Article 30 also includes an Institution for providing technical or professional education to the children of minorities. 1

The word "establish" in Article 30 (i) does not mean that educational Institution should be brought into existence exclusively by members of a minority community and the association of a few persons, not belonging to that minority, will not alter the minority character of the educational institution. 2

The acceptance of any donation from a few persons, belonging to a community other than the minority community establishing an educational institution does not mean that it was not established by that minority. 3

The word 'administration' in Article 30 does not mean that the management of a minority educational Institution should be composed exclusively of persons belonging to that minority. Association of a few persons not belonging to that minority with the management of such an institution will not alter its minority character. 4

If the membership of the society establishing a minority Institution is not restricted exclusively to the persons belonging to that minority, it will not cease to be a minority educational Institution; so long as effective majority of membership remains with that minority.

It is necessary for an educational institution established under Article 30 that the society's Memorandum of Association should specify that the Institution is meant for the benefit of the minority establishing it. 5

If the Memorandum of Association of the Rules of the Society managing an educational institution say that an Institution has been established for secular education of the students of a particular minority community as well as others, then it will be necessary to establish a nexus between the purpose of establishing that institution and the interests of that particular commnity. 6

It is not necessary for the society establishing a minority educational Institutions to seek the approval of the State Government for any amendment's in its rules, regulations or bye-laws framed for running that institution in addition to the procedure followed for such amendment's under Socirties Registration Act, 1960. Any provision which requires such approval to any amendment of rules designed to govern the running of the institution will conflict with the fundamental rights guaranteed by Article 30 (i). No rule requiring such approval can, therefore, be made.

It is not permissible for the State Government to impose un reasonable restrictions on the powers of management in minority educational Institutions. 7

The State Government or the Universities are not empowered to prescribe the manner in which the Governing Body or Council of Management of a minority institution should be constituted; but there could be no objection if they lay down general guidelines to ensure that only persons of proven integrity and academic experience find a place in such Governing Bodies. 8

The State Government or the University is not empowered to comple a minority educational institution to include one or more members of its choice in the management of the Institutions. 9

The State Government or the University is not empowered to require a minority educatinal institution to seek its approval of the management or any change made in it.

The State Government or the University it not empowered to require a minority educational Institution to prescribe a Selection Committee, consisting of outside members also, for the appointment of teaching and nonteaching staff of the Institution. However, there could be no objection if they lay down general guidelines as to the minimum qualifications and academic experience for the Members constituting a Selection Committee. 10

The State Government or the University is not empowered to require a minority educational institution to seek its approval in the matter of appointment or disciplinary action against any member of teaching or nonteaching staff of the Institution. 11

The State Government or the University is not empowered to reserve a certain percentage of vacancies of teaching or non-teaching staff of minority educational institutions for scheduled caste / sche duled Tribe candidates. 12

The State Government or the University is empowered to prescribe such regulations regarding the Management of the working capital of the minority managed educational institutions, as are

necessary to ensure the application of such funds, only on bonafide educational needs of the institution concerned.

Where a Trust manages several institutions besides the Educatinal Institution, it would be lawful for the Government or the University to require inspection of records and accounts of the Trust not pertaining to the educational institution in order to satisfy itself that unlawful diversion of funds from educational to non-educational institutions has not taken place.

The State Government or the University is not empowered to prescribe rules placing serious restrications on the freedom of minority educational Institutions to make admission of students according to their choice.

The State Government or the University is not empowered to reserve a certain percentage of the intake of students in a minority educational institution for students belonging to Schedule Caste/ Schedule Tribe. 13

The State Government or the University is not empowered to prescribe the medium of instruction to be followed by a minority educational Institution. However, in case of grant-in-aided institutions, they can insist on provision for imparting education also in the official language of the State at Secondary / Collegiate level. 14

**EPILOGUE :**

Thus, it can be seen from the stipulations laid down by Articles 29 and 30 of the Indian Constitution that Minority Educational Institutions are most well-protected.

Very many times, it is observed that some managements of some minority educational institutions take the fullest advantage of the facilities accorded to them under the Indian Constitution, Whilst

some managements do not even know that they come under the category of Minority Educational Institutions and thus have remained without even getting their names registered with the educational authority of their area as required by law.

Hence, it is hoped that most of the doubts and queries that arise into the mind of the management people of very many minority institutions will be considerably assuaged and answered through this monograph.

Supporting References to the Case Law per each salient point explained by the Minorties Commission of India.

1. Ahmedabad St. Xavier's College Society Vs State of Gujarat AIR 1974-SC 1389

2. S. K. Patro Vs State of Bihar - AIR 1970 - SC 259

3. Methodist Boys' H.S. School V/s Director of public Instruction A. P . - LJ 1963 - Vol - II Andhra - 490

4. Punjab University Vs Khalsa College- AIR 1971 P & K 479

5. Supreme Court's Judgement in the case of State of Kerala V/s Mother Provincial - AIR 1970 /SC/2079

6. Chikkala Samuel Vs Dist. Education Officer A.P. - AIR 1983 AP 64

7. Ahmedabad St. Xavier's College Society Vs State of Gujarat - AIR 1974 - SC/ 1389

8. State of Kerala Vs Mother Provincial - AIR 1970 - SC / 2079

9. Supreme Court's decision - in the case of D A V College,

Jullender Vs State of Pubjab - AIR 1971 - SC/1737

10. Ahmedabad St. Xavier's College Society Vs State of Gujarat AIR 1974 - SC/1389- Sec. 33 A- Gujarat University Act

11. DAV College Jullender Vs State of Pubjab AIR 1971 - SC / 1737 - Section 19 of Guru Nanak University Amritsar.

12. Director of School Education Tamil Nadu V/s Arogiasami AIR 1971 - Madras / 44

13. Sidhrajbhai Vs State of Gujarat - AIR 1963 SC / 540

14. The State of Bombay V/s Bombay Education Society - AIR 1954 - SC/561

# समानतेसाठी शिक्षण-अल्प संख्याकांचे शिक्षण

श्री. सुखदेवसिंग

**प्रास्ताविक :-**

शिक्षणाने भारतीय समाजात समानता प्रस्थापित करता येते याची प्रचीती शंभर टक्के आलेली आहे. पण ही समानतेची संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणताना अनेक समस्या व अडचणी येतात. उदाहरणार्थ स्त्रिया, आदिवासी मागासवर्गीय व अल्पसंख्याक यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिल्यास भारतीय समाजात सर्व बाबतीत समता हे लक्ष्य गाठणे सहज शक्य होईल असा विश्वास वाटतो.

**अल्संख्याक :-**

भारतासारख्या खंडप्राय देशात जे लोक (निवासी) संख्येने कमी आहेत अशा लोकांना "अल्पसंख्याक" म्हणून भारतीय राज्य घटनेत संबोधिले आहे. तर जे लोक संख्येच्या दृष्टीने जास्त प्रमाणात आहेत अशा लोकांचा बहुसंख्याक म्हणून उल्लेख केला जातो.

**भारतीय अल्प संख्याक :-**

भारतात लोकसंख्या धर्माच्या निकषावर मुस्लीम, शीख, ख्रिस्ती, जैन, नवबौद्ध व पारसी ही सर्व धर्मीय लोक भारतीय अल्पसंख्याक म्हणून मान्यता पावलेली आहेत

**भारतीय अल्पसंख्यांकांची संख्या :-**

आज भारतात एकूण लोक संख्येपैकी (१९८१ च्या जनगणनेनुसार) सर्व धर्मीय अल्पसंख्याक १७.४ टक्के आहेत. १७.४ टक्क्यांपैकी मुस्लीम ११.४ टक्के, ख्रिस्ती २.४ टक्के शीख २ टक्के, नवबौद्ध ०.७ टक्के तर जैन ०.५ टक्के अशी लोकसंख्या आहे.

**अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक समस्या :-**

१. काही अल्पसंख्याक गट हे शिक्षणापासून वंचित आहेत. किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत.

२.	काही अल्पसंख्याकांना त्यांच्या मातृभाषेतून माध्यमिक शालांत परीक्षेपर्यन्त शिक्षण मिळते. पण पुढे उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्याची सोय नाही. त्यामुळे त्यांची महाविद्यालयीन शिक्षणाच्या संदर्भात कुचंबणा होते. त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास अडसर निर्माण होतो. ते उच्च शिक्षणापासून वंचित राहून त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. उदा :- मुस्लीम धर्मियांना शालांत परिक्षेपर्यन्त उर्दू माध्यमातून शिक्षण घेता येते. पण महाविद्यालयीन शिक्षणाबाबत उर्दू माध्यमाची सोय फारशी आढळत नाही. कदाचित एखाद्या ठिकाणी तशी सोय असली तरी त्या माध्यमातून त्या पाठ्य पुस्तकांची वाणच आहे. त्यामुळे सहाजिकच मुस्लीम विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतो.

३.	सर्वच अल्पसंख्याकांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळण्याची सोय अजूनही पूर्णपणे झालेली नाही.

४.	अल्पसंख्याक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षकांची कमतरता आहे.

५.	अल्पसंख्याकांच्या भाषांमध्ये सर्व वर्गांची व विषयांची पुरेशी पाठ्य पुस्तके उपलब्ध नाहीत. काही जरी मुद्रित केली असली तरी त्या शैक्षणिक गुणवत्तेच्या संदर्भात त्रुटीच वाटते.

६.	अल्पसंख्याक समाजातील भाषा शिक्षक जास्त प्रमाणात प्रशिक्षण दिलेले नाहीत त्यामुळे अध्यापनात कमतरता राहते.

७.	अल्पसंख्याक समाज (विविध प्रकारचे) भारतात निश्चित अशा एकाच भूभागावर स्थायिक नाहीत. त्यामुळे त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यास फार मोठी अडचण येते. तर फारच कमी संख्या असलेल्या शहरात, गावात त्यांच्या साठी शिक्षणाची सोय उपलब्ध करणे शासनास किंवा त्या अल्पसंख्याक समाजाला देखील आर्थिकदृष्ट्या अतिशय महागाचे पडते.

८.	बहुतेक अल्पसंख्याकांचे बहुधा शिक्षणाकडे दुर्लक्षच जास्त आहे असे दिसून येते.

९.	अल्पसंख्याक समाजातील ज्या काही सेवाभावी संस्था आहेत त्या देखील अल्पसंख्याकांच्या शिक्षणाच्या बाबतीत फारशा कार्यरत दिसत नाहीत.

१०.	भारतीय राज्य घटनेत कलम २९, ३० व ३५० या मध्ये अल्पसंख्याकांना शैक्षणिक अधिकार दिलेले आहेत. पण बहुतेक अल्पसंख्याक गटांना ह्या राज्य घटनेतील शैक्षणिक अधिकाराची माहिती देखील नाही.

११. राष्ट्रीय स्तरावर प्रामुख्याने मुस्लीम व नवबौद्ध समाज हे शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेले आहेत.

१२. मुस्लीम समाज मुलांना व मुलींना उच्च शिक्षण देण्याच्या बाबतीत उदासीन दिसून येतो.

१३. नवबौद्ध हा समाज मागासवर्गीय अल्पसंख्याक गट आहे. तो सध्या एक विचित्र अशा कात्रीत सापडला आहे. कारण त्या समाजाला नवबौद्ध म्हणवून घेतले तर शैक्षणिक सवलती मिळत नाहीत. जर हिंदू धर्मातील महार ही जात म्हटले तर सवलती मिळतात हा समाज हिंदू म्हणून बहुसंख्याक आहे की नवबौद्ध म्हणून अल्पसंख्याक ह्या वादामुळे देखील या समाजाची शैक्षणिक हानी होत आहे.

१४. काही अल्पसंख्याक गट अजूनही ह्या देशाशी एकनिष्ठ वागताना दिसत नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेत बाधा येताना दिसते.

१५. काही अल्पसंख्याक अतिशय दरिद्री व आर्थिकदृष्ट्या अतिशय दुर्बल आहेत त्यामुळे ते पुरेसे शिक्षण घेऊ शकत नाहीत.

१६. अल्पसंख्याक समाजाच्या भाषेमध्ये तंत्र शिक्षणाची पुरेशी सोय नाही, त्यामुळे ते तांत्रिकदृष्ट्या मागे आहेत.

१७. पंजाबमध्ये बहुसंख्य शीख स्थायिक असल्यामुळे त्यांच्यासाठी उत्कृष्ट शिक्षणाची संधी राज्य सरकार व केंद्र सरकार यांना उपलब्ध करून देता आल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती प्रशंसनीय आहे. पण भारतात पंजाबच्या व्यतिरिक्त इतर राज्यांत विखुरलेल्या शीख समाजाची शैक्षणिक प्रगती मात्र अतिशय निकृष्ट, दर्जाची पहावयास मिळते. ही वास्तविक-दृष्ट्या एक शोकांतिका आहे.

१८. अल्पसंख्याकासांठी त्यांच्या भाषेतील पुरेशी ग्रंथालये व वाचनालये यांची सोय नाही.

**अल्पसंख्याकांच्या शिक्षणासाठी काही उपाय :-**

१. अल्पसंख्याक समाजाला महाविद्यालयीन शिक्षणाकरिता त्यांच्या भाषेच्या माध्यमाची प्रत्येक महाविद्यालयात सोय केली पाहिजे. जेणे करून ते उच्च शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत.

२. संविधानातील शैक्षणिक अधिकाराबाबत अल्पसंख्याकांना शासनाने व सामाजिक कार्यकर्त्यांनी जाणीव करुन द्यावी व जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी त्यांना प्रेरित केले पाहिजे. व अल्पसंख्याकांना राष्ट्रीय विकासात्मक कार्यक्रमामध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे.

३. भाषिक अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक सोयी बाबतची माहिती संकलित करण्याचे काम राज्य सरकारने व सामाजिक संस्थांनी त्वरित हाती घेतले पाहिजे.

४. अल्पसंख्याक समाजाच्या भाषाविषयक शिक्षकांच्या जागा मंजूर करणे, त्यांच्या नियुक्त्या करणे, ह्या नियुक्त्या करताना विलंब टाळणे यासाठी राज्य शासनाने त्वरित पाऊल उचलून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली पाहिजे.

५. अल्पसंख्यांक भाषांमधील विविध विषयातील पाठ्य पुस्तके विषय तज्ज्ञांकडून तयार करणे, ती मुद्रित करण्यासाठी मुद्रण सुविधांची व्यवस्था ही जबाबदारी राज्य सरकारने घेऊन ती अंमलात आणली पहिजे.

६. अल्पसंख्याक भाषा विषयांच्या शिक्षकांसाठी सरकारने प्रशिक्षणाची सोय केली पाहिजे.

७. अल्पसंख्याकांची दाट वस्ती असलेल्या जिल्ह्याकडे विशेष लक्ष पुरवून अल्पसंख्यांक समाजातील मुलांना प्रवेश देण्याच्या बाबतीत सोयीचे होईल अशा प्रकारे शाळांसाठी ठिकाण राज्य शासनाने निश्चित केले पाहिजे.

८. विशेषत्वे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांची गरज पुरवण्यासाठी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळांमधून विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

९. शैक्षणिक धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या तांत्रिक व व्यवसायिक शिक्षणाच्या सर्व कार्यक्रमांचा पूर्णांशाने लाभ अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्थांना मिळेल अशी शासनाने व्यवस्था केली पाहिजे.

१०. अल्पसंख्याक समाजातील कारागिरांचे प्रमाण जास्त असलेल्या भागात हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करून त्या संस्थामध्ये ८५ टक्के जागा ह्या कारागिरांच्या मुलांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत.

११. ज्या जिल्ह्यात अल्पसंख्याकांचे प्रमाण अधिक आहे त्या जिल्ह्यात विशेष करून

मुलींसाठी हस्त व्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या पाहिजेत. या केंद्रांतून प्रामुख्याने स्त्री शिक्षिका राज्य सरकारने नेमल्या पाहिजेत.

१२. अल्पसंख्याक असलेल्या भागात त्यांच्या भाषेतून उपलब्ध असलेली ग्रंथालये व वाचनालये स्थापन करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार व सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे.

१३. नवबौद्ध हा मागासवर्गीय अल्पसंख्याक समाज आहे. त्यामुळे त्यांना नवबौद्ध म्हणून केंद्र सरकारने सवलती मंजूर केल्या पाहिजेत.

१४. नवबौद्ध या मागासवर्गीय अल्पसंख्याक समाजातील मुलांसाठी व मुलींसाठी इयत्ता १ली पासून केंद्र सरकारने जी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे ती प्रत्यक्षात व त्वरित अमलात आणली पाहिजे.

१५. नवबौद्ध समाजात मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे. म्हणून मुलींच्या शाळा जास्त प्रमाणात सुरू करणे, स्त्री शिक्षकांच्या नेमणुका करणे, मुलींची वसतिगृह सुरू करणे आणि मधल्या वेळचे जेवण, कपडे पुरविणे, पुस्तके व वह्या पुरविणे ह्या गोष्टी राज्य शासनाने केल्या पाहिजे.

थोडक्यात भारतातील अल्पसंख्याक समाजामध्ये शासनाने बहुसंख्याक धार्मीक गटाने व कार्यकर्त्यांनी असा विश्वास निर्माण केला पाहिजे की त्यांना असे वाटले पाहिजे की, येथील शासन व बहुसंख्याक गट आपणांस सापत्न भावाने किंवा दुजा भावाने वागवीत नाही, तर सर्वांबरोबर शिक्षणाची समान संधी देण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. असे त्यांना वाटले तर राष्ट्रीय एकात्मतेसाठी व राष्ट्रीय विकासासाठी हे साहाय्यक, उपयुक्त उपकारक ठरेल अशी आशा करावयास हरकत नाही.

# "समानता के लिए शिक्षा अल्पसंख्यों के लिए शिक्षा"

एम. ए एच. अन्सारी

**अल्पसंख्यक - राष्ट्रीय शिक्षानीति ८६ में :**

सर्व प्रथम हम यह स्पष्ट करें कि "अल्पसंख्यक" से क्या अभिप्राय है। अल्पसंख्यक धर्म के अनुसार हो सकते है, भाषा के अनुसार हो सकते है, क्षेत्र के अनुसार हो सकते है, सम्प्रदाय के अनुसार हो सकते है। प्राय: अल्पसंख्यक से अभिप्राय धार्मिक अल्पसंख्यक होते है।

राष्ट्रीय शिक्षा नीति। नैशनल पॉलिसी फोर ऐज्युकेशन १९८६ के विभाग ४ "समानता के लिए शिक्षा" के अनुच्छेद ४.८ के उप-शीर्षक अंतर्गत लिखा हुआ है: -

"कुछ अल्पसंख्यक समूह शिक्षा के लिहाज से पिछडे हुए अथवा शिक्षा से सर्वथा वंचित है। समानता और सामाजिक न्याय की मद्देनजर रखते हुए इन समूहों को शिक्षा पर अधिक ध्यान दिया जाएगा। इस में प्राकृतिक रूप से संविधान में दी गई वह जमानतें भी शामिल होंगी, जिन की मदद से वे अपनी शैक्षणिक संस्थाएँ न केवल स्थापित कर सकते है, अपितु इसका इंतिजाम (व्यवस्था) भी कर सकते है। साथ ही अपनी भाषा और संस्कृती का संरक्षण भी कर सकते है। पाठ्य-पुस्तकों की तैयारी और शाला की सभी सरगर्मियों में ऑब्जेक्टीवीटी (वस्तुनिष्ठता) का प्रतिबिंब होगा और ऐसी एकता को प्रोत्साहन देने के लिए समस्त संभव कदम उठाए जाएंगे जो केंद्रीय पाठ्क्रम के अनुरूप हों। ये बातें राष्ट्रीय उद्देश्यों और आदर्शों के मूल्यों पर आधारित होंगी। (उर्दू से स्वतंत्र अनुवाद)

ऊपर लिखी हुई नीति के अनुसार यह बात स्पष्ट होती है कि अल्पसंख्यक से अभिप्राय कोई विशिष्ट सम्प्रदाय या धर्म या भाषाई समूह नही है। शायद इसीलिए रामकृष्ण मिशन वाले भी अब अपने आप को अल्पसंख्यक कहते है। उन्होंने कलकत्ता हाईकोर्ट से अपने पक्ष में निर्णय करा लिया है कि उन का संबंध हिन्दू बहुसंख्यक से नही है बल्कि वह "गैर हिन्दू धार्मिक अल्पसंख्यक" से संबंध रखते है। अब तो सामान्य हिन्दू भी अल्पसंख्यक अधिकारों से लाभान्वित हों रहे है। पंजाब, कश्मीर, मोजोराम और नागालैंड जैसे राज्यों में हिन्दू अल्पसंख्या में होने के कारण अल्पसंख्यक अधिकार से फायदा उठा रहे हैं। अभी वर्तमान स्थिति में कर्नाटक में मराठी बोलने-वाले और महाराष्ट्र में गुजराती,

कन्नड और तामिल बोलने वालों ने भाषाई अल्पसंख्याक का दर्जा हासिल करके वे समस्त अधिकार प्राप्त कर लिए है जो अल्पसंख्यक शिक्षा-संस्थाओं को प्राप्त हैं। इसिलिए हिन्दुओं की बहुसंख्या अल्पसंख्यक का दर्जा हासिल कर चुकी है। संदर्भ:" आमोजगार" मासिक सितंबर 86 --अकबर रहमानी

**२. अल्पसंख्यकों में समानता के लिए शैक्षणिक जाग्रति उत्पन्न करने की अहमियत पर जोर :**

आइए, अब हम उन बातों और समस्याओं पर विचार करें जो शैक्षणिक रूप से पिछडे या शिक्षा से वंचित अल्पसंख्यक हैं।

सब से पहले यह कोशिश की जाए कि अल्पसंख्यकों में शिक्षा के प्रति रुचि उत्पन्न हो । शैक्षणिक जागृति पैदा करने के लिए हमें उन समस्त साधनों का उपयोग करना चाहिए जो ऐसे अवसरों के लिए शिक्षा– विदों ने बताए हैं । उदाहरणार्थ

१. इन अल्पसंख्यकों को शिक्षा की महत्ता समझाए,
२. इन अल्पसंख्यकों के पढ़े लिखे लोगों के अच्छे जीवन से उदाहरण दे ।
३. लिख-पढ लेने से इन के बच्चों में किस प्रकार के परिवर्तन होते है, उन की तरफ इशारा किया जाए।
४. शिक्षा-प्राप्ति में इनके परिवारिक व सामाजिक जीवन पर क्या प्रभाव पड़ता है।
५. शिक्षा में इनके पैतृक धंधे पर कौन-कौन से प्रभाव पड़ते हैं ।
६. शिक्षा प्राप्ती के पश्चात पैतृक धंधे के अतिरिक्त कोई अन्य धंधा अख्तियार करने से इनके जीवन-स्तर में क्या परिवर्तत होता है आदि ।

**३. अल्पसंख्यकों में शैक्षणिक प्रवृत्ती उत्पन्न करने के लिए विभिन्न उपायों का इस्तेमाल :**

अल्पसंख्यक की जब शिक्षा से दिलचस्पी पैदा हो जाए, उन में शिक्षा के प्रति जागृति उत्पन्न हो जाए, तो उन्हे शनै:-शनै: और श्रेष्ठ शिक्षा की ओर रुजहान धीरे-धीरे हो, अन्यथा शिक्षा के आगे के मार्ग में विघ्न उत्पन्न होने का भय रहेगा ।

शिक्षा के लिहाज से अल्पसंख्यक समूह में शिक्षा के प्रति उत्साह पैदा करने के लिए दबाव नीति न अपनाई जाए। घर और परिवार के माहोल में सुधार हो। नए माहोल से परिचय कराया जाए। शासन या सरकारी शिक्षा कोई विभिन्न साधनों की अपना कर शिक्षा से दिलचस्पी पैदा कर सकता है । वे साधन निम्नलिखित है :–

१. जनता में जागृति उत्पन्न की जाए,
२. नई मुहिम चलाई जाए,
३. सभा-समितियों का आयोजन किया जाए ।

इन से अल्पसंख्यक छात्रों में आत्मविश्वास पैदा होगा तथा स्वयं को पहिचानने के भावोंको उत्पत्ति होगी।

**४. समानता के लिए शिक्षा -- के.जी. और प्रायमरी शिक्षा का महत्त्व**

प्राथमिक शिक्षा से पूर्व के.जी.की शिक्षा अल्पसंख्यकों के लिए अत्यंत आवश्यक है । अल्पसंख्यक समूह से संबंधिक पालक के.जी.की अहमियत नहीं समझते हैं । उसकी अहमियत समझा कर उनके बच्चों को के.जी. की शिक्षा की ओर प्रवृत्त किया जाए । के.जी. की शिक्षा उन बच्चों के लिए भी उतनी ही लाभदायक और कारामद है जितनी बहुसंख्यक समूह के बच्चों के लिए । के. जी के बाद ही बच्चों को प्राथमिक शिक्षा के प्रति उत्साह और दिलचस्पी पैदा होगी । यह दिलचस्पी उनके भावी शैक्षणिक जीवन के लिए आधार 'बुनियाद' सिद्ध होगी ।

**५. अल्पसंख्यकों के अंध-विश्वास और गलत धारणाओं को समूल नष्ट करना :**

अल्पसंख्यकों के कुछ विशष्ट रीति रिवाज, विचार और दृष्टिकोन होते हैं । उन के बच्चों के दिमाग में इन से संबंद्ध समस्त बातें धीरे-धीरे जड़ पकडती जाती है । इन में कुछ विचार धाराएँ आज के जमाने के लिहाज से उपयुक्त नहीं होती । यह गलत विचारधाराओं पर आधारित होती है । ऐसे विचारों, विचारधाराओं, दृष्टिकोण पैदा करने का प्रयत्न किया जाए ताकि उनके बच्चे बहुसंख्यकों के बच्चों के मानसिक स्तर पर पहुँच जाए, उन में अच्छे संस्कार पैदा ही।

**६ जीवन के बदलते मूल्यों के अनुसार अल्पसंख्यकों के लिए शिक्षा की व्यवस्था**

जीवन पद्धतियाँ और उनके मूल्य बदलते जा रहे है । बदलते मूल्यों व तरिकों को सामने रखते हुए अल्पसंख्यकों को शिक्षा दी जाए ताकि वे बहुसंख्यकों का मुकाबला कर सकें, उनके बराबर आ सकें। इन बदलते मूल्यों के अनुरूप उनके लिए शिक्षा का प्रबंध न हो सका तो ये अल्पसंख्यक और भी पिछड जाएँगे । इनका पिछड़ापन बहुसंख्यकों के लिए लज्जा की बात होगी ।

यदि उनके गुणों का विकास न हुआ तो न केवल ये स्वयं के लिए बल्कि देश के लिए भी किसी काम के न रहेंगे। देश पर बोझ रहेंगे । जैसे-जैसे जीवन पद्धतियाँ बदल रही है, उस से कहो तेज रफ्तारी से भौतिक व औद्योगिक उन्नति हो रही है । यंत्र-उपकरणों और मशिनरियों में तरक्की हो रही है । इन नवीन यंत्र उपकरणों और मशिनरियों से यदि अल्पसंख्यकों को अवगत न कराया गया तो ये पिछडे ही रह जाएँगे । इन्हें इस प्रकार शिक्षा दी जाए कि वे कृषि के अपने पैतृक-पेशे में नवीनीकारण द्वारा नई-नई मशीनों का

इस्तेमाल सीखे, इन्हें बरते । इन मशीनों-यंत्रों के इस्तेमाल के प्रशिक्षण के लिए शासन की ओर से विशेष प्रबंध होना चाहिए । जीवन के बदलते मूल्यों से मुताबिकत पैदा करने के लिए इन्हें इस प्रकार प्रशिक्षित किया जाए कि ये नए क्षेत्रों और नए पेशों में एकरूप हो जाए ताकि नए क्षेत्रों में नए पेशों के अपनाने में हिचकिचाहट महसूस न करें।

**७. बहुसंख्यक छात्रा अल्पसंख्यक-छात्रों से अपमानजनक व्यवहार न करें :**

अल्पसंख्यकों में समानता लाने के लिए उनके बच्चों को उन स्कूलों शालाओं मे प्रवेश दिया जाए जहाँ बहुसंख्यकों के बच्चे शिक्षा प्राप्त करते हैं। इस प्रकार उनमें आपसी मेलजोल पैदा होगा, इक-दूसरे से परिचय व जानकारी बढ़ेगी और शिक्षा में समानता आएगी । यहाँ यह बात ध्यान देने योग्य है कि ऐसे स्कूलों में बहुसंख्यक समूह से संबंध रखनेवाले छात्र अल्पसंख्यकों के बच्चों की खिल्ली न उड़ायें, उनके धर्म व रीति रिवाजों पर कीचड न उछालें, उनकी जात बिरादरी जाति को बुरा-भला न कहें और न ही उनकी अज्ञानता ओर नासमझी का मजाक बनाएँ। अन्यथा ये बच्चे तंग आकर शिक्षा बीच में ही छोड़ देंगे।

**८. अल्पसंख्यक छात्रों के पालकों में शैक्षणिक जागृति :**

शिक्षा में पिछ्डे अल्पसंख्याकों के पालकों में शिक्षा के प्रति जागृति पैदा की जाए, उन्हें उत्साहित किया जाए। उन में सोच विचार की वह क्षमाताएँ नहीं होती जो बहुसंख्यकों के पालको में होती हैं। इसलिए पालकों में शिक्षा का प्रसार करने के लिए प्रौढ शिक्षा का सिलसिला विशेष रूप से शुरू किया जाए । ऐसा न करने की सूरत में अल्पसंख्यक समाज पिछड़ा ही रह जाएगा । ऐसे समाज को शिक्षा के लिहाज से जागृत ओर तैयार करना होगा ताकि समाज की बदलती आवश्यकताओं के अनुसार जीवन भी बदले और उनमें नए विचार भी पैदा हों । शिक्षाविदों का कहना है कि पालकों को शिक्षा न मिलने से उनके बच्चों को भी नई शिक्षा नहीं मिलती । इसलिए शिक्षा में समानता लाने के लिए पालकों को भी शिक्षित करना आवश्यक है ।

**९. सामूहिक व नियमबद्ध प्रयत्न :**

शिक्षा में पिछड़े अल्पसंख्यकों को ऊँचा उठाने के लिए सामूहिक व संगठित प्रयत्न करना चाहिए । शिक्षा शास्त्रीयों के अनुसार छात्र, पालक, शिक्षक, प्रबंधक और शासन के ऊपर इनकी जिम्मेदारी होती है । शासन ने अल्पसंख्यकों में शिक्षा में समानता लाने के लिए स्कूल और शालाएँ खोली है । उन का प्रबंध किया है । परंतु पालकों का रवैया उनके बच्चों की शिक्षा के प्रति उदासीन है । उनकी उदासीनता का शिकार बच्चे होते है । बच्चों मे शिक्षा की कमी के कारण अल्पसंख्यकों को बहुसंख्यकों के बराबर नही लाया जा सकता । इसलिए सामूहिक प्रयत्न में उक्त पाँचों अंग एक-दूसरे से ताल-मेल रखकर काम करेंगे तभी समानता पैदा होगी ।

## १० शिक्षा विभाग का उत्तरदायित्व

अल्पसंख्यकों को शिक्षा और उनमें समानता लाने के लिए शिक्षा विभाग महत्वपूर्ण भूमिका निभा सकता है । इसके लिए गावों, पहाडी इलाकों, पिछडी जातियों के इलाकों में क्षेत्रीय समितियाँ बनाकर उनको समस्याएँ मालूम की जाएँ और फिर उनके समाधान के लिए विभिन्न उपायों को काम में लाकर अल्पसंख्यकों में शैक्षणिक समानता लाई जाए। इस कार्य के लिए सामाजिक संस्थाओं का सहयोग भी लाभप्रद सिद्ध होगा।

## ११ मातृभाषा में शिक्षा – अल्पसंख्यकों के विशेष संदर्भ में :

शिक्षा शास्त्रों तथा अन्य बुद्धिजीवी इस बात पर सहमत है कि बच्चों को इनकी मातृभाषा में शिक्षा दी जाए । भारतीय संविधान में भी इसकी जमानत दी गई है । कोठारी आयोग तथा अन्य शिक्षा आयोगों ने भी इस बात पर जोर दिया है। लेकिन खेद की बात है कि किसी आयोग ने यह स्पष्ट नहीं किया है कि वास्तव में छात्रों को किस स्तर तक मातृभाषा में शिक्षा दी जाए । क्या सिर्फ प्रायमरी तक मातृभाषा में शिक्षा देने के बाद आगे की शिक्षा अन्य भाषा प्रादेशिक या अन्य भाषा में देने से छात्रों में लिखने पढ़ने-बोलने और समझने की क्षमता व योग्यता पैदा हो सकती है ? क्या ये छात्र उन छात्रों के मुकाबले में टिक सकते है जिनकी मातृभाषा वही है जो संयोग से उनकी शिक्षा का माध्यम भी है । तब क्या शिक्षा में समानता लाई जा सकती है ? राष्ट्रीय शिक्षा निति ८६ में इस संबंध में वास्तविकता तथा अनुभव पर आधारित रवैया नहीं अख्तियार किया गया है। और न ही इस सिलसिले में प्रमाणित संख्याएँ प्रस्तुत कर कोई स्पष्ट दृष्टिकोन अपनाया गया है। बात प्रमाणित संख्याओं की आ गई है तो सुन लिजिए कि इस संबंध में प्रायमरी और मिडिल स्तर के बारे में जो संख्याएँ हमें बता गए है, वह गलत और भ्रामक है। विचित्र बात है कि १९७२ में · UNESCO, यूनेस्को के कमीशन को भारत में शिक्षा से संबंधित STATISTICAL DATA एकत्र करे की अनुमति नहीं दी गई ।

संदर्भ :– (The Peoples' web on the challlange of education by Dr. A.U.Shaikh (retired) I.A.S Page No. 3

हमारा मत है कि कम से कम उच्च माध्यमिक स्तर तक मातृभाषा में शिक्षण प्रदान करने की व्यवस्था की जाय। जैसा कि अभी हमारे महाराष्ट्र में प्रचलित है और इसके लिए अलग अलग स्कूल भी है । क्योंकि इस स्तर तक पहुँचने के बाद छात्रों में लिखने-पढ़ने, बोलने ओर समझने की योग्यताएँ पैदा हो जाती है और वे मानसिक रूप से आगे की शिक्षा के लिए शिक्षा-माध्यम को बदलने के लिए तैयार हो जाते है, जैसा कि अभी तैयार रहते हैं।

## १२ अल्पसंख्यक छात्रों में ड्रॉप-ऑर्डर और अनुपस्थिती की समस्या तथा उसका समाधान

सांख्यिकी प्रमाणित अंकों से विदीत होता है कि अल्पसंख्यकी तथा पिछड क्षेत्रों के स्कूलों में छात्रों का ड्रॉप आऊट और गैरहाजिरी अधिक रहती है। शिक्षा आयोगों ने इस संबंध में निम्नलिखित कारण बताए है :

सामाजिक – आर्थिक स्थिति Socio-economic condition
शिक्षा विभाग की लापरवाही
निम्न तरीकोंसे ड्रॉपआऊट और गैरहाजिरी को कम किया जा सकता है।

१. अल्पसंख्यकों के बच्चों की शिक्षा नि:शुल्क हो, स्नातकोत्तर स्तर तक, जैसा कि कश्मीर राज्य में है।

२. बच्चों को दोपहर का खाना देने की व्यवस्था हो।
यह गरीब बच्चों के लिए स्कूल में हाजिर रहने के लिए प्रलोभन का काम करेगा।

३. युनिफार्म और किताबें शासन की ओर से मुफ्त दी जाएँ ताकी बच्चे अपने पालकों की गरीबी के कारण युनिफार्म और किताबें न होने से शिक्षा से वंचित न रह जाएँ।

४. बच्चों के पालकों को कुछ इंसेंटिव शासन की ओर से दिया जाए ताकि वे अपने बच्चों को खुशी से स्कूल भेजे और इनके आर्थिक नुकसान की भरपाई भी हो जाए। ऊपर लिखी हुई बातों का इंतिजाम और निगरानी करने के लिए एक ' शासकीय बोर्ड' तो उसमें अल्पसंख्यकों और पिछडे वर्ग का प्रतिनिधित्व करनेवाले सदस्यों की उचित संख्या हो।

५ शैक्षणिक दृष्टि से अल्पसंख्यकों के बच्चों का शैक्षणिक स्तर बहुसंख्यकों के बच्चों के बराबर लाने के लिए अधिक मेहनत ओर कोशिश की जाए।
इस उद्देश्य की प्राप्ति के लिए एक्स्ट्रा कोचिंग लाभदायक होगी।

६. इच्छानुकूल परीक्षाफल प्राप्त करने के लिए तथा शैक्षणिक स्तर को जांचने के लिए समय समय पर घटक परीक्षा और अन्य परीक्षाएँ अत्यंत आवश्यक है।

## १३ नवोद्यालय योजना में अल्पसंख्यकों के लिए विशेष सुविधा रियायत :

नवोद्यालय योजना के अंतर्गत भाषाई अल्पसंख्यक ( Linguistic Minority )

के बच्चों को नवोद्यालय में प्रवेश देने के लिए विशेष छूट होनी चाहिए । भाषाई अल्पसंख्यांकों में उर्दू भाषी भी शामिल है। इसलिए दूसरों के साथ इन के बच्चों की भी प्रवेश में सहूलत मिलनी चाहिए। टेस्ट लेने के बाद जो बच्चे स्टँडर्ड पर पूरे न उतरे तो भी भाषाई अल्पसंख्यक का विचार करते हुए इन बच्चों को किसी न किसी तौर पर प्रवेश दिया ही जाए ताकि अच्छे बच्चों के साथ इन की शिक्षा होने से इनमें, समानता का एहसास पैदा होगा ।

## १४. अल्पसंख्यकों में शिक्षा में समानता के लिए आरक्षण नीति :

उच्च माध्यमिक के बाद उच्च शैक्षणिक वर्ग में प्रवेश के लिए भाषाई अल्पसंख्यांकों के छात्रों की विशेष रियासत ( आरक्षण ) होना चाहिए एस.सी./एस.टी. आदि के लिए जो आरक्षण है, वही आरक्षण अल्पसंख्यकों को जनसंख्या के अनुपात में दिया जाए ताकि अल्पसंख्यक के छात्र बहुसंख्यकों के छात्रों के समान उच्च शिक्षा उन्हीं के साथ प्राप्त कर सकें।

## १५ शारीरिक शिक्षा : ( Physical Education )

शारीरिक शिक्षा के महत्त्व सें कौन इन्कार कर सकता है ? पढ़ाई के साथ-साथ शारीरिक शिक्षा और खेल-कूद तथा अन्य शारीरिक व्यायाम वाले काम छात्रों के लिए अत्यंत आवश्यक है। स्वास्थ्य ठिक न हो तो सही ढंग से पढ़ाई भी नही हो सकती । Sound mind in a sound body वाली कहावत तो सभी जानते हैं। शरीर की दशा ठीक न हो तो मानसिक दशा कैसे ठीक हो सकती है ? इसलिए राष्ट्रीय शिक्षा नीति में शारीरिक शिक्षा को उचित महत्त्व देना जरुरी है ।

छात्रों ( इस में छात्राएँ भी शामिल है ) के लिए ग्राउंड और प्रशिक्षित शिक्षक ( पी.टी.आई) की व्यवस्था शासन के तत्त्वावधान में होना चाहिए। अधिक से अधिक स्कूलों में एन.सी.सी. और स्काऊट आदि के प्रशिक्षण की व्यवस्था होनी चाहिए । इस से हमारे छात्र-छात्राओं में कौमी एकता की भावना बढ़ेगी, वे अनुशासित होंगे तथा देश-रक्षा की भावना को प्रोत्साहन मिलेगा । आवश्यकता पड़ने पर उक्त प्रशिक्षणप्राप्त छात्र देश की सैन्य शक्ति बनेंगे ।

## १६. धार्मिक शिक्षा/नैतिक शिक्षा :

अन्य धर्म या उस के अनुयायियों के प्रति छात्रों में जो आदर-भाव होना चाहिए वह अब शनैः-शनैः लुप्त होता जा रहा है । धर्म के आधार पर दूरियाँ बढ़ती जा रही है। इन दूरियों को निकटता में परिवर्तित करने के लिए जरूरी है कि छात्रों (छात्राएँ भी) को कम से कम उनके अपने धर्म को मौलिक शिक्षा से परिचित कराया जाए। और अगर

हो सके तो भारत के कुछ अहम और बड़े धर्म की मूलभूत बातों की शिक्षा तमाम छात्रों को दी जाए । इस से छात्र-छात्राओं में दूसरे धर्म के प्रति आदर भाव व सम्मान की भावना पैदा होगी और वे उस धर्म के मानने वालों के प्रति सहानुभूति रखेंगे।

देश-प्रेम की भावना उत्पन्न करने हेतु प्राय: सभी धर्म-ग्रंथों में कुछ न कुछ बातें जरूर मिलेंगी । बन्धुत्व और मानवता की शिक्षा भी मिलेगी । इसलिए इसी प्रकार की सभी बातें धार्मिक या अखलाकी शिक्षा की तौर पर पढ़ाई जाएँ। इस शिक्षा की व्यवस्था स्कूल समय से पूर्व या उस के बाद की जा सकती है।

**१७. लड़कियों की शिक्षा :**

लड़कियों की शिक्षा पर लड़कों की शिक्षा की निस्बत अधिक बल दिया जाए । परिवार में यदि एक लड़की शिक्षित होगी तो वह अपने पूरे परिवार की सँवार देगी । उस की औलादें शिक्षित होंगी । परंतु लड़कों के बारे में यह बात नहीं कही जा सकती। बहुत से कारण हैं जिनकी वजह से यह जरूरी है। शासन राष्ट्रीय शिक्षा नीति में लड़कियों की शिक्षा को प्राथमिकता दे । उन के लिए औपचारिक व अनौपचारिक शिक्षा का विशेष प्रबंध करें । औपचारिक शिक्षा के साथ-साथ व्यावसायिक (पेशोवराना) व तकनिकी शिक्षा की व्यवस्था अत्यंत आवश्यक है ताकि वे स्वावलंबी बनें और परिवार पर बोझ न बनें । लड़कियों की शिक्षा --- अर्थात भविष्य की माताओं की शिक्षा --- की व्यवस्था और प्रबंध यह सिद्ध करेगा कि हमारे देश का भविष्य क्या होगा।

# समानतेसाठी शिक्षण : अल्पसंख्याकांसाठी शिक्षण

कीर्तीभाई डी. व्यास

**शिक्षणाचे महत्त्व –** ज्या समाजातला प्रत्येक नागरिक सुशिक्षित असेल त्या समाजाची प्रगती वेगाने होते. प्रत्येक नागरिक सुखी असावा हेच कल्याणकारी समाजरचनेचे ध्येय आहे; यासाठीच स्वातंत्र्यानंतर शिक्षण राज्य व केंद्र शासनाच्या ताब्यात देण्यात आले. सुरवातीला प्राथमिक शिक्षण विनामूल्य देण्यात येत असे, त्यानंतर अल्पमूल्यात माध्यमिक शिक्षण आणि मुलींचे शिक्षण विनामूल्य करून सरकारने शक्य तेवढ्या सवलती देऊन शिक्षणाचे आकर्षण वाढवले, परंतू अपुऱ्या पैशाचा पुरवठा आणि अपूर्ण व अयोग्य आयोजन व्यवस्था, या कारणांमुळे शिक्षणाचा प्रसार तळागाळापर्यंत पोहचू शकत नाही.

**भाषावार प्रांतरचना –** भाषावार प्रांत रचनेमुळे सर्व कारभार वेगाने होऊ शकेल व त्याचा लाभ सर्वांना होईल. या उद्देशानेच स्वातंत्र्यानंतर पहिल्याच टप्प्यात भाषावार प्रांतरचना झाली; आणि मुंबई राज्याचे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य आणि गुजरात राज्य असे विभाजन झाले. महाराष्ट्र राज्याचे सर्व सरकारी कामकाज व व्यवहार मराठी भाषेत होऊ लागले. यामुळे मराठी भाषेची गरज पण वाढली, परंतु महाराष्ट्रातल्या इतर प्रजेच्या व्यवहारात भांबावल्यासारखे वर्तन सुरू झाले. आदर्श कितीही उच्च असला परंतु त्याचे प्रतिबिंब व्यवहारात येऊ शकले नाही तर अडचण निर्माण होते. राष्ट्राच्या एकात्मतेसाठी बहुसंख्य व अल्पसंख्य ही समस्येची कारणे असू नयेत. बहुसंख्य लोकांप्रमाणेच अल्पसंख्य लोकांचीही एक संस्कृती आहे; तेव्हा बहुसंख्य लोकांनी अल्पसंख्य लोकांच्या संस्कृतीची वैशिष्टये जाणून घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

**बहुसंख्याक व अल्पसंख्याक –** भाषावार प्रांतरचनेमुळे अल्पसंख्याकांना त्यांच्यावर अन्याय झाल्यासारखे वाटते. आपल्या देशाचे हे एक आगळे वैशिष्टय आहे की जेथे विविधतेमध्ये एकतेचे दर्शन होते. मुंबई शहराचे वैशिष्टय त्याच्या पंचरंगात आहे. जगात मुंबई आपल्या देशाच्या पंचरंगीत्वाचे प्रतिनिधित्व करते. जगातले सर्व प्रकारचे अल्पसंख्याक लोक या शहरात आढळतात. हे लोक मुख्यत्वेकरून रोजी व रोटीसाठी इथे स्थायिक झाले आहेत; त्यामुळे स्वाभाविकच ते त्यांचा समाज वाढविण्याचा प्रयत्न करतात. स्वतःच्या संस्कृतीचे आणि संस्काराचे संवर्धन करून दुधात साखर विरघळल्याप्रमाणे एकत्र राहून हे लोक राज्याची शक्ती व शोभा वाढवितात.

जन्माने मराठी तोच महाराष्ट्रीयन असे नसावे, परंतु अमराठी म्हणून स्थायिक झालेले लोक हेही महाराष्ट्रीयन म्हणूनच गणले गेले पाहिजेत; आणि सरकारने सुद्धा त्यांचा स्वीकार करून त्यांना खास सवलती द्यायला हव्यात. लहान मुलांशी बोलताना मोठ्यांना खाली वाकावे लागते, तरच त्यांच्याशी संवाद साधला जातो.

बहुसंख्य हे समाजाचे मूळ आहेत, तर अल्पसंख्य लोक ही त्यांची फळे आहेत, तेव्हा अल्पसंख्य लोकांच्या विकासासाठी बहुसंख्य लोक हे बांधील असावेत तरच समाजाचा विकास एखाद्या वटवृक्षासारखा होऊ शकेल.

महाराष्ट्र सरकारने मुख्यत्वे शिक्षण प्रसारासाठी मराठी व्यतिरिक्त इतर भाषांचा म्हणजे गुजराती, हिन्दी, इंग्रजी, सिंधी, कन्नड आणि उर्दू भाषेचा स्वीकार केला आहे, आणि शालान्त परीक्षेसाठी त्या माध्यमांना प्रोत्साहन पण दिले आहे. हे एक विश्वसनीय पाऊल आहे, तरीही कोठेतरी काही कमी दृष्टीस येत आहे, आणि त्यामुळेच समानतेच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो.

**समानता म्हणजे ?** सर्वांविषयी समभाव हेचं समानतेचे सूत्र होय. कोणाच्याही अडचणीचा फायदा न घेता वेळेला त्यांना मदत करावी असाच विचार बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांविषयी करणे अगत्याचे आहे. अशानेच त्यांचे बळ वाढून त्यांचा त्यांना लाभ होईल. त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज १८०° असते हे सूत्र सर्व भाषांमध्ये सारखेच आहे. Child चे Plural Childern होते. गुजराथीकिंवा कन्नड मधला भेद रहाणारच. धरणाच्या पाण्यापासून वीज निर्मिती होऊन सर्व भाषिकांना त्याचा लाभ होतो. हे महत्त्वाचे आहे.

औरंगाबादचे वैशिष्टय म्हणजे अजंठा, एलोराच्या जगप्रसिद्ध गुंफा होय. त्यांचे ऐतिहासिक, पौराणिक तसेच वास्तुशिल्पाचे ज्ञान महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता सर्व विश्वाचे भूषण बनले आहे. आपलेपणा व समजंसपणा यांचा विकास, जीवन जगणे, रोजी रोटीचा प्रबंध करणे, कला व धर्म यामधील समभाव समजून राष्ट्रीय भावना वाढवावी यातच खरे शिक्षणाचे महत्त्व आहे. पण या कामामध्ये भाषेचे कोणतेच बंधन आड येता कामा नये.

शिक्षणात राजकारण असूच नये. मराठी भूमीतून विकसित झालेले सर्व लोकांचे श्रम आणि संस्कार यांची गोळाबेरीज म्हणजेच महाराष्ट्र होय; पण महाराष्ट्र म्हणजे मराठवाडा, विदर्भ, कोकण, पुणेरी प्रांत असा भेद निर्माण करून त्याचा फायदा घेतल्यास धोका निर्माण होईल; आणि या आंतरिक ओढाताणीत हळूहळू सर्वच नष्ट होईल.

समानता म्हणजे माणूस असा सर्वभाव असावा, त्यात मराठी, गुजराथी, सिंधी, मारवाडी असा परस्पर भाव नसावा. उद्योगधंद्यांच्या विकासासाठी सर्वांची गरज आहे. माणसाला त्याच्या जन्मभूमीपेक्षा कर्मभूमीचा मान जास्त असतो. जीवनाची घडण जीवनाच्या कर्मभूमीवर होते, धर्मभूमीवर होत नाही.

**समानतेचे विरोधक –** समानता शिक्षणाला संबंधित आहे, तोपर्यंत ती एक प्रक्रिया आहे. विज्ञान, गणित, संख्याशास्त्र, वैद्यकीय शिक्षण, इंजिनियरींग, कॉम्प्यूटर, बांधकाम,

ललितकला या शिक्षणासाठी कोणत्याही एका खास भाषेची आवश्यकता नसते. शिक्षण आणि शिकणाऱ्यामध्ये आपोआपच शिकण्याचा व समजण्याचा दुवा जुळला जातो. स्वयंपाक कसा करावा याचे खास शिक्षण मुलीला आईकडून घ्यावे लागत नाही, तरीही बदलत्या काळाप्रमाणे पाककलेत कित्येक गृहिणी पारंगत होतात. पूर्वी खेडेगावात विणकर, सुतार, कुंभार, लोहार, गवंडी, सोनार, शिंपी, यांच्या उद्योगांचे निरनिराळे कारखाने त्यांच्या घरातच असत. त्यामुळे त्याच्या भावी पिढीला शिक्षण न घेता त्यांच्या व्यवसायाचे शिक्षण घरातूनच मिळत असे. खास असे शिक्षण न घेता निरीक्षण, भोवतालचे वातावरण व जन्मजात संस्कार याच गोष्टी व्यवसायासाठी पूरक ठरत. संवेदन आणि अनुभूती हे समप्रमाणात साधणे हेच भाषा शिकण्याकरिता आवश्यक आहे. बहुसंख्य आणि अल्पसंख्य यांचा भेद व्यर्थ आहे. जेव्हा भाषेचा प्रश्न उपस्थित करून भेद निर्माण होतो तेव्हाच अनेक अडचणी निर्माण होतात.

देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची ज्ञानमात्रा एकसारखी असेल तर ते समाजाला लाभदायकच आहे. काश्मीरमध्ये इंजिनियरींगची पदवी घेतलेला कलकत्त्यामध्ये काम करू शकला पाहिजे, किंवा मद्रासमध्ये वैद्यकीय शिक्षण घेतलेला डॉक्टर मथुरेमध्ये रोग्यांवर इलाज करू शकला पाहिजे. अहमदाबादच्या शिल्पकाराने अमृतसरमध्ये शिल्प करावे आणि लुधियानाच्या शिंप्याने नागपूरमध्येही दर्जेदार ठरावे हीच खरी राष्ट्राची गरज आहे.

पण अल्पसंख्याकांना हा प्रश्न केव्हा ना केव्हातरी नडतोच. त्यांच्या आवश्यकतेनुसार सवलती त्यांना उपलब्ध होऊ शकत नाहीत. सरकारी धोरणानुसार प्रांतीयवादाला प्रोत्साहन देताना अल्पसंख्याक उमेदवार कधी कधी मागे पडतो. भाषावर प्रांतरचनेच्या दबावाखाली अल्पसंख्याक लोकांचे साहित्य योग्य प्रकारे प्रगट होऊ शकत नाही.

**भाषेचा प्रश्न –** भाषेची समस्या पुष्कळ गुंतागुंत आणि गैरसमज निर्माण करते. नवीन राष्ट्रीय शिक्षण-नीतीच्या उपक्रमाप्रमाणे शिक्षकांना तालीमबद्ध करावे, पण ते कोणत्या भाषेद्वारे? त्यानुसार महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे साहित्य तयार झाले. परंतु इतर भाषांचे काय? गुजराथी शिक्षकांसाठी गुजरात, उर्दू शिक्षकांसाठी काश्मीर, हिन्दी साहित्यासाठी यू.पी, असे विभाग केले गेले; परंतु यामुळे विलंब होतो व राज्या-राज्यातील संबंधाची दरी वाढते. राज्यातील अल्पसंख्याक भाषेचे पाठ्यपुस्तक काही कारणास्तव खोळंबून पडेल. अधिकाऱ्यांच्या तोडग्याप्रमाणे अल्पसंख्याकांच्या भाषेचे पुस्तक जर का दुसऱ्या राज्यात अभ्यासक्रमासाठी लावले तर तिथल्या स्थायिक अल्पसंख्याकांवर तो अन्याय होईल. प्रत्येक अल्पसंख्याकाच्या स्वत:च्या अडचणी आहेत. उदा. महाराष्ट्रात गुजराथी हे अल्पसंख्याक आहेत. जे मुख्यत्वेकरून मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, नागपूर, सोलापूर, अकोला, नांदेड या शहरात वसलेले असूनही पुणे, सांगली, नाशिक वगळता मुंबईशिवाय अन्यत्र कोठेही

गुजराथी शाळा विकसित झाल्या नाहीत. औरंगाबादमध्येच गुजराती वस्तीनुसार शाळांचे प्रमाण कमी आहे. तेव्हा त्या भाषिक लोकांचे काय? मारवाडी, उत्तर भारतीय, सिंधी, कन्नड, यांच्याबाबतीतही असेच आहे.

या समस्येमुळे हे लोक धड स्वत:ची भाषा शिकू शकत नाहीत किंवा राज्यभाषाही शिकू शकत नाहीत. या सर्व कारणांमुळे आपल्याकडे पूर्ण विकसित झालेले कोणतेही राष्ट्रभाषेचे माध्यम उपलब्ध नाही. याचाच परिणाम इंग्रजी माध्यमाचा प्रश्न हा प्राथमिक आश्वासन आणि कायम धोरणानुसार डोकेदुखीचा झाला आहे. मातृभाषा, प्रांतभाषा, राज्यभाषा, राष्ट्रभाषा, देवनागरी, इंग्रजी यापैकी एक मूल किती भाषा उलगडू शकेल? अल्पसंख्याक आणि बहुसंख्य एकत्र सुखाने नांदण्यासाठी सरकारची उदार नीती आवश्यक आहे.

**अल्पसंख्याकांची लालच की लाचारी?** अल्पसंख्याकांची ही लाचारी आहे की त्यांना त्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी बहुसंख्य लोकांची ताबेदारी स्वीकारावी लागते. स्वत:चे जीवन केंद्रित करण्यासाठी विकास साधून समाजाचा फायदा व्हावा, तसेच जन्मणाऱ्या आणि नवीन पिढीला मार्ग दाखविण्यासाठी अल्पसंख्य लोक स्वत:चे संस्कार केंद्र स्थापन करतात. त्यातच मंदिर, मंडळ, शाळा आणि नेते समाविष्ट होतात.

अल्पसंख्याकांना स्वत:च्या मिळकतीची मोजणी आणि नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारचे कायदे पाळावे लागतात. समानतेच्या बाबतीत तेथे असंतोष ऐकू येतो, आणि भेद पारखले जातात. अल्पसंख्याकांच्या बाबतीतले सरकारचे सावत्रपणाचे वर्तन त्यांच्या विकासाच्या आड येते आणि त्यामुळे अल्पसंख्याकांना स्वत:लाच स्वत:चा मार्ग शोधावा लागतो. घटनेमध्ये अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी कलम असूनही वेळोवेळी कायदे आणि कोर्टाची अडचण नडते.

अल्पसंख्याकांचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांना त्यांच्या स्वायत्ततेची जरुरी आहे. त्याकरिता सरकारने त्यांना प्रोत्साहन द्यावे. त्यांना स्वत:च्या गरजेसाठी योग्य असे नीतिनियम करू द्यावेत आणि त्यांच्या पद्धतीने त्यांच्या नीतीनियमांचे संचालन करू द्यावे. अनुदान किंवा मदतीसाठी सरकारने विरोध न करता त्यांना सहकार्य दिले, तर अल्पसंख्याक लोक लालचेशिवाय किंवा लाचारी न भोगता स्वत:चे काम चांगल्या प्रकारे करू शकतील. अल्पसंख्याकांच्या कार्यामुळे बहुसंख्य लोकांचाही फायदा होईल तसेच त्यांच्या मिळकतीचा राज्याला पण फायदा होऊ शकतो. अल्पसंख्याकांच्या व्यवहाराने राष्ट्रीय भावना आणि राष्ट्राची ताकद वाढते.

अल्पसंख्याकांच्या शाळांमध्ये जी शिक्षणपद्धती आहे, त्याचे त्यांना फायदे व सवलती मिळतात. १९५५ ते १९६० च्या दरम्यान 'हिन्दी' विषय अभ्यासक्रमात सक्तीचा

केला तेव्हा बऱ्याचशा हिन्दी भाषा शिक्षकांना अल्पसंख्य किंवा बहुसंख्य अहिन्दी शाळांमध्ये शिक्षकाचे काम करावे लागले; त्यामुळे त्या शिक्षकांना हिन्दी व्यतिरिक्त कोणतेही इतर कार्य करता आले नाही. जर ते हिन्दी माध्यमांच्या शाळेत राहिले असते तर त्यांना भाषेशिवाय शास्त्र, विज्ञान, गणित इ. विषय शिकवावे लागले असते. ह्या शिक्षकांना सांभाळणे आणि समजून घेणे हे त्या शाळेच्या संचालकांना कसे कठिण गेले असेल हा एक चर्चेचा मुद्दा होऊ शकेल. पण काळाच्या ओघात अशी उलथापालथ होणारच.

नाशिक, पुणे आणि सांगली या शहरात ज्या गुजराथी शाळा आहेत, त्यांची सुरवात कशी झाली हे समजून घ्यायला हवं. उत्तर गुजरातमधल्या कलोल येथून कोल्हापूरमध्ये नोकरी करण्यासाठी गेलेला किंवा पाटण्यामध्ये स्थायिक झालेला पण पुण्याच्या शाळेत नोकरी करणारा किंवा सोनगड सोडून सांगलीमध्ये शिक्षकाची नोकरी करणारा या सर्वांची गाथा एक 'इतिहास' बनू शकेल. या शिक्षकांचा त्याग जेव्हा राज्यसरकारच्या नीतीमुळे ठोकरला जातो, तेव्हा समानतेच्या शिक्षणाचा काहीही अर्थ उरत नाही. या सगळ्याचा परिणाम संचालकाच्या हेतूवर होणे साहाजिक आहे. त्यामुळे त्यांचा त्रास व ओढाताण वाढते व संस्था रसहित होऊन रसातळाला जाण्याची शक्यता असते. मुंबईमध्ये अतिशय कमी प्रमाणात गुजराथी शाळा चालवल्या जात आहेत. दक्षिण मुंबईमधील अनेक वर्षांच्या उत्तम चालणाऱ्या शाळा आज रिकाम्या होऊन त्यांची दशा भुताटकीच्या वाड्याप्रमाणे झाली आहे.

माणूस म्हटला की कटकटी ह्या होणारच. बहुसंख्य लोक हे अल्पसंख्याकांना सहजपणे खरेही करू शकतात. स्वभाव अल्पसंख्याकांचा, सवलत बहुसंख्यकांची, कायदा सरकारचा आणि समानतेचे संक्रमण.

या गुंतागुंतीचे आणि आधुनिकीकरणामुळे हे चित्र कसे भासेल?

अल्पसंख्यकांना बहुसंख्यकांमध्ये सुरक्षित वाटत नाही. गुजराथी प्रजेचा त्यांच्या स्वत:च्या संस्थेवरचा विश्वास उडाला आणि मराठी संस्थेतही रस राहिला नाही. याचा परिणाम म्हणून लोकांचा ओढा इंग्रजीकडे जास्त वाढला. जसे गुजराथीचे झाले त्याप्रमाणेच मारवाडी, सिंधी, कानडी, पंजाबी आणि मराठी भाषिकांच्या बाबतीतही इंग्रजीचा वेडेपणा वाढू लागला.

इंग्रजीचे वाढणारे फाजील महत्त्व राष्ट्राने ओळखले. त्यावरून असे वाटते की, "हम होंगे कामयाब एक दिन" हे इंग्रजांनी आपल्या बाबतीत सार्थ करून दाखविले. बहुसंख्यकांच्या त्रासामुळे अल्पसंख्याकांची दशा वाढतच आहे. तेव्हा यातून समानता कोठे व कशाप्रकारे साधावी?

**उपाय आणि उलगडा –**

आपला जळजळाट समानतेच्या बाबतीतच आहे. अल्पसंख्याकांच्या शिक्षणाची पातळी बहुसंख्यकांच्या बरोबरीची असावी, आणि कोणत्याही राज्याचा अभ्यासार्थी कोठेही गेला तरी तेथे तो मिसळून जाऊन प्रकाशित होईल अशा उपायांची आपल्याला जरूरी आहे. राजकारण बाजूला करून सरकारने समानतेसाठी उदार-नीती स्वीकारावी.

अ) अल्पसंख्याकांच्या भाषेचे माध्यम टिकविण्यासाठी सरकारने प्रोत्साहक अर्थनीती अंमलात आणावी.

ब) अल्पसंख्याकांच्या संस्थेत योग्य व्यक्तींच्या नेमणुकीसाठी त्यांच्या राज्यातूनच योग्य उमेदवारांना निवडून कामासाठी नेमणूक करता येईल अशी व्यवस्था करावी. उदा. गुजराथी शाळेसाठी राज्यातून योग्य शिक्षक मिळाले नाहीत तर गुजरात किंवा अन्य ठिकाणांहून त्यांना आणता आले पाहिजे. अशी उदारनीती असावी. साहित्यासाठी पुस्तके व साधने यांचीही योजना असावी.

क) सरकारची वृत्ती ही अधिकारी व अंमलदारांशी फक्त चुका शोधण्यासाठी व सेवा करून घेण्यासाठी न रहाता सहकारी व मैत्रीची असावी.

ड) नेमणुका, बढती, निवड इ. साठी सरकारच्या आवश्यक हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

ई) अल्पसंख्य लोकांच्या संस्कृती आणि संस्काराप्रमाणे जर प्रयोगशील शिक्षणपद्धतीच्या अवलंब केला तर समानतेची पातळी गाठली जाईल.

फ) अल्पसंख्यकांच्या संस्था टिकविण्यासाठी त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन राज्यसरकार व्यक्तिगत धोरणांचा निर्णय घेईल अशी योजना असावी.

र) संपूर्ण अल्पसंख्याकांचे एक संचालन मंडळ आणि सर्व मंडळांचे एक महामंडळ असले तर 'श्रेय आणि त्रेय' साधायला वेळ लागणार नाही. उदा. सर्व गुजराथी संस्था किंवा सर्व उर्दू संस्थांचे एक स्वतंत्र मंडळ आणि सर्व मंडळांचे सामान्यांना सर्वमान्य असे 'महामंडळ' पुष्कळ काही कार्य करू शकते.

आशा आहे की या विचारांचा प्रकाश पडेल.

# समतेसाठी शिक्षण

**गो. रा. म्हैसेकर**

"समतेसाठी शिक्षण" या विषयावर नवीन शैक्षणिक धोरण निवेदनास मुद्दाम विश्लेषणात्मक चर्चा केलेली आहे व काही सूत्रे बांधलेली आहेत. या सूत्रांना धरून कार्यक्रमात्मक आराखड्यामध्ये तातडीने घ्यावयाच्या व लांब दीर्घ मुदतीच्या योजनांचा अंतर्भाव केलेला आहे. हा कार्यक्रम प्रामुख्याने समाजातील दुर्बल (Weaker) घटकांना "लक्ष्य" ठरवून आखला गेला आहे. धोरण विषयक व कार्यक्रमात्मक निवेदनात "समतेच्या" अर्थ, आशय व संदर्भांचा विस्तार या संबंधी माहिती आलेली नाही. त्यामुळे घ्यावयाचा कार्यक्रम अर्थपूर्ण, फलदायी, व महत्त्वाचा असला तरी एकतर्फी होईल अशी साधार भीती वाटते. म्हणून समतेसंबंधी थोडेसे विश्लेषण केले तर ते अनाठायी तर होणार नाहीच उलट कार्यक्रमाबाबत काही आवश्यक अशा अधिकच्या व कार्यक्रमास बळकटी आणणाऱ्या पूरक सूचना करता येतील असे वाटते.

**विषमता –**

समाजातील व्यक्तीने किंवा समूहाने आपल्या "अहंकार", "श्रेष्ठता", व "उच्चता" या अन्यायकारक आधारावर इतर व्यक्तींचा किंवा समूहाचा "साधन" म्हणून वापर करावयाचा. या वापरात ज्याचा वापर केला गेला त्यांचे दौर्बल्य ध्यानात घेऊन त्याचे शोषण केले जाते. अशा शोषणातून विषमता निर्माण होते. याच विषमतेवर आधारित "मूल्य व्यवस्था" जन्मास येते, तिची जोपासना व वृद्धी होते. अशी मूल्य व्यवस्था सहाजिकच "समता" व समानतेच्या मूल्याला नुसती घातकच नव्हे तर नष्ट करणारी ठरते. व्यक्ती ही "साधन" असली तरी ते "साध्य" पण आहे. हे दोन घटकावरील आधारित सूत्र दुर्लक्षित केले गेले. व्यक्ती हे "साध्य" आहे याचा विचार केला गेला असता तर मग समाजातील प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे सर्व समाजाच्या चिंतनाचा खऱ्या अर्थाने विषय ठरले असते. तसे झालेले नाही. हे मानवी समाज घडविणाऱ्या इतिहासाच्या अभ्यासातून स्पष्ट होते.

**समता :**

युरोपीय देशात साधारणत: १२-१३ व्या शतकानंतर विज्ञान, तंत्रज्ञान व यंत्रज्ञान याची प्रगती झाली. त्यावर आधारित औद्योगीकरण आले. परिणामी तेथील समाज अंशत: का होईना धर्म, अंधश्रद्धा व तर्कदृष्ट अध्यात्मक युगातून बाहेर पडू लागला. फ्रेंच औद्योगिक क्रांतीने १९ व्या शतकात समाजातील विषमतेवर प्रखरतर हल्ला केला. परिणामी १९ व्या शतकात राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक चिंतनात "समता" हे उच्च प्रकारचे मानीव मूल्य म्हणून मान्यता पावले. आज पावेतो हे मूल्य बहुचर्चित आहे. फ्रेंच राज्य क्रांतीनंतर स्वातंत्र्य, बंधुता आणि समता ही आदर्श, मानवी समाजाची पायाभूत मूल्य मानली गेली.

आपल्या देशात चार्वाकाच्या "जडवादावर आधारित निरीक्षरवाद प्रगत होऊ शकला नाही. बौद्ध व जैनांच्या प्रगतीपर पिरीहारवादाला देखील व्यापारिक तत्त्वज्ञानापेक्षा धर्माचे स्वरूप आले. गूढत्व टिकून राहिले.

धर्म व जात समतेच्या आड येणे हे चालूच राहिले.

"समता" ही सर्वंकष व सर्वांगीण असली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे समाज मानले गेले पाहिजे. आर्थिक समता ही सामाजिक समतेचा पाया असते. या सूत्रातून "आर्थिक न्याय" या मूल्याची अपरिहार्यता समाजात रुजली पाहिजे. हे ज्या गतीने घडावयास पाहिजे होते तसे घडले नाही.

भारतीय घटनेत समतेचे तत्त्व व्यापकतेने व सखोलपणे स्वीकारले आहे. म्हणून प्रबोधनातून म्हणजेच "शिक्षणातून" परिवर्तन घडेल याची खात्री होती. परंतु दुर्दैवाने शिक्षणात समतेचा आशय नसल्यामुळे हे घडले नाही. समान न्याय व समतेची मूल्ये वरपांगी स्पर्श करती झाली. प्रस्थापिताचे हित सांभाळण्यात कळत नकळत अनेक घटक मग्न राहिले. किंबहुना बहुतांशी त्याबाबत सतर्कच राहिले. परिणामी वर्णव्यवस्था आहे तेथेच राहिली. गरिबी वाढली. आर्थिक विषमता वाढली. कोणी या विषमतेला सामाजिक, राजकीय व वैचारिक गुलामगिरी म्हटले, तरी काहींनी ही सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शोषणाने घडत असलेली आर्थिक गुलामगिरी म्हटले. धर्म रचना व समाज रचना न्याय अधिष्ठीत राहिली नाही. रुढी, परंपरा, चालिरीती या बाबत असलेल्या अंधश्रद्धेतून सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत आहेत.

**शिक्षणाची जबाबदारी :**

म्हणजेच शिक्षणाच्या आशयातून व प्रसारातून काही गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत. त्याचा उल्लेख येथे करणे आवश्यक वाटते.

१. सामाजिक समता व आर्थिक न्याय याबद्दलच्या प्रेरणा अभ्यासक्रमातून मिळाव्यात. या प्रेरणा समाजातील सर्व घटकांना पुरेशा मिळाल्या पाहिजेत.

२. सांप्रदायिकता ही समतेला हानिकारक आहे. म्हणून निधर्मवादातूनच समता व न्याय स्थापनेला यश मिळाले. अर्थात तर्कशुध्द, आध्यात्मिक मूल्याची गरज आहेच.

३. समाज सुधारणा करावयाची असल्यास गरिबीचे उच्चटण करणे हे प्राथमिक कार्य आहे. तितकेच महत्त्वाचे कार्य अंधश्रध्देवर आधारित घातक व अन्यायकारक रुढी, परंपरा व चालीरीती नष्ट करण्याचे आहे. ह्या बाबत प्रबोधन करणे आवश्यक आहे.

४. ज्यांच्यावर अन्याय होतो आहे त्यांना अधिकची व पुरेशी संधी देऊन त्यांची क्षमता कार्यरत करणे हे देखील एक महत्त्वाचे असे शिक्षणाचे कार्य आहे. ते गतिमानतेने व परिणामकारकरीत्या झाले पाहिजे.

५. मनुष्यातील "मनुष्यत्व" हे स्वयंभू मूल्य आहे. त्याचा मान राखला गेला पाहिजे. परंतु त्याच बरोबर व्यक्तिस्वातंत्र्य व समाजहित याचा समन्वय साधून सुसंवादित्व टिकविणे हेही समतेसाठी आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीला विशेष सवलती व अधिकार कळत न कळत मिळणार नाहीत याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

## दुर्बल घटकांचे (Weaker Sections) गट

वरील विवेचनातून समाजातील अन्याय झालेल्या घटकांचे गट ठरविण्यात आले आहेत. हे गट प्रामुख्याने खालील प्रकारे होत.

१. स्त्रिया
२. वर्गीकृत जाती
३. आदिवासी - भटक्या जमाती
४. वर्गीकृत जमाती
५. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले अल्पसंख्याक
६. ग्रामीण व शहरी झोपडपट्टी भागातील गरीब
७. अपंग

कृती कार्यक्रमात निवेदित केलेल्या सर्वच शिफारशी वर निर्देशित उपेक्षित घटकासंबंधी आहेत. या घटकातील व्यक्तींना सर्वसापेक्ष समर्थ बनविणे व इतरांच्या बरोबरीने त्यांची क्षमता वाढवावी म्हणजे हे दुर्बल घटक कुठल्याही स्पर्धेत टिकू शकतील. या कार्यक्रमासाठी तूर्तास खालील सूचना कराव्याशा वाटतात. त्याचा उल्लेख कृती कार्यक्रमात दिसला नाही.

१. दुबर्ल घटकांना शिक्षणाची पुरेशी संधी उपलब्ध करून देणे हे तत्त्व मान्य केले गेले हे खरे, परंतु ही पुरेशी संधी "दर्जेदार शिक्षणा" बाबत असली पाहिजे. ग्रामीण भागातील व झोपडपट्टीतील गरीब पालकांच्या मुलांना ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घ्यावे लागते त्यांचा दर्जा उत्कृष्ट नसल्यास त्यांना पुरविलेल्या इतर सर्व सोयीचा अपेक्षित परिणाम मिळणार नाही. या दृष्टीने काय पाऊले उचलावयाची हे ठरले पाहिजे.

२. ग्रामीण व शहरी भागातील दुर्बल घटकातील विद्यार्थी विद्यार्थीनींत ज्या उणिवा (सोयी अभावी) राखतात त्या कशा दूर करावयाच्या या संबंधी "उपचारात्मक"

(Remedial) पद्धती अमलात आणाव्या लागतील. या उणिवा कौटुंबिक, सामाजिक वातावरणामुळे तसेच शैक्षणिक संस्थातील अपुऱ्या साधनांमुळे असू शकतात.

याच्या तपशीलात जाणे आवश्यक आहे. याबाबत आणखी सूचना करता येतील.

याच प्रमाणे समाजातील वर्चस्व असणाऱ्या घटकांचे सुद्धा समानते व "समते संबंधी" शिक्षण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या मुल्यांची जर अर्थपूर्ण व परिणामकारक जाणीव झाली नाही तर दुर्बल घटकांना "सबल" करण्याची क्रिया "निरंतर" होऊन बसेल. या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमातून या मूल्यांच्या जाणिवा निर्माण केल्या पाहिजेत. माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणात देखील मन आणि मत घडविण्याची ही प्रक्रिया झालीच पाहिजे. असे झाल्यासच दुर्दल घटकासाठी जे कार्य होईल त्याला अर्थ प्राप्त होईल.

या हेतूने व दृष्टीने वेगवेगळ्या स्तरावरील अभ्यासक्रमातील आशय काय असावा त्याचा तपशील तातडीने पण अभ्यासपूर्ण रीत्या ठरवावा लागेल. हे करत असताना एकभाव, एकमन, परस्पर विश्वास, देशप्रेम, राष्ट्रभक्ती या प्राथमिक पायाभूत मूल्यांवर आधारित जोर द्यावा लागेल. समता व न्याय यातून राष्ट्रीय एकात्मता भरभक्कम पायावर उभी राहील.

# EDUCATION FOR MINORITIES

**Fr. Gregory Lobo**

When I was in Los Angeles - I was asked to give a talk on India- and I categorically started that United States may have a lot of Dollars to offer the world - but India has a lot of Human Values and a wealth of culture to offer. Isn't it true my dear Brothers and Sisters, that India is a country which hanours all religions and cultures - India is a country which is universally known for its tolerances. I can compare India to a huge tree - in whose branches birds of all religions and cultures come and take shelter. Given this background - could I ask why this problem - this tension between the Majority and the Minority and consequently education for the majority and education for the Minorities?

Mr. Kirtibhai Vyas rightly pointed out the Majority community is the tree and the Minority is the fruit - the fruit needs the tree to give it life - to give it protection - it is the very source of its being. So when you strengthen the ground with fertilisers both the tree and the fruit is strengthened,in other words the minority is an asset to the majority. So when the Fathers of Our Constitution included this article on Minorities - they were I am sure, having this in mind, rather than causing a tension between the Majority and the minority Communities.

But History has it that due to language, religion etc - a lot of Regionalism and Provincialism has set in our minds. Ask an American or an Australian, who are you or where do you come from - and the reply will be : I am an American or I come from America - but ask an Indian and he or she will say "I am a Punjabi, a Gujerati, a Tamilian etc and in this we are stifling a big value of Nationalism - we forget that we are Indians first - and Punjabis, Tamilians, Gujaratis etc. afterwards - and this regionalism has caused some sort of tension between the majority and the minority be it on the question of religion or language or culture. May I compare the role of the majority and the Minority to an incident I vividly remember. The Super Star Amitabh Bacchan was

visited by a school for a fund raiser at Shannukanda Hall in Bombay. To welcome the Chief Guest - a small child - a little girl came to the stage with a garland of flowers. When Amitabh saw this little child he came forward - carried the little child in his arms and when the child was at his hand, she garlanded him - which shows that the majority community, instead of being threatened can carry the minorities in its arms to its own stature and protect it. So instead of putting any conflict or opposition, let us keep the spirit of the Constitution before our minds - that Minorities are being protected - not to be a class apart - not to be a Royal Class but to be able to grow to its full stature - to be able to grow in its own religion, language or culture - so that it can be an asset - a glory of India.

In this scheme therefore of Education for the Minorities - I am going to speak about English Medium Schools. When I talk about English Medium schools - I am aware I am immediately entering into a controversial topic. Why should there be English Medium schools at all? Why should we still run after the British even after 40 years of our Independence? These are many questions that come to our minds - and rightly so.

Historically the British ruled over us for 400 years and sometimes we rightly feel that they exploited us. Mr. Bijon Desai rightly pointed out that they followed a policy of Divide and Rule - and they very rarely had the good of Indians at heart. If they taught the Indians English - it was to make clerks and Babus out of them - so after being dominated and exploited for over 400 years we really hated them.

The question before us today is : Should we throw the Baby with the Bath water? Should we throw away the good with the bad ? Today whether we like it or not, scientific knowledge has exploded so much that the world has shrunk - and made each nation inter - dependent on the others. Today we can have breakfast in Bombay, lunch in Cairo, Tea in London and dinner in New York. What happens in China in the morning can be seen on our T.V. Network news in the evening - and if Pakistan or China attacks India - the world gets

implicated and the Nations take sides. Today more than ever computers and space Technology is taking us into the XXI Century - and at this stage we have to move with the current, keep abreast of knowledge - or face extinction.

Can we at this stage afford to be small and narrow minded in our outlook? Can we afford to forget that language was made by man and not vice versa? No doubt we may hate the British for what they did to us and our Nation - but should we take revenge on the language for that - keeping in mind two specific points :

1) That English is a link language for most parts of the world - and especially in the world of scientific literature.

2) That English is spoken and written better in India than in Australia, America or England itself.

What I am pleading for is not to be so prejediced about a language - that we close our minds and our doors to a world out-side India and especially to the scientific literature that may come from other parts of the world. Let us never forget that language is a vehicle of thoughts - and to be open to the thought - especially the scientific thoughts of other Nations - we could use as one of the vehicles - the English language.

The second advantage of an English Medium school is that it actually promotes National intergration and is above Regionalism or Provincialiam. In a Marathi Medium school most of the children will be ones - whose mother tongue is Marathi - so also in Gujarati medium schools its a Gujarati background - so also Urdu, Tamil, Malayam, etc.. but in an English medium school, you will find children from all backgrounds. You will find Maharashtrians, Gujaratis, Punjabis, Tamilians, Urdu speaking children etc - so isn't it a good example of National Intergration ? It is above Regionalism because in what medium - would Central Govt. servants or people who can be transfered anywhere in India - would they like to put their children

in ? Again as of today - there is hardly any child who can say that his mother tongue is English - because English - men and women have left long ago. Sometimes it is misunderstood that the mother tongue of Christians is English. It is not so - because every Indian Christian is an Indian first and his or her mother tongue will be Konkani, Tamil, Malayam, etc, etc, - but not English.

So my question is why should we give a step motherly treatment to English Medium Schools? So I ask; why should our own children - coming from Maharashtrian, Gujarati, Urdu, Punjabi, Tamilian homes be deprived of a right to Education for equality - and by equality I mean - facilities that are available to other media? like Grants to English medium schools? So when you give step motherly treatment to English Medium schools you are actually giving step motherly treatment to your own children who are studying in these schools.

Another place where we give a step motherly treatment is in our curriculam and text books. To give adequate knowledge of the Regional language we introduce marathi in std III. But in the Marathi medium school - where marathi is the first language the standard of English - both in the curriculam and in the text book is far lower than the standard of Marathi in the English Medium schools. The text books are by far much higher - as it is when Marathi is the first language.

Sometimes I also notice - that the ones who shout against English medium schools are the very ones - whose children are studying in English medium schools. Allow me to give you an example ; Our ex. C. M. - Mr. Anthulay told a delegation of English Medium Headmasters, "English Education is a luxury which Maharashtra cannot afford". - Very well - but his own children were studying in our Convent schools and later were sent to London for higher education - so why this hypocracy ?

Another big hue and cry is made about donations in English Medium Schools. Donations in any form is a curruption that must be condemned and I will condemn it openly and publicly and ask the

Govt. to take stringent action against any erring schools even Convent Schools - as per the Anti Capitation Act. But I ask who is ehcouraging the mal pratice, why, demand is more than supply - curruption sets in - so why isn't it Govt. giving permission to open new schools? Because children are not getting admissions parents are becoming panicky - but if there were more schools - nobody would pay the donations - but donations as a mal practice should be put down, is very clear to me.

Another problem English Medium schools are facing because of shortage of schools, is evercrowded classrooms, old schools are told to expand, until they are busting, instead new schools would have sorted out their problem. Laws are made for man, not man for the laws.

Let me conclude by a single quotation "It is not language that makes a man, but its man who makes a language".

Thank You.

# EDUCATION FOR EQUALITY - MINORITY EDUCATION

## (MUSLIM COMMUNITY)

**Dr. Dost Mohd. Khan**

Equity in education has been perceived in a wide perspective in the National Policy of Education, 1986. It recommends "to provide for equal opportunity to all not only in access but also in conditions for success."

The term "Equalization of Educational Opportunity" was generally interpreted up to now in terms of opening of schools within walking distance of children, providing residential facilities to children, admission of children of all communities to schools, reducing the drop out rate and increasing the retention rate of children through various measures, provision of non-formal education for the non-attending children, grant of pre-matric and post matric stipends and provision of various ancillary services to facilitate schooling of children. It is observed that such provisions have either not been fully utilized or not understood in the right perspective. Secondly, economic poverty is another constraint in the educational development of educationally backward sections of Indian Society.

These are other factors such as ;

(i) Social and Psychological restraints
(ii) Lack of Motivation in children towards their education
(iii) a low self concept of their parents.
(iv) Inadequate facilities in homes.
(v) The passive attitude of teachers to the educational progress of learners from backward communities.

These constraints in the educational development of sche-

tives should be given to parents of such children to invite their attention towards education.

(5) Efforts should also be made for the retention of the Muslim children in the school till they complete their primary education. provisions should be made for their enrollment in high schools.

(6) It is the constitutional right given to every community to take education through their own mother tongue. The educationists also agree that learning is more effective through the mother tongue. Therefore Urdu Medium schools should be opened particularly in the villages by Z. P. or minority groups should be asked to run such schools with 100% grants.

(7) In urban areas Urdu Medium schools should be given higher grants as compared to other schools which have already established themselves.

(8) The departmental authorites should develop a sympathetic attitude towards the problems of minority institutions and the education of minority groups particularly Muslims.

(9) Other than the above mantioned measures all contemplated measures thought out for the educational progress of Scheduled Castes and Scheduled Tribes should also be applicable in case of educational progress of Muslims. If such measures are adapted and implimented will definitely help the Muslims in educating their children and they will develop a healthy attitude towards education. Educational equality will remain a slogan unless these measures are adopted and implimented. I wel-come the efforts of the organizers of this conference for inviting all of us to think over the problem of inequality. The conference will not be successful unless suggestions and recommendations are brought into practice, unless we rise from talking to action, unless it does not become a political stuent. I have no doubt that Muslims are the only educationally backaward minority at the national level.

# अल्पसंख्याकांचे शिक्षण

अहमद अबूद चाऊस

## मागासलेपणाचे कारण व उपाय

भारत हा विविध जाती जमाती व वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या, वेगवेगळ्या प्रांतात आपापल्या संस्कृतीची जपणूक करून राहणाऱ्यांचा देश आहे. आणि या सर्वांचे महत्त्व पटवूण देणारे एक उदाहरण मांडू इच्छितो.

"राडो घडीची किंमत दहा हजार रुपये असून त्यात वापरल्या जाणाऱ्या सुट्या भागांची किंमत वेगवेगळी असते एक भागाची रु. ५००/- एखाद्याची पाच रुपयेही होऊ शकते. हे सर्व सुटे भाग आपापल्या ठिकाणी आपल्या आकाराने कार्यरत असून सर्व भागांना महत्त्व आहेच यात शंका नाही. पण जर आपण पाच रुपयाचा सुटा भाग घड्याळीतून काढून घेतला तर घडी चालू शकते काय? ........ नाही. मोठमोठ्या किंमतीचे सुटे भागही मामुली भाग नसल्यास कार्य करु शकत नाहीत व त्यांचे काहीच महत्त्व राहात नाही. अशीच स्थिती या देशाची आहे. आम्ही एखाद्या जाती जमातीला महत्त्व न देता मागे सोडून देशाला पुढे आणू शकत नाही. देशाची प्रगती घड्याळासारखी थांबणारच. म्हणूनच देशाला उंचवण्यासाठी सर्व जाती-जमाती व सर्व प्रांतांच्या लोकांना बरोबर घेऊनच आम्ही प्रगतिपथावर पुढे जाऊ शकतो.

माझा स्वत:चा अनुभव असा आहे, की जबाबदार व्यक्ती सुद्धा उर्दू भाषेबद्दल शंका उद्धभवणाऱ्या गोष्टी करतात व या भाषेचा आता काय उपयोग? असे प्रश्न विचारतात.

पण त्यांना कळायला पाहिजे की या भाषेचा जन्म व प्रगती याच देशात झालेली असून घटनेत या भाषेला चौदावे स्थान मिळाले आहे. या भाषेच्या गोडीला व सुंदरतेला "चौदहवी का चाँद" अशी उपमा देण्यात येत असते. शिक्षण तज्ज्ञानी सुद्धा मातृभाषेत शिक्षण देण्याची शिफारस केली आहे.

तरी अल्पसंख्याकांचे शिक्षण मागासलेपणाचे कारण व उपाय काय आहेत, हे बारकाईने समजणे आवश्यक आहे.

एका कवीने म्हटले आहे......

"ना समझोगे तो मिट जाओगे ऐ हिन्दोस्तान बालों।
तुम्हारी दास्ताँ तक ना होगी दास्तानों में"।

सर्व प्रथम अल्पसंख्याकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व शैक्षणिक जागृती निर्माण करून शिक्षणाचे महत्त्व समजावून देणे महत्त्वाचे कार्य आहे.

हे एक सत्य आहे की, अल्पसंख्याकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व व त्याची गरज काय या संबंधी कोणत्याच प्रकारच गंध नाही. ज्या प्रकारे प्राणवायूशिवाय मनुष्याचे जीवन असह्य आहे त्याच प्रमाणे या आधुनिक युगात शिक्षणाशिवाय जगणे कठीणच होऊन बसले आहे. अशिक्षित माणूस आपल्या कुटुंबासाठी, समाज व देशासाठी केवळ एक दगडासमानच आहे. त्याला या गोष्टीची मुळीच जाणीव नसते की, देशाच्या व आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी स्वत:चे कोणते कर्तव्य आहे.

तसेच त्याला आपल्या मताचा अधिकारही योग्य प्रकारे बजावता येत नाही, तो या हक्कापासून वंचित राहतो.

उदा. नगरपालिका निवडणुका कशासाठी असतात व विधानसभा किंवा लोकसभेसाठी कोणत्या प्रकारच्या उमेदवाराची निवड करावी या गोष्टीसुद्धा अशिक्षित माणसाला कळत नाहीत.

या काळात माणसाला कोणतेही कार्य करावयाचे असेल, मग ते वैयक्तिक असो की सामाजिक, त्या कार्याला शिक्षणाची सांगड लावलेली असेल तर ते उत्तम होऊ शकते.

वरील सर्व गोष्टी पटवून देण्यासाठी तसेच या गोष्टीची लोकांत जाणीव निर्माण करण्यासाठी विशेषत: अल्प संख्याकांमध्ये नितांत आवश्यकता आहे. या अल्पसंख्याकांचा बौद्धिक, मानसिक व शैक्षणिक विकास साधण्यासाठी शासनाने, स्वयंसेवकांनी तसेच राजकीय पक्षांनी आपल्या पूर्ण शक्तीसह शहरापासून खेड्यापाड्यापर्यंत अल्पसंख्याकांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करण्याचे कार्य करावे, तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका व जिल्हा परिषदेच्या सभासदांना बंधनकारक करावे की आपल्या मतदान संघात कोणत्याही अल्पसंख्याकांचा व मागास वर्गीयांचा मुलगा अशिक्षित राहता कामा नये. शिक्षणापासून अल्पसंख्याक व मागासवर्गीय वंचित राहू नये.

हे अेक प्रकारचे सत्य आहे की, हे काम करणे अवघड आहे व त्यासाठी वेळही भरपूर हवा. कारण ज्या लोकांना अनेक पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा गंधही झालेला नाही व शिक्षणाचे महत्त्वही त्यांना माहीत नाही तसेच भारताची परंपरा अशी होती की अेका विशेष गटालाच शिक्षणाचे अधिकार प्राप्त होते परंतु स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची दालने सर्वांसाठी खुली झाली, तरी पण आज वस्तुस्थिती अशी आहे की अशिक्षित समाज आहेच व याचे अशिक्षितपण दूर करणे म्हणजे खूप कठीण होऊन बसले आहे.

अशिक्षितपणाची अनेक कारणे आहेत, उदा.

**१) बिकट आर्थिक परिस्थिती** - सध्या अनेक कुटुंबीय दारिद्रयात व गरिबीत जीवन कंठीत आहेत. त्याची आर्थिक परिस्थिती अशी आहे की चार व्यक्तिचे पालन पोषण करावे म्हणून वडील किंवा घरातील मुख्य कर्ती व्यक्ती मुलांना आपल्या बरोबर कामासाठी नेतात किंवा अन्य ठिकाणी कामास पाठवून जो पैसा अडका मिळेल त्यापासून जीविताची गाडी कशीबशी ओढत असताना दिसतात. मी स्वत:चा एक अनुभव सांगतो. मी एकटा काश्मीरला गेलो असता बर्फाने अच्छादिलेल्या डोंगरांकडे मी मुग्ध मनाने पाहत उभा होतो. अचानक माझी दृष्टी एका अबोध बालकाकडे वळली जो आपल्या कोवळ्या वयात मेंढरे चारताना दिसून आला. मी त्या मुलाकडे केविलवाण्या दृष्टीने पाहिले, मनाची सहानुभूतीची तार छेडली गेली व मी त्या मुलाच्या जवळ जाऊन आपुलकीने विचारले, 'का रे बाबा या वयात मेंढरे चारतो, शाळेत का जात नाही?' तो उत्तर देणार इतक्यात जवळच उभा असलेला एक वृद्ध गृहस्थ- जो घोंगडीने आपले अंग लपविण्याच्या प्रयत्नात होता त्याने उत्तर दिले "साहेब! याने सकाळचे जेवण केले का हे अगोदर विचारा."

वरील उदाहरण केवळ या साठीच दिले आहे की दारिद्र्य व गरिबी यामुळे माणसाचे शिक्षण कसे अपुरे राहते. शिक्षणाची इच्छा असून सुद्धा केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून माणूस वंचित राहतो. एक म्हण आहे "बिन भोजन के भगवान कहाँ ?"

अशा प्रकारे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या अल्प संख्याकांना व मागासवर्गीयांना फक्त शैक्षणिक सवलत देऊन चालणार नाही, तर त्यांना आर्थिक साह्यही दिले गेले पाहिजे. यासाठी ज्या प्रमाणे विमानतळावर परदेशी जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून (३००) रुपये निधी घेण्याची पद्धत आहे, त्याच प्रमाणे देशातील इन्कम टॅक्स देणाऱ्या, प्रोफेशनल टॅक्स देणाऱ्या, विमानात, रेल्वेत व एस.टी. मध्ये प्रवास करणाऱ्या तसेच पंचतारांकित हॉटेलात राहणाऱ्या, सिनेमा पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून विशेष शैक्षणिक कर लागू करून या खर्चाची पूर्तता करण्यात यावी. या निमित्ताने फारशी भाषेतील एक काव्यपंक्ती आठवते.

अे जर तू खुदा निस्त लेकिन बखुदा काजी अुल हाजात व सत्तारूल अैसूब.

अर्थातच कवीला म्हणावयाचे आहे की, पैसा हा खुदा तर नाही पण त्याच्यात लोकांची कर्तृत्वे लपवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे व त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचीही शक्ती आहे

२. शिक्षणासंबंधी अल्पसंख्याक लोकांत असा गैर समज निर्माण झाला आहे की, शिक्षणामुळे काय फायदा होणार? नोकरी तर मिळणार नाही, त्यामुळे अशा अल्पसंख्यांकाचा विश्वास संपादन करणे जरुरीचे आहे, ज्या प्रमाणे मागास वर्गीयांना

नोकरीत प्राधान्य देण्यांत येते किंवा त्यांच्या जागा राखीव असतात, त्याच प्रमाणे अल्पसंख्याकांना ही नोकरीत राखीव जागा देऊन शिक्षणासंबंधी त्यांच्यांत निर्माण झालेला गैरसमज दूर करता येऊ शकतो. त्यांच्यात झालेला गैरसमज दूर करुन शिक्षणाकडे त्यांना आकर्षित करता येऊ शकते. या निमित्ताने शासन व जबाबदार लोकांनी मोठ्या मनाने माझे वरील विचारांना कबूल करावे. फक्त तोंडी सांगून अल्पसंख्याकामध्ये शिक्षण प्रसार करणे कठीण आहे. एका कवीने म्हटले आहे -

"जुबाँसे जोशे कोमी दिलमें पैदा हो नही सकता",
" उबलनेसे कुंवा उसतमे दर्या हो नही सकता".

अर्थात फक्त तोंडी सांगून कोणतेही कार्य चांगल्या प्रकारे होऊ शकत नाही, ज्या प्रमाणे विहिरीत कितीही पाणी खवळू लागले तरी ते नदीचे स्वरुप धारण करु शकत नाही.

३) ज्या ठिकाणी एकूण लोकसंख्याच्या १० टक्के अल्पसंख्यांक लोक राहतात त्याठिकाणी त्यांच्या मातृभाषेत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत यावी. ही व्यवस्था ग्रामपंचायत नगरपालिका किंवा जिल्हा परिषद तर्फे न राबविता शिक्षण संस्थेमार्फत नवीन शाळांना अनुदान संहिता मंजूरी देऊन अल्पसंख्याकांच्या शिक्षणाचा विस्तार करता येऊ शकतो.

४) तसेच नगरपालिका, जिल्हा परिषद व संस्थेमार्फत चालणाऱ्या अल्पभाषिक शाळांच्या तपासणी व मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरावर एक उपशिक्षणाधिकारी (उर्दू भाषिक) किंवा विभागीय पातळीवर एक उर्दू भाषिक शिक्षणाधिकारी नेमून अशा अल्पभाषिक शाळांच्या तपासणी, मार्गदर्शन व वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वरील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

५) भारतीय समाजाची रचना धर्मावर आधारित आहे, याचा फायदा घेऊन धर्मस्थळावर यात्रा, ऊरूस अशा ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, जेणे करून लोकांत शिक्षणासंबंधीचे आकर्षण निर्माण होतील व आपल्या उद्देशाची पूर्तता होईल. तसेच वक्क बोर्डातर्फे मशीदीच्या इमामस जुम्माच्या दिवशी असे बंधन असावे की नमाज सुरू होण्याअगोदर (खुताबा अगोदर) शिक्षणाच्या महत्त्वावर विचार मांडणे एवढेच मुद्दे माझ्या लक्षात आहेत. ज्याच्या सहाय्याने आपण अल्पसंख्याकांमध्ये शिक्षणासंबंधी विस्तार करू शकतो. त्यांच्यात शिक्षणासंबंधी आस्था निर्माण करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्या समाजाची प्रगती घडवून आणता येऊ शकते.

हेच मुद्दे संक्षिप्त अशा प्रकारे आहेत.

१) शिक्षणाबद्दल जागृती निर्माण करणे.
२) आर्थिक अडचणी दूर करणे.
३) शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देणे.

४) शिक्षणानंतर शिक्षण वाया जाऊ नये या संशयाला दूर करणे.

५) प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि नगर पालिकेच्या सभासदांना असे बंधन ठेवावे की त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणतीही व्यक्ती अशिक्षित राहता कामा नये.

६) बालवाड्या व प्राथमिक शाळांना संस्थेमार्फत अनुदानासहित शाळेची मंजुरी देणे.

७) या निमित्ताने खर्चाची पूर्तता करण्यासाठी वरीलप्रमाणे कर आकारणी करणे.

८) प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अल्प भाषिक उपशिक्षणाधिकारी किंवा विभागीय पातळीवर अल्पभाषिक शिक्षणाधिकारी नेमणे.

९) शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याकरिता शासकीय यंत्रणांचा भरपूर वापर करावा.

१०) धार्मिक स्थळ व धार्मिक उत्सवात सुद्धा शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे फलक अथवा रंजक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

११) मशिदीच्या इमामास वक्क बोर्डा तर्फे बंधन असावे की शुक्रवारच्या नमाजाअगोदर म्हणजे खुतबा सुरू करण्यापूर्वी शिक्षणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकणे.

१२) अल्पसंख्यकांच्या भाषांच्या शाळांबद्दल सरकारच्या आपुलकीच्या धोरणाला काना डोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकारची नजर असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०
रौप्यमहोत्सवी कार्यक्रम

**समानतेसाठी शिक्षण – मुलींचे शिक्षण**

**कृतिसत्र – परिसंवाद – मेळावा**

## – अहवाल –

दि. ३ ते ५ मार्च १९८९

**स्थळ** : सेवासदन अध्यापिक विद्यालय, नागपूर

म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे १९८८-८९ हे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहे. या वर्षामध्ये परिषदेने विविध प्रकारचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्त्री शिक्षणास दिलेले विशेष महत्त्व लक्षात घेऊन "समानतेसाठी शिक्षण – मुलींचे शिक्षण " या विषयावर परिसंवाद – कृतिसत्र व मातृप्रबोधन प्रकल्प मेळावा आयोजित करण्यास शासनाने मान्यता दिली होती त्याप्रमाणे दि. ३, ४ व ५ मार्च १९८९ रोजी हा कार्यक्रम सेवासदन अध्यापिका विद्यालय, नागपूर येथे संपन्न झाला, या कार्यक्रमास सोलापूर, नागपूर, लातूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यात मातृप्रबोधन प्रकल्पाचे काम करणाऱ्या ६७ प्राथमिक शिक्षिका, मातृप्रबोधन प्रकल्पात काम करणारे १८ अधिकारी (शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी) महाराष्ट्रातील शिक्षण विभागातील २१ महिला राजपात्रेत अधिकारी व २५ इतर अधिकारी वर्ग याप्रमाणे शिक्षणविभागात वेगवेगळ्या पदावर काम करणाऱ्या १५० व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचा तीन दिवसांचा संक्षिप्त अहवाल खाली नमूद केला आहे.

### शुक्रवार दि. ३ मार्च १९८९

### 'समानतेसाठी शिक्षण – मुलींचे शिक्षण – कृतिसत्र–परिसंवाद व मेळावा' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन व मातृप्रबोधन प्रकल्प मेळावा

मा. श्री. व रा. नागपुरे, संचालक, म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३० यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २.०० वाजता या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन समारंभास सुरवात झाली. श्रीमती नमिता प्रधान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर या प्रमुख पाहुण्या होत्या.श्रीमती नमिता प्रधान यांनी मातृप्रबोधन प्रकल्पानिमित्त आयोजित केलेल्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. त्याचप्रमाणे 'मुलींचे शिक्षण' या पुस्तिकेचे प्रकाशन केले. पुस्तिकेच्या प्रकाशनानंतर प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. श्री व. रा. नागपुरे यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर आभारप्रदर्शन होऊन दुपारी ३.३० वाजता उद्‌घाटन समारंभ संपला.

दुपारी ४.०० वाजता मातृप्रबोधन प्रकल्प मेळाव्यास सुरवात झाली. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान श्री. व. रा. नागपुरे, संचालक, म.रा.शै.सं.प्र.प. पुणे यांनी भूषविले. यावेळी नागपूर, सोलापरू, लातूर, व सिंधुदूर्ग या चार जिल्ह्यात मातृप्रबोधन प्रकल्पाचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी व शिक्षिकांनी आपले अनुभव व समस्या सभेपुढे मांडल्या. या प्रत्येक जिल्ह्यातून एक अधिकारी व दोन शिक्षिका याप्रमाणे एकूण ४ अधिकारी व आठ शिक्षिकांनी या अनुभव कथनात भाग घेतला. यानंतर झालेल्या चर्चेमध्ये उपस्थित महिला राजपत्रित अधिकारी व इतर अधिकारी वर्गाने भाग घेऊन प्रकल्पासाठी मोलाच्या सूचना केल्या. अध्यक्षीय समालोचनानंतर आभारप्रदर्शन होऊन मेळाव्याचा कार्यक्रम सायंकाळी ७.३० वाजता संपला.

यानंतर ८ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी योजना तयार करण्यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांचे विषयानुरूप सहा गट करण्यात आले. यावेळी या विषयांची माहिती देऊन गटप्रमुख नियुक्त करण्यात आले.

शनिवार दि. ४ मार्च १९८९

**'समानतेसाठी शिक्षण — मुलींचे शिक्षण-परिसंवाद'**

हा परिसंवाद दोन सत्रात आयोजित करण्यात आला.

पहिल्या सत्राची सुरवात सकाळी ९.०० वाजता श्रीमती विद्या बाळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी खालील वक्त्यांनी त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या विषयावर आपले शोधनिबंध सभेपुढे सादर केले.

१. श्रीमती सुगंधा शेंडे — अनुसूचित जातीच्या मुलींचे शिक्षण

२. श्रीमती कमल सारडे — मातांचे शिक्षण व जाणीव जागृती

३. श्रीमती नलीनी जोशी — ग्रामीण भागातील मुलींच्या आरोग्यविषयक समस्या.

४. श्रीमती शालीनी मेनन — मुलींचे शिक्षण — मानवी साधन सामग्रीच्या विकासासाठी

उपस्थित अधिकाऱ्यांनी व शिक्षिकांनी यावेळी झालेल्या चर्चेत उत्साहाने भाग घेतला. अध्यक्षीय, समालोचनानंतर आभार प्रदर्शन होऊन १ ले सत्र दुपारी १.०० वाजता संपले.

श्रीमती शालीनी मेनन, रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २.३० वाजता दुसऱ्या सत्राची सुरवात झाली. यावेळी खालील वक्त्यांनी त्यांच्यापुढे नमूद केलेल्या विषयावर आपले शोधनिबंध सभेत मांडले.

१. श्रीमती नलीनी लढके — राष्ट्रनिर्मितीसाठी मुलींचे शिक्षण

२. श्रीमती मेधा साने — संक्रमणावस्थेतील नोकरी करणारी स्त्री

३. श्री. मचाडो – परिसर परिचय पद्धतीने शिक्षकांचे प्रशिक्षण
४. श्रीमती विद्या बाळ – मुलामुलींचे समान संस्कार वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण
५. डॉ. उषा नायर – उज्वल भविष्यासाठी मुलामुलींचे शिक्षण

प्रत्येक शोधनिबंधानंतर झालेल्या चर्चेत उपस्थित अधिकाऱ्यांनी व शिक्षिकांनी उत्साहाने भाग घेतला. अध्यक्षीय समालोचनानंतर आभारप्रदर्शन होऊन सायंकाळी ५.०० वाजता परिसंवादाचे २ रे सत्र संपले.

यानंतर नियुक्त केलेल्या ६ गटांनी सायंकाळी ५.३० ते ७.३० पर्यंत गटकार्य करून मुलींच्या शिक्षणासाठी विविध योजनांचा आराखडा तयार केला.

**रविवार दि. ५.३.१९८९**

सकाळी ९ ते ११ या वेळामध्ये वर उल्लेखिलेल्या ६ गटांनी आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी काही योजना व शिफारशींची निवड करून त्याचे संकलन केले.

सकाळी ११.०० वाजता समारोप समारंभास सुरवात झाली. अध्यक्ष स्थानी प्रथित यश लेखक डॉ. मधुकर अष्टेकर होते. व प्रमुख पाहुण्या डॉ. उषा नायर, प्रोफेसर, एनसीइआरटी, नवी दिल्ली या होत्या. प्रास्ताविक डॉ. सुनंदा इनामदार, उपसंचालक एससीइआरटी पुणे यांनी केले व त्यामध्ये ६ गटांनी तयार केलेल्या १० योजनांचा व शिफारशींचा संक्षिप्त अहवाल सादर केला.

कार्यगटांनी तयार केलेल्या योजना

१. मातृप्रबोधन योजना.
२. प्राथमिक शाळांच्या व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे उद्बोधन.
३. मुलींच्या शिक्षणास गती व दिशा देण्यासाठी व जाणीव जागृतीसाठी पूरक साहित्यनिर्मिती.
४. बारा ते चौदा वयोगटातील मुलींसाठी हितगुज मेळावे.
५. मुलींच्या शिक्षणासाठी विशेषकार्य करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना पारितोषिक योजना.
६. अर्थार्जन करत असलेल्या व त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलींच्या पालकांना अर्थसहाय्य योजना.
७. समाज प्रबोधनाचा राज्यव्यापी कार्यक्रम.
८. मुलींच्या शिक्षणात उद्भवणाऱ्या विविध समस्यांच्या संशोधनासाठी अर्थसहाय्य योजना.
९. प्राथमिक शाळातील (इ. १ ते ४) मुलांना मधल्या वेळचे जेवण देण्याची योजना.
१०. अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींसाठी विशेष योजना.

यानंतर प्रमुख पाहुण्या डॉ. उषा नायर यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. आभार प्रदर्शनानंतर तीन दिवस चालू असलेल्या या कार्यक्रमाची सांगता झाली.

## समानतेसाठी शिक्षण मागासवर्गीय, आदिवासी व अल्पसंख्यांक यांचे शिक्षण परिसंवाद दि. १९ व २० मे १९८९

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मनुष्यबळ व साधनसंपत्ती द्वारे स्वयंपूर्ण राष्ट्र घडविणे व समान व सोशिक समाज घडविणे याकरीता वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनातून भरघोस प्रयत्न करण्यात आले. समाज परिवर्तनाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून शिक्षणावर भर देण्यात आला व राज्य घटनेप्रमाणे वयाच्या १४ वर्षेपर्यंत प्राथमिक शिक्षण द्यावयाचे अभिवचन देण्यात आले, असे जरी असले तरी मागील ४० वर्षात मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक व स्त्रिया यांची ज्या गतीने प्रगती होणे आवश्यक होते तशी ती होऊ शकली नाही. व त्यामुळे या समाजाचा पाहिजे तसा शैक्षणिक विकास होऊ शकला नाही.

परिषदेच्या रौप्यमहोत्सवी समारोहाच्या निमित्ताने शिक्षणाच्या या महत्त्वपूर्ण घटकावर समाजातील विचारवंतांनी, शिक्षणतज्ज्ञांनी व कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन विचारमंथन करावे, या मुळ उद्देशाने "समानते करिता शिक्षण" हा विषय निवडण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात या विषयास दिलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता मागासवर्गीयांचे शिक्षण, आदिवासीचे शिक्षण व अल्पसंख्यांकांचे शिक्षण यावर दि. १९ व २० मे रोजी औरंगाबाद या ठिकाणी राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यात आला.

या परिसंवादाकरिता शिक्षणाच्या विविध क्षेत्रात काम करणारे शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, समाज कार्यकर्ते, यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी आपले शोधनिबंध परिसंवादात सादर केले.

वरील परिसंवादाच्या निमित्ताने परिषदेने मागासवर्गीयांचे शिक्षण, अल्पसंख्यांकांचे शिक्षण, आदिवासींचे शिक्षण या तीन विषयांवर पुस्तिका तयार केल्या. त्यात तीनही घटकांची आजपर्यंतची वाटचाल करण्यात आलेले प्रयत्न, समाज सुधारकांचा सहभाग व आकडेवारी याचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

दि. १९ मे १९८९ ह्या दिवशीच्या प्रथमसत्रात "आदिवासींचे शिक्षण" या विषयांच्या परिसंवादात डॉ. श्रीमती सुनीता जोशी, पुणे श्री. चंद्रामगुरुजी, सोलापूर, श्री. ऋ.स.जांभुळे, पुणे, श्री गोविंदभाई श्रॉफ औरंगाबाद यांनी भाग घेतला.

डॉ. सुनीता जोशी यांनी आदिवासी विभागात अनेक बाबींचा अभाव, उदा. शिक्षकांच्या नेमणूका, आदिवासीकडे बघण्याची योग्य वृत्ती, समाजाचा सहभाग, पालकांचे प्रबोधन, शाळांची स्थिती, विद्यार्थ्यांची उपस्थिती, योग्य प्रशासकीय दृष्टिकोन याची कमतरता असल्याचे प्रतिपादन केले. व आदिवासींच्या उन्नतीकरिता आदिवासींच्या बोलीभाषेतून पुस्तकांची निर्मिती व शिक्षक कार्यकर्ते ह्यांना बोलीभाषेचे प्रशिक्षण देण्याची

गरज नमूद केली. त्याचप्रमाणे आदिवासी विकासासाठी कार्यरत असलेल्या विविध घटकामध्ये समन्वय साधून श्रमाचा अपव्यय टाळावा असे सांगून त्यांनी कालबध्द कार्यक्रमाच्या आवश्यकतेवर भर दिला या प्रसंगी झालेल्या चर्चेत शिक्षणाचा व्यक्तीवर होणारा परिणाम, शिक्षणाचा लाभ कितपत पोचला व आदिवासी संस्थांचा शिक्षण कार्यात पुढाकार इ. विषयावर चर्चा झाली.

श्री. चंद्रामगुरुजी यांनी माणसांना माणसासारखे जगता येण्यासाठी शैक्षणिक क्रांती झाली पाहिजे असे सांगितले. समाजकल्याण खात्याकडे असलेले शिक्षणाचे व वसतिगृहाचे काम शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात यावे असे नमूद केले. त्याचप्रमाणे शिक्षण व व्यवसायाची सांगड घालणे, भटक्या जमातीकरिता फिरत्या शाळा उघडणे, कालबद्ध कार्यक्रमाची गरज व आदिवासी भागात काम करणाऱ्यांच्या मनात आत्मीयतेची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

श्री. गोविंदभाई श्रॉफ यांनी केवळ आर्थिक तरतूदींनी वृत्तीत बदल होत नाही. सेवाभावी वृत्तींची गरज असल्याचे नमूद केले. इतरांनीही चर्चेत भाग घेतला.

श्री. ऋ. स. जांभुळे, शिक्षण संचालक यांनी अध्यक्षीय समारोप करताना सर्वमुद्यांचा परामर्श घेऊन शासन करीत असलेले प्रयत्न नमूद केले.

मागासवर्गीयांचे शिक्षण या परिसंवादाकरिता श्री. एन. डी. शिंदे कराड, प्राचार्य बनसूडे सोलापूर, श्री. प्रा. व्या. ह. कल्याणकर, औरंगाबाद श्री. ऋ. स. जांभुळे, शिक्षण संचालक व श्री. वि. वि. चिपळूणकर माजी शिक्षण संचालक यांनी भाग घेतला.

या विषयावरील चर्चेच्या राखीव जागा भरण्याकरिता कालबद्ध कार्यक्रम, मागासवर्गीयांमधून पुढे आलेल्या पुढाकार, गणित या विषयामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांची होणारी गळती व कुचंबणा, पालकांसाठी जनजागरण, मोहिम, गुणकर्माधिष्ठित सनाज व्यवस्था, व गणवेश, पुस्तके वाटपाची आवश्यकता, आर्थिक विषमतेचे विफलन व समाज प्रबोधनाची आवश्यकता, संस्था, वस्ती व विकासगट स्तरावर विशेष कार्यक्रम इत्यादी मुद्यांचा परामर्श घेण्यात आला.

अल्पसंख्यांकांचे शिक्षण या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्षस्थान मा. ना. जावेदखान, शिक्षणराज्यमंत्री ह्यांनी भूषविले. श्री. व. रा. नागपुरे संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, यांनी प्रास्ताविक परिसंवादाच्या विषयासंबंधी सद्य:स्थिती व आकडेवारी स्पष्ट केली व पहिल्या दोन सत्राच्या चर्चेचा वृत्तांत सादर केला. खालील वक्त्यांनी आपल्या शोध निबंधावर आधारित विचार मांडले.

सर्वश्री अन्सारी (कामठी), फॉदर ग्रेगरी लोबो (मुंबई), डॉ. दोस्त महंमद

(औरंगाबाद), अहमद अबूद चाउस (बीड), किर्तीभाई व्यास (मुंबई), जॉन देसाई (नाशिक)

सर्व वक्त्यांच्या भाषणातून व चर्चेतून खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले.

१. धर्म, जात, भाषा या पलिकडे जाऊन अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासाचा विचार व्हावा.

२. अल्पसंख्यांकांत रुढ झालेले काही गैरसमज दूर करण्यात यावे.

३. या समाजात असलेली शिक्षणासंबंधीची अनास्था दूर करण्यात यावी.

४. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याची जबाबदारी समाज सुधारकांनी घ्यावी.

५. व्यवसायाभिमुख शिक्षणाची आवश्यकता.

६. सर्व स्तरांवर मातृभाषेचा माध्यम म्हणून वापर व्हावा.

७. जिल्हा स्तरावर किमान एक बहुभाषिक शाळा स्थापन करण्यात यावी.

८. इंग्रजी माध्यमाच्या शाळाबाबत शासनाचा सापत्नभाव

९. अल्पसभाषिकांच्या शैक्षणिक प्रगतीचे सर्वेक्षण व पूर्वनियोजन.

१०. असलेल्या सवलतींचा संपूर्ण लाभ न होणे यासाठी मिळत असलेल्या सवलतींचा सखोल अभ्यास होण्याची गरज.

११. भाषिक पूर्वग्रह, सोडणे आवश्यक, अल्पभाषिक व बहुभाषिकांचे सहअस्तित्व आवश्यक व पालकांचे उद्‌बोधन.

**गोषवारा व शिफारशी :—**

१. आदिवासींकडे बघण्याचा दृष्टिकोन समाजाने बदलावा व सर्व समाजाने एकत्रित येऊन आदिवासींच्या पुनरुत्थानाचे कार्य हाती घ्यावे.

२. पालकांचे प्रबोधन करून शाळांची स्थिती सुधारण्यात यावी व विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याचे प्रयत्न व्हावेत.

३. आदिवासींच्या बोलीभाषेतून पुस्तकांची निर्मिती करण्यात यावी व शिक्षकांचे प्रशिक्षण करावे.

४. आदिवासी विकासाचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा.

५. समाजकल्याण खात्याकडील शाळा व वसतीगृहे यांचे प्रशासन शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात यावे.

६. भटक्या जमातीसाठी फिरत्या शाळा सुरू करण्यात याव्या.

७. मागासवर्गीयामधून पुढे आलेल्यांनी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी समान व्यासपीठ निर्माण करावे.

८. इंग्रजी व गणित यामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीवर होणाऱ्या परिणामामुळे सक्ती टाळण्यात यावी.

९. पालकांसाठी जनजागरण मोहिम हातात घ्यावी.

१०. विद्यार्थ्यांकरिता खास शिकविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

११. वस्ती, संस्था व विकासगट या तिन्हीही पातळीवर व्यक्ती विकासाचा नेतृत्व विकासाचा कार्यक्रम हातात घेण्यात यावा.

१२. अल्पसंख्यांकासाठी सर्व शाळांमधून मातृभाषेचा माध्यम म्हणून वापर करण्यात यावा व जिल्हास्तरावर किमान एक शाळा बहुभाषिक असावी.

१३. धर्म, जात, भाषा या पलिकडे जाऊन अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासाचा प्रयत्न व्हावा.

१४. अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक प्रगतीचे सर्वेक्षण व पूर्वनियोजन करण्यात यावे.

• • •

# शोधनिबंध लेखकांचा अल्प परिचय

**१) श्री. व रा. नागपुरे**

संचालक, म.रा.शै. सं. व प्र. परिषद, पुणे ३०

संचालक एस.सी.इ.आर.टी. पुणे या पदाची सूत्रे ग्रहण करेपर्यंत शिक्षण विभागातील विविध पदे भूषविली व शिक्षण विभागातील विद्याशाखा व प्रशासन शाखा या दोहोमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

* संपादक, जीवनशिक्षण

* संचालक, एस.सी.इ.आर.टी. पुणे या पदाची सूत्रे घेतल्यानंतर शिक्षक प्रशिक्षण व्यापक कार्यक्रम, मातृप्रबोधन प्रकल्प, शिक्षणासाठी साधन संपत्ती व समानतेसाठी शिक्षण या विषयावरील परिसंवाद या सारख्या अनेक उल्लेखनीय उपक्रमांचे सूत्रसंचालक.

**२) डॉ. उषा नायर**

एम.ए. पी.एच.डी.

प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ विमेन स्टडीज,

एन.सी.इ.आर.टी., नवी दिल्ली

* (दक्षिण आशियातील स्त्री शिक्षिका) या विषयावर पीएच.डी.
* स्त्री शिक्षणावर ६० संशोधनपत्रिका प्रसिद्ध.

**३) डॉ. आशा मुंडले**

एम.ए. पीएच.डी.

बी.ए. (संस्कृत)

एम.ए. (भाषाशास्त्र)

शिकागो विद्यापीठ (अमेरिका) येथे मानववंशशास्त्राचे उच्च शिक्षण घेतले. सुरूवातीची नोकरी शिकागो येथे नंतर एन.सी.ई. आर. टी. नवी दिल्ली व शिक्षणशास्त्र संस्था पुणे व इंडियन इन्स्टिट्यूट, पुणे येथे

निनाद फीचर्स एजन्सीमार्फत पुणे-मुंबई येथील मराठी वृत्तपत्रात दर्जेदार लिखाण प्रसिद्ध.

'अशी आहे मराठी बोली' हे भाषाविषयक व 'घर' हे कौटुंबिक समस्यांबद्दल अशी दोन पुस्तके प्रसिद्ध.

सध्या साप्ताहिक 'सकाळ' मध्ये 'नातीगोती' हे सदर नियमितपणे लिहीत आहेत.

**४) प्रा. शालिनी मेनन**

एम.ए. एम.एड.

एम.ए (इतिहास)

एम.ए. (अर्थशास्त्र)
एम.एड. शिक्षणशास्त्र पहिल्या वर्गात प्रथम क्रमांक
* १९५९ ते १९६१ सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्डातर्फे आयोजित प्रौढ स्त्रियांसाठी वसतिगृहाची व्यवस्थापक.
* १९६१ ते १९७० महिला विद्यालय रत्नागिरी या मुलींच्या प्रशालेत शिक्षिका.
* १९७० ते आजपर्यंत गोगटे कॉलेजमध्ये प्राध्यापिका १९७८ ते ८४ रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची कार्यवाह.
* हुंडाविरोधी शासकीय जिल्हा समितीच्या सभासद.
* रत्नागिरी एज्यु. सोसायटीच्या आजीव सदस्य.

लेखन

विविध वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके इ. मधून शैक्षणिक सामाजिक विषयांवर ६०० पेक्षा अधिक लेख प्रसिद्ध.

आकाशवाणीवरून व्याख्याने प्रसारीत (रत्नागिरी केंद्र)

**५) कु. नलिनी जोशी** एम.ए.

सध्या रिसर्च सेंटर फॉर विईमेन्स स्टडीज मध्ये ज्यू. रिसर्च फेलो म्हणून काम करीत आहेत.

पंचायत राज समितीमध्ये स्त्रियांचे स्थान किंवा बृहन महानगरपालिकेमध्ये स्त्रियांचे स्थान यापैकी एका विषयावर पीएच.डी. चा प्रबंध सादर करणार आहेत.
'कोकणवैभव' 'भक्तिसंगम' मुंबई सकाळ' मध्ये स्फुटलेख व कविता प्रसिद्ध.

**६) श्रीमती सुगंधा शेंडे**

एम.ए. बी.टी.
एम.ए. मराठी
एम.ए. पाली/प्राकृत
हिंदी विशारद
विभागीय शाळा निरीक्षिका, पुणे विभाग म.राज्य प्रशासकीय सेवा सध्या निवृत.
* डिप्रेस क्लासेस गर्ल्स होस्टेल नागपूर या संस्थेच्या १९५६ पासून उपाध्यक्षा.
* कर्मचारी महिला वसतिगृहाचे संचालन
* ऑल इंडिया प्रोगेसिव्ह विमेन्स ऑर्गनायझेशन च्या संस्थापक व अध्यक्ष.
* भारत स्काऊट व गाईड नागपूर जिल्हा गाईड व कमिशनर म्हणून कार्य १९६५-६६.
* महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलनाचेअध्यक्षपद, १९७८.
* स्त्री अत्याचार विरोधी परिषदेच्या सचिव, १९८०

लेखन

'आपले बाबा', 'गौतमाची गोष्ट 'सेवाग्राम' बाबासाहेबांची धम्मदीक्षा', अग्निशिखा इ. पुस्तके प्रकाशित.

* 'सावित्रीबाई फुले' पुरस्काराने सन्मानित १९८२
* 'दलितमित्र' पुरस्कार

म. राज्य समाजकल्याण विभाग १९८२

**७) श्रीमती नलिनी लढके** बी.ए. बी.एड.

१९४४ पासून अमरावती येथील नगरपालिका शालेत शिक्षिका, मुख्याध्यापिका.

* राष्ट्रीय अध्यापक पुरस्कार प्राप्त ५ सप्टें. १९७७
* महाराष्ट्र शासनातर्फे सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित ३ जाने. १९८७.
* अध्यक्षा महात्मा फुले विचार प्रसारक मंडळ अमरावती मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'फुलेवाणी' मासिकाच्या प्रकाशिका.

**८) श्रीमती ग्लोरिया डिसोझा** बी.ए. बी.एड.

१९८२ साली 'परिसर आशा' ही संस्था स्थापन केली. या द्वारा शहरी आणि ग्रामीण भागात परिसर शिक्षण पद्धतीचा जाणीवपूर्वक व परिणामकारक अभ्यास.

मुंबईतील ७५ पेक्षा जास्त खाजगी शाळांतून हा परिसर अभ्यास प्रकल्प चालू आहे.

नाशिक येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातर्फे नाशिक व कळवण ह्या दोन ठिकाणी परिसर परिचय अभ्यासक्रम चालू आहे.

मुंबई व भारतातील इतर मोठ्या शहरात शिक्षणशाला विषयक सभा व परिसंवादात सक्रिय भाग.

लेखन –

'लाईफ इज व लर्निंग गेम' तीन पुस्तिकींची (इंग्रजी) मालिका प्रकाशित.

**९) श्रीमती विद्या बाळ**

* किर्लोस्कर 'स्त्री', 'मनोहर मासिकांमधून लिखाण
* 'स्त्री' मासिकाच्या माजी संपादिका.
* प्रथितयश लेखिका व अध्यक्ष नारी समता मंच पुणे.

**१०) कीर्तिभाई व्यास**

प्राचार्य, प्रिमियर हायस्कूल व ज्यु. कॉलेज ऑफ कॉमर्स

एम.ए. एम.एड.

मुंबई, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तसेच गुजराथी विषय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष. गुजराथी साहित्य परिषदेचे सदस्य

इंग्लड, अमेरिका व कॅनडा देशांना शैक्षणिक भेटी दिल्या आहेत.

मुंबईचे महापौर श्री. पडवळ यांचे हस्ते उत्कृष्ट शिक्षक म्हणूण पुरस्कार प्राप्त.

**११) अहमद अबुद चाऊस** मॅट्रीक
गेल्या ३५ वर्षांपासून शिक्षणक्षेत्रात सेवा केली.

बीड नगरपालिका अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य म्हणून गेली १५ वर्षे सेवा करीत आहेत. सध्या बीड जिल्हा कॉंग्रेस (आय) चे उपाध्यक्षव अंजुमन इशाते तालीम, बीड या शिक्षण संस्थेचे सचिव म्हणून कार्य करीत आहेत.

**१२) डॉ. सौ. सुनीता जोशी**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे प्रकल्प सहयोगी म्हणून सध्या कार्यरत आहेत.
एम.ए. (संस्कृत)
एम.ए. (भाषाशास्त्र)
पीएच्.डी. संस्कृत

कोलामी व माडिया-गोंडी या भाषांतून बालवाडी आदिभारती शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका तयार केल्या आहेत. कोलामी शब्दकोश व कोलामी व्याकरण या पुस्तकांची निर्मिती. बोलीभाषातून तयार केलेल्या पुस्तकांच्या आधारे अध्यापन करण्याबाबत मार्गदर्शन करण्याकरिता शिक्षकांच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन.
आदिवासींविषयी समाज विज्ञान कोश (संपादक स. मा. गर्गे)
लोकराज्य, हाकारा, साधना इ. लेख प्रसिद्ध झाले आहेत.

**१३) श्री. एम.ए. एच. अन्सारी**
एम.ए.डी.टी.
निवृत्त प्राचार्य, एम.एम. रब्बानी, ज्युनिअर कॉलेज
(कला व विज्ञान) कामठी जि. नागपूर

एम.एम. रब्बानी, ज्युनियर कॉलेज संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्रातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या संघटनेचे उपाध्यक्ष.

उर्दू भाषिक मुख्याध्यापक संघटनेचे माजी उपाध्यक्ष, ३० पदांवर यशस्वीपणे कार्य केले आहे.

**१४) मा. दादासाहेब बीडकर**
शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे पूर्ण केले. शिक्षण चालू असताना १९३० च्या स्वातंत्र्य लढ्यात म. गांधीजींच्या प्रेरणेने प्रत्यक्ष सहभाग. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याबद्दल २ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा. १९३४ मध्ये झालेल्या बिहार भूकंप निवारण कार्यात स्वयंसेवक म्हणून काम केले.

१९४१ मध्ये महाराष्ट्रातील पहिले आदिवासी छात्रालय मुल्हेर येथे सुरू केले.
१९४२ मधील स्वातंत्र्य चळवळीत २ वर्षे कारावास शिक्षा.

१९४६ ते १९५२ मालेगांव मतदार संघातून आमदार म्हणून निवड १९५२ ते १९५७ महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे संचालक १९७२ मध्ये दलित मित्र म्हणून शासनाकडून सन्मान.

आजतागायत आदिवासी भागात छात्रालये, आश्रमशाळा, हायस्कूल्स याद्वारा शिक्षणाचे कार्य चालू आहे.

**१५) डॉ. मा. गो. माळी**

आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी जि. कोल्हापूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत.

**१६) श्री. पी. आर. पंचमुखी**

भारतीय शिक्षण संस्था, कोथरूढ चे संचालक.

**१७) डॉ. स्वाती शिरवाडकर**

भारतीय शिक्षण संस्था, कोथरूड या संस्थेत संशोधन कार्य करतात.

**१८) स. सुखदेवसिंह स. नारायणसिंह**

खालसा हायस्कूल, गुरुद्वारासाहेब, देगलूर रोड, नांदेड येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

**१९) श्री. राजाराम राठोड**

प्राचार्य

बळीराम पाटील, महाविद्यालय, औरंगाबाद

**२०) श्री. बेजॉन एन. देसाई**

बॉईज टाऊन पब्लिक स्कूल, नाशिक या संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत.

**२१) श्री. चंद्राम गुरुजी**

* भटक्या समाजामुळे गावोगावी फिरस्ती त्यातच शिक्षण पूर्ण केले.
* लोकशिक्षण व दारूबंदीचा प्रचार तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले.
* महाराष्ट्र शासनामार्फत "दलित मित्र" पुरस्कारने सन्मानित.
* समाज कल्याण खात्याचा "जनता पुरस्कार" प्राप्त
* १९६० मध्ये मागास समाज सेवा मंडळाची स्थापना
* राधा नेहरूनगर, सोलापूर परिसरात बालमंदिरापासून डी.एड. बी.ए. पर्यंतच्या शिक्षण संस्थांचा कार्यभार सांभाळतात.

२२) **श्री. वसंत बनसुडे**
प्राचार्य, दयानंद वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर
* १९६७ पासून आजपर्यंत २२ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव.
* शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कार्यकारीणी सदस्य

२३) **श्री. ना. ज्ञा. शिंदे**
बी.ए. बी.एड.
मुख्याध्यापक — श्री. शिवाजी विद्यालय कराड जि. सातारा
— सदस्य — कार्यक्रम सल्लागार समिती
महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.
— सदस्य — स्थायी व परीक्षा समिती (पुणे विभागीय मंडळ)
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
— सदस्य — कार्यगट, महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम पुनर्रचना समिती
— सदस्य — अभ्यासमंडळ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
— सदस्य — "जीवन शिक्षण" शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद प्रकाशन

२४) **श्री. दोस्त महंमद खान**
प्राध्यापक मराठवाडा शिक्षणशास्त्र महाविद्यालय औरंगाबाद, येथे सेवा
— अधिष्ठाता शिक्षणशास्त्र विभाग मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

२५) **श्री. बा. ह. कल्याणकर**
प्राध्यापक, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

२६) **श्री. गो. रा. म्हैसेकर**
माजी कुलगुरु मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
सदस्य — कार्यक्रम सल्लागार समिती
महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.
शैक्षणिक विचारवंत म्हणून विख्यात.

२७) **फादर ग्रेगरी लोबो**
मुख्याध्यापक - सेंट पॉल हायस्कूल, दादर
राज्य शिक्षण सल्लागार मंडळाचे सदस्य
महाराष्ट्रातील कॅथालिक शाळांचे अध्यक्ष
मुंबई मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मानसेवी दंडाधिकारी —
सदस्य- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पूणे



... Administration
17-B, Sri Aurobindo Marg,
New Delhi-110016
DOC, No ..... D-9053
Date ..... 22-02-96.
NIEPA DC
D09053